CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

G-1
69/20

अलमारी संख्या ____________

१६

खाना संख्या ____________

विवाह

बंडल संख्या ____________

फाइल की संख्या

क्रम-संख्या

फाइल का शीर्षक

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

G-1
69/20
954.03
CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

THE BHONSLES OF NAGPUR
(*1715–1772*)

1. *Extent.*—This section brings together over 300 letters, mainly pertaining to the Bhonsles of Nagpur and covering the period from the beginning of Shahu's reign to the death of Madhavrao I in 1772. For convenience of study the whole series is divided into two parts, the first of about 130 bringing the story of the Bhonsles up to the year 1761, which marks a distinct dividing line in Maratha politics, and the second, containing a larger number of about 180 but covering a shorter period of only twelve years, and therefore better adapted for intensive study.

The part played by the Bhonsles of Nagpur was so conspicuous in Maratha history that they came in for a large share in the total Maratha conquests over a period of more than fifty years, and this naturally accounts for the extent of their records.

2. *Kanhoji Bhonsle.*—The early struggles of the Bhonsles cannot yet be set down with accuracy, not a single paper relating to Parsoji, the founder of the Nagpur Rajas and first prominent adherent of King Shahu, having been hitherto discovered. Parsoji died in 1709 and was succeeded by his son Kanhoji who for some time had to remain in the background, working in collaboration with the first Peshwa, in an attempt to raise the fortunes of their master Shahu. The advent of Bajirao's forceful personality on the scene and his successful struggle against the Nizam soon exasperated Kanhoji so much that, out of jealousy, he openly defied Shahu's commands, and even conspired with his enemies. His cousin Raghuji, however, proved more tactful. He contrived to regain his master's favour, apprehended Kanhoji and had him imprisoned, with what ultimate fate history has not yet been able to determine.

3. *Raghuji I.*—Raghuji started his career in 1728 and by dint of personal valour combined with extreme circumspection, succeeded in carving out for himself an independent field for action in what is now known as Berar and the Central Provinces. He adroitly avoided an open rupture with the Peshwa and, having carried out a successful raid in the Karnatak, attained, in the estimation of the King, a position by no means inferior to that of Bajirao himself. But not finding the Karnatak a congenial field for his ambitious designs, he transferred his activities to the North and North-East where in 1742 he precipitated an open conflict with the new Peshwa Balajirao—a conflict which, unlike that of the Dabhade ten years before, happily had no tragic consequences; it was eventually adjusted at Satara by Raja Shahu in the autumn of 1743. Thereafter the two prominent figures Raghuji and the Peshwa—though often mutually jealous and plunged into intrigues against one another, managed nevertheless to avoid an open clash, and often actually joined hands in furthering the extension and prestige of the Maratha Raj. Indeed the fact that Shahu's death passed off without a bloody revolution, is mainly due to the good sense of Raghuji, who, though repeatedly urged by the King to visit him on his death-bed, managed to

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

postpone his arrival at Satara till after his master's decease and until the succession of Ramraja had been finally settled. Having clearly grasped the position of affairs at that critical juncture and being convinced that the Peshwa alone was capable of handling the critical situation to the best advantage, Raghuji gave the latter his whole-hearted support, in spite of the pressure brought to bear upon him from influential quarters. Had Raghuji joined in the intrigues of Tarabai and Damaji Gaikwar, the odds would probably have been too strong for the Peshwa to cope with, and would possibly have launched the kingdom upon a disastrous civil war. This phase of Raghuji's character is disclosed in unmistakable colours by the copious papers here presented to the reader for the first time. Indeed, the student cannot help sighing for further details of Raghuji's remarkable personality, which for more than thirty years bulks so largely in Maratha history but which was very imperfectly known till now.

4. *Raghuji's death.*—The essentially Maratha character of the town of Nagpur, which was in many respects a prominent rival to Satara, indicates that Raghuji and his co-adjutors took incessant pains to transfer thither a fresh stock of Deccani people of all classes and to colonise with them the north-eastern regions of Central India, in order to bring them under a refining influence. Raghuji died in 1755 having, it may be presumed, reached the limit of sixty years of age. His greatest achievement is the conquest of Bengal, an authentic account of which yet remains to be brought to light in all its details.

5. *Raghuji's four sons.*—Raghuji's death opens a new chapter in the history of the Bhonsles. His four sons, though able and clever, became victims of continued family dissension and selfish intrigue, often playing into the hands of their advisers, and thereby bringing ruin upon themselves and affording the Peshwa a long-sought opportunity for mastering the semi-independent state of Nagpur. The papers referring to the period from the death of Raghuji to that of the Peshwa six years later, speak largely of disorder and chaos in Nagpur and will certainly be found full of historical interest.

6. *Contemporary History : the two campaigns of Madhavrao against Nagpur.*—The post-Panipat career of the Bhonsles deserves to be studied with the help of contemporary Indian history, particularly as recorded in the five precious volumes of the Persian Calendars printed by the Government of India. When thus studied the present papers will yield a consecutive narrative of the events with which thé Peshwa Madhavrao I and his advisers had to deal. The Peshwa's struggle for power with his uncle is found fully reflected in the attitude of the Bhonsles, but what strikes the student most in them is the masterly manner in which that stern young ruler conducted two most successful campaigns against the brothers, one in 1765-66 and the other in 1768-69, completely humbled their spirit of insubordination and, after inflicting a crushing defeat upon them, converted these age-long opponents into friends and supporters. Many pitched battles and many more heroic deeds than we were formerly aware of, not to mention many secondary episodes of a more or less

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

remarkable character will be found graphically recorded in the plentiful papers of these two memorable campaigns ; for instance, while the Peshwa is pursuing the Bhonsle brothers during 1765, the Diwani of Bengal had just been granted by the Emperor to Lord Clive and the fugitive Nabab Meer Kasim is found appealing to Janoji Bhonsle for help to attack the English. The request is repeated in 1769. The vain appeals of Janoji to the English authorities of Bengal for payment of *Chauth*, so emphatically recorded in the Persian Calendars, would possibly have proved successful had the Peshwa lived to support the Bhonsles. But both Janoji and the Peshwa were cut off by a premature death within a few months of each other, and Maratha history assumes a different character after the English were allowed to exercise unfettered control in Bengal.

7. *Nana Fadnis' early training.*—Another remarkable point in these papers is the silent training in administration which the young Nana Fadnis was receiving at Poona under the eye of his great task-master. Nana is seen to be attending to every detail of the distant campaign, supplying funds and men, removing the difficulties of those at the front, and prodigiously exerting himself to build up a sound Maratha policy. It is this early training which enabled Nana later on to hold the reins of the Maratha empire so cleverly for over thirty years.

8. *Fitness of papers for intensive study.*—Madhavrao's campaign against Janoji in 1769 is here illustrated by papers running on in sequence from day to day—a feature which the student of history so greatly appreciates. One famous general of the Bhonsles by name Narhar Ballal waged a heroic struggle for his master and was killed in a pitched battle in Berar ; both the hero and the battle have so far been entirely unknown in history. The Peshwa's attention to minute administrative details even in the midst of an arduous campaign is here illustrated in his having ordered the famous betel plants of Ramtek to be taken to Poona for cultivation in the Deccan. But it is well to leave the student face to face with the original papers without any further introduction.

Says C. U. Wills in his history of the Nagpur State (p. 220) :—Jenkins' verdict that "The advent of the Marathas 'no doubt accelerated the general prosperity' of the country may be accepted as authoritative. The Nagpur Rajas substituted one indisputable authority for a score of rival or rebellious chieftains and secured for an agricultural people that immunity from external disturbance and stability of village life which were essential preliminaries to progress. In Orissa, as in every other outlying portion of the kingdom, the Nagpur administration did not function. But Sir W. Hunter's exposure of Maratha misrule in that remote and isolated province must not be taken as justifying a general condemnation of the Nagpur Government. Wherever they could stabilize their authority the rule of the Nagpur Bhonsles constituted an immense advance upon the system which had gone before it. In establishing over a greater part of the kingdom direct relations between the Raja and the cultivating classes, they rendered a special service to the country. The introduction of direct Maratha rule, wherever it was well established, meant far more than this. It laid the first foundations of a regular revenue system ; it encouraged

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

immigrations ; it fostered trade as a necessary means of converting raw produce into specie ; and it stimulated the economic development of the country. The territory which now forms the Central Provinces was in pre-Maratha times a back-water but remotely connected with trade conditions and political movements in other parts of India. The Nagpur Bhonsles brought this back-water into the broad stream of Indian economy and history, just as the British have since linked it with ocean currents of world politics and prices."

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 25



Facsimile of the handwriting of Raghoji Bhonsle. *(Died on 14-2-1755)*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 110



Facsimile of the handwriting of Mudhoji Bhonsle. *(Died on 19-5-1788)*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh



Facsimile of the handwriting of Diwaker Purushottam Chorghode. *(Died in 1781)*

No. 150

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh



Facsimile of the handwriting of Janoji Bhonsle. *(Died on 21-5-1772)*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh


श्री

Facsimile of the handwriting of Sabaji Bhonsle. *(Died 1775)*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 1] [*17-2-1715 ?*

शाहु द. रु. नं. ४९ रा सुा खमस

खर्च माहरीर

सभासद

रा शामराऊ पिलाजी छ २३ सफर मारनिलेची असामी हुजूर सभासदांत घालून सनद दिल्ही जे. चांदांचे राजकारणांस पूर्वी रा विसाजी रघुनाथ पाठविले होते तो कार्यभाग तुम्हास सांगोन पाठविले असे. एकनिष्टपणें स्वामीकार्य करीत जाणे. तुम्हांस वेतन सालीना देखील पालखी भोई व चाकर दाा सालीना होनु पातशाही ३००० पडले असेत. वजावटाव दंडकप्रमाणें वजा करून बाकी हक सिरस्ताप्रमाणें घेत जाणें. चाकर मोईनप्रो ठेऊन जमासुदगी लिहवाल त्या दिवसापासून चाकराचा हक घेत जाणे. घोडे बारगीर खा[1] करून वागवीत जाणे. तैवज पानसुपारी प्रयोजनमाफीक खर्च करीत जाणे.

मारनिलेचे रयानगीस साहित्यपत्रें दिल्हीं. जमान बावाजी गोविंद जमेनवीस दिा भिकाजी कोकरे.

¶*This and the next paper explain Shahu's early plans in Berar and in Chanda in Central Provinces. This purports to be a Sanad enrolling Shamrao Pilaji in the nobility and fixing his yearly allowance at 3,000 hons.*

No. 1A] [*17-2-1715 ?*

शाहु द. रु. नं. ४९ रा सुा खमस

खर्च बाा मुा मोहरीर

शामराऊ पिलाजी छ २३ सफर.

रा सुलतानजीराऊ निबाळकर व रा कानोजी भोसले यास पत्र जे मशारनुल चांदाचे राजकारणास पाठविले आहेत तुम्ही यांची हरभांत साहेता करून वार्षिक तहरह पोख्ता प्रतिवर्षी होऊन ये ते करणें येणेप्रमाणे पत्रें.

रा कानोजी भोसले यास १ रा सरलस्कर यास १

---

१ खरेदी ?

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 2] [*30-4-1718 ?*

पो छ २२ जमादिलाखर

श्री

माहाराज राजश्री छत्रपति
स्वामीचे शेवशी

आज्ञाधारक कान्होजी भोसले सेनासाहेबसुभा सेवेशी विज्ञापना. येथील क्षेम तागायेत छ ८ जमादिलौवल पर्यंत स्वामीचे कृपाद्रष्टीकरून सेनासहवर्तमा(न) कुशल असो.

हो (बो?) स्वामीचे शेवेसी इरसाले[1] बिा

मोहरा सुमार	हती	घोडे	आरसा जडिते[2]
१०००	१	५	समेतै[3] जवाहीर
			मोत्य रास (?)
			१

येकून मोहर यक हजार, हती येक, घोडे ५ आरसा जडित यक, येणेप्रमाणे स्वामीचे शेवेसी रवाना केले असे, सेवेशी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Kanhoji Bhonsle sends jewellery and mohors to Shahu.*

No. 3] [*23-8-1725 ?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे शेवेसी

विनंती उपरी. राजश्री कान्होजी भोसले यांचा जो विचार होता तो सर्वास कळलाच होता. सांप्रत छ २९ जिल्हेज इंदुवारीं कुमठेयास रामाऊ जवळ गला व कांही कडबा व कांही नक्त मागावयास जातो, पागेची बेगमी करून येतो म्हणून बहाना करून दोन प्रहरा डेरामात्र तळावर टाकोन स्वार होऊनु कुमठेयास गेले तो अस्तमान जाहला. उटे डेरे बिशाँदीची समागमे होतीच, ती उतरोन तमाम चिलखतें चढविलीं. भाले तेथेंच टाकिले. सडे उंट व राऊत

टीप.—१ इर्साल—पाठविण्याचा पैका; The sending of remittances from villages to the zamindar or the district treasury and from thence to the exchequer. २ जडित—जडावाचा, ३ समेत—सहित. ४ सामान, मालमत्ता.

1888

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दोनसे ऐसे घेऊन एकसंबे कण्हेरखेड यावरून नाहावीचा घाट चढोन पुसेसावली उजवी टाकून मंगळवारीं दोन प्रहरा तासगांव येसाजी सिंदे याचे येथें दाखल जाहले. हें वर्तमान चौ घटका रात्रीं राजश्री स्वामीस कळलें. त्याउपरी त्याजकडील गोपाळ प्रभुहि आले त्यांणी कुमठेयास गेले म्हणूनच सांगितले. तेव्हा येमाजी सिवदेव यास बोलाऊन आणून तुम्ही पुढें जाऊन प्रात:कालेपर्यंत तट पाडा, आपण येतो म्हणून राजश्री स्वामीनी सांगितले, परंतु ज्यावयाचे कबूल न केले. त्याची स्थीतरीत ठावकी आहे. आम्हास वराडपावेतों घेऊन गेला तर काय करावें म्हणून यशवंतराऊ महादेव यास पाठवीत होते. त्याणीहि याच रीतीने जाब दिल्हा. मग भगवत सामराज व गोपाळ प्रभु पाठविले. आपण खासा पहाटेची प्रहर रात्री असतां स्वार होऊनु गेले. त्रिपुटीजवळ गेल्यावर पुढें गेले म्हणून खरेखुरे राजश्रीस कळलें. तेव्हां जेथें कान्होजी असेल तेथें आपण जाईन ऐसाच हेका घेऊन चालले. समागमें यमाजीपंत होते, त्याणी आपण जातों, फौज समागमें द्यावी माहाराजांनीं न यावें म्हणून बहुत बोलले. त्यावरी त्याजसमागमें दोनतीनसें हुजरात होती तितकी देऊन पुढें रवाना केले; मागती काये मनास आले तें नकळे पुढें यमाजीपंत मागे आदकोसावरी आपण ऐसे कान्होजी भोसले यांजकडील फौजेच्या दळवटानीच चालले, ते तिसरे प्रहरीं पुसेसावळी पुढें दोन कोसावर वडगावास गेले. तो वर्तमान खरेखुरें कळले तासगावास दाखल जाला. मग यमाजीपंतास पुढें रा। केलें की तुम्ही हे हुजरातीचे स्वार व आणखी आपणाकडील ऐसे पांचसातसे जमाव देऊन तासगावास आसपास राहा. कान्होजी कांही बहुत दिवस तासगावी राहणार नाहीं. निघेल ते समई गाठा म्हणून आज्ञा केली. यमाजीपंती मान्य करून निकाल काढला. यमाजीपंत पुढें गेले, आपण खासा माघारे फिरोन पुसेसावळीस आले. रात्रीचे राहिले. दुसरे दिवशीं दोन प्रहरा सातारा दाखल जाहले. तिसरे प्रहरीं तमाम सरदार आपाजी सोमवंशी व भापकर व चिमणाजी धायगुडे, व्यासेराऊ[१], संभुसींग जाधव, बंडगर यास पत्रें लिंहिले कीं बालाघाटावरून माहुरपटीस येईल तरी बातमी चौकस राखून तबी पोहोचवणें. यास मास पक्ष तिकडे छावणी करणे पडल तरी करणे म्हणून लिहिलें. आवजी कवडे यासहि पत्र लिा आण बोलिले आमचे आइकेल न आइके(ल) न कळे. याजकरितां स्वामीसहि पत्र लिहिलें आहे. मागाहून बहिरजी माहाडीक येऊन पावले. आवजी कवडे त्या प्रांती असिले तरी जाहल्या मजकुराचे

---

१ हा चंद्रसेनाचा नोकर. पुढें शाहूच्या पक्षास मिळाला. ह्याचा वंश सध्या कोठें आहे?

1889

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

परभारे आपले पत्र चितास येईल तरी रा करावे. जाहले वर्तमान सविस्तर कळावे याजकरितां लिा असे. यमाजीपंत कडेगावी आहेत. पुढें जाण्याची आज्ञा जाहली आहे. विदीत जाहलें पाहिजे.

¶*The whole letter is in Mahadoba Purandare's handwriting. He writes to Chimaji Appa an account of Shahu's own campaign against Kanhoji Bhonsle. The affair of Kanhoji Bhonsle is a new episode in history. The date of the letter is questionable.*

No. 4] [पो *14-9-1725 ?*

पौ छ १७ मोहरम

श्री

पुरवणी तीर्थरूप राजश्री राऊ ताा राजश्री आपा स्वामीचे सेवेसी

विनती उपरी. दरबारीचे वर्तमान तरी आजी छ १४ मोहरमी राजश्री प्रतिनिधि व राजश्री आमात्य व राजश्री पताजीपंत चिटन * दरबारास आले. त्यावर राजश्री खंडेराऊ दाभाडे सेनापति याणी विनंती पत्र पाठविले ते वाचून दाखविले. त्यावरून राजश्री पंताजीपंत+ याणी विनंती केली की दक्षणप्राते मसलत होणे आहे. याकरिता राजश्री सेनापतीचा सरजाम कराड प्राते आहे त्याची ताकीदपत्रें द्यावी आणि त्यास समाधानपत्र पाठवावे की विजयादशमीच्या मुहूर्ते तुम्हास प्रतिनिधि-समागमे दक्षणप्राते मसलतेस जाणे. याकरितां राजश्री कान्होजी भोसले यांजकडील समजावीस राजश्री बाजीराऊ पंडित प्रधान याजकडील त्यास आज्ञा करून त्या प्रांते रवाना (केले आ?)हेत, मारनिलेची समजावीस करून त्यास (प)दरी घेतील. तरी तुम्ही कुल फौजेनसी दक्षणप्राते मसलत करावयास येणे म्हणून विनंती केली त्याप्रमाणे समस्तानी स * * * कागदपत्र सिध करविले * * * * पाहिजे. सेवेसी श्रुत होय.

¶*Shahu prepares an expedition into the South and asks Dabhade and Kanhoji Bhonsle to accompany the Pratinidhi.*

No. 5] [*1725 ?*

श्री

पुा चिरंजीव राजश्री आपा यांसी आसीर्वाद उपरी. रा रघोजी भोसले सातारियास गेले आहेत. त्यांची समजावीस राजश्री स्वामीनी राजश्री फतेसिग

+ पंताजी शिवदेव सोमण राजाज्ञा.

1890

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

भोसले याचे विचारें करून समाधान केलें व जेष्ट मासपर्येत सातारियांस राहणें, मलकापूर परगणा इनाम करून देतो. त्यामध्ये रा। कान्होजी भोसले यास समध नाहीं. आगोटी कान्होजी भोसले हुजूर येतील. आलेतर उतम जाहाले. तिजाई सरजाम तुम्हांस देऊंन. जरी ते न आले तरी तुम्हांस तिजाई सरजाम देऊन, म्हणौन राजश्री स्वामीनी माारनिलेस आज्ञा केली म्हणौन चिरंजीव राजश्री दादोबा[१]नी लिहिले आहे. आपणास कळावें म्हणोन लिहिले असे. [+]लोभ असो दीजे हा आशीर्वाद.

¶*Bajirao informs Chimaji of the news he had received from Dadoba Purandare about Shahu having personally effected a division between Kanhoji and Raghuji Bhonsle by giving the latter one-third of the Jagir belonging to Kanhoji. Shahu agreed to give Raghuji in addition the district of Malkapur exclusively.*

No. 6] [*1725 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक नारो आपाजी कृतानेक सां। नमस्कार विनंती. येथील कुषल जाणोन स्वकीये लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. सेवकाकडील वर्तमान राजश्री रघोजी भोंसले पूर्वी महाराज राजश्री छत्रपति स्वामीचे दर्शनास आले ते समयीं आम्हांस मागें ठेऊन गेले. आपलें निशान व सिकें व च्यार सरदार होते ते स्वाधीन करून गेले. त्यास सेवकाच्यानें जे चाकरी जाली त्यास अंतराये न केला. राजश्री राणोजी भोंसले यानी क्रिया शपथ देऊन दगा केला. तेथून जिवंत निघावें यैसा अर्थ नवता. परंतु माहाराज राजश्री चे हूजुरे आले याकरितां मुक्तता जाली. दाहा सहश्र रुपये घेतले. तेथून स्वस्छानास आलों. त्यावरी येजमानाची पत्रें बहुत समाधानपूर्वक आली की मुलूक आम्हांकडे जाला. तुम्हीं फौज पोख्त जमा करणें. तुमचा जेथपर्यंत हात चालल तेथून पैसा घेऊन फौजेस देणें व कर्जहि जालें तरी करणें. परंतु जमाव मातबर करणें. त्यांचे आज्ञेवरून जे सेवा चाकरी जाली न जाली हें स्वामीस परस्परें विदित जालें असल. सांप्रत नवाबाचे मुलाजमतीनिमित्य औरंगाबादेस आले. आम्हासहि समागमें घेऊन आले. तेथें आलियावरी येका इमानाचे दोन इमाम करून

---

१ मल्हार तुकदेव पुरंदरे. + येथून बाजीरावाचें हस्ताक्षर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आम्हांस औरंगाबादेस ठेऊन आपण स्वार होऊन गेले. सेवा केली त्याचा फलात्कार सध्याच दाखविला या उपरी हेत हाच धरिला आहे कीं येक वेल स्वामीचे पाये पाहावे, सविस्तर वृत निवेदन करावें आणि उर्जित करून घ्यावें. यैसियास येजमानाच्या मामलियामुलें सर्व प्रकारें कर्जानें बुडोन राहिलों. ज्याचा पैसा घेतला त्यास फिरोन पावला नाहीं. त्यांचे तगादे आहेत. यास्तव माहाराज राजश्री स्वामीचे सेवेसी विज्ञाप्ति लिहिली आहे. स्वामी तों आमचे मुरबी आहेत. येविशयीं अभयेपत्रें आालिया सेवसी येऊन पोंहचूं. सर्व प्रकारें सेवकाचा आंगिकार करून उर्जित करावयास स्वामी समर्थ आहेत. आज्ञापत्राचा मार्ग लाक्षित बैसलों आहों. सेवेसी विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*Naro Appaji to the Peshwa: puts before him all his grievances that he had to suffer when he was left to manage the affairs by Raghuji in his absence and complains that these are not relieved by his master. " The Peshwa already knows how loyally he is serving ", says he.*

No. 7] [*1726*

श्री

सेवसीं विज्ञापना. राजश्री राणोजी भोसले याची यादी पाठविली आहे ते दप्तरी रूजू पाहोन लिहून पाटवणे म्हणून आज्ञा कली, त्यास त्यानी यादी लिहिली आहे ते पूर्वील सरजामाची. त्यातहि काही आधीक आहे. दफ्तर रूजू यादी पाटविली आहे. बाकी करार सरजाम राहिला आहे तेवढीच यादी बेरजेखरीज परगण लिहून समजाविसी करावी. बेरजेची यादी दुसऱ्याचे हातीं जाऊ देऊ नये. स्वामी-कारणे स्वामी गडावर गेले ते दिवसी भोपला येक व कणसे पाटविली व काल सुक्रवारी भोपला येक पाटविला तोहि पावलाच असेल ही विज्ञाप्ति.

¶*Ranoji Bhonsle's Saranjam is being fixed. The writer, the addressee and the date cannot be fixed.*

No. 8] [*26-5-1727*

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके ५४ प्लवंग सवत्सरे जेष्ट बहुल त्रितीया भृगुवासर क्षत्रियकुलावतंस श्री राजा शाहु छत्रपति स्वामी याणी सेनाधुरधुर विस्वासानिधि राजमान्य राजश्री कान्होजी भोसले यांसी आज्ञा केली ऐसीजे. तुम्हाकडील जासूद

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

दावलजी धुला व दादो चिंतामणी कारकून दिा जीवनराव शकर व भिवाजी पाटील मौजे पलसदेऊ याचे मारफातीने जिनस ताा आवजी पिगले व भिवजी मोरे हुजरे याजकडे याजकडे पावला बितपसील.

वजन बोरदी	सुमारी जिनस
।=।. सिसें वजन	३९ गोळे जंबुरेचे
१ दारू	वजन बोरदी (?)
१।=।	८॥९
	सुमार
	३३ सिसेचे
	२ लोखंडी
	३९
गोण्या मजीद सुमार ११	१७१९ गोल्या सुमार
	९८ जेजालाच्या
	१६१७ बदुखीच्या
	१७१९
	७० बाण सुमार
	६८ भरले दारू
	२ खाली[1] दारू नाहीं
	७०
	१८२०

येकून वजन बेरेदी[2] (खरेदी ?) येक खंडी सवासात मण व सुमारी जिनस अठरासे वीस व गोण्या मजीद सुमार अकरा येणेप्रमाणें हुजूर पावले.

¶*Shahu orders ammunition from Kanhoji Bhonsle.*

No. 9] [*1728?*

श्री

राजश्री पंडित प्रधान साहेबाचे सेवेसी

ॐ श्रीमंत रमांप्रसंन्न उतमगुणपरिपूर्ण निराधारियासी अधार जयेवंत सजन राये राजमान्ये * * * * स्नेहांकित गोरखोजी भापकर विनंती

---

१ खाली = मोकळे. २ बेरदी (?)

1893

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

उपरी. येथील कुशल जाणून साहेबी निजानंद वैभव लेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. राजश्री दावलजी कांटे वराड प्रांतें राजश्री कान्होजी भोसले यांजकडे आहेत. त्यासी तें साहेबांची सेवा करावयासी उमेदवार आहेत. दिढास्या स्वारांचे पतक आहे. तरी साहेबीं त्यासी आपलीं पत्रें दिल्ही पाहिजेत कीं ये प्रांतास येणे, तुमच्या रोजगाराचा सरंजाम करून देऊन, यैसी पत्रें दिल्ही पाहिजे म्हणिजे दावलजी काटे साहेबाचे पदरी पडतील. आणि कार्याचें मनुस्यें आहे याजकरितां आपण साहेबास विनंती केली आहे व साहेबांसहि ये गोष्टीची अगत्ये असिली तरी यासी दिलासियांचीं पत्रे दिल्ही पाहिजेत. येविषी आपण बहुत ल्याहावें यैसा अर्थ नाहीं. बहुत काये लिहिणें? कृपा लोभ असों दीजे हे विनंती.

¶*Gorkhoji Bhapker recommends to the Peshwa Dawalji Kate for being entertained into service.*

No. 10] [पोा *16-7-1729 or 5-7-1728*

पाा छ ३० जिल्हेज मुाा
माहाजन ताा रामराज

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री आपा स्वामीचे शेवेसी

विनंती उपरी. कान्होजी भोसले याच्या मजकुराची पत्रें सरदारास लिहिलीं ते समई राजश्री आनंदराऊ पंडित सुमंत यासहि पत्र लिहिले कीं आम्हाकडील चाकर नवाबानी ठेऊं नये, नवाबाकडील आम्ही ठेऊ नये, असा करार. त्यास आम्हाकडील जेवढा सरदार जातो तेवढा नवाब ठेवितात. उदाजी चव्हाण ठेविला. हाली कान्होजी भोसले पळोन गेले यासही ठेवला तरी ही गोष्ट आपणास कैसी कार्यास येईल? मजकुराचा प्रसंग पडतो, तेव्हां तुम्ही यात्रा करावयास जातां असे न करणे. नवाबास साफ पुसणे, जरी कान्होजी भोसले यास चाकर ठेवला तरी तह राहणार नाही म्हणून लिहिलें. नवाबास पत्र लिहविले कीं आपला आमचा करारदाद काय? अलीकडे आमचे चाकर आपण ठेवितात, त्यास कान्होजी भोसले याचे आगत्य आपणास आहे की काय हे मर्जी सांगोन पाठवावी, त्याचे सिफारस पत्र पाठविले जाईल म्हणून लेहून सर आनंदरायाकडे पाठविला. चितास येईल तरी देणे म्हणून लिहिले आहे. हे नोंधि कागद लेहून भाशण केले की नवाब उगाच बाऊ केला आहे. सला घडला सूद

1894

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तरी आपण हिसाब धरीत नाही म्हणून भाशण केले. नबाब ऐसेच करीत चालिला तरी त्याचा तह आम्हास कशास पाहिजे? बहुत क्रोधपूर्वक बोलले आहेत. विदित जाले पाहिजे हे विनंती.

¶*This letter from Purandare to Chimaji Appa explains why Kanhoji Bhonsle was arrested and punished by Shahu. He seems to have deserted the Peshwa and gone over to the Nizam who entertained him against the terms of the treaty that had been agreed to.*

(पत्राचे आरंभाचा भाग फाटला आहे.)

राजश्री कान्होजी भोसले याची मजमू सांगितली. तैनात सालीना होन पा। ५००० पाच हजार मोकरर केले आणि सिरपाव दिल्हा बा।

१ मंदील सरासरी.
१ सेला अष्टगोली.
—
२

¶*Shahu appoints the Muzumdar of Kanhoji Bhonsle.*

No. 11] [*1728?*

श्रीभवानी प्रसन्न

विनंती उपरी. रघोजी भोसले यांची दिवाणगिरी राजश्री स्वामींनी आम्हाकडे देविली आहे त्यास सनद सनदा दया करविली पाहिजे. राजश्रीचीहि परवानगी घेविली पाहिजे हे विज्ञापना.

¶*The writer is Yamaji Shivdeo who is appointed Diwan to Raghuji Bhonsle by Shahu.*

No. 12] [*25-8-1729*

श्री

बार छ ११ सफर सन सलासीन

यादी दि॥ रा॥ सेनापति सावळदबारे सरकार वेतालवाडी येथें राजश्री कान्होजी भोसले तोसीस देऊन फौजेच्या बळें दंगा करितात त्यास ताकीद पत्रें.

१ देशमुख देशपांडे.
१ भोसले यास

एकूण पत्रें दोनी देणें.+

¶*Shahu's letter reprimanding Kanhoji Bhonsle for encroaching upon the districts of the Senapati.*

+ कान्होजी भोसल्याचें बंडाव्यासंबंधीं शाहूचें पत्र.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 13] [*28-8-1729*

यादी साहित्यपत्रे सूद बार छ १४ सफर सनसलासीन

राजश्री कान्होजी भोसले यांस

खासगीचे महाल व बिा वगैरे महालांत तुम्ही घासदाणियाचे मनमाने तैसे रोखे करून जमीदारांस व परगाणियांस उपद्रव देऊन खासगीचे महाल खराब करून वसूल घेतां येविसीं ताकीदपत्र. संताजी आटोळे व कृष्णाजी आटोळे यांणीं सालगुा श्वारी करून गुरे नेली ते देणे. फिरोन कमाविसदाराचा बोभाट आला म्हणजे हुजरे येतील. गुरे हुजूर घेतली जातील. खासगीच्या माहालांत उपद्रव दिला म्हणजे उबार राहणार नाहीं. कमाविसदाराचा बोभाट आला म्हणजे तुम्ही जाणा.

¶*Kanhoji Bhonsle is ordered to desist from molesting the King's private Mahals and exacting Ghasdana in them.*

No. 14] [*4-10-1729 ?*

तालीक
छ २१ रोवल

श्री

सेवेसी विज्ञापना. राजश्री कान्होजी भोसले याकडील येसाजी सिधेश्वर येथे आले. नवाबाच्या भेटीस यत्न फार केला. परंतु भेटी जाहली नाहीं. आम्हाकडेहि आले होते. माहाराजाच्या पायासी येकनिस्ठतेच्या गोस्टी आण सपता वाहून सागतात. येथेहि शोध घेता काही त्याकडील आणिक विचार दिसो लागला नाहीं. राजश्री कानाजी भोसले याउपरी माहाराजाचे सेवेसी येतात म्हणून आण शपत करून आम्हास सांगत आहेत. व राजश्री येसाजी सिधेश्वरहि माहाराजाचे पायासी निस्टा धरीत आहे. यासी आज्ञा आल्यास सेवेसी येईल. त्याकडीलहि पत्रे शेवेसी येऊन सविस्तर श्रुत होत असेल. गौर करून चालवणार स्वामी धणी समर्थ आहेत. असे हे वर्तमान सविस्तर वृत्त राजश्री बावा मत्री व चिरजीव राउजीस लिहिले आहे. सेवेसी विनंती करितील. माहाराजाचे प्रतापे सर्व दुस्ट पराभवातें पावतील. नवाबास वेथा-7 फार श्रमी आहेत. दरबारच होत नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Letter communicating the efforts of Kanhoji Bhonsle to effect a reconciliation with King Shahu from whom he had been estranged and gone over to the Nizam. Kanhoji sent his agent Yesaji Sidheshwar to Shahu at Satara and asked him to visit the Peshwa also.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 15] [*16-4-1734*

माहे जिल्काद रोजकीर्द शाह सुरू

छ २२ चैत्र बहुल नवमी भौमवासरे मुा। शाहूनगर

रा। कान्होजी भोसले याचे कबिले खासगत व मुले माणसे व त्याकडील लोकाचे कबिले हुजूर आणवावयाची आज्ञा केली आहे तर तुम्ही त्याचे व लोकाचे कबिले येतील त्यास कोणेविसी उपसर्ग लागो न देणे. मार्गाचे सुरक्षित येऊन पोहचेत ते गोष्टी करणे व आणखी मानुलेचे निसबतीचे लोक कबिले सहवर्तमान त्या प्रांते राहतील त्यास सुखरूप राहो देणे. कोणेविसी तोसीस न लावणे. सताजी गाढवे व रावो सुरो व मनसूरखान व मनेखान तुम्हाजवळ आहेत त्यांस हुजूर आणविले आहेत. तरी देखत आज्ञापत्र हुजूर पाठऊन देणे. कबिले येतील ते भारबरदारी वस्तभाव समेत घोडी गुरे देखील सुखरूप येऊ देणे व त्याप्रांते राहातील लोक त्याचे वस्तभावबिसातीस तोसीस न लावणे म्हणून पत्रे सरदारास व देशमुख देशपाडे व दस्तके. **तींथ चैत्र बहुल सप्तमी भानुवार.**

¶*The two Muhammadan helpmates of Kanhoji mentioned in this letter have been referred to by Wad in No. 270 of Shahu's Diary. Kanhoji belongs to the Bhonsles of Nagpur whose early movements are yet to be cleared. Kanhoji rebelled against Shahu, who however ordered Kanhoji's family to be taken under his protection.*

No. 16] [*1734*

श्री

सेवेसी विनंती उपरी. राजश्री कान्होजी भोसले याजकडील कबिले येत आहेत. त्याविषीं पत्रें द्यावयाची आज्ञा जाली आहे. तरी यादीवरी देणे करून पाटविले पाहिजे. हे विनंती.

¶*Orders are solicited from Shahu as to the treatment of Kanhoji Bhonsle's family.*

No. 17] [*30-4-1736 ?*

पा। छ ३ मोहरम

मुा। अष्टमी

श्री

श्रीमत राजश्री आपा

स्वामीचे सेवेसी

॰ पोष्य जिवाजी खंडेराव कृतानेक दंडवत प्रा। विनंती उपरी. येथील कुशल ता। छ २९ जिल्हेजपर्यंत येथास्तित असे. सविस्तर वर्तमान आलाहिदा

1897

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पुरवणियांत लिहिलें आहे त्याजवरून विदित होईल. राजश्री संभाजीराजे यांस आणावयास गेले त्यास आजी आठ नव रोज जाले. अद्यापि त्यांजकडून कांही कागदपत्र आला नाहीं. राजे पावनगडास आले होते ते कोल्हापुरास गेले म्हणोन वर्तमान मात्र आहे. भेटी जाल्यावरी कागदपत्र येईल तेव्हा वर्तमान लेहून पाठऊ. कानोजी भो पलोन गेले. त्यास रघोजी भो याची रवानगी केली व वरकड सरदारांस त्याचा पिछा करून धरून आणावें म्हणोन आज्ञा केल आवजी कवडे यासहि पत्र लिहिले आहे त्याजविशी आपणास लिहिलें आहे; त आपण त्यांस येविशीचें पत्र व मुजरद माणसें रवाना केलीं पाहिजेत. बहुत का लिहिणे? कृपा असो दिल्ही पाहिजे हे विनंती.

¶*Jivaji Khanderao Chitnis to Chimaji Appa from Satara, informing th addressee that a deputation had gone to Kolhapur to fetch King Sambhaji and that Kanhoji Bhonsle had run away and that he was being pursued.*

No. 18] [*10-1-1738*

श्री

वेदमूर्ती राजश्री रघुनाथ भट[1]
स्वामी गोसावी यांसी

सेवक चिमणाजी बलाल नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम जाणून स्वकीये लेखन करणे विशेष. तुम्हाकडून पत्र येऊन वृत्त कळत नाहीं तर सविस्तर लिहिणे. राजश्री रघोजी भोसले यास पत्रे वारंवार पाठविली आहेत की फौजेनिशी इकडे यावे. त्याचे आमचे दर्शन होऊन जो मनसबा करणे तो करूं, म्हणून पूर्वी पत्रें पाठविली आहेत. त्यास तीर्थरूप राजश्री रायाची पत्रें ४ रमजानची आलीं. नवाब भूपाळगडी कोंडिला आहे. दाणा वैरण बंद केली आहे असा समय कधीं नवाबास घडला नाहीं. अती संकटी पडिला आहे. औरंगाबादेची फौज नवाबाच्या साहित्यास येणार. त्यास तिकडे गोऊन पडावे म्हणजे नवाबाचा परा(भव, उ)त्तम प्रकारे होतो. एसी पत्रें आलीं. त्याजवरून राजश्री रघोजी भोसले यास (आज्ञापत्रे)? पाठविली आहेत त्यास त्या * * * * र्गे यावे त्याची आम(ची भेट)होईल मग जो मनसबा करणे * * * * औरंगाबादेची फौज बाहेर नि * * * हे गोऊन पाडावी जरी हे औरंगाबा * * * * राहिले तरी मग याचे मार्गे राजश्री

---

१ पटवर्धन? भोसल्यांचा उपाध्या, पण राजकारणांत पडणारा.

1898

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

* * * * जी भोसले तीर्थरुपाकडे जाऊन * * होतील. तुम्हीहि त्यापासी आहां म्हणून वृत्त कळों आले त्यावरून तुम्हांस पत्र लिहिले आहे तरी मातबर मनसबियावरी नजर देऊन अतिसत्वर आले पाहिजे रा। छ १९ रमजान.

¶*Chimaji Appa communicates to Raghunathbhat Patwardhan the contents of Bajirao's letter to the effect that the Nizam was well hemmed in at Bhopal and that the forces from Aurangabad should not be allowed to join him. He further asks the addressee to request Raghuji to join the writer.*

No. 19] *[1738?*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री
आपा स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक मुकुंदराव कासी कृतानेक सा। नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ता। वैशाख सुध त्रितीया मु। उंबरावती प्रा। वराड जाणून सेवकाचें वर्तमान यथास्तित असे. यानंतरी राजश्री रघोजी भोसले यांचे युध्यप्रसंग वर्तमान राजश्री आवजी कवडें यानी सेवेसी विनंतीपत्र लिहिले होते त्याजवरून सेवेसी श्रुत जाले. तीर्थस्वरूप राजश्री राघोपंत तात्यास युध्यसमई मृत्य जाला; त्याचा हेत कीं स्वामीकार्यावरी प्राण वेचे तरी उतम. खांवदांचा हाती जेथे, तेथे आपला जीव, तेणेप्रमाणेच ईस्वरे सिधीस पाविले; त्याचे सार्थक जालें. माहाराजाचे लोक व निशाण आहे त्यांस लोकानी येकनिष्टता चितात आणिली कीं खावंदाचे निशान येथें येकनिष्ठतेने सेवा करावी. आपले उर्जित करणार खावंद समर्थ आहे. त्यांस सर्व सरदारांस आज्ञापत्र सादर केली आणि सेवकास आज्ञापत्र सादर न केले तेणेंकरून चित उदास. त्यांस माहाराजाची फौज व सेवक पदरचा यास * * * पत्र सादर केल्यानंतरे * * स्वामीसेवा करतील, त्या * उर्जित करणार स्वामी समर्थ आहेत. विस्तार काये ल्याहा हे विज्ञापना.

हे विज्ञापना.

¶*Mukundrao Kasi to Chimaji Appa, informing him of a skirmish between Raghuji Bhonsle and Avji Kawade in which Raghopant lost his life.*

1899

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 20] [*5-4-1740*

श्री

पुरवणी माहाराज राजश्री छत्रपती
स्वामी सेवेसी

विनंती[१] उपरी. राजश्री हिंदुराव घोरपडे ममलकतमदार याचे भेटीचा प्रसंग जालियावरी लेहून पाठऊन म्हणून पूर्वी सेवेसी लिहिले होतें. त्यास चैत्र बहुल पचमी तुंगभद्रा (ती)र मुा हपसागर येथे त्याच्या भेटी जाल्या. ते आम्ही समागमे आहों. याउपरी अन्यत्र अवलबा सोडून स्वामीच्या पायासी निष्ठा धरून सेवा करावी येतद्विसीचा भावार्थ त्याच्या चिती आहे. बोली मुदा मकसूद पूर्वी सेवेसी त्याणी लिहिलाच होता, त्या गोष्टीचा सिधात करून घ्यावा हे त्याचे मानस आहे. मध्यस्तमुखे बोलीचाली होणे ते होत. पुढे जो सिधातचा विचार होईल तो सेवेसी लेहून पाठऊन. विदित जाले पाहिजे. कोपल जागा बहुत थोर आहे. या प्राते या जागेवरी राज्य साधावे येसा विचयार आहे. आणिकहि येक दोनी जागे आहेत. परतु या प्रातास लोक ठेवावयास नाहीत. लस्करचे लोक कोणी राहात नाहीत. आम्हासमागमे हुजरातीचे ते तरी राहावयाचे कामाचे नाहीत. गडकिलेमुले राज्य साधते. उगेच गेले आले तरी स्वामीचे लस्कर होते. परतु काये करावे ! दिवसहि प्रजन्यकाल समीप आला. कोपळास पाचसे स्वार करून ठेवावे लागतात. सरदारी येथे ठेवावी तरीच केले कर्माचे सार्थक आहे. टकापैका द्यावा लागतो. उस्तवारी करून जागा पदरी घ्यावा लागतो. बरे, जो इलाज होईल तो करून जागा हाताखाली घालतो. पुढे बेगमी करणार स्वामी धणी आहेत. सेवेसी श्रृत होय.

¶*Letter addressed to Shahu written by Fatesing or Raghuji Bhonsle mentioning the writer's meeting with Murarrao Ghorpade and difficulties of the campaign.*

No. 21] [*Nov. 174*

श्री

पुरवणी श्रीमंत माहाराज राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

सेवेसी आज्ञाधारक वेंकाजी सिवदेव कृतानेक सां नमस्कार विनंती उपर राजश्री रघोजी भोसले व सफदरआलीखान या उभयेतानी येकमत होऊन राज

१ पत्र फत्तेसिंग अगर रघूजी भोसल्याचें शाहुमाहाराजांस असेल काय?

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

फतेसिंगास न कळूं देतां येकांती प्रमाणपुरस्कर बोलीचाली जाहाली आहे जे, त्रिचनापली घेऊन सफदरआलीखानास द्यावी. त्यास लस्कर जाऊन बसल्यावरी जो खर्च लागेल तो दरमाहे च्यारी लाख द्यावे. यासिवाई आरकाटीची फौज च्यार हजार व थोरल्या तोफा पांच, प्यादे दाहा हजार, यासिवाये जेजाला हजार, इतके आरकाटकरानी रघोजीस साहित्य पाठवावें यैसा करार जाहाला आहे. सध्या आरकाटकरानी फौज कुमकेस पाठविली आहे. कदाचित त्रिचनापली आली तरी घेऊन सफदरआलीखानास द्यावी आणि चंदीचा किला रघोजी भोसल्यास द्यावा. यैसा इत्यर्थ जाहालियावरी रघोजीने फतेसिंगासी कृत्रीमपणे वर्तणूक करितो. आरकाटीचे कार्यभारांत आठरा लाखाची तफावती आहे व तैसेंच त्रिचनापलीचे कार्याबदल वीसबावीस लाखाची तफावती आहे. फतेसिंग केवळ अप्रोयोजक करून ठेविलें आहे. इतकी इरे फतेसिंगास नाहीसी जाहाली. रा रामाजीपंत रकारपूर्वकाकडे मिलाला आहे. त्यानीच फतेसिंगाचा वक्र गमाविला आहे. यैसे आसोन मागती उभयेता मिळून फौजेसहवर्तमान त्रिचनापलीस वेढा घातला आहे. किल्यास मोर्चे आठ नऊ लाविले आहेत. किल्यात हुसैन दोस्तखान तिनी हजार पठाणानसी आहे. यावेगले प्यादे आठ नऊ हजार आहेत. येक लडाई जाहाली. उभयेताकडील दोनी तिनी हजार माणूस जायां जाहाले आहे. सांप्रात मोर्चे लाऊन बसले आहेत. चंदावरचे कारभारी येऊन रकारपूर्वकाची भेटी घेऊन तहरह त्रिसा बाविसाचा केला आहे. चंदीत रघोजीचे ठाणें पडावें व फतेसिंगास काहीच नाही, यैसा विचार केला आहे. आम्हांकडील कार्यभागास रघोजी नेष(?) मारितो. तरी माहाराजानी यैसेसमई निजामनमुलुकाकडून हर इलाजेकडून येकदां रकारपूर्वकाचे दंत भग्न(ग्न) करविले पाहिजे. आडचणींत गेले आहेत. टाकोटाकी निजामनमुल्क चालोन आदवानीपरियंत आला तरी यास निघोन जावयास मुसकील होईल. संधी बरी आहे. यैसा स(म)ये येणार नाही. येकदां याचा गर्वभंग केलियाविना कार्यास येणार नाही. तरी माहाराजी चिती धरून निजमनमुलुकाकडून रकारपूर्वकास पाताली घातलियाविना ठिका(णा)स येत नाही. उभयेता श्रीत गेलियावरी फार वलगना करितो. ते पत्रीं लिहीतां पुरवत नाही. येके कोनी जाऊन उभारला आहे. पिछा केलियाने वांचता मुस्कील आहे. सर्वज्ञाप्रति लिहिणे सक्ति नाहीं हे विनती.

¶*Venkaji Shivdeo informs the Peshwa of the terms of negotiations settled between Safdaralikhan and Raghuji Bhonsle without the knowledge of Fatesing. Even Ramajipant (Gune) joined Raghuji in this. The writer further requests the Peshwa to chastise Raghuji even with the assistance of Nizam-ul-mulk if need be, and thus teach him a good lesson for his impudent conduct.*

1901

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 22] [*1741 ?*

श्री

श्रीमंत राजश्री नाना

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक धोंडो आमदेव कृतानेक सां। नमस्कार विनंती विज्ञापना जे. येथील क्षेम ता। छ १० सोवाल मु॥ चिटगोपे स्वामीच्या प्रतापे येथास्थित असे विशेष. ये प्रांती राजश्री रघोजी यानी या प्रांतास येऊन येथे अत्रवियापेक्षा या स्वस्तानावरी अतिशये केला. हे स्थल देवा ब्राह्मणाचे, स्वामीचे स्थापित म्हणवितात. त्यास माघे रुपये तो सिवाजी ब्रम्हजी यास ठेऊन त्याच्या हते वसूल घेतला तो रुपया मजुरा देत नाहीत. आता तर अलीकडे कलबरगिया-मधे रुपये घेतले तेहि वसुलामधे मजुरा देत नाहीत. राजश्री आपाराव प्रभू तो नवाबा समागमे मुलकाची खराबी यास्तव या स्वस्तानाचा स्वामी अभिमान धरोन या स्थलची स्थापना केलिया, येश कीर्ति स्वामीची असे. विशेष काये लिहिणे ? लोभ असो दीजे हे विज्ञाप्ति.

¶*Dhondo Amdeo to Nanasaheb, complaining about the marauding activities of Raghuji Bhonsle round about Chitgope.*

No. 23] [*15-10-1741*

श्री

मंजूर

मसुदा भोसले

विशेष. आपणास त्वरेनें मनसब्याचे दिवस आहेत तों येऊन पोहोचावें म्हणून वारंवार पत्रें पाठविलीं व आपली उतरे अविलंबे येतो याअन्वये येत गेलीं असतां अद्यापि कांहीं येण्याचा प्रकार दिसोन येत नाहीं. फारकरून मनसब्याचे दिवस निघोन गेले, कांहीं थोडे बहुत राहिले आहेत, इतकियांत येऊन पोचला तरी उत्तम. विलंब लागला, राजकारणाचे दिवस गेले, मग येण्याचा उपयोग नाहीं. याज-करितां नर्मदा उतरोन आला असिला तरी कूच दरकूच अति त्वरेने येऊन पोहोचावें. [१]नर्मदा उतरला नसिला, दिरंग यावयास लागला तरी हिकडे ऐवज मिळणार नाहीं. स्वारी माघारी फिरावयाचे दिवसात येऊन नफा काय ? छ १९ साबान.

¶*This is a draft of a letter intended to be written to some Bhonsle in which he is asked to start at once with his forces. With some improvement towards its end, the draft is approved of by the Peshwa.*

---

१ येथून मूळचा मसुदा खोडून पुढील मजकूर निराळ्या अक्षरांत वाढविलेला आहे ; आणि 'मंजूर' 'मसुदा भोसले' असा शेरा त्याच अक्षराचा आरंभीं आहे. कारकुनानें मसुदा लिहून आणल्यावर यजमानानें तो शुद्ध करून दिला आहे.

1902

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 24] [11-8-1742

श्री

राजश्री अनंदराव गोसावी यांसी

° श्री
श्रीशाहूराज-
पदांभोजभ्रमरा-
यितचेतसः विंबा
त्मजस्य मुद्रैषा-
राघवस्य विराजते.

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री रघोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखन करीत जाणे विषेश. बहुत दिवस तुम्हाकडोन पत्र येऊन वर्तमान कलो येत नाही तर निरंतर सविस्तर वृत लेखन करणें. प्रस्तुत तुमचे सविस्तर वृत राजश्री वेंकाजी देवराव यांही निवेदना केलें त्यावरून सकलार्थ श्रवण जाहला. तेणेकरून समाधान जाहले. त्यास तुम्हाकडोन पत्राचा अभाव व्हावा हे गोष्ट उचित नाही. वरकड मकसुदाबाद वगैरे तिकडील प्रांताचा तालुका तुमचा आहे यैसे असोन तत्प्रांतीचे वर्तमान हा काल आम्हास काहीच लेहून पाठविले नाही यावरून अपूर्व दिसोन आले. हे गोष्ट तुम्हाजवळून घडावी यैसे नव्हतें. बरें याउपरी तत्प्रांतीचा विचार काये कैसा आहे व राजश्री भास्कर राम फौजेसहवर्तमान त्या प्रांते गेले आहेत त्यांची छावणीहि तिकडे जाली आहे त्याजकडीलहि वृत वरचेवर लेहून पाठवीत जाणें. आम्हीहि विज्ययादशमीचें मुहूर्तें करून फौजासहवर्तमान तिकडे येत असों. सार्वभोमाकडील मनसुबा कोणे प्रकारचा कैसा आहे हे साद्यंत वर्तमान लेहून पाठविणें. तुम्ही निष्ठायुक्त जाणोन लेखन केले आहे. निरंतर सर्वार्थ लेखन करावयासी अंतर न करणें. वरकड कितेक वर्तमान राजश्री वेंकाजी देवराव हे सस्तर तुम्हास सांगतां कळों येईल. निरंतर आपले सविस्तर वृत लेखन करीत जाणे. जाणिजे छ २० जमादिलाखर बहुत काये लिहिणे.

मोर्तब
सुद.

¶*Raghuji Bhonsle asks his sardar Anandrao news about Bhaskar Ram and his activities in Bengal.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 25] [*11-8-1742 ?*

श्री

राजश्री केशोराव गोसावी यांसी

शिक्का.

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री रघोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशललेखन करीत गेले पाहिजे विशेष. बहुत दिवस तुम्हाकडोन पत्र येऊन वर्तमान कळों येत नाही, तरी सदैव आपलें कुशल वर्तमान लेखन करून संतोषवीत असावें. प्रस्तुत तुम्हाकडील वृत राजश्री वेंकाजी देवराय याही निवेदन केले त्यावरून अवगत जाहले. आपले स्थित रीतीचे वर्तणूक ऐकोन बहुत समाधान जाहले. दुसरी ... प्रभू सार्वभौमाचा लोभ विशेष संपादून घेतला यतद्विशयींचे व कितेक अर्थ श्रुत जाह[illegible]न तरी तुम्हीहि योग्यच आहा. वरकड आपला आमचा स्नेह ऐसे असोन पत्राचा अभाव जाला यावरून अपूर्व दिसोन आलें हे गोष्ट स्नेहलक्षणास उचित नाही. सर्वकाल पत्री अविस्मर असावे. येणेकरून परस्परे स्नेहाची वृधी आहे. याउपरी निरंतर वृत-लेखन करून संतोषवीत जाणें व सार्वभौमाकडीलहि वृत साद्यंत लिहिले पाहिजे. वरकड तुमचा आमचा स्नेह आहे, विस्तारे ल्याहावे ऐसा अर्थ नाही. परंतु तुम्हाकडील मनुश आम्हाजवळ असलिया स्नेहाचाच विचार आहे. आम्ही आपले स्नेहातून दूर नाही. कितेक वर्तमान राजश्री वेकाजी देवराव सागतां सविस्तर कळों येईल. दिन प्रतिदिनी आपलें सर्वार्थ लेखन करून संतोषवीत जाणें. जाणिजे छ २० माहे जमादिलाखर, बहुत काय लिहिणें.

मोर्तब सुद

¶*Raghuji Bhonsle to Keshorao: congratulates him on his getting into the favour of the Emperor.*

No. 26] [*20-9-1742*

श्री

पुरवणी राजश्री रामचंद्रबाबा

स्वामी गोसांवी यांसी

विनंती उपरी. रा। रघोजी भोसले खराब होंऊन नागपुरास आले. त्यास आणावयास रा। स्वामीनी रा। विश्वनाथ वैद्य पाठविले आहेत. बहुतकरून

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

राजदर्शनास येतील. कर्जदार. बोढ जाली. दिवाणचेहि तगादे या हिसेबे न येतील तर न कळे. मागाहून तहकीक वर्तमान येईल ते तुम्हास लिहिले जाईल. [१] पैका न मिळला, येथे आलिया कर्जदाराचा उपसर्ग, राजश्री काही मागतील, गुंता पडेल यास्तव न यावे. परभारे पांच सात हजार जमा करून तिकडे जावें ऐसा विचार त्याचा दिसतो. तुम्हींहि मंडळ्याकडून बातमी राखून असावे म्हणजे तुमचे दबावाने पटण प्रांती जाणार नाहींत. छ १ साबान बहुतकाय लिहिणे हे विनंती.

¶*The Peshwa Nanasaheb writes to Ramchandra Baba that Raghuji 'honsle should be prevented from proceeding towards Patna. He was not [illegible] to proceed to Satara and meet the King, as he would have to pay the King's debt.*

No. 27] [*30-9-1742* ?

छ २७ रमजान

श्री

राजश्री बालाजी पंडित
प्रधान गोसांवी यासीं

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो रघोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित असिलें पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें, प्रविष्ट जाहालें. लेखनाभिप्राये श्रवण होऊन परम संतोशावाती जाहाली. लिहिलें कीं कोणे ठिकाणीं आहां, काये मनसबा योजिला आहे, लेहून पाठविलें पाहिजे. त्याजवरून लिहिले जाते कीं छ १० माहे शाबानी सिरालें नजीक उंदरी येथून कूच करून मजल दरमजल देवगडप्रांते जातों. पुढें राजश्री भास्करराम यांजकडे जावेंसा इत्यर्थ आहे. आपणास कलावें याजकरितां लिहिले असें. येंदा आपण त्या प्रांते छावणी केली आहे. काय मनसबा योजाल तों सविस्तारें

---

१ येथून अक्षर खुद्द नानासाहेबाचें. रामचंद्रबाबा सिंधांजवळ 'गढामंडळा'चे बाजूस होता त्यास हें पत्र. विश्वनाथ वैद्य हा वाईचा, त्याचा मुलगा बाबूराव व नातू नारायण बाबूराव हे सर्व मराठशाहींत राजकारणांत वावरणारे पुरुष होत.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लेखन केला पाहिजे. सदैव पत्रीं गोसावियानी कुशलादि वर्तमान लेहून आनंदावाप्ति केली पाहिजे. रा। छ ११ माहे शाबान. विसेस कार्ये लिहिणे? कृपा लोभ असू दिली पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Raghuji Bhonsle to Nanasaheb, giving him an account of his own movements.*

No. 28] *[8-11-1742*

श्रीरामोजयति

तीर्थस्वरूप राजश्री महिपतराव
काका स्वामी वडिलाचे सेवेसी

[1]आपत्ये खंडेराये चरणावर मस्तक ठेऊन सां। दंडवत प्रां। विनंती. येथील कुशल ता। कार्तिक वद्य अष्टमी पावेतों मु। हिडण नदी का। अंतरवेद नजीक दिली जाणोन स्वकीये कुशल लिहित जावें विशेष. आपणाकडील आशीर्वाद पत्र आले त्यावरून समाधान जाहलें. ऐसेच पत्री संतोषवित जावे. यानंतर इकडील वर्तमान तरी श्रीमंताची स्वारी बंगालियाकडे जावी असा विचार आहे. काय पुढें होईल ते पाहावें. मातुश्री व चिरंजीव बावा कार्तिकश्नानाकरितां श्रीकाशी-यात्रेमध्यें आहेत. श्नाने जाहली म्हणजे देशी येतील. कळले पाहिजे. वरचेवर आशिर्वाद पत्र पाठऊन संतोषवीत जावें, उचित आहे. बहुत काय लिहिणे. लोभ असो दीजे हे विनंती.

तीर्थस्वरूप राजश्री रावजीबावा व भाऊ व बाबाजी व सिवबा व हैबतराव वडिलांचे सेवेशीं. काकांचीं पत्रें येतात परंतु आपलीं पत्रें येत नाहीं. अपूर्व वाटतें.

¶*Khanderao Chitnis writes to Mahipatrao Chitnis from Antarved in the North of the intended march of the Peshwa into Bengal.*

---

१ खंडेराव बापूजी चिटणीस (साताराकर) याचें पत्र महिपतराव चिटणिसास बंगालस्वारींतून.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 29]

[*8-12-1746*

श्री

श्रीमंत माहाराज राजेश्री बावा स्वामी गोसावी यांसी

आज्ञांकित रघुनाथ जयराम कृतानेक सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल पौष्य सुध ७ मुा मकसुदाबाद जाणून माहाराजांही स्वानंदवैभवलेखन आज्ञा केली पाहिजे विशेष. स्वामीकडे दोन पत्रे पाठविली परंतु एकही आज्ञापत्र पाठऊन सांभाळ केला नाही. तर पत्रद्वारा सनाथ करीत असले पाहिजे. विशेष वर्तमान तर श्रीमंत पंतप्रधान स्वामीही सिरपाव महाबतजंग वगैरे सरदार या प्रांतीचे यासी सेवकासमागमें पाठविलें व आज्ञा केली होती कीं पटण्याचे चौथाईची विचारणा करणे. तर त्यांहचे आज्ञेप्रमाणे विचारणा केली. महाबत-जंग हे म्हणू लागले कीं पातशाहाही फर्माण पाठविला आहे कीं बंगालियाची मामलत श्रीमंत स्वामीकडे मुकरर केली. बंदोबस्त त्यांहचे विद्यमाणे केला आहे. त्यासी पटणाहि त्यांहचा व बंगालाहि त्यांहचा. ते एका जागा जाणोत ते करोत. त्यासी सेवकाणी उत्तर दिधले कीं रघोजी तुमचा मुदई. त्याणे तुमच्या मुलकांत येऊन चौथाई पेक्षां दशगुणीत घेतले व नाश केला. याणी तुमचा श्नेह मात्र संपादिला. यावेगळे तुमची मदतहि केली. पुढेंहि तुमचे बंदोबस्ताविसी येत्न करीत आहेत. हे ते एकत्र मामलत कसी होते तर आधी यांहचे कार्य करोन दिधल्या ते तुमचे कार्य करोन बंदोबस्त मुलकाचा करतील ऐश्याप्रकारे सांगितले. त्यासी जुबानी म्हणतात की सर्व भरंवसा श्रीमंत स्वामीचा आहे. त्यासी आपण सर्व प्रकारें स्वामीचे स्थळीं आहां. ताकीदपत्रें पाठविल्या कार्य होईल. याप्रांती मेदनीपूर तेथं मीरहबीब सात आठा हजारांसी धूमधाम करितो. यांहकडोनहि मीरमहमद जाफरखान बखशी सात आठ हजारासीं पाठविला आहे. एका दो दिवसां मुकाबलाहि होईल. रघोजीची आवाई नित्य आहे. त्यासी कृपा करोन ताकीदपत्रें पाठविल्या कारबार सरकारचे होईल. विशेष काये सेवकास पदरचे जाणून सर्वदा सांभाळ केला पाहिजे. विशेष काय हे विज्ञप्ति.

¶*This letter seems to be addressed to Ramchandra Baba or Mahadoba Purandare who were with the Peshwa's swari at Murshidabad. Friction with Raghuji Bhonsle on account of the Chowth of Bengal, is referred to.*

1907

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 30] [*1742 ?*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे शेवेसीं

विनंती. शेवक विसाजी भिकाजी कृतानेक सां नमस्कार विनंति विशेष. राजश्री रघोजी भोसले वेदमूर्ति राजश्री सिदभट पुरोहित रा बराणजी मोहिते यांसी सोसंपन मातुश्री सगुणाबाई यांजकडे एका दो दिवसीं रा करणार, पत्रेहि महाराजांस व सौभाग्यवती बाईस लिा आहेत. राजश्री बाबूजी नाईक यांचीं पत्रें आलीं होतीं कीं तुमची व आमची जंगजोड व्हावी ऐसा मजकूर लिहून पत्रे पाा होती. त्यास याणी वेदमूर्ति रा सिदभट रा करणार तर उदईक रा होतील. पत्री मजकूर लिा कीं कनाटक प्रांताविसी रा बाबूजी नाईक याणी लिा आहे. जर स्वामीची आज्ञा होईल तर ते व आपण येकत्र होऊन कर्नाटक व बंगाले याचा बंदोबस्त करू येसे लिा आहे. म्हणून कारकूनमंडळीत वर्तमान आइकिले. बाईसाहेबास लिा कीं आपण साहेता करून बाबूजी नाईक यांची व आमची जगजोड होये ते करावे. हा जर मजकूर होऊन आला तर रा रघोजी बावा देसास येत नाहि. विश्वनाथभटहिं पुढें रा केले आहेत. आता भटजीहि रा होणार; साा आठ नवलक्ष परियंत याणे वराड प्रांते वगैरे घेतले; त्यापैकी तीनचार परियंत समजाविसी जुने लोकांची केली त्याजकडे दिल्हा. बाकी पांच लक्ष येवज राहिला; त्यापैकी सरजामी लोकांस दोन लक्ष परियंत वराता दिल्या. बाकीच्या निशा करून घेतल्या आहेत; व हे मुदत जालियावर येवज येईल; मग कोणास देईल तो पाहावा; येदा कोणी साहुकार न मिळे म्हणून याणे मातबर जागे पाहून रुा घेतले. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Bhikaji who seems to be governing the district of Nasik, and from whom we have some letters written in about 1736 A. D. in connection with the affair of the Dabhades now gives news of Raghuji's intention of helping Babuji Naik in the Karnatic. This question became very acute on account of the Peshwa's intervention into the management of the Karnatak province.*

No. 31] [*After 1743*

श्री

पुा श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती यैसीजे. राजश्री यादवराव प्रल्हाद प्रयागांत अमीरखानाचें अमलांत राहात होतें ते सांप्रत प्रयागीहून येऊन नरसिंगराव हरकारियासी भेटून जाहीर

1908

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

केलें जे; रघूजीचा व श्रीमंताचा सळूख पटण्याच्या सरदेशमुखी जाहला. अतःपर नवाबहि माहाबतजगास लिहून सळूख रघुजीचा करवावा, श्रीमंतांस बंगालियाची गरज नाही, प्रयागचा हासील महसूल जो येईल तें श्रीमंतांस द्यावा, म्हणून पत्रे लिहिलीं आहेत ते गुजराणावी म्हणून नवलरायांसी नरसिंगरायासी सांगितलें. त्याणी नवाबांस अर्ज केला. नवाब बोलले जे त्यांस सांगा जे फलाणियाचें घरी जाऊन हकीकत पंत प्रधानाहीं सांगितलीं असेल तें सागणे. तें अर्ज करितील त्यावरून येथें आले. त्याचे सागितल्यावरून रघूजीस स्वामीही बंगाला मुकरार केला व पटण आपणाकडे केले (या) करांचा महसूल * * * उन आपला कालक्षेप करणे म्हणून श्रीमंत स्वामीही आज्ञा केली व पत्रे नवाबास व नवलरायासी दिधलीं म्हणून सांगितले. आम्हीं पुसलें जे कोण्ही पत्र आमच्या नावे असेल तरी अर्ज करूं. त्यासी स्वामी आज्ञा करितील त्याप्रा वजीरुलमुमालिकांस विनंती करूं. वजिरांस स्वामीची खातर असे. ज्यांप्रा स्वामी सांगतील त्याप्रा वजीर करतील परंतु यात्रकरांस स्वामीच्या प्रतापे त्रिस्थलींत दवडी पडत नसतां त्यांचे यात्रे श्रेय स्वामीस येत असतां धन्य धन्य लोक म्हणतांत तें सोडून यात्रकरास उलटी उपाधी लावलिया मग इतके श्रम करून स्वामीस माहायात्रेचें महदयश पदरी पडिले तें हातचें गेलिया मग होणें कलतच आहे. येविसी ज्याप्रा आज्ञा येईल त्याप्रो अमलांत आणू. रघूजीसी स्वामीही काय करार केला तें सविस्तर आज्ञापत्री सादर करणार स्वामी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणे ? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*The letter speaks of the terms of negotiations between the Peshwa and Raghuji by which Patna was retained by the Peshwa and Bengal was handed over to Raghuji. This took place in the autumn of 1743.*

No. 32] *[6-2-1744 ?*

पैवस्ता छ २ मोहरम

श्री

राजश्री बालाजी पंडित प्रधान
गोसांवी यांसी

॥ सकलगुणालंकर्ण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नों रायाजी भोसले दंडवत् विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीयें लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. बहुत दिवस जाले. पत्रीं स्मरण न केलें. तर यैसें न करितां निरंतर पत्रीं संतोषवीत असावें. आम्हाकडील वर्तमान तर श्रीमंत राजश्री स्वामीनीं आम्हास सरंजाम दिल्हा आहे. आपण सनदा करून दिधल्यात. गत

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वर्षी श्रीमंत स्वामीची आज्ञा व सरंजामाचीं पत्रें घेऊन वराडांत गेलों तो तीर्थस्वरूप राजश्री रघोजीबावाहि बंगाल्यातून आले. श्रीमंत स्वामीची आज्ञा होती कीं, त्यांची भेटी घेणें. त्यावरून तीर्थरूपांची भेटी घेतली. त्यांसी बोलिलों कीं, ज्याचा सरंजाम आहे त्याप्रमाणें अनुभवावा. हे गोष्टी चितास न आली. बोलिले कीं, तुंम्ही आंम्ही हुजूर जाऊ. उभैतास स्वामी आज्ञा करितील त्याप्रमाणें वर्तणूक करूंन. यैसें जालियानंतर ते सतरुषीस गेले. आपण मागाहून जात होतों तों शरिरास सावकाश दोन महिनें नहोता. यास्तव कांही दिवस लागले. सांप्रत हुजूर दर्शनास जातो. हेत होता कीं, आपली भेटी घेऊन आपले अनुमतें विचार करावा. परंतु स्वामीचे हुजरे आले कीं, सत्वर येणें. त्यावरून गेलों. आणि राजश्री येसाजी सिधेस्वर दिवाण गोसांवियाकडें पाठविले ते हे मुखवचनें सागतील तो अर्थ ध्यानांत अणून साहित्य केलें पाहिजे. उभैतां कैलासवासी यांचा स्नेह चालत आला त्याप्रमाणें आपणहि स्नेह वृद्धीतें पाववावा. या सरदारीचा अभिमान सर्वा प्रकारें गोसावियांसि आहे. बहुत ल्याहावें तर सूज्ञ असां. विशेष काय लिहिणें ? लोभ असो दीजे हे विनंती.

श्रीमछांह पदासक्त
कान्होजी पुण्य
जन्मना रायाजी
+ + +

लेखन
सीमा

¶*Rayaji Bhonsle, son of Kanhoji, complains against Raghuji Bhonsle for interfering with his enjoyment of the Saranjam granted by the Peshwa. The writer therefore requests the Peshwa to settle the question once more with Raghuji who had already gone to Satara for it, though he (the writer) is not able to attend on account of his illness.*

No. 33] [*1744 ?*

श्रीलक्ष्मीकांत

राजश्री नारायेण बाबूराव गोसावी यांसी

॥ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो रघोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी. येथिल कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहित जावे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

विशेष. तुम्हाकडून जी जी पत्रे आली होती त्याची उतरें समर्पक पेशजी पाठवण्यात आली. त्या आलीकडेस तुम्हाकडून पत्र येऊन वर्तमान काहीच कलले नाही. राजश्री आनंद बाबूराव यासी मात्र तुमचे पत्र सरसरी (?) आले त्याजवरून कलले. त्यास वरचेवरी पत्र पाठऊन वर्तमान लिहीत जावे. मंडळ्याचा कारकून व पत्रे पाठवितो हे तुमचे लिहिण्यात होते. त्यास कारकुनाचे येणे ताकीदपत्रासुधा अद्याप जाले नाही. राजश्री विठल बलाल सुभेदार मंडळे प्रांती आहेत. त्यास त्याचे जाणे नर्मदा उतरून गढ्यास जाहले. तेथे राजश्री विस्वासराव मोरेश्वर ठाण्यात होते ते काबूत आले. तेव्हा त्याजपासून किल्याच्या व ठाण्याच्या व प्रांताच्या सोडचिठ्या घ्याव्या हे होते. परंतु मशारनिलेनी आपले जागा आदेशा केला कीं आपला जाबसाल सनदी आहे तेव्हा याजला आटकाऊन यांप्राा घ्यावयाचे कारण नाही. हे समजोन आटकाव न केला. ते तेथून निघोन गेलियावर जमाव गोळा करून जागा जागा प्रांतात उपद्रव देऊन आहेत व जे जे जमीदार प्रांतात आहेत त्याजलाहि पत्रे पाठविली आहेत व गाव खेडी व परगणे लेहून दिल्हे व देतात यैसा बखेडा करून आहेत. कटंगी म्हणून जागा आहे तेथे इकडील जमाव होता तेथें बुधेले यानी जमाव करून चालून गेले, कटकट केली, तेव्हा दोन तीनदा नामोहरम होऊन तेजगडास वीस कोस पाठीमागे गेले. यैसेहि असून राजश्री विठल बलाल सुभेदार त्याजकडेस वरचेवरी सांगोन पाठवितात व पत्रेहि लिहिली आहेत की सनदी जाबसाल आहें हे समजोन आमची चाल धारणा असे. तेव्हा तुम्हाकडूनहि तैसेच घडावे. सनदी जाबसालास कटकटीचे कारण नाही परंतु त्याची चाल आहें तीच आहे. याजकरिता येविसी तुम्ही राजश्री पंत प्रधान यासी बोलून राा आपाजी रघुनाथ व हुजरे पत्रासुधा जलदीने रवाना करून देवावे आणि कारभाराही पत्रें जावी कीं कटकटीचे कारण नाही. हे जलदीने घडवावे. रवाना छ १३ माहे रबिलौवल बहुत काये लिहिणं हे विनंती.

॰ मी
श्रीशाहूराजपदांभोज-
भ्रमरायितचेतस:
विबात्मजस्य मुद्रैषा
राघवस्य विराजते.

मोर्तब
सुद.

¶*Raghuji Bhonsle writes to his agent at Poona that the Peshwa be requested to issue orders to Vishvas Moreshwar to stop his raids in the territory of Gadha Mandla.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

[पहिला बंद गहाळ.]

२

आणि कितेक......भोसले याणी फौज घेऊन जाऊन आपली पहिली ठाणी होती ते काही घेतली, काही बाकी राहिली आहेत. परतु आणिक यैकिले कीं, मोगलाची पागा व हाती आकरा त्या प्रांती ठाणियात कोठे होते ते याच्या हातास लागले यैसी वदंता आहे. व दुसरे पुत्र राजश्री मुधोजी भोसले हे छतीसगडावर आहेत. त्याजपासी फौज तीन हजार आहे. त्याणी देवगडास मोरचे लाविले होते मग तो किला हातास न आला. मागती छतीसगडास गेले. त्याच्या चितात आहे की, हे जागा घ्यावी. परंतु ईश्वराच्या चितांत जे आसल ते खरे; व तिसरे पुत्र राजेश्री जाणोजी भोसले याजपासी तीन हजार फौज आहे. ते गीर्दनवाई स्वारीसिकारी करितात आणि राजश्री भास्करपंत याचे पुत्र कासी भास्कर यासी व याची मातुश्रीस बोलाऊन नेऊन तमाम वराडचा सुभा सांगितला आहे. तिला आज्ञा केली कीं, नवी फौज दाहा हाजार ठेवणे आणि गंगेपावेतो वासदाणे घेत जाणे. त्यासी सिरपाव देऊन रवाना केले ते पातुरामधे फौज ठेवीत आहे. रघोजी भोसले यांच्या फौजेचे वर्तमान या प्रकारे यैकिले आहे. धारण तो माहाग आहे. दीडसेरी पायेलीच्या बारा पायेली जारी व बाजरी आहे व गहू पंधरा सेर व तूप साडे तीन च्यार सेर आहे. या प्रांती पाऊस नाही. खरीफ * * तमाम गेले आणि रबीच्या पेरणिया तो कोठे जाल्या आणि कितीक गाव नापेर जाले. वाटा चालत नाही. खोरेवाले (?) धडका माणसे मारितात. या मुलकात बंदोबस्त या प्रकारेचा आहे. काही लिहिता पुरवत नाही. माहाराजानी कृपा करून जासूद पाच जोडिया दिल्ह्या परंतु वाटा चालत नाही. चवकड्या वाचून वाट फुटेना. आणि बातमी तर वरचेवर पाठविली पाहिजे. तर सेवकावर कृपा करून आणीक पाच जोडी जासूद पाठऊन देणे म्हणजे वरचेवर बातमी सेवेत येत जाईल. तर कृपा केली पाहिजे. व भाद्रपद सुध चतुर्थीचा मोहछाव राजश्री रघोजी भोसले यांच्या घरी आहे. तेव्हा गावामधे तमाम लोकानी आपआपले घरी (देव) केलेच होते. त्यासी नागपुरामधे कासाराचा फिरका मोठा आहे. ते देव बोलवायासी लागले ते समई खुद आपण रा रघोजीबावा देव बोलवायासी गेले. तों तेथे तमाम खलकाणी आपआपले देव घेऊन आले. त्यासी तमाम कासारामधे चाल यैसी आहे कीं, आपली लेकरेबाले आवघी मिळून जाऊन देव बोलवावा. त्यासी समागमे राहि होते. त्यासी तेथील कासार मातबर येक आहे. त्याच्या दोघी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कन्या बहुत उतम होत्या. त्याच्या द्रिष्टीस कोठे ते दिवसी पडल्या. देव बोलऊन आलियावर त्या कासाराच्या घरास माणसे बदनजर धरून पाठविली. तेव्हा कासाराने येकदा दोनदा मानसे फिराविली. तिसरियाने हुकूम केला की, त्याचे घर लुटून आनने. त्याजवरून कासाराने दोघी कन्या जिवे तरवारीने मारल्या आणि फिरोन गोष्टी सागितली. तेव्हा आणीक दोन च्यारसे माणसे पाठविली की, घेऊन येणे. त्यासी याणी तो पोरी मारल्या. कासारहि सातेकसे जमा जाले. मग दोघाची बरीच कटकट जाली. तेव्हा कासाराकड राजश्री जाणोजी भोसले होऊन वडिलासी भांडू लागले. दाहा पाच माणूसहि कामास आले. तमाम कासार बाहेर पडले आहेत. या प्रकारे वर्तमान आहे. आमचे वर्तमान तों ज्या समई आम्हास रवाना केले त्यासमई पुणियाहून याला लिहून बातमी पाठविली की, श्रीमंतानी वकील व जासूद रवाना केले आहेत, त्याजवरून जितके कारकून होते तितकेयासी ताकीद केली कीं, त्यांजकडील कोन्ही गावांत येऊं न पावे यैसे आहे. आपणापासी तो रा रघोजी भोसले याचा कागदहि नाही आणि बसावयासी जागा कोठे नाही. पिगल्याच्या नैरांत गुतरूपे बसलो आहेत, आणि हा बहुत द्रुष्ट आहे. कोण्हे समई काये होईल हे न कले. त्यास * * हितो कीं, सैद शरीफखान व रघोजी भोसले येकचिते आहेत. त्यासी सैद शरीफखान यासी थैली पाठविली पाहिजे की, हे माानिले तुम्हाकड पाठविले आहेत आणि दोन वस्त्रेहि त्याला पाठवावी की, आम्हास आलजपुरी बसावयासी जागा होय आणि तेथून नागपूरहि जवल आहे. आम्ही दोन दिवस तेथे राहू आणि दोन दिवस तेथे राहून सरकारचे कामाची तरतूद करू. तर कृपा करून सैद शरीफखान व रघोजी भोसले यांसी पत्रें व उभयेताला दोन दोन वस्त्रें पाठऊन देणे की, राजरोशन जाऊन भेटू आणि सरकारचे कामाची सरबरा होऊन येईल व सरकारचे वराडांत गाव आहेत त्या कमावीसदारास ताकीदपत्र की, माानिले त्या प्राात आहेत त्याची हरयेकविसी साहिता करीत जाणे म्हणून तीन पत्रे व उभयेतास आनकूल पडिली तर वस्त्रे पाठऊन देणे; जरूर सुभ्यास तरी पाठवणे आणि तीन कागद यैसे आगत्य पाठविले पाहिजे. येथे जे होणे ते माहाराजाचे चरणाच्या प्रतापेकरूनच होईल; परंतु लिहिल्याप्राा कृपा केली पाहिजे, म्हणजे बातमी जैसी पाहिजे तैसी कलल. आणि लपून कोठवर राहावे. हे बातमीचे वर्तमान नागपुरी आपले स्वकीये सोयरे आहेत त्याणी साकल्य लिहिले होते त्याजवरून [अपूर्ण]

¶*The letter reports news from Raghuji's court to the Peshwa. It is full of useful details about the character and ways of Raghuji and his sons and their doings.*

1913

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 35] [2-9-1746

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक विसाजी भिकाजी कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता। भाद्रपद वद्य त्रयोदसी परियंत स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. यानंतर स्वामीची आज्ञा श्रावण वद्य चतुर्थीस घेऊन स्वार जालो ते भाद्रपद वद्य पंचमीस नागपुरी पावलो. राजश्री रघोजी भोसले याची भेट जाली. सर्व वर्तमान श्रीमताचे पत्री लिहिले आहे त्यावरून श्रुत होईल. रा। कोन्हेरपंताचीहि भेट जाली. त्यास ते आम्हापासी बहुतसे विस्मये करीत होते कीं आम्ही श्रीमताचे पदरचे; आणि त्याचे आम्ही असता आमचे स्मरण होत नाही. त्यावरून आम्ही त्यास उत्तर दिल्हे कीं श्रीमताही आम्हास आज्ञा केली कीं जाऊन भेट कोन्हेरपंताची घेणे. जो जाबसाल कर्तव्य तो त्यासी करणे. तुमचे स्मरण आहे. जर आपले विचारास येईल तर त्यासहि समाधानाचे पत्र पाठवावे. आणि आम्हास पत्र ल्याहावे. त्यांत ल्याहावे कीं प्रांत वराड येथे सरकारचे गाव आहेत त्यास रा। रघोजी भोसले यांणी चौसाला वसूल घेतला. त्याची वाट करून घेणे आणि साल मजकूरची नवी ताकीदपत्रे घेणे म्हणून पा. त्यास चौसाला बाकीचा तो मजकूर रा। रघोजी भोसले यांणी गालिला. साल मजकूरची ताकीदपत्रे मात्र दिल्ही. तर तुम्ही त्यास फिरोन पुसोन जाबसाल साफ करून लेहून पाठवणे. तर निर्गम करून न दिल्हा तर हरतरेने करून घेणें लागेल यैसे ल्याहावे. आणि कोन्हेरपंतास समाधानाचे पत्र ल्याहावे. आम्ही येथे आलियावर राजश्री रघोजी भोसले यास विस्मये भासला आहे. परस्परे आपणामध्ये भाषण करितात कीं जो परियंत श्रीमंतासी व आपणासी सख्यत्व होत नाही तो परियंत काही आपले बरे होते यैसा अर्थ नाही; यैसे भाषण करितात. आम्ही येतेसमयी राजश्री अपाजी सोमवंसी याजाविसी विनंती केली. त्यास आम्ही लोकाचे ब्रम्हस्वापासून मुक्त होऊ ते करणार स्वामी समर्थ आहेत. बहुत काय लिहिणे? कृपा लोभ असो दिल्हा पाहिजे हे विज्ञापना.

¶*Visaji Bhikaji to Sadashivrao Bhau writing how Konher Ram felt sorry at having received no communication from the Peshwa. The writer requests the Peshwa to mention in his letter the affair of the settlement of the four years' revenue collected by Raghuji from the Peshwa's villages in Berar.*

1914

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 36] [*10-9-1746*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक विसाजी भिकाजी कृतानेक सांा नमस्कार विनंती. येथील कुशल ताा आस्विन सुध सप्तमीपरियंत सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर राजश्री रघोजी भोसले परभारे ब्रम्हपुरीवरून माहूरपटीकडे जाणार यैसा मनसबा केला आहे. वराड प्रांते फौज पाठवावी आपण परभारे पौष माघ माहूरपटीचे घासदाणे ऊन मग सातारियास जावे यैसा विचार आहे. त्यास आम्ही त्या समागमे तिकडे जावे की काये ? वराड प्राते आले तर उतम आहे. ज्याप्रमाणे आज्ञा होईल त्याप्रो वर्तणूक (क)रून. प्रस्तुत तो शरीरी सावकाश वाटत नाही. रा कोन्हेरपंतासहि शरीरी सावकाश वाटत नाही. पुढे कोणीकडे जातील ते पाहावे. दसरेयांचे मुहूर्ते रा जानोजी भोसले व मुस्तफाखानाचा लेक तिकडुन समाग(मे) आला आहे तो व फौज वराड प्रातीची समागमे देऊन रा करणार आण आपण हिकडे देसास जाणार आहे. सेवकास जे आज्ञा कर्तव्य ते करावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Bhikaji asks the Peshwa whether he should go back to Satara with Raghuji Bhonsle who intends to send his troops to Berar and himself to proceed to Mahur and thence to Satara.*

No. 37] [*September 1746*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती विशेष. जानकीराम, अलाविर्दी याचा दिवाण, याचा लेक दुर्लभराम राजश्री रघोजी बावा याणी धरून आणिला आहे. तीन लक्ष खंडणी करार जाला. त्यास दुर्लभराम याणे आपला कारकून आम्हाकडे पाा होता कीं श्रीमंतास लेहून आम्हची मुक्तता होये ते करणे. आम्ही त्यास सांगोन पाा कीं प्रस्तुत याचे व श्रीमंताचे इस्टत्व आहे नाही हे तुम्हास ठाऊक आहे. मग दुसरे-याणे त्याजकडील कोणी आले नाही. सुरतसिंग वकील बुधेल्याकडील याणे राजश्री रघोजीबावाजवल सागितले कीं येदा राजश्री मल्हारजी होलकर व रा रामचंद्रबावा यैसे फौजेसहवर्तमान बंगालेयास जाणार. त्यास त्याणे उत्तर दिल्हे कीं मुलुक त्याचाच आहे. गेले तर उतमच आहे. हे वर्तमान त्यासनिध

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कारकून ग्रहस्त आपला आहें त्याणे सागितले. सेवेसी कलावे म्हणून लि। असे. वराड प्रांती सरकारचे गाव आहेत त्यास राजश्री रघोजीबावा याणी तमाम ताकीदपत्रे दिल्ही. सालगुदस्ता सरकारचे कमाविसदारापासून राजश्री केसो अपा याणे पैका फिरोन घेतला होता त्यास स्वामीची पत्रें अलियावर राजश्री नारो आपास पत्रे लेहून आपले जासूद समागमे देऊन त्यास लि। कीं श्रीमंताचे कमाविसदारापासून पैका रा। केसो आपा याणी घेतला असेल तो फिरोन देवणे म्हणून पत्रे देऊन जोडा पा। आहे; व पेट नादगाव येथील देशमूख रा। रघोजीबावा याचा आहे त्यास त्याणी आपले कमाविसदारास आपले स्वदस्तुरचे पत्र लेहून दिल्हे कीं गाव पंतप्रधान याचा मोकासा आहे. मोकासबाबेचा अमल सुरलीत देणे म्हणून पत्रे तो दिल्ही आहेत. पुढें जे होईल ते सेवेसी लेहून पाठऊ. प्रस्तुत त्याचा मनोदय दिसतो कीं आपणासी इस्टत्व करावे. कातवडचे मुकामीं सेवकास हाती धरून च्यार घटिका येकांती बसला होता. आपणाकडील कितेक वर्तमान सागितले कीं आम्हास धनी जसे माहाराज तसेच श्रीमंत आहेत. आपले चितात काही दुसरा विचार असेल तर शपत माहाराजाचे पायाची. श्रीमंताही आम्हास पदरी घेऊन येक वेल चाकरी आम्हापासून घ्यावी. पूर्वी श्रीमंत राऊ कैलासवासी यांची आम्हावर कृपा होती. आवजी कवडे वराड प्राते आलियावर त्याचे व आमचें कटाक्ष जालियावर मग आवकृपा जाली. त्यास आम्हास श्रीमंत राऊ कैलासवासी त्याचे जागा धनी श्रीमंत आहेत. सर्व गोस्टी मागील आम्हास माफ करून पदरी घ्यावे यैसे म्हणतात. ते समई राजश्री विस्वनाथ भट वैद्यहि होतें. आम्हास म्हणो लागले कीं तुम्हास आम्हाकडे पा। त्यास आम्हावर श्रीमंताची कृपा आहे की नाही? तुम्हापासी काही श्रीमंत बोलिले कीं नाही? त्यास उतर दिल्हे कीं श्रीमंताही बोलावेसे काये आहे? तुम्ही पदरचेच आहा. मुख्य गोस्ट कीं तुमची निस्टा त्याचे ठाई आहे यैसी दिसोन आली म्हणजे त्याची कृपा आहे. येदर्थी संदेह नाही. स्वामीची आज्ञा घेउन आलो तेव्हा हा आन्वये कलला नाही. येथे आलियावर आढलला. जसी आज्ञा होईल तसा जाबसाल करू. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Bhikaji to the Peshwa informing him that the writer was approached by Durlabhram, the son of Janakiram, Alibirde's Diwan, for the Peshwa's mediation for his release. He also writes that orders have been passed by Raghuji for the collection of the Peshwa's dues, and that Raghuji sincerely desires an alliance with the Peshwa.*

1916

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 38] [September 1746

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती विशेष. बंगालेयाहून राजश्री रघोजी भोसले आले त्या तागाईत लोकाचा गवगवा पडिला आहे. अदियाप काही निर्गम जाला नाही. राजश्री विस्वनाथ-भट माहाराज स्वामीकडून आले. त्यास त्याची तो रवानगी दसरा जालियावर सातारेयास करणार. आपण दोनच्यार महिने वराड प्राते राहून मग सातारेयास जावे. राजश्री फतेसिंगबावासहि पत्रे पाा आहेत. वेदमूर्ती रा रघुनाथभट झिपरे यासहि बलावणे पा आहे. ते आले तर त्याचे हाते फतेसिंगबावाचा व आपला स्नेह करून घेऊन वराड प्रातीचे माहाल त्याचे त्यास देऊन ते व आपण मिलोन मग मकसुदाबादेस जावे यैसा विचार आपले जागा केला आहे. प्रस्तुत दसरा जालियावर रा रघोजी कराडे व रा बिबाजी वजाळ व रा तुळजोपंत यैसी तीन पतके रा जानोजी भोसले व रा बाबूराऊ या समागमे देऊन रा करावी आण आपण वराड प्राते यावे. बगालेयात जावयाचा विचार दिसत नाही. राजश्री रायाजी भोसले यास आणावयासी भला माणूस व पत्रे पा आहेत. परंतु ते काही येता दिसत नाहीं. चितातून मुख्य गोष्ट कीं जर स्वामीसी इस्टत्व होऊन आले तर करावे, असा हेत आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶The writer (Visaji Bhikaji) informs the Peshwa that Raghuji has sent for Raghunathbhat Zipre to make up the differences with Fatesingbawa through him by giving him some mahals from Berar and to take him to Bengal campaign.

No. 39] [September 1746

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती विशेष. प्राा वराड प्राती सरकारचे गाव मोकासे आहत. त्यास राजश्री रघोजी भोसले यांची ताकीदपत्रे घेऊन गांवगना पाा. त्यास प्राा मजकूरचे जमीदार व देहाये मजकूरचे मोकादम सरकारचे सनदाचा उजूर करितात. तरी स्वामीनी कृपा करून गांवगना मोकादमास आज्ञापत्रे व जमीदारास पत्रे व सैद सरीफखान सुभा प्रांा वराड यांसहि येक थैली पाठवावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶The writer requests the Peshwa to send orders to the Village Officers and the Subha for the collection of the dues of Mokasa in Berar.

1917

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक विसाजी भिकाजी कृतानेक साष्टाग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २८ रमजान परियंत शेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर स्वामीचे आज्ञापत्र आले तेथे आज्ञा की जाऊन बहुत दिवस जाले. राजश्री रघोजी भोसले याकडील वगैरे वर्तमान काहीच लिहिले नाही हे अपूर्व आहे. यैसियांसी येथील वर्तमान तर आस्वीन सुध प्रतिपदेस राजश्री रघोजी भोसले यांची पत्रे व हिकडील सविस्तर वर्तमान पूर्वीच लेहून सेवेसी पाा आहे त्या वरून श्रुत होईल. विशेष छ २९ रमजानी राजश्री रघोजी भोसले नागपुरीहून कूच करून छ २८ रमजानी वराड प्राते अस्टी अमनेरावर आले. अस्टीस मोर्चे लावावे यैसा विचार आहे. लाविले तो नाहीत. समागमे फौज हजारपरियंत जथली आहे. दो चौ रोजी जमा फौज होईल. वराड प्रातीची फौज आठ दाहा हजार परियंत जथेल असे बोलतात. राजश्री पदमोजी जाचक यांसी वराड प्राते थुगाव परगणा मोकासा दिल्हा; तेहि राहिले व आणिकहि देसीची फौजेस कागदपत्र पाा आहेत, परंतु येता दिसत नाही. देसची फौज येत नाही म्हणून खासाच बोलतात. दसरा जालियावर राजश्री जानोजी भोसले याची बगालेयात राा करावी. मग आपण नागपुरीहून वराडप्राते यावे यैसा विचार केला होता. परंतु तेहि काहीच दिसत नाही. पुढे होता होईल ते पाहावे. बुधलखंड येथून बुधेल्याकडून वकील सुरतसिंग राजश्री रघोजी भोसले याजकडे आला. त्याही लिहिले कीं राा तूर्त बारा लक्ष परियंत देतो आणि फौज घेऊन आमचे साहित्य करा. कार्य जालियावर पुढे बारा लक्ष देऊ. त्यास राजश्री रघोजी भोसले याणी जाब दिल्हा कीं हे कर्म आपल्याच्याने होत नाहीं. प्रधानपंताचा कारभार आहे. जर सातारा जाल तर माहाराजास पत्र लेहून देऊ. त्यास तो आदियाप लस्करात आला नाही. नागपुरीच आहे. बुधेल्याकडील कोणी भला माणूस नवाब निजामन-मुलुक याजकडे आहे. वकिलाची बोली कीं जर येथे कार्य न जाले तर नवाबाकडे जावे. मग तिकडून सातारा जाणे जाले तर जावे यैसा विचार आहे. राा रघोजीबावा यांणी तो त्याचा अवेर केला भला माणूस आला त्यास

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

अती त्याचा विचार तो काहीच न जाला. आदियाप नागपूरच आहे. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Bhikaji writes to the Peshwa of the various plans of Raghuji of collecting an army and coming down with it into Berar and of asking Janoji to proceed to Bengal. "But none of these plans", he says, "has materialised as yet". The writer lastly informs the Peshwa of the arrival of a Vakeel from Bundelkhand for asking succour from Raghuji. The Vakeel intends to approach the Nizam for help if necessary.*

No. 41] [*5-11-1746*

पैा छ ४ जिल्हेज (पौष)

श्रीशंकर

श्रीमंत् राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. शेवक विसाजी भिकाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा मार्गसीर्ष सुध त्रितीयापरियंत स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. पूर्वी अस्विन सुध प्रतिपदे जासूदजोडा शेवेसी राा केला. त्यावरू(न) सर्व वर्तमान श्रुत जालेच असेल. दुसरा जासुदजोडा कार्तिक सुध प्रतिपदेस अस्टीअमनेरचे मुकामीहून राा केला तोहि शेवेसी पावलाच असे(ल). सर्व वर्तमान निवेदन जालेच आसेल. हाली राजश्री रघोजी भोसले प्राा थूगाव येथे मुकाम आहे. समागमे फौज राजश्री रघोजी कराडे व बिबाजी वाजाल (?) व तुळजोपंत व रघोजी चोपडे व रघोजी गाईकवाड व आनदराऊ वाघ व किरकोल पागा मिलोन फौज हजार दोन आडीचपरियंत आहे व सिलेदार सुलतानजी शेलके व पदमोजी जाचक व नाईकजी पाटणकर व कृष्णाजी आटोले व सयाजी आटोले व आनदराऊ पाढरे वगैरे किरकोल सिलेदार मिळोन दोन अडीच हजारपरियंत होती. पागा व सिलेदार पाच हजार फौज लाहानमोठी आहे. आदियाप जानोजी भोसले आले नाहीत. तेहि हजार बाराशे होतील. सैद सरीफ सुभे आलजपूर यांची व राा रघोजी भोसले यांची छ २९ सवाली भेटी जाल्या. खास जाहागीर व सरकार आलीची जाहागीर मिलोन घासदाणा व नजर व सरसुभा मिलोन गु * गा * रुा सवातीन लक्षास सैदसरीफ याणी केला. त्याचे सरंजामात उपसर्ग न द्यावा यैसा करार जाला आहे. निशा करून मात्र द्यावी इतका आर्थ राहिला आहे. मागाहून सेवेसी लिहितो.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

प्रात वराड येथे सरकारचे गाव मोकासे आहेत. तेथील साल मजकूरची ताकीद-पत्रे देऊन जमिदारास उरुबुरू[1] ताकीद करून जमिदाराच्या चिठ्या व गावगना घेऊन जागाजागा कमावीसदार गेले. परंतु सरकारचे सनदेचा उजूर करितात तर सनदा जमिदाराच्या व गावगना मोकादमाच्या नावे येऊन सत्वर पावत यैसी आज्ञा केली पाहिजे. सनदा आलियाबर आमल चालेल. व सरदारास मोकासे दिल्हे होते त्यासहि उरुबुरू ताकीद करून त्याची पत्रे त्याजकडील कमावीसदार गावगना होते त्यास दिल्ही. सेवेसी श्रुत होये. मकसुदाबादेकडील वर्तमान तर मीरहबीब यांची पत्रे आली होती. त्याणे लिहिले कीं, फौज सत्वर येऊन पोहचते तर उतम आहे. नाहीतर काये करावे ते ल्याहावे. रा रघोजी भोसले तिकडून आले. तेव्हा मिराचा व याचा करार रुा अकरा लक्ष द्यावे. त्यापैकी मिराने सा लक्ष रुा हुड्या पा बाकी यैवज पाठऊन द्यावा आणि फौज कार्तिक मासी रा करावी. त्यास आदियाप तो काहीच विचार दिसत नाही. रघोजी कराडे व तुळजोपंत याणी तो दुखणे घेतले आहे. रा जानोजी भोसले आलियावर जो विचार होणे तो होईल. फौज तो तिकडे रा करतील परंतु माघ फाल्गून लागेल. प्रस्तुत रवाना होत नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Bhikaji to the Peshwa writing about the mobilization of the forces under his various sardars by Raghuji who had agreed to send them to Mir Habib of Orissa in return of a sum of eleven lacs.*

No. 42] *[30-11-1746*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती. शेवक विसाजी भिकाजी कृतानेक साष्टाग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा मार्गसीर्ष वद्य चतुर्दसीपरियंत स्वामीचे कृपाअवलोकनेकरून शेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर राजश्री रघोजी भोसले याजकडील वर्तमान तर छ २७ जिल्कादचा मुकाम मागबेरी प्राा सिरपूर नजीक रिसवडचा जाला. आवई तो घातली आहे कीं वरघाट सिरपूर मेहकर लोणार व किरकोली माहालचा घासदाणा घेऊन उपरीकडे जातो. परंतु रोख तिकडील दिसत नाही. कोणीकडे जाईल हा भरवसा दिसत नाही. कूच मुकाम कोणासहि सागत नाही. वरघाटी येताच वराडच्या फौजा समागमे आहेत त्यातून दाहा पाच राऊत उठोन

---

१ समक्ष.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

माघाऱ्या जातात थैसे वर्तमान आहे. रा रायाजी भोसले भामेस आपले ठाणे-यांस गेले. यांची व त्याची समजाविसी होता दिसत नाही. संताजी भोसले यांस निरोप दिल्हा. घोडीहि त्याची दिल्ही परंतु त्याही घेतली नाहीत. राजश्री बाबूराव कोन्हेर व भास्करपंताचे पुत्र रा कासीराऊ भास्कर हे पातुरास राहिले. समजाविसी होता दिसत नाही. राजश्री कोन्हेरपंत निरोप मागतात परंतु त्यास निरोप देत नाही. सर्व ब्राम्हण मंडली श्रमी आहेत. विस्वास कोणेकावर नाही. जो कोणी सरदार बंगालेयास जावयासी कबूल करितो त्यास नजर घास-दाणेयाचे यैवजी चिठी देतो. ऐवज तसाच देतो. राजश्री परसोजी माहाडीक बराणजी मोहित्या समागमे कारजेयांस गेले होते. छ १६ जिल्कादी साइकाली मद्य प्राशन करूनु साईकालची समयें कोणास न पुसता उठोन रामगाव येथे जात होते. शुधीवर नव्हते. कारजेयापासीच घोडी पळविली. त्यास विहि-रीत पडोन मेल. चाकरहि पावला नाहीं. बाइको जात होती त्यास बराणजी मोहिते याही जाऊ दिल्ही नाही. शेवेसी कलावे म्हणून लिा असे. वराड प्रातीचे गाव सरकारचे मोकासे आहेत तेथील कमावीस रामचंद्र नागनाथ यास सागितली आहे. त्यास हा काल परियंत रा नारो गणे(श) त्याजकडील कमाविस-दार आले नाहीत. हगाम खरीपाचा वसुलाचा जातो. गावगना मोकदम व जमीदार सरकारचे सनदाचा उजूर करितात. आम्ही रा रघोजी भोसले याची पत्रे घेऊन जफ्त मात्र करून जागा जागा ब्राम्हण पा आहेत. सनदा सरकारच्या मोकदमास व जमीदारास सादर जालियास वसूल चालीस लागेल. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Bhikaji to the Peshwa writing about Raghuji marching towards North without divulging the place of his destination. The writer also informs him of the differences that had arisen between Konher Ram and Raghuji. The writer promises to collect the dues of the Peshwa from the villages of his mokasa.*

No. 43] *[2-12-1746*

श्री.

राजश्री पंत प्रधान गोसांवी यांसी

ऽ श्रीमंत सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये श्नो राघोजी

शिक्का.

भोसले व माधवराव भोंसले व हणमंतराव भोंसले कृतानेक दंडवत विनंती. येथील क्षेम पौष शुध १ जाणून स्वकीयें निजानंद वैभवादिलेखनआज्ञा करीत असले पाहिजे विशेष. कृपाळू होऊन पत्र पाठविले ते पावले. राजश्री रामचंद्र गणेश व राजश्री विसाजी कृष्ण हूजूर बोलाविलें. तुम्ही हुजूर येणे म्हणून

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आज्ञा केली त्या * * * वीं पथकाची नेमणूक राजश्री पंत मारनिलेकडे (ब) ती आज्ञेप्रमाणें सरंजाम सुधां चिरंजीव रा अमृतराव भोसले व चिरंजीव सुलतानजी भोंसले व चिरंजीव सुभानराव व चिरंजीव लालसिंग भोसले जमावानसीं रवाना केले आहेत ते शेवेसी आले असतील. विदित आले पाहिजे. बहुत काये लिहिणे? कृपा लोभ असों दिला पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Raghuji Bhonsle informs the Peshwa that in pursuance of his instructions he has deputed Amritrao, Sultanji, Subhanrao and Lalsing Bhonsle to join the Peshwa with their armies.*

No. 44] *[8-12-1746*

श्रीशंकर.

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती. शेवक विसाजी भिकाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ ६ माहे जिल्हेज परियेंत स्वामीचे कृपाद्रिस्टीकरून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. यानंतर राजश्री रघोजी भोसले यांकडील साद्यंत वर्तमान लेहून पाठवणे म्हणून आज्ञा. यैसियास हा कालपरियेत नवे लोक येतात, त्याच्या बोल्या मात्र करून ठेविल्या आहेत. पैसा त्यास दिल्हा नाही. सरजामी पथकें जी आहेत त्यास काही थोडाबहूत यैवज करून दिल्हा आहे. बंगालेयांत जावयास सरजामी राजश्री जानोजी भोंसले या समागमे जावे यैसा निस्चये जाला आहे. सरजामी लोक कोण कोण म्हणतील तर राजश्री रघोजी कराडे व आनंदराऊ वाघ व बिवाजी वजाल व रघोजी गाईकवाड व रघोजी चोपडे व गिरमाजी खंडेराऊ इतके करार जाले आहेत. फौज समागमे किती होईल ते पाहावी. प्रस्तुत तो कोणाजवळ दोनशे व पाचशे, शंभरापासून पाचशेपरियंत आहेत. अधिकोतर नाहीत. बावापासी म्हणतात कीं जर यैवजाची बेगमी करून पोखती द्याल तर दाहा हजार फौज आम्ही सरजामी लोक मिलोन करून घेऊन बगालेयास जातो यैसे म्हणतात. परंतु दिसत नाही. पुढे जावयासी सिध जाले म्हणजे चौकसी करून लेहून पाठवितो. निर्मल

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

परियंत समामे जाऊन बंगालेयांत फौज जाते किती व रा। रघोजीबावा समागमे वराड प्रातें राहाते किती यांचा शोध करून शेवेसी लिहून पाठऊन देऊं. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Bhikaji informs the Peshwa that Janoji Bhonsle has been asked by Raghuji to proceed to Bengal with the Sardars Karande, Vagh, Gaekwar, etc. The writer also gives the strength of the army.*

No. 45] [*10-12-1746*

श्री.

श्रीमंत् राजश्री बाबा स्वामीचे
शेवेसी

विनंती. शेवक विसाजी भिकाजी कृतानेक सां। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ ८ जिल्हेज परियेत लस्करांत प्रा। नादरे येथे स्वामीचे कृपादिृष्टीकरून शेबकाचे वर्तमान येथास्तित आसे. यानंतर रा। रघोजी भोंसले याजकडील सर्व वर्तमान श्रीमताचे पत्री लि। आहे त्यावरून श्रुत होईल. राजश्री आपाजी सोमवंसी सरलस्कर याकडून रा। रावोपंत रा। रघोजीबाकडे आले आहेत. जंगजोड[1] यासी करावा यैसा मनसबा घातला आहे. याचे चितातून करावी यैसा अर्थ दिसत नाही. परंतु याजकडून पेगाम फारसा लाविला आहे. सरलस्करचे सरजामपैकी मजकडे मौजे शेवाले प्रा। मेहकर व मौजे वडजी प्रा। रिसवड हे दोन गाव होते. त्यास वडजी तो रा। रघोजी भोसले याणी मारली. गाव दीड प्रहर जुंजत होता. पाटील न भेटत. पंनास पाऊनशे माणूस लस्करचे जाया जाले. तीन हले मोडून माघारे घातले. दारू गोळी नाहीसी जाली. तेव्हा हती लाऊन दरवाजा पाडून गाव घेतला. दाहा पुरूश मात्र आत होते. त्यास मारून टाकिले. बरकंदाज चौघे व आड हातेरी ६ यैसे मारून टाकिले. पाटील धरून लस्करात आणिला. मग गाव स्वामीचासा त्यास कळला व आम्हासहि कळलियाउपरी जाऊन येक पाटील धरून जखमी आणिला होता तो व राडापोर रा। संभाजी सिरके याणी आणिली होती ती सोडून देविली. मौजे शेलगाव प्रा। मेहकर येथील पाटील धरून आणिला त्यास रु॥ दाहा हजार लाविले. सेवकास कळलियाजउपरी राजश्री बाबास जाऊन हटकिले की, हा

---

१ मैत्री.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

गाव श्रीमंत् राजश्री बाबाचा आहे. येक तो तुम्ही कापून काढिलात. जर तुमचे चितात याचेहि पारपत्य करणे असेल तर आम्ही गावास जाऊन पाटिलाची राडापोर व गावची रयेत बाहेर काढितो. आम्ही तुम्ही दरवाजेयावर झाडा घेऊन मालमवेसी असेल ते घेणे परंतु रुा खडणी म्हणाल तर येक पैसा मिलत नाही. यैसे साफ सागितल्यावर सोडून दिल्हा. शेवेसी कलावे म्हणून लिा असे. राजेश्री आपाजी सोमवसी यांकडील कर्जाचा पैका वसूल होऊन लोकाचे नर्कापासून मुक्त करणार स्वामी धनी आहेत. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Bhikaji describes the havoc created by Raghuji Bhonsle by suddenly attacking the villages of Vadji and Shevale.*

No. 46] [*29-12-1746*

पाा छ २७ जिल्हेज

श्री

पुरवणी श्रीमंत् राजश्री पंत
प्रधान स्वामीचे शेवेसी

विनंती विशेष. राजश्री रघोजी भोसले यांणी साहुकारापासून कर्जे घेतली होती. त्याबदल साहुकाराचे गुमस्ते समागमे गेले आहेत व कोणी खासाच गेले आहे. त्यास त्याचा निर्गम कसा केला तो साद्यत लिहिणे म्हणून आज्ञा. यैसियास हा कालपरियेंत कोणास पैसा दिल्हा नाही. देऊ दिलाऊ मात्र म्हणतात. तशामध्ये कोणी धरणे धरून बसला तर विचाराच्या * * * * * सांगतात. जर आइकोन समजले तर उतम. नाहीतर सुखरूप बसोत, खातरेस आणित नाहीत. राजश्री विस्वनाथभट वैद्य याणी मात्र आपला मतलब साधून कर्जाचा निर्गम करून घेऊन गेले. जानकी राम यांचे लेक धरून नागपुरी आणिला आहे. त्यास त्याची खंडणी मुकरार रुा तीन लक्ष जाली. त्यापैकी माहाराजाचे थैवजी रुा साठ हजार व खासा विस्वनाथभट यांणी आपले देणियांत रुा पासस्ट हजार घेतले येकून सवा लक्ष तिही लक्षापैकी करून घेऊन गेले. आणि पंचवीस हजार परियेंत बहुमानाची वस्त्रे व पदके व तुरा व गाव पाच नवे मोकासे करून घेऊन गेले. जे भटजीने रघोजीबावाजवल मागितले ते ते याणें त्यास दिल्हे. रघोजीबावाचे चितातून की, जो दरबारी आहे तो विस्वनाथभटच आहे. आणि पुढेहि मामल्याचे उभारणीस

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

चुकणार नाही यैसे वचनप्रमाण बावासी देऊन प्रस्तुत आपला मतलब साधून भटजी गेले. बाकी पावणेदोन लक्ष राहिले. त्या यैवजपैकी वेदमूर्ती राजश्री रघुनाथभटबावास रा चाळीस हजार द्यावे व काही यैवज रा नरहरपंत दिा वाकडे व काही ऐवज रा विसाजी बलाल खासनीस याणी द्यावा व रामाजी नाईक काले याणी पहिला यैवज पैकी येथाविभागे द्यावे. यैसा करार जाला आहे. तिही लक्षाचे भरवाईकहि रा रघुनाथभट व रा विसाजी बलाल खासनीस व रा नरहरपंत दिा वाकडे व रा रामाजी नाईक काले यैसे जाले आहेत. साता(र)ची हुंडी.........
....ची चिठी राजश्री रघुनाथभटाकडून घ्यावा यैसा करार करून जानकीराम याचा लेक आपले हवाला करून घेतला आहे. त्यासी करार केला कीं, यैवज कासीस तीन लक्ष व हुंडणावळसुधा जमा जाले म्हणजे याणी पोहाचा(ल)ऊन द्यावा यैसाहि करार जा(न)की रामाचे लेकाचा व रामाजी नाईक काले याचा जाला आहे. वरकड कर्जदारास येक पैसा पावला नाही. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer (Visaji Bhikaji) writes to the Peshwa how Raghuji was harassed by his creditors and how one among them Vishvanathbhat Vaidya got his account settled. He also informs how the affair of the ransom of 3 lacs for Janakiram's son was settled.*

No. 47] [*1746-47*

श्री.

राजश्री जासुद नाईक दिा रो पंत प्रधान
गोसावी यासी

८ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये श्रो जासुद मुा उंदरी रामराम विनंती उपर. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करणे विशष. श्रीमंत राजश्री रघोजीबावाची छावणी उंदरीवर जाहली. श्रावणाचा महिना येथे राहावे. तेथून निजामाचे भेटीस जावे. तेथून निघावे ते दसरा करावया नागपुरास जावे; यैसे वर्तमान आहे. सेवेसी निवेदन करा, कळले पाहिजे. बहुत काय लिहिणे हे विनंती. च्यारपाचसे फौज आहे. निजामाने बंगालियाचा इजारा[१] केला तरी करनाटकात जावे; नाही तरी बंगालियास जावे यैसी बातमी बोलवा आहे. कळले पाहिजे हे विनंती.

¶*One jasood writes to another jasood in the service of the Peshwa about Raghuji Bhonsle encamping at Undri in Berar.*

---

१ मक्ता.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 48] [1-5-1747 ?

पाा छ ६ जाा लोवल

श्री.

पुरवणी तीर्थरूप राजश्री भाऊ
स्वामीचे सेवेसी

विनंती उपरि. राजश्री फत्तेसिंगबावा पहिले खेडांवर[1] जाऊन राहिले, तेव्हां राजश्रीकडील अगर वाडियांतील निरोपाची वस्त्रें कांहीं जालीच नव्हतीं. यास्तव थोरले धननीनें अक्षत्रितीयेस बावास भोजनास बोलाऊन आणून निरोपाचीं वस्त्रें दिल्हीं. राजश्रीकडील वस्त्रें कांहीं सरंजामापासून आजपावेतों जालींच नाहींत. तत्राप मुहूर्तेकरून विडे मात्र दिल्हे होते. तितक्यावरीच बावा गेले. वाड्यांतील वस्त्रें जालीं म्हणून खेडाहून कूच करून कृष्णातीरी सोनगांवावर[1] गेले. खेडापलिकडे कोसीं दुकोसीं तळ मात्र पालटला. राजश्री रघोजीबावासही धाकटे बाईनें वस्त्रें दिल्हीं. परंतु येथेंच आहेत. त्यास राजश्री रायाजी भोसले यांचे सरंजामाचे कटकटीचा वेध लागला आहे. तो निर्गम जाला म्हणजे रघोजीबावाचें जाणें होईल. रघोजीबावा कांहीं कर्नाटकांत जात नाहींत. आपल्या मुलकाकडे नागपुराकडे जाणार. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Fattesing and Raghuji Bhonsle were given leave to depart. Letter to Bhau from Satara.*

No. 49] [21-12-1747 ?

श्रीमंत महाराज राजमान्या विराजित
राजेश्री जयाजीबावा सिंदे गोसावी यासी

अज्ञाकित रघुनाथ जयराम कृतानेक रामराम विनंती उपरी. येथील कुशल पौष्य सुद्ध १ मुाा मकसुदाबाद जाणून माहाराजाही कुशललेखनआज्ञा केली पाहिजे विशेष. महाराजाकडोन अज्ञापत्रे येऊन सनाथ न केले तर सर्वदा पत्रद्वारा परामृष्य केला पाहिजे. येथील वर्तमान तर श्रीमंताचे आज्ञेप्रमाणे पटण्याचे चौथाइची मामलतीची विचारणा केली. त्यासी त्याणी उत्तर दिधले की बंगालियाचे मामलतीचेविशी पातशाहाही फर्माण पाठविला की चौथाईचा मामला श्रीमंताकडे रुजू असे, त्यांहचे पैसे हजुरात पाठवीजे, त्यासी खलीते बोलाचालीचे श्रीमंताकडे पाठविले आहेत. त्यासी पटणा व बंगाला त्यांहचकडे आहे,

---

१ सातान्याजवळ.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ते सर्व मामलत दोन्ही एकत्र विले लावतील. त्यासमयी सेवकाणे उत्तर दिधले कीं रघोजीचा मामला व श्रीमंताचा मामला एक कसा होतो? त्यासी तुमचे कार्यावीशी नाना येत्न करून मामलत ठिकाणी लाविले आहे. त्यासी पटण्याची मामलत चुकऊन पैसे द्याल तर ते तुमचे कार्यास विलंब लावनार नाही. त्यासी देतो ऐसेहि न म्हणेत. हेच उतर देतात की सर्व मामलत श्रीमंताकडेच आहे तर सरकारचे कार्यानिमित्य ताकीद लिाया कार्य होईल. खलिते नवाबास पाठविले होते ते पावले करून जबाब पाठविले आहेत त्यावरोन सर्व विदित होईल. सर्व भरवसा माहाराजाचे कृपेचा आहे. विशेष काय? सेवकास पदरचे जाणून सर्वदा आज्ञापत्रे करोन सांभाळ करीत असले पाहिजे हे विनंती.

¶*Jayaji Sindia is informed by his agent at Murshidabad, Raghunath Jayaram, why the Nawab had not paid the dues of chouth and how he referred the old point to the Peshwa.*

No. 50] [*24-2-1748 ?*

श्री

श्रीमंत राजेश्री भाऊ स्वामीचे सेवेसी

सेवक आज्ञाधारक सिवराम नारायेण कृतानेक विज्ञाप्ति येसीजे. राजेश्री रघूजी भोसले यांचे लश्करातून देउलगावचे मुकामी विभक्त जालो ते फाल्गुण शुध प्रतिपदेस जामचे मुकामी श्रीमताचे लश्करात येऊन पावलो. स्वामीस कलावे म्हणून सेवेसी विज्ञापना लिहिली आहे. आम्हाबराबर जासूद जोड्या तीन होत्या. त्यांचे नाईक स्वामी बराबर आहेत. त्यास श्रीमंतानी आज्ञा केली की ह्या तीन जोड्या भाऊसाहेबाकडे पाठवणे. त्यावऱ्हून स्वामीकडे रवाना केल्या असेत. राजेश्री रघूजी भोसले यांचे कितीक वर्तमान स्वामीचे पाये आवलोकनी सेवेसी निवेदन करीन. येथ श्रीमंतास फालगुण श्रुध सप्तमी रविवारी * * * * * * याचा निश्चये आहे हे विज्ञाप्ति.

¶*Shivram Narayan informs Bhausaheb that he left Raghuji's army at Deulgaon and joined the Peshwa's army at Jamb.*

No. 51] [*14-9-1748*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक विस्वनाथ भट वैद्य कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता छ १ माहे शोवालपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पत्र पाठविले तेथे लिहिले जे तुम्हास बहुत दिवस त्या प्रांतास लागले व राजश्री रघोजीबावा भोंसले राजदर्शनास कधी येणार ते लिहिणे म्हणून आज्ञा. त्यास राजश्री रघोजीबावा छ २३ रमजानी नागपुराहून स्वार होऊन छ मारी मुकाम मोलविहिरे पा जरूड येथे आले. पुढें मजल दरमजल वराड प्रांते येत आहेत. वरकड वर्तमान तरी राजश्री जानोजी भोसले याजसमागमे रा तुलजोराम व समस्त सरदार देऊन फौज बंगाले प्रांते अविलंबे रवाना करून राजदर्शनास यावयाचा विचार करितील. सविस्तर अर्थ रा विसाजी भिकाजी याणी लिहिले आहे त्यावरून विदित होईल. विशेषार्थ ल्याहावयासारिखा नाही. आम्ही निरोप घेऊन अविलंबेच येतो. विशेष काये लिहिणे, लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Vishvanath Bhat Waidya informs the Peshwa that Raghuji has left Nagpur for a visit to the Chatrapati.*

No. 52] *[1748?*

श्रीशंकर

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री सदासिवपंत
श्वामीचे सेवेसी

पो व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक सा नमस्कार विनंती उपरी. येथील क्षेम जाणून तुम्ही आपले श्वकुशल निजानंद वैभवलेखण केले पाहिजे विशष. बहूत दिवस जाले आपणाकडील वर्तमान येऊन परामृश न जाला 'तर यैसे न पाहिजे येणार वार्तिकासमागमे तोशवित जाणे. येथील वर्तमान तर श्रीमंत राजश्री बावासाहेब्रास घेऊन देउलगाव पावेतों आलो. पुढेहि मजल दर मजल येत आसो. तर गाजुदीखान व राजश्री मल्हारबा व राजश्री सिंदे यांचे काये वर्तमान आहे व पेशवियांची भेटी कधी होत्यात हे साकल्य लिहून पाठऊन दिल्हें पाहिजे. रुणानबंद आहे तर दसरियाचे आलीकड अथवा पलीकड भेटीहि होतील. तुम्ही पहिल आम्हास येक पत्र पाठविले होते त्याचा जाब न पाठविला म्हणून रागास न येणे. आम्हास न कलत जासुद पाठविले पत्रे सिध होती म्हणून अंतर पडले तर रागास न येणे. बहूत काये लिहिणे? लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Vyankatrao Moreshwar to Sadashivrao informing him of his arrival at Deolgaon with Raghujibowa. The writer further makes enquiries about Gazi-ud-din Khan Holker and Sindia.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 53] [1-10-1749 ?

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. शेवक विसाजी भिकाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल ता। आस्वीन सुध प्रतिपदापरियत स्वामीचे कृपे करून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. यानंतर स्वामीची आज्ञा घेऊन श्रावण वद्य चतुर्थीस स्वार जालो ते भाद्रपद वद्य पंचमीस नागपुरी पावलो. राजश्री रघोजी भोसले याची भेट जाली. भेटीनंतर त्याही साद्यंत वर्तमान आपणाकडील सांगितले कीं आम्हास श्रीमंतासी दुसरा विचार नाही. जसे माहाराज स्वामी तसेच आम्हास वडील श्रीमंत. सर्वस्वे आमचा अभिमान धरून सरदार लोकांचा लवकीक वाढवावा यांत श्रीमंताचे भूषण आहे. वरकड कितेक मतलब दिसोन आला कीं आपणासी इस्टत्व संपादावे. दोन च्यार वेला आम्हास येकांतास नेऊन पुसत होते कीं काये निमित्ये तुम्हांस पा॥ ? आम्ही त्यास सांगितले कीं वराडप्रांती सरकारचे गाव मोकासे आहेत, त्यास आज च्यार वर्षे अमल देत नाही. जर अमल सुप्रत्यतीने सरकारचे गावचा अमल दिल्हा तर उतम नाही तर हरतरेने घ्यावा लागेल याजकरितां श्रीमंताहि पा॥ त्यावरून गावाची ताकीदपत्रेहि दिल्ही. येकादो दिवसा कमाविसदाराकडे रा॥ करितो. सेवेसी कलावे म्हणून लि॥ असे, हे विज्ञापना.

¶*Visaji Bhikaji to the Peshwa writing about his interview with Raghuji Bhonsle who, the writer says, expressed his thorough reliance on the Peshwa and who promised help to the writer in collecting his dues.*

No. 54] [27-10-1749

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीराजाचे सेवसी

आज्ञाधारक व्यकटराऊ मोरेश्वर करद्वये जोडून सा॥ नमस्कार विनंति विज्ञापना येसी जे. येथील वर्तमान तों राजश्री रघोजी भोसले यांची पागा आबेगढी आहे. त्यासी तेथे महमदखान रोहिला होता त्याने किला बलकाऊन फिरोन गोष्टी सांगितली कीं तुम्ही धणी आसोन दोन लक्ष रुपये लोकांचे कर्ज जाले आहे. ज्याने माझ्या कर्जाची निशा करून द्यावी मी त्याचा चाकर. तेव्हा राजश्री रघोजी भोसले नागपुरीहून स्वारी करून आबेगडास गेले. त्यानें आठ दिवस

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

यासी तरवारीनेच गोष्ट सागितली. मग याणी त्याचे कर्जाचे रुपयांची निशा केली. मग तो रोहिला येऊन भेटला. याणी आबेगडास दुसरा किलेदार पाठविला. रोहिलियास समागमे घेऊन नागपुरास आला; तो दुसरियाणे भुरा मिया * * बाळापूर फौजदार आलमपूरच्या सुभ्यानें पाठविला. मग राजश्री रघोजी भोसले याणी मोहर्त पाहून डेरे बाहेर दिल्हे. तेथून कूच करून * * * * * येक मुकाम केला. तेथून स्वार होऊन उबरावतीस आले, आणि सैद शरीफखान कुरंदखेडावरी उतरले होते; याणी साडणीस्वार पाठविला होता कीं आपण स्वार होऊन ताहासी पुरना नदीनजीक टाकली येथे जातो, तेथे तुम्ही येणे. त्याजवरून राजश्री रघोजी भोसले उबरावतीहून सिताईचे पाडुरास आले. तेथे राजश्री कासीराव भास्कर याला समागमे घेऊन आले. समागमे आडीच तीन हजार स्वार आहेत. पुढे आणिक जमा होतात. नवाब सैदशरीफखान आश्विन वद्य ८ रविवारी त्यांच्या डेरियासी गेले. भेटी जाल्या. सोमवारी राजश्री रघोजीबावाहि त्यांच्या डेरियास गेले. जावसाल येकले आपल्या आगेच बोलणे चालणें बोलायाचे ते श्वमुखेकरूनच बोलतात. कोन्ही मुतसदी लागत नाहीं. दरबारचा रंग तर येसा आहे. यावर मोगलाचा पुत्र आलजपुरी राहिला होता. त्यासी बोलाऊ पाठविलें होतें तेहि आले. त्याची व मोगलाची आनभाश झाली कीं सालदरसाल घासदाणा वगैरे जे घेतां ते सालमजकुरी घ्यावे, इजाफा कोठे न घ्यावयाची नजर होती कीं येदा इजाफा घासदाणा घ्यावा तो महकूम जाला. मोगलास नवाब नासरजंग यांची बालावणी रोज बरोज येता. याणे आपला पुत्र राजश्री रघोजीबावा यांच्या हातीं दिल्हा आणि मोगल कूच * * * * * * ऊन नवाबाकडे जाणार * * * * * राजश्री रघोजी बावाचा मनसुबा आहे कीं भास्करपंताचे पुत्र यांसी बंगालियांत रवाना करावें. आपण वऱ्हाडच्या मामलती विल्हे लाऊन तुळजापुरावरून सातारियासी यावे आणि करणाटकची बोली आहे व जानोजी भोसले यासी नागपुरी ठेऊन आले आहेत. रकारपूर्वकास नवाब नासरजंग यांचे खत आले कीं तुम्ही आपले सरंजामानसी येणे आणि हे फत्ते जालियावर ईश्वरकृपेंकरून तुम्हासमागमे आपला सरंजाम देऊन मालवियाचे कामकाज तुमचे हाते घ्यावें येसा हेत आहे. तर कुल सरंजाम घेऊन सिताबीने येऊन पोहचने. आपणास तुमचा भरवसा फारसा आहे. आणि तुमचे विशाई कितेक सैदशरीफखान यासी लिहीले आहे त्याजवरून कळू येईल म्हणून त्यांचे पत्र आले. त्यासी याणी त्याला उतर

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लिहिले कीं आपला सरंजाम बंगालियांत गेला आहे आणि काही काही येथेहि आहेत. काही खर्चाचा हुकूम होये कीं आपण लोकास नालबंदी देऊन खिजमतींत येऊन पोहोचतो. आपण रकार[१]पूर्वकाच्या लस्कराच्या मागे दोन कोस चालतो आता मोगलाच्या लस्करात आहोत. त्यांसी व यासी येक्या कोसाचा तफावत आहे. मोगल गेलियावर मागती यांच्या लष्कराच्या दुमे[२]दारीस चालावें लागतें तो काहीं * * * * * * * नाहीं. चोरून मागे * * * * * * * * * * * * करून सैदशरीफखान यासी * * * * * व राजश्री रकारपूर्वकास पत्र व वस्त्रे येसी पाठविलियाने सेवकास येथे बसावयासी जागा मिलती. जर हा न राहो दे तर आविधाचे इतलियाने येखादे जागा करून घेऊ व आपणासमागमे पाच जोडी जासूद होते त्यापैकी पुढे येक चवकडा पाठविला. वाटा चालत नाहीं. मुलुक नापेर जाला आहे. बातमी तर वरचेवर जे वर्तमान येकिल्यात आले तें ल्याहावे लागतें. सांप्रती येक जोडी येक्या ग्रहस्ताच्या समागमे सोबतीने पाठविली आहे. आपणापासी चवघे जासूद राहिले आहेत. चवघानी काये करावे? मुलुक तो चोरमागे चालवे लागतें. स्वामीचे प्रतापेकरून हा कालपरियेंत आपल्या आबेने आहेत. पुढेहि काही चिंता नाही. परतु आणिक जोडी पाच पाठविल्या पाहिजे म्हणजे काही भीत नाही. माहाराजाचे पुन्य समर्थ आहे; तर रकारपूर्वकाचे भेटीचा प्रसग बनला तर करून घेतो. मुतसदी जे आहेत त्यांच्या घरास रात्री जात आसतो. राजश्री सिदाजीपंत सोनटके यांची भेटी घेतली. मातबर माणूस कारभारी तेच आहेत. त्याला भेटलो ते दिवसी दोन वस्त्रे त्याला दिल्ही; व राजश्री कोनेरपंत फडनीस यांचे पुत्र राजश्री नाना म्हणतात त्यासी भेटलो. येक श्रीवेष्टन[३] त्यासी दिल्हे व बिंबाजी व जान(बा?) यांसी भेटलो. येक श्रीवेष्टन त्यासी दिल्हे. या तिघानी निश्चय केला कीं राजश्री रघोजीबावास भेटवितो, काही चिंता नाही. आपण रात्री यांच्या घरास जातो. तेथे वर्तमान जे येकावे ते ल्याहावे; परंतु त्याचे भेटीवाचून राहाता येत नाही; परंतु खर्चवेच लागतो. या खर्चास स्वामीची आज्ञा नाही. परंतु जेथे जावे तेथे आपल्या धण्याचा लौकिक होये आणि आपली शरम राहे येसे केले पाहिजे. यासाठी या कारकून मंडळीस पंचवीस रुपयाची वस्त्रे दिल्ही. जर रकारपूर्वकाची भेटी जाली तर जे लागतील * * * * देऊं. आपल * * * *

---

१ रघूजी करांडे ? २ पिछाडीस. ३ वस्त्र.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

*   *   परंतु चोरीन   *   *   *   *
*   *   हा प्रयेत्न केला. परंतु हा प्रयत्न वावगा नाहीं. भेटलियाने तो काही आपले करूहि सकत नाही. कुलवर्तमान कलत जाईल तर येविशीचे आज्ञापत्र पाठविले पाहिजे कीं त्याजप्रमाणें वर्तनूक करू. येथील चाकरीचा विचार तो परस्परे माहाराजास विदित होईल कीं कोन प्रकारची आहे. आम्ही लेकरे आहोत. आमच्या वडिलाचें ज्यन्मपरियेत चालविले आणि आम्ही जिवेंप्राणें स्वामीकार्यास आंतर करणार नाही. याप्रांतीं माहागाई बहुत आहे. दीडसेरी पायेली येस्या बारा पायेली दाणे आहेत. कृपाकरून जासूदाचा माहादरमाहा देविला पाहिजे कीं माहागाईमधे बेफिकीर कामकाज करतील. लस्कराभवते रातदिवस फिरावें लागतें, तर त्यांचे खर्चाची तजवीज केली पाहिजे आणि सेवकासहि खर्चास पाठविले पाहिजे. माहागाईनें बहुत हैरान केले, रोज बरोज रुपया पुरत नाही ; सर्वहि विकत घ्यावे लागतें ; तर कृपा करून जासुदांचा व आमचा व घोडियाचा खर्चाची तजवीज केली पाहिजे व मुतसदी यासी वस्त्रे दिल्ही आहेत याचे रुपये पाठविले पाहिजे ; व सैदशरीफखान यांस थैली व वस्त्रे व रकारपूर्वकास पत्र व दोन वस्त्रे पाठविलियाने उपर दिसोन येतो. आधी
*   *   आज्ञा केली पाहिजे. दुसरे   *   *   *   *
*   *   *   *   राजश्रीनी रकारपूर्वकास   *   *   *
*   *   *   ला कीं तुम्ही आपल्या मुलकात बंदोबस्त करून येथे येणे. आम्हास भरवसा तुमचाच आहे. येथील कितेक बंदोबस्त करणें लागती(ल) ते तुम्हा वेगली होत नाही. तर सत्वर आपला बंदोबस्त करून स्वार होऊन येणे यैसे लिहिले आहे म्हणून कचेरीत बसोन मोगळापाशी व लोकापासी कचेरीत बसोन बोलतात. हा कागद राजेश्री विश्वनाथ वैद्य याजबाार राजश्रीनी पाठविला आहे. आणि राजश्रीचा हेत आपणावर बहुत आहे. आपणाविगले काही होत नाही येसे बोलले व वद्य १३ त्रयोदसी सुक्रवारी सैदशरीफखान त्यांच्या डेरियासी गेले होते. आपला पुत्र त्याच्या हाती दिल्हा आणि वस्त्रे दिल्ही व रकारपूर्वकास हाथी दिल्हा. समाधान करून नवाबाकडे येका दोन दिवसा कूच करून जाणार आहेत. चतुर्दसीचे दिवसी रकारपूर्वक मोगलाचे डेरियासी आला आणि पितापुत्र उभयतांस व शरमस्तखान यासी वस्त्रे दिल्हीं व येक घोडा व हतीन दिल्ही आणि कितेक (म)तलब लिहून दिल्हे ते बजिनस बितपसील सैदशरीफखान याणी नवाब नासरजंग याजपासून निश्चयेकरून घेऊन येतो म्हणून कबूल करून यादी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लिहून घेतल्या आहेत ; त्याजप्रा परवाणे घेऊन येतो यैसी आणभाश जाली. पा बितपसील.

१ नादगावपेठ रघोजी भोसले यांची.

१ पा लातूर
* गिरडमाडगाव
* * *
अबरावती.

१ पा दाऱ्हव
१ पा पापल
यासिवये माहाल १० दाहा आहेत त्याचे स्मरण नाही.

——
१५
——
२२

१ पा आजी आशेरी.
——
७

सदरहू बावीस माहाल नेमून दिल्हे आहेत याचे परवाणे घेऊन येतो. यासिवाये नगदी दाहा लक्षांची बोली आहे. परंतु निमेचा तह जाला आणि आरकाट सर जालियानंतर तिकडहि माहाल द्यावे येसी बोली आहे. आपण स्कारपूर्वकांच्या मागे कोसीदुकोसी फिरत होतो. मोगलाच्या सैन्यात राजश्री शंकराजी केशव फडनीस दिमत राजश्री कान्होजी भोसले पूर्वी दिवानगिरी वगैरे कुल काम त्याचे सरकारचें करीत होते त्यांचे पुत्र राजश्री त्रिबकराव शकर मनसबदार मातबर माणूस आहेत. यासी राजश्री त्रिबकराव मामाहि जाणतात. हे आपणावर पूर्वीपासून स्नेह करीतात. यास्तव आपण यांची भेट घेतली. यांही आपणास बहुत आश्वासन दिल्हे कीं तुम्ही आपले खातरजमेने राहाणे स्वकार्ये करीत जाणे. यावरून यांपासी आहो. यांचा हेत विशेशातकारे कीं काही आपणाकडील सेवा घडून यावी. याच्या नावे आज्ञापत्र आलियाने सेवसी येतील. यांच्या वडिलाणी मातबर कामे केली हे आपणहि परस्परे येकिलेच असेल. यासहि इकडे जागीर व मनसब आहे. परतु मुख्य हेत की स्वामीपासी राहून शुधान सेऊन[1] सेवा करावी

१ शुद्धान्न सेवून.

1933

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येसा हेत आहे तर कृपा करून यासी पत्र ल्याहावे कीं तुमचेविसी व्यकटराऊ याणी लिहिले त्या (अपूर्ण).

¶*News-letter from Vyankatrao Moreshwar to Bhausaheb from the camp of Raghuji Bhonsle who was required by Shahu immediately to come to Satara. The letter gives valuable details of the projects of Raghuji Bhonsle, Nizam Nasirjung and others, at the time of the death of Shahu.*

No. 55] *[19-11-1749 ?*

पौ छ १८ मोहरम

श्रीलक्ष्मीकांत

श्रीमंत माहाराज मातुश्री आईसाहेब साहेबांचे सेवेसी

विनंती सेवक रघोजी भोसले सेनासाहेबसुभा कृतानेक विज्ञापना. सेवकाचें वर्तमान ताा छ २९ माहे जिल्हेज मुकाम नजीक लातूर येथे साहेबांचे कृपावलोकनें- करून सेवकाचें वर्तमान यथास्तित असे विशेष. साहेबीं राजश्री आपाजी भिंवराव या समागमे आज्ञापत्र सादर केलें तें प्रविष्ट होऊन संतोशावाप्ति जाहाला. सरकारचा यैवज झाडियानसी पाठवणे म्हणोन आज्ञा केली त्यास आज्ञेप्रमाणें ऐवज पाठवावयास कोण्हे गोष्टीचा सेवकास उजुर आहे ऐसा अर्थ नाहीं; परंतु गुदस्तांपासून आविंधांची मसल प्राप्त जाहाली आहे, याजमुळें व बंगालियातून चिरंजीव राजश्री साबाजी भोसले मसलत करून आले, त्यांचे फौजेची समजाविसी करावी लागली याजमुळें सेवकाची वोढ जाली आहे. याजकरितां यैवज पाठवावयास योग वडोन आला नाहीं. येविसींचा सविस्तर अर्थ मााारनिलेजवल सांगितला आहे. सेवेसी विनंती करितील त्यावरून विदित होईल. सांप्रत मसलत प्राप्त जाहाली आहे. याचा परिणाम होऊन माघारे नागपुरास गेलियावरी तरतूद करून आज्ञेप्राो येवजाची रवानगी करून पाठविली जाईल. सेवेसी विदित व्हावें याजकरितां विनंती लिहिली असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Raghuji Bhonsle to Tarabai (?) : begs to be excused for his inability to send her dues in time owing to troubles in Bengal and on his southern border.*

No. 56] *[19-3-1750*

राजश्री सदाशिवपंत गोसावी यांसी

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्री रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कुशल लिहित असिले पाहिजे विशेष. गोसांवियानी पत्र पाठविले तें पावले. लिहिले वर्तमान अवगत जाले. अविलंबे यावें म्हणोन लिहिले. यैशियास मजल दरमजल धोबीपेठेवरी येऊन दाखल जालों. वरकड कितेक वर्तमान राजश्री गंगाजी गोपाल दिवाण व राजश्री लंबोदर धुंडीराम यास सांगून पाठविले आहेत हे सांगतील त्यास्तव कळेल. रा. छ २१ रबिलाखर. बहूत काय लिहिणे ! कृपालोभ असू दिला पाहिजे हे विनंती.

शिक्का.

मोर्तब सुद.

¶*Raghuji Bhonsle to Sadashivpant, that he is hurrying up with all possible speed.*

No. 57] [Prior to April 1750 ?

श्री

श्रीमंत राजेश्री पंत प्रधान स्वामी
समर्थाच्या पादांबुज्याप्रति

आज्ञाधारक कृस्णराऊ गोविंद साा नमस्कार विनंती उपरी. रा रघोजी भोसलें व त्रिंबकजी भोसले व रा बुऱ्हान मोहते वगैरे त्याचे मडली तमाम येकत्र होऊन तह केला की फौजेसहवर्तमान सातारायासी जावे. सेवकाने बहुता प्रकारे सागितलें परंतु त्याचे ध्यानास येत नाही. फौज तो खडे गनती गंगाजलनिर्मल ताई याची साडे च्यार हजार व रघोजीबावाची फौज साडे तीन हजार येकून आठा हजार भरलें. त्यास काा पार फार तमाम मुलुक लुटून बुडवितो. येथे पथोर आले. त्यानी बिरव त्याची.स्तुत यैसी केली की तुम्हावाचून बंदोबस्त राज्या होत नाही. नाना प्रकारचे बोल्या त्या पत्री लिहिता येत नाही ; परंतु बावासाहेबास वसवास स्वामीचा. अदियाप इतबार पुरत नाही. घडीघडीचे छंदबंद. बावासाहेबाचा मिज्याज तो पाऱ्यासारखा ! नळनिपत्रावरील जलबुंद ! सारावश फौजेसहवर्तमान आले तर येतात. कळल पाहिजे हे विज्ञाप्त.

¶*Krishnarao Govind writes to the Peshwa how attempts were made by the Satara Raja to win over Raghuji to his side.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 58] *[5-1-1750*

श्रीशंकर

विनंती. सेवेसी आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक सा। नमस्कार विनंती प्रार्थना येसीजे. येथील वर्तमान ता। छ ७ माहे सफर पावेतों मुकाम चंद्रपूर साहेबांचे कृपेकरून येथास्तित आसो विशष. राजश्री रघोजी भोसले सेना॰ाहेब सुभा यासी पत्रें मातुश्री आईसाहेबानी पाठविले, त्या पत्रांतील मजकूर कीं चिरंजीवसहवर्तमान मुकाम किलेमजकुरी केला आहे; तर तुम्ही पत्रदरशनी फौजेसहवर्तमान सत्वर काम जरूर आहे; आगर प्रस्तुत तुमचे येणे न होय तर राजश्री पिराजी नाईक निंबालकर याजसमागमे पाच हजार श्वार देऊन सत्वर पाठऊन देणे. या कार्यास हुजरे आले आहेत आणि यांचा निश्चय तों येसा आहे कीं आपण पेशवियासी सख्य केले आहे. तें काही त्यासी दुसरी गोष्टी त्यासी सांगावी हा अर्थ राहिला नाही. पहिलेच शपतपूर्वक त्यांसी केली आहे तेच आहे, आणि ज्याप्रा। ते आज्ञा करतील त्याजप्रा। आपण वर्तनूक करू हा यांचा द्रुढनिश्चय आहे. यास्तव याणी आपले तर्फेने राजश्री मैराळ नारायेण स्वामीचे सेवेसी पाठविले आहेत हे मुखवचनेकरून सविस्तर निवेदन करतील त्याजवरून विदित होई. साहेबांचे पत्र आले म्हणजे ज्याप्रा। आज्ञा येईल त्याजप्रा। वर्तनूक करू येसा यांचा परिश्चिन द्रुढनिश्चय आहे. येथून पुढे गंगातीरास जाणार आहेत आणि राजश्री बावांनी बंगालियाविसी राजश्री अमृतराव यासी पत्र श्वामीचे पाहिजे म्हणजे सांगितले आहे तर पत्राची काये ते आज्ञा केली पाहिजे. पत्रासाठी बहुत दोनच्यारदा सांगितले तर कृपा करून पत्र पाठविले पाहिजे व राजश्री भगवंतराव कडेकर (?) याजविसी सागितले आहे कीं आपण कागदपत्र आमचे आणविले पाहिजे. बोलले कीं त्यांचेहि कागदपत्र आणवितोत. तेहि पाहिलियावर इनसाफाच्या रुईने जे होईल ते करू. त्यासी कडेमारी सरकारचा झेंडा गेला आहे आणि पागाहि तेथे आहे. गावची लावणी करणे लागती त्यासी का। मारी कुरणें निंबगावकराणी राखले आहे ते सोडून देणे म्हणून निंबगावकरास सरकारचें ताकीदपत्र आले. ते ताकीदपत्र बजिनस येथे घेऊन आले त्यासी बोलले कीं तुम्ही पेशवियासी विनंती लिहिणे कीं जोपरियेंत उभयेतांचा कजिया चुकेल तोपरियेंत ज्याप्रा। कुरण होते तेप्रा। राहो देणे. मग ज्याप्रा। आपण इनसाफ करतील तेव्हां आज्ञा करतील त्याजप्रा। वर्तनूक करू, येसे म्हणू लागले त्याज-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वरून सेवेसी विनती लिहिली आहे. ज्याप्रा॥ आज्ञा स्वामी करतील त्याप्रा॥ यासी सांगू. सेवेसी श्रुत होये. बहुत काये लिहिणे? लोभ आसो दीजे हे विज्ञाप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar informs the Peshwa that letters have been sent by Tarabai to Raghuji with a request to come to her assistance personally or to send Piraji Naik with a strong force. Raghuji, he says, is, however, loyal to the cause of the Peshwa and is most unwilling to destroy the friendly relations that have existed between them.*

No. 59] [*16-2-1750*

श्रीशंकर

सेवेसी विनंती. व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक सा॥ नमस्कार विनंती प्रार्थना यैसीजे. येथील क्षेम ता॥ माघ वद्य ६ शष्टी मुकाम पा॥ माने साहेबाचे क्रुपेकरून येथास्तित आसे विशष. राजश्री रघोजी भोसले याणी कृष्णाजी गोविंद सुभेदार प्रांत वराड यांच्या हवाला कुल जतीची मामलियेत केली आणि जे काही मातबर रोबरी चुकवावयाचे आहेत ते चुकऊन कूच दरकूच माहाराजाचे भेटीस येतात. आलं(ज)पूरच्या सुभ्याचा दिवान आपाजीपंत आले आहेत व बालापूर आकोले येथील ताहूद[1] मनास आनून चुकवती करितात. कोठे ठाणे बसवीत नाहीत की साहेबाकड यावयाची जलदी बहुत आहे. यास्तव कोणे ठिकानी गुता करीत नाही. आठा दिवसांत गंगातीरी दाखल होतात. * * दुसरे वर्तमान आईसाहेबाची पत्रें व हुजरे वरचेवर येतात. आणि पत्रे रुसून येता(त) की, आम्ही पाच सात आज्ञापत्रे पाठविली आणि तुम्ही न आले तर हे गोष्टी उतम नाही. जे आम्हास आगत्य तेच तुम्हास आगत्य. आणि तुम्ही इतबारी चाकर, हा राज्याचा आभिमान तुम्हास आसावा, यैसे आसोन तुम्ही येत नाहीत, तर हे उतम नाही. तर पत्रदरशनी कूच दरकूच फौजसहवर्तमान येथे येणे. त्यासी हे काही त्यास जाब देत नाहीत. जोपरियेंत पेशवियांची भेटी होये तोंपरियेंत त्यासी काही बोलत नाही. मग यामुले प्राण जावे आथवा जे होईल ते हो, परंतु तिकड जाणार नाही. यैसी येकनिष्टता श्वामीचे चरणासी आहे. हे काही दुसरा आर्थ जाणत नाहीत. राजश्री लंबोदरपंत आलियावर समाधान जाले. आणि आगोदर तों यावयासी सिधच होते. पर आता जलदीने येणे लागले. त्यासी

---

१ ताहूद=ठराव, खंड किंवा मक्ता.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जाले वर्तमान ते माहाराजाचे सेवेसी निवेदन केले आसे. पुढे जे होईल ते वरचेवर विनंतीपत्रे चौ पाचा दिवसांत रवाना करतो. आणि स्वामींचे प्रतापेकरून सत्वरच घेऊन येतो. साहेबास कलावे म्हणून विनती लिहिली आहे. बहुत काये लिहिणे ? सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ती.

¶*Vyankatrao Moreshwar assures the Peshwa of the full support of Raghuji Bhonsle, though he has been receiving constant communications from Tarabai.*

No. 60] [*February 1750*

श्री

* ठऊ आम्ही इतकी पत्रे येथून पाठविलीं ते येकहि जोडी फिरली नाही. तर त्या जासुदास वरचेवर ताकीद होय कीं, सिताबीने जाबसाल नेत जाणे म्हणून ताकीद केली पाहिजे. व राजश्री बावास पत्रे श्वामीकडल येतात त्याचा जाबसाल बावा आम्हास पुसतात कीं, तुम्हास पात्र आले कीं नाही. हे आम्ही त्यांस काये सांगावे ? तर कृ(पा) करून आज्ञापत्र लिहीत जावे की चाकरा उपरी येथे होये आणि जासूद पत्रे घेऊन येतात ते परस्परे जाऊन भेटतात. यांत माझा भरम जातों. मी गुलाम आहे आणि कधी गुलामापासून आंतर पडले नाही. आणि पुढेहि पडनार (नाही). (मा)हाराजाचे चरण साक्ष आहेत तर कृपा करून बावाच्या पत्राबाार आज्ञापत्र पाठविले पाहिजे म्हणजे माझी स्तीत राहील ऐसे आहे. सेवेसी श्रुत होय बहुत काय लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar requests the Peshwa for communications intended for Raghuji Bhonsle being sent through him.*

No. 61] [*14-3-1750*

श्रीलक्ष्मीकांत

राजश्री बालाजी पंडित प्रधान गोसावी यांसी

शिक्का

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो रघोजी भोसले सेनासाहिबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे विशेष. येथील वर्तमान वरचेवरी गोसांवियांस लेहून पाठविलेंच आहे. सांप्रत कूच दरकूच बोधनावरी येऊन दाखल जालो. अत:पर त्वरेनेच येत आहो. गोसावियानी पत्र प्रविष्ट जाहालियावरी येक दोन मुकाम

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

करावें. वरकड वर्तमान राजश्री सिदोजी राऊत लेहून पाठवितील त्यावरून अवगत होईल. रा। छ १६ रबिलाखर * सूज्ञाप्रती विशेस काये लिहिणे ? कृपा लोभ असू दिला पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Raghuji Bhonsle intimates to the Peshwa his arrival as far as Bodhnāur.*

No. 62] [पौ। *23-3-1750*

छ २९ रबिलाखर

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नानासाहेब स्वामिराजाचे सेवेसी

आज्ञाधारक माधोराऊ मोरेश्वर करद्वये जोडू सिरसांग नमस्कार विनंती उपरी. विनवया प्रार्थना यैसीजे. आमचे वर्तमान तर मुा। गुंजमटके येथें सुखरूप असो. काही चितां नाही. यानंतर बातनीचे वर्तमान तर पूर्वी साहेबाची दोन चार चागली अभयेपत्रे आली होती. तेव्हां श्रीमंत रघूजीबावा म्हणाले जे आपण तुलजापुरास येतो. त्यास तुलजापुरास श्रीमंतबावा आले होते. ते येक दिवस मुकाम केला. मग दुसरे दिवसी म्हणाला जे रा। महिपतराऊ खासनीस चिटगोपीयाचे-यैवजासाठी ठेविला आहे त्यास त्याजवर कलबुरग्याचे मोगलानें दगा केला यास्तव कलबुरगियावर जाऊन महिपतराऊ आलियावर खामखाये आपण येतो यैसे म्हणत होते. त्यास चिटगोपियाचा यैवज घेऊन प्रों गुजमटके येथे आला आहे. येथे रा। अपाजी परभु आला आहे त्यासी रा। रघूजीबावा यासी भेट जाहली आहे. रा। रघूजीबावा अपाजी परभु यास म्हनत आहे जे तुम्ही आमचे समागमे चालावे आन तुम्ही आम्ही येकत्र होऊन कामकाज करावें. यैसे अपाजी परभु व श्रीमंत बावा म्हणाले. मग रा। अपाजी प्रभूने जाबसाल केला जे आपण तुमचे समागमे कैसे यावे. अपणास खावंदाचा हूकूम नाही. यैस म्हणत आहे. त्यास रा। रघूजीबावा म्हणाले जे रा। फतेसिंगबावा तुमचे खावद आहेत, अन अपन तुमचे खावद नाहीत की काये ? मग रा। अपाजी परभु म्हणाले जे साहेबहि आपणास फतेसिंगबावाचें ठिकानी आहेत परंतु रा। फतेसिंगबावानी आपलें हवाला सिका केला आहे

1939

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

यास्तव आपणास येता येत नाही त्यास रा बावा अपाजी परभु बहुतसा अतिसेये करीत आहेत. त्यास रा अपजी परभु रघूजीबावास म्हणाला जे आमचे लोक भुकेबग आहेत तर तूर्त आपणास दोन लक्षे रुा नालबदी द्या यैसे म्हणत आहेत. याची त्याची रदबदल पडली आहे. यानंतर आपण रा रघूजीबावास पत्र पाठविले ते गुजमटिकीयाचे तलावर पावले. ते पत्र रा बावास सादर केले. मग बावानी आपणास सागितले जे आपण पंडरपुरास येतो अन श्रीमं (त) भाऊसाहेबहि तिकडून येतील त्याचा व आमचा बेलभंडार व क्रियाप्रमान होईल तेव्हा आपण जाऊ; नाहीतर काही आपण जात नाही यैस म्हणत आहे. अन याजला तर रुाचा लचका लागला आहे. याचे चितांस आले तर तिकडे येईल; नाहीतर यावयाचा काही दिसत नाही. अन आता तर तेलगनात आला आहे. वाटा चालत नाही. जर इकडे तेलगनात लावला वर बातनी कैसी चालेल हे न कले. रा रघूजीबावाचे तीन जोड्या वाटेस मारल्या गेल्या. मग इतकियावर साहेब जैसा हुकूम करतील ते खरे. बहुत काय लिहिने हे विज्ञापना.

¶*Madhavrao Moreshwar gives the Peshwa news about Raghuji's journey towards Poona.*

No. 63] [*7-4-1750*

श्री

श्रीमंत राजेश्री भाऊसाहेब स्वामी समर्थाच्या
पादांबुज्याप्रति

आज्ञाधारक कृष्णराऊं[१] गोविंद दोन्ही करकमल जोडून सिर सां नमस्कार विनती उपरी. विज्ञाप्त यैसीजे. रा रघोजी बावा भोसले यानी बोलाऊन सागितले की श्रीमंतास विनंतीपत्र सत्वर लेहून पाठवा की आपन बेगमपूरपरियेत आलो. त्यास कृपा करून अती त्वरेन राजश्री मल्हारजी होळकर व आपली प्रतिमा यैसे उभयेतास पाठवने की सेवेसी येऊन पोहंचू. त्यास रा मल्हारजी होलकरावाचून हे स्वामीपासी येता दिसत नाहीत. बावासाहेबाची निस्ठा स्वामीच्या चरणावंदी आहे. बोलोन दाखवितात की सर्वाप्रकारे आपली मान श्रीमत भाऊसाहेबाचे चरणावर ठेविली. ते ज्या मार्गा लावितील त्याप्रमान चालन. त्यास सेवकाने त्यांस सागितले की वहीरबुनगा व लोक येथून विदा करावें की हा प्रांत सरकारचा घासलकडीखाले लुटला जाईल. लस्कर बंद. त्यानी उतर दिधले जे

---

१ सुभेदार, प्रांत वराड.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

तिकडून श्रीमंताची प्रतिमा व मल्हारजी होलकर आलियाविरहित वाटे लावीत नाही. रा। बहिरोपंतानी करकमभोसियाचे गावाविशयी लिहिले होते. त्यास बावासाहेबास सांगून ताकीद श्वार गावगना देविले. बेगमपुरावर तीन मुकाम आहेत की स्वामीकडील मार्ग लक्षितात. सारावंश यांमधे काये जीव? आपल्या आवरू व जिदगानीस पहिल्या कितो[1] सत्व बाकी असावे म्हणोन मल्हारजी होलकर जरूर पाहिजेत या प्रसगी व स्वामीच्या वचनावर येतात. श्रीमंत नानासाहेबावरी कृपा स्वामीच्या हस्ते संपादावी हाच हेत आहे. तर स्वामीनी बावासाहेबाची आंगेजनी केलिया तमाम राज्यांतील कजिया दूर होतो. इतकियावर साहेब खावंद आहेत. येमाजी सिवदे त्याचे तरफेने कृष्णाजीपंत म्हणोन ग्रहस्त आला. आताजी सिवदे याची भेटी पढरपुरी होणार. उपरातिक येमाजी सिवदे भेटी घेतील. कलल पाहिजे हे विज्ञात. चैत्र शुध १२ बेगमपुरावर मुकाम हे विज्ञप्ति.

¶*Krishnarao Govind to Bhausaheb, informing him of the entire trust that Raghuji Bhonsle places in him. "Raghuji however desires," says the writer, "that Malharji Holkar should be asked to proceed at once."*

No. 64] [*14-4-1750*

श्री

श्रीमंत राजेश्री पंत प्रधान स्वामी समर्थाच्या
पादांबुज्याप्रति

आज्ञाधारक कृष्णराऊ गोविंद सा। नमस्कार विनंती उपरी. येथील वर्तमान तर राजेश्री रघोजीबावा भोसले लस्करसहवर्तमान येऊन लासुरने[2] कोरेगावा जराडियाचे नदीतीरी उतरले. त्रिबकजी भोसले यांच्या वाचा चापल्यता ल्याहावी यैसा अर्थ नाही. म्हणाले जे माहाराज राजेश्री छत्रपतीनी मजला बलाऊन सागितलें की सत्वर लौकर बावासाहेबास घेऊन येणे की कितेक कारभार आहे. त्यास बावासाहेबी जाब दिधला जे आम्हास श्रीमंत पेशव्यासी मतलब. वरकड कोन्हासी प्रयोजन नाही. लस्कर बहुत तजविजीने लाबंच लांब दीड कोस रुंद येक पांड याप्रा। उतरविले आहे. माधवराऊ पानसरे पचवीस स्वारानसी येऊन पोचले. त्रितीप्रहरीं चैत्र वदी चतुर्थी तीन प्रहर दो घटकानी विनती लिहिली असे. हे विज्ञात.

¶*Krishnarao Govind informs the Peshwa of Raghuji's arrival at Koregaon.*

---

१ पूर्वप्रघातानुरूप. २ लासुरणें-कोरेगांवाजवळ.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 65] [April 1750

श्रीशंकर

विनती सेवेसी. व्यंकटराऊ मोरेश्वर प्रार्थना येसी जे आज दोन घटी रात्र बाकीची ते समई नगारा करून राजश्री बाबासाहेब तमाम फौजेनसी सेवेसी येतील. मग जे आपली आज्ञा होईल त्याजप्रो वर्तनूक करतील. साहेबासिवाये दूसरा आर्थ नाही. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति. राजश्री त्रिंबकजी राजे साहेबापासी चौकी गेले आहेत. ते भटले आसतीलच. उदईक दोन घडीमध्ये हेहि सेवेसी येतील हे विज्ञाप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar writes that Raghuji Bhonsle will come to Satara with his escort to pay his respects to the Chhatrapati.*

No. 66] [13-5-1750

श्री

राजश्री बालाजी पंडित प्रधान गोसावी यांसी

८ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो रघोजी भोसले सेनासाहिबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण राजश्री नरसिंगराव विठल या समागमे पत्र पाठविलें. प्रविष्ट होऊन लिहिला अभिप्राये कळों आला. लग्नाच्या अहेराची सनगे पाठविली ते यादस्तीप्रमाणें पावली. रा छ १७ माहे जमादिलाखर.

शिक्का.

आम्हीहि करारप्रमाणें सत्वरीच येतो. कलले पाहिजे. सुज्ञाप्रति विशेस काये लिहिणे? लोभ असूं दिला पाहिजे हे विनंती.

मोर्तब सुद.

¶*Raghuji Bhonsle to the Peshwa : acknowledges the receipt of robes presented to him on account of the marriage ceremony (of Sadashivrao).*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 67] [*16-6-1750 ?*

श्री

राजश्री बालाजी पंडित प्रधान

गोसांवी यासी

ऽ सकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मीअलंकृत राजमान्ये श्रीा रायाजी[1] भोंसले दंडवत विनंती. उपर येथील कुशल जाणून स्वकीये लेखन करीत असिलें पाहिजे विशेष. आपण वराड प्रांताहून कूच करून मजल दरमजल पवनेर गंगातीरास येऊन आपणास पत्र पाठविलें आहे तें प्रविष्ट जाले असेल. सांप्रत आजी मंदवारी हिंगणीहून कूच करून आपले भेटीचे उदेशे पुण्यास येत असतां कुरकुंबापासीं वर्तमान यैकिले कीं आपण श्रीगोंदियास आले त्यावरून येथे मुकाम करून सेवेसी राजश्री आपाजी मल्हार यांस पाठविले आहेत; हे कितेक अर्थ निवेदन करितील. आपणहि प्रात:कालीं स्वार होऊन भेटीस येऊं, कलावें म्हणऊन लिहिलें असे. भेटीनंतर आपलें तपसीलवार वर्तमान निवेदन करूं; कललें पाहिजे. रा। छ २१ रजब. बहुत काये लिहिणे? लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

लेखन
सीमा

¶*Rayaji Bhonsle, son of Kanhoji, to the Peshwa : gives names of places where he proposes to encamp.*

No. 68] [*16-7-1750 ?*

श्री

राजश्री सदाशीवपंत गोसांवी यांसी

° श्री
श्रीशाहूराजपदांभोज
भ्रमरायितचेतसः बिंबा-
त्मजस्य मुद्रैषा राघवस्य
विराजते.

ऽ सकलगुणालंकरण अखंडित-लक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीा रघोजी भोसले सेनासाहिबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. गोसांवियांकडून सांप्रत पत्र येऊन वर्तमान कलत नाही; तरी यैसें नसावे. निरंतर पत्री संतोशवीत जावे. यानंतर येथील कितेक वर्तमान राजश्री

---

१ कान्होजीचा मुलगा.

Ca 4—8

1943

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

गंगाजी गोपाल दिवाण यांसमागमे सांगोन पाठविले आहेत. भेटीनंतर साद्यंत निवेदन करितील व राजश्री व्यकटराव मोरेस्वर यासहि त्यांचे बंधु येथें येऊन घेऊन पाठविले आहेत. आम्ही सर्व प्रकारे गोसांवियाचे भरोसियावरी विस्तरें ल्याहावे यैसा अर्थ नाहीं. वरकड वर्तमान मारनिले सांगतील त्यावरून अवगत होईल. रा छ २२ माहे रजब; बहुत काये लिहिणे ? लोभ आसू दिला पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Raghuji Bhonsle sends to Sadashivrao Gangaji Gopal with despatches.*

No. 69] [*June—July 1750*

[पहिला बंद गहाळ]

म्हणती आणि कालपासून दरबार मना आहे. कोन्ही सरकारकून तों जात नाहीत. आणि खर्चवेच कुल मना आहे. विड्याची पाणेदेखील मना आहेत. यैसे वर्तमान आहे व राजश्री गोविंदराव चिटनीस यांची माणसे आज येथून निघाली व येशवंतराव पोतनीस यांची माणसे उदईक निघतात यैसे आहे. सडे मात्र आहेत. येक येक घोड मात्र ठेवले आहे व राजश्री रघोजीबावा भोसले तों उदईक प्राथकाली गर्गाच्या मोहर्तेकरून निघतात. याची दोन काम राहिली होती. कडवलीतची देशमुखीचा हातरोख व गाव यैसी दोन कामे राहिली होती. कडेवलीतचे देशमुखीचा हात(रोखा) दिल्हा. बाकी गावचे राहिले आहे. तें मग जेसमई होईल तेसमई हो यैसे आहे व राजश्री नानाहि उदईक येथून निघनार आहेत. कलले पाहिजे. बहुत काये लिहिणे ? सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*This paper, of which the first portion is missing, gives news about the treatment accorded to the Chhatrapati at Satara.*

No. 70] [*30-10-1750 ?*

श्री

राजश्री माहादाजीपंत गोसावी यांसी

ऽ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रा रघोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशललेखन करीत गेले

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

श्री
श्रीशाहुराजपदांभोज-
भ्रमरायितचेतसः
बिंबात्मजस्य मुद्रैषा रा-
घवस्य विराजते.

पाहिजे विशेष. आपणाकडून पत्र घेऊन कुशलार्थ कळो येत नाही. तरी साकल्य वर्तमान लेखन केले पाहिजे. यानंतर आम्ही गंगातीरप्रांतें आलो असो. पुढे तत्प्रांते येत असो. यैसियासी सविस्तर लेखन करीत गेले पाहिजे. रा छ १० माहे जिल्हेज * बहुत काये लिहिणे? लोभ असू देणे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Raghuji Bhonsle informs Mahadajipant Purandare of his arrival as far as the river Godavari.*

No. 71] [*1750 ?*

श्रीशंकर

श्रीमंत तीर्थस्वरूप मातुश्री आईसाहेब
वडिलाचे सेवेसी

आपत्ये त्रिंबकजी भोसले चरणावर मस्तक ठेऊन दंडवत विज्ञापना ऐसीजे. येथील क्षेम जाणौन आपले स्वस्तिक्षेम लिहीत जाणे विशष. बहुत दिवस जाले आपणाकडील वर्तमान कळत नवते, तो हुजरे आले त्याबराबरी आज्ञापत्र पाठविले पाऊन समाधान जाले. आमचे वर्तमान तर आपल्या आसीर्वादे खुशाल असो. यानंतरे रा रघोजीबावा भोसले सेनासाहेबसुभा यांचा व मुगलाचा कटाक्ष फार जाला याजकरिता मुगलाची फौज चद्रपूरचे रोखे माहुरावर आली. एदंनिमित्ये सेनासाहेबसुभा यानी आम्हास मुगलाचे सैन्यात पाठविले. त्यास रा जानोजी निंबाळकर याचे हाते मुगलाचा स्नेह उतम प्रकारे जाला. रा जानोजी निंबाळकर यासी घेऊन आपले सैन्यात आलो. निंबाळकराच्या व सेनासाहेब सुभा याच्या भेटी जाल्या. उपरांतिक मुगलाच्याहि भेटी जाल्या. माहाराजास कळावे म्हणोन लिहिले असे. यावरी माहाराजानी कसबे जितीवरी दाहा हजाराची चिठी पाठविली तरी दाहा हजार ऐवज तेथे कधी आकारला नाही. साहेबी वडीलपणे लिहिले उतम केले. माहाराजानी ज्याप्रमाने दरसाल करार केला त्याजप्रमाणे कसबे मजकुरी निकाल येंदा करून घेतला पाहिजे. आज

1945

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तागाईत रुपये पावले नाहीत याचे कारण जे प्रजेन्य थोडका, पीकसाल नाही, खरिपाचे पीक कुली नाही, रबीचेहि बांड जाले. ऐसे केवळ कसबे मजकूरचे नाही. तमाम प्रगणेयाचा हालहवाल याच प्रकारे आहे. याचे वर्तमान माहाराजाचे हुजरे निवेदन करता श्रुत होईल. माहाराज वडीलपणे गावचा समाचार घेत नाहीत, आनि आम्ही नेणते म्हनोन विशाद करिता, तरी कृपाळूहि आपणच होतील. चिंता नाही. येंदाचा निकाल करारप्राने करून घेतला पाहिजे. बहुत काये लिहिणे? लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Trimbakji Bhonsle to Tarabai, informing her how differences between Raghuji Bhonsle and the Nizam were made up by the intercession of Janoji Nimbalker. The writer further puts forth his grievance regarding the high demand fixed for his village by Tarabai and requests her to reduce it to what is normally received.*

No. 72] [*After 1-1-1751 ?*]

२

पळून गेला. तमाम शहर जलाले आणि लुटले गेले. त्यासी त्याची खंडणी दोन लाख रुपये केले त्या पैकीं पन्नास हजार रुपये नगद द्यावे, मोहरा तिसा हजाराच्या द्याव्या व सोने पंचविसाचे द्यावे, व जवाहीर पन्नास हजाराचे द्यावे, बाकी राहिले त्याचा वाइदा केला आहे. पंधरा दिवसांत द्यावे. त्या रुपयाची बोल त्या मोगलाच्या घरचा कारभारी मिया म्हणून आहे त्यासी बोलेस दिल्हे आहे; व पहिले शतक्रित्य या मोगलाचे राजश्री सुरेराव येलम्या निर्म(ळ)कर याजवर हा मोगल चढाव करून गेला होता. तीनेक हजार स्वारानशी व हजार प्यादा कानडा होता त्यासी येलम्यानें राजश्री पिराजी नाईक निंबालकर यासी राजश्री बावाकडून मागून घेतले. त्यासी नाईकानीं व सुरेरायानीं उभयेतानीं मिळून या मोगलाचे वाताहरण केले. दाहा राउतानसी गछ करून माहोरास आले. तो येथें हा विचार जाला. त्यासी याच मुक्कामी स्वामीची पत्रे तेरावे सफरीची बावास आली. त्या पत्रांत लिहिले कीं मातुश्री आईसाहेबानीं राजश्रीस घेऊन सातारियावर जाऊन बसले आहेत. आम्ही स्वामीचे सेवेसी आंतराये करणार नाहीं. त्यासी * * मातुश्री आईसाहेब व राजश्री किलयाखाले येत हा विचार जाला पाहिजे; व नासरजंगाचा व हिदायेत मोहिदीखानाचा मजकूर लिहिला. त्यासी पत्रे वाचून बोलले कीं सांडणीस्वार रवाना करावा आणि ज्या ठिकाणी आम्हास बोलावतील त्या ठिकाणीं आपण यावयासी सिद्ध आहोत. ज्याप्रमाणे आज्ञा आम्हास करतील तेणेप्रमाणें आपण वर्तणूक करूं; आणि

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पहिलेच पेशवियाच्या पायासी आम्ही विनंती केली आहे कीं, ज्याप्रमाणें राजे शाहू होते त्याजप्रमाणें पेशवे आहेत यैसे बोलले; आणि त्यांचे वाईट तेच आमचे वाईट; आणि आमचे वाईट तेच त्यांचे वाईट. मजला ज्याप्रमाणें ठेवतील, त्याजप्रमाणे मी वर्तणूक करीन. यैसे शपतपूर्वक बोलले. त्यासी श्वामी याजला कोणते ठिकाणी बोलावितात, हे सांडणीश्वाराबराबर पत्र पाठवावे, म्हणजे याजला तेथें घेऊन येऊ. त्यासी आता याचा विचार आहे कीं, तमाम वराडप्रांती मोगलाईची ठाणी जितकी आहेत तितकी जफ्त करावी. हल्ली सालचा पैका घ्यावा, सोलापुरावर जाऊन मुक्काम करावा, आणि तेथून कुल बंदोबस्त करावा. मग वासियावरून नडसी बाम्हणीवरून नांदेडास जावे; माधवराव पिंगले याच्या मुलकाची खंडणी केली आहे. समेत बैधन रुपये ८०००० ऐंशी हजार केले आहेत ते द्यावे, उभये गोदातीरें वरते व्हावे; जेथें आपण असतील तेथें यावे, हा मनसबा आहे. व दुसराहि एक मनसबा आहे कीं पेशवियाणी मातुश्री उमाबाई दाभाडी यासी सख्य केले आणि आपलेसे करून ठेविले. त्यासी त्याची फौज व सरकारची फौज व आम्ही व आणिक कितेक मातबर सरदार आहेत त्याजकडून फौज ठेवावी. आणि तमाम फौज घेऊन हिदायेत मोहिदीखानाचा नाका धरावा; आणि तमाम ठाणीठुणी उठवावी, आणि नासरजंग याचा पुत्र शहरी आहे त्याचा उपेर[1] करून दाखवावा, दुसरियासी दाखलगिरी या प्रांती न होय ते करावे, यैसा मनोदये आहे. आणि आम्हास सांगितले आहे कीं हे वर्तमान तुम्ही लिहिणे. आम्ही पेशवियाखेरीज कांहीं नाहीं. सांडणीस्वाराची वाट पाहतात. हे आला म्हणजे तावडतोड याजला घेऊन येतो; व महाराज इतकीयाजकडे पत्रे पाठविता, परंतु गुलामास एकहि आज्ञापत्र न पाठविले. त्यास राजश्री बावा म्हणतात कीं तुम्हास कां हो पत्र येत नाहीं ? त्यासी काये जाब द्यावा ? साहेबी गुलामास येथें ठेवले म्हणून हे विनंती केली आहे कीं मी गरीब आणि थोरे वलीसे[2] साहेबी नेऊन बसविले, तर साहेबासच माझी शरम येईल कीं पदरचे लेकरूं आणि निमकहराम चाकरी करणार नाहीं. यामुळे प्राणहि गेला तर साहेबावरून कुरबोन[3] आहे. बायधरे की (?) लाज आहे. मायेबाप धणी सर्वेहि साहेब आहेत. एकनिष्टेस अंतर असेल तर साहेबाचेरणाची शपत असे. सेवेसी श्रुत होय. बहुत काय लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*News-letter from the Nizam's camp to the Peshwa, informing him of the activities of Raghuji Bhonsle in Berar and his cordial agreement with the policy of the Peshwa who was to him altogether in the place of the late King Shahu.*

---

१ (?) २ ओळीस. ३ अर्पिलेला.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 73] [*12-1-1751*

श्री

श्रीमंत राजेश्री पंत
प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक नरहर लक्ष्मुमणराव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना सेवेसी यैसीजे. येथील सेवकाचें वर्तमान तरी ताा छ २४ सफर पावेतो स्वामीचें कृपावलोकनेकडून येथास्थित असे. प्राा सेवकाचे वर्तमान तरी प्रजन्याकरिता नापेर जाली. दुसरें राजश्री रघोजी भोसले गंगथडी प्रांतातून गेले, याजमुळें मुलुकाची खराबी जाली. प्राां आंबाड येथे नव दा हजार रुपये घासदाणां घेतला. येणेप्राा जागाजागा माहाल पाहून घासदाणे घेतच आले. सेवगावांसी खटखट केली. तेथील माणसे मारली, प्राा मजकुरी रोखे करून धूमधाम केली, ते लिा पुरवत नाहीं, यैसे वर्तमान आहे. याउपरी नगरीं मोगलाची फौज आहे. त्यांच्या रोज उठोन कही प्राा मजकुरी होत आहे, यैसे वर्तमान आहे ते सेवेसी लिा जाते. सर्वा गोष्टीने स्वामी समर्थ पारपत्य करणार. शंक्रमणीचे तील सरकारासेवेसी पाठविले आहेत, ते स्वामींनी स्वीकारले पाहिजेत. सेवेसी स्रुत हाय हे विज्ञाप्ति.

¶*Narhar Laxmanrao reports to the Peshwa the troubles created by Raghuji Bhonsle in the province round about the river Godavari and Shevgaon.*

No. 74] [*9-2-1746*

श्री

श्रीमंत राजश्री नाना
साहेबांचे सेवेसीं

सेवक आज्ञाधारक मुरारजी फालके साष्टांग दंडवत विनंती. येथील कुशल तागायत छ २८ माहे मोहरम पावेतों क्षेमरूप असे विशेष. विज्ञापना यैसीजे. तीर्थस्वरूप राजश्री महिमाजी बावा व संकराजी बावा यैसे उभयेतां राजेश्री रघोजी बावा भोसले या समागमे होते. त्यास पटण प्रांतें तांब्राचें त्यांचें युध्य मातबर जालें. युध्यांत महिमाजी बावास गोळी लागली. मार्गेश्वर शुध द्वितीयेस देवआज्ञा जाली व साहावे रोजीं अष्टमी शुध पक्षीं संकराजी बावास गोळी लागली त्यांस देवाज्ञा जाली यैसें पत्र आलें. यैसें यैकोन परम खेद जाला तो कांहीं लिहितां पुरवत नाहीं. इश्वरें वाईट केलें. आधार आसरा वडिलांचा होता.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आमची करुणा देवास आली नाहीं. आपण सर्वश्वें साहेबाचे पदरीं आहों. सर्व पदार्थें वडील धणी समर्थ आहांत. आम्ही ल्याहावें येसें नाहीं. पूर्वीपासून प्रतिपाल केला आहे. बहुत काय लिहिणे? सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Murarji Phalke reports to Nanasaheb the fight of Raghuji Bhonsle in the district of Patna and the deaths of Mahimaji Baba and Shankaraji Baba.*

No. 75] [*17-2-1757*

श्री

श्रीमंत स्वामी साहेंबाचे
सेवेसीं

आज्ञाधारक नरसो तमाजी मोकदम लस्कर नवाब निजाम आलीखां दर जागा आलंजपूर चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल माघ वद्य १४ परियंत माहाराजाचे कृपाआनुग्रहाकडून सुखरूप असो विशेष. इकडील बातमी छ १ माहे रबिलावलपावेतों सेवेसीं लिहून पाठविले होते; पोचले आसतील. आलिकडील बातमी रघोजी करंडा तिकडे गेला होता तो फिरून कूच दरकूच सोलापुरावरी आला. यास सांगून पाठविला कीं आमच मामलत चौत व घासदाणा चुकवणें व नवाबानीं आपलाकडून वाजद आलीखां व महमद आबदुला हरकारेच दरेगाव शरमस्तखांन पठाण या समागमें फौज येक हजार देऊन छ ८ जमादिलावल पाठविले होतें. मग सोलापुराहून रघोजी करडे कूच करून आलीकडे येसोरणेवरी आला. समागमें फौज दोन हजार. मग छ १३ वाजद आलीखां व रघोजी करडे याचा त्याचा भेट जाहाली मामलत सन ११५५ मध्यें चौत व घासदाणा घेतला त्याप्रमाणें वाजबी घ्यावा येसे करार मदार जाहाली. मग नवाब निजाम आलीचे भेटी रघोजी करडे आपला लेक बयोजी करडे व मालजी भोसलेच लेक हैबतराव व राणोजी करडे व रघोजी करडेचा पुतणे समागमें फौज सातशहे पाठविला होता. छ १६ जमादिलावल नवाब निजामआलीची मुलाजमत जाहाली. बापोजी करडे नवाबास पांच आश्रीफी नजर व हैबतराव व राणोजी करडे व नारोपंत छिटनीस दोनदोन रुपये नजर गुजराणली. मग नवाबानी खिलवत करून आपण व बापोजी करडे व वाजद आलीखां व शरमस्तखां व बापाजीपंत यैसे दोन घटका बैसून गोष्टीमात करून मग नवाबानी बापोजी करडेस तीन पार्चे कापड व घोडा १ व हैबतराव भोसले व राणोजी करडे व नारोपंत छिटनीस यास तीन तीन पार्चे कापड दिल्ही. मग शरमस्तखांन पठाण बापोजी करडे यास आपला घराने उजतीन

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पार्चे कापड व घो दिल्ही छ १७ बापोजी करडे वगैरे कूच * लस्करास गेले परंतु आजी काल रघोजी * * जोरा फार. आतां रघोजी करडे कूच करून सोलापुरावरी गेला. येथून कोस बारा. व लक्ष्मणराव खाडाआगलेचा दिवाण मैरालपंत येथे छ १८ जमादिलावल आले आहेत. नवाबास आश्रिफी नजर गुदराणिली. मग नवाब व वाजद आलीखां व मैरालपंत बसोन गोष्टीमात केली. लक्ष्मणराव खाडाआगलेचे लेक यास तीन लाखाचा जागीर देऊं केली. त्यानी सातशहे स्वारानसी येथ चाकरी करावी मग येकादें काम भारी. खुद लक्ष्मणराव आपण येऊन सामल होवा यैसा बेत करून छ २३ मैरालपंतास बिदा केली. छ १८ संभाजी घाटगे येथें येऊन नवाबास भेटला. समागमें मोगल-स्वार पनास आहेत. घाटगेस दीडा लाखाची जागीर द्यावा. त्यानी पाचाशहे स्वारानसी चाकरी करावी; यैसे जवाबस्वाल लागली आहेत; व हिंदुस्थानाकडील खबर रुमचा पटाण फौज जमा करून दिलीस येतो. दिलीचा पादशाहा कूच करून आगऱ्यांत आला व गाजदीखानाचे लेक दिलीमध्यें आहेत. जाटहि पठाणाकडे जाऊन मिळाले. दोन लाख फौज समागमे, यैसी आवाई येथ ऐकितों; परंतु मुदाम कासीद व जासूद कोणहि आला नाहीं. यापरी वर्तमान. येथ कोण्ही गोष्टीचा बंदोबस्त येक गोष्टी मोकरा नाहीं. तमाम लोक चाकरमाने व रयेत लोक आजुर्दे आहेत हे विज्ञापना.

¶*Narso Tamaji writes to the Peshwa about the payment of the Chauth and the Ghasdana dues which Raghuji Karande urged on the Nizam and also about an interview and the exchange of presents between Nizamali and the Karandes. The news about an impending attack on Delhi by Ahmedshah and the consequent flight of the Emperor to Agra is also communicated.*

No. 76] [*1753 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती. आज्ञाधारक गोपाळराव केशव कृतानेक सां नमस्कार विनंती. विज्ञापना ऐसीजे: या प्रांतीच्या मोगलाईच्या अमलाचे जप्तीच्या सनंदा राजश्री बाळाजी भिकाजी याजबराबर पाठविल्या, आणि आज्ञापत्र सादर केले जे मोगला-ईचा अमल जप्त करून वसुल सरकारांत घेणे. त्यांस आम्हां सेवक लोकास आज्ञा प्रमाण, परंतु हा प्रांत खष्ट; दुसरे वैराण. राजश्री रघोजी भोसले यांचे

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

फौजेमुळें हा प्रांत बहुतच खराबीत आला आहे. साप्रत्य राजश्री रघोजी भोसले माहुरावरी आहेत. माहूर शहर लुटले. या प्रांतास तमाम माहालोमाहालास तलब रोखे घांसदाणियांचे चुकवतीबदल आलें आहेत. त्याचे फौजेमुळें प्रांत उद्वस होत चालिला. परस्तुत त्यांचे फौजेचा दंगा या प्रांती आहे. दुसरे सरदेशमुखीच्या तालुकियासिवाये पाा नांदेड व वसमत, सारवाड, पालिम हे मातव ; नांदेड सुभा राहातो. तैसेच वसमत खानेअलम यांजकडे; त्याची पांच सातसे फौज माहाली आहे. विना मातबर फौज या प्रांतास आलियां-वाचोन तहाची गोष्ट होत नाही. राजश्री महिपतराऊ कवडे तो खानदेशप्रांती आहेत. या * सेवेसी विनंती लिहिली जाती जे. * * * जे सरकारची येक दोन * * पाठवावी; अथवा आम्हास आज्ञा नवी सिबंदी ठेवावयाची आलियां सिबंदी ठेविली जाईल. स्वामीचे प्रतापे सर्व होऊन येईल. येविशी काये ते आज्ञा केली पाहिजे. आज्ञेप्रमाणें वर्तणूक केली जाईल. माहालोमाहालास जती सनदा देऊन ब्राम्हण पाठविले आणि जेथवरी काजकाम होईल ते करीतच असोंत. कितेक वर्तमान राजश्री बालाजी भिकाजी याणी लिहिले असे त्याजवरून सेवेसी श्रुत होणार हे विज्ञापना.

¶Gopalrao Keshao narrates to the Peshwa the difficulties that he had in collecting the Government dues on account of the province being overrun by Raghuji Bhonsle. He also impresses on him the necessity of maintaining a good army, without which, he says, there would be no settlement.

No. 77] *[21-1-1754?*

श्रीलक्ष्मीकांत

राजश्री सदाशिवपंत
गोसांवी यासी

८ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो रघोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित अशिले पाहिजे विशेष. गोसांवियांकडून सांप्रत पत्र येऊन कुशल वृत कलत नाहीं. तरी ऐसे नसावें; निरंतर पत्री संतोशवीत जाणे. यानंतर राजश्री रघुनाथपंत याणी हस्तनापुरीहून बंगालियांत वकील पाठविले, त्यासमागमे नवाब आलावर्दीखान यांस पत्र पाठविलें आहे, बंगाल्याचे चौथाईचा यैवज सिसाला आम्हाकडे पाठवणे म्हणोन. त्यावरून आम्हाकडील मामलतीत खलेल जालें आहे. बजिनस पत्राची नकल आली ते पाठविली आहे, त्यावरून अवगत होईल.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ऐशियास बंगालियाचा तह आपणच करून दिल्हा आहे; ऐसे असतां वकील जाऊन अमलांत खलेल केली आहे, यावरून अपूर्व दिसोन आलें. आम्हास सर्व-प्रकारें आपला भरोंसा आहेच. आम्ही वारंवार ल्याहावें ऐसे नाहीं. सविस्तर राजश्री त्रिंबकजी भोंसले राजे यांस लिहिलें आहे. निवेदन करितील तो अर्थ चितांत आणून राजश्री रघुनाथपंत व राजश्री मल्हारजी होलकर यास पत्रें लेहून आम्हाकडे पाठवावी व परभारेंहि पत्रें पाठविलीं पाहिजेत, व नवाब आलावर्दीखान यांसहि येक पत्र पाठवावे जे तहनामा जाला आहे त्याप्रमाणें अमल देणे. याप्रा पत्रें आविलंबे पाठवावी. आमचे सरदारीचे आभिमानी आपण आहेत निभावणी आपणावरी आहे. याजकरितां आम्ही स्वस्त आहों. श्रीकृपेने शरीरीं दिन-प्रतीने आरोग्यता आहे. फौजेचीहि समजाविसी जाली. फौज सर्व जमा आहे. सत्वरीच डेरेदाखल होत आसो. पुढें काय विचार करावा ते लेहून पाठवावे. त्याप्रमाणेच वर्तणूक होईल. रा छ २६ माहे रोवल. सुज्ञाप्रति विशेष काये लिहिणे; कृपा लोभ आसो दिला पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Raghuji Bhonsle complains to Sadashivrao Bhau against Raghunathrao who had sent his man to Aliwardikhan for collecting Chauthai dues from Bengal. Raghuji says that this was against an agreement with the Peshwa and requests that it should be stopped at once.*

No. 78] [*Prior to 1755*

श्री

राजश्री सिदोजी राऊत गोसावी यासी

ॐ अखंडितलक्ष्मीअलकृत राजमान्य श्नो देवजी जाधव रामराम विनती उपर. येथील क्षेम जाणोन आपले क्षेम लिहित असले पाहिजे. यानंतर साहेबाचा निरोप घेऊन स्वार जाहलें तो राजश्री रघोजीबावा भोसले यास चादीयाचे मुकामी गांठले. त्यांस कागद पत्रहि दिल्हें. त्यास ते म्हणाले की घोडी वस्तभाव दऊन वाट लावितों म्हणोन आजपावेतों राहविले परतु लवकर वाटे लावितां दिसत नाही

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

व खर्चासहि देत नाही. साहेबी आणीक पत्रें पाठविली म्हणजे आम्हास वाटे लावि-तील यांत साहेब सर्वजाण आहेत. कागदीं लिहिता पुरवत नाही. बहुत काये लिहिणें ? कृपा निरंतर असो दीजे हे विनंती.

¶*Deoji Jadhav to Sidoji Rawoot, saying that he is detained by Raghuji Bhonsle in his camp at Chanda.*

No. 79] [26-2-1755

श्री

विनंती उपरी. प्रस्तुत पत्र येऊन वर्तमान कळत नाही तरी ल्याहावे. श्रीमंत[१] मजल दरमजल काल छ १४ जालोवली माडोगणास आले. आज कूच करून भातोडी नजीक चालिले. दरमजल टोक्यास जाऊन श्रीस जाणार. वरकड नवलविशेष ल्याहावेसे नाही. रघोजी[२] भोसले वारले. श्रीमंत दादासाहेबाकडील वर्तमान तरी गडमुक्तेस्वराकडे रोहिले * * त्याजपासून सालक्ष खंडणी घेतली. तेथील निघोन देसी यावयाचा विचार आहे. कळावे व तीर्थरूप राजश्री बाबा[३] वडगावास गेले. रावसाहेब पुण्यास गेले. आम्ही मात्र राहिलों. सांप्रत नवीन विशेष ल्याहावेसे नाही. सरदाराकडील व दादाकडील वर्तमान सविस्तर श्रीमती लिहिले असे त्याजवरून कळेल. बहुत काय लिहिणे हे विनंती.

पोष्य कोनेर त्रिंबक[४] आशिर्वाद. निरंतर पत्री सांभाळ करावा हे आशिर्वाद.

राजश्री नारायेणजी स्वामीस दंडवत.

¶*The letter gives news of the whereabouts of the Peshwa and some other persons. It also refers to the death of Raghuji Bhonsle, which took place on 14-2-1755.*

No. 80] [27-2-1755

छ १२ जमादिलाखर

श्री

पुरवणी राजश्री माहादोबा स्वामी

गोसावी यांसी

विनंती उपरी. राजश्री रघोजी भोसले यास फालगूण सुध त्रितीया सुक्रवारी देवआज्ञा जाहलियाचे वर्तमान आले. मातबर सरदार होते. वाईट गोष्ट जाहाली.

---

१ पशवे. २ रघूजी भोसले, मृ. १४-२-१७५५. ३ महादोबा पुरंदरे. पत्र त्याचा मुलगा आबा पुरंदऱ्याचें असावें. ४ एकबोटे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तुम्हास वर्तमान कळावे याजकरितां लिहिले असे. होणार ईश्वरइच्छा प्रमाण. मोठे लेक दोन व धाकटे दोन आहेत. अलीकडे आमचे कामाचे फार होते. छ १९ जमादिलावल हे विनंती.

¶*Nanasaheb informs Mahadoba Purandare of the death of Raghuji Bhonsle.*

No. 81] [March 1755

श्रीमंत बाबासाहेब

नागपुरीहून जोड जासुदाची येवनाकडे आली. त्यामध्ये लिहिले की रघोजी भोसले शांत जाले. सा श्रिया सती निघाल्या. हे वर्तमान ऐकून जासुदास सिरपाव दिधला. करनूलकर मुनवरखान पठाण एका दो रोजा येऊन मुलाजमत करनार. जेथवर संस्थानचे पठान आहेत त्यासी करार केला असे की मुलाजमत जालियावरी सवेंच दो चौ रोजा आज्ञा द्यावी. नवाब सलाबतजंग सिरियास जातात. तेथून श्रीरंगपटन ही सनिध आहे. तेथे दबाव घालून पेशकश घ्यावी. मोहिमेचे दिवस थोडे राहिले पुढें काय करतील व कोठवर जातील हे वर्तमान जैसे घडून येईल ते श्रुत केले जाईल. स्वामी कोने ठिकानी आहेत हे वर्तमान कळत नाही. रात्रदिवस नेत्र महाराजाकडे लागले आहेत. इकडून सर्व प्रकारे खातरजमा असो द्यावी व त्या प्रांतीचे कार्यभाग अविलंबे चुकऊन घ्यावे व स्वामीकडे जोडी वाटे लाविली असे. यासी पत्रदर्शनी आम्हाकडे वाटे * * * रा परसराम महादेव * * * * * * खान अलम वसम * * * * * नाली हजार स्वारानसी येथे आहे. त्या * * * * परगना द्यावा वरकड जागीर पा परबानी व मानूर व कलम जुडी वगैरे जप्त करून मीर मोगल नवाबाचे धाकटे भाऊ त्यास दिधली. खान अलमाची जिनस जवाहीर वगैरे पाहताती. बहुतेक सरकारामधे काही घेऊन वरकड त्यांसी देतील. येथे सैजा काठी मुळू व येत्रे समुद्रवासी व सरकार मिळून दीडसे (?) कळले पाहिजे. विशेश काय लिा हे विनंती[+].

¶*Fragmentary letter, first portion being lost : gives news of Raghuji Bhonsle's death and the consequent developments.*

\+ पत्राचा हा दुसरा बंद आहे. पहिला गहाळ. परशुराम महादेव हा निजामाजवळ पेशव्यांचा वकील.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 82] [22-3-1756 ?

श्रीलक्ष्मीप्रसन्न

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक जयराम गोपाळ कृतानिक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. येथील कुशल ता। माघ वद्य सप्तमी मु। नजीक दारव्हे प्रां वराड स्वामीच्या कृपावलोकनेकरून आनंदरूप असों विशेष. इकडील वर्तमान तरी * * ची आज्ञा घेऊन राजश्री यजमान वराड प्रांतास अले असेत. नवाब सलाबतजंग गंगातीरास आलियावर मऱ्हाटे लोक जमा करून माहूर प्रांतास आले असेत. इकडें यावयाचा दबाव घातला आहे. राजश्री येजमान सैन्यासहवर्तमान सिधच आहेत. परंतु राजश्री सैदलस्करखान व राजश्री जानोजीराव निंबाळकर मध्यस्त आहेत. त्याणी राजश्री आपाजीपंत दिमत सैदसरीफखान हे सारस्य करावयास पाठविले आहेत. बहुतेक सारस्य होईल. सर्व प्रताप स्वामीचा आहे. येणेकडून राजश्री यजमानाचे उर्जित असे. यावर वर्तमान होईल ते मागाहून सेवेसी लेहून पाठऊन. सदैव सेवकास आज्ञापत्रीं सांभाळ करणार स्वामी समर्थ आहेत. विशेष काये लिहिणे? कृपादृष्टि केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Jayram Gopal to Bhausaheb from Darva in Berar, giving news of a dispute between Bhonsles and the Nizam and their respective movements.*

No. 83] [1756 ?

श्री

शेवेसी विज्ञापना. येथील वर्तमान ता। छ ६ रमजानपावेतो स्वामीचे कृपावलोकनेकडून येथास्थित असे विशेष. स्वामीचे आज्ञापत्रे छ ९ शाबानची सादर जाहाली ती छ ३ रमजानी पावली. त्यावरून सविस्तर वर्तमान कळलें. इकडील गुंता सर्व उरकला. फौज मात्र इकडे ठेवावी ते ठेऊन मजल दरमजल देश * होईल म्हणोन लिहिले त्यावरून कळले. वरकड इकडील सविस्तर अलाहिदा पुरवणी पत्रावरून विदित होईल. राजश्री जानोजी भोसले सेनासाहेबसुभा यास व बाबूराव कोनेर व त्र्यंबकजी भोसले व व्यंकटराव मोरेश्वर व रा। शंकराजी केशव यास पत्रे पाठविली आहेत. त्याजकडे रा। करणे म्हणोन आज्ञा. त्यावरून आज्ञेप्रो ज्याची त्याजकडे पत्रे रवाना केली. सेवेसी विदित जाहालें पाहिजे. वाघेरा किला रा। त्रिंबक सूर्याजी याणी घेतला आहे. त्याचा बंदोबस्त करावया-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

विसीं जहाईरच्या राज्याच्या बंदोबस्ताविसी स्वामीनी आज्ञापत्री लिहिले तरी आज्ञेप्रमाणे वर्तणूक करूं. तुकोजी सिंदे व रावो बापोजीस पत्रे पाठविली ती त्या पावती केली. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer informs the Peshwa that letters addressed to Janoji Bhonsle, Baburao Konher and Trimbakji Bhonsle have been handed over to them, and further writes of the capture of Vaghera fort by Trimbak Suryaji.*

No. 84] *[1756?*

श्रीलक्ष्मीकांत

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक गंगाजी गोपाल कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा मार्गश्वर शुध ७ सतमी मुाा चंद्रपूर जाणोन स्वामीच्या कृपाकटाक्षेकरून आनंदरूप असो. यानंतर श्वामीची आज्ञा घेऊन श्वार जालो ते येजमान समागमे वराड प्रांतास आलो. अलजपुरचा सुभा राजश्री येजमानाच्या दरशनास आला. मुलकाचा तहरह परेसपरे होऊन मुलुकाचा बंदोबस्त करून फौजेची समजावीस केली. तदनंतर चंद्रपूर प्रांतांस फौजसह आले. संस्थांनिकाने उर्मी धरून भेटीस न आला. ठाणींठुनी बलकाऊन राहिला. तेव्हा पारपत्य करावेसें जाले. यास्तव चंद्रपुरास मोरचेबंदी केली. येथील पारपत्य सत्वरच होऊन येईल. तदनंतर गंगातीर प्रांतास जाणार. त्यासी श्वामीच्या आज्ञापत्रानरूप वर्तणुक करतील. कितेक वर्तमान राजश्री येजमानानी पत्री लेखन केले त्याजवरून ध्यानास येईल. शेवकांस सदैव आज्ञापत्रीं सांभाल केलियां सेवकाचे उर्जित असे. स्थापित सेवकाचा अभिमान महाराजास असे. विशेष वर्तमान होऊन येईल ते सेवेसी लेखन होऊन येईल. विशेष काये लिहिणे? कृपा निरंतर असो दीजे हे विज्ञाप्ति.

¶*Gangaji Gopal to Bhausaheb, informing him of an attack on Chandrapur led by Bhonsle.*

No. 85] *[1756?*

श्रीलक्ष्मीकांत

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक गंगाजी गोपाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा मार्गश्वर बहुल दशमी मुाा चंद्रपुर जाणौन श्वामीच्या कृपाकटाक्षेकरून

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आनंदरूप आसो. यानंतर पूर्वी सेवेसी विनंतीपत्र पाठविले. ते पावली असतील. इकडील वर्तमान चंद्रपुरांस मोरचे सनिध गेले. सुरंगहि सिध जाले. संस्थानिकहि क्षीन जाला आहे. येथील कार्यभाग सत्वरच होऊन गंगातीरप्रांतीं जावे ऐसा मनोदये येजमानाचा आहे. सदैव आज्ञापत्री सांभाल करणार श्वामी समर्थ असेत. विशष काये लिहिणे. कृपा वृधीते पाविली पाहिजे हे विज्ञाति.

¶Gangaji Gopal to Bhausaheb referring to an immediate attack on Chandrapur.

No. 86] *[4-2-1757 ?*

छ २३ जालोवल

श्री

राजश्री बालाजी पंडित
प्रधान गोसावी यांस

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नेहांकित जानोजी भोंसले सेनासाहेब सुभा दंडवत विनंती उपरि. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असिलें पाहिजे विशेष. गोसावियानी दोन तीन पत्रीं मजकूर लेहून पाठविला कीं निजामअलीचें पारपत्य सामान्य होता तेसमई करावयाचें होतें. त्यास दिवसगत लागली याजमुले भारी जाला आहे. आटोपत नाहींसें दिसोन येतें. त्यास मोंगलांचे लडाईमुलें मुलकाची खराबी होत चालली. याजकरितां सांप्रत पानावरी पान ठेऊन आपला दाब त्याजवरी ठेऊन तह करावा; आणि मोंगलास निर्मलेकडे आपले मुलकांतून काढून घ्यावा म्हणोन आज्ञा. त्यास मुलुकाची तो खराबी बिलकुल जाली. निजामअली बऱ्हानपुराकडून फिरोन आकोल्यास येऊन तेथून दरमजल नागपूरचा सुमार धरून सोलापुरापावेतों आजतागाईत आले. आमची फौज तमाम दहीहांड्याचे तलावरी येकत्र होऊन मोंगलासभोवतीं आहे. दहीहांडियाचे मुकामी मोंगल आकोल्याहून येऊन उतरला ते दिवसीं बुनगें पाठीमागें टाकून सडे फौजेनें मोगलाचे सनिध तोफाचे गोले आपले गोटांत येत ऐसी आम्हांकडील फौज रेटून राहिली. घोडी अंसोदी[1] करावयाबद्दल जीन लोकानी उतरले होते. दोनप्रहर रात्र पावेतों कोण्ही जीनबंदी केली, कोण्ही न केली, इतकियांत हुजरातीच्या उजवे बाजूस राजश्री पिराजी नाईक निंबालकर व पदमोजी जाचक हीं दोन पतकें उतरली होतीं त्याजवरी

---

१ अबुदी-ताजीतवानी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मोंगलाकडून बाण येकदाच सेपनास सुटले, व तोफाचे गोळे दाहा पाच टाकिले. बाणाचे सुसाटियानी घोडीं मात्र दोन च्यारसें उधळून आपल्याच गोटाकडे आलीं. दो ती रोजांत घोडीहि जमा जालीं. येक दुसरे गोटावरी छापा घालावा या उद्देशें गाडदी दोन तीन हजार व बाण व तोफा तयार होऊन अलीकडे आले होते; परंतु आम्हांकडील सावधता पाहून दुरूनच बाण तोफा सोडून घोड्याचे दणगे मात्र करविले. त्याजवरी इकडूनहि बाण सुटले, तेव्हां ते माघारे निघोन आपले गोटांत गेले. आम्हाकडील लोकांचीं बाणानी येक दोन गोटचीं घोडी उधललीं तेव्हांच त्यास गाठावें; परंतु आंधारी रात्र, जागाहि बिकटच होती याजमुळें त्याणी बाण तोफा * * * जलदीनें आपला कोट जवल केला. (त्यामुळें) दुसरे रोजीं मोंगलानी दहीहांडियाहून कूच केल्यावरी आम्हांकडील फौजा उभ्याच होत्या. त्याजवरी चडोलीवरी मोंगलाचे दाट कोलियावरी झुंज मातबर जालें. कांहीं गाडदी तिकडील मारले. गाडद्याची व तोफखान्याची आग भारी; आम्हांकडील से पनास घोडीं ठार जालीं व लोक जखमी जाले व ठार जाले. आजा तागाईत च्यारसें घोडे नित्य झुंजानी ठार जालें आहे. मुलुकाचीहि खराबी. गंगथडीप्रमाणेंच वराडचा प्रकार जाला. वराडात पैसा घ्यावयाची जागा राहिली नाहीं. गोंडवणची आशा धरून पानावरी पान ठेऊन तह करावा, तरी गोंडवणाहि उज्याड होईल. घरें मात्र त्यांचे नजरेस पडतील. आज तागाईत आम्हांकडील लोकांची कस्त घा * * * * * हून दाटच करावयाची आहे. पानावरी पान ठेवावयाचा प्रकार अद्यापवरी नाहीं. आम्हांकडील वीस हजार फौज व बुनगे मिळोन पनास हजार व मोंगलाकडील गाडदी दाहा हजार व फौज आठ हजार व बुनगें कतवार त्याचें मिलोन चालीस पनास हजार ऐसे दोहीकडील लक्षाची संख्या जमा जाली आहे. याजमुळें मुलुकांची दिवेलावण मोडून खराबी जाली. याउपरि गोसावियानी लेहून पाठविलें आहे त्याप्रमाणें पानावरी पान ठेऊन तह करावयाचा प्रकार घडला, तरी त्याजवरी दाब ठेऊन गोसावियाचे लिहिल्याप्रमाणेंच प्रकार घडवितो. सविस्तर आपणांस श्रुत व्हावें यास्तव लिहिलें असे. नवाब सलाबतजंग याजकडील मजकूर कलत नाहीं; तरी त्याचा प्रकार कैसा आहे हा सविस्तर अर्थ त्याजकडील व आपले मर्जीचा प्रकार साद्यांत लेहून पाठविला पाहिजे. येथील प्रकार ज्या समईं गोसावियांची आज्ञा येती त्याप्रमाणेंच वर्तणूक होत आहे. आम्हांकडील सरदारांचे विचारें परिछिन्न घावडाव पाहून मोंगलास बुडवावें ऐसें आहे. मोंगल चौहूकडून फौजा सभवत्या उतरऊन घेर[1]घर केला आहे; परंतु आगीच्या बलेकडून रोजीना कोस

---

१ वेढा.

1958

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दोन कोस कूच करून गोंडवणचा मुलुक जवल करीत चालला आहे. वर्धातीरा-पावेतों जो प्रकार घडेल तो मागाहून सविस्तर लेहून पाठऊं. चिरंजीव राजश्री मुधोजी भोसले व बिंबाजी भोसले यांचे वर्तणुकीचा मजकूर पेशजीं लेहून पाठविलाच आहे. सांप्रत त्याणी च्यार हजार फौज जमा करून आम्हांकडील मुल्लुक कवाल वगैरे तिकडे जाऊन मुलुकाची खराबी केली आहे; आणि गंगथडीसहि चिठ्या केल्या आहेत. बिंबाजी भोसले याणी छतिसगड वोढशाकडील खजिना येत होता ते वाटेमध्येंच दाबून ठेविला आहे; आपणांस कलावें यास्तव लिहिलें असे. रवाना छ १४ जमादिलावल +मोंगलास बीद करावा यैसें कारन नाहीं. थोरले नवाब तिकडून येतील तर निजामआली आतां त्याजवर जरूर जातील. रिकाम्या रानी पोट मात्र भरतील, तर न कले; किंवा जे(स)ट बंधूचे सूत्र आशेल तर जातील. तर हा प्रकार * * * * स पुरता ठावा आशेल * * * * * * * * पूरचे आशेवर तह करावा तर तेथें घर मात्र आहेत. आत:पर उत्तम सला आशेल ते ल्याहावी. नवाबाकडे सूचना करनें आशेल ते करावी. नवाब तैयार नाहीं. सरदार अद्याप घरींच आहेत. कलेल तैसें करावें. सूज्ञाप्रती विशेष काये लिहूं? कृपा लोभ आसों दिला पाहिजे हे विनंती.

¶*Janoji Bhonsle reports to the Peshwa his fight with the Nizam.*

No. 87] [*11-2-1757*

छ ९ जमादिलाखर गुरुवार

श्रीलक्ष्मीकांत

राजश्री सदाशिवपंत गोसावी यांसी

° श्री

श्रीशाहूराजपदांभोजभ्रम-
रायितचेतसः बिम्बात्म-
जस्य मुद्रैषा राघवस्य
विराजते.

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मी-अलंकृत राजमान्य श्नो जानोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. गोसांवियानी पत्र पाठविलें ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ आवगत जाहला. यैशियांस इकडील विचार गोसावियांचे लक्षानरूपच आहे. वरकड सवि-

---

+ येथून जानोजीचें अक्षर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

स्तर अर्थ वरचेवरी पत्री लिहिला आहे त्याजवरून श्रुत जाहला असेल. वारंवार त्याहावें यैसे नाही. फौजहि तयार आहे जिकडे बोलाविले तिकडे येत असो. वढगस्त सरदारी यांजमुळे गवगवा येऊन पडतो. या उपरी विलंब न लावितां मजल दरमजल फौजसह येत असो. गोसांवियांचे आज्ञेखेरीज आम्हाकडील तिलतुल्य विचार नाही. रा छ २१ माहे जमादिलौवल * सुज्ञाप्रती विशेष काये लिहिणे? कृपा लोभ असू दिला पाहिजे ह विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Janoji Bhonsle writes to Sadashivrao that he is proceeding to Poona in accordance with his instructions.*

No. 88] *[4-3-1757?]*

२

होतें. तेथें राहाणार अथवा पुढें येणार. त्याचे विषयीं सावधता असावी, तरी स्वामीचा प्रताप यैसा नाहीं कीं त्या गोष्टीची याणी चिंता वाहावी. यापूर्वीहि कितेक उलहाणें जाहालीं तीं पुण्यप्रतापेंकरून लयास गेलीं. तेथें याचें आगाध आहे यैसें नाहीं. तथापि आज्ञेप्रमाणें सावध आहेत. पत्र येईल त्याप्रमाणें चालावें, त्यास आजीपावतों करारांत यांजकडून आंतराय जाहाला यैसें दिसत नाहीं. त्याप्रमाणेंच पुढें चालतील. श्रीमंत सेनासाहेबसुभा फाल्गुन शुद्ध चतुर्दशीस जेजुरीस पावलें. तेथून कूच दरकूच देशास जाणार. पांचासातां रोजीं आम्हीहि जातों. सारांश स्वामीच्या कृपेची इच्छा येजमानास आहे तेथें संशय कोणेविशी चितीं आणावा यैसें नाहीं. वरचेवर पत्र पाठवावें तरी 'नवल विशेष कांहीं नाहीं, यास्तव लिहिलें नाहीं. वरकड सविस्तर सेवेसी तपशील मागाहून लिहून पाठवितों. आजपर्यंत लौकिकांत कांहींसा सवशय होता; परंतु हा दिवसपर्यंत कांहीं सवशय दिसत नाही. आज्ञाप्रमाणें वर्तावें हाच हेत सर्वांचा आहे. सविस्तर श्रीमंत राजश्री सेनासाहेबसुभा याणी लिहिलें आहे त्याजवरून विदित होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The writer assures the Peshwa of Bhonsle's loyalty. "Janoji," he says, "is at present at Jejuri and will proceed thence to Nagpur." The first part of the letter is missing.*

1960

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 89] [*21-3-1757*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक राघो हरि चर्णावरी मस्तक ठेऊन साष्टांग दंडवत प्रो विज्ञापना. ताा चैत्र शुध द्वितीया इंदुवारपर्यंत मुाा पुणे येथे स्वामीचे कृपावलोकनेकडून सेवकाचे वर्तमान येथास्तित असे विशेष. सेवकास स्वामीने आज्ञा करून राजश्री बिंबाजी भोसले याकडे राा केले. आज्ञेप्रो माारनिलेसी बोलोन राजश्री मुधोजी भोसले यांजवल अकृत्रीमपणे चालावे, ममतावादे वर्तावें ऐसे कितेक अर्थ सांगितले. राजश्री जानोजी भोसले याचे कुटात मिलो नये हाहि मनसबा सांगितला, परंतु बिंबाजी भोसले याचा विचार येक प्रकार. याचा अर्थ पेसजी मुजरद जासुदासमागमे लेहून पाठविला त्यावरून सेवेसी विदित जालेच असल. सांप्रत राजश्री जानोजी भोसले पुण्यातून कूच करून गेले. त्याकडे याचा संदर्भ नाहीसा दिसोन येतो. निदान बिंबाजी भोसले याचा मनोदये कीं पुण्यात कर्ज जाले आहे ते वारावें, दोन अडीच हजार फौजेचा सरंजाम द्यावा, पुण्यात दाहाबारा हजार फौज्येच्या बोल्या केल्या त्यापैा इतकी तरी करार करावी याप्रों त्यास राजश्री मुधोजी भोसले पर्वतीकडोन कूच करून संगमावरी गेले. बिंबाजी भोाहि तेथेच गेले. मुधोजीबावा बहुतशा मायावादाच्या गोष्टी दर्शऊन आपलेच लगामी लाऊन घेतले आहेत. त्यामधे स्वामीच्या आज्ञेप्रो सेवकहि त्यांस वरचेवरी सावध करीत आलों. आज आठ दाहा दिवस यांचा दुसरा अर्थ दिसोन येत नाही. पुढे काये होईल पाहावें; कां की, बिंबाजी भोसले याजवल कारभारी आहेत. त्याचा मनसबा येक प्रकार; यासाठी कोणता बीर[१] भरतील न कले. जाले वर्तमान सेवेसी लिाा आहे. सेवकासमागमे दोन जासुदजोडे येकक रोजमरा देऊन राा केले; त्यापौ येक जोडी पेसजी सैाा रवाना केली. त्यास दीड मास जाला. अद्याप जावस्वाल आला नाही. दुसरी जोडी होती त्यांचे रोजमरे भरले. पोटास द्यावयास नाही. यासाठी राजश्री जिवाजीपंत अणा व राजश्री गणेशपंत दादा यांजवल भोसले यांकडील सविस्तर सांगितले आण खर्चास मागू लागलों तो त्याणी आज्ञा केली कीं राा जानोजी भो गेले. राा मुधोजी भो बिंबाजी भो येकत्र आहेत. अथपर त्यांकडील बातमी राखावी ऐसे नाही. सरकारतर्फेचे वकील आहेत ते लिहितील. जालें सविस्तर लेहून देणे त्यावरून

---

१ चढ.

1901

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सविस्तर सेवेसी लिहिले असे. जासुद समागमे होते ते सरकारात चाकरीस दिल्हे. सेवकहि सरकारात उभयेताच्या आज्ञेप्राो सेवा करीत असे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ragho Hari informs the Peshwa how Bimbaji Bhonsle and Mudhoji Bhonsle made up their differences and acted conjointly in the interest of the Peshwa. The writer incidentally refers to the departure of Janoji from Poona.*

No. 90] *[3-5-1757 ?*

छ १४ साबान

श्री

सेवेसी विज्ञापना. राजश्री मुधोजी भोसले पुण्याहून कूच करून कोरेगांवावरी गेले. राजश्री दत्ताजी शिंदे व राजश्री जानोजी भोसले यास पत्रे पाठविली आहेत. पावती करून उत्तर पाठवणे म्हणून आज्ञा * * * * * * यांस उभयेतांची नाहीं. विदित * * हे विज्ञापना.

¶*The writer reports the departure from Poona of Mudhoji and Janoji Bhonsle.*

No. 91] *[30-5-1757*

श्रीरघुवीर

राजश्री बालाजी पंडित प्रधान गोसांवी यांसी

ﷺ सकलगुणाअलंकरण आखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य प्रीतिपूर्वक सुलाबाई भोंसली दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करवीत असिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविलें तेथें लिहिलें कीं राजश्री मुधोजी भोंसले यांजकडून पत्रें तुम्हांस आलीं तेथें राजश्री भास्कर राम भेटले म्हणून वर्तमान लिहिलें आहे. त्यास तिकडील पत्रें जीं आली असतील ती पाठऊन द्यावीं म्हणून लिहिलें त्यावरून चिरंजीव मुधोजी भोंसले यांजकडील पत्रें आम्हांस आली तेंच बजीनस राजश्री भिकाजी दादाजी यांजबराबरी आपणाकडें पाठविलें आहे. प्रविष्ट होऊन सकलार्थ कलों येईल. यानंतर मौजे दहीगांव व मौजे पलसी हे दोन्ही गाव वाईदेसीं आपण दिल्हे आहेत. तेथील फडफर्मासीविसी जिल्हेदारास व सुभेदारांस पत्रें पूर्वी आपण दिधलीं आहेत जे या दोंही गावांस फडफरमास व हरयेक विसी उपसर्ग न देणे. त्यांस जिल्हेकडील व सुभाकडील

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

उपसर्ग होता राहात नाहींत. प्रस्तुत जिल्हेदारानी तेलाचे खरीदीबदल पलसीकरावर पंचवीस रुपये मसाला करून चिमणगांवच्या ठाण्यात नेऊन उभीउभी सेंभर रुपये घेतले. दिवस लावणीचे आणि उपद्रव ये रीतीचा जालियाने गांवची लावणी कैसी होईल ? याजकरितां आपणास लिहिलें आहे तर जिल्हेदारांस पत्र देऊन गांवचे रुपये माघारे येत आणि पुढेंहि दोनी गावांस जिल्हेकडील व सुभाकडील व रा। शामराव आंबाजी यांजकडील हरयेकविसीं उपसर्ग न लागे यैसें केले पाहिजे. वरकड कितेक वृत राजश्री भिकाजी दादाजी मुखवचनें निवेदन करितां श्रुत होईल. रा। छ ११ माहे रमजान * बहुत काये लिहिणें ? लोभ असों दीजे हे विनंती.

पत्र ताडगराज चोपदार

¶*Sulabai Bhonsle requests the Peshwa to issue orders to the Jilhedars and Subhedars not to put hindrances in the way of collecting the revenue.*

No. 92] *[27-7-1757 ?*

पौ छ १० जिलकाद

श्री

अर्ज विज्ञापना यैसीजे. समसामनाजंगाचा निश्चयें केला कीं श्रीमंतानी कृपाद्रिष्टीणे मात्र पाहावें म्हणजे जानोजी भोसल्यास नागपूरपावतों जाऊन तंबी करू. गावेंलचा किला द्यावा. वरकड तहे नासरजंगाच्या अमलाप्रो। करू यैसा करार भोसल्यानी श्रीमंत स्वामीसी केला, आनी अमलात न अनिलें, यास्तव भोसल्यास तंबी करणे जरूर. फिरिंगीहि येतात. माहाराव व हनवंतराव खंडागले वगैरे मराठे सरदार यास फौज अदीक आणावयास सांगितली. निजामअली बोंगी[1] होतो यैसे विस्व बजेते (बोलते ?) नवाबास व समसामजंगासहि खबरा कलतों परंतु समसामजंग म्हणतात बेगी होणार नाही. काही बेज्या हरकत त्यापासून अमलात आल्यावर श्रीमंत स्वामींस विनंती करू, यैसे समसामजंग म्हणतात. तालुके अदवनी रायपूर म्हणजे सुबेदार विज्यापूर हे बसालतजंगासच आहे. नायेब मौलवी दूर करून शौकतजंग करार केले. रुखसत होऊन हैदराबादेस गेले. तेथून अदविनींस जातील. या शोकाणे समसामजंगास सांगितले कीं शौकतजंगास सा (वा) टत असेल की मी सिपाई; बेंडपण करावयास जाईल आनी मारला जाईल; मुलुक गमाविल यैसे न करणे. शाहानवाजखाणे उतर दिल्हे की

---

१ बंडखोर.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

औरंगाबाद सुभ्यात अमल आहे तैसा द्या म्हणता तर त्याप्रमाणे होईल. खुलासा की अदवनी रायचूरचा अमल औरंगाबाद सुभ्याप्रों देतांत. करार जाला कलावे. सालगुदस्त पैका अदवनीवर व्यायेतीणे केला नाही तर वाजबी नव दाहा लाख रुपये यावें. व्यायेत केली आणि थोडे रुपये करार केले ते मवलविणे दिल्हे नाहीत. शाहानवाजखानानें कबूल केले. त्या रुयेप्या वाट आम्ही करून देतो. देतील हे विज्ञापना.

¶*This gives news from the Nizam's court, especially the help which some Sardars promised against the Bhonsle. The Peshwa wanted to march against him because he (the Bhonsle) did not want to stick to the terms of the treaty between them.*

No. 93] [*5-12-1757*

पौ छ १२ रबिलाखर

श्रीशंकर

सेवेसी विनंती प्रार्थना येसीजे. कराडियाचा व नवाबाचा जुजाचा मजकूर कार्तिक वद्य नवमी सोमवारी जलगाव जाबोदच्या पुढें लढाई मोठी जाली म्हणून लिहिली आहेत कीं मऱ्हाठी सारी फौज येकत्र होऊन जुज चांगले झाले. मऱ्हाठियानी इभरामखान गाडदी यासी मोका घेतला. तोफखाना देखील उडवून गाडदी सेदीडसे मारले. कांही जखमी झाले. इभरामखानकडील एक हवदा खाली जाला. मऱ्हाटेयाजकडीलहि पाचपंचवीस माणूस ठार जाले, त्याजमधे पाचसात माणूस नामांकित पडले. शेंभर पनास माणूस जखमीहि जाले. थोडी आराबा[१]खाली शभर सवाशे मेली, उधलली याप्रो जाली. तेव्हा नवाबानी खासा कुमक केली तेव्हा तेथून साभाळून कराड व नऱ्हे (?) व जाचक वगैरे निघाले. याप्रो जाली म्हणून बातमी आली. नवाब बुऱ्हानपुरास जाऊन दाखल जाले. हे बाहेर आहेत. सरकारचा मुलूकहि खराबीत फार आला. वराडात मोगलाने जिकडून गेला तिकडून गाव मारीतच गेला. दाहा हजार रोंड[२] लस्करात आली आहे. गाडदियाने अतिशये केला. हजार दोन हजार बायेकानी जीव दिल्हे. गाव आस्तमानपावेतो राखावा आणि रात्रीस जाऊन गाडदी याणी मारावा याप्रो वर्तनूक करितात. बुऱ्हानपुरात पाहवे काये करितील हे नकले. साध्यंत वर्तमान मागाहून विनंती लिहून पाठऊन देईन. बातमीस दोन दिवस जाजती

---

१ तोफा. २ कचरा, लुटलेले लोक.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

लागले म्हणून स्वामीनी रागास न आले पाहिजे. मी दूर गेलो होतो म्हणून विलंब लागला. माहाराजाचे शेवेसी श्रुत होये. हे बातमी मागे आठदाहा रोजात पाठऊन देईन हे विज्ञाप्ति.

¶*News-letter of the fight at Jalgaum Jambod between Ibrahim Khan Gardi and Raghuji Karande. This fight is an addition to our present knowledge of the subject. The writer of the letter is Vyankatrao Moreshwar.*

No. 94] [*4-3-1758 ?*

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे शेवेसी

विनंती शवेक हरि दामोदर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान स्वामीचे कृपाकटाक्षें यथास्थित असे. छ ९ माहे जमादिलाखरचे आज्ञापत्र सादर जाहाले ते आजी छ २३ मिनहूस पावले. राजश्री मुधोजी भोसले अद्यापि जात नाहीत म्हणोन सेवकास शब्द लाऊन पत्री आज्ञा केली. यैसियासी राजश्री महिपतराव व राजश्री आनंदराव यांची रवानगी करून सिवरात्रीस पुणियास आलो. त्या दिवसापासून राजश्री मुधोजी भोसले यांचे कारकुनास व त्यास बहुता प्रकारे सांगतो, परंतु ते अद्यापि तरतूद करीतच आहेत. लोक निरंकुश, तैनातीस मोईन[१] नाही, याजमुळे खर्च; देमुबलग साहुकारी व देणे लोकांचे, यामुळे लौकर निकाल होता दिसत नाही; या प्रकारचा कारभार यांचा आहे. आपण वाकिफ[२] नव्हतो. हाली राजश्री गोविंदपंत तात्याचे विचारे निकाल निघालियासी रवाना होतील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Hari Damodar informs the Peshwa of the dilatory behaviour of Mudhoji Bhonsle in the disposal of money matters.*

No. 95] [*22-5-1758*

छ १४ रमजान

तिसा वैशाख

श्रीशंकर

सेवेसी प्रार्थना यैसीजे, वरधातीरी छ १९ रजबी नवाब निजामआलीखान सेनासाहिबसुभा याच्या डेरियासी आले होते. समागमे पांच हजार गाडदी व

---

१ करार, वेतन. २ माहितगार.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

हजार दीड दोन हजार फौज होती. त्यासी त्यांच्या डेऱ्यापुढे येऊन हतीवर बसून दोन घडीपावेतो उभे राहिले आणि याणी नवाब घरास येतात म्हणून सरांचे[१] (?) उभे करून तीन च्यार मसनती केल्या होत्या, त्यासी नवाबास भये प्राप्त जाले कीं हे आर्जकू[२] (?) केला आहे तेव्हा काही येथे दगा आहे म्हणून प * ल्या चोबदार आले. मसनती पाहाण्यासी गेले कीं दारू पसरली कीं काये आणि तमाम कारकूण मंडली व हत्यारबंद बाहेर घातले. मो * इतबारी होते ते पाठविले. इभरामखान गाडदी पाहून गेले. मग विठलपंत येऊन पाहून गेले. तेव्हा मग नवाब हतीवरून उतरले. नवाब दुसरे मसनती पावेतो आले ; तेथे बसले. पुढे जागा खलबतखाना तमाम तसाच राहिला. तेथेच नवाब बोलले कीं बिचारे की तै हकनाहक खराब किया, आणि आमची सरदारीहि खराबीत आणिली. आज आम्ही भागानगर पावेतो (जा)ऊन काजकाम केले आसते त्यासी बसल्या बसल्या खेळ करितात म्हणून यैसे बोलले. चितां बहुतसे खिन्न जाले. दुसरे सराच्याचा व डेऱ्याचा आर्जकू (?) पाहून दुखहि जाले. पानदाने वगैरे सरंजाम पाहोन घरास गेलियाउपरी येका जनाजवळ बोलूहि लागले कीं आज जानोजीने आम्हास मोठासा थाट करू दाखविला कीं आम्ही यैसे मातबर म्हणून आम्हास दाखविले. दुसरे दिवस विठलपंतास पाठविले कीं साऱ्या तोफा व गाडदी याची एक रंजकी करविती तुम्ही जानोजी भोसले यासी घेऊन येणे. त्यासी हेहि गेले. रात्र जाली ; मग चौ घडी रात्रीस तोफखाना वगैरे सोडला. प्रहरा रात्रीस आपल्या डेरियास आले. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापि.

¶*An interview between Janoji Bhonsle and Nizam Ali along with the gorgeous entertainment arranged by Janoji is reported in this letter.*

No. 96] [*1758*

श्री

पुा राजश्री शामजी गोविंद
गोसावी यासीं

सुाा तिसा खमसैन मया व अलफ. सैदगुलामअली येथून गेले त्याजवर व विठल सुंदर याजवर कारभाराची पेशमानी निजामअली आणणार म्हणून वर्तमान ऐकतों. त्यास सरकारांत जागीर द्यावयाचे परगणे कोणकोणते नेमिले ते व

---

१ सरांचे=? २ आर्जकू=?

1966

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

दोन स्थळे द्यावयाची ती करारात आणून करून घेऊन सत्वर देतात किंवा कसे म्हणतात, कोणे प्रकारे वर्ततात ते लिहिणे व मुधोजी भोसले याचे जागिरीस व स्थलास उपसर्ग जानोजीबावाचे सांगितल्यावरून करितील, तरी दोघेहि रघोजी भोसले याचे चिरंजीव, राज्यातील सरदार, उभयेताची वाटणी येथून करून दिल्ही आहे याप्रो चालविले पाहिजे ऐसे असोन जानोजी बावाचे--(यापुढें पत्राचा भाग कोरा आहे.)

¶*Shamji Govind Takle, the Peshwa's envoy at Hyderabad, is instructed to give news about Sayed Gulam Ali and Vithal Sunder and to see that Mudhoji Bhonsle's territory is not molested by the Nizam at the instigation of his brother Janoji.*

No. 97] [*29-1-1759*

पो छ ११ जाखर तिसा

माघ श्रुध

श्री

राजश्री सदासीवपंत गोसावी यांसी

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलक्रुत राजमान्य श्नो जानोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असिले पाहिजे विशष. गोसावियांणी सांडणस्वारांबराबर पत्रे पाठविली ती प्रविष्ट होऊन लेखनार्थ आवगत जाला. निजामअली यासी तह खामखा करावा म्हणोन निक्षून लिहिले त्यास आज्ञेप्रमाणे तह करीत असो. मोगल वरधेपलीकडील अमल घेवो अगर ठाणी बसवो. आम्हास आपली मर्जी दरकार, परंतु वीस हजार फौजने आता काये करावे? बंगालियास फौज पाठविली (तिच्या) रवानगीस पांच सात लक्ष नास्तिपक्षी पाहिजेत. आपण लिहिले की गंगथडीस फौज घेऊन जावे आणि दोन रोज पोट भरावें आणि आमचे सरकारचा यैवज झाडियानसी पाठवावा म्हणोन; तरी गंगथडीचा यैवज मुलकांत बहुत सख्ती केली तरी तीन लक्ष पावेतो जरूर होतील. त्यामध्ये वीस हजार फौज वारून यैवज कोण्हे प्रकार पावता बेदर म्ह * * * दे मवासे असतील तेथें शह पाहचाऊन ..च्यार रुपये द्यावे तरी सलाबदजंग यासी श्नेह रक्षावा मोगलाई अमीलास तसदी ..द्यावी. त्याप्रमाणेच निजामअलीसी श्नेह सपादून त्याचे मर्जीप्रमाणे चालावें तेव्हाचे श्नेह उभयेपक्षी राहील. हैदराबादेच्या मुलकांत उपसर्ग जालियाने नवाबाची मर्जी कैसी राहाते. वांरवांर आपणाकडे बोभाट लेहून पाठवील. इकडे तरी निजामअली वाली जालेच आहेत. त्यासी श्नेह जालियावरी त्याचेहि

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मनोदयानरुप कर्तव्यता प्राप्त जाली. तेव्हां रुपया काढून मेलवावा. विस हजार फौजेची समजाविसी कैसी करावी. आपले सरकारचा यैवज कैसा पाठवावा. वराड बिलकूल बुडाले यैवजास कोठे जागा दिसत नाही. याजमुले आमचे चितात काहीच विचार सुचत नाही. गोसावियांनी येवनासी स्नेह करून तह-प्रो चालवें; गंगथडी प्रांतातच फिरून फौजेचे पोट भरावे; पैका पाठऊन घ्यावा म्हणोन लिहिले. येतद्विशईचा अर्थ चितात कैसा आणून लिहिले तो

भावगर्भ कलावा म्हणजे त्याप्रमाणेच वर्तणूक करूं. तूर्त निजामअली यासी स्नेह केलियावरी हे हैदराबादेवरी जाते तरी याचेच समागमे जाऊन च्यार दिवस फौजच पोट भरितो. त्यास सलाबतजंग बेदरावरी आले तेव्हां तिकडे जातील यास कारण नाही. यांणी उमदी नजर धरली आहे. नवाबाचे मुकाबलियावरी जातात. ते मोडले तरी हे धनी प्रांत लूटू देणार नाहीत. त्यास हे सरदारीचा अभिमान आजवरी आपले कृपेवरी चालली. आतां जर वरचेवर उपेक्षा करून लिहिले तरी काये करावे ? हरयेक विचार करून काल घालवावा तरी आमचें इतल्याखेरीज हे करीतां. आता इतबार तुमचा आम्हास येत नाही. दाबाही चितात विपर्यास येईल. आम्हास तों सर्व प्रकारे आपली मर्जी राहावी हेंच आवश्यक, यांजमुलें जे होणार असेल ते होईल. फौज भारी, वराड बुडाले, बंगाल्याचा यैवज फौजेवेगला येत नाही यैसे दिसतें. येंदा हा कालपर्यंत पैका न आला तेव्हां जरूर फौज पाठवावी लागती. तिकडेहि फौज जाऊन इकडे फौज फारच राहील तिचा हिसेब करून पैका देणे घडत नाही. त्यास आमचा सर्व प्रकारें येक आपले आज्ञेवर. जर हे सरदारीचा सांभाल न केला विचार न सांगितला तरी पुढे काये होईल हे ध्यानात असेल. निजामअलीस सा महिने इकडे अटकाविले. लोकाची थोडी तलब खरी जाली. येंदा समजावीस काये निकडेने जिवाभ्य श्रम करून केली. पुढे समजावीस करावी यैसा विचार राहिला नाही. कालवंचना करावी. गंगथडीस असावे तरी सरदारी या रीतीने परिछिन्न राहता दिसत नाही. सर्व लोकिक आपला प्रिथवीत होईल की आज्ञेप्रमाणे वर्तत आसता सरदारी मोडली जेव्हां गंगथडीस फौजची उस्तवारी करावी आणि सरकारचा यैवज झाडियानसी पावावा यावरून दिसोन आले की सरदारीची आस्ता मनापासून नाही यैसे दिसोन आले. यैसियास आमची निष्ठा आपले ठायीं चितापासून आहे तरी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आपणासच दया येईल. वडिलपणे नेक सला ज्यात आमचे स्वहित हेंच लिहितील. नाही तरी होणार असेल ते हो. आता काही सुचत नाही. निजामआली आम्ही येक होऊन पोट भरावें तरी इतबार करणार नाही. यैसे संकट जालें आसे. सविस्तरे विदित व्हावे म्हणोन लिहिले असे. रा छ २९ माहे जमादिलावल. सुज्ञाप्रती विशेष काये लिहिणे? कृपा लोभ आसू दिला पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Janoji Bhonsle to Sadashivrao Bhau, writing that he would try according to his instructions to have a treaty effected with Nizam Ali and himself act up to the terms of the treaty. "But," he says, "there are many difficulties in the way of my collecting the revenue and paying the big army their dues for which they are clamouring."*

No. 98] *[31-1-1759*

छ १ जमादिलाखर

श्री

सेवेसी आज्ञाधारक निळो गोपाल सां नमस्कार विज्ञापना ऐसीजे. येथील वर्तमान सेनासाहिबसुभे व सेनाधुरंधर याचा कलह होता तो वारून स्नेह जाला. तह ठहरला की मुधोजी भोसले याणी कारभार करावा. मध्यस्त रघुजी करांडे व त्रिंबकजी राजे व पिराजी नाईक निंबालकर व नानाजी कृस्ण ऐसे मिळोन उभयेतास वर्तवावे. मुधोजीबावाकडील जाबसाल आहे की जानोजीबावानी श्रीमंताकडील फौजेचा व ऐवजाचा कजिया व खासगी कर्ज वारावे, चंद्रपुर स्वस्थान खासगी खर्चास द्यावे असे मुदे आहेत. येविशई जानोजीबावानी उतर केले की श्रीमंताकडील जाबसाल तुम्ही आम्ही मिळून तेथ जाऊ; जे चाकरी सांगतील ते करू. तुम्हाविसी रदबदल करून आइकिले तर उतम, नाहींतर जे आज्ञा करतील तैसी वर्तनूक करावी. दुसरी गोष्ट आमच्याने होत नाहीं. कर्जाचा जाबसाल तर आमचे व मागील व तुमचे सर्व येक करून वारावे व फौजे—(अपूर्ण)

¶*Nilo Gopal gives here the terms of negotiations agreed upon between Janoji and Mudhoji Bhonsle.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 99] [21-6-1759 ?

श्री

श्रीमंत राजश्री भाऊ
स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक केशो आपाजी कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ २९ माहे सवाल मुाा पंचगव्हाण प्रांत वराड जाणून स्वकीयें लेखनाज्ञा करित असिलें पाहिजे विशेष. नागपुरचे मुकामीहून सेवेसी विनंतीपत्र लेखन केले होते त्यावरून श्रुत जालेंच असेल. यैसियासी सेवेसी यात्रयाचा हेत बहुत होता परंतु स्वामीसेवेकरितां गुंता जाला. श्रीमंत राजश्री येजमान सेनासहवर्तमान आपले आज्ञेप्रमाणे दर्शनास येत आहेत. त्यासमागमें सेवकाचें येणे होऊन चरणाचे दर्शण होईल. त्यास तीर्थस्वरूप राजश्री नारो आपाजी स्वामीसेवेस कार्यास आले. चिरंजीव येशवंतराऊ स्वामीजवल आहेत. गुदस्ता तों वडिलांप्रमाणे त्याची उभारणी करून चालविलें हे चिरंजीवाचे लिहिल्यावरून कलों आले. येंदाचे उभारणीचा विचार अद्यापवर कलो आला नाही. यैसियासीं चिरंजीव अज्ञान आहेत परंतु महदाश्रयें समर्थाचा आहे. त्यास वडिलांपेक्षा चिरंजीवाची उभारणी विशेष जालियां लौकीक स्वामीचा आहे. वडिलांचे कर्जवाम आहे त्याचा अभिमान सर्व स्वामीस आहे. लाहान मुले आहेत त्यांचे पालग्रहण करून उर्जित करणार स्वामी समर्थ आहेत. तीर्थस्वरूपांमागे सर्वास वडील धनी आपण आहेत. आम्हीं विशेषात्कारें लिहावें यैसा विचार नाहीं. बहुत काये ल्याहावे ; कृपा सदैव वृद्धि करित असिलें पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*Keso Apaji to Sadashivrao Bhau, recommending Yeshvantrao, son of one Naro Appaji, to the favour of the addressee.*

No. 100] [25-7-1759
छ २२ जिल्हेज

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री बापू स्वामींचे सेवेसीं

स्तापित व्यंकटराव मोरेश्वर कृतानेक साा नमस्कार विनंती जे. येथील क्षेम ताा छ २९ माहे जिलकाद मुकाम नागपूर स्वामीचे कृपेकरून येथास्तित आसे विशष. येथील वर्तमान तर, श्रीमंती आज्ञा पाठविली कीं, रुपये राजश्री सेनासाहिब सुभा याजकड सरकारचे येणे, गुदस्ताचे दाह लक्ष व सालमाारचे दाह लक्ष, येकून वीस लक्ष येणे, त्यापैकी दाह लाख रुपये तगादा करून पाठऊन

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

देणे. त्यासी, येथील मजकूर कुल श्रीमंतांचे पत्री विनंती लिहिली आसे. त्यासी स्वामीनी राजश्री मानको शंकर राजश्री जानोजीबावाच्या समाधानास्तव पाठविले. त्यासी उभयेतांची भेटी करविली. जाबसालहि आठ चौ रोजात करून सेवेसी विनंतीपत्रे पाठवितो, त्याजवरून काये आज्ञा करणे ते करावी. आम्हास सर्व प्रकार भरवसा स्वामीचे पायाचा आहे. वगवसिला कुल स्वामीचे पाये आहेत. माझे सेवेचा प्रकार स्वामीस विदित जालाच आहे आणि पुढेहि होईल. सेवेसी श्रुत होये. पूर्वी विनंतीपत्री विनंती लिहिले आहे त्याजप्रा। पत्रे पाठवावयाची आज्ञा करावी. माझी चाकरी परिणामी कलेल. आम्ही लेकरे आहोत. आमचे पालिग्रहण ईश्वरे स्वामीकड लावले आहे. श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar writes to Sakharam Bapu regarding the Peshwa's dues to be recovered from Janoji Bhonsle.*

No. 101] *[23-8-1759?*

पौ छ १९ मोहरम

श्री

श्रीमंत राजश्री नानासाहेब
साहेबाचे सेवेसी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्रो त्रिंबकजीराजे भोसलें दंडवत विनंती. उपरी: येथील कुशल जाणून साहेबी निजानंदअभिवृधिलेखन करित असिले पाहिजे विशेष. साहेबी पत्र पाठविले ते उतमसमई प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाला. यैसेच निरंतर पत्री वृतलेखन करित असिले पाहिजे; तेणेकरून संतोशाभिवृधि होत जाईल. येथील वर्तमान तर ता। छ २९ माहे जिल्हेज मुकाम नागपूर येथें असों. यानंतर साहेबी धवलसिंग यांजबराबर पत्र पाठविले ते पाऊन साद्यंत अर्थ अवगत जाला. यैवज सरकारचा व राजश्री मुधोजी भोसले याचे यैवजाविसी लिहिले, त्यास सरकारचे येवजात च्यार लक्षाच्या हुंड्या सेवेसीं रवाणा केल्याच आहेत. राजश्री मुधोजी बावाचे यैवजाचा मार तर यांची सरदारी वोढीची आहे. हा प्रकार सेवेसी परस्परे कललाच असेल. निजामनअलीचा मार श्रीमंत राजश्री जानोजी भोसलें सेनासाहेबसुभा याणी लिहिले आहे, त्यावरून व राजश्री वेंकटराव मोरेश्वर याणी लिा आहे त्यावरून कलो येईल. राजश्री गिरमाजी खंडेराव व राजश्री येशवंतराव कोनेर यांस ताकिद केली आहे. ते जलद पावतील. हेहि मावाहून दाखल होतील. प्रसंगानरूप ज्या गोष्टी घडोन येतील त्या खऱ्या. राजश्री

1971

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लक्षुमण नरसिंह याचे कर्जाचा मार लिा तरी आम्हीं यांस दरम्यान हो(न)ऊन पुर्जा[१] दिल्हा होता. त्यास याचा निकाल पडून यांजवलचा पुर्जा अजसिंग याचे विद्यमाणे आम्हांस पावला. कितिक तपसिलेसी वृत मारानिले सेवेसी निवेदन करील त्यावरून कलो येईल. बहुत काये लिहिणे, लोभ केला पाा हे विनंती.

¶*Trimbakji Bhonsle to the Peshwa, writing about the payment of money due from the Bhonsles.*

No. 102] [*11-10-1759*

पौ छ ७ राखर सितैन

श्रीरघुवीर

राजश्री बालाजी पंडित प्रधान गोसावी
यासी

ꣳ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो मुधोजी भोसले सेनाधुरंधर दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणौन स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे. विशेष :—गोसावी याणी छ १८ जिल्हेजचे पत्र पाठविले तें छ ९ मोहोरमी नजीक पिजरी प्रात वराड येथे प्रविष्ट होऊन बहुत संतोशित मानसे लेखनान्वय साद्यत ध्यानास आला. राजश्री सदासिव हरी याचे पत्री अर्थ की, येथील लक्षानरूप वर्तणूक किमपि न केली हे प्रासिध्धच आहे. याजउपर जसी मर्जी तसे चालावें मागे चुकले ते दूर करून घ्यावे. अशा प्रकारावर आले असें तुम्हांस वाटल्यास त्याचा निरोप घेऊन तुम्ही हुजूर येणे. सर्व अर्थ समजोन उचित तेच होईल. ऐसियासी या सरदारीचा बंदोबस्त पेशजीपासून गोसावी याचे हातचा. पुढेहि येथास्थित मार्ग आपणाकडूनच करून घ्यावे हे निष्टेचे मनोदये. येतद्विषईच्या निखालसपणाचा अर्थ पूर्वी दोन तीन वेला पत्री लिहिलाच आहे. वडीलपणें ममतापुरस्कर बंदोबस्त करून देतील या अर्थे घाटमाथा आठ महिनेपर्येत दिनचर्या करणे प्राप्त जाहाले होते. बंदोबस्त घडोन यावयासी दिवसगतीचा अवकाश इकडील प्रकार मनास आणितां सरदारीची तारावल दिवसे दिवस आधिकच व चद्रपूर प्रांतहि उपहत जाला. येक शहर मात्र राहिले. तेहि त्याच्या वेधात तेथील साहित्याचा प्रकार क्षीणतेत दृष्टीस आल्यानंतर जरूर कूच करून घाट उतरणे जाहाले. इतकियांत राजश्री

---

१ कागद.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जानोजी भोसले याणी रो मोरो रघुनाथ आपणाकडील फडणीस पेशजी दग्याचा प्रकार जाल्या दिवसापासून त्याजवलच होतें. त्यासी यैक्यता घडावी, दरोबस्त दौलत रक्षावी, वडीलपणची रीत मात्र सांभालावी मांगे घडले प्रकार ते ध्यानास न आणावे यैसे फारच निखालसपणाने कापट्य न दाखवितां बोलोन निशा क्रियेने करून आम्हाकडे रवांना केले. ते आल्याउपर सदरहू प्रकार सविस्तरें तिकडील त्याचे सांगितल्यावरून ध्यानास आले. त्यासी पूर्वीपासोन त्याजकडील संशयात्मक वर्तणूक आमच्या व सर्वांच्या प्रत्यास आलीच आहे. परंतु संस्थान निर्वेध व्हावें याकरितां हेहि आचरणे प्राप्त जाले. जे जे जाबसाल दृढीकरणाचे सांगणे ते सांगोन मारानिलेस त्याजकडे पुन्हा रवाना केले. त्याणी याचे मुखोद्गते सर्व अर्थ ध्यानात आणून निश्चयेपूर्वक राजश्री रघोजी करांडे दिा पागा व बालमजी केशव यैसे उभयेतां करारमदार शफतपुरस्कर बोलण्याप्रमाणे ठराऊन आम्हाकडे पाठविलें. माध्यस्तानीहि निघतेसमई साफ त्यासी विचारिले की, गावेलीपासोन सर्व कारभारात आम्ही माहीत आहों आणि पुर्ते क्रियानष्टपण आमचे वाब्यास व अलीकडील अमर्यादेस अभिमानी आम्ही असेच त्यासी समजले आहे. आणि घडतहि तसेच आले आहे. याजकरितां आम्ही पुर्ते मुदई असे असोन तसीच बोलणी व कर(णी) असिले तरी जाणें पाठवणे उतम नाही. त्यावरून त्याणी निश्चयात्मक सांगितले की, तुम्ही त्याची निशा ज्या रितीनें होईल त्या रीतीने करावी अतर किमपि पडणार नाही. शपतपूर्वक बोलिलेप्रमाणे परिणामास लागले. त्यानतर आपण संस्थानचा वेढा मुक्त करून नागपुरास गेले. रा रघोजी करांडे आम्हाकडे आले. त्याच्या आमच्या भेटी वर्धातीरीं होऊन पहिले बोलले मजकूर सर्व दृढीकरणात आणिले की, पेशजी यैसेच कृत्रिमाच्यारांचे प्रकार घडऊन जिवाम्य अनुभवास आणिले आहेत. आतांहि निःसंशयेता वर्तणुकेंत येणार नाही. तत्रापि तुम्ही आपली निशा करून आला आहा तर कराराप्रमाणे अमलात आणावे. क्षुल्लक मनुष्ये बोलती त आपाये कर्ती यैसी असतील ते संग्रहीची सोडून सर्व घरचा व दरबारचा बदोबस्त राखावा; परस्परे श्नेहास मलीनता कदापि न आणितां उतम कीर्तच मेलवावी असे तुम्हास निश्चयात्मक समजले असले तर उतम. आम्हासहि हेच आगत्य येणेंहि हेच भाव यैकोन जाले, तुम्ही दृढता सत्क्रियची धरून आमची निशा केलीत म्हणजे गुंता विकलपाचा आमचे ठाई कदापि राहाणार नाही. तेव्हा मारानिलेहि आपले संक्रियेने निशा केली की कदापि वावगे दृष्टीस पडणार नाही. दिवसेदिवस श्नेहभाव त्याजकडून

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

फारच दृष्टीस येतील. पुढे सर्व बंदोबस्त तुम्हा आधीन. त्याणी वडीलपणें खुशाल असावे, तुम्हीहि धणीपणाची रीत सांभालोन कारभार करावा. तुम्हाकडून अंतर नसतां त्याजकडून दृष्टीस आले तर आम्ही खऱ्याचे सोबती आसों. जो प्रकार तुम्हास प्राप्त तो आम्हासहि कैलासवासी बावासाहेबाचे दौलतीकरितां आचरणे आवशकच होईल. याप्रकारे त्याजकडून निशा जाल्यानंतर नदी उतरोन दरकूच नागपुरास गेलोत. छ ९ सफरी शहराआलीकडेस कोसावर सीताबरडीवर मुकाम करून राहिलो. विज्यादशमीस भेटी होणार यास्तव आगोधर काही मुद्याचा प्रकार बोलण्यात आणिला नाही. दुसरे दिवसी त्याकडून सर्व कर्त देवाजी पुरुषोतम भेटीस येऊन कितेक येकनिष्टेतचे व आपले कर्तेपणाचे भाव बोलोन गेले. तदुतर दसरियाचे दिवसी भेटी जाल्या. दोन च्यार दिवस लौकीक ममता विशेषच दाखविली. उपरांतिक मधेस्ताहि बोलण्याप्रो बंदोबस्ताचा सदर्भ लाविला. त्यास पहिल्या बोलण्यात अंतरे फारच त्याजकडून याचे दृष्टीस आली. त्यामुले माध्यस्तपैकी रा रवोजी कराडे यासी परनिष्ट बोलणे प्राप्त जाले की, प्रारंभी निश्चयात दृढीकरण काये आणिले आण आता काये बोलतां हाच प्रकार तुम्हास घडवणे होता तर आगोधरच आम्हास पाठवणे योग्ये नव्हते. सर्वस्व तुमची सात्क्रिया जाणोन अज्ञेने क्रियेस गुतलो. आता आम्हांस दुसरा विचार दाखविता कसा येईल? हेच संशय मागील आचरणाचे समजोन आम्ही जात नसतां बलात्कारे त्यास आणावयासी पाठविले. आता येणेकरून परिणाम उतम नाही. यैसे गोष्टीने ते कैसे समजोन स्नेहभावी आचरतील ? या जाबसालेकरून त्यास व त्याचे कारभारी देवाजी पुरुषोंतम यासी बहुतच विशमता वाटली की, आमचे पदरचे होतसाता आतर मुधोजी भोसलेच होऊन बलात्काराच्या गोष्टी सांगतात. हे घरचे मुदेई उतम नाही. जसी मर्जी खावंदाची तसे चाकर लोकानी वर्तावे, ते यासी अनकूल पडत नाही तरी चिंता काये? तेव्हा सर्वानी मिलोन मसलत केली कीं, कराडें या सरदारीत वरिष्ट होऊन सर्वोत्कर्षाच्या गोष्टी सागतात. याजकरितां यासच विचाराचे वाटेने मर्यादेत ठेऊन पुढे कर्तव्यार्थ तो करावा, त्याप्रमाणे आमचाहि विचार करावा. हे मसलत सिध करून तमाम दग्याचे सरजामास लागून आपायासी जपो लागले. तदुतर त्याजकडे जाणे टाकिले. तेव्हा त्यास समजले की, योजिले संधानाची बातमी यास प्रविष्ट जाली. आतां जलदी करून चागले पारपत्य उघडच करावें. हा मनसबा शटकर्ण न करितां छ १७ मिनहूस सामान

1974

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सिध करून रात्रौ राजश्री पिराजी नाईक निबालकर व सुरतसिग हजारी यासी सागोन पाठविले की, तयार होणे. त्याणी प्रत्योतर केलें की, राजश्री मुधोजी भोसले व रघोजी कराडे याजकडून अंतर कोणते जाले जे आपण विस्वासवात करावा ? त्याचे चितांत कृत्रीमच असते तरी निखालसपणे नागपुरास कशास येते ? इतकियात बातनी आम्हाकडे व कराडियांकडे पोहोचली. त्यावर तयार होऊन सूर्योदयेपर्येत तलावर उभे राहून बुनगे व्याहांडानजीक सात कोसावर वराडचे रोखे मुकामास पाठविले. हे सावधेतैचे वर्तमान त्यानी यैकोन तमाम लोकांकडून कबरा सोडूऊन जेथील तेथे चौक्यावर पाठविलें. तदनंतर त्याणी कृतकर्म निराकर्णाचे सिष्टाईस त्रिंबकजी राजे यासी पा. त्यासीहि भाशणे व्हावयाची ती जाली. तेव्हा ते कुंठित जाहाले. रा रघोजी कराडे यानी परिछिन्न सागितले कीं, शंका सोडून राजकारणास आला आहा. उतम आहे. तुम्ही तऱ्ही येश घ्यावे. सर्व बखडे दूर होऊन यैक्यता चालावी हे वासना असिली तरी सेनासाहेब सुभ्याचे दौलतीत आपायेकर्ते माणूस देवाजी पुरुषोतम व बालाजी केशव व शामजी फुलाजी वगैरे आहेत. यासी आमच्या हाती देणें. प्रारंभीहि श्नेह करावा. भेटोन दौलतीचा कारभार त्याजवर सोपावा. कलह दौलतीतील तुटावा म्हणजे उचित प्रकार कर्तव्य ते करावयास संशय पडणार नाही. असे मनसबे घाटून आम्हास सांगावयासी आले. त्याच वेलस सागितले की हे उचित आहे खरें परंतु तुम्हाकडून चालणार नाही. तेव्हा दुर्लौकिक याजकरितां नच करावे. जे जाले आहे ते उतम आहे. त्याप्रमाणे परस्परे चालिवणार चालवितील चिंता नाही. तेव्हा वाईट वाटलें आण शब्द लाविला की, दौलत बुडवावी हे काका ! तुमची वासना. तेव्हा चुकलो असें म्हणौन नादानी घेतली. मनसबा सिधीस नेऊन आतां घर दौलत बुडवावयाचे मनसबे सांगोन घोर वाढविला आहे हे बरें कीं काये ? उमज कां पडत नाही ? याउपर उमजा आणि त्या दुष्टास हवाले करां. त्यासी पोटास देऊन जतन करून ठेऊन पुढें दौलतीचे वृधीचे विचार करां. दौलत या आज्ञानपणानी बुडाली ; बाकी राहिली नाही. क्रियानसष्टांचे संसर्गात आमचे कल्याण नाहीं हे आंम्हास उमजले. याजउपर उचित ते करा. येणेप्रमाणे राज्यास सागोन शहरात रा केले.

[शिक्का] आम्ही कराडें यैसे कूच करून बुनगियांत आलों. त्या स्थली दोन च्यार मुकाम जाहाले. राज्यानी व सुरतसिंग हजारी यानी दोन तीन येणीजाणी केली. त्यांत सारांश हाच कीं, देवाजीपंतास रा पिराजी नाईक निबालकर याचे हवाले करितों ; त्याचे सरजामात

1975

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

राहील. त्याजपासोन काही अंतर पडले तरी नाईक जाब करितील तुम्हाकडीलहि सदासिवपत व रामाजी केशव व कराडे याजकडील नानाजी कृष्ण यासी साफ निरोप द्यावा. चालवणे तर घरीच चालवावे हे उतरास प्रतिउतर आणिले. तेहि मान्य केले आण सांगितले की, याउपर अतर पडो न देऊ असे तुम्ही दोघे व नाईक थैसे लिहिले द्यावे म्हणजे गुता उरकला. त्याचे उतर त्याणी केले की, हा मजकूर फिरोन जानोजीबावास सागून त्याणी आमची खातरजमा करून लिहिले देवितील तर येऊन देऊ. नाहीतर येक दिवस येणार नाही. यातच समजोन मग चितास येईल ते तुम्ही व त्यानी करावें असे म्हणोन निरोप घेऊन गेले. दोन रोज वाट पाहिली; ते न आले; लेहून देणे हाहि प्रकार घडत नाही म्हणौन त्याची उतरे आली व त्यासमई कराडे यानी आम्हांस बोलण्यात फार आणिले त्याचा प्रकार निखालस यात संशये नाही आण या दौलतीचे वोझे व आमचे बरें याविंतरिक्त दुसरा अर्थ त्यास नाहीं व आम्हासहि उपयुक्त तेव्हा याणी सागावे तेच आम्ही आचरण करावें हे दढतां येकाग्र घडली. प्रात जालियासी साहाणे पडणे. दग्याची बातनी तिकडून आली म्हणौन कूच करून वरधातीरास आलों. फौजेचा व प्रांचा बदोबस्त त्याचेच नावे होत आहे. फौज पाच साडे-पाच हजारपर्येंत जमा जाली आहे. पुढेहि येतच आहे. ते नागपुरीहून दिपवालीचे प्रतिपदेस डेरे दाखल जाहाले. फौजेची समजावीस करून आमचे रोखें यावे. मग जसा प्रकार द्रिष्टीस येईल तसा करावा हा मनोदये त्याकडील. आम्हासहि याप्रमाणेच प्रात जाहाला आहे. हे सर्व वर्तमान गोसावी यास परस्परे कलले नाही थैसे नाही. कललेच आहे. तत्रापि आम्हास सर्वस्वे वडील आपण. जाला मजकूर लिहिला पाहिजे. पुढें सेनासाहेबसुभा याकडील गोसावियाची कामे व जाबसाल त्याचे मध्येस्त कराडे आम्हाकडील आम्हाला दोन्ही उलगडे येकदाच कर्णे प्रात जालें. याचा विचार कराडे याचे विद्यमानें निश्चयात आले की, या सरदारीचा अभिमान जेथे आहे तेथे लक्ष येकाग्र ठेवावे आणि सर्व प्रकारे बरे करून घ्यावे. सर्व पेचपाच दूर होतील, वोढे वारतील, दौलत येथास्थित होईल. त्यास हे गोष्ट प्रारंभापासोन मनोमानसी येथार्थ आहे; परंतु वोढ्यामुले व मध्यस्ताच्या स्वार्थामुले कितेक विपर्यास सारिखे वाढविले. त्यास तुम्ही निखालस हे त्यासहि निवेदन आहे. तुम्ही तेथील व येथील सर्वार्थी वाकीफ आहा. वोढ्याच्या आडचणीत ज्या प्रकारे घडवाल आणि निभावणीत आणाल ते वर्तणुकेस अंतर पडणार नाहीं. अवग्र साल दरसाल वोढा रोड यामुले पडत आला. आणि कितेक कितेका प्रकारे करणाराही करून बदनाल्याच माथा लाविल्या. आमचे अत:कर्ण साक्ष हेच आहे की, सर्व प्रकारे आधार

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

गोसावियांचा. त्याजकडे वडीलपण, तेथे दुसरा भावार्थ नसावा हेच खरे आहे. तरी अकल्याण सहसा होणार नाही. सर्व अनकूल होईल. श्री करील, याकरितां हेच की, वडीलपणे उपेक्षा दृष्टीत न आणितां प्रांजल कृपायुक्त विचार वर्तणुकीचा योजून ल्याहावा व कराडे यासीहि जे लिहिणे असेल ते ल्याहावे. या सरदारीचा अभिमान तीर्थरूप कैलासवासी याजपासी वचनी गुंतले आहेत त्याची उपेक्षा न करिता ज्यात उतम होये ते करावें. आम्हापासोनहि घडवीत आणावे. लिहिल्याप्रमाणें पत्रार्थ ध्यानात अणून वडीलपणास जे उचित तेंच ममतापूर्वक केलें पाहिजे. येदर्थी समर्पक उतर अलियानंतर ज्यास पाठवावयाचें त्यास पाठऊन देऊं. रा छ २० माहे रबिलवल. सुज्ञाप्रती विशेष काये लिहिणे? कृपा लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती

मोर्तब
सुद.

¶Mudhoji Bhonsle solicits the Peshwa's advice as to how he should proceed in the situation which has developed and about which he writes thus :—His brother requested him to go over to Nagpur to settle their differences amicably at a personal interview. He proceeded accordingly and was encamped outside the city walls. The terms Janoji proposed were too high-pitched to be the basis of an agreement and could not be accepted. The proposed interview thus ended without result. The failure of the interview Mudhoji ascribes to Dewaji Purṣhotam, the evil genius of Janoji. As he suspected foul play, he left Nagpur for his province.

No. 103] *[10-11-1759*

पो छ ८ रबिलाखर

श्रीलक्ष्मीकांत

राजश्रीं बालाजी पंडित प्रधान गोसांवी यांसी

ℰ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो जानोजी भोंसले सेनासाहेब सुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणुन स्वकीय कुशल लिहित आसिले पाहिजे: विशेष गोसावी यानी पत्र पाठविलें तें प्रविष्ट होउन लेखनार्थ अवगत जाला. नवाब निजामआलीखान यांचा गुदस्तां तह जाला त्याप्रमाणे चालावें हे उतम. तथापि तुम्हाकडील लोकानी तह खेरीज

1977

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वर्तणूक केली असिली तरी जाजती ऐवज तह सिवाये घेतला असेल त्याचा मोबदला ऐवज सालमजकुरीं नवाबाकडील मामलेदारास जाऊन द्यावा, रहश्यें चालवें, कलह न करावा, म्हणोन विस्तारें लिहिलें. यैशियास गोसांवियांची आज्ञा जे समयीं जैसी येते त्याप्रमाणे वर्तणूक होत आलीच आहे. पुढेंहि होईल. येवनाचे पारपत्याविसीं वारंवार पत्रें कितेक प्रकारें भाव दर्शऊन येऊं लागलीं तेव्हां जरूर जाणोन येवनाचे पारपत्याची विवंचना करावी लागली. सरदारीवरी वोढा कैलासवाशी तीर्थरूप असतां ब्रिज्यानगराकडे फौज पाठविली ते सालीं च्यालीस लक्ष रुपये कर्ज जालें. त्याउपरी आमचें कारकीर्दीस जो प्रसंग येऊन प्राप्त जाला तो आपणास विदितच आहे. कोठपर्यंत ल्याहावा? सावनूरचे मसलतीपासून आजी च्यार वर्शेंपर्यंत फौजेचा व कर्जदारांचा मागील वोढा, दुसरे सरकारचे देणियाचा वोढा, त्याहिमध्यें मुधोजी भोंसले यांस संरजाम दिल्हा. मुलकांत मोगलाचा दंगा जाला पैसा फौजेस खर्च होऊन मोगलांचे पारपत्य न जालें. अविछिन्न पैका पदरींहून देणे आला, आणि मुल्कहि गेला, परंतु फौज पुर्ववतप्रमाणेच पदरीं राखावी लागली. त्यांचेच ऐवजाचे तरतुदेंत नित्य उठोन असतां अविधाचा मनसबा प्राप्त जाला, याजमुलें भारी फौजेचा गाहा करणे लागलें. त्वरेने लोकांची समजाविसी करितां ज्याणी जैसी आड घातली तैसी समयावरी नजर देऊन मान्य करावे लागले. मुलकाचा विचार तों अगोधरच गुदस्तां मामलेदारापासून पेस्तर सालचा पैका घ्यावा लागला, तेव्हां जरुरीस सावकारांपासून कर्ज सेंकडा पधरा रुपये बटा मनोती देहून पंधरा लक्ष पावेतों नूतन कर्जे लोकांची समजाविसी करून फौजेचा गाह केला. दाहा हजार फौज तूर्त मोगलांचे चौगीर्द घेरून आहेत. राजश्री गिरमाजी खंडेराव यांचा जमाव येणेच आहे. त्यांजकडेहि ऐवज पाठऊन फौजेची समजाविसी करविली. सत्वरीच मारनिले तीन च्यारपर्यंत येऊन फौजेंत मिलतील. आम्हास निघावयास सुदिन नव्हता व हुजरातीचे लोकांची समजाविस होणे होती, याजमुले च्यार दिवस मागे राहोन लोकांची समजाविस करुन कार्तिक बहुल पंचमीस सुमुहूर्तें डेरे दाखल जालों. मजल दरमजल जाऊन, पुढें जो कर्तव्यार्थ होता तो आपले मनोदयानरूपच होऊन येता न येता हे सर्व ध्यानास येतें. साप्रंत याप्रकारें आज्ञा आल्यास उपाये नाहींसा दिसोन आला. विनाकार्य कर्जा खालीं यावें लागलें. जफ्तीचें ऐवजाची उमेद होती ते तह केलियावरी सहजेच राहिली. साल गुदस्तांचा तहाचा प्रकार म्हणावा तरी कारभारी यांनीं न कलत कलत वर्धे आलीकडील तह केला. कार्यावरी दृष्टी दिल्ही.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

विचारें ध्यानास आणितां आयुक्त गोष्ट दिसोन येतांच अमलदारांस ताकीद करून येवनाचा पराश्रम होऊ न दिल्हा आणि येवनासहि साफ सांगोन पाठविलें जे वर्धे आलाकडील तह मंजूर होणार नाहीं. पहिला अमल वडिलानी न दिल्हा; आम्हीहि देणार नाहीं. त्यास ऐवजहि निघोन गेला. आलाकडे त्यांची उर्मी आहे, त्यास वडिलानी श्रमसाहस करून राहावयास जागा मेलविली ते वर्धे आलीकडे त्याचा पराश्रम जालियावरी आमचे हातें आम्ही मोगलास घर दाखऊन दिल्हेंसे जालें. येवढा लौकिक मात्र मेलविलासा होईल. जागीर त्याची म्हणावी तरी काही बहुत नाही. झाडून मुलूक कोणे कालीं लागेल तेव्हां तीस च्यालीस आकार होतील, परंतु त्याचा संचार कदापि कार्याचा नाहीं. येविसींचा अभिमान आपणास पाहिजे. वरकड आमचा विचार म्हणावा तरी कैलासवाशी तीर्थरूपामागें या प्रसंगी आपण वडील आहेत, कोण्ही संकट पडिल्यास समक्ष येऊन श्रुत करावे, अथवा साद्यंत लेहून पाठवावे. आपण जे आज्ञा करतील तदनुसार वर्तणूक करावी हाच आमचा कृतसंकल्प आहे. या सिवाये अन्य विचार तिलमात्र नाहीं. हा अर्थ दिनप्रतीने चितांत दिसोन येईल, ल्याहावेंसे नाहीं. या समयीं पारपत्य अविंधाचें श्री कृपेने उत्तमच होतें. त्यास त्याचा काल अनकूल होऊन आपली कृपा त्याजवरी जाली, नुकसान होतां मोगलांचे काहीं न जाले. त्याणे नजरेचा बाहना करून कुल वसूल जमाबंदीप्रा झाडून घेतलाच होता. हलीं शाहराची शाहरें व सावकार लुटीत चालला आहे. मुलुक कांही राहिला होता तोहि हंगामीच तुडवणीने गेला. सिबंदी फेढली. आम्ही मात्र कर्जा खालीं आलों. जफ्तीचा ऐवज कोठे कोठे घेतला, तोहि तह जालियावरी हिसेबामुले माघारा द्यावा म्हणजे सरदारीचा अंत राहतां दिसत नाहीं. आपलें पत्र आलें याजवरून सरदारांस पत्रे पाठविलीं आहेत जे मोगलाभोंवते दु कोसी च्यार कोसी राहणें; तूर्त आवडाव न करणें; यैसे लिहिलें आहे. गोसांवियानी पूर्वील पत्री लेखन केले होते कीं मोगलांचा तह तुमचे विचाराखेरीज होणार नाही. त्यास इतकें कांही लागत नाही. वडीलपणे या सरदारीचा आभिमान मात्र धरावा, येथे बोढ जाली ते नसावी, कर्ज भारी न व्हावें, यैसे आपले चितांत असल्यानें मोगलांसी तह विचारूनच करावा हे नलगे. मोगलाचा वकील सन्निध आहे त्यास ताकीद करावी की वर्धेपार तुम्हास कलह करावयास प्रयोजन नाही. याप्रमाणेच येवनास व त्याचे कारभारी सांप्रत आहेत त्यास मुजरद पत्रें पाठवावीं जे वर्धेपार तुम्ही अमल मागितल्याने श्नेहांत अतराये होईल यैसे परिछिन्न लेहून पाठविलें पाहिजे. मोगलानी तहाप्रमाणे चालल्यास

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कोण्हे विचारें राहावे याचाहि भावगर्भ ल्याहावा. फौज पंधरा सोला हजार जमा जाली आहे. पुढें वर्तणूक काय करावी, मुळुकगिरीस गेलियाखेरीज निभणार नाही. मुळुकगिरी न होतां घरीच बैसल्याने फौज आणि सरदारीचा आब जरूर राहील थैसे आहे. सविस्तर वृतांत निवेदन व्हावयास्तव लिहिलें असे. अक्षरशाहा श्रवण करून याचा प्रकार काये तो लेहून पाठविला पाहिजे उतराची मार्गप्रतीक्षा आहे. उतर येईल त्या प्रमाणे वर्तणूक होईल. रा। छ १९ माहे रबिलावल. या सरदारीचा बंदोबस्त वडीलपने केला तैसा पुडे येथाथीत चालीवने आपनासच आहे. बोडर जाली अशे. सुज्ञाप्रती विशेष काये लिहिणें ? कृपा लोभ आसू दिला पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Janoji Bhonsle to the Peshwa, pleading his inability to join the addressee in his invasion against Nizam Ali, explaining the financial difficulties of his situation and urging the Peshwa to continue towards him the same kindness which used to be shewn towards the writer's father.*

No. 104] [*17-11-1759*

छ २१ रबिलाखर मार्गसीर सितैन

श्री

श्रीसकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये श्री॥ त्रिंबकजी राजे भोसले दंडवत विनंती. येथील क्षेम जाणून साहेबी आ(प)ले निजानंदवैभव लिहित जाणे विशष. बहुता दिवसा कृपा करून पत्र पाठविले उतमकाली पावोन परम समाधान जाले. आमचे वर्तमान तर कार्तिक वद्य १३ पावेतो येथास्तित आसे. साहेबी लिहिले जे "सेनासाहिबसुभा यानी रा। सेनाधुरधर यासी आणावयाचा सिधात आगोधर यांणी केला ते उपरी सनिध डोगराहून वराडात उपद्रव करीत होते; यास्तव सेनासाहिबसुभा याणी वराडच्या बंदोबस्तास फौज पाठविली. त्याजवरून त्याणी राजश्री मोरो रघुनाथ त्याजकडील फडणीस याचे हातूण भेटी घ्यावयाचे सूत्र लाविले, याजवरून रघोजी करंडे वगैर वराडची पतके सेनाधुरंधर यासी आणावयासी पाठविली आणि सेनासाहेब सुभा याणी चंद्रपुरीहून कूच करून नागपुरास

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आले. तेथे सेनाधुरंधर यासी आणिले. समाधान करून, आपण पेशजी करार करून दिल्हा त्याप्रो॥ सेनाधुरंधर यासी चंद्रपुरास लाऊन द्यावे याच आर्थी येथे आणिले, परंतु ही सरदारी वोढगस्त, यामुले च्यार सरदार लोक आहेत ते देण्याघेण्याविशई आजुर्दा. त्याच्या लाज्या (कज्या?) कोठवर राखव्या? राजश्री मुधोजी बाबाची स्थीतरीत पूर्वीपासून सर्वास विदितच आहे. कोठेहि असतील तेथे लटकी राजकारणे करावी, चाळाकुचाला करावा, च्यार लोक फोडावे यास कारण इतकेच की मुधोजीबावास येथे आणावे या अर्थी च्यार गोस्टी त्याच्या समाधानाच्या लटक्या खऱ्या सांगोण येथे आणिले. भेटी जाल्या. उपरांतिक पेशजी करारप्रमाणे विभक्त राहावेयाचा अर्थ परिछिन्नवादे सांगितला. तो विचार राजश्री मुधोजीबावा याणी चितात न आणिता राजश्री रघोजी करंडे यासी सूत्र बांधोन फितूर आरंभिला. तेव्हा करंडे बोलो लागले की देवापंत व बालाजीपंत यासी कारभारातून काढावे आणि रा। मुधोजीबावास कारभार सांगावा म्हणौन आग्रहपुरस्कर बोलो लागले. उभयेता कारभारातूण काढावेयाचे कारण काये म्हणतील तर करंडेयाकडील राजश्री नानाजी कृष्ण याणी राजेकारणे कितेकाप्रकारची करून राजश्री मुधोजी भोसले सेनाधुरंधर यासी येक करून यांचे (?) व करंडेयाचे येक चित करून दिल्हे. याजकरिता बलेच कारभारी उभयेता आपल्या हती घ्यावे म्हणऊन करंडे याणी फारच आग्रह धरिला. तेव्हा श्नेह्याच्या नात्याने आम्हीहि या राजकारणात सिरोण राजेश्री मुधोजीबावाचे व करंडियाचे मनोगत शोधोन पाहिले. त्यासी ते आम्हास लिहिले मागो लागले जे आमच्या ममतेत राहावे आणि येका जागा नांदवावे. तेव्हा आपण त्यासी (अर्ज) केला की आमचे इमान व लिहिणे येका जागा श्रीमंत पंतप्रधान याचे येथे गाहाण आहे. जागा जागा लिहिले द्यावयासी येत नाही. आणि त्याचे आज्ञेखेरीज आमच्याने काहीच होणार नाही. त्याचा हेत जे नागपुरीच कफावत करावी यामुले जे होणे ते होयेसा मनोभाव दिसोन आला. तेव्हा येथे कजिया न पडावा म्हणऊन विचार करोन राजश्री मुधोजीबावास व करंडियास उतमरीतीने सांगितले परंतु त्याच्या चितास न आले. नेट धरलियासारिखे येथे काहीच न चाल, यैसे जाणून उभयेताहि वराडप्राते गेले. मुलकात रोखेपत्र करितात त्यास सेनासाहेबसुभा पाच हजार फौज जमा करून वरधातीरास जात आहेत. बहुता अर्थी करंडेयाचे मनोगत रक्षावे हेच मर्जी येजमानाची आहे परंतु करंडे काही दुराग्रह टाकीत नाहीत. त्यास प्रेरक नानाजी कृष्ण समीप आहेत, याजकरितां भरी

१९८१

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

भरले आहेत. सेनासाहेबसुभा वराडात आलियावर करंडे दुराग्रहच करील यैसे नाही. येथाकदांचित मार्गावर न येत तर त्याच्या परामृशास येजमाणहि सामर्थहीन नाहीत. त्या रीतीने बंदोबस्त करतील. आपण वेकटराव मोरेस्वर यासी व आम्हास पत्रे लिहिली तीच पत्रे राजश्री वेकटराव मोरेस्वर करंडे याजकडे वेऊन गेले. या प्रमाणे करंडेयासहि पत्रे ल्याहावी. नानाजी कृस्ण यासीहि त्या अर्थ ल्याहावे. सेनासाहेबसुभा याचा पूर्वीपासून आपल्या पायापासी मनोभाव आहे. त्यास दुसरा विचार किमपि नाही. या दौलतेचा माणअभिमाण सर्व आपणासच आहे. त्या प्रमाणेच पुढे सर्व प्रकारे सांभाल करावा. राजश्री दिवाकरपंत व बालाजी केशव उदेपुरीकरिता नागपुरी राहिले आहेत. आम्ही येजमानास वेऊन मजल दरमजल वराडात जात आहो. करांडेयासी निक्षेण पत्र लिहावी म्हणजे ते दुराग्रह टाकून सुमार्ग न वर्तत यैसी त्याची जुरत काये आहे? राजश्री मुधोजीबावाजवल तीनसे स्वार लाखनवाडियापासून आहे ततेच आहेत. आधिकोतर नाहीत. वरकड दोन अडीचहजार फौज करांडे व त्याची तैनाती पतके व(रा)डची मिलोण लाहाणमोठी अडीच तीणपावेतो होतील. येजमाण वराडत गेले म्हणजे तैनाती पतके कराडे-याजवल राहातीलच यैसे नाही. जाहाले वर्तमान तपसिले सेवेसी लिहिले असे. बहुत काये लिहिणे ही विनंती.

¶*Trimbakji Raje Bhonsle describes first the straitened condition of the Bhonsles of Nagpur and then writes how differences had arisen between Mudhoji and Janoji and how Mudhoji and Karande insisted on Devajipant and Balajipant being removed and Nanaji Krishna being placed instead in charge of administration. The writer requests the Peshwa to mediate between Janoji and Mudhoji.*

No. 105] [*23-12-1759*

छ २१ जालौवल पौष सितैन

श्रीशंकर

सेवेसी विनंती. आज्ञाधारक व्यंकटराव मोरेश्वर कृतानेक सा॥ नमस्कार विनंती प्रार्थना यैसीजे. स्वामीनी आज्ञापत्र पाठविले तेथें आज्ञा की, राजश्री जानोजीबावानी राजश्री मुधोजीबावास भेटीस नेऊन येथील कराराप्रो॥ * * * * * घालावे विरोधा सा * * * हे काहीच लिहिले नाही. मुख्य गोष्टी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येथे ज्याप्रो करार ठहरला आहे त्यात कमज्यादा न होता बेकिलाफ चालोन सरकारकामें मोगलाचा व हरयेक मनसुबा उपस्तित होईल तिकड जावयासी दोन्ही फौजा सिध आसाव्या याप्रो जानोजीबावास व त्याचे कारभारी यांसी लिहिले आहे त्या आन्वयाने बोलून ठीक करून उतर पाठवणे म्हणून आज्ञा. त्यासी येथील प्रकार तर देवाजीपंतानी व बालाजी केशव याणी मोरो रघुनाथ यासी पाठऊन आणिले, त्यासी भेटी होऊन दुसरे रोजी उभयेतानी दुसरी गोष्टी सांगून मनसब फिरविला. रघोजी कराड आणावयासी पाठविले. त्यासी बदलून गोष्टी सांगितल्या, मारावेसे केले, यैस्या कितेक गोष्टी केल्या, त्या पूर्वी विनंती लिहिली आहे. हुजुरी करार जाला त्याजप्रो उभयेतांचा प्रकार घडत नाही. रघोजी कराड याच्या क्रियाप्रमाण मुधोजीबावानी घेतली, त्याजवरून हे आटकूण राहिले, तेव्हां उभयेता भावाचा कटाक्ष फारच वाहडला. कर्जावामाचा मजकूर कारभारियासी केला; त्यासी कारभारी धड बोलणे नाही मग रुपया कैचा? जानोजीबावा आम्हास सांगितले कीं मुधोजीबावाचा कजिया वारालियाउपरी हरतजवीजीने रुपये देतो. मजला कालजी फार आहे. कारभारी याणी दौल(त) बुडविली, घातलें (?) श्रीमंताचे पुण्य आहे तर रुपया देईन, चाकरी करीन, चिंता नाही, यैसे बहुताप्रकारे सांगितलें. त्यासी आता तर युध्यप्रसंगाचा कारभार वारालियाउपरी मग काये होईल ते हो! त्यासी आम्ही साहेबचाकरीस चुकत नाही, परंतु येथे बोलता बाबासी बोलावे. कराड तर यागी (?) यैसे आहे. माहाराजाचे सेवेसी श्रुत होये हे छ २ माहे जमादिलावल, हे विज्ञाप्ति.

Vyankatrao Moreshwar writes from Nagpur about the differences between the brothers Janoji and Mudhoji and of their advisers who fomented their differences for selfish ends.

No. 106] *[31-12-1759*

छ. २१ जमादिलौवल पौष

श्रीशंकर

सेवेसी विनंती. आज्ञाधारक व्यंकटराव मोरेश्वर कृतानेक सां नमस्कार विनंती प्रार्थना यैसीजे. येथील क्षेम ताा छ १० माहे जमादिलावल मुकाम हतगाव माहाराजाचे कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशष. येथील वर्तमान तर राजश्री जानोजीबावाचा व राजश्री मुधोजिबावाचा कजिया जाला व तहाचा प्रकार सारी विनंती पेशजी केलीच आहे. त्यासी आलीकडील (प्र)कार तर या दोघाच्या कजांत कोन्ही जाईनात. तेव्हां राजश्री रघोजी कराडयाणी आतस्ते समत दिल्हें कीं

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सुला करून तहावर घालावें आणी भाऊ भाऊ येक करावे. तेव्हा आम्हास पाठवलें. आम्ही जावयासी आनमान केला की आम्हास धण्याची आज्ञा नाही. त्यासी जानोजी बावानीहि बोलाऊ पाठविलें आणि सांगितले कीं तुम्हाखेरीज कजिया फैसल होत नाही. पुढे मोगलाचा व श्रीमंताचा पेच तेथे गेले पाहिजे. यास्तव कोन्हेहि प्रकारें कजिया फैसल करणें. त्यासी येक दोनदा जाऊन त्यांचा व त्याचा कजिया फैसल लौकर रघोजी कराड्यांच्या व जानोजीबावाच्या भेटी करविल्या. कराड जानोजीबावाच्या घरास जाऊन त्याचा त्याचा `(खील) * * * परस्परे किलाफ तुटला: परंतु मु * * * * जवल कारभारी मोरो रघुनाथ * * * (व बाळाजी) केशव हे उभयेतां आहेत ते नाश करितात. परंतु रघोजी कराड मुधोजीबावापासून निघालियाउपरी मग फार राहिले तर दोन हजार राहिले यैसे अहे. आपाहि यैकतील. याच्या चितात कारभार करावा आणि बोलतात कीं माझे दैव येथास्तित नाही. आम्ही उदड करून पाहिले परंतु काल साहे नाही. जानोजीबावा प्राक्तनवान आहेत कीं चाकरी करीतील. मजला पोटास द्यावे, ताट पाठवाल त्याजवरीच राहीन. पांचा पोरगियानसी राहीन. परंतु मजला सरदारी लागत नाही यैसे म्हणतात. त्यास आमचा हेत कीं कोन्हेहि प्रकारें येक करून साहेब चाकरविर पाडावें. रुणानंबंथ आहे तर आज उद्या इतकें याचा किलाफ तुटून कजिया वारल, दोन्ही फौजा येक होतील, कराड्याकडे काही गुंता राहिला नाही. आपाचे कारभारी मात्र शाहणपण करितात, त्यासाठी इतका कारभार वहाडला. त्यासी राजश्री नानाजी क्रुष्णं+ दरमियान व आम्ही यैसे दोघेजन कराडयानी घातलें आहे. राजश्री पिराजी नाईक या प्रकारात आहेत, फडशा होईल. याणी निश्चये केला आहे कीं लाडाचे करंजिया-जवल उज्याडी आहे तेथे जाऊन मुकाम करावा. आठ च्यार रोज राहून भावाचा कजिया दूर करून मुळीकी जमीदार व कृष्णाजी गोविंद सुभेदार वराड, यासी आणून वराडचा बंदोबस्त करून, तोंपावेतो सरकारची पत्रेहि येतात. पत्रे आली म्हणजे त्याजसारखी तजवीज करावी. मुधोजीबावानी तमाम वराड लोका(त) वाटून टाकले. मोकासे दिल्हे आहेत. आनेगोदीचे राज्य वाटले आहे. त्यासीं त्याचा बंदोबस्त करून जिकडल तिकड येथास्थित करून सुभेदाराच्या जिमेस लावतील. पिराजी नाईक निंबालकर याणी तमाम सिलेदाराचे हवाले दाह लाखा रुपयाचे घेतले आहेत. सुभेदाराकडून त्याची निशा करून देऊन वराडच्या

\+ जोशी.

1984

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

फौजा कराडियाच्या निसबतीच्या आहेत त्याचाहि राडा आहे. त्याची समजाविस करून मग स्वामींचे पायापासी यावे हा मजकूर आहे. तर साहेबी जे आज्ञा करणे ते करावी, त्याजसारखी वर्तणूक करतील. येदा हे दौलत राहावी यैसे नवते परंतु साहेबाच्या कृपेने राहिली नाही, तर कारभारी या(नी) दौलत बुडविली होती. उभयेतां कारभारी यांसी येखादे ठिकानी ठेवावे हे निश्चये आहे. पुढे वर्तमान जे होईल तें सेवेसी विनंती करीन. दुसरे स्वामीकड पत्रे बातमीची विनंती लिहितो त्यासी स्वारी तर गंगथडीस आहे, आणि जासूद जाबाची आज्ञा घेऊन जलद येत नाहीत त्याजवरून परम खेद होतो. तर जाबाची आज्ञा करणार माहाराज समर्थ आहेत. आणि सेवकाचेहि समाधान आहे. राजश्री जानोजीबावास व कराडियासी व नानाजी कृष्ण यासी समाधानाची पत्रे पाठवावी. अलीकडे पत्रेच येत * * * * * * * वरून बहुतच श्रमी आहेत * * * * * पूर्वक पत्रे पाठवावी. याचा प्रकार तर सारा जीव स्वामींचे पायावर आहे. मोगलावर चाकरी करून दाखवावी आणि आपले उर्जीत करून घ्यावें. कर्जाच्या तजविजींत लागले आहेत. हर प्रकारें लटिकवाद आला आहे तो दूर करावा. कराडे म्हणतात कीं कारभारी यानी मजला कालिमा लावली आहे. ते रुपये दिल्हे म्हणजे दूर जाली. या शोच्यात फार आहेत. साहेबाचे पुण्य आहे तर सर्व होईल. माहाराजाचे सेवेसी श्रुत होये; छ १० जमादिलावल, हे विज्ञाप्ती.

¶*An important letter by Vyankatrao Moreshwar describing the quarrels of Janoji and Mudhoji Bhonsle and efforts made by the writer to compose them. Mudhoji, the writer adds, is pacified and Janoji is starting for Poona as soon as the preliminaries are settled.*

No. 107] [*January 1760 ?*

श्री

पुरवणी

विशेष. स्वामीनी चिरंजीवास आज्ञापत्र व मजला सादर केले. काल पावली. त्यात आज्ञा की देवाजीपंत व बालाजीपंत नागपुरी सरकारचे पैकियाची निर्गत व्हावी म्हणून राहिले आहेत. उदयेपुरी आले न आले हे लिहिणे व मारनिलेसी काये केले हे बारीक मोठे लिहिणे येसी आज्ञा. त्यासी याणी उदयेपुरीबावाची वाट पाहिली नाही व जैनाथपुरी बावा महंताचे शिष्ये व त्रिकमसेट व नरहर बलाल सुभेदार त्रिवर्गापासून सरकारचा येवज याप्रा खराखुरा प्रकार करून ठेविला आहे. गुंता नाही. परंतु दर्म्यान सेनासाहेबसुभा व मुधोजी भोसले

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

यासी येक जागा त्रिंबकजी राजे व वेंकटराव नाना करंडे याणी करून कारभार मुधोजीबावानी करावा याप्रा त्रिवर्गानी हट धरून करंडियासीहि चढी लाविले आहे. स्वामीची सरकारची मर्जी सैन्यात कोणासहि कलत नाही. या उभयेतास येथे ठेविले हे फार उतम येसे करंडे व राजे व नाना व वेंकटराव मानितात. या उभयेताचे समजीचा हा प्रकार नाही. सरकारची आज्ञा मानावी, पैका सरकारचा मर्जीनरुप आपले शक्तीनसार करावा, हेच समज याची आहे. खरी आहे. सरकारचे मर्जी कसी रक्षावी हे दौलत कसी चालेल यांचे मनन उभयेतास आहे. वरकठ कोणी या दौलतेस समजत नाही. कदांचित स्वामीपासी सैन्यात सेना-साहेबसुभा आले तर सर्व मंडलीची समज स्वामीचे ध्यानात येईल. सांप्रत सैन्यातून चिरंजीवाने लिहिले आहे की भेटी जाल्या. राज्यानी व करंडे याणी आग्रहाने कारभाराची वस्त्रे देविली परंतु जानोजीबावा बोलले की श्रीमंत सांगतील ते करावे येसे पष्ट बोलून वस्त्रे दिली. शाहजी भोसले व त्रिंबकजी राजे व नाना करंडे याणी कारभार करावा. खासा जानोजीबावा व पिराजी नाईक यांचेच वर्म मात्र येक आहे. उभयेताचा खुलासा व येथे दिवाकर पुरुषोतम व बालाजी केशव हे उभयेता आहेत येसा चौघाचा मनसबा येक आहे. मतलबी वस्त्रे दिली व तह जाला काकी जर आड धरीतात तर करंडे पाचसात हजार व मुधोजीबावा हजार येकून मागती सभोवत गडबड करितात. बरेवजेने वेल गाठून आपनास जवल करावे हे सारी मसलत आहे. जानोजीबावा परीछिन कबूल चितापासून नाहीत. पुर्ता शोध करून विनंती लिहिली आहे. त्यात आग्रहे नाना करंडे व त्रिंबकजी राजे की उभयेता

¶*The news-writer informs the Peshwa how there had been formed tu clear cut parties in Nagpur Darbar, one led by Janoji and the other Mudhoji, and how differences had arisen between them with regard to the actual power in the administration. The writer further discusses the views entertained by them in favour of the Peshwa being paid back his dues. The letter is incomplete.*

No. 108] *[3-1-1760*

छ ३ जमादिलाखर

सोमवार

श्री

आज्ञाधारक दिवाकर पुरुषोतम व बालाजी केशव कृतानेक विज्ञापना. येथील क्षेम ता। पौश वद्य प्रतिपदा गुरूवार स्वामीचे कृपावलोकने सेवकाचे वर्तमान

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येथास्तित असे. यानंतर येथील वर्तमान आज्ञेप्रमाने तपसीलवार वरचेवर पत्रे सेवेत रवाना केली. सांप्रत अलीकडे श्रीमंत मुधोजीबाबाच्या व श्रीमंत येजमानाच्या भेटी राजे व करंडे यानी करविल्या. सिधांत केला कीं कारभार आपानी करावा. आम्हा उभयेतांस गडावर घालावें, तेव्हां आपास तेज येईल. या आक्षेपावर राजे व वेंकटराव मिळून करंडे याजकरवी जीर्दे[1] धरविली. पिराजी नाईक निंबालकर यानी उतर केले कीं राजे तुम्हास दरबारास जाने लागेल. श्रीमंत भाऊसाहेबांचे तरफेने दिवाकरपंत व अलीकडे बालाजीपंत त्यांचेच आज्ञेने कारभार करीत होते. तशांत उभयेतापासून चूक पडती अगर निमकहरामी होती तरी सांगायास जागा. त्यास चुकला तुम्हीं कीं करंडेयासारखा बेइमान करून ग्रहस्तास फसविले. येजमानाचे जिवावर गुजरली. सेवट येक पुत्र करंडियाचा मोहनसिंग मेला. क्रिया लागली. तुम्हासहि भोगने लागेल. यैसें असतां उभयेता गडावर घालावे तेव्हा चिताचें समाधान तुमचें होते. त्यास श्रीमंत भाऊसाहेबाची फौज जवल; येवनाचा सल्लख जाला. आता बेजरब यैवजाकरिता चालून येतील, गळां पडतील, त्याची ज्यान हाते तो गडावर घालितां हें कसें होईल? तेव्हां राज्यानी उतर केलें कीं, तेच आना म्हनतील तेव्हां बोलाऊ; परंतु आता तों करंडेयासी मी सेब्द हारलो, मग कांहीं आसो. श्रीमंत येजमान यांचे चितातील प्रकार कीं जरी इमानात खोट जाली तर हो, परंतु राज्यास नीट सांगावे. त्यास फौज दाहा हजार, तिची गुंज आलाहिदी. रोज वेंकटराव जाऊन तेथे नाना करंडे व हे मिळून पथक्याचे घरोघर जातात कीं पडीत घोडी व तलबा[2] बेजरब घेने तर दोन रोज आळा न तोडावा. कारभारी कैद करवितों म्हनजे सावकार मामलेदार श्रीमंत आपासी रूजू होतील तेव्हां तुमचा निर्गम तलबेचा वगैरे होईल. जर श्रीमंत येजमान आयेकत नाहीत तर मागती डहोला कजिया पाडावा, हे साफ नागवे होऊन बोलतात. करंडे यानी सोमवारी येजमानापासून कागद नागपूरचे सुभेदारास घेतले कीं, उभयेता येक देवगडी व येक आंबागडी ठेवनें. प्रतापगड भामेर हे करंड्याचे, याकरितां येजमानानें हे कबूल केलें. राज्यानी येजमानास सांगितलें कीं किले तुमचेच होते. करंडे(याचे) स्वाधीन न करावें हे मरजी तुमची आयेकिली. येजमानावर परमसंकट राज्यानी घातलें. पिराजी नाईक व येजमान याकरिता मोठा अनर्थ करितील. उपाये सवड मात्र

---

१ निकड, हट्ट.   २ तनखा, रोजमुरा.

1987

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

चालावी हे निशा आहे. राज्याचा व वेंकटरायेजीचा मनसबा व तिसरे नाना करंडे कीं कारभारी श्रीमंतानी बोलाविले तरी नक्षे राहतो कीं जो कारभार करील तो रोज तुम्हास भिऊन करील कीं देवाजीपंतासारखा गडावर राज्यानी घातला यात दबाव तुमचा राहील हे वर्तमान आहे. अगदी गोडी जाली आहे. यास स्वामीनी पिराजी नाईक व येजमानास ल्याहावें कीं वकीलानें हे लिहिले याचा अर्थ काये? करंडे व नाना करंडे व राजे यास परिछिन निक्षून ल्याहावें; वेंकटरावजीस जे आज्ञा कर्नें ते करावी. येन्दाचा वसूल अगर रीत स्वामीस न कलावी, याअर्थी आक्षेप मात्र याचा; कुल फौज करंडे याकडील व येजमानाकडील पथके येक येक सेवकाचें इस्टत्वांत आहेत. राजे आनी करंडे याची हुजरात व आपा त्यास मसलत येक प्रकारची आणून पाळीन हा प्रकार घडवितात. जर कदाचित श्रीमंतानी आपले हस्ती ठेऊन गडावर घातले तरी स्वामीचे कामातून गेलो, आब जाईल. राजे आनीक मसलतेवर नाहीत; आब मात्र जावी, मग श्रीमंत जिती घेतील तरी घेवोत; निमकहराम आपन जाले आनि गडावर आम्हास घालावें हे अपूर्व रीत मांडली आहे. येजमानाचा गाह पाच हजार फौजेचा जो आहे तोच आहे. फौज त्याची बुडवली, यांवर वराडचे वळन मागती जथ राज्यानी रानोजी भोसले पाठऊन व वेंकटराव जाऊन धरविली आहे या दबावावर येजमानास कायेल करितात कीं येकदा जाली, वारंवार तुमचीच होईलसे नाही. तशांत जुंजावर हे येनार नाहीत व रसद बंद करून धूम करितील, हे आयेकता तर लडा मोडतो. त्यास स्वामीची फौज; इकडे शह दिला म्हणजे भेटीस येऊन विनंती करितील की येवनास पत्रें दाखविली येसे नाना प्रकार बोलून आपला निभाव करतील. हे मसलत राजे व वेंकटराव नाना घाटितात. दहशतहि मानितात कीं श्रीमंत येवज फार मागतील. वीस लक्षाची तोड सरदेशमुखीसुधा याचा उपाये उभयेता गडावर घालावे. सावकार कुल येऊन भेटतील. ते नागपुरी आहेत तवर सावकार येनार नाहीत हे वर्तमान आहे. येक येजमानाचा प्रान आम्हाकरिता व पिराजी नाईकाचा व्याकूल आहे. वरकड सरदार त्यास ममता परंतु पेच आनून घातला आनी पुढील भये आंदेशा कुल टाकिला आहे. श्रीमंत काये करितील हे भयेहि नाही; याचा विचार जो कर्नें असेल तो केला पाहिजे. स्वामीचे पायाची भेट जालियावर खरेखोटे सर्व आनि रीत अर्थहि उमजेल. फार काये ल्याहावे. * तैसी याची तजवीज करावी; जर उपेक्षा जाली तर मरावें लागेल. कदाचित वाचलों तर पाये पाहावे हे राहनार नाहीं. मातबर लोक राज्यास म्हनतात कीं राज्यांत हे रीत जाली नाही कीं अपराधासिवाये येसे करावें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वेंकटराव पिलाजी गाईकवाडाचा व कवडे जाधव परशरामपंताच्या काहान्या सांगतात. येजमान आपले पाये पाहतील तेव्हा तेच विनंती हे सर्व करितील. येजमानांचे दवलतेचा बंदोबस्त न घडावा हे चितांत आनून मातबर मानसास बेईमान करून जरब धरली आहे. येजमानाची ममता तोडावी याकरिता महंत जीत असता फार साधने केली; सेवट चांद्याहून उठता श्रीमंत आपास आनविले. इतकी सवड पाहून राज्यावर बदमामलीचा पेच करंडा उभा करून धरविला; आता करंडे येजमानापासी रडतात कीं मी निमकहराम जालो परंतु आपाचे कामास तेज, विना उभयेता कैदीत ठेवल्यावांचून येनें नाही हें वर्तनूक आहे. जर फौजेत असतों तर विनंती न करितों. येजमान व नाईक यानी करंडे समजोन यावे आनी गोसावी उदेपुरीस घेऊन यावे या अर्थी नागपुरी ठेविलें. स्वामीकडे पत्रें लिहिलीं, सेवट युध्ये जालेंच, येशहि पावले. आतां हाहि प्रकार घाटितात. येजमानानें कागद दिले, राज्यानी घेतले, पुढें आपला सेह भारी पडला आहे याची तोड पाहतात. सांप्रत हेच कीं उभयेतां कैद, पुढें दुसरी सुचेल ते करितील. आम्ही तो * * आपले सेवेत येथे होतों. श्रीहरि जानत असेल. याचा बदला आपन समीप असतां यैसा न घडावा तो घडतो. जर येथून स्वामीकडे यावें तर पलोन गेले म्हनतील बदनक्षी. न आलों तर गडावर घातलें हें बदनक्षी. मग आपन करनारास मारतील नि * आहे परंतु * * उभयेतास घेऊन येने यैसी रागेजोन पत्रें लिहितां आनी येजमानास किहीमत नवल काये विज्ञातील.

¶*Rightly suspecting that Diwakar Purshottam and Balaji Keshao were preventing an understanding between the two Bhonsle brothers Raghuji Karande and other mediators insisted on getting them confined. The two Karbharis in this letter request the Peshwa to bring pressure to bear on the Bhonsles to secure their liberty. The whole long letter is in Diwakar Purshottam's hand. This person is proverbially known as one of the three and a half wise men of the Maratha Raj.*

[*6-1-1760*

No. 109]

पौ छ १६ जमादिलावल
सितैन पौष्य बुधवार+

श्री

सेवेसी आज्ञाधारक निलो गोपाल सां नमस्कार विज्ञापना ऐसीजे. येथील वर्तमान सेनासाहेबसुभे व सेना धुरंधर यांचा स्नेह जाला. करार ठहरला कीं मुधोजी भोसले याणी

+ जंत्रींत वरील तारखेस रविवार आहे, बुधवार नाहीं.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कारभार करावा. मध्यस्त रघुजी करांडे व त्रिंबकजी राजे व शाहाजी राजे मुधोजी बावाकडील व पिराजी नाईक निंबालकर याणी उभयेतास वर्तवावे. मुधोजी भोसले यांजकडील मुदे आहेत कीं श्रीमंतास आमचा जाबसाल व कर्ज खासगी व चंद्रपुर संवस्थान घरखर्चास द्यावे. याचा जाबसाल रा जानोजीबावानी केला कीं श्रीमंता-कडे जाऊन सेवा करू, पुढे ते आज्ञा करतील ते वर्तनूक करावी. कर्ज सर्व तुमचे व आमचे येक करून वारावे, व खर्चासही द्यावे. रा जानोजीबावानी म्हटले कीं श्रीमंताची पत्र आली कीं निराले राहून उभयेता सत्वर यावें. त्यासी हा तह येथ न करावा. करांडे व राजे व नानाजी कृस्न व वेंकटराव मोरेस्वर यांचा आग्रये[1] कीं येक होणे. श्रीमंताचा जो जाबसाल पडेल तो करून. उतरहि केली कीं त्यांची रीत असीच आहे. त्यांसी हेंच पाहिजे कीं यांचा कजिया अस-ल्याने उतम आहे. यैसे जानोजीबावा व पिराजी नाईक व शामजी फुलोजी याणी ध्याणास आणिले कीं मुलूक खराब होतो व मोगलाचीहि बातमी आली कीं मोगल जलद येतो व सेवेसी अंतर पडते ऐसे समजून सर्व मुदे कबूल केले. परंतु आद्यापहि नित्य येक नवा मुदा आणितात. मागील पुढील लूटची उंट तट सोडा याचे कजियात आहेत. व प्रस्तूत लोकाचाहि गवगवा आहे. याचीहि तर्तुतीत आहेत. आता रघुजी करांडे याणी मुदा घातला आहे कीं आम्हास घरी राह्याचा निरोप देणे कीं आता मी येत नाहीं हे म्हणता (अपूर्ण)

¶*An incomplete letter from Nilo Gopal to the Peshwa, communicating the terms of agreement which was being discussed between the two brothers Janoji and Mudhoji Bhonsle.*

No. 110] *[8-1-1760*

छ १० जमादिलाखर

श्री

शेवेसी पोष्य भगवंत विष्णु साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता पौष वद्य ६ मुा नागपुर जाणून साहेबाकडे वर्तमान सैन्यातील चिरंजीव निलोबानें लिहिलेच आहे. येथील वर्तमान हालींचा प्रकार इकडील सेनासाहेबसुबा यांच्या व मुधोजीबावाच्या व करांडियाच्या भेटी जाल्या. तह जाला की दिवाकरपंत व बालाजीपंत दोघे, येक देवगडावर, व येक आंबगडावर घालावे. याप्रा मध्यस्ती त्रिंबकजी राजे व वेंकटराव करितात. याविसी राजे याचा आग्रह फार की हे

---

[1] आग्रह.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दोंवे गडावर घातल्याखेरीज कारभार मुधोजीबावाचे लगामी लागणार नाहीं. कोणी सावकार मामलेदार बोलनार नाहीत. कां की या उभयेताच्या दौलतीत लगाम याप्राच आहे म्हणून आग्रह जाला आहे; परंतु हे कर्म न करावे येसी मर्जी पिराजी नाईक निंबालकर यांची व येजमानाची आहे. स्वामीचे येणे जवल जाले आहे याजकरिता न जाणो पुढे कसे होईल म्हणून फारच राजे या कर्मावर प्रवर्तले आहेत. या उभयेताचे आबरूस धका न जाला तर सरकार उपयोगी उभयेता चांगले आहेत. फार तोडजोड करावयाची माणसे आहेत. मी फार पाहिले परंतु या उभयेताप्रा कारिस्तानी कोंठे पाहण्यात न आली. येक रूाचा यैवज नाही. दोन वर्षे दौलत चालविली. या उभयेताच रूप कारिगरीचे फारच पाहिले. या दौलतीत तो, आजपावेतो तोडजोड केलीच पुढे करतील हे निशा माझी आहे. यांप्रा दुसरा कोणी येथें दिसत नाही. हे नसलियासी येथील सरदारीचा लगाम स्वामीचे आज्ञेत कसा राहील न कले. कदांचित स्वामीपासी सैनासह वर्तमान सेनासाहेबसुभा येत तोपरियंत उभयेतास बरे वाईट जाले तर फार वाईट. करंडियासी व मुधोजीबावास व राज्यास ताकिदपत्रे आलिया उतम आहेत. दिसले व पाहिले व कार्यउपयोगी शेवेसी लिहिले आहे हे विज्ञाप्ति.

¶*Bhagvant Vishnu requests the Peshwa to intercede for Divakarpant and Balajipant whom the Bhonsles had determined to imprison. Both of them, the writer says, are, on account of their skill in diplomacy, the props of the administration of the Bhonsles.*

[9-1-1760

No. 111]

पौ छ २९ जालोवल
माघ सितैन

श्रीरघुवीर

राजश्री सदाशिवपंत
गोसांवी यासी

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो मुधोजी भोंसले सेनाधुरंधर दंडवत विनंती. उपरी : येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत आसिलें पाहिजे विशेष. गोसांवियानी पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनाभिप्राय अवगत जाला. उभयेपक्षी कलह न व्हावा. येथील लक्षानरूप परस्परें समजोन दोन्ही फौजा तयार होऊन यावें म्हणोन लिहिलें. येशियासी

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

गोसावियांचे मर्जीप्रमाणे वर्तावे हेच उभयेपक्षींहि अवश्यक. आज्ञेप्रा॥ कलह दूर होऊन येक्यता जाली. अतःपर कोण्हे गोष्टीचा गुंता राहिला नाहीं. फौजा सिधच आहेत. पत्रामागें अविलंबेच येऊन पोहचत असो. विदित व्हावे म्हणोन लिहिलें असे. रा॥ छ १९ माहे जमादिलावल. सूज्ञाप्रति विशेष काये लिहिणे? कृपा लोभ असों दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Mudhoji Bhonsle to Sadashivrao Bhau saying that the internal family differences have been settled and that he is soon proceeding with his forces to join the addressee as desired.*

No. 112] [*9-1-1760*

पो॥ छ २९ जालोवल

माघ सितैन

श्रीलक्ष्मीकांत

राजश्री सदाशीवपंत

गोसावी यांस

ऽ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो॥ जानोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे विशेष. गोसावियानीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनाभिप्राये अवगत जाला. उभये पक्षीं कलह न व्हावा; येथील लक्षानरूप परस्परें समजोन दोन्ही फौजा तयार होऊन यावे म्हणोन लिहिलें. यैशियासी गोसांवियाचें मर्जीप्रमाणे वर्तावें हेच उभयेपक्षींहि अवश्यक. आज्ञे-प्रमाणे कलह दूर होऊन यैक्यता जाली. अतःपर कोण्हे गोष्टीचा गुंता राहिला नाहीं. फौजा सिधच आहेत. पत्रामागें आविलंबेच मजल दरमजल येऊन पोंहचत असो. विदित व्हावें म्हणोन लिहिलें असे. रा॥ छ १९ माहे जमादि-लवल. सूज्ञाप्रति विशेष काये लिहिणे, कृपालोभ आसू दिला पाहिजे हे विनंती.

¶*Janoji Bhonsle to Sadashivpant that the breach between himself and his brother has been made up. He is ready to start with his forces and hopes to join the Peshwa's army at an early date.*

No. 113] [*9-1-1760*

छ ८ जमादिलाखर

रविवार

श्री

शेवेसी पोष्य भगवंत विष्णु साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता॥ पोष्य वद्य सप्तमी मु॥ नागपूर वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील राजश्री

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सेनासाहेब सुभा व मुधोजी बावा यांचा कटाक्ष वाढलियाउपरी युधप्रसंग होऊन जय सेनासाहेबसुभा यांचा जाला. त्याचे वर्तमान मी येथून व चिरंजीव निलोबाने सैन्यातून सेवेसी वरचेवर लिहिलेच आहे व तह उभयेताचा जाला. करंडे व मुधोजीबावा यांची व सेनासाहेबसुभा याची भेट होऊन दारमदार जाला. पेशजीचे पत्र पाठविले आहे त्याजवरून श्रुत होयेईल. सांप्रत्य सैन्यांत प्रकार ऐसा जाला आहे. या कारभाराचे मुख्य अभिमानी राजे व नाना करंडे व वेंकटराव मोरेश्वर त्रिवर्ग आहेत. मुधोजी बावानी कारभार करावा हा आग्रह त्रिवर्गाचा यामुळें दिवाकर-पंतास व बाळाजीपंतास उभयेता गडावर घालावे हा प्रकार शेवसी पेशजी पत्री लिहिला आहे. तदनंतर प्रकार ऐसा जाला कीं मोरो रघुनाथ दिा मुधोजी भोसले याणीं करंडियासी व त्रिवर्गास सांगितले कीं दोघा जनांस गडावर घालावे हा प्रकार केलियानें तुमच्यानें तरी कारभार होतो की काय ? वीस लाख रुपये श्रीमंताचे देणे व फौजेची समजाविशी ऐसे भारूड कोण विले त्यांखेरीज लावितो. मजला तो दिसत नाहीं. तुम्ही जाणा, ऐसे भाशण केले. कां कीं एक वर्ष उभयतांची तोडमोड सावकारासीं गव (?) व मामलेदारासी प्रमाणीकपण त्याणी कसें चालविलें व दौलत कसी वोढगस्तीची चालविली हे आपण पाहेली आहे याजकरितां मी बोलतो. पोर-पणाचे कारभार दिसतात. काहीच तुमच्यानें होणे नाहीं. त्यावर मुधोजीबावानीं मोरोपंतास पुसिलें की काय अवघड आहे ? त्यावर मोरोपंतानी जाबसाल केली की श्रमिंत राजश्री भाऊसाहेब जवळ आले; त्यांचा पैका कमकसर वीस लाख रुपये देणे व मुधोजीबावा तुम्ही दोन वर्षे श्रीमंताकडे चाकरीस गेला नाहीं; दरसाल पंध्रा लाख रुपये प्राा दुसाला द्या ऐसें श्रीमंत म्हणतील. कां की तुम्ही सेनासहेब सुभ्याचे कारभारी जालां याजकरितां व साल हाली पांच हजार फौज व तुम्ही चाकरीस चला ऐसे तुम्हास म्हणतील, तेव्हां तुम्ही यास तोड लावाल ते कळतच आहे. इतका प्रसंग पुढें कठीण आहे, याजकरितां उभयेतास आणून सर्व एक होऊन जे करणे ते करावे; नाहीतर सेनासाहेब सुभ्याची दौलत मात्र दवडाल, आपेश घ्याल, तुमच्यानें काहींच होणे नाहीं, ऐसे फारच मुधोजीबावासीं व मोरो-पंतासी व त्रिवर्गसी भाषन जाले. याचे बोलण्याचा अर्थ भिन्न करून मोरोपंतच नसावे याप्रा करंडियास नानानी व त्रिंबकजी राजे व वेंकटराव याणीं बहाकाऊन मोरोपंतानी लस्करांतून जावें ऐसे केले. प्रस्तुत हाच लढा पडला आहे. इतके जाले आहे. यात मुख्य जानोजी बावा व पिराजी नाईक यांचे मनोगत वेगळे आहे. स्वामीचे कार्यउपयोगी जे कर्म असल तेच करावे ऐसी समज खासा व पिराजी नाईक

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

दोघांची आहे त्याप्रोंच करतील ऐसे दिसतें. पत्रे लिहिली आहेत त्याजवरून शेवेसी लिहिले आहे. वरचेवर चिरंजीव निळोबाची पत्रे शेवेत येतच असतील. इकडे येतात त्याप्रो लिहितो. माजे राहणे उभयेतां काय काय करितात याच वर्तमानावर राहिलो आहे. मुख्याची व उभयताची एकवाक्यता आहे याज-करितां येथें राहिलो आहे. सेवेसी श्रुत होईल हे विज्ञाप्ति.

¶*Letter describing the differences between Janoji and Mudhoji Bhonsle.*

No. 114] [*10-1-1760*

पौ छ २९ जालोवल

सितैन माघ

श्रीशंकर

सेवेसी विनंती. आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक साा नमस्कार विनती प्रार्थना यैसीजे. येथील क्षम ताा छ २० माहे जमादिलावल मुकाम नजीक कारंजे लाडाचे माहाराजाचे कृपावलोकनेकरून यथास्तित आसे विशष. स्वामीनी सांडनीस्वाराबाार पत्रे पाठविली. राजश्री जानोजीबावा व राजश्री मुधोजीबावा व राजे व कराड व नानाजी कृष्ण व सेवकास पत्रे होती तेथे आज्ञा की, मुधोजी भोसले याणी गुदस्ता मोगळासी मिळून राजकारणे करीत होते, ते गोष्टी निराली. सांप्रत्य मुधोजी भोसल्यासी कजियाच करावा, नाना प्रकारच्या फिसादी कराव्या ही गोष्ट जानोजीबावा वाईट करितात. मुलूक उभयेतांस वाटून दिल्हा आहे, त्याजप्रो त्याचा त्याणी त्याचा त्याणी खावा, वराऊ लटके कजिये काहाडून मुलूक बुडवावा, हे उतम नाही; म्हणून आज्ञा. त्यासी गतवर्शीचा प्रकार तर स्वामीस कललाच आहे. वरचेवर विनंती करितच गेलो. साप्रत्य आलीकड विनंती वरचेवर जें जाले वर्तमान ते विनती लिहीतच गेलो. त्यासी देवाजीपंत, बालाजीपंतानी नाना प्रकारचे कारभार जसे चितास आले, तसे केले. काही कोन्हाचे यैकिलेच नाही. उभयेतांमध्ये सर्वगुणसंपन्न; येखादाहि गुण उणा नाही. जानोजीबावाचा प्राा जरकरिता म्हणावे तर काही उमजच नवता. जे देवाजी वगैरे याणी सांगावे तेच खरे. दुसरियाणी खरे सांगितले ते लटके भासावे. त्याणी लटकेहि सांगितले तर खरेच भासावे याप्राा कारभार. आपण कर्म करून सेवटी निराले निघून बसले. जेव्हा बितली तेव्हा धण्याच्याच जिवावर बेतली. धणी जेव्हा नागपूर सोडून येक मज(ला) आलीकडे आले, तेव्हा काहीसा उमज पडला; यैसे आहे. केले त्याणी भोगणे धण्यास प्राप्त जाले की, समूलं च विनशाति. कोन्ही ब्यास राहत नवता

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तेव्हा नाना प्रकारे छद करून सलूख केला. याचा तपसील विनंती साध्यंत पहिलेच केली आहे. त्याजवरून विदित होईल. यैसे न करता गत्यच नाही. निमित्य की, मोगलाचा व सरकारचा कजिया वाहडला समयास चाकरीस तर पोहचले पाहिजे. याजसाठी कान्हेहि प्रकारे दारमदार करून कजिया तोडला. धण्यापासी आलियाउपरी स्वामी जे आज्ञा करतील त्याजप्रो उभयेताहि वर्ततील. मुख्य जानोजीबावाचे लक्ष स्वामीच्या पायापासी पूर्ण आहे. दुसरा प्राा तिलतुल्य नाही. येथे इतके दिवस तर कजिया लागला होता. आता च्यार दिवस जाले फडशा जाला. त्यासी आता लोकाच्या समजाविशी व कृष्णाजी गोविंद याची समजावीश करून निघणार. त्यासी दोन च्यार रोज लागतील; म्हणजे मग काही गुता तिलतुल्य नाही. कूच दरकूच स्वामीच्या चरणापासी येऊन पोहचतील. गुता तिलतुल्य नाही. सारी फौज जमा करून घेऊन येतो. कजियामुले बखेडा फार जाला. मुलूक बुडाला रुपया व्यावयासी जागा नाही. यैसे चहूकडून पेच, सरदार केवलच तुटपुंजी जाली आहे. यासी येक आसरा स्वामीचे पायाचा; दुसरा आसरा तिलतुल्य नाही. उभयेतां जलदीने घेऊन येतो. माहाराजाचे सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar informs the Peshwa that in spite of the division of the property and office between the Bhonsle brothers, the differences between them are widening. "But," he further writes, "as hostilities are declared with the Nizam, Janoji is proceeding with the forces to help the Peshwa."*

No: 115] [*11-1-1760*

पौ छ २९ जालौवल
माव सितैन

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री राऊसाहेब स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक व्यंकटराव मोरेश्वर कृतानेक सा नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ २१ माहे जोल मुकाम लस्कर स्वामीचे कृपेकरून येथास्तित आसे विशष. आपण कृपा करून पत्र पाठविले ते उतमसमई पावोन परम समाधान जाले. पत्री आज्ञा, फडनिसीचे रुपयाविशी आम्ही तुम्हास दाहपांचदा लिहिले आणि श्रीमंतांचीहि पत्रेहि पाठविली. परंतु तुमच्याने रुपया न पाठविला. आम्ही फार भरवसा मानला होता. परंतु तुमच्यानें हे काम जाले नाही, म्हणून

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

फार रागास येऊन लिहिले. तर, आम्ही आज्ञाधारक. सेवा करावी. त्यासी, चाकरीस चुकू आथवा न चुकू स्वामीचे चित साक्ष देत आसल. मजवर शब्द लावावा यैसे नाही. येथील कारभारी मातबर माणूस प्रमाणिक त्याची कीर्ति आपण यैकिलीच आसल. रुणानबंधेकरून स्वामीचे पायाची भेटीहि लवकरच होईल. भेटीआंती साकल्य निवेदन केले जाईल. आम्ही पदरचे आसो. फडनिशीबा रुपयेहि लवकरीच याजपासून वेऊन समागमेच येतो. दुसरे, रा त्रिंबक हरि वर्तक याजबा रुपये काहीसे वसूल करून नागपुरात जमे केले आहेत ते कोन्हास देवणे आसतील ते देवावे. त्या रुपयासी बहुत मेहनत लागले. आम्ही सेवक पदरचे आसो. रागास न यावे. आम्ही धाकटे आहेत. कृपा करीत जावी. दरबारात भरवसा आणि आसरा स्वामीचे पायांचाच मानितो. तर आमचा आभिमान वडिलास आसावा. आणि आम्हास कोण आहे? फार ल्याहावे तर धाकटे आहेत, आपण वडील आहेत. भेटीहि थोडक्याच दिवसी होईल. बहुत काये लिहिणे, लोभ आसो दिल्हा पाहिजे, हे विज्ञाति.

¶*Vyankatrao Moreshwar explains to the Peshwa why he could not send money as ordered by him.*

No. 110 [*11-1-1760*

पौ छ २९ जालोवल

माघ सितैन

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब

साहेबांचे शेवेसी

आज्ञाधारक रघोजी करंडे पागा दिमत राजश्री सेनासाहेबसुभा दंडवत. कृतानेक विज्ञापना. येथील कुशल छ २१ माहे जमादिलोवल येथास्थित असे विशेष. सांडणीस्वाराबा (काल) जाावलचे आज्ञापत्र पाा तेथे आज्ञा की उभयता बंधुचा कलह वाढला आहे तो तोडून * फौजा येथील कामांस येऊन सामील व्हावें. याप्रकारेंच श्रीमंत राजश्री नानासाहेबांची पत्रे पाठविली त्यांतहि आज्ञा. त्यास उभयेतांचे लक्ष येक मर्जीवर होऊन कलह

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तुटला; सामील व्हावेंयाचे विचारे दोन च्यार रोजात लोकांचा वगैरे बंदोबस्त करून येतात. उभयेतांच्या पत्रावरून निवेदन होईल. शेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Raghoji Karande informs Bhausaheb that the differences between the Bhonsle brothers have been made up and that both of them are proceeding to join the addressee.*

No. 117] [पौ *16-1-1760*

पौ छ २६ जमादिलौवल
सितैन पौष्य बुधवार

श्री

शेवेसी पौष्य भगवंत विष्णु साष्टांग नमस्कार विज्ञापना यैसीजे. स्वामीनी अज्ञापत्र सादर केले तेथे अज्ञा कीं, निजामआलीखानास पत्रें भोसलियांचे कारभारी याणी दाखविली व अंतर्यामी येवनासीं सल्लक राखितात यैशा वार्ता हुजर येतात हें खरें आहे किंवा कसें आहे? यैसी आज्ञा आठ महिने येत्ये त्याची उतरें वरचेवर सेवेसी लिहीत गेलों. मी ज्या दिवसापासून येथें आलों त्या दिवसापासून उभयेता कारभारी यांचें लक्ष काये करितात हेंच राखिलें आहे. हाली उभयेता कारभारी नागपुरी राहिले आहेत. त्यांचेच बातमीवर मी राहिलों आहें. चिरंजीव निळोबास सैन्यात पाठविला आहे. सेवेसी सैन्यातील बातमी वरचेवर सेवेसी येत आसेल. येवनाकडे कागदपत्र दाखविले याचा शोध फार लाविला परंतु उभयेता मनसेबाष[१] फार आहेत. आगापिछा फार पाहातात. विठोजीपंतांस पत्र दाखविली यैसें स्वामीचें पत्रें मजला फार आली, त्याजवरून पूर्वीच शोध केला. परंतु मनसबियाचे पत्र दाखविले नाही. मुधोजीबावाची पत्रें विठोजीपंतास दाखविली व विठोजीपंतानी माारानिलेची आलीं होतीं ते दाखविलीं. त्या पत्राचे आर्थ यांच्या शत्रुत्वेंकरून कोणी सेवेसी लिहिलें आसेल व ह.ळी लिहीत आसतील. परंतु तो आर्थ उभयेतापासीं नाही. मी सेवेसी जे आसेल तेंच लिहीन व शोधांत नेहमी आहें. उभयेतांचा प्रकार, सर्व स्वामीचेच आज्ञेवर व मर्जीवर आहेत. स्वामी कशावरून म्हणतील तर उभयेतांचा प्रकार माझे पाहन्यात आला. मुधोजी भोसले आणिले परंतु कारभारांत न घालावे कीं

---

१ मन्सुबे-बाज—अक्कल लढविणारा; मुत्सद्दी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

स्वामीची मर्जी नाही हा प्रकार. याणी राज्य बुडे तोंवर मोहरा धरला. वरकडांनी मुधोजीबावास कारभारांत आणावे याच आचेरणे करून करंडे मुधोजीबावानी फौज बारा हजार मिलून जानोजीबावासी झुंजले. निदानी पठाणी तऱ्हेने जानोजीबावानी व पिराजी नाईक याणी मोडून फना करून हती तीन नौबता निशानें घेतली. उभयेतांस नागपुरी ठेविले. हें कारण कीं करंडे समजावे म्हणऊन ठेविलें. निदानी झुजच जालें. करंडे आपेश पावले. त्याउपर वेंकटराव मोरेश्वर व त्रिंबकजीराजे उभयेतानी करंडियाची मध्यस्ती करून पौष सुध ३ शनिवारी करंडियाची व जानोजीबावाची भेट जाली. सप्तमीस मुधोजीबावाची भेट होणार. तह यैसा जाला ऐकतों कीं, मुधोजीबावानी कारभार करावा. परंतु आठपंधरा रोजांत तहकीक येथील जालें वर्तमानाची तपसीलवार हकिकत सेवेसी लिहीन. पुर्ते वर्म कळलिया खेरीज आजपावेतों सेवेसी लिहिलें नाही व पुढें लिहिनार नाहीं. करंडियाचा आग्रह व राजे यांचा कीं, उभयेता कारभारी याणी कारभारांत नसावें; मुधोजीबावानी कारभार करावा, याप्रकारें फार आहे. वरचेवर सेवेसी लिहीत गेलों. मुख्य जानोजीबावा व पिराजी नाईक याचें हद्दत पुर्ते ध्यानास येईल त्याप्रा सेवेसी लिहीन. येवनाचा स्वामीचा बिगाड जाला तर जानोजीबावा निखालस येवनासीं झुंजतात. आपली खामी[1] कबूल करितात. दुसरा आर्थ नाहीं. मी फार शोधांत आहें. उभयेता बंधूचा प्रकार सर्व सेवेसी चिरंजीव निलोबाने लिावरून श्रुत होईल. येथे उभयेता कारभारियापासी या प्रकारे तहाचें लिहिलें येतात त्यावरून लिा आहे हे विज्ञापि.

¶*Bhagvant Vishnu writes that he tried much to know what really passed between the Nizam and the Bhonsle but that he could not get any clue. Further on he describes a skirmish between Janoji and Mudhoji in which the latter was defeated. Both Janoji and Mudhoji, however, agreed that the two Diwans should be removed and that Mudhoji should look to the administration.*

No. 118] [*24-1-1760*

पौ छ १० जमादिलाखर मंगलवार

श्री

श्रीमंत राजश्री भाऊसाहेब स्वामीचे सेवेसीं

विनंती. सेवक विसाजी बलाळ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ९ जाखरपरयंत मुकाम पेणगंगा येथे स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान

---

१ नुकसानी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

यथास्थित असे विशष. स्वामीचे आज्ञेप्रमाणे राजश्री जानोजीं भोसले सेनासाहेब-सुभा व राजश्री मुधोजी भोसले उभयतास फौजसुधा छ ४ जाखरी वासिमा अलीकडे दाहा कोस पेणगंगेवर घेऊन आलो. येथे यांचे लढे फौजेचे व कितेक कामाकाजाचे आहेत. याजकरिता येकदोन मुकाम होतील. तदोतर मजल-दरमजल सेवेसीं येतील. फौज सात आठ हजार उभयतां मिळोन आहे. बाबती व सरदेसमुखीचा अमल स्वामीचे तर्फेचा निराळा हावा हा मनोदय याचा नाही. वराड प्रांत आमचे वतनी आहे येसे म्हणतात. मख्ता सालाबाद आहे त्याप्रमाणे तफरीक[1] करून देऊ. आम्ही म्हणतो की श्रीमताची आज्ञा आहे जे कचा अमल घ्यावा. हे गोष्ट हे मानीत नाही. राजश्री त्रिंबकजी राजे येविशईचे भाषण बहुत करीतात जे दरबारी जाबसाल करू. यास्तव आम्ही फौज ठेऊन कचा अमल घेतो. स्वामीजवळ भोसले आल्यानंतर बहुत रदबदल करून मख्ताच करार करून घ्यावा, दुसरा अमल होऊ न द्यावा ऐसा याचा आशय आहे. कचा अमल झाल्यास सरकार किफायेत आहे व याणी बाबती सरदसमुखीचा आमलचा वलवटा मोडून मोकासियाखाले वोढतात तो निराळा होईल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Visaji Ballal writes to Bhausaheb (?) that he is accompanying the Bhonsle brothers. The Bhonsles, he reports, are disinclined to recognise the Peshwa's claims in Berar and would prefer giving him a lump sum in exchange.*

No. 119] [*29-1-1760*

पो छ १० जमादिलाखर
मंगलवार

श्रीशंकर

सेवेसी विनंती. आज्ञाधारक व्यंकटराव मोरेश्वर कृतानेक सा। नमस्कार विनंती. प्रार्थना यैसीजे. येथील क्षेम ता।। छ ६ माहे जमादिलाखर मुकाम नजीक नडसी बाम्हणी माहराजाचें कृपांआवलोकनेकरून येथास्थित असे विशेष. येथील वर्तमान तर राजश्री जानोजी भोंसले सेनासाहेबसुभा व राजश्री रघो करड फौजसहवर्तमान मुकाम मजकूरास आले. राजश्री मुधोजी भोंसलें सेनाधुरंधर याचे

---

१ वाटणी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लोकानीं गवगवा फार केला. त्याचे फौजेसाठी मुकाम करून समजाविश आजचें दिवसांत करून व वराडचा आमला फैला समागमें आहे त्याची रवानगी आजच करून उदईक तिकड रवाना करून देतील आणि आपण कूच करून स्वामीकड कूच दरकूच * * * येऊन पोहचतात. मोरो रघुना * * * फिसाद करीतात. याचे चिता * * * जी बावास स्वामीकड न न्यावे य * * * आतस्ते उदगार निघतात वा * * * वध्या चितात कीं कोन्हेहि प्रकारें * * * घेऊन यावें. हे आले तर घेऊन येतात, नाहीतर हे व कराड यैसे चाकरीस येतात यांचा गुता नाही. राजश्री नानाजी कृष्ण स्वामीचे सेवेसी येथास्तित पहिलेपासून आहे, आणी * * * पत्रे आजवर येत होती. आलीकड (खा) * * * येत नाही. तेणेकरून बहुत श्र(मी) (आहेत;) (कृ)पाळू होऊन पत्रें लिहीत जावी, * * * श होईल. यांचा गुता तिलतुल्य * * * कूच दरकूच येऊन पोहचतात. ज़ुजाची खबर याणी यैकीले, त्याजवरून बहुत श्रमी जाले कीं समयास आम्ही नवतो. येथे वरचा कजिया आम्हास पुरवला. आता मी राहत नाही. जे दिवसी त्याचे पाये पाहीन आणी चाकरी करीन तेव्हा ऊर्जितहि तेच करणार आहेत. फौज सांप्रत्य तेरा हजार आहे परंतु माणूस फार चागले आहे. स्वामीचे सेवेसी जलद येऊन पोहचतात. श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar writes about Janoji and Mudhoji proceeding with their forces to help the Peshwa.*

No. 120] [*10-2-1760*

श्रीशंकर

सेवेसी विनंती आज्ञाधारक व्यंकटराव मोरेश्वर कृतानेक सां नमस्कार विनंती प्रार्थना यैसीजे. येथील क्षेम ता। छ २२ माहे जाखर मुकाम लस्कर माहराजाचे कृपावलोकनेकरून येथास्तित असे विशेष. स्वामी कृपा करून रामचंद्र व मनसुक चोबदार याजबाार आज्ञापत्रे पाठविली ती राजश्री जानोजीबावा व राजे वगैरे पत्रे आली ती ज्यांची त्यांस दिल्ही. येथील वर्तमान तर स्वामीची पत्रे आली. त्याजवर मजल दरमजल करून श्रीमंत राजश्री भाऊसाहेब याजपासी छ २० माहे मारी येऊन दाखल जाले. येथे आलिया उपरी मोगलाचा सलुखा संदर्भ लागला आहे, मग पाहावे. याचे दैवच हीन, यासी विलाज नाही कीं चाकरीस येऊन पोहचावे. चाकरी करून दाखवावे आणि सर्फराज व्हावे याप्रा। असता,

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नस्ता अपसगीमध्ये कजिया निर्माण जाला. त्याजमुळे च्यार दिवस जाजती लागले. इकडे कामास अंतर पडले यैसे जाले, परंतु याचे येकनिष्टपणास अंतर नाही. दुसरे जे होणे ते स्वामीचे कृपेकरून होईल. हे सरदारी फारच वोढीत पडली. गुंता नाही. ऊर्जित करणार स्वामी समर्थ. अद्यापि मोगलाचा पुरता सलूक जाला नाही रूणानुबंद आहे. तर केवल सला बिघडला तर हे चाकरी करून दाखवितील. माहाराजाचे सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar to the Peshwa : pleads in excuse of the delay of the Bhonsles in proceeding to join, on account of their internal differences. He also writes that the terms of negotiations with the Nizam have not yet been settled.*

No. 121]

[*15-2-1760 ?*
[*11-3-1757 ?*

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री पंतप्रधान

स्वामीचे सेवेसी

पोष्य नारो कृष्ण जोसी कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २० जमादिलाखरपर्यंत मुाा श्रीजोगाईचे आंबे येथे राजश्री सेनासाहेबसुभा याचे लस्करात येथास्थित असे विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन स्वार जाहालो ते मजल दरमजल वराडात येऊन दाखल जाहालो. राजश्री सेनासाहेबसुभा व राजश्री मुधोजी भोसले याच्या भेटी जाहाल्या. येथील प्राा मनास आणिता मध्यस्ताचे विचारे येकत्र व्हावे यैसा प्रकार दिसोन आला. त्यावर आम्ही स्वामीचे आज्ञेप्राा तेथील भाशणाचा प्राा यास सांगोन तदनरूप यानी व त्यानी स्वतंत्र परस्परे असावे हा निश्चये होऊन ते येकमार्गे श्रीमंत राजश्री भाऊ-साहेब याजकडे गेले. हे मजल दरमजल मुाा मजकुरास आले. उदईक हे श्रीमंताचे शैन्यात दाखल होतील. आम्ही सेवक लोक सरकारचे. मर्जीप्राा यास सांगोन सरकार काम करावे. याजसमागमे फौज बारा हजार आहे. लस्करात रूााची अडचण ते कोठवर ल्याहावी. आज दोन साले तटाई; दरसाल युध्यप्राा परंतु सरकार काम जाणोन निकड करोन समयास आले असेत. वरकड सविस्तर मजकुर मागाहून सेवेसी लिहून पाठवीत आहे. बहुत काये लिहिणे? कृपा लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Naro Krishna Joshi writes to the Peshwa about the squabbles of the Bhonsle brothers. 'The breach has been healed up and one of the brothers will soon join Bhausaheb's army with his contingent.'*

2001

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 122] [*15-3-1760 ?*

पौ छ २६ रजब

श्रीगणपति जयति

श्रीमंत राजश्री भाऊ
स्वामीचे शेवेसी

पो गोविंद हरि कृतानेक नमस्कार विनंती. उपरी: येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन केले पाहिजे विशेष. राजश्री गोविंदराव सिवदेव यांस राजश्री मुधोजी भोसले सेनाधुरंधर यानी बंगालियाचा लटका आरोप ठेऊन चांद्यात कैदेत ठेविले आहेत. व त्याची पागा हती उंठे वस्तभाव सर्व हरण केले आहें, येविसी श्रीमंतानी पत्र आपणास लिा आहे. तर आपण त्या प्रांते जातात. त्यावर सह देऊन राजश्री गोविंदराव याची मुक्तता होये ते केले पाहिजे. मारनिले आपले पदरचे आहेत. त्याचे आगत्य आम्हास आहें. त्याजवर कृपा कराल ती आपल्या उपयोगी पडेल. त्याजकडील कारकून राजश्री गोपाल अनंत आपणाकडे पा आहेत. त्याची मुक्तता होये तोपर्यंत हे तुम्हापासीं राहातील. सेवेसी श्रुत होये. बहुत काये लिहिणे? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Govind Hari requests Bhausaheb who is about to proceed to the North to intercede with Mudhoji Bhonsle and secure the liberty of Govind Sivdeo wrongly kept in confinement by Mudhoji.*

No. 123]

[*19-9-1759 ?*
[*7-10-1760 ?*

श्रीलक्ष्मीकांत

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

आज्ञांकित जयराम गोपाळ कृतानेक सां नमस्कार विज्ञप्ति. येथील कुशल भाद्रपद बहुल त्रयोदसी मुकाम नजीक उंदरी घाटमाथा स्वामीचे कृपावलोकने-करून आनंदरूप असों विशेष. स्वामीचा (निरोप) घेऊन स्वार जालो ते मजल दरमजल सैन्यांत दाखल जालो * * * (पु)णियाच्या मुकामीहून पत्रे स्वामी * * * पत्रे पावताच राजश्री ये * * नागपुरीहून कूच करून वराड प्रांती * * यंदा फौजहि उत्तम प्रकारे जथली आहे. वराड प्रांतीच्या कामाकाजाचा निर्गम जाला. याउपरी मजल दरमजल सेवेसी येतील. आमचें व रा येजमानाचे दर्शन बाळापुरच्या मुकामी होऊन स्वामीच्या आज्ञे-

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

प्रमाणे साद्यंत निवेदन केले. सारांश दर्शविला कीं अतिसत्वर चलावें. त्याजवरून अविलंबे यावे हाच उद्योग आहे. राजश्री येजमानाचे मानस स्वामीसी दृढ निश्चयेकरून आहे. अन्यथा भाव नाहीं. स्वामीचा व येजमानाचा दर्शनाचा योग कोणे स्थळी होईल हे आज्ञा केली पाहिजे. राजश्री येजमानानीहि सेवेसी पत्रे लेखन केली आहेत. कितेक अर्थ राजश्री मैराळ नारायण सेवेसी विनंती करतील, त्याजवरून विदित होईल. विशेष काय लिहिणें? कृपा वृद्धी केली पाहिजे हे विज्ञप्ति.

¶*Jayram Gopal writes to the Peshwa assuring him of the support of the Bhonsles in his enterprise against the Nizam.*

No. 124] [*Autumn 1760 ?*

श्री

राजश्री जानोजी भोसले
शेनासाहेब सुभे गोसावी यासी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो बालाजी बाजीराव प्रधान आर्सीर्वाद विनंती. उपरी: येथिल कुशल जाणौन स्वकीयें कुशल लिहीत असिले पों विशेष. तुम्ही पूर्वी पत्र पाठविले ते पावोन लिहिला मजकुर सर्व अवगत जाहला. त्यास खासा स्वारी विजया दशमीचे मुहुर्ते डेरेदाखल होणार याजकरिता तुम्ही फौज सुधा गंगातीरी पैठणचे सुमारे येऊन सामील होणे. भेटी तेथेच होतील. तदोतर जिकडे श्वारीस जावयाचा (यापुढील पत्राचा भाग गहाळ झाला आहे.)

¶*Balaji Bajirao asks Janoji Bhonsle to join him at Paithan where he would discuss with him plans of the campaign.*

No. 125] [*1-12-1760 ?*

छ २२ रबिलाखर

श्रीशंकर

सेवेसी विनंती आज्ञाधारक व्यंकटराऊ मोरेश्वर कृतानेक सा। नमस्कार विनंती प्रार्थना यैसीजे. येथील क्षेम ता। छ ९ माहे रबिलाखर मुकाम वरधातीर माहाराजाचे कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशेष. स्वामीनी कृपा करून पत्र पाठविले ते उतम समयी पावोन परम समाधान जाले. हे पत्रे आज्ञेप्रो राजश्री जानोजी-बावा व राजे व दिवाकरपंत यासच त्रिवर्गास येकांती घेऊन बसून त्यासी आक्षरशा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वाचून दाखविली त्याजवरून त्यासहि परम हर्श जाला की आम्ही आज्ञाधारक आहेत आम्हास उजूर तिलमात्र नाही. फौज जमा होयासी आणि पहिली पत्रे यावयासी साडनीस्वाराबाार आली की सुला सरकारचा जाला. तुम्ही आपला सुला जसा पाहल तसा करणे त्याजवरून यासी परमहर्श भंग जाला होता. आता आज्ञापत्रावरून परम हर्श जाला तो पत्री कोठवर ल्याहावा ? याचा तपसील साहेबी तपसीलवार लिहून आज्ञा केली तर जे होणे ते माहाराजाच्या पुण्यप्रतापेकरूनच होईल. बाबासाहेबाची येकनिष्ठतेस पार नाहीं. केवल स्वामीच्या चरणासी दुसरा प्रकार जाणत नाहीत. आता हुजरातची फौज तीन च्यार हजार व राजश्री गिरमाजी खंडेराव यांची फौज सात हजार येकूण हे दहा हजार जमा आठवे दाहावे दिवसी होती आणि राजश्री रघोजी कराड वगैरे सरदार हे दाह हजारपावेतो मोगलाजवल जमा आहेत. मोगल तो शहरात जाऊन दाखल जाला. शहराभोवता तमाम मुळूक सरकारचा याचेच परम संकट प्रात जाले आहे कीं तमाम मुळूक मारला जाईल, लुटला जाईल, स्वामी रागास येतील कीं सरकारचा मुलूक लुटला आणि मोगलाने तर शहरचा आसरा करून गावांत गेला आहे. मग पाहावे बाहेर कधी निघल हे न कले. रघोजी कराड वगैरे फौजेने दोन जुजे चागली केली. साप्रत्य कार्ति(क) वद्य ९ नवमीस सोमवारी फारच निकड तमाम तोफखाना पिऊन फौजेत सिरले. गाडदी फारच मारले जुज फार चागले जाले. परभारे माहराजासहि बातमी मोगलाच्या लस्कर विदित जालेच असल. मोगल बाहेर निघू कार्णाकड जाईल तिकड त्याच्या पाठीमागे जावे लागल. वराड खराब बहुत जाले. गावचे गाव मारले. रांडा भ्रष्ट केल्या. यैसे मागे कधीहि जाले नाही. थोरले नवाब आसफज्या होते त्याणी कधी यैसे केलें नाही. याचा इतबार विस्वास तिलतुल्य नाही. महिना पधरा दिवस जाजती लागतील परंतु याचा नेशनाबुद केलीयावाचून बनारच नाही की हा विस्वास देईल. कोणे समयी काये करील हे न कले. सलाबतजगाचे व बसालतजंगाचे या दोघाचे भय तिलतुल्य नाही, याजसाठी(या) आम्हीहि याचे पारपत्य बरेच करीतोत आणि बनेल तर साहेबीहि याणे फारच शोखी केली तर उपराला करावा, परंतु निदानी साप्रत्य तर नाही. परतु सेवटी बुऱ्हानपुरासभोवता मुळूक लुटला जाईल, त्यासी तेथील तालुकदारास आज्ञा करावी कीं मुळूक मारला जाईल, आणि लूटला जाईल, तर तुम्ही तमाम रयेतीस ताकीद करून रयेत थारीयासी येकीकड न्यावी, नाहीतर खराब होईल. मागतीन फिरोन वराडात आला तर बरे जाले, नाहीतर संकट आहे. तसी तर ताकीद फारच आहे परतु लाईलाज जाणून करावे लागते. वराडात कितेक रांडानी जीव आडात पडून दिल्हे; किती कानी गलफास घेतले; कीतीकानी पोट कटारीया करून घेतल्या. दाहा हजार

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

रांड भ्रष्ट केल्या. गाडदी मानीत नाहीत. तमाम गावचे गाव बलेच मारीतात. नवाबाजवल खर्चास नाही. शहरास गेला आहे. तमाम साहुकारा लुटावा आणि सिबंदीस द्याव, मग काये होईल ते सुखरुप हो, याजसाठी बुरानपुरास गेला आहे. तेथे यैवज पाहवे काये मिलवितो. परंतु रुपया नाही. याच्या चितांत आहे कीं पंचवीस लाख रुपये हरतजवीजीनें मिलवावे आणि ईतक्याच सिबंदीने फार मातबर काम करावे यैसी भाशने करितो. तर काये चिंता आहे? आम्ही यासी हार येतो. आमची सरदारी येक्या आगे उणी आहे की द्रव्य नाही. इतका कारभार मात्र कठिण आहे. त्यासी मुख्य श्रीमंताची कृपा जालियाने कर्जापासूनहि मुक्त होतो, नाहीतर सरदारीत ताल राहिला नाही याप्रकारे बोलले. त्यासी यांच्या चितांत कीं आज्ञेप्राो पारपत्य परिछिन करावे, गुता तीलमात्र नाही. जो मत्र जाला आहे तो प्रगट कधीहि होणार नाही. राा विठल सुदर यासी या गोष्टीचा फार आहें कीं नस्ता येखादा कल्प करून त्याहवे तर ह्या गोष्टी कोण्ही सांगतो की लिहितो किंवा जी मध्ये आणि हे राज्यभाराचे प्रसंग होयेत यैसा प्रकार आहे; तर आज्ञेप्राोच वर्तनूक होईल यैसे दिसते. पिराजी नाईक आले. साबाजी भोसले रुसले आहेत त्याजसाठी मागे राहिले आहेत; त्याची समजाविसहि जाली. सिवाजी केशव वगैरे दोन आडीच हजार मागे आहेत. ते नागपुरीहून निघाले आहेत. येका दोन रोजानी येऊन दाखल होतील. बावासाहेब तो कूच दरकूच चालले. मोगल जाऊ शहरात बसला आहे. तो कधी निघतो हे पाहावे. साहेबी कलम बितपसील आज्ञा केली त्याचा तपसील.

नर्मदा दक्षण तीरची आज्ञा केली तर दफ्तरात कागद ध्यानास आणून आज्ञा करणे ते करावी. याजपासी सरकारची सनद पहिली दरोबस्ताची आहे. इतकींया उपरी जे आज्ञा.

त्रिबकजी राजे व कराडियाणी हवाला सरकारच्या यैवजाचा घेतला. त्याजसाठी कराड तर तिकड गेले. आम्ही त्यासी खटखट बहुत केली तेव्हा त्याणी व राज्यानी मिळून दोन लाख रुपये देतो यैसा करार जाला. त्यासी कराडे गेलियाउपरी राज्यासीहि कजिया केला, तेव्हा जानोजी

दादजी पवार याजबाा रुपये आम्हाकड नागपूरात जमे जाले त्यास स्वामीनी आज्ञा पत्री आज्ञा की रुपये पुणियात पावतील तर सरकारा घेतले जातील, नाहीतर रुपये न लगेत. हुंडनावल देऊन रुपये आणवावें यात गरज काय आहे? त्याचे पारपत्यच पुरते होईल म्हणून आज्ञा. आम्ही येथे लस्करात आहेत. दादजी पवार रघोजी कराड यांजवल आहे त्याची आमची गांठ पडलियाउपरी निकड करून चिठी करून घेतो, नाहीतर रुपये आमचे पुणियांत त्याणी दाखल

2005

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बावानी करार केला. बहुतच बजिदी केली कीं हा कजिया निर्माण जाला याजमुळे च्यार दिवस आधिक लागले तर चिंता काय आहे ? आम्ही रुपये देतो. या गडबडीमुळे आंतर पडल रुपये देतो. वराडात जाऊन कृष्णाजी गोविंद याजपासून घेऊन देतो म्हणून करार केला आहे. नित्य उठोन मागणी करितात. दोन लाखाचा निकाल करतील. च्यार दिवस आधिक उणे परतु दोन लाख रुपये राहतात. बरे हे दोन हाताखाली घाळून मग दुसरियाची मागणी करितो.

दरबार खर्चाचे रुपये या दोन लाखा बराबर देतो यैसे म्हणतात. दोन लाखा बाा घेऊन सेवेसी पावतें करितो.

निजामआलीच्या लस्करात धारण काय आहे फौज किती आहे, आणि यांजकडील फौज किती आहे, इकडे धारण काय आहे, कुल बारीक कचे वर्तमान लिहून पाठवणे. निजामआलीची फौज सात आठ हजार फौज आहे. गाडदी दाहा बारा हजार व तोफा ४० चालीस व गैरसरंजाम या प्राो आहे. तोफखानियाचे बल मोठे तोफा लहान पधरा यासिवाये. आणीक सरंजाम आहे. याजकडील फौज मोगलाच्या तोंडावर आहे. कराड वगैरे दहा हजार फौज आहे. मागूनहि दाहा हजार तेथे जमा होईल येकूण वीस हजार जमा होईल. मोगलाच्या लस्करात पोत्यात करून द्यावे यैसी गाठ पडली याउपरी करीतो. किाा रुपये सरकारात रुपयें येऊन दाखल होतील मग रोखा द्यावयाची आज्ञा करावी.

नजरेच्या रुपयाविशी गोसांवी महंत हंसपुरीपासी तगादा बहुत केला. तो म्हणू लागला कीं यैवज आम्हास लाऊन देतील तेव्हां रुपये द्यावे. त्याजवरून आम्ही महंतास तगादा निक्षूण केला कीं तुमचा हवाला आहे तर रुपये तुम्हापासून घेऊ आणि तुम्हास सुटनार नाही. रुपये तुम्हापासून घेऊ. त्यासी जानोजीबावा व राजे उभयेतानी सांगितले कीं आम्हास वोढ भारी पडला आहे या वोढ्यासी आणि देण्यासी गाठ कसी पडती ? हे रुपये आम्ही कबूलच केले आहेत ते रुपये आम्ही देतो परतु विचारे करून घ्यावे. तेव्हा जरुर जाणून उठावेसे जाले. येविशी काये आज्ञा ? परंतु देतील सुटत नाहीत कालवंचना आहे.

जफतीचा ऐवज सांप्र(त) चाली लागला आहे. जो करारातं येईल ते विनंती करीन.

माहदाजी कृष्ण काणे याजकड रा बलवंतरावजी याचे फडनीशीबाा रुपयाविशी आज्ञा वारंवार येती. येथे विश्वनाथ वैद्य याणी रावसाहेबाचा पुरजा घेऊन आले आहेत. त्यासी ते लवाडी फारच करितात. धरणीपारणी कजियेरजिये जितके करावयाचे

2006

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

धारण सस्ती आहे लमाण पुस्कल आहे आणि सिवारहि बहुत पिकला आहे. इकड तर सिवारच आहे मग धारणीस काय पाहत्रे? चौपैस्यास गोणी आहे. याप्रो वर्तमान आहे.

कितेक कामेकाजे या गडबडीत राहिलीसी जाली. गडबड वारिली याउपरी राहिली कामे करून घेणे ते घेतो. श्रृत होये.

तितके सोलाहि संवसकार जाले. काही बाकी राहिले नाही. आता तर मागतीन निकड करितो त्यांचे काही भय काय आहे? परंतु बास्कल आप्रामाणीक धट आहे. परम संकट आहे. येथे बऱ्या बोले दिल्हे तर उतम, नाहीतर स्वामीनी बावधनेस ढालाईत पाठऊन रुपये आणविले पाहिजेत. हा काही भला मनुश नाही तर विनंती लिहीण त्याजप्रो काये करणे ते करावे.

माहराजाचे सेवेसी श्रृत होये हे विज्ञाप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar reports the depredatory activities of the Nizam's army in Berar and Khandesh and assures the addressee of the whole-hearted co-operation of Janoji Bhonsle in the campaign.*

No. 126]

श्री

सेवेसी विज्ञापना. राजश्री रघोजी भोसले भागानगरासनिध ती कोसांवर आले. राजश्री रामदासपंत व अनवरखान सामोरे जाऊन शहरासनिध घेऊन आले. नवाब सलाबतजंग याच्या व त्याच्या भेटी जाहाल्या. राजश्री रामचंद्र जाधवराऊ यानी राजश्री रघोजी भोसले याचा बहुतसा अभिमान धरिला आहे. सेवेसी श्रृत जाले पाहिजे. हे सेवेसी विज्ञापना.

¶*This letter gives information about an interview between Raghuji Bhonsle and Salabatjung.*

No. 127]

श्रीरघुवीर

राजश्री गोविंदराव चिटनिवीस
गोसावी यांसी

ꣳ सकलगुणालंकरण अंखडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रो मुधोजी भोसले सेनाधुरंधर रामराम विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये

2007

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

लेखन करीत असिले पाहिजे विशेष. आम्हाकडील वर्तमान तों परसस्परें निवेदन जालेच असेल. पारोलियास गेलों होतों तेथोन निघोन चंद्रपुरास येऊन दाखल जालों. आपणाकडील व्रत्त वरचेवर लिहीत असावे. रा। छ ९ माहे जिलकाद. बहुत काये लिहिणे ? लोभ असो देणे हे विनंती.

मोर्तब
सुद.

० श्री ~
शाहूराजप्रसादेन रघुरी-
णात्प्तयशोधनं तत्सुनोस्तु-
मुधोर्नाम्नस्तेषां मुद्रा-
विराजिते.

¶*Mudhoji Bhonsle informs Govindrao Chitnis that he has left Parola and reached Chandrapur.*

No. 128] [*About the close of 1761*

स्वामीकडील नून गोष्ट सांगितली नाही. दोहीकडे बरे या आन्वयेच जे बोलणे ते बोलले. त्याप्रोाच मा। कबीरखानाहि त्यास समसामुदौला व मा। कबीरखां व शेरजंग व रुकनुदौला यांचे बोलणे येकाच प्रकारचे जाले. त्याजवरून नवाबाचेहि चितात आले कीं असे उमदेहि गोष्ट सांगतात; तेव्हा याच गोष्टींत कुशल आहे असें वाटते. दरबारीं याप्रकारे खिलवतींत जाबसाल जालें. गुलाम सैदखान व देवराज हे शकुनी दुर्योधनाप्रो। दोघेजण स्वतंत्रच मनसबा करितात कीं, भोसल्यास मेलऊन घ्यावे आणि हैदर नायेकास मेलऊन घेऊन श्रीमंतासी बिघाड करावा. कदाचित नवाब कृष्णा उतरून हैदर नायेकाकडे जातात हें कलल्यावर श्रीमंत कृष्णा उतरून आले. तरी करनाटक प्रांतचा बंदोबस्त करून पैका मेलऊन श्रीमंताचे मागे यावें असा विचार दोघांचा आहे. दोघेजण हा विचार फार घाटितात. नवाबांस वेगले वाटेने उमजवितात. मग

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

परिणाम काये लागतो पाहावा. परंतु येथें जो विचार घाटतो तो मजला तरी शेवेसी लिहिला पा. भोसल्यास मेळऊन घ्यावयाचा विचार गुलाम सैदखानानी आपले जागा ठरविला आहे. तो मीर खलीलासी बोलतात कीं, भोसल्यानी श्रीमंताकडे जातो म्हणून पंचमाहालचे शुमारे यावे व पंचमाहाल वगैरे माहालचा बंदोबस्त करणे आहे म्हणून म्हणावे. आम्ही इकडून नवाबांस घेऊन पंचमाहालचे शुमारे येतो. बाह्यात्कारे कटाक्ष दाखऊन आंतस्ते येक होऊन तसेंच जाऊन हैदर नायकास शामील व्हावे, या आर्थे मीर खलीलांसी बोलतात. मीर खलील म्हणत होता कीं, भोसल्यांचे मधस्त मलारजी होलकर ते उतर प्रांतास दूर गेले. याजमुले श्रीमंतांचे मनात भोसल्यांचे विसीं निर्मलता नाहीं व भोंसलेहि श्रीमंताकडे जात नाहीत, वसवांस[1] करितात. भोसल्यांचे मनांत नवाबासींच येऊन मिलावें व राज्यांत डोहणा[2] करावा असे आहे. याप्रकारे मीर खलील गुलाम सैदखानांसी बोलत होता. याप्रकारे मनसबे घाटितात. कचा पका इतिला स्वामीचे शेवेत दिल्हा पाहिजे यास्तव विनंती लिहिली आहे. याणी मनसबे घाटिले हेच सेवटीस जातात किंवा नाहीं हे इच्छा ईस्वराची. कचें वर्तमान सेवेसी लिहिले असें हे विज्ञापना.

¶*The writer gives the developments in the Karnatak, especially the joint action which the Bhonsle, Haidar and Ghulam Saidkhan proposed to take against the Peshwa. The first two sheets of the letter are missing.*

No. 129] [*20-7-1762*

श्री

राजश्री महिपतराव चिटनविस
गोसांवी यासी

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो त्रिंबकजी राजे भोंसले रामराम विनंती. उपरी: येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत जाणे विशेष. तुम्ही पत्र पाठविले तें प्राविष्ट होऊन लेखनार्थ श्रवणे संतोशावाप्ति जाली. तुम्ही व राजश्री दादासाहेबी कितेक अर्थ लिहिला त्याप्रमाणे राजश्री सेनासाहेबसुभा यासी बोलिलो. त्यास तिलमात्र याचा अर्थ राजश्री दादासाहेबांसी दुसरा नाहीं. तुमचे लिहिल्यावरून आमची रवानगी करून पाठविलें असे. सत्वरीच येऊन

---

१ संशय, अंदेशा. २ अडथळा, गोंधळ.

2009

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पोहचतो. यासमई हे सरदारी तुमची जाणोन साहिता करणे. सरदारीत काही ताकत राहिली नाही. सर्व प्रकारे हे सरदारीची उभारणी राजश्री दादासाहेबी करावी उचित असे. आम्ही पत्रामागेच येत असो. रा। छ २७ माहे जिल्हेज. ही विणती.

¶*Trimbakji Bhonsle writes to Mahipatrao Chitnis about the favourable attitude of Janoji, the Senasaheb Subha, towards Raghoba.*

No. 130] [*14-11-1762 ?*

पौ छ २ जाल

श्रीलक्ष्मीकांत

राजश्री रघुनाथपंत
गोसांवी यासी

सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो जानोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती. उपरी : येथील कुशल जाणोन स्वकीय कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. गोसांवियांनी पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनाभिप्राये आवगत जाहाला. राजश्री मल्हारराव भिकाजी व सदासिव येमाजी व लक्ष्मण खंडेराव तीन पतके येथून रवाना केले आहेत हे आपणास सामील होतील, म्हणोन लिहिले. यैसियास छ २७ राखरी उगावचे मुकामी राजश्री सदासिव[१] येमाजी व लक्ष्मण खंडेराव येऊन भेटले. आज छ २८ मिनहूस पाचवडीस माारानिलेसुधा आलों आसो. दरमजल सत्वरच गोसांविया-जवल (येऊन) पोहचतो. विदित व्हावे म्हणोन लिहिले असे. * * छ मजकूर सूज्ञाप्रति विशेष काये लिहिणे; कृपा लोभ आसू दिला पाहिजे हे विनंती.

मोर्तब
सुद.

¶*Janoji Bhonsle to Raghunathrao, informing him that he had come as far as Pachvadi and that he would join him soon. He also writes that Sadashiv Yemaji and Laxman Khanderao have joined him in accordance with Raghunathrao's orders.*

---

१ गमाजी यमाजी.

2010

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 131] [*17-11-1762 ?*

पौ छ २ जमादिलावल

श्री

सेवेसी रामाजी बलाल साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ३० रबिलाखर प्रहर रात्र मुकाम येरडगाव परगणे सेवगांव गंगा दक्षणतीर नजिक पैठण तीन कोस, सेवकाचें वर्तमान यथास्थित असे विशेष. कासिदासमागमे आज्ञापत्रें पाठविलीं तीं पावलीं. सत्वर राजश्री जानोजी भोसले सेनासाहेबसुभा यांस घेऊन येणे म्हणून आज्ञा. त्यास आज छ रविलाखरीं जामखेडाहून कूच करून सोला कोस आले तों स्वाम घाट चढोन वरते फौजसमेत गेलियाची बातमी आली. नवाबाचे लस्कर नेवासियानजीक आहेत म्हणून बातमी आली. त्याजवरून उदैक तिसगावानजीक करजिच्या घाटाखालीं याणी मुकाम नेमिला आहे तेथें येतील. परवां छ २ रजबी स्वामीसन्निध येतील. राजश्री सदाशिव येमाजी व राजश्री लक्ष्मण खंडेराव आंबडावर होते तेहि यांसमागमे आले. सेवेसी श्रृत होयें हे विज्ञापना.

¶Ramaji Ballal informs the Peshwa that Janoji has already left for Poona He will be joined, he says, with the Nizam's forces.

No. 132] [*18-11-1762*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेसी

विनंती. सेवक रामाजी बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. छ १ जमादिलावल मुा तिसगाव स्वामीच्या कृपे क्षेम असे. यानंतर काली पैठणानजीक येरंडगावच्या मुकामीं राजश्री सेनासाहेब सुभा यांस स्वामीचीं पत्रे आलीं; तेथें आपण घाट चढून जाणार, तुम्ही गुंजालियाचे घाटें चढून बुनगे मागें ठेऊन सडे भेटीस यावे म्हणून लिहिलें. त्यावरून गुंजालियाचा घाट मोगलाच्या फौजेस नजीक पडतो म्हणून करंजीच्या घाटें चढावयास्तव आज येथें आले तों आज स्वामीचे पत्र आलें, टोकें व देवस्थानचा हिंदुधर्मउछेद आरंभिला. याजकरितां मोगलाचा निपात करणे जरूर. यांचें येणे लवकर न होये म्हणून रागें भरून पत्र आलें. इंदुवारीं मृत्युयोग. रविवारीं प्रहर रात्रीपर्यंत भेटीस येणे म्हणून आज्ञा लिंहिली. अशास यांस व स्वामीस आज पंधरा रोजांचें अंतर. येणे होऊन भेट न होये. याजकरिता ते घाट करंजीचा चढोन नगराच्या पूर्वेस दोन

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

कोसावर बुनगें ठेऊन सडे होऊन येतात. परवा स्वामीच्या दर्शनास येतात. स्वाम घाटाखाली असिले तरी घाटाखाली येऊन दर्शन घेणार. टोके व देवस्थानाचा उच्छेद जाहाला, यास्तव स्वामीस विशाद आला व हें वृत हिंदुधर्मास अनुचित जालियावर यासहि या गोष्टीची ईर्शा बहुतच आहे. स्वामीचें व यांचे दर्शन जालियावर स्वामीच्या प्रतापेंकडून त्यांचें पारपत्य श्री घडवील. याउपर यांच्या येणियास दिवसांचे अंतर पडणार नाहीं. विदित होये हे विज्ञाप्ति.

¶*Ramaji Ballal informs Raghunathrao that Janoji Bhonsle is hurrying up with all possible speed to join the main army and wait upon the addressee as he is much pained to hear of the devastation of temples by the Moghals.*

No. 133] [*1763 ?*

श्री

दुर्जेनसिंग सिसोदे याचा तालुका भदोडे वगैरे प्रा खुटावद येथे होतो. श्रीमत बंगालीयास जाते समयी त्याजपासून जागा सोडविली. उपरी वगैरे गांव ४ च्यार ठेविले. तहनामा आहे त्या प्रा कमाविसदार चालत नाहीत, जाजती उपसर्ग देतात, येविसी तेथील कमाविसदार बापुजी मोरेश्वर यास पत्र द्यावयास आज्ञा करावी की पूर्वी नानासाहेबी तह करून दिल्हा आहे त्याप्रा चालणे. जाजती उपसर्ग न देणे.

पूर्वी तह तीर्थरुपानी करून दिल्हा असेल त्याप्रो चालवणे म्हणोन कमाविसदारास पत्र देणे.

¶*Peshwa's officers instructed not to molest the villages of Durjansing Sisode.*

No. 134] [*19-1-1763 ?*

पो छ १३ रजबु

श्रीगजानन

सेवेसी गोविंदराव मोरेश्वर साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ४ रजबपर्यंत सेवकाचे वर्तमान येथास्थित असे. यानंतर राजश्री जानोजी भोसले यांकडून हंसपुरी गोसावी सप्तरुषीस आले आहेत व रा. बाबूराव कोनेर आपल्या घरात पांडवगड वाडी येथें आले आहेत. स्वामीस (विदित) व्हावे यास्तव लिहिलें असे. राजश्री पंत प्रतिनिधि यांणी जोत्याजीराव पाटणकर व सुलतानजी घांटगे व थोरात वगैरे पांच सातसे फौज हशम दोन च्यारसें जमा केले आहेत. राजश्री येमाजीपंत आणा यांचा व प्रतिनिधीचा कटाक्ष आहे, या निमित्य रा आणा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

यांणी दोन च्यारसे राऊत व दोन च्यारसे प्यादे जमा करून पुसेसांवळीवरी जाऊन मोकाम केला आहे. उभयतांचा विवेकाचा मजकूर होईल त्याप्रमाणें सेवेसी लिहून पाठऊ. प्रतिनिधि चौरोजां बाहेर निघणार यैसें वर्तमान आहे. मुळुकाचे चौकसीस वाई व कऱ्हाड प्रांतास राजश्री शामराऊ व राजश्री हरिपंत भिकाजी बावा यास आज्ञा करून * * ते येथें आले आहेत मुळुकांत अद्याप वसूल जाहाला नाही. चौक * * ठराव होईल तोपर्यंत लोकांच्या रोजमुरा चालावा लागतो, त्यास कृपा करून बे (गमी) करावया स्वामी धणी समर्थ आहे. शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Govindrao Moreshwar informs the Peshwa of the arrival of Hansapuri Gosavi and Baburao Koner at Satara from Janoji Bhonsle. He further writes about the movements of the Pratinidhi.

No. 135] *[24-1-1763*

श्रीलक्ष्मीकांत

श्रीमंत राजश्री पंतप्रधान
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक रामजी बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ९ रजबपर्यंत स्वामीच्या कृपावलोकनेंकरून क्षेम असे विशेष. राजश्री सेनासाहेब सुभा यांच्या शुतरस्वारासमागमें सेवकास आज्ञापत्र छ १२ जमादिलाखरीं रवाना जाहालें तें छ २ रजबीं प्रविष्ट जाहाले; तेथें राजश्री सेनासाहेब सुभा निश्चयेरूप भेटीस येत असतां अनारोग्यतेमुळें हवेलीस गेले; उत्तम केलें. शरिरास उपाय उत्तम प्रकारे करावा. राजश्री मुधोजी भोसले सेनाधुरंधर यांची रवानगी केली बहुत बरें आहे; त्यास लौकर पाठऊन देवणे येविसीं सेनासाहेब सुभा यांस समाधानयुक्त पत्र पाठविलें आहे म्हणून पत्रीं आज्ञा लिहिली. त्याप्रमाणें पत्र राजश्री सेनासाहेबसुभा यास होतें. प्रविष्ट जालियावर लेखनार्थावरून बहुत संतोष पावले. भेटीस तत्वतां येतों म्हणून लिहिलें पाठऊन उद्योग केला तो शरीरभोगामुळें व्यर्थ जाहाला, मागें कारभारी याच्या सांगितल्यावरून लिहिणें लटिके पडत होते ते दूर होऊन जें लिहिलें ते निश्चयरूप घडत असावें त्यास व्यर्थता आली म्हणून फारच चिताच्या ठाई खेद करीत होते. यांचा निश्चय स्वामीच्या लक्षांत तिलप्राय अंतर करूं नये. तेव्हां स्वामीच्या मनांत सदयेता येऊन संतोषयुक्त पत्र लिहिल्यावरून फारच उत्छाहयुक्त जाहाले. राजश्री सेनाधुरंधर उंदरी गोदरी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नजीक पावले. तेथून दरकूच सत्वर जाऊन पोंहचण्याविसीं येथून वारंवार पत्रें जात आहेत त्यांचीहि पत्रें स्वामीस लवकर येतों म्हणून येत असतील. लवकरीच येतील. गुदस्तां राजश्री साबाजी भोसले यांजवर भेटीपासून निरोपपर्यंत आदर व ममता विशेषात्कारें जाली त्यापेक्षां यांजवर अधिकोत्तर जालियानें येथें यांस परम हर्ष आहे तो वृधीस पावे तें करणार स्वाम समर्थ आहेत. सेवेसीं श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Ramachandra Ballal writes to the Peshwa that Janoji Bhonsle was much gratified at the cordial treatment given to him and his brother by the Peshwa. "Janoji assures that there will be no more misunderstanding similar to the one created formerly by his Diwan," says the writer.*

No. 136] [*February 1763*

श्री

सेवेसी रामाजी बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ साबान मुकाम अबदलपूर भीमा तीर स्वामीच्या कृपावलोकनेंकरून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. राजश्री जानोजी भोंसले सेनासाहेबसुभा याणी वराडांतून राजश्री माणको शंकर व गणेश तुकदेव स्वामीकडे रवाना करून आपण फौजसुधां घासदाणा घेतघेत परलीपर्यंत आले. तेथें राजश्री सदाशिव यमाजी नवाबाकडून येऊन भेटले. तदनंतर नवाबाकडे जावयाचा निश्चय करून छ २९ रजबीं कलबर्ग्यानिजीक याच्या व नवाबाच्या भेटी जाहाल्या. तेच दिवशीं दाहा बारा कोसांची मजल करून भीमेवर येऊन देखील नवाब उतरले. दुसरे दिवसीं तेथें मुकाम करून हे नवाबाच्या डेरीयास गेले. तेथें निश्चय केला कीं सातारीयापर्यंत जाऊन राजश्रीची भेट घ्यावी. सरकारकुनाची घालमेल जाली आहे ते ज्याचे धंदे त्यांचे स्वाधीन करावे व पहिला मोंगलाकडे मुल्क भीमेपलीकडील होता त्याप्रमाणे त्याणें घ्यावा. चौथ सरदेशमुखी स्वराज्यांतील पेशजीं तह आहे त्याप्रमाणें करार करावा. पेशवे चाल्हून आले तर युध्य करावें. जसी निकड येईल तसी सोसून जाहाला करार सेवटास न्यावा. याप्रमाणें करारी करून तेथून मजल दरमजल मुकाम मजकूरपर्यंत आले. आज नवाब यांच्या डेरीयास येणार यास्तव येथें मुकाम आहे. राजश्री माणको शंकर व गणेश तुकदेव नवाबाच्या भेटी अगोदर दोन दिवस येऊन पोहोंचले त्याणी स्वामीकडील जो मजकूर करून आले असतील तो यांस सर्व सांगितलाच असेल. मागती येथून या उभयतांची रवानगी स्वामीकडे होणार आहे. परलीवरून मोंगलाकडे जावयाचा याचा निश्चय जाहाला ते वेळेस व्यंकटराऊ मोरेश्वर व सेवक उभयेतां सेनासाहेब सुभा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

यांजकडे जाऊन पुसिलें कीं तुम्हीं राज्यांतील चाकर श्रीमंतास जाऊन सामील व्हावें तें न करितां मोंगलाकडे जातां उचित नाहीं. याचे पर्याय कितेक बोलिलों. त्याणी उत्तर दिल्हें कीं यंदां पैका पदरीं नसतां पंचवीस हजार फौज धरली ते श्रीमंताच्याच कार्यानिमित्य. त्यास त्याणीं मोंगलासी सलुख करून राजश्रीस राज्यीं बसऊन आपले अर्थ सिधिस नेले. आमचा अव्हेर केला. याउपर इतकी फौज जमा केली याचा परिणाम आम्हांस कांहीं तरी केला पाहिजे. यास्तव मोंगलास जाऊन भेटतों; मग जें ईश्वरइच्छेनें घडेल तें प्रमाण; याप्रमाणें भाषण केलें. त्याउपर दोन दिवस जाहाले; मागती राजश्री दिवाकरपंत व खासा सेनासाहेब सुभा यांस सांगितलें कीं नवाबाचा मनसुबा कांहीं माघारे फिरावयाचा नव्हता. तुम्ही सामील जाहाला म्हणून तुमच्या बलावर हे चालतात. मऱ्हाटे राज्य आहे म्हणून तुम्हांस नवाब मानितो. मग याप्रमाणे तुमची मान्यता राहील कीं काय? तुम्हास सरंजाम पाहिजे तर श्रीमंतास द्यावयास अशक्य आहे यैसें नाहीं. जे गोष्टी सध्या तुम्ही योजिली याणे परिणाम शुध तुमचा नाहीं. दूरवर द्रष्टी देऊन पाहोन जें कर्तव्य तें करावें; यैसें फारच निषेध करून बोलिलों. त्याचें उत्तर आम्हांस श्रीमंतासी विरोध करून आपलें राज्य बुडवणें नाहीं परिणाम काय करितों तो उगेच राहून पाहाणें यैसें म्हणतात. विदित होये हे विज्ञापना.

¶*Ramaji Ballal reports to the Peshwa how Janoji arranged for an interview with the Nizam and how he entered into negotiations with him thus renouncing his friendly relations with the Peshwa. The writer further says that he tried to remonstrate with him and to bring home to him the grave consequences of his conduct.*

No. 137] [*February 1763*

श्रीशंकर

सेवेसीं विनंती. आज्ञाधारक व्यंकटराव मोरेश्वर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती प्रार्थना यैसीजे. येथील वर्तमान राजश्री माणको शंकर व राजश्री गणेश तुकदेव यास वराडांतून स्वामीकडे रवाना केलें आणि कूच दरकूच गंगातीरास वासदाणे घेत आले. राजश्री जानोजी भोंसले सेनासाहेबसुभा गंगा उतरून आलीकडे परलीच्या मुकामास आले. तेथें राजश्री गमाजी येमाजी मोंगलाकडून आले. त्याणी मसलत दिल्ही कीं मोंगलाकडे जावें; सर्व मनसबे सिधीस जातील. तेव्हां याणी कूच करून तेरा कोस आले. ते दिवशीं राजश्री रामाजी बलाल व सेवक, राजश्री सेनासाहेबसुभा व राव दिवाकरपंत यांजकडे गेलों आणि पुसले

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

की तुमचा व श्रीमंताचा श्नेह येक मसलत येक्या राज्यांतील राहणार आणि अविंधाकडे जाणार हें काये? तेव्हां त्याणी सांगितलें कीं आम्ही येथून उभयेतां वकील पाठविले. पत्रें वरचेवर पाठवितों परंतु जासुदास जाब मिलत नाहीं. मन मानेशी भाशनें बोलतात. येंदां आम्हीं पंचविस तीस हजार फौज ठेविली ती पेशव्याच्या कामावर पडावी यास्तव ठेविली; त्याणी आमची हेलसांड केली तेव्हां या फौजेस रुपया तर पाहिजे; रुपयावांचून फौज कसी फिटेल याजसाठीं तजविज करून पाहतों यैसें बालले आणि गमाजी बावाजी लांब लांब मजली करून वेऊन आले. मोंगलानें भीमातीरींहून कूच करून कलबर्गीयापुढें सुलतानपूर आहे तेथें जाऊन मुकाम केला. मोंगल सेनासाहिबसुभा यांचे रोखें पंधरा कोस आला. सुलतानपुरावर भेटी जाल्या तेच रोजीं कूच करून भीमातीरावर येऊन मुकाम केला. छ २९ रजबीं बुधवारीं तेथें दोन मुकाम करून मसलत ठराऊन भीमातीरेच आज छ ४ साबानी मुकाम आबदुलपुरीं केला. मोंगलाची व सेनासाहेबसुभा याची आणभाश क्रियाप्रमाण जाली व प्रतिनिधीचीहि जाली कीं स्वामीसी विरोध परिछिन करावे; मग जें होईल तें सुखरूप हो. त्याणी राजा आमचे इतेलीया बेंगला कां बसविला व पदे कैलासवासी याणी दिल्हीं होतीं तीं दूर करून दुसरीयासी दिल्ही. राजश्रीचे केले याणी मोडले हें आनुचित केलें. पूर्ववतप्रमाणें जें चालत आलें आहे त्याप्रमाणें चालावें व नवाब आसफज्याचे वेळेस ज्याप्रमाणें तह चालत आला आहे त्याप्रमाणें चालावें. साल दरसाल कजियें नसावे, चौथ सरदेशमुखी वाजवी घ्यावी याप्रमाणें मोंगलाचा मनसबा आहे. केवळ निकरच करावा हेंच दिसतें. दुसरा प्रकार येकंदर दिसत नाहीं. दुसरें स्वामीकडून राजश्री माणको शंकर व गणेश तुकदेव पत्रें घेऊन आले. तेहि राजश्री सेनासाहिबसुभा व राजश्री दिवाकरपंत यासी बोलत असतात. उभयेतां वकिलासी मागती बोलून स्वामीकडे रवाना करावे यैसें दिसतें. स्वामीस कलावें. येथें आज सध्या फौज नवाबाकडील चालीस पंचेचालीस हजार व भोंसले कसरेकम लोक तीस हजार व तोफखाना मोंगलाकडील येकसें तीस जरब आहेत व भोसलियाकडील तोंफा वीस आहेत, गाडदी सात आठ हजार व भोंसलीयाकडे दोन हजार याप्रमाणें फौज आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar reports to the Peshwa the defection of Janoji Bhonsle from the Peshwa and his going over to the side of the Nizam. He says further that he along with Ramaji Ballal tried to impress on him the advantages of an alliance with the Peshwa. Janoji however persisted in going over to the Nizam that he may thus secure money to pay the dues of the army.*

2016

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 138] [*4-4-1763*

छ ८ रमजान रविवार संध्याकाल

श्री

सेवेसी विज्ञापना येसीजे. अजुरदार कासद याबाार छ ११ रजबची पत्रें गुलामसैदखान व सेवकास सादर जालीं तीं उटनुरानजीक पाऊन सविस्तर कळों आलें. पत्रीं आज्ञा कीं खान मानिल्हे येथून कारारमदार करून गेले आहेत त्यास तेथें पावलियावर खानानी लिहून दिल्हे आहे त्याप्रमाणे करार करितात अगर कांहीं न्यून पूर्ण करितात. कराराप्रोा अमलांत आलें म्हणजे सर्व गोष्टीची निखालसता यांतच दिसोन येईल. नाहींतर कलतच आहे. तेथील सर्व पुढील कर्तव्य व येथून ग्रहस्त गेले त्याची व तेथील्याची मर्जी कसी मिलते, सर्व बारीक अर्थ लिहून पाठवणें म्हणून आज्ञा. येसियास, खान व सेवक लस्करास पावलिया-वर राजे विठलदास यांच्या लग्नाची गडबड वारलियावर मुख्यास व कारभारी यांस यादी करारमदाराच्या सर्व दाखविल्या. विदित करावयाचा अर्थ खानानी वेगला विदित केला. सेवकानेहि विदित केला. त्यास सर्वमान्यच आहे म्हणून नबाबानी व कारभारी यानीं उतर प्रत्योत्तर केले. त्याजवरून नवाबाचे पत्र मोघम घेऊन सेवेसी उमाजी जिवाजी जासूद याबाार येदलाबादेहून विनंतीपत्रें सेवेसी रवाना केली आहेत तीं पावलीच असतील. तदनंतर मुख्यास व कार-भारियांस नित्य विनती करीत गेलों की करारदादप्रोा नवाबाचे दसखत मोहरेनसीं यादी ठरावून द्याव्या. त्यास नवाब व कारभारी यानीं करार केला कीं करार-मदार खानानीं ठहराऊन आले आहेत तोच करार; परंतु लांब लांब मजली करून निर्मल प्रांतास जावें लागतें. उटनूरचा मोकदमा फैसल जालियावर निर्मलेस जाऊन तेथें खास दसखतानसी यादी ठराऊन देऊन सुतरस्वारास रवाना करू. त्याऊपर उटनूराचें ठाणें घेऊन बंदोबस्त करून निर्मलेनजीक येऊन पावले. वाटेमध्ये कारभारियासी नित्य मजकूर आपले कार्याचे वरचेवर होतच गेले, त्यांत खुलासा पाहतां देवाजीपंती तेथें असतां नानाप्रकारच्या गोष्टी लिहिल्या, येथें आल्यावरहि बाहकाविलें आहे. त्यावरून खानाचे व त्याचे अंतरंग साफ नाहीं. बाह्यरंगे मात्र आम्हासी बोलत गेले कीं आपणांस तों क्षणभर फुरसत नाहीं आणि मजला कामांत कशास आणितां? खान करार करून आलेच आहेत. मुख्यास समजाऊन खास दसखतानिसी यादी ठराऊन घेणे. त्याचे उतर प्रसंगोचित सेवक देतच गेला. खानासीं व मजसीं चित शुध्ध नाहीं ते नसो; सरकारचे काम कराराप्रोा ठिकाणीं लाऊन घेणे जरुर, यास्तव येके दिवसीं कारभारियांसी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

चार गोष्टी परिछिन उमजावून सांगितल्या कीं श्रीमंताची कृपा संपादून घेतल्याने तुमचे कामाचे असिले तर कराखदार खानाने केले ते नवाबानीच केले, आढेवेढे कशास घेतां? श्रीमंताचा स्नेह कार्याचा नसला तर साफ सांगावे, त्याप्रमाणे श्रीमंतास लिहून पाठऊं. त्यावरून म्हणो लागले कीं आम्ही काये करितों? कृपा संपादून घेणे न घेणे येख्तियार खावंदाचा आहे. येसीं भाषणें आम्हांसी नित्य करितात. परंतु अंतस्ते मुख्यांस नानाप्रकारचे कुडे मंत्र भासऊन त्यापासोन बोलवितात. त्यास खानाने जागीर व स्थलें कबूल केली आहेत तीं (ये)थिल्या दस्तावैजाप्रोंाच केली आहेत, त्यांत कमजवाद करूं सकत नाहीं. यादीपैकी जागीरदार चाकरी येथास्थित जागिरीप्रोा करीत नाहींत, त्याचे तगीरी बहालीचें कलमच तहनाम्यांत न ल्याहावें. दुसरें बंदगानअलीजवल पोहोचल्यावर मातबर मनसुबा करणें तो शाहानवाजखानाचे नाव न लिहितां कारपरदाज[1] इतला[2] देऊन करीत आले आहेत त्याप्रोा आपण तुम्हास इतला मात्र देऊन करीत जाऊं. तुमचे विचारें ठहरेल तेसें करूं हे लिहीत नाहीं. तुमचे सरकारचे नोकर आम्ही न ठेवावे व आमचे सरकारचे नोकर तुम्ही न ठेवावे या कलमांत ही कमजवाद करणार. याकलमासिवाये धरकड यादीप्रोा लिहून देणार. खानाचे विचारे प्रस्तुत आपण कांहीं बोलू नये. यांचे हेच येका दोहो दिवसांत काये ठराव करीतात तो पाहून ठराव होऊन चुकला म्हणजे मग जे बोलावयाचे ते बोलोन निश्चये होईल त्याप्रोा सेवेसी ल्याहावें. येसें वर्तमान आजचे घडीपावेतों आहे. येका दोहों दिवसांत फडशा करून घेतों. कारभारी आढेवेढे घेतात, परंतु झक मारून सेवटी यादी ठीक करून देतील. कारभारियांस जानोजी भोंसले यांचे स्नेहाचा वगैरे मोठा फुंद[3] जाला आहे. विचारें करून पाहतां येथील कारभार उपास-मातगा(?) आहे. मरजीस येईल तर राजे विठलदास यांस ममतापुरसर येक आज्ञापत्र समाधानाचे सादर करणार स्वामी समर्थ आहेत. सेवकाचें पत्र राज्यानी पहावयास मागत असतात. सूचनार्थ विनंती लिहिली असे. सेवेसी विदित होये हे विज्ञप्ति.

¶*This is probably Ramaji Ballal's letter to the Peshwa discussing the terms of an agreement that was being settled between the Peshwa and Nizam Ali through Sayad Khan. The subterfuges and the intrigues of the various negotiators are well described.*

---

१ मुत्सद्दी. २ माहिती. ३ गर्व.

2018

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 139] [1763 ?

श्री

राजश्री जानोजी भोसले गोसावी यासि

९ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो रघुनाथ बाजीराव असीर्वाद विनंती. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहीत गेले पाहिजे विशेष. तुम्ही या राज्यातील मातबर सरदार ज्या गोष्टी राज्यास उपयोगी त्या तुम्ही कराव्या, व तुमचे वडील व तुम्ही करीत आलें, ऐसे असतां कोती अंदेशी करोन नवाब निजामआलीखान यास जाऊन भेटला, बिघाडाचा प्रकार केला ये गोष्टीत कोणता नफा पाहिला आहे ? ही कर्मे मातबरायोग्य नव्हेत, क्षुद्रानी करावी; ते (आ)चरण तुम्हाकडून जाले. आपण कोण, करितो (काय) हे न पाहिलें. तुमच्या वडिलानीं या राज्यात (श्र)मसाहस करोन राज्याच्या वृधीस * * * करून दौलत मेलविली त्याचे वंशज तुम्ही * * * (निजामा)स मिलोन इकडील नुकसानी इच्छितां. * * कडून खानदानास शब्द लाविलात. असो. ज्या * * ज्यात दौलत मेलविली, मातबर पदवीस पा(वला) त्याच राज्यावरी फिरल्या परिणाम लागोन उतम फले प्राप्त होणे कलतच आहे. थोडक्याच रोजात वर्तणुकीनुसार फलप्राप्ति होईल.

¶*Raghoba administers a very strong rebuke to Janoji Bhonsle for having joined the Nizam.*

No. 140] [7-2-1764 ?

छ २१ साबान

श्री

राजश्री त्रिंबकराव गोसांवी

यांसी

९ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्य श्नो जानोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती. उपरी: येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन करीत आसावे विशेंष. ताम्राचे विरूधाचे समई आम्ही जिवाभ्य श्रम करून समयास येऊन पोहचलो आणि जो प्रकार घडला तो आपण द्रिष्टीने पाहिला. मोगलानी येंदा मातबर फौज ठेऊन महत्प्रेत्न केला तो निर्फळ जाला, तेव्हा येविशईचा दोषारोप त्याणी आमचेच ठाई कल्पून बहुतच वैश्यम्य (मानिले.) * आम्ही आपल्यास विचारी * * (आ)म्हाकडील बंदोबस्त करून देऊन मग आपला तह करावा, या * * ही मान्य केलेच होते.

2019

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

त्यानंतर प्रसंगानसार मोगलाचे तह्चा प्रकार होऊन आला त्यात आ * * * चा प्रकार काहीच न जाला. (आधी तो) * ती निकट गव्र-गव्यात होतो; तैसाच आपला निरोप जाला तो घाटाखाली येतपर्यंत लोकाची येक मास तिडणच बसली याजमुळे सरकारचें माहालात च्यार रूपये घेऊन वोड वारणे पडली, याचा अर्थ येक दोन वेला लिहिलाच आहे. पुढें गंगथडी प्रांते जाऊन सुदामत घासदाणा आहे तो घेऊन फौजेचा आब राखून आहो. प्रांतात जावे यास्तव दरमजल येऊन आंबाड परगणियात मुकाम केले तो नवाब निजाम-अलीखा याजकडील वर्तमान आले की माघारे फिरून गंगथडी प्रांते आले; सवेच नवाबाची व राजश्री विठलपंत याची पत्रे आली की वराडचे मामलतीचे वगैरे बोलणे आहे, तरी राजश्री कृष्णाजी मोरेश्वर या * * आम्हाकडील वकीला * * नांदेडचे सुमारे येऊन * * * * तेव्हा तेथून नागपूर पाचा * * * यास्तव कृष्णाजी मोरेश्वर यास पाठऊन द्यावे आणि आपणासहि भेटीचा योग करावा लागेंल; नाही तरी त्याचा आग्रह आपले प्रांतात उतरावे यैसा फारसा आहे. कदांचित टाळा दिल्हिया हर्षामर्ष वाडेल याप्रमाणे वरचेवरी लिहिली येऊ लागली. याजवरून माारनिले जरूर पाठवावे यैसे जाले आणि पुढें भेटीचे योगाचे संकटच प्राप्त जाले. विरूधाचा प्रकार करावा तरी इतक्या फौजेने थकतो यैसा अर्थ नाही. सारांश सांप्रत्यच्या करण्याचा विक्षेप मानून हा प्रकार आरंभिला आहे. त्यास येतद्वि-शईची सला आपल्यासिवाये कोण्हास विचारावी * येतद्विशईचे सर्व अ * * उतर ल्याहावे. तदनुसार विचार केला जाईल. रा। छ ४ शाबान. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Janoji Bhonsle seeks advice from Trimbakrao Pethe regarding his relations with the Nizam who is enraged with the writer's desertion of his side.*

No. 141] [*19-9-1764*

पो.छ २९ रबिलौवल खमस सितैन

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब साहेबांचे सेवेसी

विनंती. शेवक गणेश विठल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. तागायत छ २२ रौवल मुा। किले नगर साहेबांचे कृपाकटाक्षेंकरून सेवकाचें व किले मजकूरचे वर्तमान यथास्थित असे विशेष. छ ११ मोहरमचे आज्ञापत्र

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

श्रीमंत राजश्री राऊसाहेबाचें आले, तेथे आज्ञा कीं मौजे निंबेगाव[1] देवी ता[1] कडे हा गांव जागीर राजश्री जानोजी भोसलें यांस दिल्हा. त्याचे तर्फेने मौज मजकुरी भगवंत गोपाल असतात त्याणी कसबे मजकूरचें सिवारास उपद्रव करून वहित सेतें पाडून कुरणे करितात. कसब्याची जमीन आडताळून पाडिली आहे. राजश्री भगवतराव राम वाड्याचें कामाकरीतां रानातील दगड फोडीतात त्या बेलदारास त्याणी नेऊन हाणमार केली. सरकारचे कौलाची रयेत त्यांस त्याणी फारच उपद्रव दिल्हा आहे म्हणून विदित जाले. त्यास तुम्ही भगवंत गोपाल यास ताकीद करून भगवंतराव याचे कामास कडेयास किमपि उपद्रव न लागे ते करणे म्हणोन. त्याजवर साहेबाचेहि आज्ञापत्र छ १६ सफरचे आले, तेथेहि आज्ञा कीं का॥ कडे येथे भगवंत गोपाल दि॥ भोंसलें हे उपद्रव देतात म्हणून हुजूर विदित जाले त्यावरून हे पत्र सादर केले असे तरी तुम्ही भोसल्याकडील कमाविसदारास ताकीद करून का॥ मजकुरी रयतेस उपद्रव लागो न देणें, वस्तभाव कोणाची लुटून घेतली असेल ते परतोन माघारें देवणे, न आइकत तरी पारपत्य करणे म्हणोन. त्यावरून याचा व त्याचा आकास कशावरून वाढला, भगवत गोपाल याणे कडेकराचा नाश काय काय केला हे मनास आणून त्यास व यास च्यार गोष्टी सागोन कजिया न करावा या अर्थे धोंडो बापुजी कारकून किले मजकुरीहून कडेयास पाठविला. त्याणी उभयताकडील वर्तमान मनास आणिले. भोसल्याकडील भगवतपंत याणी कडे-कराचे तालुकियातील वस्तभाव गुरे ढोरे व नख्त काही नेले होते त्याची यादी भगवंतराव कडेकर याचा लेक निलकंठराव याणी लेहून दिल्ही. त्या मुलास आणून तहकीकांत केली; पैकी काही तफावतहि दिसली. उपरांत भगवंत गोपाल दि॥ भोसलें यास हटकिलें की तुम्हीं कजिया करिता काय सबब? सरकारातून तह जाहला आहे त्या प्रा॥ वर्तावें तो दरम्यान कजिया करिता सबब काय व वस्तभाव तुम्ही कडेकराचें तालुकियातील नेली व नख्त रुपये घेतलें यैसी बोभाट वर्तणूक केली आहे, तरी तुम्ही घेतलेत आहा हे माघारे देणे व उपद्रव तीलमात्र न देणे म्हणोन कितेक प्रकारें सागितले. त्यावरी भगवंत गोपाल याणे सालजाप लोक जे याचा आमचा काही कजिया नाही. कडेकर कड्याची गढी संगीन पोख्त पाया घालून इमारत बाधतात ही बांधो नये. आपल्यास भोसल्याची आज्ञा आहे की वाडा बांधो नये पोख्त सगी काम करू देऊ नये. त्यावरून कडेकरास आपण ताकीद केली; परतु ते आईकत ना, गडी बांधितात ही आदावंत त्याची आमची पाडिली आहे त्यामुलें

---

१ तालुके जामखेड, जिल्हा नगर.

2021

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

कजियाहि जाहला. काही सेरडे वगैरे आपण धरून आणिली व नख्त रुपयाचा मजकूर तरी गुडेंवाडीपासून रुपये घेतले ते आपण रुसुमाचे यैवजी घेतले आहेत. पांचा वर्षाचा रुसुम दरसालास रुपये ४४ चवेतालीस प्रा घेतले. रुा २२० दोनसे वीस व डोहरापासून घेतले त्यास आपणापासीं डोहारान बदमामली केली सबब घेतले व लोनोरियापासून घेतलें त्याचा प्रकार तरीं कड्याचे काम मना करीत असता लोणारी जंगलात कोलसे वगैरे काम करीत, सबब त्याणी काम न करावे या अर्थे घेतले रुपये पाणसे व वाणी रेवापा यापासून घेतलें; पंनास त्यास त्याचा पेसजीचा करार काही होता त्यास तो बदमामली करून भगवतराव कडेकर याची पाट निघाला सबब आपण धरून त्यापासून रुपये घेतले येकून येकदर रुपये सवा च्यारसें. गुरे व सेल्या नेल्या त्याची तहकीकात करीतां तो बोलिला की आपण गुरें नेली नाही; काही थोडी बहुत सेरडे नेली आहेत. येणे प्रा वर्तमान त्याणी सांगीतले. याजवर धोंडोपंतानी त्यास सांगीतलें की ह्या गोष्टी कार्याच्या नाहीत. रुपये वस्तभाव घेतली आहे ते माघारी देणे व आम्हीहि येथून साहेबाचे आज्ञेवरून दपटशाचें पत्र त्यास लिहिले होते तेहि दाखविले. त्यावर भगवंत गोपाल बोलिले की भगवतराव राम याणी वाडा बांधो नये म्हणजे आपण वाटेस जात नाही. आपल्यास भोसल्याची आज्ञा आहे की वाडा बांधो नये व रुपये आपण घेतले हे हक रुसुम वगैरे आपण घेतले. काही भगवतराव याचे घेतले नाही, आपण देणार नाही यैसे पष्ट सागितले. त्याजवर आमचे कारकूनाने सागितले की तुम्हावर स्वारी येऊन पारपत्य करितील मग फजीत पडाल यात जीव काय? सरकारचें आज्ञेप्रा वर्तणूक करणे. त्याजवर ते बोलिले की आपण भोसल्याचे सेवक, आपणांस त्यांची आज्ञा प्रमाण. आपण त्याजकडेस पत्र लेहून पाठवितो. जावसाल येईल त्याप्रा वर्तणूक करू. त्यास तूर्त पंधरा दिवस भांडो नये यैसा करार त्याणी केला आहे. सारांश मजकूर की रुपये घेतले हे रुसुमाचे म्हणतात, परंतु आकसामुले घेतले हे खरे. रुसुमाचे असल्यास सालाचे सालास घेता सालं मजकूरीच कशास घ्यावे? हे आकसाने घेतले. आकसास कारण हेच की कडे येथील गडी पोख्त बांधतात. त्या कामावर लोक होते त्यास धरून नेऊन हाणमार करून ऐवज घेत की फिरोन कोणी काम वाड्याचे न करीत, कामावर मजुरी कोणी न करी असी दहशत त्या प्रातात त्याणी घातली असा मजकूर द्रिष्टीस पडिला. कुरणाचा मजकूर तरी कुरण श्रीमंत भाऊसाहेबी करार करून दिल्हा आहे त्या प्राच आहे. परतून जमीन कडियाची आहे यास्तव कजिया कडेकराची गडी पकी बाधो नये म्हणजे ते कजिया करीत नाही असा भावार्थ दिसोन आला. यैसियास किले मजकूरीहून तोफा व सिबंदी काही घेऊन जावे तेव्हाच ते आईकीतील

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मध्ये आइकत नाही. दारुगोला खर्चवेच लागेल माणसे जखमी होतील. त्याणी काही राऊत वगैरे संरजाम तयार केला आहे. आम्ही जावे तेव्हां पके काम करावे. किल्याची इभरत राहिली पाहिजे यास्तव संरजाम चागलाच नेला पाहिजे. संरजामा सिवाये ते आइकणार नाही. कजिया मातबर होईल यास्तव सविस्तर मजकूर सेवेसी श्रुत व्हावा यास्तव लिहिला आहे, तरी ध्यानास आणून आज्ञा जाहली पाहिजे. तोफा व प्यादे वगैरे साहित्य घेऊन जाऊन पारपत्य परिछिन करावे असे असल्यास तसीच आज्ञा करावी, अगर तूर्त ठेवण्याचें असल्यास तसीच आज्ञा करावी. आज्ञापत्र येईल त्याप्रमाणें वर्तणूक करू. श्रीमंत राऊसाहेबांकडून या कामास कोंडाजी बोथांटीबारदार आला आहे त्याचे देखताच भोसल्याकडील कारभारी याणे जाबसाल केला आहे. विना त्याचे पारपत्य केल्यासिवाय तो आईकत नाही. मागे त्याणी येक दोनदा जुज केले त्यावरून आम्ही त्यांजवर दबाव घातला आहे. आता लढाई येथून दपटशा गेल्यावरी जाली नाही, परतु कुरकुर जात नाही. या उपरी त्याचे पारपत्य करून निंबगावचे ठाणे घ्यावे असी आज्ञा जालिया सरंजाम सुधा जाऊन पारपत्य करून. साहेब उभयताचेहि अगत्य धरितील तरी बंदोबस्त होणार नाही. दोघेकडून येकीकडील निष्ठुरता जाल्यास काम होईल. तूर्त कजिया करावयाचा नसल्यास कडेकरास पत्र पाठवावे की तूर्त कजिया न करावा. गढीचे काम राहो द्यावे. कब्याचे गडीचे काम करणेच तरी निबगावकराचे पारपत्य केल्यासिवाय ते काम चालों देत नाही. आम्ही उदंड ताकिदी केल्या तरी ते गडी बांधो देत नाही असे साफ सागतात; यास्तव पारपत्यच जाले पाहिजे. निंबगावकरानी कडेकराबरावरी दोन जुजे केली. कडेकराची दोन च्यार जखमी जाली; व निंबगावकराची तीन ठार व च्यार पाच जखमी येणे प्रा। जाले आहे. तूर्त जुज तकूब करून सेवेसी विनतीपत्र लिहिले आहे; तरी सविस्तर अर्थ ध्यानात आणून आज्ञापत्र सादर होईल त्याप्रा। वर्तणूक करू; निबगावकराचें पारपत्यच करणे आहे तरी आज्ञा सत्वर जाली पाहिजे विलंब लागल्यास मग ते जमावंदी करितील. हलीच काही जमावंदी करीत आहेत; परतु विलब लागल्यास भारी होईल. तरी सत्वरच आज्ञापत्र सादर जाहले पाहिजे. आज्ञेप्रा। तोफा व संरजाम घेऊन जाऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ganesh Vithal Waghmare writes to Dadasaheb that the Bhonsle's officer Bhagwant Gopal took objection to the redoubt that is being raised at Kada and attacked the ryots of the Taluka. All remonstrances to make him give up his raiding activities have failed. The writer solicits orders as to how he should proceed.*

2023

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 142] [4-12-1764

पौ छ १० जमादिलाखर मंगळवार

श्री

श्रीमंत राजश्री महिमत रावजी
दादा गोसावी यांसी

पाा विसाजी बलाळ कृतानेक आशीर्वाद विनंती. येथील कुशल ताा छ ९ जमादिलाखरपरयेत मुाा पेणगंगा यथास्थित असे विशेष. श्रीमंताचे आज्ञेप्रमाणे उभयता बंधू भोसले यास घेऊन छ मजकुरी मुाा मजकुरास आला. पुढें मजल दरमजल येतील. बाबती व सरदेशमुखीचा अमल निराळा होऊन घ्यावा एविसीचा दुराग्रह बहुत आहे. आम्ही म्हणतो कीं श्रीमंताची आज्ञा आहे जे कचा अमल द्यावा. हे म्हणतात जे मक्तियाप्रमाणे तफरीक करून देऊं. वराड प्रांती जो अमल आहे तो आमचा वतनी आहे म्हणतात. यास्तव फौज ठेऊन कचा अमल घेतो; परंतु हे दरबारी येऊन रदबदल बहुत करतील जे बाबती सरदेसमुखी आम्हाकडे करार करून द्यावी अथवा मक्तियाप्रमाणे पैका घ्यावा, तर हे आपण गोष्ट सहसा होऊ न द्यावी. हे गोष्ट जालियास बदनक्ष होऊन अमलाचा वलवंटा[१] मोडतो. सिवंदी खर्च व्यर्थ होईल. विशेष काये लिहिणे? कृपा निरंतर असो द्यावी हे विनंती[+].

¶*Visaji Ballal writes to Mahipatrao Chitnis asking him not to allow the Bhonsle brothers to claim the babti and sardeshmukhi dues from the Berars even if they press their claims for them.*

No. 143] [15-8-1764

श्री

छ १६ सफर

सेवेसी विज्ञापना येसीजे, साल गुदस्ता राजश्री साबाजी पाटील, राजश्री जानोजी भोसले सेनासाहेब सुभा याजकडे गेले. तदनंतर भोसले मोगलाकडे गेले. मागे मुले मनुष्ये कनेरखेडात होती. तेव्हा सातार्‍यास मानाजी सिंदे यासी बोलाऊन नेऊन जमान बालकोजी मान्या रहिमतपूरकर मोगलाचे गर्दीत घेतला. त्याजवर भोसलेहि साहेबाकडे आले. साबाजी सिंदेहि आले. त्यास

---

१ वहिवाट. + महिपतराव चिटणिसास पत्र.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

हली मानाजी सिंदे हिंदुस्थानात तीन वर्शाचे छयावणीस जातात. माघे मुले मनुष्ये आहेत त्यास उपद्रव होईल याजकरिता कतबा द्यावयाची आज्ञा करणार स्वामी समर्थ आहेत.

[१]संदरहूप्रा मालुमात उध्धारून या मजकुराचा जामीन कतबा घेतला आसेल तो देणे म्हणून व्यंकाजी माणकेश्वर यास पत्रे[२] देणे.

छ १६ सफर श्रावण खमस

¶*The letter refers to the order passed by the Peshwa cancelling the surety for Manaji Sindia and Sabaji Sindia, that had been obtained when these two deserted the Peshwa and went over to Janoji Bhonsle and the Nizam. Manaji Sindia Fakde is the grandson of Sabaji who was driven by Abdali from the Panjab in November 1759.*

No. 144] [*1765*

श्रीशंकर

सेवेसी त्रि॰ रा॰ व्यंकटराऊ मोरेश्वर प्रार्थना यैसीजे. सरकारात येथून तबके व पानदान व गुलाबपाश आले आहेत तर त्याची आज्ञा करणार धणी समर्थ आहेत की जो जिनस जामदारखानियात रुप्याचा आला असल तो देणे म्हणून आज्ञा करावी. दुसरे आम्ही येथील वर्तमान साहेबास विनंती केली. याउपरी साहेब म्हणू लागले कीं आम्ही येतो. त्याजवरून आम्ही येथे निवेदन केले. तर थोरले साहेबाचे पाय यावयाचे जाले तर उतम; नाही तर साहेबी तरी कृपा करून यावे, म्हणजे आम्ही येथे खरे पडू यैसे आहे. नाही तर लटीक वाद येईल. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापि.

¶*Vyankatrao Moreshwar writes about some silver articles and requests the addressee to come personally as promised.*

No. 145] [*1765 ?*

श्री

विनंती विज्ञापना यैसीजे. राजश्री जानोजी बावा भोसले व राजश्री मुधाजी बावा यैसे उभयेतां व कुटुंब घेऊन दरमजल आंबनेरास चालिले. किल्ल्याच्या

---

१ मजकूर निरनिराळ्यांच्या हातचा. २ लिहिणें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आसऱ्यास गेले. समागमे जे समई नागपुरीहून स्वार होऊन चालले ते समई पांच सातेकसे स्वारानसी गेले. दोन चार मजली गेलियावर मागून लोक गेले. राजेश्री साबजीबावा राजश्री देवाजीपंत यानी (एक)मेकाची समजुती करून कोणास पावले कोणास नाहीं ऐसे करून रवाना केले. राजश्री साबजीबावा व राजश्री देवाजीपंत हे उभयेतां आज १६ छ रजब यास शहरातून स्वार होऊन राजश्री सावाजी भोसले यांचे डेरे शहरापासून कोसावर जाले व राजश्री देवाजीपंत यांचे मागे सिताबर्डी याजवर आहेत. मागे पथके याज समागमे राजेश्री शंकराजी घोरपडा व सुंदरजसिंग बाजारी व किरकोल सिलेदार वगैरे आहेत. बाजार * दो कानसी आहेत. पुढेंहि राजश्री जानोजीबावा समागमे बाजार दोन तीन आहेत. राजेश्री देवाजीपंतानीं सावकारावर तफरीक केली. ऐवज एकमेकास वगैरे तोडून देत आहेत. येणेप्रमाणें फौजेचा बंदोबस्त करून बाहेर निघाले आहेत. शहरासहि पल सुटला आहे. सेवेसी श्रुत व्हावे. आणिक वर्तमान होईल ते सेवेसी लिहीत जाईन. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*The letter gives news about the military preparations made by Janoji, Mudhoji and Sabaji.*

No. 146] [*18-1-1765?*

पो छ ३ सावान

श्री

श्रीमंत राजेश्री दादासाहेबाचे सो

स्थापित जंगनाथ धोंडाजी साा नमस्कार विज्ञापना येसंजे. माहाराजाची कृपा पत्रे छ २९ रजंबी मौजे सागवी पाा भासर गगा तीर येथून नादेड साहा कोस तेथे पावलें. त्यात माार कीं खासा स्वारी वराडात पावली व नवाबसाहेब जंन-वडियापासी * * * सरदारास हुकूम गेला कीं तुम्ही हूजूरच येणे तर याजवरून काये समजावें आपणहि न आले व सरदारासहि येऊ दिधले नाहीं. तसमात कांही भोसल्याकडील सदर्भ असल. नवाब कायेम मिजाज आहेत, परंतु दिसता प्रकार जो आहे तो कळतच आहे. त्यास माहाराजास बातमी जनवाडियाची आणि नवाब तर गगा उतरले. येथून वासीम तीस कोस; तेथून कांरजे तीस कोस; येकून पनास कोस व बाळापुरीहून कारंजे चालीस कोस. माहाराजहि नागपूरचे रोखे कुच करितील तर कारंजियावरच जातील. आम्ही बाळापूरास यावें तो पनासा कोसाचा फेर पडतो, यास्तव परभाराचे कारंवियास जातो कीं भोसलीयाचा रुख तोच आहे. माहाराजीही येऊन पोहचावे. जैसी तजवीज महाराजानी केली

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहे तेणेप्रमाने पारपत्य केले जाईल. नवाबसाहेब व रुकुनुदवलाचा जो करारमदार शेरजंगानी व चिरजीव मोरोबानें सा॥ निवेदन केला आहे त्यात काडीभर अतर नाही. सरदाराचा मा॥र तर खावद गगा उतरले असता ते आपलाले जागा कोन्ही कूच केले आहेत ते थोडियास दिवसात येऊन पोहचतील. येथून नवाबानी वरचेवर त्याजला ताकीदी लि॥ होत्या कीं श्रीमंताचा आमचा स्नेह अकृत्रीम जाला आहे. तुम्हीं जलदीने जाऊन पोहचने. त्याच्या चितास न आले. काये चिता ? आता ही फौज बारा तेरा हजार समागमे आहे, यासिवाये गाडदी व जेजाल आंदाज वगैरे पायेदळ आहे व तेहि येतीलच यांत सदेह नाहीं. यासिवाये साहेबजादे येथून तीस कोस आहेत. त्याजसमागमें फौज व तोफखाना वगैरे सरजाम वेगळा आहे. तेहि जलद येतील. विशेष काये लि॥ हे विज्ञापना.

¶*Jagannath Dondaji to Raghunathrao informing him of the movements of the Nizam and Bhonsle.*

No. 147] [*27-1-1765*

श्री

यादी मसुदापत्र राजश्री देवजी पुरुषोतम यांस येणेंप्रमाणें कीं गु॥ तुम्ही निरोप घेऊन गेलां ते वेलेस लौकर यावें यैसा करार करून राजश्री सेनासाहेबसुभा गेले, तदोतर वरचेवर पत्रेहि येत गेली की फौजेची तयारी करून येतो. त्यावर चिरंजीव राजश्री रावसाहेब याणी गणेश तुकदेव याची रवानगी सेनासाहेबसुभा यांजकडे केली आणि पत्रे लौकर येण्याविसीं लिहिलीं. करारप्रमाणें यावे त्यास मा॥रनिले गेले, तेथें गेलियावर पत्रें पाठविलीं की सेनासाहेबसुभा यांस बंगाल्याकडे मसलत जाण्याची प्राप्त जाली. त्यास आता दिवस थोडके राहिले. फौज पाठविली आहे, ही सरंजाम काबीज करून चाकरीस येईल त्याप्रमाणे पत्रे पाठविली. त्यास सेनासहिब सुभा नागपुरीच राहिले. पुढें फौज जाहागिरीत मात्र आली. त्यास हे खासे बाहेर निघाले नाहीं. यामुले फौज येऊन जाहागिरीचेहि उपयोगी पडली नाही. व चाकरीचाहि प्रकार घडला नाही. आस्तु, आता तरी फौजेची तयारी वरचेवर करावी. आधी बाहेर डेरे देऊन लवकर यावयाचें करावें. चिरंजीव राजश्री राव याजकडील मजकूर तर हैदर नाईकाची व याची येक दोन वेल लढाई जाहली. हैदर नाईक याने फौजेचे सामान पाहोन युक्तीने बारी जवल केली आणि झाडीत पळून गेला. तेव्हा पर्जन्य कालचे दिवस झाडींत जाणें फौजेस नाहीं. मग कर्नाटक प्रातें छावणी केली, या गोष्टीने मोठी सलाबत बसली. समागमे राजश्री मुरारजी घोरपडे व नबाब सावनूरचे व दौलतराव घोरपडे हे ते

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

प्रांतीचे मातबर आहेत; व फौजा छावणीस राहिल्यायोगें सर्वांस आश्रये जाहला. वाडीकर सावंत व गोवकर फिरंगी यांजकडून विठल विश्राम आले, ते आपली तयारी करून येतात. श्रीरंगपटण वगैरे पलीकडील आश्रा जाला. त्याचे वकील पकीं राजकारणें घे(ऊ)न चिरंजीवापासी आले. याप्रमाणे तिकडील मजकूर जाला. येथून राजेश्री दमाजी गायेकवाड खासखेल यासहि पत्रें गेली. ते तयारी करून येतात यान्वये त्यांची पत्रें अली. त्यास सेनासाहेबसुभा यासहि दोन तीन पत्रें गेली आहेत, व निलो गोपाल पाठविले आहेत. त्यास मारनिलेची तर्तूद तुम्ही केलीच आसेल, परतु सर्व वर्तमान तुम्हांस समजावे, तेणेकरून तयारी लवकर करून येण्याची जलदी कराल, यास्तव तपसीलवार लिहिले आहे. त्याचें येणे जलदीनें जाहल्यास जाहागिरीचा बंदोबस्त सहजात होईल. खासा स्वारी सत्वरच श्रावणमासीं निघणार त्यास सेनासाहेब लौकर येऊन पोंहाचत तें करणें.

सदरहूप्रा॥ पत्रच तयार करून द्यावे म्हणजे श्रीमंत यापत्रावर विनंती करितील आणि पत्र पाठवितील यास्तव आताच पत्र लेहून पाठवावे. उदईक प्रात:कालीच येजमान स्वामीनी(जी ?)कडे पाठऊन देऊं.

¶*This is a draft of a letter proposed to be sent to Dewajipant Chorghode by Raghunathrao. He describes the successful march of the Peshwa against Haidar in the Karnatic. He also asks the addressee to make speedy arrangements for the march of Bhonsle.*

No. 148] [*13-5-1765*

पा॥ छ २ जिल्काद सन खमस
वैशाख

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

आज्ञाधारक व्यंकटराव मोरेश्वर कृतानेक सा॥ नमस्कार विनंती प्रार्थना यैसीजे. येथील क्षेम ता॥ छ २७ माहे सवाल मुकाम मोहखाबुसवाडी स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशष. स्वामीनी कृपा पत्र पाठविलें ते पाऊन परम आहलाद जाला. येथील वर्तमान तर राजश्री सेनासाहेबसुभा याचा प्रकार पूर्वी राजश्री नानानी व सेवकाने विनती लिहिलीच आहें. त्यासी आलीकड

2028

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
माहाराव निंबालकर यांचे तालुकियात घासदाणा घेऊन मग पुढे श्रीमंताकड पत्रे गेली आहेत. त्यांची उतरे आलियाउपरी मग तरतूद काये ठरल त्याजप्रो विनंती लिहून पाठऊ. साध्यंत वर्तमान येथील राजश्री नानानी लिहिले आहे त्याजवरून श्रुत होईल. पूर्वी आम्ही पत्र येकलेच पाठविले. जे आढले वर्तमान ते स्वामीस कलावे यास्तव जलदीने लिहून पाठविले. त्यासी स्वामीनी यासी लिहून पाठविले कीं पत्राचे उतर देखील न पाठविले तर तसा काही प्रकार नाही कीं उतर न द्यावे. मागून दुसरे जोडीबाार पत्री साद्यंत विनंती लिहून पाठविली. श्रुत होये हे विज्ञाति.

¶*Vyankatrao Moreshwar to Nana Fadanvis giving some news about Janoji Bhonsle. He reports also that Ghasdana is being collected by Janoji from the province under Janoji Nimbalker.*

No. 149] [*30-5-1765*

पैाा छ १३ मोहरम

सन सीत आषाढ मास

श्रीलक्ष्मीकांत

राजश्री रघुनाथपंत दादा

गोसांवी यांसी

८ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्वेाा जानोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती. उपरी: येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे विशेष. गोसांवियानी पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत जाहला. पाा आंबडापूर व पाा सवेली हे माहाल सरकारातून राजश्री पिराजी नाईक निंबालकर यांजकडे जाहागीर दिल्हे होते, त्यास त्याजकडून दूर करून तेथील कमावीस राजश्री खंडेराव बलाल यांजकडे सांगितली असतां नाईक मशारनिलेनी जाहागिरीचे वसुलाकरितां आंबडापूरचे नागो त्रिंबक देशपांडे व वकील देशमुख व सेवलीचे जमीदार धरून नेऊन वसुलाचा तगादा करितांत म्हणोन लिहिलें त्याजवरून नाईक मशारनिलेसी हरदू माहालाविसी मजकूर केला. त्याणी राजश्री रामाजी बलाल यांचे समक्ष जाबसाल केला कीं आपण काही तेथील वसूल साल मजकुरी घेतला नाही आणि जमिदारहि आणिले नाहीत. अमल सरकारचे कमाविसदाराचे स्वाधीन केला

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
आहे म्हणोन आटोलियाजकडील बालाजी बावाजी यांची साक्ष पुरऊन दिल्ही. आपणास कलावे यास्तव लिहिले असे. रा। छ ९ माहे जिल्हेज; सूज्ञाप्रति विशेष काये लिहिणे? कृपा लोभ आसू दिला पाहिजे हे विनंती.

¶*Janoji Bhonsle writes to Raghunathrao that the complaints brought against his Sardar Piraji Naik Nimbalkar, regarding his hostile activities against the new officers of Ambadapur and Saveli, are baseless.*

No. 150] *[June 1765*

श्री

मसुदा राजश्री सेनासाहिबसुभा यांस पत्र विशेष. आपण गंगेचे तलावरून गेला त्यास तयारी करून येतो यैसाच करार करून गेला. तदोतर आपली पत्रेहि याच आन्वये येत गेली. त्यास लस्कराहून चिरंजीव राजश्री राव याणी व्यंकटराव मोरेश्वर व गणेश तुकदेव यासमागमे पत्रे त्वरीत यावे याआन्वये दऊन रवानगी केली आणि मा।रनिलेस पाठविले. त्यास हे तेथे गलियावर आपली पत्रें आली कीं, मुलूकगिरीस थोडे राहिले व आपणास बंगाल्याकडील कार्य उपस्थित जाहले. त्यास करांडे वगैरे सरंजामाच्या बदोबस्तास पाठविले आहेत. तिकडे चाकरीस येतील. आपण गढ्यामंडलियापावेतो जाऊन कांही फौज कासमआलीकडे मुधोजीबावाबा। पाठऊ, बादवरसात आम्ही पुढें लवकर येतो. यान्वयें पत्रें आली. त्याची उतरें इकडील मर्जीचे आशये लेहून पाठविलीं ती पावोन कललेच आसेल. कराडे याजबा। फौज मात्र आपली सरंजामात आली. आपले जाणे तिकडे घडलें नाहीं. त्यास.आपण आसल्याविना कोणताहि बंदोबस्त पु(र)ता होत नाही. नुस्ती फौज त्यांस सिकस्त पोहचून खराबीमात्र जाली. सरंजामाचा बंदोबस्त पुर्ता जाहला नाहीं. व फौजहि चाकरीच्या उपयोगी पडली नाहीं. मध्येंच कालहरण जाले. येक आपले राहाणें जाले. पुर्ता बंदोबस्त सरंजामाचा जाहला नाही. व करनाटकचे मसलतीसहि तुम्हांकडील फौजेचा उपयोगं गु॥ पडिला नाहीं. येणेकरून मनसुबा ठीक न जाला. आस्तु. यंदा आपले येण्याचा प्रकार दोन तीन पत्रीं लेहून पाठविला आहे. आपले येणे लवकर जाल्याने सर्व नीट होईल. चिरंजीवकडील मजकूर तरी हैदरनाईकाची व याची येक दोनदां गांठ पडली. त्यास आश्रयेने मात्र तो उभा राहिला. तथापि इकडील तोफ कारभार जरब पाहिला व फौजाहि मातबर व तिकडील प्रांतपैकी मुरारजी घोरपडे व सावनूरचे नवाब व दौलतराव घोरपडे सर्व व आपले सरदार हे पाहोन त्याणे बारी जवल

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

करून झाडींत गेला. मागून झाडींत जावे तर पर्जन्यकाल रावतांस या दिवसांत जाणे उपयोग नाहीं. उन्हाले दिवसांत तेहि घडते. त्यास मंग छावणी करावी हा मनसुबा करून छावणी केली. यामुळें तिकडील सर्व मातबार श्रीरंगपटण वगैरे संवछानीक यांस दुपट बल पडले. श्रीरंगपटणांत याचा कोण्ही होता. आधिकारांतून काढिला आणि तमाम सारे याचे व किले आले. इकडे सावंत गोवियाचे फिर्गी याणी विठल विश्राम पाठविले. आपण तयारी करून येतो. याप्रमाणे जाहले. हैदरनाईक झाडीत बसला आहे. तमाम मुलकांत फोजा आपल्या आहेत. याप्रमाणे जाले. त्यास खासा स्वारी तिकडे लौकर जाणार. आपले येणे सत्वर होऊन आमची आपली गाठ पडावी याआन्वये निलो गाल (गोपाळ ?) आपल्याकडे पाठविले. दोन तीन पत्रेंहि गेली आहेत. त्यावरून आपण तो तयारी केलीच आसेल. परंतु जलदीने यावे यास्तव पत्र लिहिले आहे. आपले येणे जाहल्यावरी जाहगिराचाहि बंदोबस्त सत्वरीच होईल. सर्वांचे पारपत्य करणें आगाध नाही. दमाजी गायेकवाड सेनाखासखेल यासहि पत्रें गेली. त्याची उतर आली की, सत्वरीच येतो. त्यास आपणहि येण्याविसीं त्वरा कराल ती उपयोगावर पडेल. मनसुबियाचा विषये तुम्हीहि दूरंदेसी फार जाणतच आहां. लिहिणे नलगे. सारांश जलदीने यावयाचें करावें. आंम्ही श्रावण मासी बाहेर निघतों. तोफखान्याची व कांही हुजरात तयारी जाली आसे. गाये(कवाड) सत्वर येऊन पोंहचतात. तेथून कूच करून जालनापूरचे रोखे येतो. आपण लौकर येऊन पोंहचावे.

¶*This is a draft of a letter intended to be sent to Bhonsle by Raghunathrao who has asked him to join the Peshwa with his forces in the campaign against Haidar. The campaign—he says—has already begun and Haidar has fled to the woods being pursued by Murarji and Daulatrao Ghorpade and the Nawab of Savnur.*

No. 151] [*27-7-1765*

श्रीलक्ष्मीकांत

राजश्री रघुनाथपंत दादा गोसावी यांसी

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो जानोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती. उपरी, येथील कुशल जाणोन स्वकीय कुशललेखन करीत असिलें पाहिजे विशेष. गोसावियांनी पत्र पाठविले ते प्रविष्ट होऊन लेखनाभिप्राय अवगत जाहला. हैदर नाईकाचे पारपत्य पुरते जाहल

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नाहीं यास्तव यंदा आपली स्वारी जात आहे तरी आपण श्रावणात बाहेर निघोन सत्वर यावयाचे करावे म्हणून लिहिलें व एतद्वीशईचे कितेक अर्थ रा मल्हार बाबुराव व निळो गोपाळ याजसमागमे सांगोन पाठविलें. ऐशियास येथील अर्थ लिहिणे तो वारंवार लिहिलाच आहे. आज्ञेप्रमाणे श्रावणांत निघोन गंगाथडी प्राती येऊन फौजेचा गाहा करीत असो. पुढें ज्याप्रमाणे आज्ञा होईल तैशी वर्तणूक होईल. एतद्विशईचा अर्थ निळो गोपाळ यासी बोलणे तो बोलिलो आहो ते सविस्तर लिहितील त्याजवरून विदित होईल. रा छ १३ माहे सफर. सूज्ञाप्रति विशेष काय लिहिणे? कृपा लोभ असो दिला पाहिजे हे विनंती.

॰ श्री ‿
श्रीशाहूराजपदांभोजभ्रम-
रायितचेतसः ॥ विम्बात्म-
जस्य मुद्रैषा राघवस्य
विराजते.

मोर्तब
सूद

¶*Janoji Bhonsle to Raghunathrao informing him that he is, as instructed by him, proceeding to Poona to help the addressee in his expedition against Haider.*

No. 152] [*1-8-1765*

श्रीलक्ष्मीकान्त

राजश्री रघुनाथपंत दादा
गोसांवी यासी

ﷴ सकलगुणालंकरण अखंडितलक्षुमीआलंकृत राजमान्य श्रा जानोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती. उपरी: येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असिलें पाहिजे विशेष. गोसांवियानी पत्र पाठविलें ते प्रविष्ट जाहालें. राजश्री गणेश तुकदेव यांची रवानगी केली ते येऊन दाखल जाहालें.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

सविस्तर अर्थ अवगत जाहला. आपलेकडील कोण्ही मातबर ग्रहस्त राजश्री रामाजी बलाल याजसमागमे पाठवावा म्हणोन वरचेवरी पत्रे आली. ऐशियास गणेश तुकदेव यासच पाठवावें ऐसे होते, परंतु यांच्यानी कितेक अर्थांचे जाबसाल होऊन न येत व गोसांवियांचीहि पत्रे दुसरा कोण्ही पाठवावा म्हणोन आली; तेव्हा न जाणो याजवरून काही मर्जीत अंतर पडले असेल किंवा काही उदाम रीत भाषणात आली असेल. असो; रामाजी बलाल याजसमागमे राजश्री मैराल काकाजी यांस पाठवावयाचा निश्चये केला आहे. या पत्रामागे सत्वरच दो चौ रोजात सेवेसी येऊन पोहचतील. तदनंतर कितेक विनंती करणे ते करतील. वरकड पत्री काही सधिग्ध अर्थ लिहिलें त्यास यांचा परिहार वारंवार कोठवर ल्याहावा. आतां ईश्वरच आपलें चितात आम्हांविसी ममता आणून संकटापासून दूर करवील. रा छ १३ माहे सफर. सूज्ञाप्रति विशेष काये लिहिणे. कृपा लोभ असू दिला पाहिजे हे विनंती.

(मोर्तब सूद)

¶*Janoji Bhonsle intimates to Raghunathrao of the arrival of Ganesh Tukdeo and of his intention to send Mairal Kakaji with Ramaji Ballal.*

No. 153] *[17-8-1765*

पो छ १९ रबिलौवल सुा खमस

श्रीशंकर

सेवेसी विनंती. आज्ञाधारक व्यंकटराव मोरेश्वर कृतानेक सा नमस्कार विनंती प्रार्थना यैसीजे. येथील क्षेम ता छ २९ माहे सफर मुकाम नागपूर माहाराजांचे कृपा आवलोकनेकरून येथास्थित असे विशेष. येथील वर्तमान तर जानोजी बावा भोंसले सेनासाहेबसुभा यानी बाहेर निघावयासी श्रावण वद्य येकादसीचे मोहर्त पाहून ते दिवसी तयारी देखील जाली. उटे लादली. तोफखाना वगैरे कुल तयार जाला. त्यास सेनासाहेबसुभ्याचे नेत्रास दुखत होते, फार श्रमी होते, त्यामुले सार्‍यानी मिळून सागितले कीं महतकार्यास जाणे आहे, सावकाश वाटलीयाउपरी मोहर्त पाहावे. त्यावरून याचे राहणे जाले, नाहीतर निघावयासी गुता नवता. हे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

केवल येकनिष्ठ आहेत दुसरा विचार तिलतुल्य नाही. कितेक अर्थ राजश्री चिंतोपंत सातारकर विनंती करतील त्याजवरून श्रुत होईल. सेवकाचा खर्चाचा परामृश करावा. माहाराजांचे सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar writes to the Peshwa from Nagpur that Janoji has made all preparations to start for Poona but is advised to postpone the march owing to an eye complaint from which he suffered.*

No. 154] [*22-8-1765*

पौ छ १९ सौवाल

श्रीशंकर

सेवेसी विनंती. आज्ञाधारक व्यंकटराव मोरेश्वर कृतानेक सा। नमस्कार विनंती प्रा। यैसीजे. येथील क्षेम ता। छ ४ माहे रबिलावल मुकाम नागपूर माहाराजाचे कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशष. येथील वर्तमान तर राजश्री सेनासाहिब सुभा याणी श्रावण वद्य ११ येकादसीचे मोहर्त देखील पाहिले. डेरे लादले; उटे तयार केली; स्वारी तयार जाली; घोडीयावर स्वार होऊन बाहेर निघावे त्यासी खाश्याचे डोल्यास आजार जाला होतां त्याजवरून चौघानी सांगून राहविले ते मोहर्त राहिले. आता पुढे भाद्रपदमास तर वेर्थ आहे. दसरा जालियाउपरी मोहर्ते-कडून निघावे हा निश्चय केला आहे; मग पाहवे. राजश्री सेनासाहिबसुभा यांचे चितात मात्र तिलतुल्य दुसरा प्रकार येकदर नाही. पटलियाकडून सुज्यायेतदौला वगैरे याजकडून मिरजा साले म्हणून येत होते त्यासी तो गलियासी आला तेथे आजार जाला त्या अजाराने वारला. मोठ्या मनसबियावर आला होता. धण्याचे ताले सिकंदर आहेत. याणी येथून राजश्री गणेशपंत व निलो गोपाल यासी कारभारास स्वामीकड रवाना केले आहे. त्यासी कोण्हेहि प्रकारे स्वामीनी खर्चास द्यावे आणि कड वगैरे कामे करून द्यावी हा हेत फार आहे. तर मरजीस येईल तर याचे मुदे जे आहेत ते करून देतील. हमी कुल वर्तमान पेशजी राजश्री चिंतोपंतास कुल वर्तमान लिहिलेच आहे ते ध्यानास येईल. आम्ही चाकर आहोंत. विनंती मात्र त्याहावी. येथील वर्तमान कुल गणेशपंत मुखजबानी साद्यंत निवेदन करतील. मा।निले केवळ सरकारचे आहेत. दुसरा विचार तिलतुल्य नाही. माहाराजाचें सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar informs the Peshwa of Janoji's preparations for a march and of the delay caused by his eyes being sore. The death of Mirza Sale, an envoy of Sujauddaula, coming to the Bhonsles from Patna on some mission is also reported. It seems Sujauddaula and Mir Kasim at this time made an effort to secure Janoji Bhonsle's help in driving the English from Bengal and Behar.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 155] [16-10-1765

श्री

राजश्री बाळाजी जनार्दन स्वामी गोसावी यांसि

विनंती. उपरी, राजश्री जानोजी भोसले यांजकडून चार लक्ष सतावीस हजार रुपयांच्या हुंड्या आल्या त्यापैकीं चारलक्षांच्या मोरो बलाळ पटवर्धन यांजवळ आहेत. सातावीस हजाराचे हुंडीचे ठिकाण लागत नाहीं. राजश्री बाळकृष्ण शास्त्री तीस हजार व पांडुरंग जोशी पंधरा हजार, एकूण पंचेताळीस हजार रुा उभयतांस मोरो बल्लाळ याजकडून देविले म्हणोन लिहिलें ते कळलें, व कबजें पाठविलि ती पावली. सतावीस हजारांचे हुंडीचे ठिकाण लावावे म्हणोन लिहिले त्यास हुंड्याचा मजकूर रुा

४००००० मोरो बलाळ पटवर्धन यांच्या हवाली केल्या त्याचा खर्च.

३६९००० दिा गोविंद हरी

३१००० किता

३०००० बाळकृष्णशास्त्री.

१००० पांडुरंग जोशी.

———

३१०००

———

४०००००

२७००० परशराम नाईक अनगळ याचे हवाली हुंडी केली त्याचा खर्च

१३००० लक्ष्मण बलाळ कर्जाबाा

१४००० पांडुरंग जोशी पंध(राहजारापो)

———

२७०००

———

४२७०००

येणेप्रमाणे चार लक्ष सतावीस हजार रुपयांच्या हुंड्या आल्या. त्याची नेमणूक सदरहुप्रमाणें जाली आहे. सतावीस हजाराची हुंडी अनगलांजवळ आहे. त्यापैकीं लक्ष्मण बलाळ यांचे तेरा हजार देऊन बाकी चौदा राहिले. त्यास मोरो बलाळ याजपासून चौदा हजार घेऊन पांडुरंग जोशी यांस दिल्हे आहेत,

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

त्यांस मुबादला ऐवज अनगळाकडील चौदा हजार देणे. हंसपुरी गोसावी यांजकडील आपाजी चिमणाजी कारकून पुण्यांत आले. त्याणीं चहुलक्षाच्या हुंड्याचा भरणा केला म्हणोन लिहिलें तें कळलें. व त्याचें पत्र पाठविलें ते पावले. सतावीस हजारांचे हुंडीचा भरणा जाला असला तरी उत्तम. नाहीतर लिहिल्याप्रमाणें भरणा करून देणें. राा छ ३० रबिलाखर हे विनंती.

पोा छ ६ जमादीलवल

¶*Madhavrao explains to Nana Fadnis some money matter in connection with dues received from Janoji Bhonsle.*

No. 156] [*4-11-1765*

पौा छ १ जाावल सन सीत

श्री

सेवेसी विज्ञापना. उदईक मगळवारी येथून कूच होऊन राजेवाडीस मुकाम जाणार. खासा स्वारी सासवडास जाऊन राजेवाडीस माघारे येणार. याप्रमाणें ठराव जाला आहे. राजेवाडीहून मोरेश्वरचा मुकाम. खासा स्वारी जेजूरीस जाऊन मोरेश्वरास येतील. याप्रमाणे आहे. राजश्री हरिपंत तात्या याणी जलद येऊन पोचावे याप्रमाणे आज्ञा जाली आहे. हबशाचे वकिलास प्रातःकाली येथून निरोप होणार व आणखी कामकाजे आहेत. यास्तव येथेंच तलावर यावेसी आज्ञा जाली आहे. तोफखाना येथून गार दौडेचे सुमारे सकाली जाऊन राहेल. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*The letter gives the itinerary of the Peshwa proceeding to Morgaon. Hari Ballal has been summoned there by the Peshwa.*

No. 157] [*24-11-1765*

पौा छ २९ माहे जााखर

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
रामाजी अनाजी स्वामीचे सेवेसी

सेवक नारो कृष्ण सां नमस्कार विनंती. उपरीः येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जावें विशेष. तुम्ही राजश्री सदासिव कानेरे याजसमागमें

2036

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

छ १२ जीवलचें पत्र पाठविलें व दुसरें पत्र छ २१ माहे मजकुरचे रवाना केले तेहि पावलें. लिहिलें वर्तमान सविस्तर कलो आलें व पंत मारनिले याणीहि सांगितलें. ऐसियास हरदू पत्रांचे कलमवार जाबसाल मागाहून याजसमागमें लेहून पाठवितो. लौकरीच येऊन पावतील. शहरीं भवानी हती आहे, तो जलदीने पाठऊन देणे म्हणून सरकारची आज्ञा; त्यास रवानगी केली पाहिजे, तरी येविसी लेहून पाठवावे म्हणून लिहिलें. त्यास सरकारआज्ञेप्रमाणे हतीची रवानगी लौकर करावी; दिसगत न लागे ते करावें. यानंतर श्रीमंत राजश्री दादांसाहेब कासारबारी उतरले; याउपर बाणाची वगैरे फरफरमासीची जलदी होईल. तुमचे येथे तर तूर्त सातसे बाण तयार आहेत म्हणून लिहिले होते. त्यास येविसींची समजोती कैसी निघते? श्रीमंताची मर्जी येके प्रकारची, ऐसियास आजीपावेतो कितेक कामाची तरतूद फारच चांगली राखली आहे. त्याप्रमाणे श्रीमंताचे स्वारीचा सरंजाम बाणाचा वगैरे किरकोळी फरफरमास येईल त्याची तरतूद बहुत उतम खुद जातीनसी मेहनत करून राखावी. राजश्री धोंड जोसी तात्या व राजश्री अंबादास बलाल व धर्मोजीपंत लस्करात श्रीमंताजवल आहेत. हरयेक जाबसाल लहान मोठा वरचेवर त्याजकडे लिहित जावा. त्याजकडूनहि उतर प्रत्योतर येत जाईल त्याप्रो कामकाजाची वगैरे सरबरा करीत जावी. सारांश श्रीमंताचे मर्जीनरूप हरयेक कामाकाजाचा डौल येथास्थित घडोन येई ते करावे. आजीपावेतो कितेकविसी तरतूद फार चांगली रक्षिली असे, त्याचे समजोतीचा समये हा आहे यास्तव वारंवार लिहीत आहो. बाणाचे वगैरे फरफरमासीकरिता काही ऐवज लागले; त्यास तूर्त दोनच्यार हजार रुपये हरतजवीजीने अनकूल करून काम करावें; कोण्हेविसीं नून न पडे ऐसे करावें. राजश्री धोंडो बावाजी कामाकाजात खलेल करितात म्हणून येथे बोभाट आला; त्यास लस्करांतून येविसी राजश्री धर्मोजीपंत मारनिलेस ताकीद करून लिहितील, कलावे. वरचेवर पत्रे पूर्वी कल(म)वार पाठवितच आहो; त्यास श्रीमंताची स्वार तिकडे समीप येत चालली. तुम्हीं तर्तुदेत सावधपणे वर्तून मर्जी लस्करांतून चिरंजीव जोसीबावा लिहीत जातील त्याजप्रा असावे. आमचेहि येणे लस्करांत सत्वरच होईल. रा छ १० जाखर सुा सीत सीतैन मया व अलफ. बहुत काये लिहिणे? लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Naro Krishna (Bhuskute) to Ramaji Annaji asking him to send one elephant to the Peshwa and also to supply ammunition to Raghunathrao, and be serviceable to him in every possible way.*

2037

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 158] *[11-12-1765 ?*

छ २७ जमादिलाखर

श्री

साहेबाचे शेवेसी चरणरज खंडोजी गुलदगडे चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग दंडवत विज्ञा(पना) येसीजे. राजश्री सेनाधुरंधर यांजपासीं लोकाचे धरणे नालबंदी रोजमुरियाकरितां काली दोन प्रहरापासून बैसले तें अद्यापि उठलें नाहीं. गारदियांचे धरणे परवा होते तें त्यास हती उसणा घेऊन दिल्हा. बाकीचा येवज बारा हजारांत साहा हजार त्याचा हवाला मोरो रघुनाथ यानी घेऊन समजाविले. याप्रमाणे येथील वर्तमान सेवेसी श्रुत होये हे विज्ञाति.

¶*Khandoji Guldagade informs his master how Mudhoji Bhonsle is being harassed for payment by the troops.*

No. 159] *[15-12-1765*

छ २ रजब सन सीत

श्रीशंकर

येथील वर्तमान तुम्हास लिहीत जात असेलच. खुलासा भोसल्यावरी जरब भारी बसली तेव्हा ते शरण आले. बहुत गरीबपणे हजुर पत्रे पाठविलीं त्यातील पत्र बजिनस धोंडराम याचे पत्रांत घालून पाठविले असे. पत्र आलियावरी रयात न करणे व केवळ निकर्षच करणे थोरपणास उचित नाही, यास्तव बलाऊन घेतले. वाटेने लुटले जातील, सबब चितो विठल व विठलराव सिवदेव यास रखवालीस पाठविले. भोसले हजुरात लोकरच येतील. त्याचे गरीबीवर नजर देऊन व थोडी बहुत शास्तही करून कारभार विल्हे लाविला जाईल. कदांचित कारभार न बनला तरी माघारे लाऊन देऊ. सारांश नवाबाचे येणास विलंब लागला म्हणोन नवाबाचे करारात अंतर करूं येसे नाही, आधी नवाबासी बोलल्याप्रमाणे जागीर सोडऊन मग सरकारचे काम होईल ते करू. आम्हास हिंदुस्तानात जावयाची त्वरा. तिकडे बहुत कामे. दिवस थोडे उरले. सबब हा गुंता लोकरच उरकोन नर्मदा उतरोन प्रयागचे सुमारे जाणार. चिरंजीव रायाची रवानगी दक्षणेस करणार. ते सविस्तर तुम्हास लिहितील. मुख्य गोष्ट सेरजंग व मोरो धोंडाजी याचे मारफतीने करार जाला त्याप्रमाणे आमलात आणून करभार विल्हेस लाऊ. नवाबचे येण्यास दिवसगत लागली. सबब भेटीचा मार राहिला. नाहींतर भेटी होऊन जावे येसेच मानस होते. असो. भेटीवर काय मदार आहे. मुख्य

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वचना सचोटी राखिल्याने परस्पर स्नेह अधिकच वाढेल. हमेशा तिकडून खुषखबरा लिहीत जाणे. भोसल्याचे पत्र वाचून माघारे पाठवणे. त्याणी बहुत गरिबीने लिहिले. सबब कृपा आली यास्तव कारभार केला व वराडचा मुल्क निमे नवाबाचा त्याची ही खराबी न व्हावी, नवाबाचा मुल्क तो आमचाच समजतों, यास्तव जलद या मुलकाहून फौज उतरेस घेऊन जाऊं. श्रीसता प्रमाण. आद्यापि कारभार ठहरला नाहीं. तथापि तुम्हास इतला असावी. नवाबास सविस्तर पत्रार्थ समजणे.

¶*News letter giving details of an expedition against Janoji Bhonsle and the Nizam by Raghunathrao. The letters appear to be from Raghunathrao to the Peshwa's agent with the Nizam.*

No. 160] [*19-12-1765*

पैा छ १९ रजब सनसीत

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत ६ छ रजब मुकाम नजीक मलकापूर वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी येक दोन पत्रें पाठविलीं तीं पावलीं वर्तमान कललें. सरकारचें पत्राचा जाब मागाहून पाठऊं. इकडील वर्तमान तर उभयतां श्रीमंताच्या भेटी येदलाबादच्या मुकामी (जाहाल्या. चार) मुकाम तेथें जाहाले. तेथून कूच करून बालापूरचे सुमारें जात आहेत. फौज राजश्री विठलराव सिवदेश नारो शंकर सुधां पंधरा अठरा हजार जाली. आले असें आहे. तूर्त वराड प्रांतचे जत्तीस सित्रभट साठे याजबराबर च्यार हजार फौज देऊन रवाना येक दोन रोजांत होईल. पुढें होईल तें लिहून पाठऊं. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना

¶*Hari Ballal writes news to Poona about the Peshwa joining his uncle and proceeding to Balapur.*

No. 161] [*24-12-1765*

पैा छ २३ रजब सन सीत पौष मास

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ११ रजब मुाा नजीक मलकापूर वर्तमान यथास्थित असें विशेष. स्वामीनी दोन तीन रवानग्याचीं पत्रे पाठविली ती पावोन बहुत संतोष जाहाला. इकडील वर्तमान

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

तर भोसल्यासी बिघाड जाहाला. तूर्त माहालची जप्ती करावी हा मजकूर. त्यास येकीकडे बचयाजी विश्वनाथ भोसल्याकडील, येकीकडे गोपाल संभाजी व कृष्णाजी अनंत तांबे याप्रों रवानगी जाली. दोन्ही रवानग्या मिळोन चार हजार फौज जाईल. कृष्णाजीपंत तांब्याची बोली तीनसे राऊताची थोरल्या श्रीमंताकडे जाली. सारी फौज उभयतां श्रीमंत व राजेबहादर व उमदेमुलमुलुक मिळोन पंधरा अठरा हजारपर्यंत जमा जाली. नित्य फौज पांच सातसें राऊत देसींहून येतच आहेत. मोगलाने कुमकेस यावे, त्यास भोसल्यापैा पंधरा लक्षांची जागीर द्यावी असें ठरले आणि सेरजंग आणावयास गेले परंतु लवकर येतीलसें दिसत नाही. बहुत गलाव्यांत आहेत. उभयतां निंबालकर लवकर आले तर येतीलसें दिसते. भोसल्यांजवळ सारी फौज दाहापर्यंत होईल. आजपर्यंत पत्रे फार नर्मतेची येतात; परंतु सेवट जुजतील किंवा तह करितील हें कळत नाही. झुंज जाले तर मराठे झुंज कठीण पडेल. होईल ते लिहून पाठऊ. भोसल्यांचा कारभार फैसल जाल्यावर थोरले माहाराज हिंदुस्थानांत जाणार. हैदरनाईकाकडील वकील आले आहेत. बोलीला ठरेल ते लेहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal informs the Peshwa of the arrangements made by him for confiscating the Mahals of the Bhonsle. He further gives the strength of his combined forces.*

No. 162] [*December 1765 ?*

श्री

श्रीमंत राजश्री महिपतरावजी
दादा गोसावी यांसि

पा। विसाजी बलाळ कृतानेक आसीर्वाद विनती. येथील कुशल ता। छ २० जाखरपरयेत आपले कृपेकरून वर्तमान यथास्थित आसे. विशेष:—राजश्री जानोजी भोसले यास गंगेपावेतो श्रीमताचे आज्ञेप्रमाणे घेऊन आलो. दो चौ रोजात येऊन पोहचतील. बाबती सरदेसमुखीचे अमलाचे वृत तर आजपावेतो भोसले आपला वतनीच म्हणत होते. आम्हास * * * * ल्हा नाही. आम्ही सनदा जमीदारांस दाखऊन अमल जपत्त करून श्रीमताकडे चाललो हा निश्चय यास कळल्यावर आपले मामलेदारांस मोघम पत्र दिल्हे की, सुदामतप्रमाणे आमल देणे. परतु अतरयामी सांगितले की दरबारास जाऊन पूर्ववत प्रमाणे आमल आपणाकडे करून घेतो; यास अमल सुरलीत न देणे ऐसे यास

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सागितले आहे. परतु आम्ही सिबदी ठेऊन जोर पोहचऊन वसूल घेतों. दरबारी रदबदल करितील त्यास आपण श्रीमतास विनंती करून यांची रदबदल न चाले आणि अमल सुरलीत मोगलाचा याचा तह जाला आहे त्याप्रमाणे भोसले यास ताकीद होऊन तहनामा याचा पाठऊन दिल्हा पाहिजे म्हणजे अंमल सुरलीत चालेल. येविशीची विनती आम्ही येतेसमई आपणास केलीच आहे. आपण मान्य केले. दुसरा आश्रय आपणाखेरीज कोणांचा नाही. कागदाचा जाबसाल यथास्थित करून घ्यावे म्हणजे आपण धंदा सागितलेचा परिणाम उतम आहे आणि आमल सुरलीत चालेल. येविशी श्रीमतास विनती पत्र लिहिले आहे. त्याप्रों जाबसाल उगऊन घेणार आपण आहेत. सेवेसी श्रृत होये हें विनती.

¶*Visaji Ballal complains to Mahipatrao about his difficulties in collecting revenue from the districts recently ceded by the Bhonsle.*

No. 163] [*December 1765*

श्रीशंकर

सेवेसी विज्ञापना. काल शहरची पत्रे पांच दिवसांची आली. त्यांत मजकूर लिहिला होता की देवाजीपंत राजश्री मुधोजी भोसले यांस घेऊन श्रीमंत यांचे भेटीस गेले. रा जानोजी भोसले गेले नाहीत; परंतु सुखरूप आहेत, यैसी लिहिली आली म्हणून लिहिले होते. सत्यमिथ्या श्री जाणे हे विनंती

¶*This paper gives the news that Dewajipant is proceeding with Mudhoji Bhonsle to meet the Peshwa.*

No. 164] [*31-1-1766*

श्री

सेवेसी गोविंद मल्हार कृतानेक सास्टांग नमस्कार विज्ञापना यैसीजे. जाणोजी भोसले याजकडील वर्तमान तरी आज छ १९ रोज सुक्रवारी मोगलाकडील याचे येथ वर्तमान आले की नागपुरा आलीकडेस पधरा कोसाचे सुमारे मोगलाची फौज काही गेली आणि तिकडेस याची कुटुब वगैरे बुनग गेले होते त्यास मोगलाची दहशत फार प्राप्त जाली की कैस काय होईल. जागा जागा मोगलाची फौज खडन्या घेत चालला म्हणून येथ बातमी आली त्याजवरून देवाजीपंत व जाणोजी भोसले यैस श्रमी जाले की काल श्रीमंतास मोगलाची पत्रे आली ते बजिनस

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आम्हाकडेस पाहावयास पाठविली ते पाहिली. परंतु त्या पत्रात काही भाव हा नाही आणि मागें येस कर्म अवलंभिले याचे कारण काही कलत नाही. पेसजी पंत * * आज समाधान नाही, यास्तव (ख) * * नाहीत. उदईक जाईन, येसी * * * * सी श्रीमंतास सर्व वर्तमान * * * करीन येस जाणोजीबावास * * * सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Govind Malhar writes to the Peshwa how anxious both Janoji and Devajipant were on account of the sudden appearance of the Nizam's forces in the vicinity of Nagpur. They could not explain, he writes, this conduct of the Nizam as he does not refer to it at all in his letters to the Peshwa.

No. 165] *[1-1-1766*

पौ छ २८ रजब शीत पौष

श्री

सेवेसी माहादाजी बलाल व हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १९ रजब मुाा बालापुर वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी छ २ रजबचें पत्र पाा तें पावोन लिहिलें वर्तमान सविस्तर कललें. भोसले नागपुरा-आलिकडे दाहा कोसांवर आहेत. पांच हजार फौज जवल आहे. तुलजोपंत दोन हजार फौजेनसी पुढें आहेत. पिराजी नाईक साकरखेडल्याकडे आहेत. त्यास पत्रें भोसल्यांची गेली आहेत तिकडे जातील. श्रीमंतानी वऱ्हाड प्रांताची जप्ती केली. बालापुरची खंडणी येक लक्ष पंच्यातर हजार जाली व आकोल्याची खंडणी येक लक्ष सतर हजार जाली. वरकड माहाल दाहावीस हजार खंडणी होतच आहे. भोसल्याकडील बोलण्याचा प्रकार अद्यापि काही नाहीं; परंतु श्रीमंताची फौज भारी यापुढे+ निर्वाह होणे कळतच आहे. बोलीचे राजकारण लागले असे दिसते. निजामअलीखान कुमकेस येणार ते हैदराबादेसच आहेत. त्याजकडे धोंडो राम व मोरो धोंडोजी गेले आहेत, तेहि येणार. उभयता निंबाळकर फौज सुधां इकडेच येणार. इतका जमाव जाला. सर्वांनीं मेहनत केलीतर भोसल्याचे आगाध नाही. परंतु श्रीकृपेने घडेल ते खरे. आपण पत्रे श्रीमंतास पाा ती एकांती दाखविली. पैक्याटक्याचे सर्व अर्थ त्यांचे ध्यानात येऊन चुकले. यंदा

+ माधवराव पेशव्याची नागपुर भोसल्यांवर स्वारी झाली त्यासंबंधींचें पत्र. महादाजी, बापूजी व हरि बल्लाळ हे फडके त्रिवर्गबंधु होत.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दुसऱ्यास सांगावे लागत नाहीं. त्याणीच नेमणुक करून दिली. त्यांत जमेत कमी खर्चात जाजती नहेमीच होत चालिले हे सर्व अर्थ समजले आहेत. बऱ्हाणपुरास आमीन आपण योजिला असेल तोच पाठवावा अशी आज्ञा सरकारचे पत्री आली आहे. राजश्री बज्याबाचा मजकूर लिहिला त्यास अद्यापि सासवडकर मंडळी येथे कोणी आले नाहीत. आलीयावर सावध असो. स्वामीनी चिंता न करावी. गांव तीन हजाराचे भामेर परगणापैकी जत केले. हणमंतराव तिमाजी कारकून पाठविला हे पूर्वी लिाच आहे. वरकड वर्तमान नवल विशेष लिहिजेसे नाही. समशेर बहादराचे बाईकाचा मजकूर आज्ञेप्रमाणे तपसिलवार सांगितला, परंतु जुने गोरे [१] कारकून आहेत त्याची घालमेल करितां येत नाही. यामुळे ते काही करो याप्रमाणे साफच सागितले. मग रदबदल कशास करावी. जाला मजकूर सेवेसी लिहिला आहे. वरकड मागाहून लिहून पाठऊ सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Mahadji Ballal and Hari Ballal write about the whole province of Berar being attached and its tribute Leing fixed by the Peshwa and the subsequent preparations of the Bhonsle for fighting.*

No. 166] *[3-1-1766 ?*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री दादासाहेबाचे सेवेसी आज्ञाधारक बहेरजी नाईक डोगार चरनावर मस्तक ठेऊन रामराम विनंती उपरी. येथील कुशल जाणून ताा छे [२] २१ रोज शुक्रवार प्रहरपावेतो मुक्काम अमनेर येथील लस्कर राजेश्री जाणोजी भोसले सेनासाहेब येथाती(त) असो विशेष. येथील वर्तमान तर छ २० रोजीं नागपुरीहुन रा॥ साबाजी भोसले व देवाजीपंत ऐसे दोप्रहरा किले मजकुरीचे मुा॥ दाखल जाहाले. उभयेताच्या भेटी जाहाल्या. समागमे दोन अडीच हजार स्वार व पहेले हली आली ते हे मिळून साहा सात हजारपावेतो जमा जाली. रा॥ साबाजी भोसले येताच त्रिवर्ग मिळोन आमनेरच्या किल्यांत गेले. आनि किल्ला झाडून पाहिला, आनि किल्यासभोवती खाई * * देची आहे. किल्या आसपास गोळीचे टप्यापावेतो चौकिया बसविल्या आहे. दुसरे किल्यातून आलियावर

---

१ हा दिनकर बल्लाल गोरे, समशेरबहादराच्या बायकोजवळ कारभारी होता. (पदा रुमाल ३.) पत्र हरिपंताचें नानाफडणिसास. हस्ताक्षर हरिपंताचें.

२ रजब.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

त्रिवर्ग मिलोन मनसुबा करोन कबिले व झाडून कारखाना व सिगरी व हस्ती ऐसे दो प्रहरी रवाना केले. चांदियाकडे केले. कलवे, घोरपड व लक्षमनराव पाटनकर व सर्व सरदार ऐसे मिलो(न) येकचित होऊन सरदाराचे दिलाबी (?) रवाना जाहाले. अता सडे जाले आहेत. मागू(न) नागपुरची फौज आलियावर येथू(न) कूच होईल. रा॥ पिराजी नाई निंबालकर यास व तुळजोती यास बोलावले आहे. सेनासाहिबाचे बोली आहे कीं श्रीमंतानी लेकरावर कबर बाधली आहे. अपूर्व आहे. हे जन फारच बोलतात. आम्हास चाकरी सागावी अन पोटास द्यावें ऐसें बोलतात. चितातील (उ?) कर्म की पहेलापहिल तोड लावावे, मग जे होता होईल ते हो, ऐसे दिसोन येते. मोठमोठाले गाव मारावे व आसपास जाळपोल करावी ऐसे बोलतात. पुढें होईल ते सेवसी लिहिल जाईल. बहुत काये लिहिणे हे विज्ञाप्ति.

¶*News letter addressed to Raghoba giving the activities of Janoji Bhonsle.*

No. 167] *[4-1-1766 ?*

श्री

राजश्री मोरोपंत दादा गोसावी यांसी

स्नो॥ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये श्नो॥ साबाजी भोसले (दंडवत) विनंती. उपरी, येथील कुश * * * * * * * * * * * * * * * *
दाखल जाहालें. मागोन पत्रें सांडणी स्वारासमागमें पाठविलीं त्याची उतरें न आलीं. परंतु मुकाम मजकुरी राजश्री पंडित प्रधान यांजकडून रा॥ बापूजी अनंत कारकून याजसमागमें पत्र आलें. व दुसरें जासुदासमवेत आलें की राजश्री नारायेणराव पंढरपुराकडे पुढें गेले आहेत. तेथें तुम्हीं फौज सुधां चांभारगोंदयापलीकडोन परभारा जावें, आमची स्वारीहि पंढरपूरचे रोखेंच येत आहे. त्यासी पत्रांचे पूर्वीच येथें येऊन पोहचलों, तफावत पाहातां येके मजलीची राहिला; आणि एकिल्यांत आलें कीं आपण मागें पुण्यासच राहिले आहेत, समागमें नाहींत; ऐसीयासी भेटीच समई आपण अगत्यरूप समीप असावे. आपले विद्यमाने भेटी घ्याव्या हा आमचा मनोदये, व तीर्थस्वरूपजीनीहि आज्ञापिलें आहे, यास्तव राजश्री नागोराव माहादेव पाठविले आहेत. यावयाचें सत्वर होऊन भेटी आपले समक्ष करविल्या पाहिजेत हाच अर्थ घडावा. येण्यास विलंब सहसा न लागावा. रा॥ छ २२ माहे रजब. बहुत काय लिहिणें! लोभ असो दीजे हे विनंती.

¶*Sabaji Bhonsle writes to Moroba Fadnis that as instructed by the Peshwa he has already reached Pandharpur and that he wishes to see the Peshwa through the addressee.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 168] *[18-1-1766 ?*

श्रीशंकर.

सेवेसी विनंती. आज्ञाधारक व्यंकटराव मोरेश्वर कृतानेक सां नमस्कार विनंती प्रा। यैसीजे. येथील क्षेम ता। छ २६ माहे रजब मुकाम तलेगाव मोझरी माहाराजांचे कृपावलोकनेकरून येथास्तित असे विशेष. येथील वर्तमान तर राजश्री जानोजी भोंसले सेनासाहिबसुभा यांजपासी खासगत फौज दाहा हजार व पिराजी नाईक आठ हजार व तुलाजोराम बाहेर आहे, उद्या भेटनार; आटोले मल्हारजी व भवानजी मंडली मिळून तीन हजार गोविंदराव मुगुटराव व खानाजी सिंदे वगैरे हजार; सुरतसिंग वगैरे हजार मागून यावयाचे आहेत; येकून तीस हजार जमा जाली आहे. याचे चितांत कीं आम्हावर राग करून श्रीमंत वराडात आले. आमचा आन्याये कोणता? येक पुणे जालले म्हणतील तर पुणियाचा आन्याय आमचा नाही; मोगलाने जालले तेव्हाच त्यासी आम्ही बेरोख मोगलासी जालो. येक आमचा आन्याय कीं हैदरनाईकाकडे आम्ही आलो नाही इतका मात्र आन्याय आहे. तर मनुशापासूनच होतच असते; तर त्या आन्यायासी आसा दंड कीं काये आम्हास तीसा लाखाचा सरंजाम दिल्हा तो मोगलास आमचा घेऊन द्यावा. सर्पास दूध पाजावे. आम्हास आज्ञा करावी कीं तुम्ही मोगलावर जाणे. तेथें जाऊन त्याचे पारपत्य करितो कीं नाही हे पाहणे होते. आम्ही त्याच्या मुलकांत च्यार रुपये घेतले त्यासी श्रीमंतानी वराडात येऊन रुपयें घेतले. जे जाले ते समर्थ. वडीलपणे आम्हास हतीं धरावे. आम्ही यैसे काम करून दाखऊ कीं मागे जाले नाही, पुढे होणार नाही. तीसा लाखाची जागीर दिल्ही, त्यापैकी रेवामुकुंदपूर व पंचमहाल अमलच नाही. येक गंगथडी मात्र च्यार परगणे, त्यापैकी वसमतीने सरेसाल लढाईच पुरवली. पिराजी नाईकासारखा सरदार खराब जाला त्यासी आता आम्ही लेकर. आम्हावर केवल निकरच करतील तर आम्हास काही समोरून हलता येणार नाही. प्राण द्यावा लागल. त्यासी आम्ही कूच दरकूच दाहा कोसावर येतो. वडिलाच्या उमरजीस येईल ते करावे परंतु आम्हास हातचे दौड नये. त्यासी स्वामीनी विवेक करावा हे विहित आहे. आम्ही सेवक लोकानी विनंती मात्र करावी; तरतूद करणार धणी समर्थ आहेत. छ २७ रोजी याचा मुकाम नांदगाव पेठ येथें गुरुवारी मुकाम आहे; तर स्वामी यासी हती धरून न्यावे यांत उतम आहे. राज्यातील मोहरा जाऊ देऊ नये. स्वामी वडील आहेत. इसमाईलखान इकडे तीन

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

हजार फौज येणार आहे. लढाईत जीव नाही. हख जेने सुला होये ते करावे; यांत धण्याची मरजी. त्यासी हातचा मोहरा जाऊ देऊ नये माहाराजाचे सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶Vyankatrao Moreshwar to the Peshwa writing how Janoji Bhonsle tried to give explanation regarding the two charges brought against him by the Peshwa—firstly that of burning Poona and secondly not taking part in the campaign against Haider.

No. 169] [*19-1-1766*

पौ छ १६ सावान सन सीत
माघ मास.

श्री

सेवेसीं बाबूराव केशव व मादाजी नारायेण साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ ७ सावान मुकाम कसबे दर्यापूर प्रांत वराड स्वामीच्या कृपेंकरून क्षेम असो विशेष. पांच सात पत्रें पाठविलीं त्याचीं उत्तरें न आलीं. कृपा करून पत्री सांभाळ करावयास आज्ञा जाली पाहिजे. येथील वर्तमान तर चिंतो विठल व चिंतो अनंत विठल सिवदेव भोसल्याकडे तहाच्या मजकुराकरितां पेशजीं गेले म्हणोन लिहिलें होतें, त्यास याणी जाऊन तहाचा मजकूर पका बोलोन आले, त्याजवरून भेटीचा प्रकार केला. त्यास छ ९ साबानी भोसले कूच करून लस्करापासून चौ कोशावर आले. उभयेतां श्रीमंत तयार होऊन पुढें गेले, त्यास खासा रावसाहेब सारे सरदार समेत जेष्टांपुढें आद कोशावर चालत होते, त्यास भोसल्यानें यावयास सायंकाल केला. त्याच्या मनांत पुन्हां कांहीं संदेह आला याजमुळें भयभीत जाले, त्याजवरून चिंतोपंत उभयतानी पुढें जाऊन संदेह निवारण करून त्यास घेऊन येत तों दोन घटका रात्र जाली; याजकरितां रावसाहेब धाकटे नाना व सरदार पुढें होते त्यांच्या भेटी होत तों रात्र च्यार पांच घटका जाली. पुढें जेष्टाकडे भेटीस यावें तों जेष्टानी सांगोन पाठविलें कीं आतां भेटीची मर्जी नाहीं. प्रात:कालीं भेटी होतील. त्याजवरून भोसल्यानी कबूल केलें कीं प्रात:कालीं डेऱ्यास येऊन भेटी त्याजवरून जेष्ट श्रीमंत माघारे आले. रावसाहेब मागाहून आले भोंसलेहि आपल्या डेऱ्यास माघारे गेले. काल छ ६ साबानीं दोन प्रहरीं जानोजी बावा सडे येऊन भेटले या प्रमाणें मजकूर जाहला. याउपरी याजकडील प्रकर्णास आठ च्यार रोज लागतील. मोंगलहि समीप आला त्याचयाहि भेटी सत्वरच होतील तदनंतर पुढें हिंदुस्थानांत अगर कर्नाटकांत जावयाचा मनसबा ठरेल. पनास लोकानिसी भेटीस येणे म्हणोन

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

थोरल्या श्रीमंताची आज्ञा जाली. त्याचप्रमाणें भोसले दोन प्रहरी पनास लोकानिसी येऊन भेटोन माघारे गेले. भोसले फार नरम जाले. कांहीच यैत्रज नाहीं. परंतु येथील प्रकारामुळें कांही यथास्थित मनसबा सिधीस जाणार नाहीं. यासमई जें म्हटलें तें सिध होतं; परंतु लाभकालानरूप घडेल तें प्रमाण याप्रमाणें आहे. सेवेसीं श्रुत होय हे विज्ञापना. संक्रमणाचे तील शर्करायुक्त पाठविले आहेत. सेवेसी प्रविष्ट होती हे वि.

¶*Baburao Keshav and Madaji Narayan write about negotiations having been opened with the Bhonsle and an interview having been arranged between the Peshwa and the Bhonsle brothers. The writer Baburao Keshav Thakur was Nana Fadnis' trusted diplomat.*

[19-1-1766

No. 170]

पौ छ १६ साबान सन
सीत माव

श्री

शेवेसी बाबाजी माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ ७ साबानपावेतो मुकाम कसबे दर्यापूर प्रांत वराड स्वामीचे कृपाकटाक्षं करून येथास्थित असे विशेष. आपणाकडून पत्र येऊन सेवकाचा परामर्ष जाहाला नाही. तरी पत्र लिहावयासि आज्ञा केली पाहिजे. इकडील वर्तमान तरी छ ९ साबानी श्रीमंत राजश्री रावसाहेबाच्या व भोसल्याच्या भेटी जाहाल्या. दुसरे दिवसी श्रीमंत राजश्री दादा साहेबाची भेट जाहाली. भोसले पनास रावतानी भेटीस आले. मिसलबदीने चालावे असा निश्चय होऊन येक मजल तीन कोस मुकाम मजकुरास आले. आघाडीस रावसाहेब, पिछाडीस दादासाहेब, बाजूस सरदार विठल सिवदेव आदीकरून, मध्ये दोनी हजार, याच रीतीने मुकाम जाहाला. यास्तव श्रीमत राजश्री दादासाहेब आमचे पाठीमागे राहिले आहेत. तेथे भोसले आले. केवल निखालसीचे भाषण जाहाले नाही. याजकरिता जरारी भेट घेऊन गेले. रावसाहेबाकडे येतील म्हणौन काही साहित्य होत होते. परंतु परभारेच गेले. रात्री फौज आम्हाकडील छबिन्यास गेली. त्याचीहि छबिन्यास फौज होती. त्याचे लस्करात हुलड जाहाली. याजमुले बुनगेदेखील आवळून राहिले. आद्याप बोली चाली लागली नाही. निजामअलीची फौज येथून चालीस कोसावरी आली आहे. शेवेसी कळावे

2047

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

म्हणोन लिहिले असे. आपणाकारणे तील सक्रमणाचे शर्करायुक्त पाठविले आहेत. स्वीकार करून उतर लिहावयासि आज्ञा केली पाहिजे. शेवेसी श्रृत होय हे विज्ञापना.

¶*Babaji Mahadeo writes about an interview between the Peshwa, Raghunathrao and the Bhonsle.*

No. 171]

[*27-1-1766*

श्री

सेवेसी विनंती सेवक शामजी उमाजी कृतानेक साां नमस्कार विज्ञापना ऐसीजे. छ १९ साबान रोज इंदुवासरी माहोलीच्या मुकामीहून श्रीमंत रावसाहेब याचे भेटीस राजश्री सेनासाहेब व दिवाकरपंत वगैरे लोक सेपनास खासा घेऊन गेले होते तेथून बहुमान घेऊन सायेंकाली मुकामास आले. आजचे वर्तमान तर छ १६ रोज मंगलवारी राजश्री पिराजी नाईक रा। दिवाकरपंतासी खलबत प्रहरसाघटका करून डेऱ्यास गेले. उपरांतिक गणेश तुकदेव येऊन गेले. त्याजला देवाजीपंतानी वस्त्रे देऊन रा। जानोजीबावाकडे पाठविले. मग रा। जानोजीबावाकडे येऊन वर्तमान सांगितले. त्यानी गणेशपंतास पुसले की आज कूच का जाले नाही. त्यानीं सांगितले की काही गुता आज होता. तोफखाना पुढे रवाना केला. उदईक कूच होईल इतके वर्तमान ऐकिल्यात आले. सेवेसी श्रृत होये. बहुत काय लिहिणे हे विज्ञापना.

¶*Shamji Umaji reports an interview of the Peshwa with Janoji Bhonsle and some of his sardars, He also refers to the negotiations carried on between the two.*

No. 172]

[*January 1766*

श्री

पुरवणी श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. श्रीमंत राजश्री रावसाहेब वराडांतून कूच करून दरमजल मनरथ गंगातीरास आले. नवाबहि मागून दरमजल राजे टाकली गंगातीरास आले. श्रीमंताचा व नवाबाचा आठा कोसाचा फासला होता. रुकनुदोला व शेरजंग व जगंनाथ धोंडाजी श्रीमंताकडे गेले होते. येक दिवस राहिले. भोजनें कीलीं

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

परस्परें श्नेहाचीं भाषणें जालीं. श्रीमंतानी रुकनुदौलास हती सिरपेंच वस्त्रें दिल्हीं. शेरजंगास सिरपेंच व वस्त्रें व जगंनाथ पंतास सिरपेंच वस्त्रें दिल्हीं. दुसरे रोजीं श्रीमंत कूच करून आठ कोस मोगऱ्यावर गंगातीरासच गेले. रुकनुदौला शेरजंग जगंनाथपंत नवाबाचे लस्करांत गेले. राजश्री माहाराव निंबालकर व राजश्री रामचंद्र जाधवराव व श्रीमंत रावसाहेबांचे भेटीस गेले आहेत. च्यार पांच दिवस जाले. आद्यापि आले नाहींत. राजश्री हैबतराव निंबालकर यांजकडे सरदेशमुखीबाबती चौथाईची मामलत दुसाला राहिली होती. श्रीमंत मनरथावर आले तेव्हां तुकोजी चव्हाण येऊन भेटले. मामलत फैसल केली. साडेच्यार लक्ष रुपये करार केले. त्याचा वसूल होत आहे. नवाबाकडीलहि पावणे दोन लक्ष रुपये बाकी राहिली आहे. ती व आणिक कांहीं घ्यावें हे नवाबाचें मानस. त्यास द्वारकाबाई व हैबतराऊ परवां येऊन नवाबास भेटले. द्वारकाबाईस मुलीचें लग्न करणें होतें. नवाबाचे भेटीस न यावें असें होतें, परंतु नवाबानी गंगातीरीहून कूच करून न्हिडाजवल आठ कोसाचे तफावतीनें आले तेव्हां येऊन भेटणें जरूर जालें. येऊन भेटली. प्रस्तुत समागमेच आहेत. त्याजकडील मामलत नवाबाकडील कोणें प्रकारें विल्हे लागती ती मागाहून शेवसीं लिहिण्यांत येईल हे विज्ञापना.

¶*The news of the Peshwa's march through the Berars and his interviews with some of the Sardars of the Nizam is reported to Raghunathrao.*

No. 173] [*14-2-1766*

पौ व॰ ६ रमजान

श्री

राजश्री रघुनाथपंत दादा
गोसावी यांसी

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नोंा जानोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती. उपरी : येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असिले पाहिजे विशेष. आपली आज्ञा घेऊन निघालो ते येदलाबाद टाकून तीन कोस पुढे डेरे जाले. मजल वीस कोसाची जाली. त्यात हिरबुनगें वाटेने फार गलाटा जाला याजकरितां मुकाम जरूर जाणोन येक केला. प्रांतात उपद्रव कोठे फौजेचा जाला नाही. येक दुसरा गाव लागला त्याची रखवाली फार रीतीने केली; सर्व आपणास कललेच असेल. तोफ चांगली येथून पाठविली; पावल. माणको अमृतराव समागमेच आला. येक तुलजाजी भागवंत व सातजी वंजारे व फुटकर इतके जरूर पाचसे राऊत पावेतो तेथे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

असतील किंवा नसतील. सरंजामी पुरातन पतके, तेहि उठून आलेत. कालाचे प्रकार घडता ऐसेच घडत असतात. आपलीं कृपा आहे तरी सर्व सोई नीट आज्ञा केली तैसी वर्तणूक घडल्या श्रीहरी उतम करील सौशये नाही. सांप्रत फौज पाठवावी याजकरितां हजार प्रकार करून पाठवितो. उजुर नाना-प्रकारे करितांत; चाकर गेले; फंद करावयास चुकत नाहीत. वरकडास बोलायांस जागा होती कीं जर फौज पाठवावी हे मनात असते तरी पंचवीस हजार फौजेतून सरंजामी फार दिवसाची दौलत पाच हजार न निघती की काये? हे कोण्ही दर्शवितील तरी हा अर्थ किमपि नाही. फौजेचीच तिडण हे खरे आहे. आम्हीं हरवजे आपणापासी आज्ञा जाली त्याच दिवसात येतो. आता हे फौज च्यार दिवस न्यावी, खोरी करील गंगथडीस जाता न ये. सांप्रत तह जाला आहें तेव्हा येक माळ घास लकडीचा जागा पाहून च्यार रोज पीडा सोसून लोकास निरोप देतो. पुढे जे उपयोगी पडणार त्याजला ठेऊन घेतो. तूर्त माणको अमृतराव यास फौज दोन अडीच हजार जे तरतूद होईल ते पाठवितो. वीस हजार सरकारातून व राजश्री चिंतो अनंत याणीं दोन परगणे मामलेदारास द्यावे. लाख येक महिन्यामधी याणी देवावे तरी परगणियांच्या सनदा व माणको अमृतराव पाठवितो. ऐवज हे आलियावर देवावा. तोफखाना जाजी भागवत यासीं हजार दोन हजार वीसपैकी देवयाची आज्ञा करावैसी श्रुत आपण; सिक्षा केली आणि जे जे नीत सांगितली तैसेच घडल.

आले; चुकलो, हे फौज गंगेवरी व वरदेआलीकडे घडल तितके करावे Bhonsle या फौजेचा पाहिला. पुढे आज्ञेप्रोच फौजेचा व वर्तणुकीचा प्रकार ween आपली माया दिवसेदिवस वाढती असावी. येथून वर्तणूक जे होई प्रत्यासच येईल. आम्हास आपणावाचून आता गती नाही. च्यार मधे विल-करविनार ते पाडावे हेच जाणतील. परंतु च्यार घटका येकांती बसून आपण आज्ञा केली तेच कल्यानदायेक मानितो. तेणेप्रोच वर्तणूक ईश्वर आम्हाकडून घडवील. वरकड कारभार संमधे येक दुसरी गोष्टी विशाधवर अगर गुंतल्यावर घडली ते सर्व आपली मर्जी राहिल्यावर नीट सहजात होईल. भरवसा आहे. आपले लिहिण्यावर नवाब घाट चडोन गेले. राजश्री राव गेले. काही पेचपाच नवाबानी केला नाही, हे सर्व आपले कृपेची फळे कैसी विसरतील. श्रीहरि आपली मर्जी आमचे सेवेवरून व आज्ञेप्रो वर्तणूक करू याजवरून राहो हेच देवास निरंतर मागतो. तीन हजार अदिकउणे आपणास आटपून लांबलांब

2050

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मजली करून येतील. रूपया नाही, नाहीतर तेथून न येते, हे सर्व आपले धानात आहे. रा छ ४ माहे रमजान. सूज्ञाप्रति विशेष काये लिहिणे? कृपा लोभ असू दिला पाहिजे हे विनंती.

¶*Janoji Bhonsle professes his deep attachment for Raghunathrao and promises to send him a contingent at his earliest convenience.*

No. 174] [*20-2-1766*

श्री

श्रीमंत राजश्रीं दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक कृष्णराव बलाल सा नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता छ १० रमजान मुा लशकर देऊलघाट स्वामीचे कृपेकडून सेवकाचें वर्तमान येथास्थित असे विशेष. मोगलाचे व चिरंजीव राजश्री राव याच्या भेटीचें वर्तमान विस्तारपुरक लिहिणे म्हणून आज्ञा; ऐसियासी प्रथम दिवसी मध्यें डेरा उभा करून, इकडून रावसाहेब तिकडून नवाब ऐसे आले. पूर्वीचे जाबत्याप्रमाणे भेटी होऊन खुलाश्यात फरस केला होता तेथे समीप बसावयाची योग्यता तितक्यानीच बसोन, उतम मिष्ट भाशणे परस्परे जाहाली दोन अडिच घटका. तदनंतर ते तिकडे हे इकडे आलें. दुसरे दिवसी नवाबाचे कूच होऊन कुरूम-खेड्यानजीक आपले लशकरचेजवल आडचा कोसांवर येकेच नदीवर खालले पाण्यावर येऊन राहिले. त्यानंतर तिसरे दिवसी आगोधर श्रीमंत नवाबाचे डेऱ्यास गेले. नवाब बाहेर डेऱ्यात मामुल सिरस्ते भेटी होऊन मग * * जागा फरस केला होता तेथे जाऊन बसले. दोन घटका भाशणे होऊन मग सिष्टाचार वस्त्रे, जवाहिर, सिरपेच जिका, मोत्याचा तुरा, हातचे दोन बाजू, गल्यात मोत्याची कंठी, समेत पदक, याप्रों आठ नव हजार रूपेयाचें व हती घोडा. दुसरे दिवसी नवाब येथे आले ते अस्तमानी डेऱ्यांत दाखल सा घटका रात्रपर्यंत फार गोड भाशणे जाहाली. मग जवाहीर सिरपेच, जिगा, मोत्याची कंठी व माल याप्रा दाहा हजार रूो पो वस्त्रे, घोडा, हती, याप्रो दिली. सावे घटकेचे अखेरास उठोन गेले. त्यानंतर दोन मुकाम होऊन दरकूच स्वामीच्या मर्जीस्तव लाखनवाड्याचा घाट चढून सरकारांतून नवाबास माहाल दिल्हे आहेत त्याचा बंदोबस्त करीत पूर्व स्थलचे सुमारे जात आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Krishnarao Ballal to Raghunathrao describing an interview between the Peshwa and the Nizam.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 175] [*8-3-1766*

श्री

यांदी भोसलीयांकडील सरदार फौज घेऊन मालवियांत जावयासी येतात त्याची फौज अनिवार आहे. फौजत कैद नाहीं. यास्तंव सरकारचें ताकीदपत्र कीं मार्गांनीं येतां सरकार तालुकियांत रयेतीस कोण्हे गोष्टीचा उपद्रव न देतां यावें यैसें निक्षुन ताकीदप(त्र) असावें.

सदरहुप्रमाणें पत्र देवावें. देणें.

लिहिणें

छ २६ रमजान फालगुन सीत.

¶*This is an order issued by the Peshwa to the Bhonsle asking him not to allow his army to molest the Peshwa's province while going to Malwa.*

No. 176] [*5-4-1766*

पौ छ २४ सवाल अधिक
सीत मुा नजीक वोडसे

श्री

राजश्री रघुनाथराऊ दादा
साहेब गोसांवी यासी

(कराव

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्ये श्री जानोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनती ... येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहीत असिलें पाहिजे. विशेष : इकडील वर्तमान शुतरस्वार व कासीद जोडीबराबर सविस्तर लिहून पाठविले आहे त्याजवरून श्रुत जाले असेल. हिंदुस्तानात समागमे असावें, सर्व प्रकारें ऊर्जित व्हावें, पुढे प्रेम आपला दिवसेंदिवस वाढता व्हावा, हे सला आबाळवृधीपावतो उतम असतां राजश्री पिराजी नाईक निंबालकर यानी व घोरपडे पाटणकर वगैरे मलई[1] करून त्यांत तलब[2] मागावी हा अर्थ नाही. कारभार करावा. जोंवर हिंदुस्तानातून आपण येत तोवर घर मुल्हक साहुकार सर्व लुटून आपली येण्याची आमद[3] ऐकतां निघोन जावें अगर मसलत हातास आली तरी करून पाहावी. या मलईत राजश्री बाबुराव कोनेर व आणीक च्यार इमानी मिळून पेगाम[4] केला कीं, राजश्री दिवाकर

---

१ दंगा. २ तनखा. ३ पोंच, आवक. ४ संधान.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पुरुषोतम हाती द्या. कैद करितों. सर्व आम्ही चाळवितों. दक्षणेत सूत्र करितों. ऐसे फंद पत्रीं कोठवर ल्याहावे? मारता न ये. नाईकाचा मजकूर काही इतका नव्हता. कुल फौज निमकहलालावरच सिध जाहाली. हें कबूल न जालें तर तरवार चालावी. तेव्हा लटके कर्ज रकमा नामंजूर करून त्याची व्याजे करून आठ लक्ष ठहराविलें. तीन रोज उपवास लस्करांत गूळ[१] येकच जाहाली. लाच्यार. वडीलपणें आपण जे आज्ञा केली, त्यासी फार दिवस जाले नाहीत. तूर्त फळास आले. देशचे फौजेचे फार चालविलें. सात वरसे लडाई नाही. येंदा मसलतसीर जाऊन चीज करावी ते ऐसे जालें. मजकूर लिहिणे उचित तो नाही परंतु दक्षणचा जीव कुल आपली जात आपणावर सर्व भार. आम्ही तर चुकलों. वडील आपण संभालणार चिंता वाटत नाही. परंतु हे लोक इमान टाकून सर्व घातास चुकणार नाही. मरणास बाकी राहिली नव्हती. झुंजता नये. मोठे [फाटले] * * * * * * * मुकाम जाले. सेवट आठ लाख कबूल केले. कुल लस्करचे कारकून जे जे ते लेहून आपले तर्फेनी देऊ लागले. त्याप्रमाणे पुर्जे[२] देऊन तँगीर[३] होऊन मोठे जबरदस्तीनें बिदा केले. तेव्हा त्याचे मलईकर न जात. त्याचाहि भेद विचारे-कडून प्रस्तुत हिसेबाचे पुर्जे तलबेचे करून श्रावणाचे मुदतीचे कबूल करून जातात. त्यास घोरपडे मरणार मारणार हे आहेत. त्यांचा प्रकार होईल तो लेहू. तोंडे मागतात. तीन हजार येकँजथ[४] आहे. जे कचे वर्तमान ते येथास्तित लिहितो. का की हे दौलत[५] मुकरर आपले पदरास झोंबली. कपटेकडून बहुतच चूक जाली ते क्षमा नच करावी. काळेंकडून जालिया ते गोष्टीचा वडिलें सर्वश्वे निर्वाह करणे आपणाकडे देवाने सोपला. आपण कोठेहि असोत. हिंदुस्तानात येक घोड्यावर हजार, दीढ हजार पागेनसी कुचाबराब(र) कूच करावे मुकामास येणार * * हे न केले. पुढें दोन सरदार उमदे हासतील. पंचवीस हजारचे वागवणार तीन च्यार हजार आले. आपली फौज कुल होती ते आमची होती. नाईकास आपण काढून दिल्हे. तो ठेवावा हे अवलात चूक. ज्या चुकीने शफत केली असतां संशय आपणास आला. जे चूकच तेथे फळ नीट काये होणे? आवल आपली बेमर्जी. बार्दज हिंदुस्तानचे जाणे राहिलें. तिसरे नाहाक तोदा करून घर घेतले. चौथे लाऊन फिसादी करून गेला. आतां याचा निपटारा करीत येके जागें बसावें. दुसरें काही सुचत नाही. आपणाकडे पाठवावयासी तिघेजण सरदार तयार केले. ईश्वरजी जाणतो. गुंता काही ठेविला नाही. बाजद

१ ओरड, गोंधळ. २ पत्रें. ३ बडतर्फ. ४ एकत्रित जमाव. ५ नंतर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दसरा दरमजल आपणाकडे यावें हे मसलत त्यासी सांप्रत या पेचात पडल्यामुळे प्रतणी केलीसी काये चितात येईल ते येवो. जर येथील क्रिया कायावाचामने-कडून ईश्वरसाक्षीने येक आपणासिवाये दुसरे नसेल तरी हिंदुस्तानास दसरा जालियावर येतों. श्रीहरि इतकेहि येकीकडे ठेऊन पोहचावील. सांप्रतची फौज तीन लाख रुपये तूर्त देतां आपणाकडे आज येणार तयार इसमाईल-खानाची प्रतीक्षा तो मातबर आमचा इष्टहि आहे. त्याजवर भार घालून तर्तूद करून पाठवितों. मग येथे कैसेहि हो. अगर तजवीज करीत असतां न बने. नाईक आबदाब दोन्ही तूर्त घेऊन गेला. सर्वज्ञ आपण आपले चितात ये * तेथील * * * * * * त प्रेम उपजवील फार काये ल्याहावे. आतां सर्व भरवसा आपला. जे होणे ते आपणाकडून अचरणानरूप फळ होईल. चुकीचा संभाल वडिलावाचून कोण करील? पुढे जर दौलत अगर आज्ञा केली, तैसी कवायेतीत चुकलो तरी खातरेस येईल तें करावें. तूर्त सर्व प्रकारें क्षमा करावी रा छ ३० रमजान. आपन वडील आहेत. सर्व भरवसा आतपर आपला आहे. सरदारीवर कलत असता व आपन सागत असता दगा केला. सर्व निरवाहा आपनावर आहे. सूज्ञाप्रति विशेष काय लिहिणे कृपा लोभ आसू दिला पाहिजे हे विनती.

[जानोजीचा शिक्का]

(मोर्तब सुद.)

¶*Janoji Bhonsle informs Raghunathrao of the disturbances created by Piraji Naik Nimbalker and Ghorpade and of the terms which they, along with Baburao Konher, thought to impose upon the writer about money and about Divaker Purushottam being handed over to them. The writer expresses his implicit trust in the addressee.*

No. 177] [*17-4-1766*

पौ छ २९ जिलकाद
सीत चैत्र मुा शिंमधर

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री दादा
साहेब स्वामीचे शेवेसीं

विनती सेवक बापूजी नारायण व धोंडो विस्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागाईत छ ७ जिलकादपावेतो शेवकांचे वर्तमान यथास्थित असे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

विशेष. स्वामीची आज्ञा घेऊन निघालो ते किले नरनाला येथे आलो. मातुश्री निबाई कराडी व जिवाजी इंगळे यांची भेटी जाहाली. राजश्री जानोजी भोसले सेनासाहेबसुभे याणी किले मजकुरी, आम्ही येथे आल्याचे पूर्वी, गणेश तुकदेव वकील पाठऊन कितेक प्रकारे संदर्भ लाविले होते. परंतु याणी त्यास स्पष्ट सागितले की, श्रीमंताचे पायेचा आश्रये केला आहे. दुसरा विचार जाणत नाही. तेव्हा वकील उठोन गेला. गोपाल रंगनाथ यांस, वागडोबाचे मुकामी राजश्री सेनासाहेबसुभे होते, त्यांजकडे पाठविले. त्यांस समागमे घेऊन नागपुरास गेले आहेत. त्याचा मजकूर सविस्तर कारभारियांचे पत्री लिहिला आहे. ते सेवेसी निवेदन करितील. शेवक येथे उगेच बसलो आहो. आज्ञापत्र येईल त्याप्रमाणे वर्तणूक करू. शेवेसी श्रुत होये. विशेष काय लिहावे? कृपावृधी जाली पाहिजे हे विज्ञाप्ति.

¶*Bapuji Narayan informs Dadasaheb how Janoji tried but failed to win over the keeper of the fort Narnala.*

No. 178] [*18-4-1766*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनती सेवक यादव माहादेव व रावो गोविद सा। नमस्कार विज्ञापना. राजश्री बाबुजी नाईक जोसी याणी राजश्री जानोजी भोसले सेनासाहेबसुभा यांजकडे सूत्र केले होते हे तुम्हांस ठाउक असेल ते सत्य सागणें. त्यास कृष्णसिग बैसयाचे चाकरीकरीतां पत्र येकदा पाठविले होते त्याचे उतर आले तें दफ्तरी आहे. फिरोन उतर पाठविले तो श्नेहाचाच मजकूर लिहिला असे. यासिवाये अधिकोतर मजकूर किमपि आम्हांस ठाऊक नाही. यात अंतर असेल तरी श्री गंगेंची व माहाराजाचें पायांची शेपत असें. मिती अधिक चैत्र श्रुध ९ शके १६८८ सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना. यांत अंतर जाल्यास दिवाणचे गुन्हेगार हे विज्ञापना.

¶*Yadav Mahadeo and Ragho Govind, on being asked as to whether they know anything about the alliance between Babuji Naik and Janoji Bhonsle, declare to the Peshwa on oath that they know nothing except that Babuji Naik had sent a letter regarding Krishnasing Bais.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 179] *[29-4-1766 ?*

पो छ ९ जिल्हेज

श्री

सेवेसी कृष्णाजी अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ १९ जिलकादपर्यंत मु॥ म्हेसे स्वामीचे कृपावलोकनेकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. पो उमरखेड व म्हेसे येथील कमावीसदारांचे नाव छ २ जिल्कादची पत्रे पाठविली, तेथें आज्ञा जे राजश्री जानोजी भोसले यांजकडे चाकरीस सिलेदार वगैरे गेले आहेत त्यांची घरे पा। मजकुरी असतील तीं व त्याजकडे गांव मुकासे वगैरे * * जमिनी गावगना असतील त्या जप्त करणे, व मुले माणसे आटकेस ठेवणें, वतने वगैरा कुल जप्त करणे म्हणोन आज्ञा. येशास दोंही परगण्यामध्ये भोसल्याकडील सिलेदार वगेरा कोणी नाहींत व कोणाकडे मुकासे वगेरा जमिनी नाहीत व हरदो माहालातील कोणी भोसल्याकडे चाकरीस गेले नाहीत. शोध मनास आणिला. वरकड भोसल्याकडील तह जाहला. राजश्री देवजीपंत भोसल्यास आणावयासी गेले. पंधरा दिवस म्हैशानजीक श्रीमंताचा व मोगलाचे फौजेचा मु॥ जाहला. हाली कूच म्हैशावरून उमरखेड परगणियात गेले आहेत. तेथून वासिमाकडे जाणार. तेथे भोसले याच्या भेटी होणार येसे आहे. महिना पंधरा दिवसी आम्हीच निघोन सेवेसी येतों. भेटीनंतर सर्व विदित होईल. याउपरी माहाली राहावे हा अर्थ राहिला नाहीं. च्यार च्यार आवृती फिरफिरोन आपले फौजांच्या व मोगलाच्या जाहाल्या. ते वृत विस्तरे कोठवर लिहावे? सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Krishnaji Anant writes that inquiries show that there is not a single case of a siledar having joined the colours of the Bhonsle and hence there is no need to put into effect the order of the Peshwa confiscating the property and imprisoning the families of the Bhonsle soldiers.*

No. 180] *[15-5-1766 ?*

श्री.

सेवेसी बालाजी जनार्दन कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील वर्तमान ता। छ ५ जिल्हेजपावेतो यथास्थित असे विशेष. राजश्री जानोजी भोसले सेनासाहेबसुबा यांजकडील कराराच्या यादी सन तिसा सितैनांत वराडचे स्वारीत ठरल्या त्याच्या नकला करून पा। आहेत. नजरेचा ऐवज करार जाला त्यापैकी बाकी व कापड दरसाल पांच हजाराचे यावे त्याजबा। च्यार साला ऐवज घांसदाणे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सरकारचे माहालांत भोसले याणी घेतले आहे. येकूण येकंदर ऐवज सरकारचा येणे त्याची याद लिहून पाठविली आहेत. प्रां गंगथडी येथील घासदाणा भोसले याणी घ्यावा; त्यास, तो अमल सरकारात आला, सबब त्याचे यैवजी प्रां वऱ्हाड येथील सरदेशमुखी व बाबतीचा ऐवज सरकारात दरसाल रुो २२५००० सवादोन लक्ष येणे तो माफ करून, सन इसंने सितैनात सनद दिल्ही आहे; त्याप्रमाणे बाबती सरदेशमुखीचा अमल त्याजकडे चालत असतां गंगथडींचे माहालीं घांसदाणा ेनला आहे व कितेक माहालीं घांसदाणा घेऊ नये याप्रमाणे करार असतां घ...दाणा घेतात. त्यास, मागील कराराच्या यादी पाहून पुढे कोणे माहाली .सदाणा घ्यावा न घ्यावा याचा करार करून घ्यावयासी आज्ञा केली पाहिजे.

¶*Balaji Janardan sends a list of the dues to be recovered from Janoji Bhonsle. He complains that the Bhonsle has committed breach of agreement by realizing ghasdana from mahals which did not belong to him.*

No. 181] [*30-12-1766 ?*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे शेवेसी

विनंती सेवक आज्ञाधारक गोविंद मल्हार कृतानेक सां नमस्कार विज्ञापना यैसीजे. येथील कुशल तागा छ १७ रजब मुकाम किले जामनेर वरघट जामनदीचे सगमी स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशष. येथील वर्तमान तरी रा जाणोजी भोसले सेनासाहेबसुभा नागपुराहून कूच करून साहा रोजानी किले मजकूरी छ १५ रोजी किल्यास दाखल (होऊन डेरे) देऊन बाहेर नदीचे कांठी फौज सुधा राहिले आहेत. समागमे फौज दोन अडीच हजार रा मुधोजीबावा सुधा आहेत. वरकड फौज नागपुरास साबाजी भोसले व देवाजीपंत यैस मागेच आहेत. अदियाप वर आले नाहीत. त्याचाहि मोहर्त सुध त्रितीयेचा आहे. नागपुराबाहेर सिताबरडीवर मुकाम आहे. तेहि दो चौव रोजानी येतील. काल छ १५ रोजी घोरपडे व यादव यैस पाचाशा स्वारानसी फौजेत दाखल जाले. आनंदराव वाघबावा मोहरतानसी कोढालीचे बाहेर येऊन उतरले. तेहि उद्या परवा येतील. आमनेरचा किला जमीदोज आहे. काम मागाचे आहे परतु मजबूद आहे. सभोवती वरधा नदी व जाम नदी आहे. चौफेर पाणी आहे. नदीस खडक आहे. कळावे सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Govind Malhar to Dadasaheb informing him of the movements of the Bhonsle's army.*

2057

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 182] [1766

श्री

शेवेसी आज्ञाधारक भगवंत विष्णु सां नमस्कार विज्ञापना यैसीजे. रा जानोजी भोसले यांचे वर्तमान रा पिराजी नाईक निबालकर वगैरे याची धरनी सेना साहेब सुब्याचे दारी बसली आहेत तमाम देशची फौज यास रजा मागत आहेत. दोन वरसे जाली, छावनीस होते, त्याजमुले गवगवा बहुतच आहे. शेवेसी श्रुत होईल. गगाजी नाईक वावले यांचे घरी कनेचे लग्न आहे; त्यासी रजा देणार धनी समर्थ आहेत. यांच्या जासूद जोड्या चाकरीस आहेत. माझे वर्तमान दोन वर्षे श्रीमंत राजेश्री दादासाहेबाचे शेवेसी चाकरी केली यावर साहेबी कृपा करून सेनासाहेबसुभ्याचे बातमीवर ठेविले आहे. सेवकाचे ऊर्जित करणार माहाराज समर्थ आहेत हे विज्ञेप्ति.

¶*Bhagvant Vishnu, a news writer in Janoji's camp, writes how men like Piraji Naik Nimbalker were demanding their dues from Janoji.*

No. 183] [1766 ?

श्रीशंकर

विनंती जे, रा दिवाकरपंत आले होते ते गेले. भोसलीयाचे घरी खर्चाची मोठी तारावल आहे. यास्तव आले होते. त्यासी उभयेतांसी बोलून जावे मग तैसेच गेले. उभयेता मिळून विनंती करून खर्चास देवावे. येथे कोठें पैसा मिलत नाही. त्याहीवर आम्ही सचोटीचे माणूस तर आज रिकामे जाता येत नाही. त्रिवर्गीहि बसला आहांत. जाबसाल करावा हे विनंती.

¶*The letter describes how Diwakerpant is approaching men for giving monetary relief to the Bhonsles in their straitened circumstances.*

No. 184] [1766

श्रीहेरंब

होलकर यासी पत्र

खासा स्वारी खानदेशांत परगणें येदलाबादेपर्यंत पोंहचल्यावर तुम्हांस इकडील मजकुराचीं पत्रें, भोंसलेयाचा प्रकार वगैरे सविस्तर लिहिलीं आहेत तीं पाऊन वृत्त कळलें असेल. सांप्रत वराडप्रांतीं दर्यापूरावर आहों. हिंदुस्थानांत जलद चलावें हाच मनसुबा पहिल्यापासोन आहे; परंतु भोंसलेयाची सेखी व आमर्यादपणें नानाप्रकारचीं राजकारणें फितुर पाहून यांस तंबी पोंहचवणें जरूर पडिलें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

चिरंजीव   रावहि पुणीयाहून निघोन आले. विना भोंसलेयाचा बंदोबस्त मजलदरमजल चालणें हें दक्षणेंत वाईट, व भोंसल्याचे पारिपत्याचें फारसें अगाधहि नव्हतें. यास्तव महिना दीड महिन्याचा आधिक गुंता पडिला. त्यास खासा स्वारीसमागमें फौज व तोफखाना पोख्ता सरंजाम याखेरीज चिरंजीवासमागमची फौज व मोंगलहि सर्वप्रकारें सामील होत आहे सबब त्यास बच्यावास कोठें जागा नाहीं हें समजोन व खासा स्वारी पोख्त सरंजामानसीं पाहून भयाभीत जाले आणि भेटीस यावयाचा संदर्भ लाविला. वकील आला तो बहुतच बजीदीचे निरोप सांगों लागला कीं जें चित्तास येईल ते करावें, पोटास मात्र, द्यावें वरकड कोणेहिविसीं आग्रह नाहीं. भेटीस येत आसों. यैसे त्याचे प्रकार पाहून मातबर माणसाचा केवलच उपहास करणें उचितहि नाहीं व आपलींहि पत्रें भोसलेयाविसीं सिफारसीचीं आलीं. आमचेहि मतें भोंसल्याचे मसलतीचा उलगडा करून लौकर हिंदुस्थानांत चलावें. आमचा वोढा सर्व प्रकारें हिंदुस्थानचा येविसीं आपलींहि पत्रें येतात यास्तव भोंसले यांस भेटीस बोलाऊन घेतलें. येका दोहों रोजांत भेटी होईल. चिंतो विठल, विठल सिवदेव, त्यास आणावयास पाठविले आहेत. येथून दाहा कोसावर भोसले आसेत. सरकारचे मुद्दे आहेत ते त्याजपासोन उलगडून घेऊन त्यांस फौजिसह समागमें घेऊन येत येत असो. आगोधर हाडेयाचे घाटी नर्मदा उतरून उज्यनीकडून यावें यैसें योजिलें होतें; त्यास या मनसव्यामुळें इकडे आलों आतां येथून नागपुराकडूनहि प्रयागचे सुमारें जाणे सोईस आणि समीप यास्तव इकडीलच मार्गानें येत आसों. लौकरिच येऊन पोंहचूं. येथील गुंता आठापंधरा रोजांत उरकेल. याउपरी दुसरा गुंता कोणेविसीं आम्हांस नाहीं. मजल दरमजल हिंदुस्थानांत चालणें हाच उद्योग आसे. समागमें फौज व तोफखाना भारी सरंजाम. याचा खर्च बेमबलग आहे. येविसीचे तरतुदीचा प्रकार आपणास पयदरपय[१] लिहिलाच आहे. भोसले झाडून बुडवावे यैसाच समय होता; परंतु आम्हांस हिंदुस्थानचा वोढा आणि मातबर माणूस शरण आल्यास निकर्ष करणें उचित नाहीं व आपलीहि सिफारस, यास्तव भोसले भेटीसच बोलाविले असते.

¶*This is a draft letter written by Dadasaheb to Holker in which he refers to the Bhonsle being humbled down and forced to sue for terms. He adds that he is shortly proceeding to the north.*

---

१ टाकोटाक, एकामागून एक.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 185] [1766 ?

दमाजीबावास

श्री

पत्र जें विशेष. तुम्ही मातबर राज्यांतील सरदार. हारयेक विचारें मनसब्यास संनिध आसावें. कराराप्रमाणें सरकार व साहुकार देणें घेणें व येणें जाणें असावें. त्याप्रमाणें तुम्हाकडून घडोन येत नाहीं. याकरितां कागदपत्र व खिजमतगार पाठविले. व राजश्री सयाजी गायकवाड व राजश्री रामचंद्र बसवंत यांसी बहुत वेळां आज्ञा केली. परंतु तुम्हाकडून कोणेयेकविसीचा सरल मार्ग कार्याचा दिसोन आला नाहीं. सालमजकुरीं हिंदुस्थानांत जावें यैसा मनसबा निश्चय होऊन आनंदवलीहून खांसा स्वारी चांदवडबारीपर्यंत आली. समागमें तुम्हासारिखे मातबर आसावें. येथें मशारनिलेस फौजेची आज्ञा होत गेली परंतु फौज तुम्हाकडील नाहीं आणि तुम्हीहि नाहीत. तरी ऐसें कितेक तुम्हाकडील करारांत अंतर. येथें मशारनिलेस पुसावें तरी वोढीचा मजकूर. देणें घेणें कर्जेवामे. विशेष हालाखी सदैव सांगतात. दौलत सरदारी मातबरी मातबर. त्याप्रमाणें विचार तुम्हाकडील नाहीं. यावरून मर्जीत अंतर होऊन गुजराथ प्रांतांतून तुम्हास समागमें घेऊन हिंदुस्थानांत जावें ऐसा ठराव होऊन च्यार मजली आलों. पुढें दरमजल यावें, त्यास राजश्री रामचंद्र बसवंत पुण्याहून येऊन पोहोंचले. त्यांणीं समक्ष येथील मनसबा समजोन बहुतप्रकारें अर्ज विनंती तुमचें निखालस सांगोन कितेकविशी खांतरजमेची विनंती केली. त्यावरून गुजराथचा मार्ग तूर्त तहकूब करून वऱ्हाड प्रांतें भोसलें सेनासाहेब सुभा याजकडें स्वारी जाली. मशारनिले शरण येऊन फौजेसह हिंदुस्थानास यावें यैसा करार जाला. तुम्हाकडील फौज मातबर ठेवावयाविशी आज्ञा मशारनिलेस केली. त्यास यैवजाचें अनकूलतां तुम्हाकडून होऊन आली नाहीं. गुदस्तांचे समजाविशी फौजेचा गवगवा पुण्याचें मुकामीं जाला हें वर्तमान कळलें. तेव्हां सरकारांतून कर्जाऊं ऐवज देऊन लोकाचा लडा तोडला. आणि राजश्री सयाजी गायकवाड यांसी समागमें आणिलें. सांप्रतहि सरकारांतून यैवज कर्जाऊं देऊन फौज ठेविली. याप्रसंगास तुम्ही निकडीनें जलद येऊन पोहोंचावें. यैवजाच्या हुंड्या त्वरेनें पुढें पाठऊन देणें. कितेक सविस्तर वर्तमान राजश्री (जागा कोरी) पाठविलें आहेत. त्याचें मुखें कळेल. हीं वचनें आमचीं यैसीं जाणोन कर्तव्यता करून सत्वर येऊन पोहोचणें, म्हणून पत्र.

¶*This is a draft of a letter intended for Damaji Gaikwar reprimanding him for not accompanying the writer (the Peshwa) with his forces in an expedition in the north though he was written to often to that effect.*

2060

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 186] [*24-1-1767 ?*

पौ छ २९ साबान

सनसबा

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान याप्रति

बाळकृष्ण दीक्षित पाटणकर आशीर्वाद उपरी. येथील क्षेम पौष वा। ९ गुरुवार जाणून स्वकीये कुशललेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपण पत्र पाठविले ते पावले. त्यांत लिहिला मजकूर की वो सिवभट साठे यांचे घर मौजे काये-गावीं आहे त्याची जप्ती करावयास सरकारातून भिकाजी केशव कारकून पाठविले आहेत. हे सरकारचे आज्ञेप्रमाणे त्यांचे घराची व कुल वस्तवानीची जप्ती करितील त्यास आपण अडथाळा न करावा म्हणऊन लिहिले. त्यास पूर्वी राजश्री धोंडोपंत यांनी दौलताबादेहून गोपाळपंत कारकून पाठविले होते तेव्हां वस्तवानी सर्व यादीत वो गंगाधरभट गोखले यांचे विद्यमाने लिहून घेऊन चौकी उठऊन नेली. त्यास येथें त्याचे घर मात्र आहे. त्याचे मारफतीचे गंगाधरभट गोखले पुण्यांतच आहेत. त्यास सर्व ठावके असेल. वरहि यादीत लिहिलेच आहे. कळावें म्हणऊन लि॥ आसे. बहुत काय लिहिणे हे आशीर्वाद.+

¶*Balkrishna Dixit to the Peshwa writing with reference to the attachment of the house of Shivbhat Sathe, says that his property has already been attached and that there is only his house, and he requests the Peshwa to refer the matter to Gangadharbhat Gokhale.*

No. 187] [*17-5-1767*

पौ छ २३ जिल्हेज सबा सितैन.

श्रीशंकर

श्रीमंत राजश्री साहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक धोंडो विश्वनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील क्षेम छ १८ जिलहेजपर्यंत मुकाम शहर बराणपूर येथें स्वामीचे कृपेंकरून सूखरूप असो. यानंतर सरकारचें आज्ञापत्र सादर जालें तेथें आज्ञा कीं लक्ष रुपये यांचे कबज पाठविले आहे तरी येक लक्ष रुपये याचा भरणा जाला असेल तर कबज करांडे यास देणें. ऐशास मशारनिलेकडून पूर्वी नवद हजार रुपये आले ते

+ शिवभट साठ्याचा हा उल्लेख चिन्त्य आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आज्ञेप्रमाणें ओसरीस देऊन शेटीबा आइतोळे याचे कबज घेतले, व हाली साहा-हजार रुपयें दिल्हे; येकूण शाणव हजार रुपये आले. वरकड ऐवजाची निकड करीतच होतों; परंतु करांडे यांजपाशीं पांचशें स्वार व पांचशें पायदळ. त्याचें देण्याचा गवगवा नित्य उठोन कजिये; त्यास पूर्वीं राजश्री मुधोजी भोंसले व इस्मालखान फौजसुद्धां आले होते. तेव्हां तह ठरला कीं दोन महिने करांडे यांणी उपद्रव देऊं नयें. श्रीमंताचे आज्ञेप्रमाणें सरंजाम देतों. याप्रमाणें इस्मालखान दरम्यान येऊन करार जाला; आणि राजश्री बापूजी नारायण यास बोलाऊन नेले. आठ पंधरा दिवस देतों घेतों म्हणोन बोलत होते. शेवटीं भोंसले यांणीं इस्माल-खान याचे विद्यमानें सांगितलें कीं किल्ला द्याल तर सरंजाम देऊं. तेव्हां हे गोष्ट दुर्घट जाणोन मशारनिले उठोन आले. त्याजवर मागती इस्मालखान याणी बलावयास पाठविलें, तेव्हां जिवाजी इंगळे व आम्ही गेलों. ते समयींहि तोच मजकूर दिसोन आला, तेव्हां निघोन आलों; उपरांत करांडे यासी मी सांगितलें कीं हुजुर चला, तेथून तुमचे कामाचा बंदोबस्त होईल; तें त्याणी मान्य केलें आणि खर्चावेंचा ओढ भारी यामुलें त्यांचें कर्ज मुलुकांत थोडेंबहुत होतें तें वसूल करावयानिमित्त रोंखे पत्र केलें. तेव्हां इस्मालखान फौजसुद्धा येऊन करांडे यासी गांठ घातली. युद्ध जालें, त्यानंतर भैरवगड ठाणें करांडे यांचें, स्वार व पायदळ पोटास नाहीं यास्तव सर्व उठोन गेले. राणोजी करांडे किल्ल्यावर राहिले, याप्रमाणें मजकूर घडला, तेव्हां लक्ष रुपयें यांपैकी च्यार हजार व बाकी पाऊण लक्ष रुपयें राहिले ते तूर्त निर्गमांत येत नाहींसें दिसोन आले. मग तेथून निघोन बराणपुरास आलों; कारण कीं खांसा स्वारी देशास येणार, तेव्हां चरण पाहावें याजकरितां आलों तों येथें परस्पर वर्तमान ऐकतों कीं स्वारी फिरोन माघारी चालली म्हणोन तूर्त निघोन घरास जातों. च्यार हजार बाकी येणें यास्तव सरकारचें कबज मी आपल्यापाशीं ठेविले आहे; करांडे यास दिल्हे नाहीं. श्रुत होय हे विज्ञापना

¶*Dhondo Vishvanath informs the Peshwa that he did pass the receipt to Karande for a sum of one lac of Rupees as there remained Rs. 4,000 yet to be paid. He refers to an agreement between Karande and Bhonsle.*

No. 188] *[1768-69?*

श्रीशंकर

सेवेसी आज्ञाधारक व्यंकटराव मोरेश्वर प्रार्थना येसीजे. काल राजश्री जानो-जीबावा भोसले सेनासाहेब हे रा पिराजी नाईक निंबालकर व नन्हेजी जाचक व

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मानाजी सिरगरे व नरसिंगराव पांढरे व तारू गायकवाड, शाहाजी गायकवाड, मानसिंग मोहिते व आनंदराव वाघ, जामदारखान पन्ही अळजपुरकर यैसे पाच हजार फौज काल दोन कोसावर आले; यास्तव हे तेथे गेले आहेत. त्यासी सडे करून घेऊन येणार. प्रहरानी येऊन दाखल होतील. आलियाउपरी आज्ञा होईल तर घेऊन येऊ. श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Vyankatrao Moreshwar writes about the mobilisation of the forces under Piraji Naik Nimbalker, Jachak, Sirgare and others and about Janoji going out to meet them.*

No. 189] [*1768-69*

श्री

रावसाहेबजी

यासी दिवाकर पुरूशोतम विनंती. उपरी : आपले वचेनावर लिहिल्यावर श्रीमंत येजमान आले. श्रीमंताची मसलत काही खराब जाली नाही; सोये पडली. यैस असता आज दुसरा उपवास. सिलेदाराचे कारकोनाप्रमान येऊन आटोपाहार तोंड वासाव तर हे उचित दिसत नाही; येतो. आपन आज्ञा करितात की दरबारात वोढ आहे, बोलू नका. उठून येतो. त्यास श्रीमंत येथे आल्याचे फळ उपवास करावे, मराव हे ठाऊक नव्हत. लाख रुपये दिले तेहि बागलकोटी, सोडनवाची मोहर. फौजेची येकच हाक जाली. दवलत पेचात यावी हा अर्थ घडल हे ठाव नव्हत. च्यार लक्ष रूपये आज पाहिजेत, नाहीतर परिछिन जीव वाचत नाही. कर्जबातरीक घ्यावे. हती घोडी भरीस घालतो तरी पुरत नाहीत यैसा कहर. जर आठ सांगून पाठवितो तर पेच दिसता. सांडनीस्वार पाठविला. त्याचे उतर आले की येथे आलियावर सर्व घडल. तैसेच करार करून येथोवर आनिले. च्यार काले कागद दिले ते आज काये उपयोगावर पडले. त्यास याजला आनिले तैसे याजला जिवंत वाचून येथून जात ते काराव. वाचायाचे असल तर वेंकटरमनाची सेफत आहे. आजवरी यैसे लिहिले नाही. येथे उपाये आमचा नाही. लोकाची घोडी दोन लक्षा रूपयाची मेली आनी मानस मेली ती मरोत. येकदा येजमानास वाचून येथून काढिता तर येक यत्ने करायाचे पुन्ये घडत. याहिवर इच्छा परिछिन. आज जीवत्वाची आशा नाही.

¶*Diwaker Purushottam to the Peshwa : complains about the monetary difficulties of the Bhonsles and requests him to send some money.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

(पत्राचा यापूर्वीचा भाग गहाळ झाला आहे.)

यावर मोठीसी आशा यांसी आहे. त्याचे परं छेदिले पाहिजे. कारभारी याणी चंद्रपुरचे मुकामीहून या मनसबियांचे पूर्वी आम्हास म्हणो लागले की आमचा शह चंद्रपुरावर आहे. धनी क्रोध करून लिहीत आहेत. त्यासी आम्हीहि जाणतो की सरकारचा यैवज वीस पंचवीस लक्ष आहे. त्यावरून आम्हास म्हणो लागले की तुम्ही श्रीमंतास लिहिणे की जेनेकरोन आम्हावर श्रीमंताची कृपेची पत्र येत. त्यांणी चिती कुडत्रीम धरिले की आम्ही वीस पंचवीस लक्ष रूपये परियेंत यांचे वकिलासी बोलोन लिहिले; परंतु याचे उतर कांहींच न आले. त्याजवरून यांचे चिती यैसे आले कीं बाबुराव कोनेर परिछिन पाठवितील अगर मुधोजीबावाकडे तरी पाठवितील. त्याजमुले या मनसबियात पडोन परिनाम यैसा केला. सांप्रत्य माहाराजाहि रा सेनासाहेबसुबा यांसी व दिवाकर पुरूषोत्तम व बालाजी केशव यासी पत्रे बहुत समाधानाची लिहिली पाहिजेत. कारभारियाचे दुर्गुणाचा भाव पत्री किमपि दिसो न द्यावा. जोपरियेंत स्वामींचे चरणासी सर्व मनसबे रूजु होत तोंपरियेंत कोन्हासहि विशाद करून लिहिल्यात न दाखविले पाहिजे. खरखोटे सर्व प्रसंगानरूप विदित होतील. यांचे पत्री भाव दाखविला पाहिजे की तुमची येकनिस्टपणाची वर्तनूक भगवंत विष्णु याणी विदित केली, त्याजवरून सर्व विदित जाहाले. तुम्ही आपले कामकाजाचा बंदोबस्त करणे व सरकारचा यैवज सत्वर पाठवणें. दुसरे फौजेची बेगमीस त्रिकमसेटीजवल सात लक्ष रुपये कर्ज ठीक केले आहेत. दोन लक्ष रूपये चंद्रपुरचे मुलकातून घेतले. लक्ष रूपये नऱ्हेर बलाल नागपुरचे सुबेदार याजवळून घेतले. नागपुरचे साहुकारापासून येक लक्ष रूपये घेतले. कृष्णाजी गोविंद यासी बोलाविले. त्याजपासूनहि काही घेतील. काहीक यैवज बंगालियातूनहि येणार आहे. फौज दोन हजार नागपुरास आहे. सेवकावर शब्द लाऊन लिहिले की बातमी न आली. त्यासी च्यार जोडिया आहे. त्याजमध्यें चंद्रपुरचे पाणियामुले सर्व दुखी पडले. आम्हीहि दोन महिने शरीर स्रमात होतो. नागपुरास आलियावर काहीक आराम स्वामीचे कृपेने आहे. पूर्वी दाहा जोडियाची नेमणूक होती. त्याजमधे यैसे आहे. आम्ही येथे रा बालाजी केशव सपरे याचे कर्ज दीड हजार रूपये स्वामीच्या नावावर घेतले आहे. यांचे रूणापासून मुक्त कर(णार)धनी समर्थ आहेत हे विज्ञाप्ति.

¶*Bhagwant Vishnu explains the complicated situation at Nagpur which makes it difficult for Janoji to pay off the Peshwa's claims.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 191] [*1768*

श्रीरामोजयति

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री अनंदराव
स्वामींचे सेवेसी

पोष्य जिवनराव माधव कृतानेक दंडवत प्रा। विनंती. उपरी, येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत गेलें पाहिजे विशेष. पत्र पाठविलें पावोन संतोष जाला. जासुदाबरोबर तेलाविसी सांगोन पाठविलें त्यावरून चमेली वजन पक्के ८४॥. अछसेर पाठविली असें घेऊन उतर पाठवावें. प्रस्तुतचे वर्तमान भोंसलें दोन तीनसें श्वारानसी गावेलगडास दाखल जाले. फौजेची अवस्था दौडीमुलें काहीं ल्याहविसी राहिली नाही. खाष्याच्या शरीराचीहि अवस्छा तशीच जाहाली आहे. फारच कायले अहेत. याहिपेक्षां विषेश लोकोपवादाचें वर्तमान ल्याहावें तर तहकीक कलल्यावांचून कैसें ल्याहावें? पुढें येईल वर्तमान ते लिहिले जाईल. प्रस्तुत श्रीमंताचा मुकाम कोणे ठिकाणीं आहें हे वर्तमान येथें कांहीं कलत नाही; तर आपणाकडे काही आले असेल तरी ल्याहावें. बहुत काये लिहिणे? लोभ असावा हे विनंती.

¶*Jivanrao Madhao to Anandrao informing him of the arrival of Bhonsle with some 300 horsemen at Gowalgad. The writer says that the party was much exhausted by the rapid march.*

No. 192] [*5-5-1768*

श्री

राजश्री हरिपंत तात्या गोसावी यांसी

८ अखंडितलक्ष्मीअलंकृत राजमान्ये श्नो हणमंतराव जाधवराव दंडवत विनंती. उपरी, येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशष. आपणांकडोन हुजरे आले त्यास आम्ही मोहूर्ते करोन बाहेर निघालो. सरदारीचे गल्हाटियाचे वर्तमान आपणास विदितच आहे, याजकरिता च्यार दिवस अधिक लागले. आता

शिक्का.

सत्वरीच येऊन पोहचतो. चिरंजीव राजश्री जैसिंगराव बापू फौजसुधा भोसल्याकडोन आलें. त्यांचा मानस आपल्याकडेस यावयाचा आहे. आज्ञा होईल तर चिरंजीवास फौज सुधा आम्ही आपले बराबर घेऊन येतो. तेथ आल्यावर सोये

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आपणच करोन देतील. उतर सत्वर पाठवावे त्याप्रों येऊन पोहचतो. रा छ १७ जिल्काद. बहुत काये लिहिणे, लोभ असो दीजे हे विनंती.

मोर्तब
सुद

¶*Hanmant Rao Jadhav informs Haripant about his movements.*

No. 193] [*3-6-1768*

पो छ ८ सफर समान

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक त्रिंबक नारायण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना तागाईत छ १७ माहे मोहरम स्वामीचे कृपाकटाक्षेंकरून वर्तमान सेवकाचें व शहर बराणपूरचें येथास्थित आसे विशेष. सरकारचे जासुदजोडीबराबर आज्ञापत्र सादर जालें कीं राजश्री मुधोजी भोसले यार्णी शहरचे लगते माहाल पैकीं यैवज घेतला आसेल तो चौकसी करून लिहिणें म्हणोन आज्ञा त्यास, शहर मजकुरीं राजश्री गणेशपंत दिमत सरसुभेदार यांस विनंती केली याणी माहालची चौकसी करून सेवेसीं लिहिलें आहे त्याजवरून निवेदन होईल. भोसले घांट उतरून परगणें बोदवड व जामनेर येथं धामधूम करून परतून वराडांत जाऊं(न) हिवर बारेनें माळव्यांत गेले. त्या मार्गें नेमाड प्रांतीं सरकारचे माहाल व सरंजामी माहाल येथील घांसदाना घेऊन नर्मदा उतरले; साहेबास कलावें. सेवेसी शृत होये हे विज्ञप्ति.

¶*Trimbak Narayan supplies news to the Peshwa regarding the Bhonsle having proceeded to Malva after creating disturbance on his way in Bodvad and Jamner.*

No. 194] [*16-7-1768*

श्री

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री माहादाजी गोविंद

स्वामी गोसावी यासी

पोष्य कृष्णाजी माहादेव कतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहिणे विशेष. इकडील वर्तमान तर श्रीमंता-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जवल फौज तीस चालीस हजारपर्यंत जमा जाहाली आहे. आणखीहि जमा होत आहे. रुकनुतदौले याजवल फौज दोनपर्यंत जमा जाहाली आहे. भोसले हाली नागपुराजवलच आहेत. फौज दाहाबारा हजारपावेतो आहे. अद्याप अंतर विसाबेविसा कोसाचे आहे. देवाजीपंतहि येऊन लस्करात दाखल जाहाले. त्याच्या आसमंतात चौकी आहे. गाठ थोडकेच दिवसात पडेल. पुढे जे वर्तमान होईल ते सविस्तर मागाहून लिहून पाठऊं. वरकड कितेक बारीक मोठे वर्तमानी राजश्री गोविंद सदाशिव पाठविले आहेत. सांगता साद्यंत कलेल. रवाना छ १ रबिलोवल सन तिसा सितैन मया अलफ. बहुत काय लिहिणे? लोभाभिवृध्दि अखंडित असील पाहिजे. वरकड नवल काये लिहिणे हे विनंती.

¶*Krishnaji Mahadeo informs Mahadoji Govind that the Peshwa has mobilized an army of nearly forty thousand. Ruknudaula and Bhonsle are also preparing for the coming conflict.*

No. 195] [5-9-1768

पो छ २९ राखर समान त्रितीये प्रहर

श्री

सेवेसी विज्ञापना. ताा छ २३ राखर प्रहर दिवस प्रात:काल क्षेम असे विशेष. सरकारचे लखोटे दोन आज प्रात:काली श्रीमंत रावसाहेब व गोपालराव व बापु व गोविंद सिवराम व मोरोबादादा व गुरुजी यैसे सकाली दोन घटिका खलबत करून हे लाखेटे जलद जावयास दिल्हे ते सेवेसी राा केले आहेत. व येथील अर्थ सुध्धा दिसत नाहीं. काल रात्री साफ जाब तिकडून जाहला जे आले तसेच जावे. त्यावरून येथे डेऱ्याभवती चिखल भारी पडिली म्हणून जवलचे लोक दूर निपल जाग्यावर उतरले होते. त्यास आजचं प्रात:काली ताकीद जाहली की जवल येऊन उतरणें, यैसा मजकूर घडत आहे. सरकारच्या फौजा व पागा ग्रोलाविल्या, याप्राहि बातनी आहे. याजउपर होईल ते लिहून पाा. आम्हाबरोबर जासूद आहेत. हे म्हणतात जे आमचे रोजमरे जाहले, त्यांस जासुदाचे सबनिसास ताकीद करून रोजमरे पाठवावे. येथील कार्यास दिसगत दिसत्ये. वरघाटचे किले याही मागितल्यावर त्याणी कोकणचे जंजिरे तीन च्यार मागितले असेहि वृत आहे. तेव्हां मग कलतच आहे. मी आज्ञेप्राा यथाबुध्दीने विनंतीपत्रे पाठवित आहे. यातहि स्वामीनी बरे वाईट पाहावे. मलाहि केवल मुख्याचे तोंडची बातनी हरयेकांची सापडत्ये यैसी नाही. परतु जे आईकतो त्याची त्रिशुध्धता येथे आईकोन सेवेसी लिहितो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The writer refers to a despatch sent to the Bhonsle after consulting the Peshwa, Gopalrao, Sakharam Bapu, Govind Shivram and Moroba Dada.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 196] [*29-9-1768*

श्री

राजश्री रावसाहेब गोसावी

यांसी

८ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री खंडेराव दरेकर सरलस्कर दंडवत विनती. येथील कुशल जाणौन स्वकीये लिहित जावे विशेष. छ १७ जावलचे पत्र आले ते छ २९ जावली पावले. लोकाची कामे करीत करीत वराडात जाणार. त्यास जलदीने जाणे म्हणौन आज्ञा जाहाली. त्यास बीड प्रांती फौज जमा जाहाली नव्हती. यास्तव मुकाम केले. हालीं आडीच हजार फौज जमा जाली. त्याजवरून कूच करून गंगा उतरोन दर-मजल आज्ञेप्रमाणे जाऊन पोहोचतों. स्वारीबरोबर यैवज पुण्याहून आणिला होता. त्यापौ खर्च होऊन सिलक अजमासे पांच हजार राहिली. पुढे रोजमरे-यास यैवज नाही. त्यास यैवजाची रवानगी करावयास आज्ञा जाहली पाहिजे. यैवजाचे कामगारीस सिलेदार निा सातप मंडली पाठविले आहेत. छ १ जावलचे आठवडे यास यैवज नाही. यास्तव जलदीनें रवानगी करावयाची आज्ञा जाहाली पाहिजे. फौज जमा जाहाली, त्याची यादी अलाहिदा पाठविली आहे. छ २९ जावल बहुत काये लिहिणे हे विनंती.

श्री
ती चरणी तत्पर
जयाजीसुत खंडेराव
दरेकर सरलष्कर.

लेखन
सीमा

¶*Khanderao Darekar to the Peshwa informing him that he is proceeding apace with rapid marches. The writer asks for funds for paying off the arrears of the army.*

No. 197] [*September 1768*

श्रीगजानन

सेवेसी विज्ञापना. राजश्री दिवाकरपंताचे वर्तमान आपण राजश्रीचे नावी पत्र पाठविल ते प्रविष्ट केले. त्याचे उतर केलें ते सविस्तरे लिहितो. वासिमे-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
समीप पैनगंगेवर श्रीमंताचा मुकाम आसता, राजश्री पंत मारनिले सैन्यांत आले. ते समई सेनासाहेबसुभा यांनीं मांज्यावर यावे. तेथे स्वामींनी येऊन त्यास श्रीमंताचे दर्शनास आणावे. त्या वेळेस सेनासहिबसुभा यानी मागाहून चिठी पाठविली की, आम्ही येत नाहीं. त्यावरून स्वामीस व श्रीमंतास आनुमान येवि-षईचा माझे विचारेच हा विचार जाला म्हणून. त्यास मजला तो हे वर्म कळले नवते. परंतु प्राप्त जाल्यास निरुपाये. याचप्रमाणे समयाचे समई जे जे घडून आले, त्याचा दुरारोप श्रीमंताचे गैरमर्जीचे कारण मजपासोनच म्हणोन. त्यास प्रतिपदी याप्रमाणें निरापराधी शब्दे येऊन श्रीमंताची गैरमर्जी व्हावी, हे कोणे आर्थाकरिता सोसावे? येकदाचे परस्परें श्रीमंत श्रीमंताचे दर्शन कोणेहि प्रकारें घडून न्हस्य जाल्यास आतःपर या कारभारांत पडनार नाहीं. शेपथपूर्वक विज्ञा-पना केली. तत्समई श्रीमंतास व स्वामीस मिथ्या भासवितो यैसे समजून हे तुम्हापासोन कालत्रई घडनार नाही. त्याचा तुमचा आन्योन्य प्रकार त्यांत यैसे तुम्हापासोन घडावे हे आवटीत. त्यावरून श्रीमंताचे गल्यावर व स्वामीचे गल्यावर हात ठेविला जे, परस्परें दर्शन होऊन येकदाचे कृतकार्ये जाले म्हणजे मग जो नियेम केला, त्यांत किमपि आंतर येणार नाही. यैसे विनंतीचा अर्थ जाणून सर्वस्वी साभिमाने चालऊं म्हणून आभयेहि श्रीमंताचे व स्वामीचे प्राप्त जाले. ते द्रुढतर धरोन उमरावतीचे मुकामी येतां सेनासाहेबसुभा यानी आम्हांसी पूर्ववत कारभार मत्त बोलावे, चालत आल्याप्रमाणें चालावें, या अर्थे विचारिल्यास स्पष्टच उतर केले की, इतःपर तुम्हास कलल तसें आपला बंदोबस्त करावा. मजपासी गुंता नाहीं की मी निरोप घेऊन घरास जातो. त्याज-वरून मुकामीं तीनवारपर्येत राहून नाना प्रकारें बोध करावयाचे रीतीने केला. परंतु माझा येकच निश्चये श्रीमंताच्या पायासी जाला. त्याचे लक्ष राखून ते कुटुबाकडे गोवलीवर गेले. आंम्ही आमनेरास गेलो. तेथे ८ दिवस होतो. तो वर्तमान लोकवार्ता आमनेर बदलविली म्हणोन. हे उपाधी खोटी म्हणोन नागपुरास आलो. * * हून तेहि आले. येथेहि आल्यास बहुत साधना केली. * * इकडील नियेमांत +आनतर पाहून धणीपणाचा दाब घालून सिबंदीचे देणे घेणे जाले आहे याची वाट काये? आजपर्येत येख्तीयारी तुमची. आतां यैसे वरचेवर ठालणे उचित नाहीं. आपले आपणच विलेवार करणे विहित. आम्ही करावे यांत मर्यादा राहणार नाही. त्यावरून उतर तुमचे वाजवी ज्यापासी जे निघेल ते घेऊन कार्य करणे म्हणोन उतर केले. त्याज-

---

+ अंतर.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वरून दोन च्यार आप्त होते, त्यांनी आमचे सर्वध्यक्षतेचे भरसियावर मनस्वी-पणाचे काम केले. त्याच्या संधी धरोन बाजीयाफ्तीचा आकार ठेराऊन, त्यास चेक्रावलीचे व्याज व बटा येणेप्रमाणें दोन च्यार रकमा लाख रुपये नेले. चौघाची कामे दूर केली. आमनेर घेऊन वतने जफ्त केली. ठेवरेव कोठे काये आहे याची चौकसी करणे ते केली, आण करीत आहेत. दामाजीपंताचे घरी वस्त्रपात्र आदीकरोन सर्व सोडून येक येक वस्त्रानसी नूतन ग्रहप्रवेश जालो. मध्येमध्ये चतुर्विध साधना करीतच गेले. निकूरच्याहून आत्याग्रहे तीन लक्ष वीस सहस्त्रपर्येत नख्त व जैवाहीर, हती, घोडे उटे वगैरे तमाम नेऊन निदानी पोषाकी वस्त्रे नवीजुनी निवडून जुनी द्यावी, नवी न्यावी, येथवर केल्यास धैर्या-धिष्टित चित करोन श्रीहरीसेवेत सादर आहे. पुढे विजेयादशमीचा उत्छाह आहे. प्रतिवर्षी पडित आदीकरोन येत आसता त्यास साहा हजार रुामात्र ठेविले. हेहि त्या दिवसपर्येंत राहून उपेगी पडतील यैसे निश्चये करणियांत येत नाहीं. आर्थहरण तो जालें. पुढे प्राणाचाहि संकल्प केला. परंतु आत:पर याचा कारभार नको. येविषईची प्रतिज्ञा समर्थाचे पायासी. ती खरीखुरी आहे. शरीरीहि शूळ निर्माण जाला. श्रेम होता आहेत. माहोत्साह मात्र जाला पाहिजे, येवढी वासना. हे सिध्धीस गेल्यावर मग काही आस्छा राहिली नाही. नित्य-कृत आहेरनिसी श्रीचे चरणावलोकन करीत श्रीमंताचे पायांसी वंचकता न घडावी. हे लक्ष धरोन आहे. त्यात जे घडल ते सुखेनैव घडो. उतर लेहून द्यावे तर येथील मर्जी नाही. म्हणौन संक्षेप केला. इकडून तों नेमाप्रमाणें आमरणपर्येंत आंतर लक्ष आहे. स्वामीसमर्थापासोन घडल तसे घडो. सैदलष्करखान व कविजेंग व मुरादखान याजप्रमाणें मात्र न व्हावे. स्मरणापासोन दूर न धरितां कृपाभिवृधी असावी. आंम्ही सर्व प्रकारे आपराधी. प्रतिसमई श्रीमंतासी प्रतरणा करणार. यैसे समजले. जे आहे ते प्रकर्णानुसार प्रत्ययास आले आसेल, की पुन: येईल ते खर. येथीलहि प्रयेत्न फार आहे की आमचे आंगी आजपर्येंत कारभार केल्याची प्रतरणा लावावी. श्रीहरि लावणार नाही. याहिवर न कळे. यैसे जाले. कलल पा॥.

¶*The writer says that Diwakar Purushottam tries to absolve himself from the charge levelled against him that it was at his instance that Janoji refused to interview the Peshwa though he had promised to do so. In a mood of disappointment Diwakar further says that he is tired of administering the Bhonsles' affairs and the sooner is he freed from it, the better. May the writer be Vithal Samraj?*

2070

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

श्री

सेवेसी विठल शामराज चेरनावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ २९ जमादिलावलपरियेंत वर्तमान यथास्थित आसे. राजेश्री सेनासाहेबानी साबाजी नानाची रवानगी केली. भाद्रपद शुध सतमीस बाहेर डेरे दाखल जाले. तें वर्तमान पेशजीं विनंतीपत्रीं सेवेसीं लिहिलें आहे. आज त्रयोदसीस जागा ढालून पुढें आदकोस गेले. प्रज्येन्यें फार लागला आहे यामुलें अटकाव. वरकड रवानगीचें साहित्य सेनासाहेबानी करून दिलें आहे याजविसीं मधेस्तीचा शब्द श्रीमंताचा व वरकड मुतसदी यांचा न लागावा हे चिंता फार करितात. रात्र दिवस श्वता आपन मेहनत करून सारीं कामें येकीकडे ठेऊन रवानगीची तरतूत केलीहि आहे; करितात. मुतसद्यांपैकीं राघोबा बक्षीस सावकाश वाटत नाहीं. दरबारास येत नाहींत. भवानीपंत मुनसीसहि ज्वर आला आहे. या प्रकारें कारभारियांची अवस्था. नानाच्या येन्यास अटकाव येक प्रज्येन्याचा. दुसरा आर्थ कांहीं नाहीं. आपल्याकडील जासूद व बोथाटीबारदार येथें बातनीस आले आहेत. सेवकास तों कांहीं भेटले नाहींत; परंतु जासुदास आमचा बोथाटी बारदार भेटला होता. वरचेवर ठिकाना न सांगतां गेला. त्यास त्यांतून कोनी जासूद याच्या फडनाईकाजवल बोलला जे, श्रीमंत दादासाहेब बाहरे येत जात होते. उभयेतां श्रीमंताचें समाधान थोडें बहुत जालें. त्या संधींत श्रीमंत दादासाहेबानी नवाबास पत्रें लिहिलीं जे, रावसाहेब व भोंसले येकत्र जाले आहेत. हे उभयेतां मिलून तुम्हांवर येनार. हे जों येकजागां जाले नाहींत तोंवर तुम्ही व हैदर नाईक येकत्र होऊन पुण्यावर येणे. यांजवल फौजहि आतांसी नाहीं. भोसलेहि आद्याप मिलाले नाहींत; तोंवर हैदर नाईक व तुम्ही मिलून पुण्यावर येणे, असीं पत्रें हैदराबादेस दादासाहेबाचीं गेलीं. तेथें धोंडोंरामपंताच्या जासुदानी या जासुदास वळखून त्याजवल घेऊन गेले. त्यानी जासुदापासून पत्रें पाहून तेच पत्रें धोंडोपंतानी आपल्या जासुदाजवल देऊन श्रीमंताकडे रवाना केलीं. श्रीमंतानी व मोरोबा दादानी ते पत्रें पाहून उभयतांही पत्रें घेऊन दादासाहेबांकडे गेले; त्यास दाखविलीं. दादासाहेबानी पत्रें पाहून शफत केली जे आपन पत्रें लिहिलीं नाहींत. नाहक माझ्या नांवें पत्रें लिहून कोनी पाठविलीं आहेत. फार आतिशये केला. कासीस जातों म्हणून म्हणतात. फिरून श्रीमंतानी बंदोबस्ती केली. याप्रमाणे वर्तमान आपल्या जासुदानी यांच्या जासुदास सांगितले. त्याने सेनासाहेबास सांगितलें. सेनासाहेबानी रात्रीं दरबारास गेलों होतों येकांती बसून मजला हें वर्तमान सांगितलें. सेनासाहेब बोलले जे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तुम्हांकडीलच चार बातनीस जासूद व बोथाटीबारदार आले आहेत, त्यानी हें वर्तमान आमच्या जासुदाजवल सांगितलें. यानी आपला जासूद बोलाऊन आणून रुबरू याजकडून मजला सांगविलें. सेनासाहेब बोलले जे श्रीमंत व मोरोबादादा उभयतां मात्र येकदील आहेत. वरकड तेथील मुतसदी सारे द्वामोशायन आहेत. याजकरितांच राज्यांत फितवे होतात. मुतसदी व फौज सारे फितव्यांत आहेत. आमचे भेटीचे वेलेस कितीकांचीं पत्रें व निरोप आम्हांकडे आले जे तुम्ही भेटीस येऊं नका, दगा करितील, याप्रमाणें कितीकांचे निरोप आम्हांकडे आले होते. मुतसदी तों केवल मात्रागमनी आहेत. साऱ्यांच्या चित्तांत दादानी कारभार न करावा हाच पोटसूळ त्यास आहे. कोनाचा भरंवसा श्रीमंतानी न करावा. लोकांचा येका तुमचा नाहीं; चहूंकडे फूट दिसती. कसें होईल न कले. फार श्रमी जाले. आम्हांविसीं उगेच श्रीमंताच्या चित्तांत सवंशये जातो. असो. आमचा इमान येकच आहे. च्यार वर्षें जें तुम्ही कराल त्यास मी हजर आहें. त्यांत तुमची खातर-जमा जाली आनी आम्हांवर कृपा करून ममतापूर्वक माझें उर्जित केलें म्हणजे जन्माचे खाविंद आमचे श्रीमंतच. माझे क्रियेस आंतर होनार नाहीं अगर श्रीमंतास भरवंसाच न ये तर आमचा उपाये काये? चौवरशात ब्रम्हकपाटच आमचे पाठीसीं लाऊं लागले तर पांचवे वरसीं आमचा उपाये नाहीं. तदोत्तर आम्हांस आपलें बरें दिसल ते करूं, हें साफ बोलणे आमचें आहे. अंतर येक व बाहेर येक असें आमचें कोणतेंहि बोलनें नाहीं. या बोलन्याचीं उत्तरें जसीं सुचलीं तसी खातरजमा सेनासाहेबांची करीत गेलों. बोलले जे तुम्ही खातरजमा करितां परंतु श्रीमंताच्या चित्तांत उगेच सवशये होतात. भलताच सिकोपा मागें लावितात यास काय करावें? यास उत्तर केलें जे पेशजीं वर्तनुकी संशयात्मक घडून आल्या, यास्तव श्रीमंताच्या चित्तांत वसवास येतो येकनिष्ट वर्तनूक पाहल्यास किमपि तिकडून अंतर होनार नाहीं. त्यांत दादाची मध्यस्तीस बटा लागनार नाहीं. ते बोलले जे खाविंद उलटून पडल्यास दादा काये करतील? त्यास उत्तर केलें जे श्रीमंत व दादा शरीरें मात्र दोन आहेत परंतु प्राण येक. गंगाजेली ब्रम्हेश्वरावर देताना रावसाहेबांचे रुबरू दिवाकरपंतासी दादाच बोलत होते. दिवाकरपंताच्या चित्तांत जे श्रीमंतानी असीं उत्तरें आपल्यामुखेंकडून बोलावें आनि बेल व गंगाजल द्यावें. तेव्हां श्रीमंत दिवाकरपंतासी बोलले जे दादास व आम्हांस प्रत्यक समजलां आहां कीं काये? जेते बोलता ते आमचींच वचने होयेत. असें बोलून बेल व गंगाजल दिल्हें, त्याप्रमाणेंच त्यानी निभाविलें. पुढें भेटी जालियावर तुमची व श्रीमंताची वचने प्रमाणयुक्त भाशन जे जालीं आहेत त्यांत किमपि आंतर होनार

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

नाहीं. संव[illegible] कां [illegible]? [illegible] तुमची धरावी. ते नवाबाचे चाकर पूर्वी तुम्ही उत्पात केले आहेत. आतांहि न जाणू ते काय तुम्हांस भासवितील तुम्हीं काये यैकाल. दुसरें हिंदुस्तानांत कर्णाटकांत तुमचे कागदींपत्रीं सिलसिले व वकील परिछिन होते. केलेले सरदार तुम्ही मागें असें करित आलां आहां. दादासाहेबांचें तुमचें इमानप्रमाण जालें आहेत. तेथील ग्रहकृत्य येक प्रकारचें यास्तव कोणत्या रंगांत तुम्ही मिळून जाल कीं हा संवशये मात्र. आपन मऱ्हाठे सरदार, चवघे दादाभाई मिलून काय आपनांस सांगतील, आपन काये यैकतील, यास्तव मात्र वारंवार संवशये. दुसरा अर्थ तेथें कांहीं नाहीं. आपन संवशये कांहीं चित्तांत न धरावा. श्रीमंताविसी पुर्ती खातरजमा असावी. याची उत्तरें सेनासाहेबानी केलीं जे इसमालखानाचा मजकूर बोलला तर त्यांचा आमचा भाऊपना हा खराच; परंतु ते नवाबाचे चाकर आम्ही याचे कोनीहि आपलाल्या वलनानेच वोढील; परंतु स्वामी भूत्ये न्यायास आपलाला पंथ निरालाच आहे. त्यानी उदंड जरी आम्हांस सांगितलें तरी आमचें आम्हांस दिसतें जें श्रीमंतास जे दिवशीं दुसरा विचार ते दिवशीं तुरुकमये दक्षेण होईल. आम्हांस कोण पुसतो? आनेत्र आमचीं श्वया (?) जे आहेत श्रीमंताविसीं ज्याची सुधता नाहीं त्याची अवस्था तरी काये होनार? किंवा याज माघारें आमच्यानें दक्षेन हिंदुस्थानचा बंदोबस्त होतो हे ह्या गोष्टी साऱ्या मिथ्या. त्याच्या कल्यानांत आमचें सर्वांचें कल्यान आहे. या आमच्या इमानांत जे दिवसीं विपर्यास ते दिवसीं आमच्या जिंदगानीसच विपर्यास असें जानावें. मग दौलत कोनाची? श्रीमंत कायेम तर आमची दौलत कायेम हे पुर्ती समज आमची आहे. पूर्वील सिलसीले चहूंकडे जे जाले ते आम्हांस बोलतां न ये; परंतु हें इतकेहि कृत्य माझें नव्हे, हें दिवाकरपंतानी चहुकडे सूत्रें ठेविलीं होतीं. मी त्यास सांगेहि परंतु त्याची समज कांहीं आनीख पाहातां विभिच्यार भक्तीनें भगवत प्राप्त नाहीं, येकनिष्टतेनेंच ईश्वर प्राप्त आहे. कैलासवासी बावासाहेबांस दमाजी गाईकवाडानें साताऱ्याचे सालीं हुंड्या देखील पाठविल्या होत्या. सामील जालियास आनिखहि प्राप्त फार होती. परंतु बावासाहेबानी दुरंदेसी करंता श्रीमंतांसी आनेत्र भाव केल्यानें पुढें प्रांत सुधां नाहीं. त्याजकडूनच आमचें ऊर्जित. त्यासी विपरित केल्यानें पुढें आपलें बरें नाहीं, असें जाणूनच गाईकवाडाच्या हुंड्या फिरून पाठविल्या. सांप्रत आम्हीहि दिवाकरपंताच्या मसलतीनें उदंड करून पाहेले परंतु प्रांत कोठेंहि न लागला पाहतां याचें कृत्य असें म्हणूनच आमचे दौलतीवर आफत हें जाणूनच दिवाकरपंतास घरीं बसविलें. आनेत्र कोनी आनिख समजतात परंतु पुर्ती समज माझी असी जाली जे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
श्रीमंतासिवाये आपले बरें नाहीं. हें जाणून कृत्रिम दूर करून येकनिष्टता आविलंबिली आहे. हें केल्यानें कसें आहे असें पाहावें. श्रीमंतहि आमची येकनिष्टता पाहतात. आम्हीहि श्रीमंताचा इमान व दादांची मर्धेस्ती हे चेरित्र पाह्यासच साबाजीबावास रवाना केलें आहे. साधनशक्त कसी करितात किंवा साबाजी-बावासच बगलेंत घेऊन मजवर उलटून पडतात काय होतें हें मीहि पाहातों. हे कामी आपमतलबी साधनशक्त तेथें फार आहे, यास्तव तसेंच आहे किंवा काय मिजाज आहे हें पाहावें. याचें उत्तर केलें जे दिवाकरपंतास व भवानीपंतास ठाऊक आहे कीं श्रीमंत व दादा मुधोजीबावा व साबाजीबावाविसीं काये म्हणत होते. ते उभयेतां लायेक बारगिरीचे आहेत. आमची द्रिष्ट सर्वविसीं सेनासाहेबावर आहे. आपन भेटीस श्रीमंताच्या जानार नाहीं, या उभयेतांतून येकास पाठवितों म्हणून सांगूण पाठविलें तें श्रीमंतानी कबूल केलें कीं काये? येदांचे मसलतीस पनास साठ लाख रुपये खर्च जाले. या प्रांतांत येक रुपया मिलाला नाही; परंतु श्रीमंताच्या आपल्या भेटी जाल्या, सख्य जालें, हेंच उभयेपक्षीं समाधान. कोनास उभयेतांतून येकास बगलेंत घेणे आसते तर तुम्ही तों दोघांसहि पाठवावयास राजी होता. अगर त्यांचा मणोदये तसाच असता तर तुमचे भेटीचा आक्षेप कशास करते? पेशआंदेसी न करतां उगेच संवशये चित्तांत आनावें हे आपनास उचित नाहीं यावरून लाजबाब जाले. सेवटीं बोलले जे श्रीमंतावीसी माझे चितांत दुसरा अर्थ असेल तर ईश्वर साक्ष आहे, या प्रमाणे बोलले. नानाचे खानगीचे लोकाचा देण्याचा राडा पडला होता, बक्षीला बरें वाटत नाहीं यास्तव सेनासाहेब आपनच बक्षीच्या घरास जाऊन लोकांच्या समजाविसी करून चिठ्या करून दिल्ह्या. लोकांचा व पागेच्या बारगिराचे गुते वारले आन भाद्रपद वद्य प्रतिपदेस सिताबरडीवरून कुचे करून पुढें दोन कोस नाना गेले. सेनासाहेब आपन जाऊन कुचे करविलें. सुज्यायेद्दौलाकडील वकील सिवरामभट नामें येथें आला आहे. सुजायेद्दौलानीं पत्रें पाठविलीं आहेत जे: दा हजार स्वार येक सरदार आम्हांकडे पाठवा. फिरंग्यासी आम्हांसी हर्शामर्शी लागला आहे, त्यास फौज इकडे पाठवा. सिवनी छेपाऱ्यापासून फौजेस नालबंदी व रोजमरे देऊं. फौज तेथें पावल्यावर पांच लाख रुपये नख्त देऊं व कार्य जालियावर कांहीं मुलकी सरंजामहि देऊं. मकसुदाबादेकडे तुमच्या कार्यास आम्ही येऊं, याप्रमाणें पत्रींहि होतें वकीलानेहि जावसाल केला. त्यास यानी उत्तर केलें जे श्रीमंताकडे आम्हांस जावें लागतें. इतकी फौज पाठवावयास कोठें आहे? आम्हांस कांहीं नको. इतक्या खोल्या पाण्यांत आम्ही सिरत नाहीं. तें देवाजीपंताचें कृत्य आमचा धावरा इतकी

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

नाहीं. येक श्रीमंताचे आमचेवर आहे. त्यांच्या पोटांत सान्या गोष्टी आमच्या बऱ्याच्याच आहेत. इतकें लांब धावतीत आम्ही पडत नाहीं. मकसुदाबादचा प्रकार श्रीमंताची आज्ञा घेऊन सारे फौजनसीं आम्हींच येक दोन स्वारी तिकडे केली तर आम्हांस कोनी साहाये नलगे. आमचें फौज पाठवणें होत नाहीं असा साफ जाब दिल्हा. गणेश संभाजीविसीं कोनी कोनी याच्या चित्तांत संवशये घातला होता जे ते सुज्यायेदौलासीं सख्य करतील कुटुंबसुधां तिकडेच आहेत याच्या चित्तांतहि संवशये आला होता. गणेशपंताच्या वकिलानें येथून त्यांस लिहून पाठविलें जें यांच्या चित्तांत आसा संवशये आला आहे; त्यास त्यानी कटकीहून सेनासाहेबांस पत्रें पाठविलीं जें म्यां साहेबासी इमान केलें आहेत, वार्धिक दशा माझी जाली, आखरीस लेकराबालांस साहेबाचे पायेजोड केली आहे, तिकडे श्रीमंताकडेहि म्यां चाकरी करून दुरोरोप आला म्हणून हे पाये जवल केले. मजपासून आंतर किमपि होनार नाहीं. पुढें तरी प्रांत माझा काये होणें आहे ? कुटुंब येथून रवाना करितों. नागपुरांत मुलें लेकरें कुटुंब तेथें राहिले. आज्ञेप्रमाणे दत्ताजी गणेश कटकांत राहतील. कनिष्ट पुत्रासहेंवर्तमान फौज़सुधां दसरा जालियावर मकसुदाबादेवर आपन जातों; याप्रमाणें पत्रे आलीं; त्यावरून येथील खातरजमा होऊन वस्त्रें पत्रें बाहलीचीं त्याजकडे जानार. प्रतिपदेस कुचे करून दरकुचे पुढें जानार; परंतु त्रितीयेचा पक्षे यास्तव मुकाम करून बाहेरच सारा सरंजाम पाठविला. कबिलेसुधां सेनासाहेबहि तेथेंच जाऊन पक्षे केला. चेतुर्थीस कूच करून कोसभर पुढें गेले; तेथें तीन दिवस आवग्र रात्र-दिवस पाऊस लागला. लोकांची समजाविस सारी जाली; परंतु नाना बरोबर खर्चास दिल्हें पाहिजे. याची तजवीज व कापडाची तजविजी च्यार दिवस लागले तेव्हां लाख रुपयाची सरजामी सोनें रुपें व नख्त येसी करून दिली. जवाहिर व हती घोडा हें नानानी आपल्याकडूनच घेतलें आहे. नाना म्हनाले जे आम्हांस परावे स्तलास जावें लागतें तेथं श्रीमंतास घरास आनावें लगेल. तेव्हां सेनासाहेब बोलले जे रीत पूर्वपासून आसी आहे जे येथून जातांच श्रीमंताच्या भेटी व्हाव्या. जाते दिवशीं मेजमानी ते पाठवितच असतात; त्यावर जेवना बलावतील, वस्त्रें पात्रें देतील; आपन जे दिवसीं बिदा व्हावें ते दिवसीं त्यांचीं वस्त्रें बहुमान घेऊन यावें. दुसरे दिवसीं त्यानी वरास आनावें. त्या समागमें सें दोनसें लोक येतील त्यांस वस्त्रें द्यावीं. श्रीमंतास बहुमान जो दे(णे) तो द्यावा असी रीत आहे. किंबहुना परामृशास कधीं घरास आले तर दाहा पांच लोकांनसी येतील त्यांस वस्त्रें द्यावीं असी रीत आहे असें नानासी बोलले. मी जवलीच होतों.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दुसरें सेनासाहिबानीं येकांतीं सेवकास बोलाऊन बोलले जे नाना तेथें जातात आमची तों खर्चाची वोढ या प्रकारची आहे इकडून तिकडून तेथोर पोंहचायाची बेगमी करून दिली आहे पुढें तेथें गेल्यावर खर्चीवेंचास यांचा परामृश श्रीमंतानी केला पाहिजे. त्यास उत्तर केलें जे गुदस्तचे लाख रुपये व साल-मजकूरचे लाख रुपये तुम्ही सरकारचे देणे. बजिनस पत्रच श्रीमंताचें तुम्हांस आलें आहे त्याची तजविज काये करितां ? दुसरें कितीक दिवसानीं येदां तुम्हांस श्रीमंतानी बोलाविले आहे. त्यास तुम्हांकडे सरंजाम धुर मकसुदाबादेपासून लाखन-वाड्यापरियेंत तुमचा मुलूक साठ सत्तर लाखाचा सरंजाम हमेश तुम्हीं खात असावा, राज्याची कलवल प्रतिवर्षीं हिंदुस्थान करनाटकची जे येईल ते श्रीमंतानी सोसीत असावी, तुम्हांस अनकूल पडेल तर मोंगलांसी मिळून श्रीमंतासी फिरून गोष्ट सांगावी, हिंदुस्थान कर्नाटकांत सिलसिले कागदीं पत्रीं करावे, मधेंच सरंजाम खात असावा आसें आसून येक गुदस्तांची कलवल तुमच्या मुलकावर पडली तोहि निमे मुलूख वांचला कटक सुधां असें असतां श्रीमंतानी बोलाविलें ते नानास पाठविता, त्यांत खर्चाची आधीं तजवीज पुसतां, येविसीं काये तुम्हांसी उत्तर करावें. तेथें जावें. श्रीमंत आहेत; दादा आहेत; केवल उपासी मरूं देनार नाहींत. सेनासाहेब बोलले जे दोन लक्ष येवजासाठीं लिहिलें आहे त्याचे दोन आर्थ येकतां. आम्हांवर दहशत टाकलिया दो लाखांकरितां चलबिचल होतात किंवा कायेम राहतात हें मन पाहयासाठीं लिहिलें आहे. दुसरे आर्थ गुदस्तांचे गंगथडी बाबतचे रुपये ते लुटिला. बहुत मुलूक ताराज जाला. भेटीचे वेलेस तें बोलन्यांत आलें आहे. माफ जाले आहेत. येक रोखा मात्र वेंकाजी रघुनाथाजवल राहिला त्यामुळें येवजाचें काम राजश्री नाना फडनविसाकडे आहे त्यानीं लिहिलें आहे. तर हें श्रीमंतास व दादासी बोलून घेतलें आहे; माफ जाले आहेत. येंदाचें लाख रुपये दसऱ्यास आम्ही तुमचे द्यावे त्यास रवानगीची गडबड पुढें येऊन पडली; यांची भरती करतांच पुरे पुरे जालें. वायेदा जालियावर तेहि तजवीज करूं. चिंता काय ? खर्चाविसीं आम्हीं म्हटलें तर सरंजाम तुम्हीं काढला ; त्यास त्याचा प्रकार दिवाकरपंतावर सारी मुना त्यानी हा विचार करावा तो कांहीं न केला. आतां पाहातच आहां. कोन कोनावर काये काये माहजवे निघतात. या प्रकारचा सरंजामाचा येवज जिकडील तिकडे गेला; दौलतीवर वोढ जाली; कर्जबंदी जालों; नाहींतर खरेच आहे जे राज्याचे सरंजामी आम्ही राज्याचे कलवलीस आपले सरंजामानसीं सामील असावें. दुसरें श्रीमंतानीहि कृपेस अंतर केलें नाहीं. आतां तरी खर्चावेचाविसीं आम्ही जें म्हणतों ते आपले ठाईं गाफीलपन बंदोबस्तीविसीं

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जालें. केवळ धर्म(न) जरूर जाणून म्हणतो. दुसरें सांप्रत हे जाणतो जे उभये पक्षींहि आतां कांहीं किलाफ राहिला नाहीं सर्वाविसीं त्यांनीं सांभाल आमचा करावा. आम्हीं त्यासी आनेथा किमपि करू न ते खाविंद होयेत. आम्ही त्याचे हेसतेकडून वारंवार म्हणतों व दादांचे मधेस्तीनें आमची खातरजमा पुर्ती आहे. सावाजी नानांस उपासी राहूं देनार नाहींत असी माझी निशा आहे. बहुत बोलले. सुचल्या-प्राणें उत्तरेंहि करित गेलों. त्यास भाद्रपद वद्ये प्रथम येकादसी इंदुवासरीं नानास येथून बिदा केलें. नानानी येथून कूच करून हिंगन्यास आठ कोस गेले. दरमजल येनार. हे तों म्हणतात जे दारव्यास जानार नाहींत; परंतु दिसतें जे दारव्यास जाऊन दसरा करून तेथून दरमजल चालतील असें दिसतें. कबिले समागमेच आहेत. दारव्यांत त्यास ठेऊन पुढें येतील. आपल्या तीन जासुदजोड्या व आंताजी फडनाईक यैसे नानाचे समागमे दिले आहेत घांट चढल्यावर येक जोडी रवाना व गंगेपासून येक जेजोरीपासून येक येश्या जोड्या रवाना करील. दिवाकरपंताचा मजकूर कांहीं नग जडावाचे व सोने रुपें राहिलें होतें तेंहि घेऊन गेले नवरात्रांत उछाहासाठीं पांच हजार रुपये ठेवले होते तेहि नेले. उछाहास त्यांचे घरीं कोण जातो म्हणाले. तमाम ब्राम्हण ज्यांस गांव स्वास्तीवृत्ती ज्यांस आहेत व आपले चाकर जितके आहेत तितके कोनी देवाजीपंताचे येथें न जावे; गोसावी कोनी न जावे असी परिछिन्न ताकीद केली आहे. कोनी त्यांच्या घरास जात नाहीं. सुलाची व्येथा त्यास जाली आहे. त्यास औशद देयास कोनी वैद्य देखील जात नाहीं, असा बंदोबस्त केला आहे. कोनी त्याच्या घरास जात नाहीं असा प्रकार जाला आहे. राघोबा बक्षी त्यास ज्वर जाला होता. कितीक वोशधी उपाये केले; परंतु साध्य न जाले. वैद्यांनी सांगितले जे रोगाचा ज्वर नव्हे, प्रयोग आहे. आठरावे दिवसीं भाद्रपद वदे नवमी शेनवारीं दो प्रहरां दिवसा आधी रावा त्याचे घरीं होता; राघो तो ते समईं उगाच मेला. तेच क्षणी राघोबा बक्षीचाहि प्राण गेला. त्याचे स्त्रीनें सयागमन केलें. त्यास बक्षीचा दोन दिवस कोठा जलाला नाहीं. लांकड तूप टाकून जाला. तिसरे दिवसीं राख सांवडली त्यांतून वडे व घारगे दाहा वीस ध्याता जे निवाले हें आश्चर्य जालें. त्यावरून सर्वांस वाटलें जे हे जादू होये. नानाचे रवानगीस सारेच बाहेर आले होते. सौभाग्यवती दर्याबाईहि आली होती. त्यास याचे येथें नागा गोसावी आहे तोहि फिरत फिरत आला तेव्हां सें दोनसें माणूस बसले आहे. सेनासाहेबासीं बोलला जे मी राहत नाहीं, हिंदुस्थानास जातों. यानी पुसलें जे कां आपन उदास जाले? त्यास तो बोलला जे तुमचे येथें इनसाफ नाहीं. ज्याच्या चित्तास जसें येतें तसें लोक करितात. येथें जादू फार

2077

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जाली राघोबाला परिछिन देवाजीपंतानें जादू करून मारला व माहादेव भट पटवर्धन तोहि जादू करूनच मारला पुढें आनिक काये होतें कीं न कले. मी जातों असें म्हणून गोसावी चालला. येक बानाची खांस गेला सेनासाहिब व नाना मागें धांवत जाऊन घेऊन आले त्रिवर्ग दोन घटका येकांतीं बसून काये बोलले हें न कले. तदोत्तर नानास बिदा करून येऊन त्रितीये प्रहरीं देवाजीपंताचे घरीं चौकी बसविली. शोध करतां जनार्दन वैद्ये देवाजीपंतासमागमे जे आले होते त्यांचे घरीं चौं दिवसा खालें होमहवन जालें. ते म्हणतात जे आम्ही आपलें शरीर आरोग्यास्तव जेपज्याथें केला होता तसें ते म्हणतात, याच्या चित्तांत हा भास. माहादेव भटाच्या गुमास्त्यान त्यांजवर प्रयोग जादू करविली ते खरीच जाली. ते करनार करविनार दोघेहि पौनींत धरले आहेत, हेहि खबर कालच आली. दुसरे विपरित राळेगांवांत गाये व्याली, तिने वासरूं भक्षिलें; हें येक सांगतात, खरें म्हणतात, व आज वर्तमान नाना करञ्यान दरबारांत सांगितलें जे पछेम दिसेकडून येका मडक्यांत कालें मांजर घातलें आहे, त्यास बारिक छिद्रें मडक्यास पाडलीं आहेत; मडक्याचें तोंड बांधले आहे. त्या मडक्यावर येक वळ लिहिली आहे जे: हे मारज्यार ज्या गांवीं येईल तेथें यास दूद पाजून हजराहजरी पुढें पोहचावें जे इतकें लिहिलें आहे. कोनी त्यासमागमें नाहीं. हजाराहजीर येते आहे. सेनासाहेब बोलले जे त्यास वरधा उतरूं देऊं नका. तिकडे नर्मदेकडे जाऊं द्या आसें बोलले. याप्रमाणें येथें जादूचा व विपरीताचा प्रकार आसा जाला आहे. राजेश्री रामाजी बलाल अद्याप येथें आले नाहींत; दोचौं रोजानी येणार असें वर्तमान आहे. कोठे आले आहेत हेंहि कांहीं कलले नाहीं; परंतु यैकतों जे समागमें बाबूराव कानेरेहि आहेत यैसें यैकिन्यांत आलें आहे. सेनासाहेब बोलले जे रामाजी बलाल जे येता(त) ते दादानी दिवाकरपंताच्या मधेस्तीस पाठविले आहेत. यैकतों जे दादाचे व दिवाकरपंताचे पगडी बदल जाली आहे यास्तव रामाजीपंतास दादानी पाठविलें आहे. परंतु हे गोष्ट आसाध्ये. त्यानी तरी हा आक्षेप कशास करावा ? यांचीं उत्तरें सुचल्याप्रमाणें परिहार केला; परंतु त्याच्या चित्तांत हेच आहे. दिवाकरपंतावर आक्षेप दुरारोपाचा फार दिसतो हें निक्षून विपर्यास होईलसें दिसतें. चेंद्रपुरी मुधोजी भोंसल्यानी येका साहुकारावर परद्वाराचा आरोप आनून त्यास कैद करून घरदार लुटलें; लाख पनास हजाराची मालियेत लुटली; त्या साहुकार ब्राम्हण त्यानें विश खाऊन प्राण दिल्हा; तरी आद्याप त्याच्या मुलामानसांवर चौकी आहे. येथें देवाजी नाईक काले त्यानी सेनासाहेबास सांगितलें. यानी येथून मुधोजी भोंसल्यास रागें भरून पत्रें लिहिलीं आहेत; पाहावें कसें होतें की, याप्रमाणें येथील वर्तमान. साबाजी नानास बिदा करताना फार प्रकारें

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सांगितलें जे श्रीमंताची मर्जीप्रमाणें वर्तणूक करा; दादासिवाय आनिख कोनाच्या घरास जाऊं नका; जें बोलनें तें दादासींच बोला; जे मागणें ते दादासींच मागा; ते श्रीमंतास विनंती करितील; तुम्ही तेथें श्रीमंताची मर्जी रक्षून चाकरी करून येंदा यापुढें मजलाही विश्रांत हेच आहे जे तुम्ही आपले आटोपल्यावर माझा आग्रह कांहीं नांहीं; परंतु मुख्य गोष्ट श्रीमंताची व दादाची मर्जी रक्षून आसा. आपले लोक अनिवार फार, तेथील मर्जी नाजूक कसें कराल हे चिंत्ता वाटती. नाना बोलले जे मजवळून अंतर पडणार नाहीं; लोकहि अनिवार कशास करतील ऐसें होणारच नाही. त्यावरहि उभयतापक्षीं मी लेकरूच आहे; क्षेमा करणार ते समर्थ आहेत; तुम्ही चिंता करूं नका. सेनासाहेबांच्या डोळां पाणी आलें. मजलाहि सेनासाहेबानी सांगितलें जे, दादास लिहा, नाना मूल आहे; आपण सर्वाविसीं आम्हास मुरबी वसिले आहा, यास संभाळून घेणे. खर्चाविशींहि त्याहा म्हणून फार सांगितले. बिदा त्यास करतो. समई काय उत्तर देऊं? लिहितों म्हणून उत्तर केलें. जरद्या घोड्याविसी उभयतांस कजिया लागला आहे. नाना म्हणतात जे मी जाऊन फार तजविजीनें घोडा घेईन. सेनासाहेब म्हणाले जे देतील तर मजलाच देतील. नाहींतर तुम्हांस देणार नाहींत. तुम्हांस दिला तर श्रीमंताचा आमचा व दादाचा आमचा रुसवा आहे असे दोघांचे जाबसाल जाले. राजश्री भवानी काळो चांगला शाहाणा माणूस सरकारची मर्जी संपादून घेया योग्य आहे. भवानी पंत सेनासाहेबासीं बोलले जे: तुमचें अहित करणार नाहीं; श्रीमंताची मर्जी तोडनार नाहीं. हे बोलेले जे तुम्ही जे बोलला तें मी बोललो. याप्रमाणे उभयतांचीं बोलणीं जालीं. नाना समागमें वानी काळो येतात. येथें कारभाऱ्यापैकीं भवानीपंत मुनसी, नाना करडे, वि नाथपंत बगोजीपंत हे दोघे गोडे स्वतः आपला आपन कारभार करितात; दुसऱ्याचें येकने फारसे नाहीं; मोडून गोष्ट सांगणारहि नाहीं. सेनासाहेब दोन तीनदा बोलले जे श्रीमंतानी आमच्या शाखापलवाची चौकसी न करावी. मी येक त्यासी सर्वा गोष्टीनें हजर असल्यास यासी काये दरकार आहे? रामाजी बलाल देवाजीपंताच्या मध्येस्तीस येतात म्हणून बोलले. उत्तर केले जे: विहित मार्गें चालल्यास ते कशास चौकसी करितील? आविहित करूं तर सिक्ष्या करावी, बोलले. मागाहून वर्तमान सविस्तर लिहून पाठवीन जासूद जोड्या पाठवाव्या. खर्चाचा मजकूर त्याहावा तर आपन रागें भरतात. माझी अवस्था कर्ज फार जाले, देनार कोनी नाहीं, दोनसें रुपयेहि पावले नाहींत. वामोरीचेविसीं विनंती स्मरनार्थ हे विज्ञाप्ति.

¶*The following items are mentioned in this long letter:—*

1. *Sabaji's departure for Poona to help the Peshwa;*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

2. Raghoba's letters to the Nizam asking him to join with Haidar and attack Poona before the Peshwa and Bhonsle combine their forces for an attack on him, strangely enough reach the hands of the Peshwa himself. Raghoba thereupon tries to expatiate this sin by apparently renouncing everything and going on a pilgrimage;

3. Janoji's assurances of help and support to the Peshwa;

4. Janoji repenting for the attitude towards the Peshwa which he says is solely to be attributed to the machinations of Devajipant;

5. Sujaudaula asking Janoji to help him;

6. The sharp reprimand given by the writer to Janoji for his constant monetary grievances and requesting the Peshwa always to render him monetary help in spite of the fact that he enjoyed his saranjam, and other rights without paying any dues to the Peshwa;

7. The strange dishes which were discovered in the ashes after the body of the Baxi was cremated—which incident the people in general attributed to the witchcraft practised by Devajipant;

8. There are some other strange incidents attributed to his witchcraft, e.g., a cow devouring her own calf and a cat being put into a jar and transferred from village to village;

9. Some of Mudhoji's atrocious deeds for exacting money from Savkars;

10. The word of advice given by Janoji to Sabaji at the time of his departure;

11. Bhavani Kalo accompanying Sabaji.

No. 199] *[23-10-1768*

पौा छ १४ जमादिलाखर

श्री

विनंती सेवक हरि दामोदर कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. आज्ञापत्र छ १० जाखरचे सादर जाहाले ते छ ११ मिनहूस अस्तमानी मुा धानोरे पाा धारूर येथे पावले. येथील वर्तमान तरी धारूरच्या आसपास साहा-सात कोसी आहों. आज्ञेप्रा सावधता करणे ते करीतच आहों. खावंदाचे पुर्णेकरून सर्व उतमच होईल. छ मारी मौजे वडगाव धासरा आलीकडे चौकोसावर आहे तेथे बातमीस गेले होते. खंडागलियाची फौज अडीच तीन (हजार) आहे. किल्याच्या उतर भागी राहिली आहे. त्याजकडील बातमी मौजे मजकुरी येत असत्ये. राजश्री जानोजी भोसले व मुधोजी भोसले हे परलीच्या धाटे येणार त्याची बातमी राखोन लिहावयासी आज्ञा.

2080

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आज्ञेप्रा अन्व्यास माहादाजी दामोदर याजकडे माणसे पाठविली आहेत. वर्तमान आलियावर सेवेसी लिहून पाठऊ. ते घाटाखालेच आहेत. अद्याप घाट चढले नाहीत. खंडागले परांडियासी जाणार म्हणून वर्तमान आले. याजकरितां तीन कोस पुढे गेलो होतो. मुकामीच आहे येसी बातमी आलियावर माघारे आलो. मोगल येक दोन मजली आलियावर हे चलबल करितील. हे विज्ञापना.

¶*Letter from Hari Damodar to the effect that Janoji and Mudhoji who are reported to be pushing through the Parali pass have not yet crossed it. Khandagale's force, three thousand strong, is hovering about Dharur.*

No. 200] *[15-11-1768*

श्री

श्रीमंत माहाराज राजश्री
साहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक आपाजी रघुनाथ कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील क्षम ताा छ ४ माहे रजब मुाा आलजपूर स्वामीचे प्रतापेकडून सेवकाचे वर्तमान यथास्तित आसे. विशष:—श्रीमंत राजश्री रावसाहेब याणी सेवकास येथें आलजपुरास सरकारची पत्रे देऊन पाठविले आसें. पत्रे यासी प्रविष्ट करून उतरेहि श्रीमंत रावसाहेबाकडे पाठविली. याचा हेत की, श्रीमंताचे कृपेची वृधी आसावी हा हेत आहे. बातमीचा मजकूर राा जानोजी भोसले याचे वकील येथे आले होते की, ईस्मालखानास भेटीस न्यावे; येशास खाशे भेटीस गेले नाहीत. राा तिमाजीपंत दिवाण गेले होते. त्याचा याचाहि सख्याचा प्रकार आहे. सख्य आहे म्हणोन हे येथे ठरले आहेत. नाहीतर याचे पाये भोईस न लागते. याजपासी जमाव हजार स्वार, त्यांत उतम मध्यम तीनच्यारसे कनिष्ट प्रतीचे साहशे पायेदल, जेजालवारदार वगैरे हजार दीड हजार येणेप्राो जमाव आहे. राा जानोजी भोसले नागपुरासमीप आहेत. तेथून कूच होऊन पुढे येणार. हे वर्तमान येथे आहे. राा तुलजोपंत नरनाल्यासमीप पाच हजार फौजेनसी आहेत. खासा तुलजोपत फौजत नाहीत. शरिरास सावकाश नाही. त्याचा भाचा आहे. येणेप्रमाणे वर्तमान असें. इस्मालखानाकडे पत्रे खंदारचे राज्याची आली. त्यांत वर्तमान की, नवाब निज्यामआली बेदराकडे येणार व पिराजी नाईक निबालकर वसमेतचे ठाणे सर करून तेथे फौज हजार दीड हजार ठेऊन खासा आजण-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

डोहाकडे गेले. येणेप्रा वर्तमान येथे आले असे. सेवेसी विदित व्हावे. बहुत काये लिहिणे? जाहाले वर्तमान सेवेसी लिा. पुढे होईल ते लिहिले जाईल. कृपावृध्दी आसावी हे विज्ञाप्ति.

¶*Apaji Raghunath writes to the Peshwa the news about the movements of Janoji Bhonsle and some of his Sardars. He also says that Nizamali is proceeding to Bedar.*

No. 201] [*1-12-1768*

श्री

श्रीमंत राजश्री दादासाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गोपाल संभाजी सां नमस्कार विज्ञापना. येथील क्षेम ताा छ २७ रजब मुकाम गंगाई वडनेर येथे सेवकाचें वर्तमान सैन्यसह येथास्थित असे विशेष. छ २६ रजबचें पत्र पाठविले ते छ मजकूरी प्रहर दिवसात पावले. पत्री आज्ञा कीं भोसले फौज सुधा सडे जालें. पंचवीस कोस आंतर आहे. त्यास तुम्हाजवल लोक चागले आहेत. माहालचा वसूल लागला असेल. त्यास कार्याकारण से पनास राऊत ठेऊन सारी फौज व महालच्या बोला चांगल्या असतील त्या घेऊन उदैक शुक्रवार संध्याकालपर्यंत लस्करास येऊन दाखल होणे. विलंब न लावणे. यैसियास काल मागाहून कूच करून चौदा कोस मजल आलो. येथून लस्कर पांच कोस राहिले आहे. आज पां आकोट येथील चुकोती करून वसूलाची बंदोबस्ती करून, बोलीस जमीदार घेऊन सेवेसी येऊन पोहचतो. माहाराजाचा प्रताप थोर आहे. सर्व गोष्टी येथास्थित होतील. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Gopal Sambhaji to Dadasaheb informing him that he is trying to reach him soon in accordance with his instructions.*

No. 202] [*7-12-1768*

श्री

सेवेसी विनंती. सेवक गोविंद मल्हार कृतानेक सां नमस्कार विज्ञापना ऐसीजे. येथील कुशल ताा छ २६ रजब मुकाम तिवस वरधे अलिकडेस तीन कोसाहून कूच जाले येथ स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्तित असे विशेष. येथील वर्तमान तरी रोा जानोजी भोसले सेनासाहेबसुभा याची

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

फौज मुकाम मजकुरी सात आठ हजारपावेतो जमा जाली. दुसरे छ २५ रोज मंगलवारी रो पिराजी ना निंबालकर वरधा तीरास आले. इकडून सेनासाहेबसुभा तयार होऊन तीन कोसपावेतो त्यास सामोरे गेले. तेहि तिकडून आले. याजकडील व तिकडील सरदार याची भेटी जाल्या. उपरात हे त्रिवर्ग बंधू याची व त्याची भेट जाली. ते हे मिलोन डेऱ्यास आले तो आस्तमान जाला. उपरात खलबत जाले. मग सेनासाहेबसुभा याचे घरी नाईक मजकुर यार्णी भोजन केले. दीढ प्रहर रात्रपावेतो होते. उपरात आपले गोटास गेले. पिराजी नाईकासमागमे आटोले व गावडे व सुपेकर व खानाजी सिंदे (खोपे?) व गोविंदराव मुगटराव व मीरखां ऐस झाडून मिलोन च्यार पाच हजारपावेतो फौज आहे. उभयेता येकत्र जाले. नाईक व भोसले मिलोन बारा तेरा हजारपावेतो फौज जमा जाली. काल भेटी वरधे नदीचे मुकामी जाल्या. तेथून आज कूच करून मुकाम मजकुरास आले. येथूनहि पुढे नांदगावाचे सुमारे कूच जाले. येथ रात्रीचे ठाई लस्करा-सभोवते छेबिना फिरत राहतो. दुसरे येथ वर्तमान आहे की खासा स्वारी शंक्रातीचे परवाकरिता लस्कराजवल कोन्हे तीर्थ आहे तेथ स्णा(ना)स जाणार; त्यास ते समई काही घालमेल करावी. त्यास तीर्थास गेलिया बहुत बंदोबस्त करवावा. दुसरे येथील दोनच्यार सरदारीयाचे व सेनासाहेबाची शपतक्रिया जाली की आम्ही तुमचे जिवाचे सोबती ऐसी जाली. दुसर, काल माहातास इर्जाफा केला आणि हातीस सेर करावे ऐसी ताकीद केली आणि अंबारीस कमानी व तीराचे भाते लावल. ते समई भाशन की येकदा सफेजंगी करावी. काल गोसावी व पठाण ऐस आडून बसल की आमचे रुपयाचा निकाल करून देणे. त्यास गोसावियास भाशन केले की तूर्त दम धरण. जरकरिता रुपया न मिले तरी तुमचे घरी मोली टाकीन. मग ते गेले. पटाणाचा काही निकाल जाला नाही. तिवशाहून आज कूच होऊन नांद-गावास मुकाम आहे. नांदगाव येथून दाहा कोश आहे. दुसरे रो निलो गोपाल यासहि लवकरच सेवेसी रवाना करणार आहेत. तेहि सेवेसी येतील. दुसरे येथून आम्ही बरीक मोठ वर्तमान लिहितो, त्यास ते वर्तमान याचे वकिलास बजिनस पत्र त्याचे द्रिस्टीस पडते किंवा कोन्ही त्यास मतलब झाडून सांगतात हे न कले. ते आम्ही जितक लिहितो तेच वर्तमान यास

---

१ बक्षीस.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

लिहितात. तेव्हा आम्ही काये करावे ? आमची येथस्तीत कैसी राहील ? येथ हे आम्हास बरे पाहत नाही, तर याचा तेथ बंदोबस्त करावा की त्याचे वकिलास हे वर्तमान न कले ते करावे. दुसरे आम्ही येथून विनंतीपत्रे सेवेसी वरचेवर जाल वर्तमान लेहून पाठवितो, त्यास त्या पत्राचे उतर येत नाही. मधच कागद सबनिसाकडेस जातो, आनी तेच आपले नावे जाब पाठवितात. त्यास हे काही कलत नाही. विनंतीपत्रे सेवेसी पोचतात की कैस होते ? जासुद सरकारचे असता दुसरियाचे हाती उतर येते, सरकारातून विनंतीपत्राचे उतर येत नाही, त्यास याची चौकसी जाली पाहिजे. बातमीचे काम, सरकारचा जाब जासुदापासी असला म्हणजे वाटेस जासुदास भये नसता मधेच कोन्हाच पत्र निघाले तरी कठीन. जासुदास व आम्हास वाटते की तुम्ही कोन्हीकडेस कोन्हास लिहिता, यास्तव या माहाराजानी कृपा करून विनंतीपत्रे पोहचलियाचे उतर पाठवायाची आज्ञा केली पाहिजे. जासुदास रोजमरा मिला(ला) नाही. त्यास, त्याची व माझी व खर्चाची आबाल जाली आहे. त्यास कृपा करून खर्चाची बेगमी करून पाठविणार माहाराज स्वाम समर्थ आहेत. सेवेसी श्रुत्य होये हे विज्ञाप्ति.

¶*Govind Malhar informs the Peshwa of an interview near the Vardha between Janoji Bhonsle and Piraji Nimbalker as a result of which Nimbalker joined Janoji with his forces. The writer further gives the approximate strength of the combined forces. He also complains of the difficulty in carrying on safe communications with the Peshwa.*

No. 203] [*7-12-1768*

पौा छ ४ सवाल माघ
मास सन तिसा

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक धोंडो माहादेव साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २६ रजबपावेतो स्वामीचे कृपावलोकनेकडून वर्तमान येथास्थित असे. यानंतर किले देवगिरी येथील तालुकियातून फौजाचा मार्ग पडला आहे. फौजा या मार्गीने जातात. त्याची कैद नाही. सेते कापून चारावी, कुणबीयाचे आऊताच्या पासा वगैरे न्यावे, घासदाणे घ्यावे, याप्रमाणे करितात. मानाजी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सिदे वगैरे अडीच तीन हजार फौज खानदेशांत गेली. सेते, शाळू वगैरे कापून, घोडियासी चारिलीं. उंसाची थले मोडून खराबी केली. दर गावास दोनसे च्यारसे रुपये सेतें व ऊस व घासदाणा मिलोन लुकसान करीत गेले. सरासरी पांचा हजाराचे लुकसान करून गावाची खराबी केली. याप्रमाणे धूम होऊ लागली तेव्हा लावणी कैसी राहाते? पैका कैसा येतो? येक तर सवंगाईमुळेच कुणव्याची दिलभारी करून सोड देऊन वसूल करावा लागतो. तेथे ऐसे उपद्रव लागे. लागले. तेव्हा लावणीचे सकट. किरकोल उपद्रव लागतात त्याचा बोभाट कोठवर ल्याहावा? परतु मानाजी सिंदे वगैरे याजकडील फौजेने लुकसनी खराबी बहुत केली. यास्तव सेवेसी लिहिलें आहे. आज्ञा होईल त्याप्रमाणे वर्तणूक करू. शवेसी शृत होये हे विज्ञापना.

¶*Dhondo Mahadeo to Nana Fadnis complaining about the want of discipline in the army.*

No. 204] [*10-12-1768*

श्री

सेवेसी विनंती. सेवक गोविंद मल्हार कृतानेक सां नमस्कार विज्ञापना ऐसीजे. येथील कुशल ताा छ २९ रोज मंदवार मुाा नजीक नांदगाव येथ स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशेष. येथील वर्तमान तरी सेनासाहेबसुभा व पिराजी नाा याचा मुकाम मजकुरी आज आहे. फौज तेरा चवदा हजारपावेतो जमा जाली.' रोा तुळजोपंत याचे निाची फौजहि काल येथ आली. नागपुरास तोफा राहिल्या होत्या त्या घाटीखाली आल्या आहेत * * ऊन पोहचवील. दुसरें येथून * शंकराजी घोरपडे दीढा (हाजारानसी) पुढे रवाना जाले आहेत. त्यास त्याची (बा)तमी असो द्यावी. दुसरे यानी येथ कितेक लोकासे चिलखते वाटली आनी दिलबरी केली; आणि तमाम सरदार यास ताकीद की फार सावद असावे. आपलाली तयारी असो द्यावी, ऐसी ताकीद करून तह ठहराविला की आज कर आहे. उदईक रविवारी मोकाबला घ्या व मग जे होणे ते होईल. त्यास ऐसा करार जाला आहे. रविवारी कूच करून सडी फौजनसी येणार त्यासी तेथ फौजेस ताकीद असो द्या की खबरदार असावे. खासा जातीनसी रात्रीस जागतात आणि स्वार सभोंवते तयार असतात. अंतर उभयेपक्षी फार जवल राहत चालल्यासस्तव सावधता असलिया कामाची आहे. येथून निलोपंत आले आहेत त्यास ते

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

येथील काही भावगर्भ सांगतील तो ध्यानास येईल; परंतु याचे बोलन्याचा इतबार केवल धरून असाश्वता नसावे. फार सावध असलियास कामास येईल. येथ यासी मर्जी आहे की रविवारी जाऊन मोकाबला घ्यावा. दुसरे येथून कोन्ही मैराल केशव कारकून तेथ आला आहे तो रा मैराल काकाजीचे राहुटीस तेथ राहिला आहे. तो काही फोडाफोडी फौजेत करावी या लागात आहे. * * * चा शोध तेथ बारीक रीतीन * * सर येथून आम्ही कितेक वर्तमान * * मोठ लिहितो त्यास तेच वर्तमान यास कलते. त्यास यासी बंदोबस्त जाला पाहिजे. हे मजवर फार कुडत आहेत. आस्टऊ प्रहर आमचे बातमीवर आहेत. आन कितेक प्रकारे आम्हास दबावितात. व्यंकटराव मोरेस्वर यासी त्यासी क्रियाशपत जाली आहे की आम्ही आपले मरजीचे वर्तमान लेहू; परंतु हेच येथून बरीकमोठ लिहितात ऐसी आमची नालेश करितात; आनी आमची बातमी देऊन आमचे आले वर्तमान त्यास सांगतात. जासुद वाटेन निभावत नाही. चोर राऊत लुटितात. आमची येक दोन जोडी माघारी आली; त्यास स्वारास ताकीद जालिया वाट चालल हे विज्ञापना.

¶*Letter from Govind Malhar intimates that the Bhonsle is mustering his forces and warns his master to be on his guard against a surprise attack.*

No. 205] [*12-12-1768*

पो छ ७ साबान सन
तिसा. बा करीम सां-
डणी स्वार

श्री

सेवेसी हरी बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ साबान मुा मौजे दहिगाव पाा काटी वर्तमान यथास्थित असे विशेष. आज कूच जाले. सोलापुराआलाकडे पाच कोसावर राहातील. तेथे येकदोन मुकाम सोलापुरचा किला पाहून मग सुरापुर अगर तुळजापुरचा रोख भोसले लौकर येणार; कलावे. अधिकोतर आढलेल ते लिहून पाठवीन हे विज्ञापना.

¶*Hari Ballal gives the movements of Janoji Bhonsle.*

2086

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 206] [*14-12-1768*

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामींचे सेवेसी

पोष्य नारो बाबाजी सांा नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ ४ साबान जाणून स्वकीये लेखन आज्ञा करीत असिलें पाहिजे. यानंतर आम्ही बालापूरचे मुकामीहून श्रीमंताची आज्ञा घेऊन आलों. त्यास चौदा दिवस जाले. किले दौलताबाद येथे च्यार दिवस आलो आहो. लस्करचें वर्तमान तर राजश्री जानोजी भोसले वर्धा नदीवर सात हजार फौजेनसी होते. पिराजी नाईक पडदूर प्रांतीहून भोसल्याकडे गेले म्हणोन लस्करातच वर्तमान होतें. भोसल्याची दाहा पंधरा हजारपावेतो फौज जमा व्हावीसी आहे. सरकारचीहि तीस हजार पावेतो फौज, सिवाये गारदी व तोफा आहेत. भोसल्याकडील व पिराजी नायेकाकडील वकील हूजूर सलुखा करीत आले होते. आलीकडील वर्तमान श्रीमंत पयोष्णी तीरे दहीहाड्याहून कूच करून पुढें गेले. सरकारचे फौजेचे व भोसल्याचे चालसा कोशाचे अंतर होते म्हणुन लस्करातून वर्तमान आलें. आजपावेतो सलूख अगर युध्य जाले आसावें. मोगलाचें वर्तमान तर निंबालकर अद्याप कोण्ही गेले नाहीत व खासा मोगल नादेडावर पाच हजार फौजेनसी आला म्हणोन वर्तमान आहे. आपणाकडे साखरीकर भोसले वगैरे दोनसे स्वार पुणियास हुजुरुन रवाना केले. ते व आम्ही समागमेच आलों. * बहुत काये लिहिणे? लोभ असो दिजे हे विनंती.

¶*Naro Babajee to Nana Fadanis giving the strength of the combined forces of the Bhonsle and Nimbalkar. The Peshwa, the writer says, is proceeding by the river Payoshni and the Nizam is at Nanded.*

[*14-12-1768*

No. 207]

पो छ १० साबान

तिसा मार्गसीर्ष

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ताा छ ४ साबान मुाा काो मारडी वर्तमान येथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तर काल श्रीमंत सोलापूरचा किला पाहावयास गेले होते. आज चहू कोसाचे कूच आहे. तुल-

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

जापूरचा सुमार आहे. नवल विशेष लिहिजेसे नाहीं. हिसेब 'देणे' करून घ्यावयास आणिले आहेत त्याजवर 'देणे' जाले म्हणजे पाठवितों. आपली शरीरप्रकृत कसी आहे ते लिहिले पाहिजे. येथे लोक बोलतात की आपणास समाधान नाहीं; त्याजवरून काळजी लागली आहे. लिहून पाठवावे. राजश्री बळवंतराऊ वैद्य लस्करांत आले आहेत. श्रीमंत राजश्री दादांस[1] औषध देतात; चार रोज जालें. कळावें, सेवेसी श्रुत होये, हे विज्ञापना.

¶*Hari Ballal Phadke informs Nana Fadanis that the Peshwa is proceeding towards Tuljapur.*

No. 208] [*29-12-1768*

पो छ २७ साबान
तिसा रात्र प्रहर बा
जासूद जथे मुकुंदजी
नाईक

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १९ साबान मुा नजीक पोहनेर गंगातीर वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान, आज कूच जाहालें. बारा कोसांचा मुकाम नेमिला आहे. रूकनुतदौले समागमेच आहेत. श्रीमंत राजश्री नारायणरावसाहेब यांस आज येथून गंगापुरास जावयाचा निरोप जाहाला. श्रीमंत सौ रमाबाई यांची रवानगी पुण्यास जाली. सौ बाईची रवानगी करण्याची कारणे दोन: येक, भोसल्याचे मुलकांत दरमजल जातो, जुजभांडण. दुसरा खराखुरा प्रकार, शरीर अशक्त, प्रकृत ठीक नाही. याजकरितां श्रीमंत राव व सौ बाई दोनच्यार मजली समागमे जातील. मग बाई पुण्यास येतील, राव गंगापुरास जातील. रायाचें समागमे राऊत नेहेमी दीडशे दिल्हे आहेत. सुलतानजी धायभर व भगवंतराव रामाजी वदूकर व सिवाजी बलाल यांची पागा व मल्हारराव सोमवंसी याप्रो आहेत. येथून च्यार मजली पोहचवावयासाठी शाहाजी भापकर दिल्हे आहेत. कळले पाहिजे. श्रीमंत रावसाहेबासमागमे आपलेकडील कारकून राघोपंत गडबोले दिल्हे आहेत. वरकड

---

१ मोरोबादादा फडणीस.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

इकडील नवल विशेष लिहिजेसें नाहीं. राजश्री गोपालराव येकदोन रोजांत येऊन भेटतील. कर्नाटकांत रास्ते वगैरे पाच हजार फौज पाठविणार. गेले म्हणजे लिहून पाठवीन. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Hari Ballal writes from the Peshwa's camp near Pohner that Madhavrao, accompanied by Ruknutdaula, is proceeding towards Berar against the Bhonsles and further adds that Narayanrao and Ramabai have, that day, left the camp respectively for Gangapur and Poona.*

No. 209] [*1769*

[पत्र विठ्ठल शामरावाचे. पहिले तीन बंद गहाळ आहेत. चौथा बंद.]

आलीकडे इकडे पाऊस नाही. श्री जोगश्वरीं प्रज्यन्यासाठीं से दोनसे ब्राह्मण आणुष्टानास बसविले आहेत. माहगाई जाली आहे. गहूं रुपायाच्या च्यार पायेल्या, हरभर च्यार पायेल्या, तांदूळ आडीच पायेल्या, तूप आडीच सेर, तेल तीन सेर, गूळ आठ सेर, खुर्दा पंधरा सजगाण्या, याप्रमाणें माहगाई जाली आहे. खरिपाच्या पेरण्या पावसामुले जाल्या नाहीत. आतां पाऊस नाही, म्हणून पेरनी बंद जाली आहे. दिवाकरपंताचें वर्तमान पेशजी लिहिलेच आहे. तेच वर्तमान आहे. हिसेब पाहतात. याप्रमाणे वर्तमान आहे. माहगाईमुळे कर्ज पुष्कळ जाले. खर्च तो लागलाच आहे. या सन्यांत दरबारखर्च सवासे रुपये देहनगी जाली. दिल्ह्यावाचून वर्तमान कळत नाहीं. घरीं मुले मानसांस आज तीन वर्षें खर्चास कांही मिलाले नाहीं. फार श्रम आहेत. स्वाम कृपालू समर्थ. हे विज्ञाप्ति. हे पत्र घाईने रात्रीं लिहिले आहे. शामराव गोपाळ जो आला आहे, तो सेवकाचा वलख्या आहेसे वाटतें. भेट जालियावर कलेल. मागाहून सविस्तर वर्तमान लिहीतो. हे विज्ञाप्ति.

¶*Vithal Shamrao complains of the hard times. The first three sheets of the letter are missing.*

[*January 1769 ?*

No. 210]

श्रीशंकर

विनंती आज शहरचे पत्र सुध त्रयोदसीचे आले. त्यांत मजकूर की, बऱ्हाणपूरची पत्रे आली. तेथे करांडे तीन हजार फौजेनसी आले. त्यामुले दरवाजे बंद आहेत. आकोल्यांची पत्रे आलीं त्यांत नरहर बलाल पाच हजार फौजेनसी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नजीक आकोल्यावर आहेत. तेथे गडबड करितात. गावलगड त्याचे स्वाधीन आहे. रा जाणोजी भोसले निर्मळेकडे आले. नादेडावरून पुण्यास जाणार. इतकी खबर आली. विशेष नाही. विशेष आलियास लिहून पा. हे विनंती.

¶*This paper gives news of the arrival of Karande at Burhanpur, of Narhar Ballal at Akola and of Janoji Bhonsle at Nirmal.*

No. 211] [*January 1769*

[पहिला बंद गहाळ]

(२)

पुरवणी श्रीमंत रा रावसाहेब स्वामीस

विज्ञापना. नाहीतर आमची शोभा राखणे ईश्वरासदेखील संकट आहे. रावसाहेब, सारांश दरबार व सावकार राजी राखल्यास सर्व उतम आहे. वारंवार ल्याहावेसे काय आहे. इतके दिवस चालिले परंतु पुढे शुष्क चालणे परम कठीण आहे. संकट जाणून विनंतीपत्र लिहिले. सेवकावर रागे न भरावे. वरकड राजकी वर्तमान, फौजा तमाम रामचंद्र गणेश व गोपाळराव गोविंद वगैरे फौजा दरोबस्त श्रीमंत पंतप्रधानसुधा नागपुरास वराडांत गेल्या. पिराजी नाईक निंबालकर श्रीमंती धरिले. दिवाण मोगलाकडील रुकमतदौला व भोसल्याचे वकील देवाजीपंत श्रीमंताचे लस्करांत आहेत. भोसले याणी माघारे च्यार मजली काहडते घेतले. गोंडवणांत गेले आहेत. फौज भोसल्यापासी वीस पंचवीस हजार चांगली आहे. श्रीमंतापासी फौज पंनास हजार आहे. आद्याप लढाई जाली नाही. पुढे काये होईल पाहावे. आम्ही येथे श्रीमत रघुनाथ हरी व गोविंद नाईक पैठणकर याजपासी येथे पुण्यांस आहो. जोपर्यत याचा रुा फिटे, तोपर्यत आहो. विशेष काये ल्याहावे. पुण्यांत श्रीमंत नाना फडणीस कारभारास आहेत. दुसरे कोणी नाही. श्रीमंत रा नारायेणराव व मातुश्री गोपिकाबाई हे उभयेता गंगातिरी जलालपुरी आहेत. श्रीमंत सौ रमाबाई लस्करातून पुण्यास च्यार रोज जाले आली. श्रीमंत दादा साहेब येथेच वाडयात आहेत. सेवेसी श्रुत होय. बहूत काये लिहीणे? कृपा लोभ आसो द्यावा हे विज्ञापना. श्रीमंत नाना फडनीस याचा फर्मास[१] श्रावण मासी आपणास लेहून पाठविली. त्यास आपण येक वेळ लेखन केले की, तयार करोन पा. ते वारंवार हटकितात.

---

१ सामान, जिन्नस.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आद्याप न आली. त्याजमुळे बहूतच राग. आणि तुम्हास सांगितली की, लाहणपणचे इष्टत्वे फर्मास जरूर पा, म्हणून सांगितले. आणि आपणाकडून न आली. तर आतां सत्वर फर्मास पाा. हे विज्ञापना.

¶*A news letter to some Raosaheb mentioning the movements of the Peshwa and the Bhonsles of Nagpur.*

No. 212] [*5-1-1769*

पौ छ ९ रमजान

सन तिसा

श्री

सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २६ साबान मुाा नजीक वासीम वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तर श्रीमंत दरमजल वराड प्रांती जात आहेत. त्याजकडून देवाजीपंत आले, भेटले. जाबस्वाल ते आपणाकडून बजिदीच्या गोष्टी सांगतात. श्रीमंत काहींच आज्ञा करीत नाही. येथून साठ कोसांवर आहेत. अधिकोतर आढलेल ते लिहून पाठऊ. श्रीमंत राजश्री दादांचे पुत्रास बरे वाटत नाही, याजकरितां रामचंद्रभट वैद्य यास लस्करांतून पाा देणे म्हणून आज्ञा. त्यास, श्रीमंत सौ रमाबाई पुण्यास गेली त्याजबाा भटजी गेले. पुण्यास पावलेच असतील. कलावे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal writes probably to Nana Fadanis from the Peshwa's camp near Vasim that Madhavrao is marching fast towards Berar against the Bhonsles of Nagpur.*

[*7-1-1769*

No. 213]

पौ छ १८ रमजान

सन तिसा

श्री

सेवेसी हरी बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा २८ साबान मुाा काो कारंजे प्रांा वराड वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तर वरचेवर लिहितो त्याजवरून कलतचं असेल. राजश्री जानोजी भोसले येथून चालीस कोस अलजपुरचे सुमारे आहेत. श्रीमंत उमरावतीच्या रोखे जात आहेत. भोसल्याचा जुंजावयाचा सुमार दिसत नाहीं. जमियेत फार थोडी; देवाजीपंत लस्करांत आहेत. विनंती करीतच आहेत. कांही द्यावें असीहि विनंती

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

त्यांची चालली आहे; परंतु इकडून ऐकावयाची मर्जी नाही. वर्धेवर गेल्यावर सिधांत होईल. होईल ते लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. रा छ २ रमजान मुा नजीक उमरावती.

¶*Hari Ballal to Nana Fadanis—' Janoji Bhonsle is somewhere about Ellichpur while the Peshwa is heading towards Umraoti. Bhonsle is evading battle. The Peshwa is determined to fight to a finish despite the attempts of Dewajipant to patch up an understanding'.*

No. 214] [*7-1-1769*

पो छ २८ साबान सन तिसा

श्री

श्रीमत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक गणेश विठल कृतानेक साा नमस्कार विनंती विज्ञापना. ताा छ २१ साबान मुा जालनापूर येथे सुखे आसो. विशेष:—स्वामीकडून पत्र येऊन साभाल होत नाही तरी ऐसे नसावे. हमेशा पत्रे येऊन साभाल केला पाहिजे. श्रीमंत राजश्री रावसाहेबाची पत्रे राजश्री रामचद्र गणेश यासी आली की, तुम्ही तूर्त जालनापूर येथे आसपास राहाणे. खासा स्वारी गंगथडीस येत आहे. बालापूरचा सुमार दिसत आहे. मागाहून वर्तमान सेवेसी लिहीन. त्यावरून कल्ह येईल. सेवक लस्करांत येऊन दाखल जाहाला. यैवज मात्र पावला नाही. त्यास कृपाल्ह होऊन यैवज देविला पाहिजे. बारगीर बाजे लोक वगैरे ऐवज साडेच्यार हजारपर्यंत आहे. येथे यैवज रामचद्र गणेश देता दिसत नाही. आम्ही रोज उठोन मागत आहो. देतील तेव्हा खरा. लोक हैराण आहेत. नालबदीचा यैवज दिल्हा पाहिजे. कृपाल्ह होऊन यैवज देविला पाहिजे. शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Ganesh Vithal informs Nana Fadanis of an order from the Peshwa to Ramchandra Ganesh to halt at Jalnapur. The writer asks for money for paying the Nalbandi charges to the army.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 215] [*10-1-1769*

पौ छ १० जिलकाद
तिसा सितैन फालगुन

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक सिवराम नारायण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील कुशल छ १ रमजान मुा बोदवड येथे स्वामीचे कृपेकरून क्षेम असे विशेष. छ १६ सवालचे आज्ञापत्र सादर जाहाले, तेथे, नरहर[१] बलाल मारले गेले, फौजेची गडबड वारली, अत:पर नवा जमाव दूर केलाच असेल, नसेल तर सोय पाहून करणे. त्यास, पेशजी मोठी गडबड जाहाली तेव्हा वाबले वगैरे सरदार ठेविले होते त्यास निरोप दिल्हा. त्याउपरी सरकारच्या फौजा आकोटावर होत्या त्या श्रीमंत वराड प्रांतीहून निघताच पलून शहरास आले. हे वर्तमान विठल बलाल, नरहरपंताचा भाचा, यास कलल्यानंतर, दोन अडीच हजार सडी फौज करून आपले फौजेचे पंधरा कोसाचे तफावर्तीने आले. हे वर्तमान कलल्यानंतर फिरून जमाव करून बोदवडास आलो आणि मीच शहरास गेलो. तेथून फौजा निघत ना हे जाणून तेथे मनस्वी त्यासी प्रकार केले. राजश्री कमलाकरपंतभाऊ याणी लिहिले असतील किंवा लिहितील. त्याजउपरी त्यास घेऊन मलकपुरास गेलो. तेथे त्यास ठेऊन मी बोदवड येथे आलों. हाली नवीन जमाव दूरच करावा, परंतु विठल बलाल दोन हजार फौज सडी करून जलगावापासून आठ कोस सोनाले म्हणून सतावीस गावांतील ठाणेयाचा गाव आहे तेथे घेऊन ठाणे घेतले. बाबूजी नाईक याजकडील कमावीसदार अंताजी बापूजी यांचे जेष्ठ बंधु होते ते कुटुंबसुधां पलोन छ २९ सवाली जलगावास आलें. त्याजवरून जलगावचे कमावीसदार पलोन काल आले. त्यास तोहि माहाल सरकारचा. दुसरे, ते ठाणे घेतले म्हणजे बराणपुरानजीक शह पोहचेल हे जाणून हाली सामान येणेप्रों ठेऊन सडा जाहालो. नवीन नेमणुके सिवाय

प्यादे शहरापासून जलगाव येथे बातमीस आा १००

सिदोजी गुजर याचा मूल तुकोजी गुजर भिलांत दोनसे स्वारासनसी गेला आहे. त्याणे दोन गाव मारलें. त्याचे

स्वार

११५	रघुनाथ हरि
७५	बालाजी भिकाजी
७५	किरकोल पथके
२६५	

१ भोसल्यांचा सरदार.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

शासनास दीडशे नवे स्वार आजच रवाना केले. स्वामीचे कृपेकरून ते हाती लागले तर सर्वहि तूर्त बखेडा तुटेल. पाहावे

७९ सरंजामी वाट लष्करास जाण्यास न फुटे ते
६६ बांडे
१३ भोसले

———

३४४

पदमाकर कृष्ण याजकडील लोक आले आहेत आा १०० आहेत, परंतु त्यास स्वामीनी नालबंदी दिल्ही आहे त्याजविसी श्रीमंत शब्द ठेवितील याजकरिता राहाविले नाही. येक आठवडा मात्र देणे पडला.

तीनसे स्वार सडे होऊन आजच जलगावचे रोखे गेलो. होईल ते लिहून पाठवितो.

सदरहूप्रो जाले वर्तमान लिहिले आहे. सारांश, स्वामीचा वरदहस्त आहे तरी चिंता नाही. मामलतीचा मजकूर तरी माहालोमाहाली कारकून पाठऊन चोरबातमीने शोध करितां येणेप्रो आहे. कलमे :

पाा नसिराबाद येथील साल मजकुरी मख्ता बांधोन दिल्हा आहे. त्यास काादार नाकसबी ना वाकफ. अद्या(प) या देशाची रीत त्यांस कलत नाही. माल काही जाला तो रयत खाऊन जात्ये आहे. परगणा कुभांडी मोठा. त्यास येथून माझाने जितका बंदोबस्त होईल तितका करीन व करीतच आहे.

१.

इकडे गडबड जाहाल्यामुले सिबंदी जाजती पडली व मख्यास कमती येईल त्याचा बयाज :

१ शहरास बंगाल्यांतील व वराडचे मार्गे रेसीम वगैरे जिनस येत असे. त्यास येक बैल रेसीम आलेयास सतावीस रूपये हासील होता ते अगदी बुडाले. त्याजमुले कमती बहुत येईलसे दिसते. पाहावे.

१ बोदवड परगण्यांतच त्याचा फौजा येऊन तसनस जाली आहे. त्याचा नजरंदाज जाला म्हणजे विनंती पत्री लिहितो.

———

२

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

२ सिबंदी दोही जागापैकी; बोदवड
तोंडी होते, त्यास येथे जाजती,
शहरास कमी.

२

येणेप्रो॥ जाले वर्तमान सेवेसी लिहिले आहे. मनन करून आज्ञा लिहावी. शेवेसी कलावे. पा॥ बेटावद येथे तुकोजी होलकर याणीं सात मुकाम आठ हजार फौजेनसी केले. त्याची पायमाली अडसटा नव हजार कंमपेश[1] आकारली आहे. त्यास सदरहू ऐवजाचा करार पेशजी पुण्याचे मुकामी जाहाला आहे की, मुबादला करून घ्यावा. त्याप्रो॥ मुबादला करून घेतो. येणेकरून पुन्हा कोणी सरकार माहालांत तसनस करणार नाही आणि ऐवजहि उगवेल. हें केव्हा की, बिवेवार सेत पाहून जेरीबाचे[2] रूईने[3] पायमाली माझे यथाज्ञाने खातरदास्त आकार होईल त्यास ऐवजाची वाट सदरहूप्रो॥ करून घेईन. येविसी बोभाट करितील म्हणून सेवेसी लिहिले असे. विदित असावे हे विज्ञापना.

¶*Shivram Narayan in reply to a letter from Nana Fadanis asking him to disband his army, since Narhar Ballal having been killed there is no longer any trouble, says that he could not disband all his men as fresh depredations have been started by the nephew of Narhar. He gives the actual strength of this contingent. The reference is to the war against the Bhonsles.*

॥चा मन॥
[21-1-1769

No. 216] ॥गाहन
पौ छ २१ सवाल तिसा सितैन

श्री

राजश्रिया (विरा)जित राजमान्य राजश्री
*** * स्वामीचे शेवेसी**

पो कृ॥राव बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ता॥ १२ रमजान मुकाम आम(नेर) जाणौन स्वकीये लिहित असिले पाहिजे विशेष. काल आमनेरच्या किल्याचे ठाणे हस्तगत केले. (त्या)त राघो बावाजीस ठेवावयाची नेमणूक केली आहे. त्यास आत ठेऊन पुढें मजल दरमजल नागपुरावरून देवगड. चांदे वगैरे ठाणी हस्तगत करावयाचा उदेश आहे.

---

१ अदमासें. २ मोजणीचे. ३ शिरस्त्याप्रमाणें.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जानोजी भोसले तूर्त झाडीत पलोन गेले. सात स्आठ हजार फौज आहे. वराडांत वर्धे अलीकडे जपती भोसल्याचे आमलाची जाहाली. साल मजकुरी गोंडवण तमाम पायेमलीखाले जाले. मोगलाचीहि, फौज पधरा हजार पो जमा जाहाली आहे. [1]जेमिदोज ठाणी कूल दों आडचा महिन्यात हस्तगत होतील. श्रीमंताचे ताले सिकंदर आहेत. प्रस्तुत भोसले खराबीत आले. फौज श्रीमंताजवल रामचद्र गणेश व मोगल मिलोन पनास हजार पो जमा आहे. रा नारो शंकरहि लाखणवालीयाचा घाट उतरोन आले. शकरात (शहरात?) लौकरीच येऊन दाखल होतील. बहुत काये लिहीणे? लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Krishnarao Ballal writes to Poona the news about the capture of Amner fort. Janoji Bhonsle, he writes, has fled to the wilds in Berar with his army of some 8,000, and the whole province under him will be reduced to subjection.*

No. 217] [*February or March 1769*

सवाल मंगलवार दिढ
प्रहार सकालचा दिवस

श्री

सेवेसी दिवाकर पुरुशोतं सां नमस्कार विनंती उपरी. मल्हारपंत ... आले कुचाचे विसी आज्ञा सांगुन पाठविली. त्यास रा भवा जाहाल सुभेदार यांजला बोलाऊन पंत मशारनिलेसी रुबरु करून दिल्हे. ... व मख्ल्याचेच आज्ञेप्रमानच करविले. आज भेटीचे यानी सांगितले तर आपले येन च्यार घटका दिवस राहिल तेव्हा मुकामास होईल. जेवन होऊन मग स्वारी सेवासीवर येईल ते आठ कोस अजी येथून आठ कोस याचा मुकाम करविला तेव्हा रात्र दोन प्रहर यांजला असे. मुकामास जातां होईल. येथ तजवीज प्रथम आज्ञा जाली तैसी होती ... डेन्यास रावतासी डेऱ्यास ये * * * * * होता ... विस ... म आली तैसे करु. * * * * चिंता नाही. विनंती ब * ... ती लिहिली तैसाच होईल. आजे भे * * * करता * * * * ईल हे * * .

¶*Diwaker Purushottam makes arrangements on the way for the halts of Janoji Bhonsle.*

---

१ भुइकोट किल्ले.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 218] [*3-2-1769*

पौ छ १३ जिल्काद सन तिसा

श्री

शेवेसी माहादाजी बलाल सां नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ २९ रमजान मुाा नजीक बोरी प्राा नागपूर येथास्थित असे विशेष, इकडील वर्तमान तरी वरचेवर आपणास कलतच आहे. चांद्यास जावयाचा रोख धरिला आहे. चांदे ऐथून चालीस कोस आहे. भोसलेहि त्याच रोखे आले आहेत. बारा पंधरा हजार फौज जमा जाली आहे. बाजारबोली. वीस हजाराची आहे. सरकारचा कारकून (होता) तो त्याणे उठऊन दिल्हा (बातमी काही ए)क कलत नाही. चोर बातमीस माणसे आहेत. आलियावर वर्तमान कलेल. अद्याप एक पैसा प्राप्त नाहीं. भोसले भेटत नाहीत. जमाव दिवसेदिवस त्याजकडे अधीक पडत चालला. तेव्हा कठीण पडेलसे दिसते. वराडमध्ये चार हजार फौज गावेलीजवल जमा जाहली आहे. बालाजी केशव तिकडे फौजसुधा आहेत. अद्यापि वसूल खंडला नाही. इस्मालखान जमाबंदी करून देईल तेव्हां वसूल खंडेल. इस्मालखान वराडामध्यें जबरदस्त आहे. आणि भोसल्याचेहि ममतेचे आहेत असे म्हणतात. चौ पाचा दिवसात चंद्रपुरास दाखल होतील. तेथे गेल्यावर भोसल्याचा मनसुबा बिलकूल दृष्टीस पडेल. तूर्त पुर्ता ध्यानास येत नाही. होईल ते मागाहून लिहून पाठवीन. राजश्री माहादाजी सिंदे व राघोराम याचे उजनीस जुज झाले. राघोराम मारले गेले. येविसींचे तपसीलवार वर्तमान सरकारास आले. त्याची नकल करून पाठविली आहे. त्यावरून कलेल. वरकड वृत अधिकोतर ल्याहावेसे नाही. [illegible]पंत येथे * * परंतु आपले साधन-संपतीस चुकत * * [illegible]चा इतबार राहिला आहे (नाही) हे कलत नाही. सारांश आजपावेतो मनसुबा त्याजवर गालब होता. आता त्यावर अंतरसे दिसते. घडेल ते खरे. श्रीमंताचे पुण्य समर्थ आहेत. त्या भावेकडून सर्वहि गोष्टी नीट होतील. चिंता नाही. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal (Phadke) informs that Bhonsle is heading towards Chanda. Ismailkhan who is all powerful in Berar is friendly towards Bhonsle. A fight is reported from Ujjain between Mahadaji Sindia and Raghoram in which the latter lost his life.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 219] [12-2-1769

पौ छ १२ सवाल तिसा

माघ हा हयात सांडणीस्वार

श्री

शेवेसी माहादाजी बलाल सां नमस्कार विज्ञापना

ता माघ शुध षष्टी पावेतो स्वामीचे कृपेकरून मु नजीक चांदे सुखरूप असो विशेष. इकडील वर्तमान तरी भोसले आजपावेतो झाडीतच होते. बातमीचाहि पता पुरता लागू दिल्हा नाही. हाली बातमी आज आली की भोसले * * * * येलगड्यास गेले. पुढे मजलदरमजल देशात जावे यांप्रो त्याची कस्त आहे. जासूद सोडून तीन दिवस जाहाले. आजकाल उमरखेडचे सुमारे गेले असतील किंवा जातील. कमकसर वीस हजार फौज जरारी आहे. चौघा खाशाच्या मात्र चार चांदव्या व चार राहुट्या आहेत. लस्करात कोणाजवल पाल राहुटी नाही. सडे जरारे जाहाले. गोपालराव व रामचंद्र गणेश आजच त्याचे पाठीवर पंधरा आठ हजार फौजेनसी होतील. मागून साहेबी दरमजल येतील. याप्रो मनसबा ठरला आहे. आपणहि तिकडील बातमी राखून सावध सत्वर करावी. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶*Mahadaji Balal writes from Chanda that the Bhonsles have emerged out of the woods and are rushing hurriedly with a squadron of twenty thousand horse towards the Peshwa's territory.*

No. 220] [12-2-1769

पौ छ १० सवाल

तिसा

श्री

शेवेसी श्रीनिवास नरसिंह सां नमस्कार विज्ञापना ऐसीजे. येथील क्षेम ता छ ४ माहे सवालपावेतो येथास्थित असे विशेष. पूर्वी आज्ञा जे लाखणवाड्याचे घाटे जाणे म्हणून आज्ञा. त्यास त्या घाटांवर फौज रा नरहरपंत, भोसले याकडील पाच हजार फौजेनसी मलकापुरच्या मैदानात आहे व घाट लाखण-वाड्याचे तोंडी फौज हजार राऊत आहे. याप्रमाणे मुदाम आली. येथे ठेऊन आपले आज्ञाप्रो रा बालाजी केशव यास लेहून पाठविले आहेत. लेहून पाठ-वितील त्याप्रो लस्करास जाऊ. लस्करची बातमी नागपुरापलिकडे गेली म्हणून वर्तमान ऐकितो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Shrinivas Narsinha writes about Narharpant arriving at Malkapur with a force of 5,000 belonging to the Bhonsle.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 221] [13-2-1769

पौ छ १९ सवाल
तिसा सितैन माघ
मास

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक सिवराम नारायण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान माघ शुध्ध ७ पर्यंत मुा नजीक जामनेर येथे स्वामीचे कृपेकरून कुशल असे विशेष. इकडील वर्तमान सविस्तर पेशजी लिहिले आहे त्याजवरून कळलेच असेल. आलीकडील वर्तमान तर राजश्री नरहर बलाल व करांडे यांचा पुत्र ऐसे दोघे मिळोन पांच हजार फौज म्हणून वदंता. परंतु सडी फौज तीन हजार करून प्रथम जळगावी आले. तेथून बारा हजार रूपये खंडणी घेतली. तेथून येलदाबाद येथे पंधरा हजार घेतले आणि मलकापुरास आले. तेथून त्यांस बातमी आली की, आपले लस्करातून पाचसे स्वार व लुटीचे गुरूढोर मिळोन करांज्याचे मैदानात आले होते; त्यांजवर उलटून गेले. त्यांस हस्तगत केले. कोण होते हे कळले नाही. त्यांजवर खांनदेशात यावे ऐसा निश्चये करून मलकापुराआलीकडे आले. त्याजवरून येथे कमावीसदाराची पत्रे आली. त्याजवरून माहादजी सिंदे याजकडील जानराव वाबले वगैरे मिळोन तीनसे स्वार जात होते त्यांस सामील करून घेऊन, त्यास दरमाहा रूपये चार हजार मी म्हणतो, पांच हजार ते म्हणतात, परंतु करार करून समागमे घेतले. त्याजासिवाये फौज येणेप्रमाणे

	अज स्वार.	येकूण दरमाहा रुपये.
वाबले वगैरे	३००	४९००
नारो भिकाजी	१००	२०००
रघुनाथ हरि	१२९	३०००
किरकोळी पथके मिळोन	३००	९९००
	८२९	१९०००

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

पद्माकर कृष्ण नौकर सरकार स्वार २००, दर आठवडा रूपये ६०० प्रो ती आठवडे येकमाही १८००. याजसिवाये दीडमाही खासा ३५०	२००	१८००
	१०२५	१६८००.

सदरहूप्रो सरंजाम तयार करून याजसिवाये प्यादे ठेऊन दरकूच येथून कूच करून बराणपुरास गेलो. तेथे बुनगे ठेऊन तेथून सडे जरीरा[1] होऊन रात्रीस गाठ पाडावी अशे उदेशेकरून जातो. बातमीचे पत्र कमलाकरपंताचे पत्र आले तेच शेवेसी पाठविले आहे. आपले कृपेकरून सर्व उतम करील. परंतु स्वामीजवल काही जाजती लोक असल्यास, हा समय कठीण आहे; ज्ये असतील ते रवाना व्हावयास आज्ञा जाली पाहिजे. कदाचित आपण म्हणतील की, आपले फौजेचा गाहा असता हे कसे येतात, कसे जातात? त्यास, बालाजी केशव सफरे यास जफतीचा सुभा सांगितला. त्याजपासी दोन हजार फौज असतां पलत फिरतात. तेव्हा गरीबगुरबाने कसे करावे? हे वर्तमान इकडून श्रीमंतास लिहावे तर जोब्या मारल्या गेल्या. पुढे कसे करावे ते लिहून आज्ञापत्र सादर जाहाले पाहिजे. सारांश, माझी कुवत थोडकी आहे. परंतु त्यातून येथाज्ञानेकरून जितका बंदोबस्त होईल तितका करितो. असे करिता हा प्रकार. न करीन म्हटला तर कादार गलबले. पुढे कसे होणार न कले. याजकरितां विनंती लिहिली आहे. शेवेसी विदित जाहाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*Shivram Narayan to Nana Fadanis giving the movements of the Nagpur army under Narhar Ballal and Karande in Khandesh. He further gives the strength of his own army and their remuneration.*

No. 222] *[14-2-1769*

श्री

पुा श्रीमंत राजश्री दादासाहेब
स्वामीचे सेवेसी

विज्ञापना. श्रीमंत राजश्री रावसाहेब लाखणमडयाचा घाट चढून छ ६ रमजानी गेले. भोसल्याचे सालजाबासाठी घाटाखाली मोगलाचे लशकरात

---

१ सडे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ठेऊन गेले आहेत. त्यास तूर्त भोसल्याकडील सालजाब स्वामीचे मर्जीप्रोाचे होतील. कितेक मोगलाकडील जाबसाल भोसल्यावरी शाबीत होत आहेत. तूर्त मोगल आपली मर्जी तोडून भलती * * * करीत नाही. दो चौ दिवसानी घाट चढू(न) (जा)तील. भोसल्यानी स्वामीचा निरोप घेतल्याचे कारण कलले नाही. स्वामीवर ईश्वराची कृपा आहे. यास्तव स्वामीसी दगाबाजी केल्याने परिणाम उतम नाही. तिकडील वर्तमान सेवकास ल्यावयास आज्ञा करणार धणी समर्थ आहेत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Raghoba Dada is informed that negotiations with Janoji Bhonsle have been opened.*

No. 223] [*15-2-1769*

श्री

श्रीमंत राजश्री नानास्वामीचे शेवसी

पोष्य बालाजी शंकर सा। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। माघ सुध नवमी मुकाम जालनापूर स्वामीचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीचा निरोप घेऊन आलो ते दरमजल चौदा कोसाच्या मजलीकरून मुकाम मजकुरी रा। रामचंद्र दामोदर खजिना घेऊन आले त्याजवल दाखल जालो. त्यास इकडील वर्तमान तर स्वामींनी खजिना व कापड रवाना केले ते तिंहीकडे जाले. खंडेराव बारगे ये कासारबारीचे घाटे जाणार व रामचंद्र दामोदर येथे आले. कापड तर आलेच नाही याप्रो। आहे. येकामध्ये येक नाही. पुढील मार्ग चालत नाही. भोसलेयाकडील लाखणवाडाचे घाटाखाली पाच हजार फौज जमा करून नरहर बलाल धामधूम करीत आहेत. तिकडून राजश्री लक्षुमणराव रास्ते व खंडोपंत मामा लस्करातून आले. त्याणी मार्गाचे कठींण जावयाचे सागितले. त्याजवरून हा खजिना येथेच मुकाम करून राहिला आहे. बारगे यास याच मार्गे येणे म्हणोन पत्र रा। केले आहे. पुढे लस्करचे सुमारे पत्रे व बालाजी केशव यासी बातमीचे पत्र पाठवावे तर जासूदजोडी निभावत नाही. मारले जातात. शंभर माणूस जिवे मारले गेले व जखमी जाले. यास्तव तेथे पत्र पोहचत नाही. रास्ते आले. त्याणी भयेभीत विस्तार सांगितला. त्यावरून याचे मानस जावयाचे दिरगावर आहे. विना याची मदत जाहालियासिवाय लस्करास जाणे होईल तर येविसीची तर्तूद करून पाठवावी. काल दोन प्रहरा याजवल येऊन पावलो. त्याणी हे सविस्तर वर्तमान सांगितले. त्यावरून सेवेसी लिहिले आहे. रा। खंडोपंत मामाहि पुणेयास आल आहेत. त्यास बोलाऊन

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सविस्तर पुसावे. याउपर पुढील तर्तूद आजी पैरवी बातमीची करून बालाजी केशव याजकडे कासीदजोडी पाठऊन जाव आणून फौजेची तर्तूद जाली तर जातच आहो. खंडेराव बारगे व रामचंद्र दामोदर याचे स्वार आहेत ते रिकामे नाही. येकादा प्रसंग पडला तर स्वार तीनच्यारसे रिकामे पाहिजे तेव्हां ठीक पडेल. येथे यासिवाय दुसरा जमाव नाही. जाणे लांब. सेवेसी कलावे. बहुत काये लिहिणे? कृपा केली पाहिजे हे विज्ञापना.

¶*Balaji Shankar who was commissioned to take treasure and cloth to the Peshwa's army reports to Nana Fadanis how difficult it was for him to leave Jalnapur as the country was overrun by the armies of the Bhonsle.*

No. 224] *[16-2-1769*

श्रीमार्तंड

श्रीमंत राजश्री नानासाहेब स्वा-
मीचे सेवेसी.

विनती सेवक लक्षुमण खंडेराव साष्टांग नमस्कार विज्ञापणा यैसीजे. येथील कुशल माघ शुध्ध ११ मुकाम नाणेफल जाणून स्वकीये कुशल लिहीत आसिले पाहिजे. विशष:—श्रीमंताची खासा स्वारी वासिमावरून वराड प्रांती घाट उतरून गेली. त्यासमई तीर्थरूप उभाउभी घरास येऊन, परामर्ष आमचा करून, येका दो रोजात सत्वरच श्रीमंताकडे गेले. पुणियात श्रीमंतास आपन तीर्थरूपास निरविले. त्या दिवसापासून श्रीमंत बहुतच कृपावंत तीर्थरूपावर आहेत. भोसलियाकडील माहाल च्यार घाटावर खेडले, मेहकर, चाखाण, जिंतूर, येथील जती सांगत होते. परंतु तीर्थरूपाचा हेत की, जे कर्तव्य ते आपले विद्यमाने करावे. यास्तव ते काम कबूल न केले. तदोतर श्रीमंत विजये साधीत नागपूर प्रांतीहून पुढे चंद्रपुराचे रोखे गेले. सेनासाहेबसुभा गाठ तोडून पुढे चालतात. मागे वराड प्रांती गड गावेल तेथ कबिले भोसलियाचे आहेत. रक्षनार्थ रा। नरहर बलाळ फौजिसहवर्तमान होते. त्याणी संधल्याहून उगवे वगैरे गाव श्रीमंताचे मौकासियाचे मारिले. श्रीमंताकडून रा। बालाजी केशव सपरे सुभा होऊन वराडचा वंदोबस्त करावयानिमित्य आकोलियावर आले होते. त्यांचा काही जोर न पडता रा। नरहरराव बलाल याणी पूर्णातीर वराडात कूल फिरून खंडन्या घेतल्या. हा बोभाट श्रीमंताजवल गेला. तेथून श्रीमंतानी तीन तोफा व नवाबकडील पथके बीडकर निंबालकर व खंदारचा राजा वगैरे तीन हजार फौज तीन तोफा कुमकीस येऊन पा. त्यावर विपरीत काळाची छाया

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

रा। नरहर बलाल योजवर पडताच पतगप्राय चालून पूर्णातिरी वराडात लडाई जाली. सूर्योदई अंधकार लयास पावेतो तद्वत रा। नरहर बलाल सहसमुदाये गतप्राण होऊन श्रीमंताची फौज विजई जाली. राहिली फौज पलायेन करून गडाकडे गेली. यापूर्वी रा। नरहरराव याचा हेत उत्कर्ष होता की, घाट चढून मुलूक मारावा, तो मनोरथ ईश्वरे सिध्धीस पाववीला नाही. हे वर्तमान आपनास कळावे यास्तव लिहीले आसे. यानंतर येथील आधिकारी चिटनिसाकडील ग्रहस्त आहेत. त्यानी गतवर्षी आम्हावर बदीसा केला. त्याचे निवारण स्वामीनी करून पूर्ववतप्रमाने रक्षण आमचे केले. त्यावर आमची मामलत पा। अंबाडापूर येथील सरदेसमुखी व मोकासा व साहोत्रा इतकी आहे. आणि कर्ज-वाम लढे परगणियात उदंड आहे. त्यास अंबाडापुरी राहून कार्येभाग येथास्थित चालवावयासि आधिकारी याचे चिताची शुध्धता न देखून तीर्थरूपाणी नाने-फलातच ठेऊन गेले. पुढे ज्या काली स्वामी अंबाडापुरी नेऊन बसवितील तेव्हांच जाऊ. श्रीमंत पुढे गेलियावर मागून फौजा व तोफखाना गेला. त्यास काही खेडिलीयावरून गेले. आणि आबाडापुरावरूनहि फार गेले. त्याजमध्ये शत्रूणी चित पुरऊन येक दोन गाव पायेमालीत तोफखानियाच्या आले. जुज-रसी करून पायेमाली खेडियासि मजरा द्यावी लागल. यानंतर पा। खेडिले वगैरे च्यार्‍ही परगणे भोसलियाकडील जप्तीची कमावीश रा। महिपतराव प्रल्हाद तुळापूरकर याणी केली. त्यासि ते खेडलियासि आले. तेथे आमची मामलत आपलियाकडील चौथाई व बाबती व साहोत्रा आहे. आणि परगणियात कर्ज-वामहि आहे. आणि माजूल जागिरदारान खरिफाचा यैवज घेतला. त्यापैकी बाकी गावगणा होती ते आमचे यैवजात दिधली होती. वसूल करावा तो जपत्ती श्रीमंताची आली. त्यास पुढे यैवज घेतील त्यासि नूतन ताकिदीचा आक्षेप यानी केला. त्याजवरून विनंतीपत्र सेवेसी लिहिले आहे. तरी कृपाळू होऊन ताकिदी यादीप्रमाने पाठविल्या पाहिजेत. आणि नानेफल पा। खेडिले येथ आमचे राहाणे जाले आहे. याविशई आपन पत्र आपले नावे रा। महिपतराव प्रल्हाद यासि ममतेचे ल्याहावे की, कितीक प्रकारे आमचे चालवितील. विशष ल्याहावे तर आपले कृपेची कीर्ती दिगंतरास जाऊन शत्रू पादाक्रांत जाले आहे. सदैव कृपापत्री सांभालीत आसावे. बहूत काये लिहिणे? लोभ आसू द्यावा हे विज्ञाप्ति.

¶*Laxman Khanderao informs Nana Fadanis of the death and defeat of Narhar Balal, the Bhonsle's Subedar of Berar. Janoji is being hotly pursued from place to place.*

2103

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 225] [*17-2-1769*

पो. छ ९ सवाल पहाटेची
दीडप्रहर रात्र

श्रीशंकर

राजश्री सदासीव अनंत नािा. फडनीस स्वामी गोसावी यांस विनंती उपरी काल तेथून निघोन सिवण्यास आलों. च्यार घटका दिवस असता गाव सभोंवता फिरोन पाहीला. रात्रीस गावाभोवत्या चौक्या ठेवील्या होत्या. प्रात:काली आज गावावर हला केली. गावचा अधिकारी अजमतजंग हात बांधोन आला त्यास गोटात ठेविला आहे. त्यांचा गुंता आज उद्या उरकोन एक दो दिवसात लस्करचा मुकाम आहे तेथे येऊ. तुम्हास कलावे. हे पत्र डावे बाजूस राजश्री आनंदराव दादास व उजवे बाजूचे सरदारास दाखवावे. राजश्री साबाजी भोसले नानाचे लस्कर कूच करून जवल आले असेल तर आल्याचे वर्तमान लिहिणे. रा. छ ९ सवाल बहूत काय लिहिणे हे विनंती.

¶*The writer intimates Sadashiv Anant of his attack on Sivane. He also requests him to write whether the forces of Sabaji have arrived.*

No. 226] [*19-2-1769*

पौ छ २१ सवाल तीसा सितेन

श्री

राजश्रिया विराजीत राजमान्य राजश्री नाना स्वामीचे शेवेशी पो रामचंद्र दामोदर साष्टांग नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ ११ शवाले मुक्काम नजीक जालनापूर जाणोन स्वस्ति क्षेम असे विशेष. पत्र पाटविले ते पावले बर्गे व तुम्ही येकत्र होऊन जालनापुरी राहावे आणि राजश्री बालाजी केशव यास पत्र पाटवून त्याचे उत्तर येईल तैसे करणे म्हणोन आज्ञा. त्यास जालनापुरी मुक्काम करतांच बालाजीपंतास पत्र पाटविले. परंतु मार्गावरोधे अवकाशें पत्र पावले. त्यांचे उत्तर काल आलें कीं दहा हजार फौजेचा पेच पडे असे स्थळ असेल तेथे जाऊन राहणे. बालाजीपंत याणी आकोलेहून कूच करून येदलाबादेवर गेले म्हणोन पत्र लिहीले. अशास आम्ही दौलताबाजेसमीप गेलो. जानोजी भोसले गंगथडी असपास करून खंदारचे सुमारे आहेत. त्याचे पाटीवर सडी फौज आपली आहे. असे इकडे वर्तमान आहे. ओढ करून लस्करासच जावें तर लस्कर कोणे ठिकाणी हे तथ कलेना. वोझे जवल. बालाजीपंतानी लिहिले त्यांतील अर्थ समजोन दौलताबाजेस गेलो. फुढें आपली आज्ञा जैसी येईल तैसी वर्तणूक करूं.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आम्ही मार्गावर आज्ञेप्रमाणेच इकडें आलो. बरगे यांस च्यार पत्रे आम्ही मार्गावरून पाटविली. परंतु ते ओढ करून खानदेशाजवळ घाटानजीक गेले होतें. मग तिकडे घाट चालत नाहीं, निभाव कटीण, असे समजोन बर्गे छ ११ शवाली आम्हाजवळे आले. कळावे म्हणोन लिहिले असे. बहुत काय लिहिणे लोभ कीजे हे विनंती राजश्री बालाजी केशव व आनंदराव गोपाल यानी आम्हास पत्र पाटविले त्याच्या नकला आपणाकड पाा आहेत, त्यावरून सर्व वर्तमान विदित होईल. हे विनंती.

¶Ramachandra Damodar informs Nana Fadnis that for his instruction he has joined with Barge and is proceeding to Daulatabad to join with Balaji Keshao. Janoji Bhonsle, he says, is near Khandesh and is being pursued by our army.

No. 227] *[10-2-1769*

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे सेवेसी,

सेवक विसाजी हरि कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. तागाईत छ २ माहे सवालपावेतो मुाा नासिक येथास्थित असों विशेष. स्वामींनी कृपावंत होऊन पत्र पाठविले तें पावोन समाधान जाहालें. ब्राम्हण ग्रहस्त वगैरे यांचे शांतवन केले. शहरचे लोक बाहेर गेलेले येऊ लागले. भोसला अद्याप घाटाखाले उतरला नाही, यामुले लोक दहंशत खातात. आगोधर भोंसल्याचे हुलडीमुले पाा मजकुरचे दाहा पांचा गावांचे पाटील व रयेत लोक परागंदा जाहाले ते अद्यापि गावांवर येत नाहीत, याजकरितां विनंती लिहिली आहे. तरी पाा मजकुरचे मोकदमाचे नावे कौल सादर जाला पाहिजे कीं, खातरजमा राखोन आबाद होणें. यैसा कौल आलियावरी त्याचे समाधान करून गांवावर आणून. स्वामींची स्वारी या प्रांती आली, येणेकरून बहुत जनास समाधान जाहाले. आपले जासूद हमेशा इकडे येतात तेव्हा सेवकास पत्री आज्ञा जाली पाहिजे. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶Visaji Hari writes to the Peshwa from Nasik that the Ryots, scattered at the approach of the forces of Janoji Bhonsle, are slowly trickling back into their hamlets but seem to lack confidence.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 228] [17-2-1769

श्री

श्रीमंत राजश्री रामचंद्रपंत तात्या व राजश्री विसाजीपंत दादा स्वामीचे सेवेसी

पो कृष्णाजी अनंत सां नमस्कार विनंती. ता छ ९ शौवाल भृगुवारपर्यंत वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामींनी पत्र पाठविलें तें पावोन अभिप्राये कळला. श्रीमंतानी भोंसल्यांचे पिछावर फौजसुधा आमची रवानगी केली आहे म्हणोन लिहिलें. त्यास भोंसले धर्मपुरीजवळ गंगा उतरून पोलासावरून+ कोना+ समुद्र पा बेमंगल+ येथे पंचमी शनवारी व रविवारी त्यास्थळींच मुा जाहला. सोमवारी सप्तमीस कूच करून मौजे लालेम पा इंदूर येथें मुा जाहला. तेथून अष्टमी मंगळवारी मलुपेठेवरून राजेनापेटेनजीक मुकाम बुधवारीं नवमीचे दिवसी जाहला. गुरूवारी लिंगमपेठेचे सुमारें कूच करून गेले. येक वंदता यैसी आहे जे भागानगराकडे जाणार. येक वार्ता जे भालकीवरून जाधवराऊ याची भेट घेऊन पुण्याकडे जाणार यैसी वदंता आहे. सत्यमिथ्यां न कळे. वरकड भोसले या प्रांते आलें, हे वर्तमान आले त्यावरून आम्ही ठाण्याठुण्याच्या बंदोबस्ताकरितां म्हैशांस आलों. त्यास उमरखेडाहून कमाविसदार याची पत्रें आलीं जे लस्करचे लुगारियाणी परगणियांतील दाहावीस हजार ढोरें वळून नेलीं. गांव लुटिलें. फारच खराबी केली. यैशास परगणा सरकारची खास जागीर आहे. कळेल त्याप्रमाणें बंदोबस्त करून संरक्षण करावें. ताकिदीस राऊत व बाणदार द्यावे. उमरखेडींतून कमाविसदार आपणाकडे अगोदर गेलेच असतील. उमरखेड व म्हैसे सरकारचे माहाल आहेत. संरक्षण करावें. कृपा लोभ असो द्यावा हे विनंती. सांडणीस्वारांसमागमे श्रीमंताचे आज्ञापत्र बातमीविसी आले त्याचे उतर पाठविले आहे. हे आपण वाचून लाखोटा करून, आपला सांडणीस्वार लस्करात जाईल, त्यासमागमे रवाना करावे हे विनंती.

¶*Krishnaji Anant gives news of Janoji Bhonsle's movements to Ramchandra Ganesh and Visaji Krishna. He writes that Bhonsle crossed the Godavari near Dharmapuri and was marching through the Nizam's territory by way of Polas, Kona Samudra, Lalem, Malupeth, Lingampeth. Either Bhaganagar or Poona* via *Bhalki seemed to be his objective.*

\+ निजाम शहरांतील प्रदेश. ७९, १९.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 229] [*19-2-1769*

पो छ १३ सवाल माव तिसा

श्री

श्रीमंत राजश्री नाना फडणीस
स्वामीचे सेवेसी

पो नागोराम+ कृतानेक सां नमस्कार विनती. येथील कुशल ता छ ११ सवाल मुा कंा जेऊर नजीक नगर आपले कृपेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. आपली आज्ञा घेऊन स्वार जाहलो ते तिसरे दिवसी लस्करांत वालकी नजीक येऊन पोहचलो. दुसरे दिवसीं कूच करून घाटमांथा जऊरावर मुकाम केला आहे. राजश्री धोंडो हरी खजिना घेऊन या मुकामी आले. यैवज होन चोवीस हजार येकूणीस व नख्त दिड रुा चवल आमचे स्वाधीन केला आहे. आपली आज्ञा मागाहून आली तें छ ९ मिनहूस पावले. तेथे आज्ञा की राजश्री गोविंदराव गाईकवाड सेनाखासखेल यांची फौज अडीच हजार लस्करात जाणार ते नगरा नजीक येतील तुम्हास लिहोन पाठंऊ त्याप्रमाणें खजिना रुा करणे म्हणोन आज्ञा. आज्ञेप्रमाणे वर्तणूक होईल. राजश्री धोंडो हरी यांस कृपा करून पत्र पाठविले त्यात आज्ञा की नागोराम यांचे राऊत जसजसें घरीहून येतील त्याची गणती घेणे. त्याजवरून मारनिलेनी आपणास पत्र लिहिले आहे त्याजवरून विदीत होईल. कानडे वलणचे लोक पदरी मातबर. त्यांच्या पालख्याचा रोजमरा आपण वजा केला त्यामुले त्यानी फारच घोर केला आहे. तिघे सरदार जातीनसी दाहा दाहा स्वारानसी मात्र राहिले. बाकी लोक आम्ही पुणियास येताच आपण आज्ञा केली की लस्करात पत्र रुा केले याचे उत्तर येईल तोपर्यंत तुम्ही येथे राहणें, लोकास चार दिवस निरोप द्यावा. त्या आज्ञेवरून येथें आमचें फडनीस होते त्यास लेहून पाठविलें, त्याजवरून राउतांस निरोप खर्चास दोन रोजमरे देउन रुा केलें. कानडे वलणचें लोक गेले; खासे मात्र राहिले. इकडील कडेवालीतचें लोक वामोरी आसपासचे गेलें नवतें. त्याची गणती मात्र दिल्ही आहे बाकीचे लोकहि जवलपास ज्यांचीं घरें ते आपलाले घरीं कोणी कोणी गेले आहेत त्यांस पत्रे पाठविली आहेत. दो चौ दिवसी जे येतील त्यांची गणती देऊ. चाकरीस जसी आज्ञा येईल त्याप्रमाणे चाकरीस जाऊ. बिडास सत्वर गेलें पाहिजे. हंगामाचे दिवस. गाईकवाड कधीं येतील? खजीना त्यांचे स्वाधीन कधीं करावा? यामुलें खोलंबा जाहला आहे. श्रीमताचे लस्कर तो

+ वांबोरीकर (?)

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नागपूर सोडून दोन तीन मजली गेले. मध्यें वाट चालत नाही म्हणोन वर्तमान ईकडेस दाट आहे. जसी आज्ञा येईल तसी वर्तणूक करूं. बिडास धोंडो गणेश कारकून व वीस स्वार देऊन रा। केले आहेत. तिकडून पत्र गोविंदराव हरी, रामचंद्र गणेश याजकडील त्यांस पत्र लेहून सरकारची पत्रे पाठविली आहेत. त्याचे उत्तर येक दो दिवसी येईल तोपर्यंत आपलीहि आज्ञा येईल. आज्ञेप्रो वर्तणूक करीन. बहूत काय लिहिणे ? लोभ आसो द्यावा हे विनंती.

¶*Nago Ram to Nana Fadnis acknowledging the receipt of treasure sent with Dhondo Hari. He further writes that Dhondo Hari could not take muster of his cavalry as some of them, especially from Karnatik, had already left the army as their palanquin allowance was stopped. The writer says he has been awaiting the arrival of Govindrao Gaikwad to whom he can hand over the treasury.*

No. 230] *[23-2-1769*

पौ छ १ जिलकाद
तिसा सितैन

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे शेवेसी

पो चिंतामण हरी कृतानेक सां। नमस्कार विनंती. येथील कुशल ता। छ १९ सवाल मुकाम कसबे बोदवड प्रांत खानदेश येथे सुखरूप जाणोन स्वकीयें कुशल लिहित असिलें पाहिजे विशेष. इकडील वर्तमान तरी भोसल्याकडून खानदेश प्रांती सुने रान पाहून नरहर बलाल फौजसुधा रवाना केले होते. त्यास त्याची व राजश्री बालाजी केशव सफरे यासी लडाई जाली. नरहरपंत ठार जाहालें. च्यार पाच हजार त्याजसमागमे फौज होती, लुटून फस्त केली. त्याजवर भोसले माहूर प्रांती निघाले. कराडे वगैरे भोसल्याकडील दाहाबारा हजार फौज पुन्हा या प्रांती जलगाव नजीक आली. याचे वर्तमान आजच आले. बालाजीपंत सफरे माघारें फिरोन या देशात आले. कराडे याचा रेट भारी, यास्तव निभाव होणार नाही, याजकरिता आले. आम्हीहि पुन्हा जमाव केला. त्यास येथे मुकाम मजकुरी राजश्री भगवंतराव पवार वेळावीकर याजला आम्ही आपलें समागमे ठेऊन घेतले. पवारास न्यावयासी सरकारचे जासुद येक व हुजऱ्या येक श्रीमंताकडे न्यावयासी आले होते. त्याजला स्वामीकडे माघारे पाठविले आहेत. येऊन पोहचतील. हुजऱ्यास व जासुदास पवाराचें कामगिरीवर आल्यापासून याजला रोजमरा पावला

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नाही, म्हणोन जासुदाने व हुजरयाने येथे सांगितले. वरकड मजकुर जासुद सांगता सेवेसी विदित होईल. बहुत काय लिहिणे? कृपा लोभ केला पाहिजे हे विनंती.

¶*Chintaman Hari writes to Nana Fadnis from Bodwad (Khandesh): "Balaji Keshao Sapre repulsed Narahar Balal who had ventured into Khandesh but had to retire in the face of a large force led by Raghuji Karande."*

No. 231] [*24-2-1769*

पौ छ २३ सवाल
तिसा सितैन
पौ छ १८ माहे सवाल
मुा फरकाडे

श्री

अजम भाईखान महमद दाम
मोहबत हू

८ मोहीबाम पन्हा मुखलीशान दस्तगाहा चितामण हरी सलाम बाजद सलाम आकी. येथील खैरसला छ १६ सवाल भृगुवासर मध्यरात्र मुकाम वरणगाव जाणौन तुम्ही आपली खैरखुसी कलमी करीत जाणे. दिगर आज आताच बातमी आली की, भोसले खासा जानोजी फौजसुधा आमदानगरच्या मैदानात आले. पैठणावरूनच खानदेशात कराडे व जाचक आजंठ्याच्या घाटास आले आहेत. त्यास मिलावयासी विठल बलाल फौजेनसी मलकापुरानजीक आहेत. सरकारची फौज बुणगे ठेवायासी बराणपुरास गेले. त्याजकडे आम्ही राजश्री सिवरामपंत तात्या पाठविले आहेत. त्याची फौज बोदवडाकडे आणून आम्हीहि येकत्र होतो. तुम्ही येक घडीचा विलंब न करिता जामदारखाना घेऊन पारोल्यास जाणे. तेथे बंदोबस्त करून राहाणे. डोंगरकठारियाणे आजठ्याचे घाटास फौज आली आहे. त्यास मिलावयासी जातो. तुम्ही बहूत खबरदारीने ठिकाणास पोहोचणे. तेथे बदोबस्ती करून राहावे. ज्यादा काय लिहीणे? मोहोबत आसो द्यावी हे किताबत.

¶*Chintaman Hari informs Khan Mahmad of Janoji's arrival in the neighbourhood of Amadanagar and asks him to proceed to Parola with forces.*

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 232] *[25-2-1769*

पौ छ २३ सवाल तिसा सितैन

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामी-
चे शेवेसी

विनंती शेवक धोंडो माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ताा छ १७ सवालपर्यंत स्वामींचे कृपेकरून वर्तमान येथास्थित आसे. विशेष:— छ १२ रोजचे पत्र रवाना जालें. रोज गुदस्ता त्रितीय प्रहरी किलियात पावले. तेथे आज्ञा कीं, श्रीमंताकडे लस्करांत खजिना खंडेराव बर्गे याजबाो व कापड खान माा याजबरोबर पाठविले आहे. त्यास ते दौलताबादेवरून बोदवडास गेले. येविसी त्याची पत्रेहि येथे आली होती. त्यास त्याच्याने निभाव न होई. साा माघारे दौलताबादेस खजिना व कापड ठेवावयाविसी त्यास येथून लिाा आहे. तरी त्याची येण्याची (बातमी) राखून तुम्हाजवल आलें म्हणजे खजिना व कापड किले दौलताबादेवरी चढऊन त्यास सडे करून पुणियास जलद पाठवणे. आणि तुम्ही आपले जागा हुसीयार राहणे. चालीस पंनास माणूस किलियाहून त्याजकडे पाठऊन त्यास किलियास आणऊन खजिना व कापड लिााप्राो किलियावरी ठेऊन त्यास इकडे रवाना करावे म्हणून आज्ञा. त्यास सांडणीस्वार स्वामींचे पत्र बजिनस घेऊन त्याजकडे गेला आहे. ते येथे आलियावरी सर्व आज्ञेप्राो होईल. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना.

¶Dhondo Mahadeo writes to Nana Fadnis that he would carry out his instructions regarding the safe custody of cloth sent by Nana with Khanderao Barge.

No. 233] *[25-2-1769*

पौ छ १८ सवाल तिसा-
सितैन माघ मास

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे
शेवेसी

पोष्य माहादाजी नारायेण साष्टांग नमस्कार विनंती येथील कुशल ताा छ १७ सवाल पावेतो वर्तमान येथास्थित असे. विशेष:—आपण पत्र पाठविलें तें

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पावले. तेथे आज्ञा की, राजश्री नागोराम याजकडील तीनसे राउताबरोबर लाख रुपयाचे होन लस्करात रवाना केले होते. त्यास तो खजिना तुम्हाजवळ नगरी येवावयाविसीं त्यास लिहिले आहे. तो तुम्हाजवळ खजिना आणून देतील. ते घेऊन खजिन्याबरोबरचे राऊत पुणें यासी सत्वर रवाना करणें. भोसले खासा फौजेसहवर्तमान पुणेंयासी येणार. त्यास तुम्ही किला हुशार राखणे व तुमच्या जिल्ह्यातील घाट निंबेदहारे वगैरे घाटची बातमी राखोन खबर वरचेवर लिहीत जाणें म्हणौन लिा त्यास राजश्री नागोराम यानी कारकुनाबरोबर खजिना होन पाठविले आहेत. ते मोजदाद करून आपल्या लिहिल्याप्रमाणे हुशार राहातों. घाटचे बातमीस आज्ञेप्रो लोक ठेवितो. बहूत काये लिहिणे? लोभ असो द्यावा हे विनती.

¶*Mahadaji Narayan to Nana Fadnis promising him to carry out his instructions regarding vigil being kept in the pass of Nimbe Dehar to prevent Bhonsle from coming down to Poona. He also says that he would receive and keep well the money sent by Nago Ram.*

No. 234] *[25-2-1769*

पाो छ २० सवाल
सन तिसा पुणें

श्रीनकल

श्रीमंत राजश्री हरिपंत आबा व ताा
राजश्री हरिपंत बापू स्वामीचे शेवेसीं

सेवक राजाराम बाबूराव कृतानेक साा नमस्कार विनंती. उपरी: येथील क्षेम ताा छ१७ माहे सवाल जाणून स्वकीयें लेखन करीत असले पाहिजे. यानंतर फौजची बातमी काल छ १६ रोजी आली, त्यांस फौज भोसलियाची रेणापुरावर आली आहे. तेथून कूच करून पुणियाकडे गेला. पुण्याअलिकडे चालसा कोसावर कासद सोडून आले; तिकडे कुल वर्तमान येत असल. बहुत काये लिहिणे? श्रीमंताची फौज भोसल्यामागे चाली आहे. सत्वरच मुकाबला होईल. चिंता न करावी. लोभ करावा हे विनंती.

¶*News-letter from one Rajaram Baburao says Bhonsle is heading towards Poona hotly pursued by the Peshwa.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 235] [*26-2-1769*

पौ छ २१ सवाल तिसा सितैन

श्री

श्रीमंत राजश्री नानास्वामीचे शेवेसी

पो बालाजी शंकर सां नमस्कार विनंती येथील कुशल ताा छ १८ सवाल मुकाम मौजे आडुळगाव पाा पैठण स्वामीचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी पत्र छ ११ सवालचे पो ते छ १७ सवाली प्रात:काली पावले. तेथे लिहिले की खंडेराव बारगे यास पत्रे पो आहेत, ते आपणाजवल आणून सारे येके जागा जालनापुरी असणे. मागाहून पुढे जावयाची सोय लिहोंन पाठऊ, त्याप्रो जावे म्हणोन आज्ञा. अथवा राा बालाजी केशव यास पत्रे पाठऊन निभाव होतो ऐसे कलले तर पुढ जावे. त्यास जालनापुरी मुकाम करून राहिलोच होतो. त्यास मुरादखान सांडणीस्वार लस्करातून जलदीने आला. त्याणे सविस्तर सांगितले की भोसले निर्मळकडून देशास येत आहेत. श्रीमंतहि दरमजल त्यामागे येतच आहेत. तर घाटाखाली न जाणे, सावध राहणे. त्यावरून आजपर्यंत चौकडील बातमी आणून जालनापुराजवल होतो. त्यास काल बालाजी केशव याचे पत्र आले की आपले येणे घडत नाहीं. तूर्त ऐवज मातबर ठिकाणी ठेवावा व गोपाल केशव व आंबेपडदूरची बातमी आली की भोसले दरमजल खंदार परगणेयातून उदगिरीकडे गेले. दुसरे वर्तमान गंगातीर मनरथाकडे येणार हे वर्तमान आइकोन दौलताबाजेस कूच करून गेले. खंडेराव बारगे घाटाजवल जाऊन फजित पाऊन आम्हाजवल येऊन पावले. पत्रे गेली तेव्हा आले नाहीत. आवाई खाऊ लागले तेव्हा आले. हाली खजिना येके जागा जाला. कापड घेऊन खान महमदखान देशास बोरनार परगणेयात गेला आहे. त्यासहि पत्रे पाठविली आहेत. कलावे. श्रीमंतासहि पत्रे आजी येथून मुजरद जोडीबाा पाठविली आहेत. पावतील तेव्हा खरी. चौकडील बातमी राखोन आहो. खर्चास अजुरा वगैरे करावा म्हणोन लिहिले त्यास ऐवज खर्चास नाही. येक महिन्याची बेगमी करून आलो ते येथेच खर्च जाला. येक रोजमरा आमचा व शंभर रुपये पाठवावे हे विज्ञापना. राा रामचंद्र दामोधर याणी सविस्तर लिहिला आहे त्यावरून कलेल हे विज्ञापना.

¶*Balaji Shankar informs Nana Phadnis (?) about the movements of the armies of the Peshwa and the Bhonsle. He writes, the latest report says that the Bhonsle's forces have marched towards Udgir through the province of Khandar.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 236] [*26-2-1769*

पौ छ २२ सवाल तिसा सितैन

श्री

श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामींचे सेवेसी

विनंती सेवक आज्ञाधारक गणेश त्र्यंबक चरणावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १८ सवालपावेतो सेवकाचे व किले सोलापूरचे वर्तमान यथास्तित असे विशेष. राजश्री जानोजी भोसले पुण्याकडे येणार तरी तुम्ही आपले जागा हुशार राहून राा चिंतो अनंत किले मजकुरी आहेत त्याचा बंदोबस्त उतम प्रकारे करणे म्हणून छ १२ सवालचे आज्ञापत्र सादर जाले. चिंतो अनंत याचे रखवालीस हरजी चव्हाण वगैरे खिजमतगार आसामी तीन व खासबारदार आसामी दाहा लस्करातून आले आहेत व किलाचे लोक पंधरा आसामी नेहमी चौकीस ठेऊन बंदोबस्त केला आहे. अलंगनोबत चौकीपाहारे याने किला हुशार आहे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञात.

¶Ganesh Trimbak, the Commandant of fort Sholapur, who has been warned to be careful about Chinto Anant, a political prisoner, as Janoji Bhonsle is marching upon Poona, reports that he has been taking due precautions about the said Chinto Anant.

No. 237] [*27-2-1769*

पौ छ २३ सवाल तिसा सितैन

श्री

राजश्री भगवतराव पवार गोसावी

यासी

ℰ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो चितामण हरी आसिर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीये लिहित जाणे. विशेष :—इकडील वर्तमान आम्ही व बालाजी केशव दोनी फौजा येकत्र जाहाल्या. आपणास हुजूर जाण्याची निकड आहे. तेथेहि जरूर आहे. येविसी पुण्याहून पत्रे आली की, त्यास पाठवणे. त्याजवरून हे पत्र लिहिले आहे तरी तुम्ही पत्र पावतांच पुण्याचे रोखे निघोन जावे उचीत आहे. अत:पर राहू नये. राा छ १९ सवाल सुाा तिसा सितैन मया व अलफ. बहूत काय लिहिणे हे विनंती.

¶Chintaman Hari informs Bhagvantrao Powar of Nana's order to proceed back to Poona.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 238] *[27-2-1769*

श्री

शेवेसी श्रीनिवास नरसिंह साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १९ सवाल मुकाम पुरकडे पाा म्हसे नजीक पारोले पाच कोस येथे क्षेम असो विशेष. सांडणीस्वार याजबरोबर छ ११ सवालचे आज्ञापत्र छ १७ सवाली पावले. तेथे आज्ञा की बोदवडच्या मार्गे न जाणे. राजश्री रामचंद्र दामोदर जालनापुरास आहेत ते तुम्ही येकत्र होऊन तेथेच राहणे. येथून लेहून पाठऊ त्याप्रोा लस्करास जाणे अथवा श्रीमंतानी बोलाविल्यास जाणे म्हणून अज्ञा. त्यास पूर्वीच जालनापुराहून आमडापुरास जावे याचे अर्थे त्या रोखे जात असता वर्तमान ऐकिले की त्या घाटे आटोले वगैरे भोसलेयाकडील दंगा करीतात. त्याअर्थे या मार्गे येऊन राजश्री चिंतामण हरि सुभेदार व आम्ही येकत्र होऊन दरकूच करून बोदवडास गेलो. तो पूर्वीच घाटमाथाहून राजश्री बालाजी केशव याजकडे जासूद जोडी पाठविली होती. त्याचे उतर आले की आम्ही फौजसुधा वराड प्रांत सोडून बुनगे बऱ्हाणपुरी ठेऊन सडे होणार म्हणून सोला सोला कोसाच्या मजली करून आलो तर तुम्ही सामानसुधा किले पारोले येथे जाऊन ताबडतोब जाणे. त्यान्वये जलदी करून येथे अलो. उदईक पारोले येथे जातो. इतक्रियात सुतरस्वाराबरोबर अज्ञा की जालनापुरास जाणे. आज्ञेप्रोा वर्तणुक करावी तो अताच सुभेदार याजकडील बातनीस आम्ही जासूद ठेविले त्याजबरोबर बातनीपत्र आले तेच बजिनस स्वामीकडे पाठविले आहे. पुढे आज्ञा प्रतीक्षा करीतो. बातनीस पुढे जासूद पाठविले आहेत. सुबता अल्यास दौलताबाजेचे सुमारे जालनापुरास जाऊन पोहचतो. खानमहमद याजकडील सिलेदार याचे आठवडे दोन चढले आहेत. माारनिलेस तगादा करीतात. त्यास आम्हास मागतात. याची काये आज्ञा करावी. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Shriniwas Narasi asks which was the safest route by which he should proceed, to avoid the marauding bands of the Bhonsle.

No. 239] *[29-2-1769*

पैवस्ति छ १ जिलकाद तिसा फालगुन

हाा खंडोजी ठोबरे जथे खंडोजी गुलदगड

श्री

राजश्री बालाजी जनार्दन स्वामी गोसावी यास

विनंती उपरी. खासा स्वारी माहुराहून सडी होऊन भोसल्याचे सुमारें चालिलो ते छ १९ रोजीं बेदरानजीक दाखल जाहालो. भोसले पुढें वीसतीस कोस. त्याचे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पाठीमागें गोपाळराव याप्रमाणें चालिले आहेत. लष्करांत ऐवजाची अडचण फार. तुम्ही पुण्याहून ऐवज कापड पाठविले ते वराडात गेले. याजकरितां दोन लक्ष रुपये होन मोहरा बुनग्याचा मुक्काम पाथरीस करविला आहे तेथें लौकर पाठवून देणे. व आणखीहि ऐवजाची तर्तुद असो देणे म्हणोन पेशजी तुम्हास लिहिले आहे त्याजवरून ऐवजाची रवानगी केलीच असेल. नसेल तर लौकर रवाना कर्णे. तेथून लष्करांत आणविला जाईल. पहिला ऐवज तुम्ही पाठविला तोहि बुनग्यांत आणविला आहे. सोय पाहून लष्करांत आणऊ. तुम्ही लिहिल्याप्रमाणें रवाना करणे. रवाना छ १९ सवाल सुरसन तिसा सितैन मयावअलफ. बहुत काये लिहिणे हे विनंती.

¶*Nana Fadnis is asked by the Peshwa to remit money for the expenses of the Peshwa's army in the Berars.*

No. 240] *[1-3-1769*

पौ छ २९ सवाल तिसा-
सितैन

श्री

विनंती सेवेसी लक्ष्मण गोसो कृतानेक सां नमस्कार विनती. येथील कुशल ताा छ २१ माहे सैवाल मुा कसबे अंबाडपूर सेवकाचे वर्तमान येथास्तित असे विशेष. किले सोलापूर येथील लोक अलमखान लढाईत (ढालाईत?) व जासूद याजसंमागमे छ २० सवाली येथे येऊन ५० पनास लोक दाखल जाहाले. इकडील वर्तमान, नरहरपंताचा भाचा विठलपंत तीन हजार फौजेनसी घाटाखाले दाहा बारा कोसावरी आहे. घाटावरी स्वारी करावी हे मानस आहे. लोकाची वदंता फारसी आहे. बराणपुराकडून फौज, त्या फौजे पाठीमागे आलिया माघारी जाईल. इकडे रान सुन्फ़े पडिले. यास्तव लोक तजावजा आहेत. सेवेसी विदित होये. राजश्री खंडेराव बर्गे आंबाडावरी होते, म्हणून येथे वर्तमान आले होते. श्रीमंत माहूर प्रांती आले, म्हणून वदंता यैकतो. सेवेसी श्रृत होये. या मार्गे प्रस्तुत कोण्ही येत नाही. हे विज्ञाप्ति.

¶*Laxman Goso writes of the arrival of some force at Ambadpur from Sholapur. The Peshwa, he says, is at Mahur.*

2115

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 241] [*2-3-1769*

श्री

आसीर्वाद उपरी येथील क्षेम माघ वद्य ९ पावेतों येथास्थित असे विशेष. तुम्ही पत्र छ १६ सवालचें पाठविलें तें छ २० सवालीं पावलें. भोंसले धर्मपुरीकडे गेले. पुण्यांत आतां गडबड नाहीं. शिहिंगडास वाड्यांतील माणसें गेलीं होतीं तीं माघारीं पुण्यास आलीं. आपण त्रिंबकास गेली असाल तरि गंगपुरास यावें म्हणून लिहिलें त्यावरून चिरंजिव राजश्री नारायणराव आदींकरून सर्वांस आजच आणिलीं. निरंतर चहुंकडील बातमी उत्तम राखोन बातमीचें वर्तमान वरचेवरि पाठवित जाणें. बहुत काय लिहिणें हे आसीर्वाद.

¶*The letter gives the news about Poona being restored to its normal condition after the disorder due to the news of an attack by Bhonsle.*

No. 242] [*2-3-1769*

पौ छ २६ मोहरम माहे सवाल
माघ तिसा सितैन

श्री

श्रीमत राजश्री नाना स्वामी-
चे शेवेसी

विनंती शेवक धोंडो माहादेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २२ सवालपर्यंत स्वामीचे कृपावलोकनेकरून शेवकाचे वर्तमान येथास्थित असे. विशेष:—स्वामीचे आज्ञापत्र छ १२ रोजचे रवाना जाले. ते छ १६ रोजी किलियास सादर जाले. तेथे आज्ञा की, राजश्री खंडेराव वगैरे याजबरोबर श्रीमंताकडे खजाना रवाना केला आहे. त्यास मार्गाचा पुढे न निभे. यास्तव मारानिलेस सरकारची पत्रे पाठविली आहेत कीं, किले दौलताबादेस खजाना ठेऊन, तुंम्ही सडे फौजेने पुण्यास येणें व तुंम्ही त्याची बातमी राखून किलियास आणवणे म्हणून आज्ञा. त्यास आंम्ही आज्ञेप्रमाणे त्याचा शोध घेता, खजनांसुधा आजंठ्याच्या घाटाच्यासुमारे गेले होते. तिकडे करांडे वगैरे भोसल्याकडील फौजेची गडबड यैकिली. याजमुळे खजाना घेऊन जाहलानापूरच्या सुमारे गेले. आज्ञापत्र येताच तावडतोब जासुदाच्या जोड्या पत्रे देऊन पाठविल्या

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहेत. सांप्रत वर्तमान यैकिले की, पैठणाकडून गंगा उतरून नगराकडे गेले. त्यावरून तिकडेहि जासूद पाठविला आहेत तहकीक बातमी आलियावरी शेवेसी लेहून पाठवितो. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Dhondo Mahadeo to Nana Fadnis saying that he has sent men to find out the trace of Khanderao Darekar and that Darekar would be sent back to Poona and the money kept at Daulatabad according to his instructions.*

No. 243] [*4-3-1769*

पौ छ ९ जिल्काद तिसा
सितैन माा फाल्गुन

श्री

सेवेसी कृष्णाजी अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २४ शौवालपर्यंत मुाा काा म्हैसे स्वामीचे कृपादृष्टीकरून वर्तमान येथास्थित असे विशेष. या प्रांतीचे वर्तमान तरी पेशजी आपणास लिहिलेंच होतें. तदनंतर जानोजी भोंसले फौजसुधा धर्मपुरीवर गंगा उतरून आम्हापासून चौदा पंधरा कोशांवरून वालकोंड परगणियांतून गेले. परंतु त्याणी आमचे तालुकियास तिलशा उपद्रव दिल्हा नाहीं. मागाहून चंद्रपुरातून कूच करून श्रीमंत फौजसुधा निघाले. पुढें आवाडीस राजश्री रामचंद्र गणेश व राा गोपालराव व रास्ते वगैरा पंचवीस हजार सडी फौज रवाना केली ते माहुरावरून उमरखेड परगणियांतून म्हैशावरून गेले. त्याणी दोंही परगणियांचा वर्तुलाकार करीत गेले. गुरेढोरें नेली. गांव लुटले जालिले. मागाहून श्रीमंत माहुरावर आले; तेव्हा पुढें चिरंजीव व कारकून श्रीमंताकडे पाठविले. सविस्तर वर्तमान विदित केले. श्रीमंतानी आज्ञा केली जे प्रस्तुत आम्हीं मोहिमे(त) आहो. रसदेचा येवज उगऊन घेणे आणि आमचा गला मोकला करणे हे सर्व कालजी स्वामीसच आहे. कवड्याचे नेमणुकेची व बाकीचे येवजाची वरात न करावी. माहाली येवज पावणार नाही. पुढे आम्हास काये आज्ञा करणे ते केली पाहिजे. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Krishnaji Anant writes that the Peshwa's army under Ramchandra Ganesh, Raste, and others completely devastated his provinces and when a complaint was made to the Peshwa the latter excused himself on the ground that he had to look to the military operations.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 244 [7-3-1769

पो छ ९ जिलकाद तिसा

श्री.

शेवेसी माहादाजी बलाल सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ता॥ माव बहुल चतुर्दसी मुकाम रामपुरी रत्नेश्वरांची गंगा उतर तीर बुनग्यात सुखरूप असो विशेष. कृष्णापूर पा॥ उमरखेड येथून निघोन उतरकार्यास्तव नांदेडास गेलो. तेथे गंगातीरी सर्वविध उरकून कालच बुनग्यांत येऊन पोहचलों. थोरले लस्करचे वर्तमान येथें बितिम * * काल लाख रुपये लक्ष्मण कोनेर यासमागमेच सातसे राऊत देऊन रवानगी जाली. भोसले मेदकचे सुमारे गेले. गोपालराव व रामचंद्र गणेश त्याचे पाठीवर दाहा कोसाचे अंतरे आहेत. त्याचे मागे दाहाबारा कोसाचे अंतरे श्रीमंत आहेत. मोगल पाठीमागे लांब आहे. लोकांची गालण बहुत जाली आहे. माहागाई बहुत, मजली भारी, यामुले माणूस मात्र रडकुंडीस आले तो प्रकार लिहिता पुरवत नाही. बुनगे खुदाईखोर मनश्वी फिरतें. स्वमुलकांत येऊन पडिले. रिपु कोणी नाहीं. नाहीतरी बाकी नवती. पिराजी नाईक बुनग्याचे पाठीमागे तीन हजार फौजेनसी होते. परंतु ते परलीकडून श्रीमंताकडे जात आहेत. सिबंदीमुले त्यास धरणी पारणी होत आहेत. रडत कढत जातील. देवाजीपंतास सरकारची बोलावणी येकदोन आली होती. परंतु तो जात नाही. [१]मांदगी जाली म्हणतों. बुनग्यातच आहे. व * * चे वर्तमान तरी नरहर बलाल भोसलया * * दोन अडीच हजार फौजेनसी गावेलीखाले * * त्यांची व सरकारचे फोजेची लडाई जाली. त्यास, नरहरपंत मारले गेले. वरकड फौज पलाली. मागती फौज भोसल्याची करांडे जाचक मिलोन जमा जाहाले आहेत. वसूल अद्याप जाला दिसत नाही. जाले वर्तमान ते लिहिले असे. पुढे होईल ते लिहून पाठवीन. विदित होय हे विज्ञापना.

¶*Mahadaji Ballal first gives the relative positions of the Bhonsle's and the Peshwa's armies and then describes a skirmish between them near Gowele in which Narhar Ballal, a Commander of Bhonsle, was killed.*

---

१ थकवा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 245] [*7-3-1769*

पौ छ ३ जिलकाद
तिसा सितैन

श्री

श्रीमंत राजश्री नाना साहेब
स्वामी सेवेसी

सेवक कृष्णराव भगवंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना कृपापत्र छ २७ सवाली पाऊन परमोल्हास जाहला. राजश्री गोविंदराव गायकवाड यांजकडील राऊत राजश्री सदासिव राम लाळे याजपासी आहेत. त्यापैकी पंनास राऊत देविलें ते पत्र पाठऊन आणऊन बातमी भोसले यांचे लस्करची व श्रीमंताच्या लस्करची येथास्थित जाणोन वरचेवर लिहीत जाणे म्हणौन पत्रीं आज्ञा ते सिरसावंद्य. बातमीच्या कामास मुजरद लस्करास माणसें दाहाबारा गोसावी, फकीर, बैरागी, याचा वेश देऊन रवाना केली होती. त्यापैकीं नजीक उदगीर येथील मुाहून भोसले याचे लस्कर सोडूण येक माणूस आले. त्याणें जबानी वर्तमान सांगतों कीं पंचवीस हजार भोसले याजपासीं फौज असतां सडे जरारे[1] म्हणौन भाकर लस्करांत मिलत नाहीं. राणांत बोले हुरडा वगैरा त्याजवरच गुजराण. सांप्रत बोले बहूतसें मिळत नाही. घुगऱ्यासी गांठ. दुसरे घोडी फार थकली, यास्तव दररोज पांच सातसे उठोण जातात. व काही तळावर व वाट चालतां थकोन राहतात. लस्करांत वार्ता आमक्या सुमारे जावे यैसे नाहीं. जेथवर गांठ तुटेल तेथवर तोडावी. आंगासी आंग लागल्यावर झुंजोन मरावें. राजश्री गोपालराव, रामचद्र गणेश त्याचे मागें सडे. त्यांच्याहि लस्करांत पिठाचा दुकोल. दररोज कुचामुलें रोड दुबली घोडी माणसें राहतात. येका दों रोजाणा श्रीमंत व गोपाल(राव) येकत्र होणार यैसी वार्ता. गोपालराव याच्या लस्करांत भोसले यांच्या कुचा मुकामाचा माार ठीक लस्करास कलत नाही. आवाई पूर्वेची, तो जावें दक्षणेस, याप्रमाणें दररोज होते. म्हणौन माणसानी जबानी सांगितलें ते सेवेसी लिहिलें. राजश्री निंबालकर यांचे बुनगें बिडास व करमाले, परंडे, मिरजगांव, येथें कांही आलें. व काही वाट चालते. ते येका दों रोजांत येणार. सेडे रुकनदौला निंबालकरसहवर्तमान श्रीमंताचे मागें सात आठ कोसाचे तफवतीने चालत आहेत. देवाजीपंत भोसले यांजकडील मुतसदीं याचे घरोघर

---

१ सडा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

दर रोज येक दोन खेपा करूण म्हणतात की सर्वप्रकारे आपराधा क्षमा करूण कृपा करावी. येविशई श्रीमंतास आर्ज करावा. त्याजवरूण आर्जहि समर्थ सेवेत जाहला. परंतु जावसाल जाहला नाही. निकरच आहे. मुतसदी याचे मते पारपत्य यासमई फार जालें. बाकी राहिली नाहीं. आतां सलूक करावा. येश घ्यावें. यांतच उतम. यैसे कितकांचे मतें. म्हणौन वर्तमान निबालकराच्या लस्करातून आले. भेटले त्याणी जबानी सांगितलें. सत्यमिथ्या आईकिले ते सेवेसी श्रुत केलें. आज्ञेप्रमाणें सदासिव राम यासी पत्र पाठऊन राऊत दिल्हे तर आणवितों. बहुधा राउत तेथें त्याजपासीं नसतील. गायेकवाड याचे होते ते त्याचे त्याजकडे गेले म्हणौन वर्तमान आईकिल्यांत आलें कलावें. सारांश बातमीविशई लस्करास माणसे गेलीच आहेत. व नागतले, मोहरी वगैरे घाटाणी माणसे, कारकून, राऊत बसविले आहेत. इकडील बातमीविशई चिंता न करावी. सेवक स्वामीचा या स्थलीं, स्वामीकृपेणे शोधास आंतर करीत नाही. व या स्थलाचीहि बंदोबस्ती आसल्या पदार्थी बरीच करूण, दम हिमत कृपेचा राखोन, प्रसंग पडल्यास शत्रूचें पारपत्य येथानशक्तया करावयास सादर आसो. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना. रा छ २८ सवाल प्राथःकाल गुरुवार.

¶*Krishna Rao Bhagwant in his letter to Nana Fadnis describes the straits to which the fugitive army of the Bhonsle is reduced. The supply of food and fodder is running short and consequently men are deserting their ranks in large numbers. The forces in pursuit are in no better condition. Janoji is, as far as possible, avoiding a clash. Attempts of reconciliation are being made by influential persons on both sides.*

No. 246] [*7-3-1769*

पो छ ४ जिलकाद

तिसा फाल्गून

श्री

राजश्रियाविराजीत राजमान्ये

राजश्री मोरोपंतदादा स्वामीचे शेवेसी

पो पांडुरंग कृष्ण बेडेकर कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील कुशल ताा छ २७ सवाल मुाा मौजे रामपुरी पाा पाथरी गंगाउत्तर तीर नजीक मनरथ येथे आपले कृपेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तरी भोसले वरहाड प्रांती होत तिकडून चुकाडी देऊन देशाकडे आले. तेव्हां श्रीमंताच्या शेनात छ ३ सवाली तमाम लहान थोर लोक बोलू लागले कीं पुणियास भोसला

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

गेला त्याजवरून बहुतच गडबड होऊन देशी पत्रे लिहून राजश्री रामचंद्र गणेश व राजश्री गोपाळराव पंचवीस हजार फौज सडे स्वारी छ ४ सवाली प्रात:काळीं चां जवळून रवानगी केली. दरमजल वीस वीस कोसाच्या मजली करीत गंगातीरास आले तो श्रीमंत श्रीमाहुरचे मुकामीहून छ १४ सवाली सोमवारीं विसा कोसाचें कूच करून दरमजल भोसल्यापाठीमागें जात आहेत. श्रीमंताचे पत्र छ २२ सवालचे आले होते त्यांत लिहिले आहे कीं खाशाचा मुकाम बेदरचा होता. राजश्री गोपाळराव व रामचंद्र व गणेश पुढें आठ कोश व तेथून भोसले बसवाड्यावर आठ कोश, याप्रमाणे वर्तमान आहे. पुढें दरमजल भोसले जात आहेत. पाठीमागें श्रीमंत आहेत. आपले फौजेत दोन तीन सेर पीठ धारण आहे. बहुत मिळत नाहीं. दाणा वैरण बहुत आहे, परंतु ध्यावयास तटु स्वारीत थोडके निभले आहे. भोसल्याच्या तळावर घोडी उट राहत असतात. पाचसात हतीहि राहिले. यांचे उपयोगी नाहीत. थकले आहेत. याप्रमाणे यांचीहि घोडी थकली आहेत. थोर थोर ग्रहस्त घोड्यांच्या पाठी जातीनें पुसोन घोडी असुधी करि याप्रमाणें वर्तमान आहे. सडे स्वारीतील लिहिली येत असतात. आपणांस कळावें म्हणोन लिहिलें आहे. आम्ही पदरीचे आहों. सूज्ञांप्रती विशेष काय लिहिणे. लोभाची वृध्धि कीजे हे विज्ञापना.

¶*Pandurang Krishna Bedeker informs Moroba Dada how Bhonsle proceeded with his army for an attack on Poona and how he was h y pursued by the Peshwa and Gopalrao and Ramchandra Ganc*

No. 247] [*7-3-1769*

पौ छ ६ जिलकाद सन तिसा

श्री

वो सपन राजमान्य राजश्री
रामशास्त्रीबावा स्वामीचे सेवसी

विद्यार्थी रंगो कोनेर कृतानेक साष्टाग नमस्कार विनती. येथील कुशल ताा छ २७ सवाल मुाा मेदक प्राा भागानगर वांजरानदी येथे सुखरूप असो विशेष. आपणाकडे येथून तीन च्यार पत्रे पाठविली ती पावली न पावली हे न कले. उतर येकहि पत्राचे न आले त्यावरून सदेह पावल्या न पावल्याचा जाला. तर उतर पाठवावे की संतोष होईल. वरकड इकडील वर्तमान श्रीमंत नागपुराहून चाद्याजवल गेले तो भोसले झाडी लाजीची सोडून निर्मलेकडून देसी जावे हा निचये करून निघाले. हे वर्तमान आल्यानंतर राा गोपालराव व रामचंद्र गणेश व रास्ते वगैरे पथके

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पचवीस तीस हाजार फौज त्याचे पाठीवर पाठविली. त्यास तो पचमाहालातून देसास नीट चालला हे वर्तमान आले, तेव्हा खासा श्रीमंती चाद्याचा रूख सोडून दरमजल मोहोरपरियेत आले. तेथून बुणगे ठेऊन सडे घोडा राऊत थैसे होऊन पचवीस तीस कोस मजला करून भोसल्याचे पाठीवर आले. तो त्यान पल काहाडला. तोहि वीस पचवीस तीस कोस जात गेले त्यावरून गाठ पडली नाही. तो निघोन झाडीत गेला. गोपालराव रामचद्र गणेश पाठीवर गेले. श्रीमती मुकाम मेदकासच केला. त्यास भोसले सवासे कोस येथून झाडीत गेले असेत. गोपालराव येथून पनास कोसावर असेत. तहरहाचा मजकूर अद्याप काही नसे. आता येथून कूच होऊन निर्मल वालकोंडियाचे रोखे जावे आसे आहे. चाद्यासहि फौज जावी आसे आहे. नवाबाकडील रुकमतदवलाहि आले आसेत. आथपर तह झाला तर होईल अगर चंद्रपुरास मोर्चे लावावयास फौज जाईल जे घडल ते मागाहून लिहून पाठऊ. भोसला देसी येतो ये आवाईने पुणे दोन दिवस गलबलले आसले, तेव्हा आपणाकडील वर्तमान कसे जाल हे सर्व लिहिणे. तूर्त देसचे राजीक तुटले आसे. इकडे आला आसे. कलावे सरकारची फौज नवाबाकडील देखील पाऊण लक्ष असे. भोसला बारा पधरा हाजार आसे कलावे. झाडीत पलत फिरत असे कलावे. श्रीमंताचा प्रताप थोर आसे लवकरच तहरहा जो होणे तो होईल. लोभ कीजे हे विज्ञापना. येथून आज कूच होऊन गेलो हे विज्ञापना.

¶*Rango Konher to Ramshastri giving details of the pursuit of the Bhonsles by the Peshwa and Gopalrao and Ramchandra Ganesh. He gives the actual strength of the Bhonsle's army and the Peshwa's army assisted by the Nizam. The writer also refers to a probable attack on Poona by Bhonsle and the consequent disturbance in the town.*

No. 248] *[9-3-1769*

पौ छ ८ जिलकाद तिसा
फालगुन बाा बच्याजी
जासूद दिाा खंडोजी
संताजी

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री नाना स्वामींचे सेवेसी पोा विश्वासराव त्रिंबक सांा नमस्कार विनंती. उपरी, कुशल येथील ताा फालगुन शुध प्रतिपदा गुरुवार जाणून स्वकीये कुशल लिहित असिले पाहिजे विशेष. आम्ही बुनगे घेऊन पोहनेरानजीक गंगातीरास आलो. परेलीचे आसपास मुकाम करून राहावे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

असा विचार केला. त्यास, श्रीमंतांचे पत्र मेदकच्या मुकामीहून आले की, भोसले चेनूरजवल गंगा उतरून आपल्या मुलकात जातात. त्यास, बुनगे घेऊन निर्मलच्या सुमारे येणे. त्याजवरून आम्ही जावे, त्यास खंडेराव बरगे याजबरावर ऐवज आपण रवाना केला. ते दौलतावादेस किंवा नगरास असतील. त्यास लौकर यावयाविसी येथून पत्रे पाठविली आहेत. ते येत तोपावेतो परेलीनजीक मुकाम करून राहातो. माारनिले आले म्हणजे कूच करून दरमजल निर्मलच्या रोखे जातो व दुसरा ऐवज रवाना करावयाकरिता आपणास लिहिले आहे त्याजवरून ऐवज आपण रवाना करितीलच. त्याजबरावर सेपनास राऊत व गाडदी देऊन रवानगी कराल त्याणी निभाव होत नाही. त्यास, राजश्री नारो शंकर आपले पुत्राची मुंज करावयास पैठणास गेले आहेत, त्याजकडे ऐवज पाठवावा. ते समागमे घेऊन येतील. फालगुन पौर्णिमेपावेतो त्यांचे राहाणे पैठणास होईलच येविसी त्यासहि आम्ही लेहून पाठविले असे की, पुण्याचा ऐवज येईल तो समागमे घेऊन येणं. याजकारितां आपण ऐवज सत्वर त्याजकडे पैठणास पाठवावा. माानिले-खेरीज दुसरी सोबत यैवजास ठीक पडणार नाही. लस्कर लांबत चालले यास्तव माारनिलेची गांठ घालून यैवज सत्वर लश्करास येऊन पोहचे तो अर्थ जरूर करावा. बहुत काये लिहिणे? लोभ कीजे, हे विनंती.

¶*Letter from Vishvasrao Trimbak to Nana, saying that the writer would encamp near Parli to escort Khandoji Barge, with the treasure, to the main army at Nirmal. Janoji Bhonsle has left behind Chennur and fallen back on his own territory with the Peshwa's army close on his track.*

[9-3-1769

No. 249]

पौ २ जिल्काद फाल्गुन तिसा
हस्ते बाळोजी पाठक
जथे आबाजी नाईक

श्री

सेवेसी बाबूराव केशव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. तागायत छ २२ सवाल मुकाम नजिक शंकरामा पेठ मेदक आठकोस वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तरी दरमजल लांब लांब मजलीनी येथपर्यंत आलों. आज तीन दिवस हलक्या मजली बारबारा कोसाच्या होतात. भोसले लांब चाळीस कोसाचे अंतर पाडून गेले. राजश्री गोपालराव रामचंद्र गणेश त्याचे मागें विसा कोसाचे अंतरानें आहेत. भाळकीचे मुकामी भोसलेयाचा मुकाम

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जाहाला. त्या दिवशीं गोपालराव मागाहून आले. दोन कोसाचे तफावतीनें नजरानजर जाली तेव्हां भोसले तयार होऊन फौजेनसी माघारी तोंडे गोपालरावाकडे तोडं करून उभे राहिले. गोपालराव जेथें होते तेथेच जमोन राहिले भोसल्याकडे पुढें चालोन आले नाहीं. त्याणी प्रहर सा घटिका वाट पाहून निघोन गेले. आपले फौजेनें गाठ घातली नाहीं असें लोक म्हणतात. दुसरी गोष्ट गाठ घातली नाहीं हें उत्तमच केलें. गाठ पडल्यास भोसले याचें न आईकते असाच पर्याव होता. खासा स्वारी आठ दिवस दरमजल आली घोड्यास दाणा वैरण मिळाली परंतु घोड्याची शख्त राहिली नाहीं. तमाम लोक घोडीं हातीं धरून चालतात याहून अधिक गोपालरायाची अवस्ता खराबीची आहे. भोसले भागानगराकडून आपले मुलकांत चाद्याकडे जाणार तशी मसलत दिसत्ये. रुकनतदौले सडे होऊन मोठ्या मजली करून बेदरास आले. त्याची दोन च्यार रोजा गाठ पडेल. पेसजीं भवानीपंत भोसल्याकडे पाठविले होते त्याची गाठ पडली नाही. निर्मलास राहिले होते ते कालच आले. हलीं दुसरा येक कारकून राजारामपंत म्हणून भोसल्याकडून आला आहे. परंतु कांहीं जीव दिसत नाहीं. देवाजीपंत बुनगियांत आहेत. त्यास यावयाविसीं पत्र गेलें आहे. सडी स्वारी जालियापासून महर्गता लस्करांत बहुत जाली. सरकारांत पैक्याची तूर्त वोढ फार जाली आहे. येक आठवडा मात्र दिल्हा. येका महिन्यांत दीडमाही वगैरे ऐवजास तों ठिकाण नाहीं. नालबंदी च्यार रुपये घोड्यास पडते, खाो नालमेख हजामतीस अर्ध रुपया पडतो, याप्रमाणें वर्तमान जालें आहे. लोक बहुतच हैराण जाहले आहेत. याउपरी होईल वर्तमान तें लिहून पाठऊं. हुजरातीस राज्यांतील घोडे जमा जाले आहे याहून मोठे कोठें राहिले नाहीं. वर्षास कर्नाटक प्रांती दाणा वैरणीची तसई पडते परंतु मोठ्या घोड्या. (अपूर्ण)

¶*Baburao Keshao gives the positions of the armies of Bhonsle and Gopalrao and Ramchandra Ganesh. The two latter, he says, pursued the Bhonsle with their forces; Bhonsle turned towards them and offered a fight. Gopalrao however remained where he was and did not join battle.*

No. 250] [*9-3-1769*

पौ छ ८ जिलकाद तिसा-
सीतैन. हा बच्याजी जासूद-
हा खंडोजी संताजी

श्री

सेवेसी विज्ञापना ताा छ २९ सवाल मुाा नजीक पोहनेर गंगातीर वर्तमान येथास्थित असे विशेष. छ २४ रमजानपासून स्वामीकडील पत्र येऊन सांभाल

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

होत नाही याजकरितां चित उद्विग्न आहे. सदैव पत्री सांभाल व्हावयासी आज्ञा जाहाली पाहिजे विशेष. श्रीमंताकडील पत्रे छ २३ सवालची आली, त्यांत मजकुर कीं भोसले चेमुराजवल गंगा उतरोन चंद्रगडाकडे आपल्या मुलकात गेले. गोपालराव पाठीमागे वीस कोसाच्या अंतरे आहेत. खासा स्वारीस व त्यास सतरी कोसाची तफावत आहे. मोंगल पाठीमागें आहे याजकरिता मेदकाहून निर्मलच्या रोखे येऊन मोगलास सामील करणार. तेथे दोन च्यार मुकाम होतील. बुलगे निर्मलच्या सुमारे घेऊन येणे म्हणोन लिा आहे. उदईक येथून कूच करून निर्मलाकडे जात आहो. भोसल्याचा पिछा खासा स्वारीचा सुटलसा दिसतो. सिंदे होलकर याजकडे सांडणीस्वार रवाना केले आहेत. बहुधा त्याजला गढ्यामंडलाच्या सुमारे बोलाविलासे वाटते. देवाजीपंत बुलग्यात आहेत. त्याजला जलद पाठऊन देणे म्हणोन पत्रे आली. त्याजवरून त्याची रवानगी पुढे केली. आपाजी गोविंद बिर्नीवाल्याकडील सडे फौजे बाा बिनीच्या कामास होते. त्यास लस्करचे लुगाऱ्यानी नवाबाकडील गाव जालिले; ताकीद सुधी न जाली; यास्तव त्याजवर इतराजी होऊन पंचवीस स्वार देऊन लस्कर पार करून बेदरास पोहचाऊन दिल्हे. बिनीचे काम तूर्त जयरामपंत गोविंद सिवरायाकडील याजला सांगितले म्हणोन सडे स्वारीतून पत्रे आली, त्याजवरून स्वामीस लिहिले आहे. नारो शंकर बुलग्यात होते, ते पुत्राचा वृतबंध करावया-करिता पैठणास गेले आहेत. वृतबंध करून मग सडे फौजेस मिलतील. यंदाचा मनसबा प्रथम दिवसांपासून नासतच गेला तो सेवटी फारच नासला. पुढे छावणी जाहाल्याने खर्चाखाली येतील; परंतु भोसल्याचे पारिपत्य चांगले होऊन दबाव पडेल. पिराजी नाईक निंबालकर बुलग्याबाा होते. लोकानी अडविले म्हणोन मागे राहात गेले. ते वसमतेकडे लूट लबाड करीत आहेत. भोसल्या-कडे जाणार म्हणोन बाजारी अफवा आहे. भोसल्याकडील कारकून पत्रे घेऊन सडे स्वारीत आला होता. त्याच्या पत्रात काही जीव दिसण्यात न आला व बोलण्यातहि धातूघोषणच दिसो लागले. लबाड कारभार जाणोन त्याजला चौकीत दिले म्हणोन लस्करातून आबा पेठे याजला येका ग्रहस्ताने लिहिले होते, त्याजवरून स्वामीस लिहिले आहे. विदित जाले पाहिजे हे विज्ञापना.

¶*This news-letter gives the movements of the various divisions of the two armies. Among other details, the letter says that Janoji is being pursued by Gopalrao, that Dewajipant has been sent back to the Bhonsle, that Naro Shanker has gone to Paithan for his son's thread ceremony. The date of the letter is prior to the final rout of the Bhonsles.*

2125

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 251] [10-3-1769 ?

पो छ ९ जिलकाद

तिसा सितैन

श्री

शेवेसी कृष्णाजी अनंत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता। छ १ जिलकादपर्यंत स्वामीचे कृपेकरून वर्तमान येथास्थित असे. विशेष:— हिकडील वर्तमान तरी, श्रीमंत चंद्रपुरास गेल्यानंतर, राजश्री जानोजी भोसले धर्मपुरीवर गगा उतरून, वालकोंड परगणियांतून आम्हापासून चौदा पंधरा कोसावरून फौजेसुधा गेले. परंतु आमचे निसबतीचे माहालांस भोंसल्याचा काही उपसर्ग जाहाला नाहीं. मागाहून त्यांचे पिछावर आपल्या फौजा चंद्रपूर सोडून खासा स्वारीं व सड्या फौजा माहुरावरून उमरखेड परगणियांतून म्हैस परगणियांतून भोंकरावरून नांदेडे लसमतचे मार्गें गेल्या. त्यांचे मागें तोफखाना व मोगलाची फौज व बुनगें गेले. पंधरा दिवसपर्यंत फौजांची रहदारी पो। उमरखेड व म्हैसे व भोंकर व कौ बारड याजवरून पडली. तन्मुळें तिनी माहालची व कसबे बारडची बहूत खराबी जाहाली. तिनी परगणियाचे गांव झाडून लुटिले. चीचबस्त व गुरेढोरे नेली. कितेक गाव जाळिले. उमरखेड म्हसे मिलोन सात आठ हजार ढोरे व तीन च्यार हजार बैल गेला. तिनी माहाल फार करून बेचिराख जाहाले. फौज अनिवार; काडीमात्र ताकीद नाहीं. श्रीमतांची खासा स्वारी माहुरावर आली. ते समई पुढे कारकून पाठविले व चिरंजीवहि माहूरचे मुकामी गेले श्रीमंतांस विनंती केली जे, राजश्री रामचंद्र गणेश व गोपालराव वगैरा सड्या फौजा पुढे गेल्या, त्याणी माहालांची फार खराबी जाहाली. याउपरी तरी दुसरेयाचे तालुकियांतून फौज काडिल्यास माहलच खराबी होणार नाहीं. त्यावरून आज्ञा जाहाली जे, सांप्रत आंम्ही मोईमसीर; या समयांत ताकीद करितां येत नाहीं; व होत नाहीं. दोनी मिलोन चहू लक्षांचे परगणे तुमचे गेले तरी पुढें मुजरा देऊं. याप्रमाणे समक्ष आज्ञा जाहाली. तेव्हां बंदोबस्ताचा विचार कलतच आहे. दोनी माहालांतील दाहा पंधरा ठाणी आहेत. तेवढीमात्र आजपर्यंत संरक्षण केली आहेत. राऊत व प्यादे मिलोन दोन अडीच हजार जमाव आम्हांजवल आहे. माहाली तो सिवंदीची काही जागा राहिली नाही. दोनी परगणे मिलोन दाहा दाहा वीस वीस हजार रुामात्र वसूल जाहाले. पुढें हा प्रकार जाहाला. रसदेचे येवजास ठिकाण नाही. पूर्वी पेचामध्ये आलो. तो पेंच स्वामींनी कृपा करून उलकडीत आणिला, तों हालीं दैवयोगास्तव हा योग प्राप्त जाहाला. याचाहि परिहार करणे स्वामींसच संकट. श्रीमंतानी उतरे करून

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मात्र आमची समाधानी केली. परंतु येथे मोठे संकट प्राप्त आहे. ठाणी सोडता नये. सिबंदी भारी पाहिजे. माहाली जागा नाही. दोही फौजाचे दहशतीनें सारा प्रांत वैराण. साप्रत भोसले भागानगरानजीक संक्राईचे तालुकियांत आहेत. पाठीवर श्रीमंत दों मंजलीचे अंतऱ्याने आहेत. याप्राा वर्तमान आहे. पुन्हा या प्रांते येतील किंवा कोणीकडे जातील कलत नाही. होईल वर्तमान ते वरचेवर लिहीत जाऊ. आम्हास काय आज्ञा ते लिहून पाठवावी. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Krishnaji Anant complains that the three districts under him—Mahur, Umerkhed and Mhase—have suffered heavily from the movements of the Peshwa's armies. When he sought redress from the Peshwa he was put off with the excuse that this was bound to happen as times were abnormal.*

No. 252] [*11-3-1769 ?*

श्रीशंकरप्रसन्न

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
नाना स्वामीचे सेवेसी

पो लक्ष्मणराव भिकाजी सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ[1] २ जिलकादपर्यंत मुाा वाई येथे यथास्थित जाणून स्वकीये लेखन करीत असिले पाहिजे. विशेष:—आपण पत्र पाा ते पावले. छ ४ सवालची पत्रे सरकारची नजीक देवगड चांद्याचे मुकामीहून आली कीं, भोसले फौजसुधा उमरखेडाकडे गेले. पुणियाकडे येणार. त्यावरून पलावयाची गडबड जाली होती. त्यावरी छ १९ तारखेस प्रात:कालीं दुसरी पत्रे नजीक माहूरचे मुकामीहून आली की, भोसले देशी येत नाहीत. धर्मपुरीपलीकडे निघोन गेले. त्यावरून लोक गडबले होते; ते स्वस्थ जाहाले. येथून श्रीमंत आदीकरून सिंहगडास जात होते तेहि माघारे आले. भोसले याचे पाठीवर राजश्री रामचद्र गणेश, गोपालराव वगैरे सरदार आहेत व खासा श्रीमंत फौजसुधा माहुरानजीक होते. याप्रमाणे सांप्रत लस्करचे वर्तमान आहे; म्हणून लिाा ते कलले. काही कार्य तुम्हाकडे आहे. ते मागाहून लेहून पाठऊ; म्हणून लिाा. ऐसियास कार्ये कार्य असे व ते लेहून पाठवावे. व लस्करचे वर्तमान सरकारचे बातमीचे आले असल्यास ल्याहावे. सदैव पत्रीं संतोषवीत असावे. बहूत काये लिहिणे? कृपालोभ करीत जावा हे विनंती.

¶*Laxman Bhikaji thanks Nana Fadnis for keeping him informed about the movements of the armies of the Peshwa and the Bhonsle who was reported to be heading towards Poona but who later on gave up the idea. He solicits the addressee to entrust him with the work referred to in the letter.*

---

(१) १२-२-१७६९.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 253] [*13-3-1769*

पौ छ १८ जिलकाद तिसा
हा जासुद जथे केसाजीराव

श्री

सेवेसी हरी बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ४ जिलकाद मुाा कनकापूर पाा मुधोल गंगा उतरतीर स्वामींचे कृपावलोकनेकरून वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान काल श्रीमंताची स्वारी येथे आली. येथे कांही मुकाम होतील. तोफखाना बुनगे मागाहून आणविलें आहे. आठ चार रोजांत येईल. येथून निर्मल दाहा कोस आहे. देवाजीपंत बुनग्यांत आहेत, ते आले म्हणजे कांही बोलणे लागेल. भोसले झाडीत चिंनुरचे सुमारे मुकाम करून आहेत. गोपालराव ब्रम्हपुरीवर गंगातीरी मुकाम करून आहेत. त्यास भोसल्यांस तीस कोसाचे अंतर आहे. हे वर्तमान येक दोन वेल सेवेसी लिहिलेंच आहे. अधिकोत्तर आढलेल ते लिहून पाठऊ. पैक्याचा तोटा फार. पुण्याचा खजिना आल्याविना आमदानी होत नाही. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Hari Ballal Phadke writes to Nana—" The Peshwa is encamped at Kanakapur waiting the arrival of his artillery and baggage. The Bhonsle has sought the refuge of the forest of Chinnur. Very likely negotiations will be opened on the arrival of Dewajipant (Bhonsle's Diwan). " At the end a request is made for funds to prosecute the war with vigour.

No. 254] [*10-3-1769*

पौ छ १९ जिल्काद तिसा सितैन

श्री

शेवेसी श्रीनिवास नरसी साष्टांग नमस्कार विज्ञापना ऐसीजे. येथील क्षेम तागाईत छ ७ माहे जिलकाद मुकाम जलगाव प्राा पाटोदे येथ स्वामीचे कृपावलोकनेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. सांडणीस्वार याजबरोबर विनंतीपत्र सविस्तर लेहून सेवेसी पाठविली होती ती पावलीच असतील. दुसर पारोलेयाच्या मुकामी छ १६ सवालचे आज्ञापत्र पुणीहून आल ते छ २ जिल्कादी पावले. त्यात आज्ञा जे दौलताबाजेस येऊन राहाणे. त्यास आज्ञाप्रमाणे मजल दरमजल मुकाम मजकुरास अलो. येकदो रोजानी दौलताबाजेस येऊन पोहचतो. याजवर आज्ञा येईल त्याजप्रमाणे वर्तणुक करू. भाई सेख खानमहमद याचे निसबतीचे लोक याचे अठवडे च्यार भरत अले. त्यास मारानिलेस लोकानी खर्चाविषई निकड केली. याजमुले येंक आठवडा रुपये येकसे शाऐंसी दिल्हा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मागीलहि रोजमरे मागतात व खासबारदार याचे रोजमरा निमे दिल्हा होता त्याचेहि बेगमी करावी व गडकरी याचे रोजमऱ्याची व आडसेरी माघ अखेरपर्यंत बेगमी केली होती तेहि खर्चास मागतात. जामदार व जासूद व साखान हेहि खर्चास मागतात. येविषई बेगमी करून राजश्री धोंडोपंत याजवर वरात करून बेगमी केली पाहिजे. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Shriniwas Narasi asks for supplies and funds.

No. 255] *[17-3-1769*

पौछ १८ जिल्काद सुा तिसा सितैन

श्रीगजानन

सेवेसी श्रीनिवास नरसी साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील कुशल क्षेम ताा छ १९ माहे जिल्काद मुकाम नजीक दौलताबाज येथे स्वामीचे कृपावलोकनेकरून येथास्थित असे विशेष. छ ११ जिल्कादचे आज्ञापत्र छ १३ जिल्कादी साहा घटिका रात्रौ सादर जाहाले, तेथे आज्ञा की राजश्री नारो शंकर राजेबाहादर पैठणास आहेत. त्याजवल दाखल होणे आणि त्याजबरोबर लस्करात कापड घेऊन श्रीमंताकडे जावे. तुम्हास याणी संभाळून लस्करास घेऊन जावे येविसी पैठणास याजकडे पत्रे लेहून पाठविले आहे तरी तुम्ही व सुमेरसिंग मिलोन लवकर पैठणास जाणे म्हणोन आज्ञा. त्याप्रमाणे आज कूच करून जातो. दुसरे बैलास नाळी पडले आहे. जागोजागा मयेत जाहाली याजप्रमाणे बैलाचा गलाटा आहे. उंटे पाठऊन दिल्यास निभाव होईल. खर्चाची बेगमी करून दिल्ही होती तो ऐवज खर्च जाहाला व रोजमरे सिलेदार आठवडकरी याचे च्यार अठवडे भरले आहेत. शागीर्द पेशाचे लोक वगैरे रोजमरा द्यावा लागतो. खर्चास मागतात. याप्रमाणे ऐवजाची वरात करावयाची आज्ञा केली पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Shriniwas Narasi writes that according to instructions he would join Naro Shankar with the supply of cloth at Paithan and reach the main army with the latter.

No. 256] *[19-3-1769*

पो छ १८ जिलकाद

तिसा. हा सांडणीस्वार

श्री

सेवेसी हरी बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १० जिलकाद मुा कनकापुर पाा मुधोल गंगातीर वर्तमान यथास्थित असे विशेष.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

स्वामीनी छ २१ सवालचें पत्र अजुरदार कासिद पाा होते त्याजबाा पाा छ ९ जिलकादी पावले. लिहिले वर्तमान सविस्तर कललें. पुणे गडबडले व स्वस्थ जाले; येविसीचे वर्तमान लिहिले व दोन रवानग्या श्रीमंतास कागद लिहिले ते पावलें. त्याची उतरें आपणांकडे गेलीच आहेत. आपण लिहिले कीं आपले तर्फेने सरकारकामांस चुकत नाहीं; मग कोण काय श्रीमंतास समजावित असतील ते असो; परंतु निष्ठेनें वर्तती त्याचा परिणाम चांगलाच होईल. येक पागेचे अधिकारी येथे आहेत; तेहि काय बातनी लिहित असतील कलत नाहीं. दुसरें श्रीमंत दादासाहेब बाहेर निघाले असे कोणी तेथे सांगितलें त्याजवरून श्रीमंताचे चितात संशय काय आला असेल त्याचे उतरहि न आले. पत्रे पावलीं की नाहीं म्हणोन पत्रीं आज्ञा केली; त्यास आपले तर्तुदिस व मेहेनतीस दुसरियानें दोष ठेवावा असे नाहीं. श्रीमंताची खातरजमा आहे. पागेचे अधिकारी काय लिहित असतील ते कुपिर्थातें[1] काहीं कलावयाचे नाहीं, परंतु त्याणी काय लिहिणें आहे? दादासाहेब बाहेर निघाल्याविसीं येक वेल ऐकिलें म्हणोन श्रीमंतानी आपणांस लिहिल होते. त्याचीं उतरे आपण चार पांच श्रीमंतास पाठविली त्याचे जाब येथून गेलेच आहेत, त्याविसी काही संशय तिलमात्र नाही. सेवटी येक पत्र आले होते दादासाहेबांचे मजकुराचे; त्याचे उतर श्रीमंतानी आपले हाते लिहून दिले होते. चार रोज जाले जासुदाबाा रवाना केले तेहि पावलेच असेल. पत्रें येतात त्याचे जाब वरचेवर लिहितो. मधी काही गलाटले असतील, आता पावत असतील. श्रीमंताची मर्जी चांगली आहे. मजजवल कधीमधी गोष्टी काढीत असतात. कांही मर्जीत संदेह नाही. विदित जाले पाहिजे; हे विज्ञापना.

¶*Hari Ballal Phadke who is with the Peshwa at Kanakapur assures Nana of the full confidence of his master. He refers to the rumour of Dada's escape.*

No. 257] [पौ. *17-3-1769*

पौ छ १८ जिलकाद
तिसा. हाा सांडणी-
स्वार

श्री

सेवेसी विज्ञापना. इकडील वर्तमान तर देवाजीपंत लस्करांत आलें. चार रोज जालें, आपले तर्फेने बोलतच आहेत. सारांश त्यांचे बोलणे कीं आतां

---

१ अंतस्थ.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
काहीं जीव राहिला नाहीं. मुलुक गारत जाला, लुटला, जालला, गुरेढोरे गेली. याचे उस्तवारीस पांच वर्षे पाहिजेत. फौजेची तलब चढली. आतां कृपा करावी. सर्व अपराध क्षमा करावे. सरकारची जागीर दिल्ही आहे, ती देवितों आणि त्यास पोटासी धरून कृपा करावी. चाकरी सांगाल ती करू, हेच भाषण आहे. त्यास इतक्याहि गोष्टी खऱ्याच आहेत. दोन चार लक्ष अलिकडे पलिकडे होऊन ठराव होईलसा दिसतो. याप्रो ठरले तर देवाजीपंत तिकडे जातील. हे वर्तमान सिधांतात नाही परंतु घडेलसे दिसते. अद्यापि कचे आहे, परंतु स्वामीस कलावे म्हणोन लिहिले असे. पुढे होईल ते लिहून पाठविन. या मसलतीत किती हिसके पडले आहेत ते लिहिता येत नाही. श्रीकृपेने स्वामीचे पाय द्रिष्टीस पडतील ते वेलेस विदित करीन. पोशाक दोन आपण पा। ते मर्जीस आले नाहीत. आपले घरी मेजमानी जाली ते समई बकुलिच्या फुलासारिखी बुटी पागोटे केले होते. फार दिवस ते तिवट बांधीत होते; त्याप्रो करावी म्हणोन आज्ञा जाली आहे. येविसीं श्रीमंतानी लिहिले आहे, त्याप्रो करवावी. वरकड मेवेजात कांही येईसी असली तर पाठवावी. बुनगे आजच आलें. गोपालराव रामचंद्रपंत सर्व फौज येकत्र जाली. या तलावर हुताशनी होईल; मग विचार होईल तो लिहून पाठऊ. वरकड नवल विशेष लिहिजेसे नाहीं. हे विज्ञापना.

¶*News letter informing Nana of a treaty being negotiated between the Peshwa and Bhonsle who is reported completely humbled.*

No. 258] *[21-3-1769*

पो छ २३ जिल्काद तिसा

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक लक्ष्मण कृष्ण दिा माा मीरखां टोके कृतानेक सिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १२ माहे जिल्कादपावेतो स्वामीचे कृपावलोकने-करून पाा डागरी येथे सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. साहेबाचे आज्ञापत्र सादर जाले. तेथे आज्ञा की भोसले याजकडील चाकर लोक पाा मजकूरी असतील त्याची घरे दारे कबिले मुले मानसे वंतने जप्त करून ठेवणे

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

म्हणोन त्यास आज्ञेप्रमाणे पाा मजकूरी शोध करून मारनिलेकडील चाकर लोक कोणी आसलिया त्याचे घरदार कबिलें वतन जप्त करुन ठेवितो. स्वामी-सेवेसी अतर होणार नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Laxman Krishna to the Peshwa informing him that the property of the servants of Bhonsles at Dagari has been confiscated according to the orders of the Peshwa.*

No. 259] *[23-3-1769*

पौ छ १ जिल्हेज
तिसा चैत्र

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचें सेवेसी

पो बालाजी केशव सफरे कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील वर्तमान ताा फाल्गुन वद्य द्वितीया गुरूवार मुकाम कसबे मलकापूर प्रांत वराड येथे स्वामीचे कृपे करून यथास्थित असे विशेष. कासिदाबरोबर छ २ जिलकादचे पत्र रवाना जाले ते आजच दोनप्रहरी पावले. तुमची व नरहर बलाल भोंसले याजकडील (लढाई होऊन) ते कामास आलें. त्याचा मोड जाहला. लोक पलाले ऐस असता नरहरपंताचे भाचे याणी मागती तीन च्यार हजार फौज जमा करून अंबडापूर परगणियानजिक दाहा कोसांवर येऊन दंगा करितात. आंबडापुरहि मारणार. रयत तजावजा होऊन पळू लागली म्हणोन तेथील कमाविसदारानी लिहिले. ऐश्यास तुम्हांसी त्यासी युध्य होऊन त्यांचे चांगले पारपत्य जाले. सरकारची पथके सेर जाली असता फिरून मारनिलेच्या भाच्यानी जमाव करून दंगा करीत आले. तुम्हीं कोठे आहां ? त्यांचा प्रवेश कसा होऊ दिल्हा ? अपूर्व आहे. तर भोसल्याचे फौजेस जरब देऊन सरकारचे माहालास उपद्रव न लागे ते करावे. वरचेवर वर्तमान लिहून पाठवित जावे. चांगले पारपत्य करावे. श्रीमंताची पत्रे छ २० सवालची बेदरचे मुकामाची आली. भोंसले पुढे तीस पस्तीस कोसी आहेत. लौकरच गांठ पडेल. तुम्हीं तिकडील बंदोबस्त उतम प्रकारे करावा. वरचेवर वर्तमान सविस्तर लिहित जावे म्हणोन स्वामीचे पत्र आलें. यैश्यास विठल बलाल, नरहरपंताचे भाचे सध्या तीन हजार फौजेनसी आंकोलियाचे दक्षणेस पांचा कोसांवर आहेत. आम्हीं फौजसुधा मलकापुरावर आहों. हे ठाणे मातबर; खानदेशची सरद व

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

वऱ्हाडचा शेंवट याजकरिता हे ठाणे व परगणा बाळाजी केशव पळनिटकर यांजकडे यवनाकडून जागीर; परंतु ठाणे बळकट. पंतमारनिलेपासी ऐवज तीनशे राऊत, तेव्हां ठाणे त्यांस हस्तगत होणे कठतच आहे. आम्ही बऱ्हाणपुराहून सडे होऊन येथे आलो. नाना प्रकारचे युक्ति करून लडाई न पडता ठाणे हस्तगत करून मारनिलेस दिल्हें. आम्हांसहि कालकला आसरा चांगला जाला. आम्हीं फौजसुधां वराडांत मध्यभागी जावे तर विठल बलाल खानदेशात सिरतो. पेशजी बऱ्हाणपुरास गेलो होतो तेव्हां मलकापुर परगणियात आला होता. आम्हीं मलकापुरावर येताच मागती वऱ्हाडांत गेला. झुंजावयास उभा राहात नाही. आम्हीं येकीकडे गेलो तर आपण मोहला चुकाऊन येकिकडे जातो. ऐसी रीत वराडियांची पुरातन आहे. आम्हीं सर्व मंडली तीन हजार कुल गणती आहों. आणिक पांच हजार फौज आम्हापासी असती तर त्यांचा राऊत वऱ्हाडांत न राहाता पलून अन्य देशात जाता. फौजहि आणिक श्रीमंत पाठविते परंतु खासा स्वारीचा शह लांब गेला तेव्हां फौज आम्हांकडे येणे न घडे. श्रीमंताची पत्रे आम्हांस तीन येकेच तेरखेची येक सांडणीस्वारांबरोबर व दोन कासिदाबरोबर, याप्रमाणें तीन पत्रे आली. सरकारचा व रूकमतदौले यांचा मुकाम वानवलियावर होता, तें मुकामाची पत्रे आली. तडका खासा स्वारीं चांदेयास आली. जानोजी भोसले चांदेयास आले. तेथून त्यांजबरोबरील गलली फौज सारी तीन हजारपावेतो होती त्यास निरोप दिल्हा. पागा राहिली. आली ती मात्र जागाजागा झाडीतून राहिली आहे. खासा जानोजीबावा चांद्याहून गाविलगडास आले ऐसे वर्तमान; फार जणाची बातमीची पत्रे लिहिली आली. सत्यमिथ्य शोध आणविला आहे. वराडांत लोक गेले आले तेंहि विठलपंतापासी जमा होतील. वऱ्हाडांत दाहा हजार घोडे होते; त्यांत जानोजीबावाबरोबर पांच हजार गेले होते व पांच हजार नरहरपंताबरोबर होते. त्यापैकी जानोजी भोंसले याजबरोबरील गलले व घोडी राहिली तितकी वजा होऊन बाकी वऱ्हाडांतच जमा होतील व विरंघलावयासहि उसीर नाहीं; ऐसी रीत पुरातन वऱ्हाडियाची आहे. सरकारचे माहालांस उपद्रव विठलपंत करितों. तुम्हीं पारपत्य करीत नाहीं ऐसे स्वामीनी लिहिलें. त्यास आंबडापूर घाटमाथा देखील जालनापुर दहशत खाते तेथे आंबडापुर खाईल नवल नाहीं. परंतु तिकडे त्यांचा हात पोहचत नाहीं. मामलेदार याणी * हावें. मामलेदारास आपले परगणियापासी सरकारची सारी फौज असावी, याच अन्वये सर्व मामलेदार आम्हांस लिहितात परंतु शहनिशह पाहून वर्तावे लागते. खानदेशचे सुभेदार व फडणींस बऱ्हाणपुरी आहेत त्यांस तीन वेल बोलाविलें. आम्हांपासी आले

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

परंतु मलकापुरी आमचे फौजेंत राहावयास हिमत न होय. नानाप्रकारचे बहाणे सांगोन पिंपलोद परगणियांत भोंसलियाची फौज आली, खांडव्याकडे आली, हांडियाकडे आली, यैशा आवाया नित्य आम्हांस पत्रे कमलाकरपंत व सुभेदार खानदेशाचे लिहितात. त्यास आम्हींहि विनंती केली की तिकडे फौज आलियावर आम्हीं येऊ; तुमच्यानेच बंदोबस्त होईल ऐसे नाहीं. त्यामध्यें फौज सध्या भोंसलियाची विठलपंत मात्र वरकड खासा भोसले तारपतार (?) आहेत. हे फौज जुलेल आणि तिकडे येईल ऐसे घडत नाहीं. सध्या भोंसलियावर ईश्वरी क्षोभ आहें. श्रीमंताचे पुण्येकरून कोणतीहि गोष्ट भोंसलियाची उत्कर्षाची बनत नाहीं ऐसा प्रकार आहे. आपली आज्ञा पत्री आली की सरकारचे माहालास त्यांचा उपद्रव न लागें ऐशे रीतिचे पारपत्य विठलपंताचे करावे. त्यास घाटावर सरकारचा मुलुक व आम्हीं आहो. यापाठीमागें पछमेस खानदेश आहे. दोन्हीकडे उपसर्ग त्यांचा लागावा ऐसा पदार्थ सध्या नाहीं. पारपत्यास ते उभे राहिले तर झुंजोन मोडावयास गुंता नाहीं; परंतु आम्ही येकीकडे गेलो तर ते येकीकडे पलतात, ऐसे आहे. यांत जसे घडेल तसे आज्ञेप्रमाणे शेवा करू विठल बलाल यांची स्त्री बऱ्हाणपुरी नारोबा नाईक जोसी यांचे घरी होती, तेव्हां आम्हीं बऱ्हाणपुरी राजश्री कमलाकरपंतास लिहून पाठविले. मशारनिलेनी आम्हांस सांगोन पाठविले व राजश्री सिवराम नरायेण थते यांस कमलाकरपंतानी लिहिले की आली होती खरी परंतु विठलपंतास जखम लागली तेव्हा बायको व मुलें घेऊन गेले ऐसे लिहिलें; तेव्हां शोध उतम रीतिने केला आणि ठिकाण लाविलें. मेरो खंडेराव सरकारचे कारकून पाठवून चौकी नारोबा नाईक जोसी यांचे घरी बसविली. त्यांजपासून विठलपंताची स्त्री व मुले घेऊन रा। कमलाकर भास्कर याचे स्वाधिन रा। जगनांथपंत अशेरकर याचे गुजारतीने केली आणि जामिनीचा कतबा सरकारचे नावें रा। कमलाकरपंताचा आणविला. त्यास कमलाकरपंतानी कतबा न दिल्हा आणि सांगोन मात्र पाठविले कीं विठल बलाल याची मुले व बायको आमचे स्वाधिन आहे. श्रीमंताचे आज्ञेखेरिज सोडीत नाहीं, ऐसे रा। कमलाकरपंती सांगोन पाठविलें. रा। सिवराम नारायण थते याणी आम्हांस पत्र लिहिले आहे की विठल बलाल याची मुले व बायको याचा बंदोबस्त रा। कमलाकरपंती केला. त्याविसी कोणीहि फिकिर करू नये, ऐसे पत्र रा। सिवरामपंताचे आम्हांस आले ते पत्र आम्ही विल्हेस लाऊन ठेविलें, आणि पुन्हा रा। कमलाकरपंत यास आम्हीं पत्र लिहिले आहे की विठल बलाल याची मुलें व बायको आमचे स्वाधिन आहेत. आम्हीं जामिन आसों. जे समई श्रीमंत मागतील ते समई हजीर करू म्हणोन पत्र जामिनकीचे पत्र पाठवावें. पत्र पाठवावयास अनकुल

2134

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

न पडे तर मुले व बायको विठल बलाल याची रा जगनाथपंत याचे स्वाधिन अशेरीस करून त्यांचे पत्र पाठऊन द्यावे म्हणोन आम्ही रा कमलाकरपंतास लिहिले आहे. अद्याप त्यांचा जाब आला नाही. आम्हासी विठल बलाल कजिया करीत असता त्यांचे कबिले सापडले ते किले अशेरीवरच असावे. सोयरिकेने मुरवत धरली तर असाच प्रकार पडतो. त्यांस आज्ञा स्वामीनी लिहावी जे विठलपंताची मुले व बायको किले अशेरीवरच ठेवावी अथवा विचारास येईल तैशी आज्ञा करावी. येशवंतराव गोपाल दिवाण नरहर बलाल यांचा कबिला व मातुश्री मलकापुरीच चोरून होती ती धरून कैद केली. सध्या गावांत जामिन घेऊन ठेविली आहेत. आज्ञा आलिया किले अशेरीवर पाठऊ. येशवंतराव गोपाल सध्या आकोट नजीक ननोला, तीन कोस येथे जखमी जाला होता तो राहिला आहे. त्यांजकडे त्यांचा मेहुणा गेला होता तो काल आला. याणेंहि वर्तमान सांगितले कीं खासा रा जानोजी भोसलें किले गोवलगडास आले हे खरे ; त्यावरून आम्हीं शोधास माणसे व पत्रे पाठविली आहेत. वर्तमान आलिया वरचेवर शेवेसी लिहू. आजपावेतों पांच जोड्या जासुदाच्या वर्तमान तपसिलवार लिहून सेवेसी पाठविलें आहें. प्रांतात मोठा गुल आहे ; वाटा वऱ्हाडच्या बंद आहेत. बहुत काये लिहिणे ; लोभ करणार स्वाम समर्थ आहेत हे विनंती. ताजा कलम : आताच लाखोटा केलावर वर्तमान जलगाव परगणा दिा रा महिपतराव चिटनिस त्याजकडून कमाविसदार पा मारी जिवनराव नामे आहेत, त्याचे पत्र आले ते याच लाखोटियात बिजनस घालून सेवेसी पाठविले आहे. वर्तमान निवेदन होईल. नरहर जिवाजीचे पुत्र बाजी नरहर विठल बलाल यापासी चाकर आहेत. त्याचे घरी तगादा सरकारचा केला पाहिजे ; व कागलकर घाटगे त्याजकडे चाकर होते. जयसिंगराव आम्ही मारला व त्याचा भाऊ धरून आणिला परंतु त्याचे राऊत व येक भाऊ बाकी विठलपंतापासी जमावसुधा आहे. कागलास राऊत पाठऊन कबिले धरावे. ठेंभुरणीकर महाडिक, जगदेवराव निंबालकर त्याजकडून फोडून आणून ठेविले. त्याचे घरी मात्र उपसर्ग न व्हावा हे विज्ञापना.

¶*Balaji Keshav Sapre of Burhanpur on being reprimanded for his failure to check the activities of Vithal Balal, the Bhonsle's officer in Berar, explains that Malakapur which forms the key to Khandesh was poorly equipped by the Nizam and stood in danger of being occupied by Bhonsle's forces. He therefore took over the place and now cannot leave it to penetrate further east unless reinforced. Janoji, he adds, is taking refuge in Gawilgad while his army is scattered in the forest round Chanda. He further seeks orders about the disposal of the prisoners of war.*

2135

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 260] [*24-3-1769*

पैवस्ती
छ १७ जिलकाद

श्री

राजश्रिया विराजित राजमान्य राजश्री
कमलाकरपंत दादा स्वामींचे सेवेसी

पो बालाजी केशव सां नमस्कार विनंती उपरी. येथील कुशल ताा छ १९ जिलकाद मुाा मलकापूर जाणोन स्वकीयें कुशललेखन कीजे विशेष. राजश्री जानोजी भोंसले सेनासाहेबसुभा यांसी शरीरीं सावकाश नव्हतें. आंग सर्वांग सुजलें होतें. काहीं त्यांची फौज दोन तीन हजार होती ते चांद्यावरी सोडून पालखी नव्हती म्हणोन डोलींत बसोन आंन चालत नव्हते (अशा) परम आवस्थेने किले गावेलगडाखाली फालगुण सुध द्वादसी रविवारी प्रथकालच्या प्रहर दिवसास येताच पानी पानी करून देहावसान जाहाले. तैसाच मुडदा डोलींतच घालून किल्यावरी नेला हें तथ्य वर्तमान आहे. तोफा आणावयासि राजश्री नरसिंगराव धायेगुडे यांकडील स्वार पाठविले आहेत, तरी तोफाची अतिसत्वर रवानगी करावी. बहुत काये लिहिणे हे विनती.

(पत्राच्या मागील बाजूवरचा मजकूर)

सो पो लक्ष्मण खंडेराव व मुरार गिरधर सां नमस्कार विनंतीं उपरी. लिहिले परिसीजे. हें वर्तमान आम्हास प्रमाण आहे. आम्हास एक कलमदान राजश्री धोंडोपंत बाबापासी सांगितले त्याप्रमाणे पाठविले पाहिजे. लोभ आसो दीजे हे विनंती.

¶*Balaji Keshav from Malkapur writes privately to Kamalakarpant the news of the death of Janoji Bhonsle from exhaustion and fatigue near the fort of Gawilgad. The news proved false, as Janoji died three years later. However it may be taken that the report was widely spead at the time.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 261] [26-3-1769

पो छ १८ सवाल माघ मास
तिसा जासूद जथे जीवाजी
नाा याजब्राा

श्री

चिरंजीव राजश्री बालाजी जनार्दन याशी प्रती आसिर्वाद उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जाणे विशेष. तुम्हीं पत्र छ १३ सवालीचे पाठविले ते छ १९ सवाली पावले. सकालचे चहू घटिका दिवसास येऊन पावले. शीहीगडास जाणार म्हणून लिहिलें ते विदित जाहलें. तुम्हाकडे सांडणीस्वार आले त्यांचे बराबरीच दोन आले ते आम्हाकडे छ १२ सवाली पुर्णीमेस आले. त्यात मजकूर लिहिला आहे. भोंसल्याची गडबड देशांत होणार याजकरीतां त्रिंबकास जावें त्यास तेच दिवसी चिरंजीव राजश्री नारायणराव व चिरंजीव सगुणाबाई श्रीत्रिंबकी गेलीं. प्रस्तूत सरकारचा वाडा खाली आहे त्यांत आहेत. आम्ही बातमीस राऊत व जासूद दौलताबादपावेतों पाठविले आहेत. गडबडच जाली तरी प्रहराची वाट आहे. निघोन त्रिंबकास जाऊ. तुम्हाकडे बातमी येईल ते वरचेवरी लिहून पाठवित जाणें. रवाना छ १९ सवाल. बहूत काय लिहिणे हे आसिर्वाद. तुम्ही कमावीसदारास लिहून पाठवणे जे भोसल्याचे फौजेची व किरकोल राऊत फिरतील त्यांची बातमी लिहून वरचेवरी गंगापूरचे मुकामी पाठवित जाणे म्हणून लिहून पाठवणे हे आसीर्वाद.

¶*Gopikabai to Nana Fadanvis (from Nasik) saying that as advised by him she has already sent Narayanrao and Sagunabai to Trimbak and that she herself would soon be going there owing to the impending danger from Bhonsle.*

No. 262]

पैाा छ २६ जिलकाद
सुाा तिसा

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक सिवराम नारायेण कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ताा छ १७ जिलकादपावेतो मुकाम बाहादरपुरा नजीक शहर बराणपूर येथे स्वामीचे कृपावलो (कने) करून कुशल असे विशेष. स्वामींनी येकदोन आज्ञापत्रे सादर केलीं तेथे रागे भरून लिहिले की, तिकडील वर्तमान लिहीत

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नाही. त्यास पेशजी जे वर्तमान होते ते सेवेसी लिहीत गेलों. त्याजउपरी विठल बलाल यांचे कबिले धरिले. त्याजपासून विठल बलाल खानदेशचा रोख सोडून आकोटाकडेस गेले. प्रस्तुत इकडे गडबडहि नाही. असे असता काय लिहावें ? गणेश संभाजी याचा मजकूर तरी ठिकाणहि नाही. वरकड विशेष वर्तमान तर, जानोजी भोसले सेनासाहेबसुभा यांचे शरिरी सावकाश नव्हते. याजकरिता चांद्यास फौज ठेऊन खासा गावेलगडानजीक आले. तेथे विकृत बहुत जाली. त्यांस फालगुन शुध १२ स शोष लागोन देवाज्ञा जाहाली. वरकड मुधोजी, बिंबाजी व साबाजी फौजेत आहेत. फौज आठ हजार आहे. श्रीमंतांचे फौजेस त्यांस वीस कोशाची तफावत आहे. पाहावे. जाले वर्तमान लिहिले असे. कदाचित पेशजी बालाजी केशव याणी मिथ्यावादेकरून लिहिले असेल की, हे आमचे कह्यांत न चालले. त्यास ते कोठेहि जात ना आणि मलकापुरास राहून बोदवड परगणा लुटीत असत. त्याजमुले यासी व त्यांसी सोय न पडे. असे असता विचार केला की, हे या काली अभिनिविष्ट आहेत. हे जाणून दाहा रोज मलकापुरानजीक राहिलो. तदनंतर राहून फल नाही आणि सिबंदीचे पेचात यावे हे जाणून काही लोक दूर करून काही इकडे भिलानी दंगा केला आहे त्याजपुरते लोक ठेऊन फडशा केला. येथाज्ञाने सुचले ते केले. बोदवड परगण्यांत काही जीव राहू दिल्हा नाही. समक्ष विनंती करिता विदित होईल. सेवेसी विदित होये हे विज्ञापना.

¶*Shivram Narayan writes from Burhanpur the false report of Janoji's death on 19-3-1769. He died three years later on 21-5-1772.*

No. 263] [*28-3-1769*

पो छ ३ जिल्हेज तिसा
चैत्र

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती सेवक आपाजी गणेश कादार पौ जैमनाबाद नाा राजश्री त्रिबकराव सिवदेव कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १९ जिलकादपावेतो स्वामीचे प्रतापे सेवकाचे वर्तमान येथास्तित असे. विशेष:—आज्ञापत्र सादर जाले. तेथे आज्ञा की, राजश्री जानोजी भोसले सेनासाहेबसुभा याजकडील चाकरमाने लोकाचे कबिले पाो मजकुरी असतील ते जफ्त करून, कबिले कईदेत

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

ठेवणे. त्यास तिकडील चाकरमाने लोकाचे कबिले येथे पाा मजकुरी नाहीत. आज्ञेप्रो शोध मनास आणून असल्यास आज्ञेप्रो जफ्त करितों. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶*Apaji Ganesh to the Peshwa saying that there is none of the followers of Janoji Bhonsle at Jainabad whom he could confine as ordered nor is there any property belonging to them which he can attach.*

No. 264] [*28-3-1769*

पैाा छ २३ जिलकाद

तिसा

श्री

श्रीमंत राजश्री पंत प्रधान

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक रामचंद्र सिवदेव साष्टांग नमस्कार विज्ञाति. येथील वर्तमान ताा छ १९ जिलकाद पावेतो स्वामीचे कृपावलोकनेंकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विज्ञाति ऐसीजे. स्वामीचे आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा जे प्रां राताजन येथील कोणी सिलेदार वगैरे राजश्री जानोजी भोसले सेनासाहेब सुभा याजकडे चाकरीस गेले असतील त्याचे घरदार जफ्त करणे म्हणोन आज्ञा. त्यावरून येथे चौकसी केली परंतु येथील कोणी तिकडे चाकरीस गेले नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाति.

¶*Ramchandra Sivdeo reports to the Peshwa that none from his province (Ratanjan) has taken service in Bhonsle's army.*

[*30-3-1769*

No. 265]

पैों छ ११ जिल्हेज तिसा चैत्र

श्री

श्रीमंत राजश्री नाना

स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक बाजी गोविंद कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ताा छ २१ जिलकाद मुाा पिंपरी पाा उदरखेड पावेंतो स्वामीचे कृपावलोकने वर्तमान

---

१ पैवस्ती नाना फडणविसांचे हातची आहे.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

येथास्तित असे विशेष. आलीकडे बहुत दिवसापासून पत्र येऊन सेवकाचा साभाल होत नाही. तर यैसे नसावे. इकडील वर्तमान तर भोसल्याकडील सल्याचा मजकूर ठराव करून राजश्री देवाजीपंत, भोसल्यास भेटीस घेऊन येतो, म्हणोन करार करून निरोप घेऊन गेले. त्यास च्यार दिवस जाहाले. भोसले नागपुराजवल आहेत. आणखी आठ दिवस त्यास जावयास लागतील. त्याचा जाबसाल येईल त्यासारिखे पुढे करणे तैसे करितील. तपसिले राजश्री हरिपंत तात्या लिहीतच असतात. भोसल्याच्या भेटी जाहाल्यावर हिदुस्तानचे फौजेची रवानगी होणार. दिवस आखेरीचे आले. धावणी फारच पडली. यामुले फौजेत काही हाला राहिला नाही. घोडी अगदी थकली. माणसे पलोन जातात. लोकाची फारच खराबी जाहाली. रोज मजल जाहाल्यावर घोडी वाटेने राहातच आहेत. नाकारी फौज हिदुस्तानात गेल्यानेहि काही काम होणे नाही. तेरा लक्ष रुपये रवानगीस द्यावे लागतात. त्यात काही तूर्त, काही हिदुस्तानचे माहालावर पेस्तर सालची रसद नेमणूक करून द्यावी, याप्रो ठराव करून रवानगी करणार. यैसा मजकूर आहे. आद्याप जाणेच ठरेल यैसे प्रमाण नाही. आवघे लक्ष भोसल्याचे सल्यावर आहे. कलावे. हिदुस्तानात सिंदे होलकर गेले आहेत. परस्परे उभयताची चित शुध्ध नाही. कलहच आहे. कलावे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Baji Govind informs Nana Fadanis of the attempts that Devajipant was making to bring about a settlement between the Peshwa and the Bhonsle.*

No. 266] [*2-4-1769*

पेाा छ २४ जिल्काद
सुाा तिसा सितैन

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे
शेवेसी

विनंती. शेवक बालाजी विश्वनाथ संाा नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ २२ जिल्काद पावेतो यथास्थित असे विशेष. सभासिंग चौबे गोणाकरोल्याहून धरून आणिला त्यास आपले पत्र आले त्याची लूट जी आणिली असेल ती सोडून देणे म्हणून पत्रीं आज्ञा त्यास लुटीचा थांग लागत नाही. येक ठिकाणा असता तर शोध होता. आपले पत्री चोबे मजकुरास सोडून देणे यैसें कांही

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लिहिले नाहीं. सोडावयाची आज्ञा आली म्हणजे सोडून देऊं. सेवेसी विदित व्हावे म्हणून लिहिले असें. राजे हिंदुसिंग छत्रपुरास आले आहेत त्यांकडे बोंडशेकर राजे हेटसिंग यांचे पांच व दतियेवाल्याचे पांच गेले आहेत. कांही खर्चास दिल्हे आणि या प्रांताकडे राजे हिंदुसिंग सेनेसहवर्तमान येणार म्हणून बातमी आहे. आम्हीं येथून माणसे मुजरद तेथील वर्तमान आणावयासी पाठविले आहेत. आलियावर मागाहून सेवेसी लिहूं. राजश्री माधवराऊ गणेश सागराहून आले. त्याणी वर्तमान तेथे यैकिले कीं राजश्री जानोजी भोसलें व रा। विसाजी कृष्ण बिनीवाले यासी युध्य राक्षसभुवनावर जाले; त्यास राजश्री विसाजी कृष्ण बिनीवाले यांचा कोठे थांग नाहीं, यैसे यैकिले वर्तमान लिहिले आहे. पुणेयाकडे श्रीमंत राजश्री पंतप्रधान गेले आहेत. बहुत काये लिहिणे हे विज्ञापना.

¶Balaji Vishvanath to Vishwasrao Laxman saying that the property of Sabhasing Chobe could not be restored to him in accordance with the Peshwa's instructions as it could not be traced. The writer asks whether the Chobe is to be released and further informs the Peshwa of the arrival of Hindusing at Chhatrapur and of a skirmish between Janoji Bhonsle and Visaji Krishna at Rakshas Bhuvan.

No. 267] *[3-4-1769*

पौ छ ६ जिल्हेज सन
तिसा. हा। जासुद जथे
बयाजी

श्री

सेवेसी हरी बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ २९ जिलकाद मु॥ नजीक कलंमनुरी+ वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान तर देवाजीपंत भोसले यांकडे गेले हे पूर्वी लिहिलेच आहे. ते भोसल्यास घेऊन आले म्हणजे भेटी होतील. भेटीस पंधरा दिवस पाहिजेत. तूर्त कालक्रमणा करीत चालिले आहेत. येथे पांच सात मुकाम होतील. आवढें दाहा कोस आहे. लोक फार करून दर्शनास जातात. रिकामपण सांपडले आहे. वरकड नवल विशेष लिहिजेसे नाही. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Hari Ballal writes from Kalamanuri how Dewajipant was deputed to bring about peace between the Bhonsle and the Peshwa.

+ परभणी जिल्ह्यांत.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 268] [5-4-1769

पो छ ४ मोहरम तिसा

श्री

श्रीमंत राजश्री पंत

प्रधान स्वामीचे शेवेसी

आज्ञाधारक बालाजी लक्ष्मण दिाा मोरो विनायक व त्रिबकराव सदासिव काादार सरकार हाडे कृताने (क) सां नमस्कार विज्ञापना. येथील कुशल ताा छ २७ जिलकाद पावेतो पाा मजकूरचे व सेवकाचे वर्तमान यथास्थित असे विशेष. आज्ञापत्र सादर जाले की, राजश्री जानोजी भोसले सेनासाहेबसुभा याजकडे सिलेदार चाकरीस गेले असतील त्याची घरे जफ्त करणे. इनामी गाव, जमीन, वतने असतील ती अवघी जफ्त करणे म्हणोन आज्ञा. यैसियास या प्रांती सिपाई लोक कोण्ही राहात नाहीत. गोड भिलाची वस्ती आहे. मकडाईचे काही सिलेदार गावेलीस चाकरीस गेले होते ते राजश्री नरहरपंत मारले गेले, त्याजसमागमे बुडाले. आता भोसल्याकडे चाकर कोण्ही नाहीत. सेनासाहेबाचा कबिला गावेलीस होता तो किला टाकून चांद्यास गेला. माखल्याच्या राज्यास किला सोपून गेले. तूर्त मेड्यावर राजश्री रामजी भोसला दोनसे स्वार, पाचसे बरकंदाज, येक हती येश्या सरंजामानसी सावलीगडास आहे. त्याणे बहुत उपद्रव दिल्हा. येक लडाई त्याची सेवकाची जाली. अद्याप सावलीगडाखाले बसला आहे. किल्याचा मोठा आसरा त्यास आहे. स्वामीच्या प्रतापेकरून त्याच्या तोडावर देऊन वाटेस लाविला. मुलतापीच्या ठाण्यावर जफ्ती आल्याने या प्रांतीचा बंदोबस्त राहातो. येविसीची आज्ञा करावयास स्वामी समर्थ आहेत. बहुत काये लिहू हे विज्ञापना.

¶Balaji Laxman informs the Peshwa that there is no property belonging to any one of the cavalry of Janoji Bhonsle which he can confiscate according to the Peshwa's orders. The family of Janoji, he further says, has been removed to Chanda from Gawel.

No. 269] [7-4-1769

पौ छ ७ जिल्हेज तिसा

चैत्र. हाा रुस्तुमखान

सांडणीस्वार

श्री

सेवेसी हरी बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ २९ जिलकाद मुाा नजीक आवढें पांच कोस वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी छ १७

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जिलकादचीं पत्रे पाठविली ती छ २९ मिनहूस पावली. इकडील वर्तमान तर भोसल्यास आणावयास राजश्री दिवाकरपंत गेले आहेत त्याची भेट होऊन पत्रे आली नाहीत. पत्रे दोन चार रोजात येतील. मग दोन मजली श्रीमंत राजश्री दादा[१]स पुढे जानोजीबावास आणावयास जावे लागेल. येथे च्यार पांच मुकाम होतील. त्रितीयेस येथून कूच करून आवढ्यास जातील. देवदर्शन करून तेथेच मुकाम करतील. चतुर्थी पंचमीस कूच करून पेणचे पाण्याने वासिमचे सुमारे जात असों, इतकियांत देवाजीपंत येतील. श्रीमंत राजश्री दादा तिकडे जाऊन भोसल्यास श्रीमंताचे भेटीस घेऊन येतील; कळलें पाहिजे. वरकड नवल विशेष लिहिजेसे नाही. श्रीमंतास पोशाकी सनगें पाठविलीं ती पावली. पसंद पडली; व वाल्याचे पडदे तीन बिचोब्याचे पाठविले तेहि पावले. उन्हाला दिवस, उपयोगी पडले. कळलें पाहिजे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Hari Ballal gives the dates and the places of his halts and communicates that Moroba Dada would go ahead to receive and bring Janoji to the Peshwa.

No. 270] *[9-4-1769*

पो छ १ जिल्हेज तिसा सितैन

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचें सेवेसी

विनंती. सेवक मल्हारराव रामकृष्ण कमाविसदार पाा पैठण कृतानेक साष्टाग नमस्कार वर्तमान यथास्थित असे विशेष. सरकारचे आज्ञापत्र आलें तेथे आज्ञा की राजश्री जानोजी भोसलें सेनासाहेबसुभा याजकडे चाकरीस सिलेदार वगैरे गेले आहेंत त्याची घरें पाा मजकुरी असतील ते व त्याजकडें गांव मुकासें वगैरे व जमीनी गावगना असतील तें जप्त करणें व मुले माणसे अटकेंत ठेऊन वतने वगैरे कुल जप्त करणें म्हणोन आज्ञा. आज्ञेंप्रमाणें वर्तणूक करितो. सेवेसी श्रुत होये विज्ञापना.

¶Malharrao Ramkrishna, Kamavisdar of Paithan, to Nana saying that the orders regarding confiscation of the property of men in the service of Janoji Bhonsle will soon be acted up to.

---

१ मोरोबादादा फडणीस.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 271] [11-4-1769

पौा छ १३ जिल्हेज सन
तिसा चैत्र मास बाा
जासूदजथे थेसाजी भिकाजी
१ मायाजी त्रिंबकजी
१ राणोजी त्रिंबकजी

श्री

श्रीमंत राजश्री नाना
स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक बाजी गोविंद कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ताा छ ३ जिल्हेज पावेतो मुाा नजीक नडसी वर्तमान येथास्तित असे विशेष. अलीकडे पत्र येऊन वर्तमान कलत नाही. तर थैसे नसावे. पत्र पाठऊन साभाल करावा. इकडील वर्तमान तर राजश्री जानोजी भोसले याजकडे राजश्री दिवाकरपंत गेले आहेत. त्याजकडील सालजाब अद्याप काहीच आला नाही. जानोजी भोसल्याचे शरीरी स्वस्थ नाही. नागपुराजवल मुकाम आहे. देवाजीपंत प्रतिपदेचे मुहूर्ते भेटणार होते. येका दोहो दिवसी त्याजकडील सालजाब येईल. हिंदुस्तानचे सरदार सिंदे होलकर याचे परस्परे चित शुध्ध नाही. उभयताचे कागद आले. त्यावरून हिंदुस्तानचे सरदाराची रवानगी हिंदुस्तानात जावयाची जाहाली. वर्षप्रतिपदेचे मुहूर्ते निरोप दिल्हा. धावर्णामुले फौज आगदी गलाली. चाकर बारगीर लोकाचे उठोन जातात. तवईच आहे. खर्चाचा मजकूर तर छावणीची बेगमी भाद्रपद अखेरपावेतो केली. दरमाहा दोन आठवडे व दुमाही रोजमरा सेव्या तोफखाना गाडदी मि(लोन) सा माही सा लक्ष त्र्याणव हजार पा * * असी हजार उजनीस पहिलाच थैवज आहे. येक लक्ष ब्याणव हजार, बाकी च्यार लक्ष येकवीस हजार पो उदेपूर येक लक्ष. तीन लक्ष येकवीस हजार बुंदलखड कालपीचे पेस्तर सालचे रसदेचे थैवजी वरात, याप्रमाणे बेगमी करून देऊन रवानगी केली. कनिष्टपक्षे दाहा लक्ष छावणीस पाहिजेत. त्याची बेगमी याप्रो करून दिल्ही. पुढे प्रज्यन्यकाल जवल आला. मजल लांब जाणे. सर्व भार ईश्वरावरच आहे. याउपर कूच करून दर मजल जात असो. कलावे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

¶*Baji Govind informs Nana Fadanavis that Devajipant has gone to Janoji Bhonsle to discuss terms of the negotiations. He further writes that Sindia and Holker have been allowed to proceed to the north. The two Sardars, the writer says, are viewing each other with sus,-icion.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 272] *[14-4-1769*

पौ छ १२ जिल्हेज तिसा
चैत्र. हा सुभानजी
वाबरे खिजमतगार

श्री

सेवेसी हरी बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ६ जिल्हेज मुाा नजीक वासीम चार कोस वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी छ २६ जिल्कादची पत्रें पाा ती पावली. सरकारचे जाब मागाहून पाठऊ. इकडील वर्तमान तर राजश्री जानोजी भोसले श्रीमंताचे भेटीस येत आहेत. भेटी जाल्यावर सविस्तर लिहून पाठऊ. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Hari Ballal writes of Janoji Bhonsle's arrival at Vasim for peace negotiations with the Peshwa.

No. 273] *[16-4-1769*

पौ छ १६ जिल्हेज
तिसा चैत्र. हा
फतेअली वगैरे सांडणीस्वार

श्री

सेवेसी हरी बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ ८ जिल्हेज मुाा वासीम नजीक चार कोस वर्तमान यथास्थित असे विशेष. राजश्री देवजीपंत, भोसले यांकडून आज आले. आतां श्रीमंत राजश्री दादा फडनीस त्यास आणांवयासाठीं येक दोन मजली पुढे जातील. याच्या भोसल्याच्या भेटी जाल्या म्हणजे श्रीमंताकडे घेऊन येतील. भेटी जाल्यावर दोन चार रोज बोलणे चालणे होऊन निरोप होईल. मोगलास निरोप देऊन श्रीमंत दरमजल पुण्यास येणार. टोक्यांस जाऊन येक दोन रोज तेथे राहून मग पुण्यांस यावे असे बोलण्यांत आहे. घडेल ते लिहून पाठऊ. दिवाकरपंत काल आले. श्रीमंत राजेश्री दादा आज तिकडे जातील. पाच सात रोज लागतील. मी समागमे जाईन. राजश्री नारोपंत नाना लस्करांत आहेत. कळावे, सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶Hari Ballal writes to Poona about the preliminaries of the negotiations with the Bhonsle and further on gives the programme of the Peshwa.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 274] [17-4-1769

पैा छ २० जिल्हेज चैत्र मास

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे

शेवेसी

पो बालाजी शंकर सां नमस्कार विनंती. येथील कुशल ता छ ९ जिल्हेज मुकाम पेंनगगा नजीक वासीम लस्कर स्वामीचे कृपेकरून वर्तमान यथास्थित असें विशेष. इकडील वर्तमान देवाजीपंत भोसल्याकडे गेले होते त्या करारा-प्रो आजी माारनिले येथे आले. याउपरी रा दादास घेऊन पुढें तिसा कोशावर भोसल्याचे भेटीस जावें. त्याची खातरजमा करून मग श्रीमंताची भेट होणार (आहे). याप्रकारें आजचे उद्यांचे दिवसा होऊन जाणार. भोसले येथून पना-साकोशावर माझरी तलेगावावर आहेत. हें येथून निघाले म्हणजे ते पुढे येतील. कलावे. श्रीमंताच्या भेटी जाहाल्या म्हणजे मोगलासहि निरोप देऊन खासा दर मजला पुणेयास येत असेत. वरकड आधिकोतर काये आहे. रा बापू निरोप घेऊन पैठणास गगातीरास गेले आहेत कलावे. रामचंद्र गणेश व (विसाजी) कृष्ण फौजसुधा कूच * * सेवेसी * पाहिजे

¶*Balaji Shanker writes to Nana Fadanis the preliminary efforts and interviews, etc., in connection with the negotiations with Bhonsle.*

No. 275] [18-4-1769

पैा छ १६ जिल्हेज तिसा
चैत्र. हा फतेअली
वगैरे सांडणीस्वार

श्री

सेवेसी हरी बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ १० जिल्हेज वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी छ २९ जिलकादचें पत्र सांडणी-स्वाराबा पा ते छ ८ जिल्हेजी पावलें. जमाखर्चाचे अजमास पाठविले ते श्रीमंतानी व दादानी पाहिले. उतरें सरकारची लिहिली आहेत त्याजवरून विदित होईल. श्रीमंत राजश्री दादा, भोसल्यास आणावयास आजच गेले. पाच साता रोजी घेऊन येतील. भेटी जाल्यावर सविस्तर लिहून पाठऊ. भोसले यांचे विपरीत वर्तमान आपण ऐकिले होते ते लटके; कलावे. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Ballal writes of Moroba Dada having gone to bring Janoji Bhonsle to the Peshwa.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 276] [*20-4-1769*

पैवस्ति[1] छ १८ जिल्हेज

तिसा चैत्र वाा

सखोजी जासूद जथे रामजी नाईक

श्री

सेवेसी विज्ञापना. तागायत छ १२ जिल्हेज पावेतो मुक्काम नजीक वासिम वर्तमान यथास्थित असे विशेष. श्रीमंत राजश्री दादा भोसल्यास आणावयास गेले त्याच्या भेटी आज गुरुवारी होतील. श्रीमंत उदईक येथून कूच करून मेहकरावर जातील तेथें भोसल्याच्या भेटी सोमवारी होतील. विसाजीपंत रामचंद्रपंत यांचा कलह लागला होता. उभयतास हुजुर आणून समजाऊन सांगत होते. ते न आइकत तेव्हां सरंजाम जप्त करावा, माल मालीयेत सारकारांत व्यावी, असे जाहाले. तेव्हां उभयतानीं जावयाचे मान्य केले. बाजीपंत नसावे एवढी मात्र आड घातली ती श्रीमंतानीं मान्य केली; परंतु दादा आले म्हणोन त्याच्या विचारांस आले म्हणजे दुसरा कारकून मागाहून जाऊन बाजीपंतास आणऊ या प्रमाणें सांगोन त्यास मार्गस्त केले. मोरो व्यंकाजी कृष्णाजीपंत परकाले आबा आठवले यास माघारे आणिले होते त्यापैकीं आबास मात्र बालकोबा न पाठवीत * * * राहिले; मोरोबा कृष्णाजीपंतास घेऊन गेले. पंतास येथें आणविले नव्हते. फौजेत ठेविले होते. हे उभयाता गेल्यावर हे वर्तमान त्याजला कलल्यावर येथील आज्ञेची वाट न पाहातां माघारे आले तर श्रीमंताची बेमर्जी होईलसे दिसते. आज सायंकाल पावेतो वर्तमान कलेल मागाहून लिहू. बाजीपंत राहिले तर कोणत्या कारकुनास पाठवितील तें पहावें हे विज्ञापना.

¶*News of an interview between the Peshwa and the Bhonsle is sent to Nana Fadanis. The differences between Visajipant and Ramchandrapant and the removal of Bajipant from their service are also communicated to him.*

No. 277] [पौ *20-4-1769*

पो छ १२ जिल्हेज

तिसा चैत्र हाा खंडोजी

वावरे खास जिलीव

श्री

विज्ञापना. इकडील वर्तमान राजश्री जानोजी भोसले चैत्र शुध द्वितीयेस श्रीमंताकडे यावयास निघाले. दरमजल येत आहेत. दिवाकरपंत पुढे येतील

---

१ पैवस्ती नाना फडणिसाचे हातची.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

मग श्रीमंत राजश्री दादा पुढे येक दोन मजली जातील. तेथे भोसल्याच्या भेटी जाल्या म्हणजे घेऊन श्रीमंताकडे येतील. कलावें हे विज्ञापना.

¶*Letter intimates that Janoji Bhonsle started for the interview with the Peshwa on the 8th of April 1769.*

No. 278] *[23-4-1769*

पौ छ २१ जिल्हेज तिसा चैत्र

बा। मल्हारजी जासूद जथे आबाजी

*   *   *

श्री

सेवेसी सदासिव अनंत कृतानेक साष्टाग नमस्कार विज्ञापना. ता। छ १९ जिल्हेज पावेतो मु॥ नजीक मेहकर येथे स्वामीचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान येथास्थित असे विशेष. स्वामीनी सेवकावर दया करून छ २६ जिलकादचे कृपापत्र पाठविले ते पावले. त्याआलीकडे पत्र येऊन सेवकाचा सांभाल जाहाला नाही. तरी सदैव पत्र ल्याहावयासी आज्ञा जाहाली पाहिजे. वरकड इकडील वर्तमान तर छ १० जिल्हेजी श्रीमंत राजश्री दादा फडणीस व हरिपंत तात्या दोन हजार फौज घेऊन राजश्री जानोजी भोसले त्यास पुढे सामोरे येथून चालीस कोसावरी गेले. त्याच्या भेटी चैत्र शु॥ चतुर्दसी अथवा पूर्णिमेस होऊन दर मजल निघोन येणार आणि वद्य चतुर्थी सोमवारी श्रीमंताच्या व भोसल्याच्या भेटी होणार याप्रो करार मदार ठरला आहे. श्रीमंत राजश्री दादा फडणीस येथून गेले त्याचे तिसरे दिवसी राजश्री रामचद्र गणेश व विसाजी कृष्ण याणी आपल्याआपल्यात कजिया केला. हे वर्तमान श्रीमंतास कलताच दोघाजणा बलाऊन आणिले आणि त्याजकडे सरंजाम माहाल गाव वगैरे चीजवस्त असेल ती सरकारात जफ्त करावी याप्रमाणे बोलण्यात करार जाहाला. त्यावरून उभयताचे कारकून बलाऊन आणून माहाल व गाव वगैर त्याजकडे आहेत त्याची यादी लिहून घ्यावी तो इतक्यात राजश्री गोविंदपंत तात्या व बालकोबा तात्या व कृष्णराव काले या तिघा जणानीं रदबदली करून त्यासच मागती पूर्ववत प्रमाणे स्थापना करून निरोप देऊन रवाना केले, याप्रमाणें वर्तमान जाहाले. श्रीमंताची मर्जी बहुत कठीण जाहाली. * * परंतु त्याच्या दैवकरून येथास्थित होऊन त्याची रवानगी सत्वर जाहाली. रामचद्र गणेश यार्णा निरोप वेतेसमई बोलिले कीं, बाजीपंत आम्हास फडणीस नको. इतके वर्तमान केले हे त्याणी केले. याप्रमाणे श्रीमंतास त्याणी विनंती केली. त्यावरून श्रीमंत बोलिले

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
की, याचा परियाय मोरोबा येथे आल्यानंतर ठाक करून देऊ. याप्रकारचे वर्तमान जाहाले हे स्वामीस कळावे म्हणौन सेवेसी लिहिले आहे. यंदा फौजेस चौथाई नालबदी द्यावी व कापड सबात पावले त्यापैकी चौथा (अपूर्ण).

¶*Sadashiv Anant writes about an interview between the Peshwa and the Bhonsle. He also tells how the Peshwa gave orders for confiscating the Saranjam of Ramachandra Ganesh and Visaji Krishna who had begun to quarrel between themselves. The Peshwa was however requested to release their Saranjam.*

No. 279] [*25-4-1769*

पौ छ २१ जिल्हेज तिसा
चैत्र हाा मोराजी जासुद
जथे नारोजी नाईक

श्री

सेवेसी हरी बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना. ताा छ १७ जिल्हेज मुाा मेहेकर वर्तमान यथास्थित असे विशेष. इकडील वर्तमान राजश्री जानोजी भोसले यांस आणांवयास श्रीमंत राजश्री दादा गेले होते. वराडांत लस्करापासून चालीस कोस गेलो होतो. मोन्यांवर भेट जाली. तेथून घेऊन काल लस्करांस आलों. श्रीमंताच्या भेटी जाहाल्या. आता भोसले व मोगलासी निरोप देणे यांस आठ दिवस लागतील. तदोतर श्रीमंत दर मजल पुण्यांस येणार. पुण्यास यावयाचे मुहूर्त शुध पक्षी येक षष्टी दुसरा दशमी व त्रयोदसी याप्रों आहेत. घडेल तो खरा; परंतु येथून निघाल्यावर मग मार्गी काहीं गुंता नाहीं. तोफखाना पुढे आजच रवाना केला. याप्रो वर्तमान आहें. राजश्री रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण याची रवानगी हिंदुस्थानात जाली; कळावें. वरकड नवल विशेष लिहिजेसें नाहीं. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Hari Balal from Mehkar writes that the Bhonsle's meeting with the Peshwa is now over and the Peshwa will soon begin his homeward march.*

No. 280] [*28-4-1769*

पो छ २९ जिल्हेज
सन तिसा बाा करीम
व सेख म्हमत सांडणीस्वार

श्री

सेवेसी हरी बलाळ कृतानेक साष्टांग नस्मकार विज्ञापना. ताा छ २० जिल्हेज मुाा कोा मेहेकर वर्तमान यथास्थित असे विशेष. स्वामीनी छ ९

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जिल्हेजची पत्रें जासुदाबा॥ पा॥ ती पावली; आजच पावली. श्रीमंताचा पोशाक तयार होत आहे, धोत्रजोडे मागे सांडणीस्वारबा॥ पा॥ आहे म्हणौन लि॥ ते कलले. धोत्रजोडे पावले. हैदरनाईकाचे मजकुराची पत्रें श्रीमंतास लिहिली तीहि पावली. त्यार्चा उतरे श्रीमंतानी लिहिलीं आहेत त्याजवरून कलेल. इकडील वर्तमान तर राजश्री जानोजी भोसले यांस आणावयास श्रीमंत राजश्री दादा गेले होते; घेऊन आले. भेटी जाल्या. कोणे गोष्टीचा किलाफ¹ राहिला नाही. काल श्रीमंत मेजमानीस गेले होते. आज रुकनुदौलाचे घरी जाणार. उदैक रुकनुदौले श्रीमंताचे निरोपास येतील. श्रीमंत आतां दरमजल टोक्यास येत आहेत. मातुश्री बाई गंगापुरी आहेत. पुण्यांस तूर्त जावयाची मर्जी नाही याजकरितां श्रीमंत गंगापुरास जाणार. टोक्यास जातात तों बाई पुणेयास येतात असे कलले तर मग टोक्याहून पुण्यास येतील. न आल्यास गंगापुरास जाऊन मातुश्रींचे दर्शन घेऊन मग पुण्यांस येतील. कललें पाहिजे. मोगलास तीन लक्षांचे माहाल द्यावे लागतात. त्यास, मेहेकर वगैरे चहू लक्षाचे माहाल भोसल्यांकडील सुटले आहेत याजपैकी देतील. कलावें. वरकड नवल विशेष लिहिजेसे नाही. सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*Haripant Phadke writes to Nana Fadanis about the meeting which took place between the Peshwa and Janoji Bhonsle.*

No. 281] [*29-4-1769*

पौ छ २९ जिल्हेज सन
तिसा

श्री

विनंती सेवक खडो गणेश सा॥ नमस्कार विज्ञापना. येथील वर्तमान ता॥ छ २१ जिल्हेज पावेतो येथास्थित असे. विशेष: राजश्री बाजी नरहर रा॥ जानोजी भोसले सेनासाहेबसुभा याजकडे चाकरीस गेले आहेत. सबब त्याची मातुश्री व बाइको नासिकास आहेत त्याची जफ्ती करणे म्हणौन आज्ञापत्र सादर जाले. त्याजवरून शोध करिता मातुश्री व कन्या साता वर्षांची पंच्यवटीत बिराडी राहात होती. तेथे चौकी ठेऊन वस्तवानीची यादी लिहून आलाहिदा पाठविली आहे. त्याजवरून विदित होईल. मा॥रनिल्हेची बाइको माहेरास पुणियांत रा॥ अंताजीपंत मराठे याची कन्या तेथे आहे म्हणौन मातुश्रींनी

---

१ संशय; वैषम्य.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

सागितले. त्यावरून सेवेसी लिहिले आहे. बाइकास जामीन मागितला. परंतु येथे कोणी होत नाही. च्यार प्यादे चौकीस ठेविले आहेत. आज्ञा येईल त्याप्रो वर्तणूक करूं. सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना.

¶Khando Ganesh to the Peshwa informing him that guards have been posted to watch the members of the family of Baji Narhar who has entered into the service of Janoji Bhonsle.

No. 282] *[April 1769*

श्री

सेवेसी विज्ञापना. राजश्री जानोजी भोसले याचे कूच होऊन आम्हा जवळून दिढा कोसावर मुकामास बिनी आले. रव पडली आहे. अद्याप त्याच्या आमच्या भेटी जाल्या नाही. साडणीस्वार आला. च्यार साहा घटिकानी त्याची स्वारी येणार, आम्हीहि तयार होऊन आठ कोस पुढें जाऊ. भेट जाल्यावर त्याचे बोलणे जे होईल ते लेहून पाठवितो. मोघम बोलून आले तरी वेऊन येतो. त्यास आज तर येणे होत नाही. आले तरी उदईक गुरुवारी वेऊन येतो. न आले तरी आम्ही आज संध्याकालपर्यंत येतो. रा। बुधवार दोन प्रहर सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶The writer gives the probable day and time of an interview with Janoji Bhonsle.

No. 283] *[19-5-1769*

पैवस्ति छ १८ जिल्हेज तिसा चैत्र
हस्तें सखोजी जासूद जथे रामजी नाईक

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

पोष्य बाळाजी शंकर कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. येथील क्षेम तागाईत छ १२ जिल्हेज मुकाम मौजें येवंती परगणे वाशिम वर्तमान यथास्थित असें विशेष. राजश्री दादा व हरिपंत उभयेतां जानोजी भोंसले याजकडे पुढें छ १० जिल्हेजीं येथून निघोन गेले आहेत. उद्यां भेटी होतील. उपरांत त्याची

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

खातरजमा करून श्रीमंताचे भेटीस घेऊन यावें. येथून पस्तिसा कोशाचें अंतर आहे. सोमवारीं चैत्र वद्य चतुर्थीस भोंसले यांच्या व श्रीमंतांची भेट होणार, सेवेसी कळावें. मागाहून होईल तें सविस्तर लिहूं. कळावें, बहुत काय लिहिणें? कृपा केली पाहिजे हें विज्ञापना.

¶Balaji Shanker informs Nana Fadanis of Raghunathrao and Haripant having proceeded to bring Janoji Bhonsle and gives the date of an interview between him and the Peshwa.

No. 284] *[20-9-1769*

श्री

राजश्री जानोजी भोसले सेनासाहेबसुभा
गो यांसी

ॐ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो माधवराव बलाल प्रधान आसिर्वाद विनंती उपरी. येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित जावे विशेष. सरकार हाडेपैकी माहाल वि तपसील.

१ पो सनवाडा	१ पो सावलीगड
१ पो चिखली	१ पो जमानी

येणेप्रो पाच माहाल तुम्हाकडे आहेत. त्यास या माहालात उज्याड गाव असतील, त्याची कमाविस साल मारापासून राजश्री बालाजी नीलकठ यासी सागितली आहे. तरी सदरहू माहाली उज्याड गाव असतील, त्यास कौल देऊन आबादी करितील. करू द्यावी. येविशी आपण आपल्याकडील कमाविसदारास व जमिदारास पत्रे देऊन ताकीद करावी. साहित्य हरयेकविसी करावे. रा छ १९ जमादिलावल. बहुत काय लिहिणें? लोभ असो दीजे. हे विनंती.

श्री०
राजाराम नरपती
हर्ष निदान माधवराव
बल्लाळ मुख्य
प्रधान.

लेखन
सीमा

¶Peshwa Madhavrao assigns Kamavisi of some villages to one Balaji Nilkanth, and asks Janoji Bhonsle to help him in the assessment of the dues.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 285] [*28-9-1769*

श्रीगज्यानन

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे शेवेसी

आज्ञांकित सेवक विठल सामराज चेरनावर मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता। छ २७ जावल परियेंत स्वामीच्या कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान येथास्तित आसे. येथील वर्तमान राजेश्री सेनासाहेबसुभा यानी राजेश्री साबाजी नाना याची रवानगी छ २४ मिनहूस येथून केले ते दिवसी येथून कूचे करून आठ कोस गेले. (क)बिले समागमे दारव्यापावतर न्यावे, तेथे (वि)जयेदशमी करून पुढे सडे मजल दर मजल पुण्यास येऊन पोंहचावे असें त्याच्या चितांत होते. त्यास सेनासाहेबानी त्यास आज्ञा केली जे, तुम्ही दारव्यास गेल्यावर दोन दिवस आधीक उने लागतील. पुण्यास दसऱ्यासच जाऊन पोंहचावें. त्यास वोडगस्तीमुळे रवानगीस इतके दिवस लागले. दारव्यास न जाता, परभारें तुम्ही पुण्यास जाणे. त्यावरून नानानी कुटुंब येथेंच ठेऊन कूचे करून गेले. आपल्या तीन जासूदजोड्या व आंताजी फडनाईक समागमे दिला आहे. राजेश्री रामाजी बलाळ आद्यापवर तों येथें आले नाहींत. परंतु दो चौ रोजानी रामाजीपंत येऊन पोंहचनार. रा। बाबूराव कोनेरहि त्यांजसमागमे आहेत असीहि वदंता आहे. राजेश्री महिपतराव विश्वनाथ सेनासाहेबाकडून हती घेऊन सेवेसी आले. तेथे पोंहचून राजेश्री दादांची भेट घेऊन स्वामीचे सेवेसी आले. साहेबी कृपा करून आंमृतभाशनोतरी गौरव केला तो विस्तारपूर्वक मा।रनिलेनी सविस्तर आठ बंद पत्रीं लिहिला. हती जाताच महेपतरायास न कळता आपले सरकारचा सर्वभद्र हतीसी लडविला. याचया हतीवर साहेब बहुत खूश जाले. सरकारांत हती नेऊन रातब मसाले जारी केलें ते सविस्तर वर्तमान व राजेश्री दादानी ममतेचीं भाशने केलीं तो आर्थ संविस्तर लिहिला होता. सेनासाहिबानी सेवकाचे समक्षेच पत्रें वाचली. साहेबानी व दादानी आमृतोतर भाशने ममतेचीं केलीं ते यैकून बहुत संतोश जा(ला). तो भवानीपंत मुनसीजीनी पत्रें (वा)चलीं. त्यानीहि फार स्तव केला. सेनासाहेब फार संतोश जाले. प्रीतिकलहे सेवकासी बोलले जे, हती येथून गेलियावर येक महिना आसुदा[1] होऊन रातब मसाले खाऊन, तयार करून, लडवायाचा होता

---

१ ताजातवाना, तयार.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

तो महेपतरायास न कळतच हती श्रीमंतानी नेऊन आपल्या हतींसी लडविला. हतीने काहीं कमती केली असती तर शब्द ठेवते जे, देऊं केलेला हती पाठेवला नाहीं. दुसरा पाठविला आहे. आसा आरोप ठेवते. परंतु श्रीमंताकडून ईश्वराने आम्हांवर कृपा करविली आहे. आम्हास कृपेस पात्र केले आहे तेथें ईश्वर शब्द आननार नाहीं. हेच येकनिष्ठतेचीं लक्षणें. भवानीपंतहि बोलले जे, श्रीमंत साक्षात ईश्वरी औंश आहेत. ते सर्वजान आहेत. महेपतरायाच्या खर्चाचा परामृश करनार धणी समर्थ. हे विज्ञाप्ती.

¶*Vithal Shamraj to the Peshwa informing him that Janoji had asked Sabaji to proceed to Poona and to reach there not later than the Dasara. He further describes an elephant fight arranged between an elephant sent by Janoji and that of the Peshwa. The letter proves how fully Janoji and his Court were reconciled to the Peshwa.*

No. 286] *[6-10-1769*

पो छ १२ जमादिलौवल जावसूद

श्री

श्रीमंत राजश्री रावसाहेब स्वामीचे शेवेसी

आज्ञाधारक नागोराम कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती विज्ञापना. ता छ ९ माहे जाखर मुा ठाणे कसबे राहुरी येथें स्वामीच्या कृपादृष्टीकरून सेवकाचें वर्तमान येथास्तित असे विशेष. तरफ मजकुरी जाधवाही चौथाईच्या मामलतीविसी आम्हासी हार्शामर्ष वाढविला. हुताशनीच्या संधींत तरफेत शंभर राऊत घालून पाटील गावगावचे धरून गांडापुरास नेऊन मारहाण करून चालीस रुपये पंनास रुपये मसाले घेतले आणि जबरदस्तीने पाटिलाचा खंड करून गांडापुराहून जामीनकतबे घेऊन सोडून दिल्हे. कसबे मजकुरी पाणिवाधियावर राऊत पाठऊन गोल्या टाकल्या. गावगावचे बाजारकरू बाजार करायासी येत होते त्यांस वाटेत लुटून घेतले. यैसा नानाप्रकारे उपद्रव दिला. आम्हास श्रीमतांही आज्ञा केली कीं जाधवास चौथाईसिवाये जास्त कपर्दीक न देणे आणि जाधव तों खामखा तिजाई घेऊं आम्हासहि श्रीमंताची आज्ञा आहे की सुदामतप्रमाणे वर्तणूक करणे. त्यास पूर्वी मखबुल अलम व तुरुकताजखान याचें अमलात वाजवी चौथाई घेत होते. पुढे मोगलाईचा कमजोर जे वरसी जाला ते वरसी तिजाई घेतली. कोणे वरसी निमेनिमहि घेतली आहे. ज्याप्रमाणे फावले त्याप्रमाणे घेतले, यैसे सुदामतीचे वर्तमान. यावरून हर्शामर्ष फारच वाढला. मग जरूर जाणून रा सिवाजी बलाल

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पागा हजूर यांसी असीडमरीहून बोलाऊन आणिलें. त्यांचा जमाव व आमचा जमाव मिळून दीडसे राऊत व दीडसे प्यादे येसा सरंजाम करून ठाणे मजकुरीहून कूच करून येथून चौ कोसावर बाम्हणी गाव आहे तेथे ठाणे जाधवाचे आहे तेथील पाटील हा काल पावेतो भेटावयासी आला नवता. जमाबंदीचे वेलेसहि आला नाही. जाधवाची हिमाईत करीत होता. सबब बाम्हणीवर जाऊन च्यार पांच मुकाम केले. हे वर्तमान जाधवाचा कमाविसदार जिवाजी नरहर गांडांपुरी आहे त्यास हे बातमी जाऊन पोहचली आणि आम्हीहि त्यास बोलाऊ पाठविले होते. त्याजवरून तो आपले जमावानिसी येऊन भेटला. उपरांतिक त्यासी व आम्हासी भाशणे सामदंडभेदेकडून परस्परे जाहाली ते पत्री कोठवर ल्याहावी? सेवटी हा ईत्यर्थ ठरला कीं ज्या गावचे पंधरासे रुपये कुल जमाबंदी जाहली त्यापैकी सरकारहि सा हजार रुपये बाकी पाचसे राहिले त्यापैकी वाजबी चौथाईचा हिसा पावणेच्यारसे सद्या जाधवाही घ्यावे बाकी कसर तिजाईची सवासे रुपये राहिले ते अमानत रयतीकडेस तहकूब ठेविले. ज्याणे श्रीमंताचे पत्र आणून द्यावे त्याणे ही कसर तिजाईची रयेतीपासून वसूल करून घ्यावी येसा करार ठरला. परंतु जे समयी जमाबंदी तरफेची केली ते समयी आगोधर जाधवाचा कमाविसदारास बोलाऊनं आणून तो व आमचा कमाविसदार येकत्र सदरेत बसून कुलबाबती येकेच जागा जमाबंदी चुकली. आम्ही रयेतीस वचन दिल्हें की तुम्हास दुसरा कोणाचा उपसर्ग लागो देणार नाही. जाधवाचा देखील कमाविसदार येथें कचेरीस आला आहे. त्यांस तुम्ही येकत्र जमाबंदी चुकवणे म्हणून रयेतीस वचन दिल्हे आहे. याजकरिता तिजाईची कसर जाधवाकडेस गेली तर परिछिन सरकारचें नुकसान आहे. जाधवाही जमाबंदी वेगली केली असती तर जैसे जाणतो तैसे केले जाते. आता कसर राहिली ते सरकारातच घ्यावी. जाधवाकडेस न द्यावी येसे वर्तमान मामलतीचे आहे. पूर्वी दोन चार वेला सेवेसी हे वर्तमान लिहून श्रुत केले आहे. परंतु त्या पत्राचे उत्तर येकहि सेवकास न आलें. तर कृपाळू होऊन या पत्राचे उत्तर सत्वर आल्यास आणि जाधवाचा कमाविसदार जिवाजी नरहर यासी पत्र की नागो राम याही बाम्हणीस येऊन जो करारमदार तुम्हासी ठैरवला आहे तोच प्रमाण आसे. वाजबी चौथाई घेणे. तिजाई तुम्हास घ्यायासी प्रयोजन नाही; तिजाईची कसर रयेतीकडेस तहकूब ठेविली आहे; ते कसर नागो राम वसूल करून सरकारात घेतील याप्रमाणें पत्र जिवाजी नरहर कमाविसदार जाधवाचा यांसी देवावे. आम्ही रयेतीस कौल दिल्हा आहे पुढें लावणी जुपणी करविली आहे. तरफ मजकूरचे पाच सात गाव

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मोगलाईचे वेळेस यैस्याच दंग्यामुळे बेचराख पडले होते. तेथील रयेत परागंदा जाहाली होती त्यास बोलाऊन खातरजमा करून गावावर बसऊन लावणी केली आहे; परतु जाधवाचा तहरह जाल्याखेरीज विस्वास रयेतीस येत नाही, त्यास्तव वारंवार विनंती हेच आहे की जिवाजी नरहर दिा जाधव यासी ताकीद वाजबी चौथाइच घेणे, खेरीज उपद्रव द्यावयासी प्रयोजन नाही म्हणून ताकीदपत्र सत्वर आल्यास उतम आहे. पुढे लावणीजुपणी येकचितेकडून होईल. यानंतर आम्ही नवाबाचा निरोप घेऊन इकडेस आलो. ते समयी रा बालकृष्णपंत मोहरीर संकराजी मल्हार यांचे नातु यांचे स्वाधीन पाछाई दतरे आहेत. त्यासी व आम्हासी कामकाजाकरिता आतश्नेह जाहाला आहे, त्यांस इकडेस येतसमयी सागोन आलो होतो की जे वर्तमान येथे वर्तत जाईल ते आठा चौ दिवसी आम्हास लिहून पाठवीत जाणे. त्याजवरून श्रीमंताकडेसहि ते वर्तमान लिहीत आहेत. रा परशराम माहादेव व आबाजी नाईक साठे वरचेवर श्रीमंताकडेस सविस्तर वर्तमान लिहितच आहेत. आम्ही नवाबाचे लस्कर माहोरच्या आली-कडेस दाहा कोसावर सोडिले होते. रघोजी बावासी व यासी विसा कोसाचा तफावत होता. त्या उपरी बालकृष्णपंती आम्हास लिहिले आहे कीं नवाब माहोरास दाखल जाहाले. तेथे किलेदारी यैवजखानाचा पुत्र आमुल्हादिखान यासी दिल्ही व ब्ऱ्हाणपूरची सुभेदारी महमद अनवरखान याचे पुत्रास दिली. रघोजीबावा माहोराहून आठा कोसावर चिखली गाव आहे तेथे मुकाम केला. उपरांतिक नवाबहि माहाराव निंबालकर याजसमागमे सिरपाव हाती येक व घोडा वस्त्रे देऊन पुढे पाठविले. त्याची व याची भेटी जाहाली. उपरांती रघोजीबावास अगदीच लस्कर सुधा कूच करऊन आणिले. पुढे आगाडीस नदी पेण गंगेच्या कांठी डेरे देऊन राहिले. उपरांतिक दुसरे दिवसी सैद लस्करखान बावाचे डेऱ्यास जाऊन भेटून च्यार घटका बोलून माघारे आपले डेऱ्यास आले. उपरांतिक छ ४ जमादिलावली नवाबाचे भेटीस आणावयास खान व माहाराव निंबालकर उभयेता जाऊन बावास घेऊन आले. रघोजीबावाहि नवाबास हाती येक व घोडा व वस्त्रे येथा पद्धतीकडून नजर केले व नख्त आकरा मोहरा नजर केल्या व बावाचे पुत्र साबाजी भोसले व बिंबाजी भोसले यांही पाच पाच मोहरा नजर केल्या व भास्करपंताचे पुत्र कासीपंत यांही पाच मोहरा नजरा केल्या. वरकड अमीर उमराव यासीहि वस्त्रे देणे त्यासी बावाही दिल्ही. यैस्या प्रकारे भेटी होऊन नवाबाही रघोजी बावाचे पुत्राचे नावे जाहागीर पाचा लक्षाची दिल्ही. पूर्वीची सनद तीन लक्षाची होती साप्रत दोन लक्ष येकूण पाचा लक्षाची जाहागीर दिल्ही, आणि रघोजीबावासी करार करून घेतला की वाजवी अमल करावा.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

धामधूम मुलुकात करू नये. सुरळीत वर्तावे. यैसा करार करून रघोजीबावा नागपुरास साबाजी भोसले याचे लग्न करायासी गेले. बिंबाजी भोसले याही पाचा हाजारा स्वारानिसी नवाबाची चाकरी करावी पुढे नवाबाही छावणीस हैदराबादेस जावे आणि खानाही आवरंगाबादेस येऊन छावणी करावी यैसे मोंगलाचे लस्कराचे वर्तमान आहे. पुढेंहि जे वर्तमान येईल ते सेवेसी लिहून पाठविले जाईल. रा दादो माहादेव वाघ याची वरात * * बावर दाहा हाजाराची केली. त्या समयात जा * वासी व आम्हासी हर्शामर्ष होतो म्हणून तहास * * आगदीच बंद जाहाली होती. धामधुमीकरिता रुपया वसूल होईना आणि वरातदाराणी रुपयासाठी निकड फार लाविली. वरात फिरवावी तर खांवदांची कैद, वरात फिरविता कामास न ये. मग जरूर जाणोन आठ हजार रुपये कर्ज काहाडून वरातदांरांस दिल्हे. बाकी दोन हाजार राहिले त्यापैकी काही दिल्हे. काही राहिले ते दो चौ रोजात झाडा करून देऊन वाटेस लाऊ. वरातदारास रुपये आठ हजार दिले. व्याज काहाडून दिले. जाधवाचे कलहाकरिता अद्यापि खलीबाद होती ते परीछिन रयेतीस गाव गाव राऊत पाठऊन ताकीद करीत की रुपया वसूल न देणे. तेव्हा जरूर जाणून अंसीहून सिवाजी बलाल यांस आणून काही जमाव नवा मेलऊन से दीडसे जमा होऊन बाम्हणी जाधवाचा पाटीलकीचा गाव तेथे जाऊन तहरह केला. वाजबी चवथाई त्याही घ्यावी. रयेती जवळून जबरदस्तीणे रोखे तिजाईचे कोठे निमेचे घेतले होते ते कमाविसदारानी माघारे घ्यावेसे केले. बारा दिवसाचा वाईदा केला. मध्य जामीन घेतला. याप्रमाणे करारमदार करून त्याजकडील कमाविसदार घेऊन ठाणे मागारी सवछर प्रतिपदेस दाखल जाहालो. गाव गाव खली मोकली जाहाली. वसूल चालीस लागला. चवथाई मात्र वाजबी त्याही धरावी तेवडाच वसूल घ्यावा. चवथाई सिवाये रुपया त्याही घेऊ नये. रयेतीणे देऊन याचप्रमाणे करार जाहाला. माहाराजाही जमीदारास पत्र पाठवावें की चवथाई मात्र जाधवास देणे, तिजाईची कसर सरकारात लक्षुमण नागनाथ याजकडे देणे म्हणून जमीदारास पत्र पाठवावे व जिवाजीपंतास वाजबी चवथाई घेणे म्हणून ल्याहावे. तिजाईस मुजाहीम न होणे याप्रमाणे पत्रे सत्वर पाठविल्यास वसूल झाडुन घेतो. पत्र अक्षेरशाहा वाचून उतर सत्वर पाठवावे. सेवकाचा तेथे रदबदली करावयास वगवसीला सर्व खावदाचे पाये हे विज्ञापना.

¶*Nago Ram reports to the Peshwa the differences that had arisen between him and Jadhav regarding the Chauthai dues, an interview between the Nizam and Janoji Bhonsle and some monetary settlement with Dado Mahadeo Vagh.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 287] *[24-10-1769*

पौ छ ९ रजब कार्तिक मास
गुरुवार सन सबैन

श्रीगज्यानन

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे सेवेसी

आज्ञांकित सेवक विठल सामराज चेरनावर मस्तक ठेऊन सां नमस्कार विज्ञापना. ता छ २३ जमादिलाखरपरियेंत स्वामींच्या कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान येथास्तित आसें. राजेश्री सेनासाहिबसुभा यांजकडील वर्तमान पेशजी विनंतीपत्रीं सविस्तर सुतरस्वाराबरोबर लेखन केलें आहे. विनंतीपत्रे सेवेसी पावलीच आसतील. सांप्रत नवीन वर्तमान राजेश्री बाबूराव कोनेर येथें आले आहेत. त्यांस छ २१ मिनहूस भानुवासरी मुजमूचीं वस्त्रे सेनासाहेबानी दिली. कासीरायाची मातुश्री येथें आहेत. त्यांस दो चौ हजारांचा सरंजाम देनार आसें आहे. दुसरें हैदर नाइकाकडील वकील शामराव गोपाळ हैदरनाइकानें येथें पाठविले आहेत. काल छ २२ रोजीं येथून दों कोसावरते येऊन राहिले. त्यानी सेनासाहिबास रुका लिहून आपल्या कासिदाबरोबर पाठविला. च्यार वटका दिवस राहातां, कासीद येथे आला. कासीद महालास जाऊन मिरध्यास समागमे घेऊन दरबारास आला तो सेनासाहेब स्वारीस बागांत गेले होतें. सेवकहि सेनासाहिबासमागमे स्वारींत होतो. त्यास या मिर्ध्यानि त्या कासिदास भवानीपंत मुनसीच्या घरास घेऊन गेला. त्यानी रुका वाचून पाहिला. तो रुका घे(ऊ)न भवानीपंत बागांत आले. सेनासाहिबांस येकांती वाचून दाखविला. सेनासाहेब भवानीपंतासी बोलले जे, श्रीमंताच्या व आमच्या खल्यांत त्यांस पत्रे पाठविलीं होती व पहिले मीरखलील पाठविला होता, त्याजबरोबरहि त्यांस पत्रें पाठविलीं होतीं ते उतरें आतां आलीं आहेत. आतां श्रीमंताचा आमचां स्नेह जाला. इमाणप्रमाण जाले. दुसरा आर्थ कांही राहिला नाहीं. आतां या वकिलाचे येण्याचे काय प्रयोजन आहे ? नाहक श्रीमंतास कळेल. त्याचे वकील येथें आहेत ते लिहितील. आमच्या चितांत तो दुसरा आर्थ काहीं नाहीं. हे वर्तमान कलल्यावर श्रीमंताच्या चितांत उगाच विपर्यास जाईल. राजश्री मोरोबादादास श्रीमंत येदर्थी विपर्यासेकडून कांही बोलतील. फिरून हे सुदरायास प्रयास लागतील यास्तव नाइकाचा वकील न येऊ द्यावा यात उतम दिसते. त्यास भवानीपंतानी उतर केले जे, तो काये पत्रे घेऊन आला आहे, तो भावगर्भ पाहावा. इतके लांब आला आहे. वर्तमान पाहून त्यास निरोप द्यावा. सेनासाहेबानी मजला जवळ बोलाऊन तो रुका हाती दिला. त्यान लिहिले होते जे, नवाब हैदरआलीखान बाहादर यानी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आपनाकडे पाठविलें आहे. भेटीनंतर सविस्तर निवेदन होईल. आम्ही येऊन कोठे उतरावें ? भेट कधी व्हावी ? हे उतर पाठवावें. हें लेखन रुक्यात होतें. ते सेवकानें वाचून पाहिलें. सेनासाहेब बोलले जे, या रवल्या अगोधर मीरखलील तेथे पाठविला होता. त्यावर या गडबडींत ही पत्रें लिहून, त्यास पाठविलीं होतीं हें खरें. परंतु आता या गोष्टीचें प्रयोजन काये आहे ? श्रीमंताचा आमचा आक्रित्रीम स्नेह जाला. मी आपले घरी देवदेव करीत बसलो आहे. हा उपद्रव कशास पाहिजे ? आतां हा वकील आला आहे. हें वर्तमान श्रीमंतास कलल्यावर त्यांच्या चितांत विपर्यास जाईल. मोरोबादादावर उगाच शब्द ठेवतील. उगेच दुरदराज लागेल. माझ्या चितांत आथःपर कांही दुसरा अर्थ असेल तर ईश्वर साक्षे आहे. हे वर्तमान भवानीपंतानी सांगतांच माझ्या चितात कितीक तर्क आले. यास्तव तुम्हास बलाऊन सांगितले. तुम्ही व भवानीपंत दोघे राजेश्री रामाजीपंत नानाकडे जा. हे पत्रांहे दाखवा. याची सलाहि काये सांगता ते पुसा. त्यानी बलावा म्हटले तर बलाऊं. तेथूनच फिरवा म्हटले तर तुम्हास व भवानीपंतास पाठऊन त्यांस फिरवितों. असें सांगून मजला व भवानीपंतास नानाकडे पाठविलें. हे वर्तमान सविस्तर नानास सांगितलें. नानानी सला सांगितली जे, त्याने इतके लांब वकील पाठविला आहे तर त्यास येथे बलावा. पत्रे काये लिहिली आहेत ते पाहा. भावगर्भ त्याचा मनास आना. तदोतर त्यांसी बोलाऊन बिदा करूं. तेच बजिनस पत्रे श्रीमंताकडेस पाठऊन देऊं. आतां त्यास बोलावा. आदरउपचार करा. ममतायुक्त बोला. येणेकडून त्याचा भावगर्भ कलून येईल. उगाच फिरून वाटे लावला तर पत्रीं काये लिहिले आहे (हा) भावगर्भ कसा कळेल ? तो आसे न करावें. त्यास बोलावा. याप्रमाणें नानानी सांगितले. च्यार घटका रात्र जाली. उभयेतां दरबारास जाऊन हे सविस्तर सेनासाहेबास निवेदन केलें. त्यानी उतर केले जे, नानानी सांगितलें आसलें तर त्यास बोलावा. परंतु प्रातःकाली नानास बलाऊन आना. येकांती बसून हे वर्तमान मी त्यांस सांगेन. ते काये मसलत देतात मी आपली खातरजमा करून घेऊन मग त्यास भेटीस बलावीन आसें बोललें. त्यावर सा घटका रात्रीं त्यास रुका लिहिला. सेनासाहेब बोलले जे, त्यास सिताबर्डीवर उतरू नका. वाटेवर उतरल्यान येनार जानार पाहतील. शोरवत पडेल. भलताच येखादा विपर्यासकडून श्रीमंतास लिहील. त्याच्या चितात कुन्हा जाईल. बागाकडे दक्षेनेस आणून उतरवा याप्रमाणे सांगितले. त्यावर भवानीपंतानी चिठी लिहून हारकारा यानी आपला समागमे दिला. त्यास सांगितले जे, त्या वकिलास बागाजवळ आणून उतरवणे. त्यावर दीड प्रहर रात्रीं दरबार बरखास्त जाला. हे वर्तमान

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

मी जाऊन नानास सांगितले. तदोतर बिराडास गेलो. दुसरे दिवसी आपले दोघे जासूद नेहमी बातनीस बागाजवळ चोर बातनीस ठेवले. प्रात:काली दरबार जाला. नानासहि बलाऊन आनिले. सेनासाहेब व भवानीपंत व नाना येसे आयेने माहलांत येकांती बसले. मीहि जवलीच होतो. सेनासाहेबानी हे साध्यंत वर्तमान नानास आपल्यामुखे सांगितले. पुढें याची सलाह काये? श्रीमंताच्या चितांत किलाफ न पडे, दादास उणा शब्द न बोलेत, चितशुध स्वछेता राहे आसें करा. मजला हैदरनाइकाची आगत्य नाहीं. मागें पत्रें पाठविलीं होती ते वर्तमा(न) म्या निष्कपट तुम्हाजवळ सांगितलें. आतां पुढें काये तरतूद ते सांगा. त्यास नानानी उतर केले जे, उगेच त्यास परतून पाठविलें तर भावगर्भ कसे कळतील? हैदरनाईकहि बाह्यात्कारे श्रीमंतास श्नेहाचीं पत्रें पाठवितो हे त्यामधें त्याने जी पत्रें लिहिली असतील ते पाहून तेच पत्रे आगर नकला करून श्रीमंताकडे पाठवाया कामा येतील. चिंता नाहीं. श्रीमंताचा व तुमचा शुध आंत:कर्णेकरून श्नेह जाला आहे. यांत किमपि विपर्यास पडनार नाही; येतदविसीं नानानी कैलासवासी श्रीमंताचे वेळेचे दृष्टांत फार दिले. बहुत खातरजमा केली. दरम्यान मी आहे. कोणे गोष्टीचा चितात आदेश न आनावा. याप्रमाणे खातरजमेची भाशन जाली. नानाहि बोलले जे, मी आल्याची दुसरे दिवसीच आपन येकांती बसून च्यारी राजकारणें मागे जाली ती व श्रीमंताच्या भेटी जाल्या. श्वछेता जाली. खातरजमा श्रीमंतानी व दादानी केली. तुम्ही त्यासी भाशन केले; ते सविस्तर ते दिवसी मजला सांगितले. माझी खातरजमा जाली. आतांच्या प्रसंगाचीहि सर्वाविसी निशा पटऊ. उभयेपक्षी कल्याण तेच आर्थ होतील. आसे उभयेतानी परस्परे दृढतर बोलनी जाली. तदोतर सेनासाहेब नानासी बोलले जे, मी श्वस्तचिंते आसूं कीं? श्वेस्त आसावे असे नाना बोलले. दो प्रहरां दरबार खास जाला. ते समंई भवानीपंत सेनासाहेबाचे रुबरु सेवकासी बोलले जे, तुम्हींहि आतांच पत्र ल्याह्याची उतावली करूं नका. त्या ग्रहस्ताची भेटी होईल. येका दो दिवसानी मथितार्थ सर्व आपनास येतील. मग तेच पत्रे व आमचें पत्र व नानाचें पत्र व तुमचे पत्र येसी श्रीमंताकडे रवानगी करूं. तोंवर तुम्ही पत्र लिहूं नका. येखादा विपर्यास श्रीमंताच्या व दादाच्या चितांत जाईल. सारा खुलासा कलून घेऊन पत्रे गेली म्हणजे बरे आहे. याप्रमाणेच करूं म्हणून उतर केले. परंतु या जाबसालास येक दोन दिवस आधीकउणे लागतील. वर्तमान कललें पाहिजे म्हणून कोनास न कलत हें तेरखेची जोडी रवाना केली आहे. जोडी पाठवितो म्हणून नानासहि सुचेना केली आहे. दाहा रोजच्या वायेद्याने जासूद पाठविले आहेत. रा॥ सावाजी नानाहीं दारव्याहून कुचे करून कारंज्यास गेले. दरमजल येऊन

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

पोहचतील. सेनासाहेब बोलत होते जे, हैदरनाइकाचे व नबाबाचेहि काही सूत्र आसेल. बसालतजंग व मुराराव हैदरनाइकासी मिळालेच आहेत आसी खबर आहे. नवाबासी आंतस्त सूत्र करून आम्हाकडे साधणेस वकील पाठविला आहे. मनसबा की, आम्ही इकडून व नवाब व हैदरनाईक फिरंगीसहवर्तमान तिकडून यैसे पुण्यावर शह द्यावा. काहीं सूत्र त्याजकडे दादासाहेबाचेहि असेलसें दिसतें. श्रीमंताच्या घरांत व मुतसद्यांत फूट, फौजेचाहि तोच प्रकार दिसतो. हे वाईट. असे नसावें असें बोलत होतें. सुचल्याप्रमाणे उतर केलें. आनीखहि येकदां बोलत होते जे, आमचे दौलतीवर कर्जावामाचा व देण्याघेण्याचा आसा पेंच पडला आहे. सिवाये बंगाल्याची स्वारी. आमची उठवण मोडणार नाहीं. येक वरीस मकसुदाबादेस जायाची श्रीमंतानी आज्ञा द्यावी किंवा मोगलाच्या तालुक्याविसीं श्रीमंतानी थोडसे नाहक त्यावर घ्यावे म्हणजे आम्ही गंगथडीचा घासदाणा जेथवर मोगलच्या तालुक्यांत हाथ पोंहचेल तेथवर घेऊं. म्हणजे थोडी-बहुत उठवण तरी मोडेल. किंवा मकसुबादेस जायाची आज्ञा होईल तरी बरे आहे. येविसी श्रीमंतास लिहून याचे उतर आनवा. आसे बोलले होते. जसी आज्ञा येईल तसे यांसी उतर करीन. दुसरें येथें बाजारी वर्तमान आहे जे, श्रीमंताच्या शेरीरास सावकाश नाहीं. बाहेर निघत नाहीत. आसे काल येका ग्रहस्तानें हें वर्तमान सेनासाहेबास सांगितले. त्यानी मजला पुसलें. उतर केले जे, आमची जासूद जोडी आली. श्रीमंत खुशाल आहेत. ते बोलले जे, आलीकडे आमच्याहि वकिलांची कांही पत्रें येत नाहींत. तुम्हाकडीलहि काही पत्रें येत नाहीत. आसे बोलत होते. आलीकडे आपल्या जासूदजोड्या येथून पाठेवलेल्या दोन तीन महिने जाले. जासूद कोनी येत नाहीं. साबाजी भोंसल्याच्या ये ।।विसीं येथून वरचेवर सुतरस्वार त्यांजकडे जातात की, लवकर जाऊन पोहचां. लोकांचीहि रवानगी वरचेवर करितात. पाहतां येथें स्वःछेता आहे. हैदरनाइकाच्या वकिलाविसीं आगर आनी कोणते गोष्टीविसी परिछिन चितात विपर्यास भात्र न यावा. श्रीमंताच्या पायासिवाये दुसरे लक्षे याचे नाही. फार शोध केला. मागाहून सविस्तर लिहून पाठवितो हे विज्ञाप्ति.

¶*Vithal Shamraj writes to the Peshwa how Janoji was vacillating whether he should grant an interview to the Vakeel sent by Haidar. Janoji himself did not want to grant an interview because there was no necessity for it, as there was now no difference between him and the Peshwa. He was however advised by Bhawanipant and Ramajipant to grant him an interview just to ascertain the motives of Haidar, which might be perhaps to form a great alliance against the Peshwa of himself, Murarrao, the Nizam, the French and the Bhonsle. The writer also refers to the rumour of the Peshwa's ill-health spread at Nagpur.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 288] [*30-10-1769*

श्रीगजानन

श्रीमंत राजश्री रावसाहेब
स्वामीचे सेवेसी

आज्ञाकित सेवक विठल सामराज चेरनावर मस्तक ठेऊन सा। नमस्कार विज्ञापना. ता। छ २९ जाखरपरियेंत स्वामीच्या कृपावलोकनेकरून सेवकाचें वर्तमान येथास्तित असे. जासूदजोडीबरोबर सरकारचे आज्ञापत्र सेवकास व राजश्री सेनासाहेबास येक पत्र छ ११ मिनहूस रवाना केली. ते छ २९ रोर्जी येथें पावली. आज्ञापत्रार्थ पाहून, सेनासाहेबाचे पत्र त्यास दिल्हे. त्यानी पत्र पाहून ते समईच राजश्री साबाजी नानास पत्र लिहिले. व राजश्री भवानी कालोस पत्र लिहिले जे, भाद्रपद मासीं येथून तुम्हांस रवाना केलें असतां आद्याप तुम्ही पुण्यास जाऊन पोंहचला नाहीं; हे उचित न केले. श्रीमंताचा व राजेश्री दादांचा शब्द आम्हांवर पेश जाला. निखालसतेस हे गोष्ट युक्त न केली. सेपनास स्वारानसी जरी तेथें जाऊन पोंहचला तरी चिंता नाही. मागाहून नेमनुकीप्रा। फौज येऊन पोहचती. आपले सरदारीवर वोडगस्ती व हालाकी हें सर्व त्यांस विदित आहे. आपल्याविसी तेथे दुसरा आर्जा किलाफ काहीं नाही. सडे * सरजाम जरी गेला असतां तरी दादा तेथे सर्व सरंजाम करून देते. मागाहून लोकहि येऊन पोहचते. आथ:पर पत्रदरशनी जितके लोक असतील तितक्यानसी थोर थोर मजली करून श्रीमंत पुण्यांत आहेत तो जलद जाऊन पोंहचने. याप्रमाणे नानास पत्र व भवानी कालोस पत्र जे, तुम्ही पे री ने (?) शाहाने मणुश समागमें दिल्हे आहां. नानास मूलच म्हणतील. परतु तेथे शब्द तुम्हांवर ठेवतील. आद्याप कसे गेला नाही? श्रीमंताची पत्रावर पत्रे येतात. तेथें दादाचे मधेस्तीस शब्द लागेल. तुम्हावर रागे भरतील. आम्ही साफ लिहिले आहे जे, येथून बिदा केलें आथ:पर येथील कांही पेच आला तर, शब्द तुम्हांकडे. पत्रदरशनी स्वार होऊन जाणे. जलद निघून जाणे. तिकडे दरकुचे चालला हे वर्तमान इकडे आम्हांस लिहून पाठवा व तिकडे वरचेवर श्रीमंतास व दादांस पत्रे पाठवीत जा कीं, आम्ही येऊन पोंहचलो. आनी दादाचें पत्र आम्हांस लवकर आले पाहिजे की, नाना येऊन पोंहचलें. याप्रमाणें त्यांस पत्रे लिहून सुतरस्वार बिदा केला. आज उद्या सुतरस्वार साबाजी नानाची पत्रें घेऊन येतो जे स्वार होऊन गेलों, जासुदांचा संताजी नाईकहि पाठविला आहे जे, नानास घाट चढून वरते गेले म्हणजे तू आम्हांकडे ये. येथून फार ताकीद आहे. वरकड येथील वर्तमान सरकारच्या सुतरस्वाराबरोबर विनतीपत्री लिहिलेंच आहे. नवीन हैदर

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh
नाइकाचा वकील येथें आला. त्याच्या भेटीचें व बोलीभाषणाचे सविस्तर वर्तमान राजश्री रामाजीपंत नानानी लिहिले आहे. सेवकाचेहि विनतीपत्र आहे. सेनासाहेबानीहि पत्रे सेवसी लिहिलीं आहेत. या पत्राचीं उतरें आल्यावर जसी आज्ञा येईल त्याप्रो येथून त्याची बिदागी करतील. वर्तमान पेशजी विनतीपत्रीं लिहिलीं आहेत. रामटेंकच्या पानवेलीकरितां कारकून व जासूदजोडी व सरकारचा तांबोली यैसे येथें सरकारचीं पत्रें घेऊन आले आहेत. त्यास आज्ञेप्रों रामटेकास पाठऊन सेनासाहेबानी तरतूद करून आडीच हजार वेल त्यांची लावनी करून पांव्या भरल्या आहेत. बतीस पाव्या भरल्या आहेत. त्यास चवसष्ट माणसे पाहिजेत. बिगारीने पाठवावी तर इतके बिगारी मिलनार नाहींत. येक बैलावर माकनी करून दोन दोन पांव्या येका बैलावर घालून सोला बैल हुंडाभाडा करून पाठवावे असी सेनासाहेबानी तजवीज केली होती. त्यास कारकून व ताबोली म्हणूं लागले जे बैलावर वेल निभावनार नाहींत. येका येका पाटीस दोघे माणसे पाहिजेत. असें जाल्याने वेल चांगले पाहचतील. यास्तव माणसे पाहिली तो मनास येईल तसें मागूं लागले म्हणून दाहा पंधरा पालख्या सरकारच्या व मुतसद्यांच्या त्याचे दर पालखीस च्यार भोई आसे चवसष्ट भोई मुकरर करून बालापुरास नेऊन पोहचावावे. तेथून सरकारचे कमाविसदार पुढें पोंहचावतील असें करून येथून भोई देऊन बालापुरास उदईक येथून बिदा करूं. बालापूरच्या व जालन्याच्या कमाविसदारांस तेथून ताकीद कसी होणें ते व्हावी. येथून वेल बिदा केलेच. पानाचे बैलहि प्रस्तुत पाच सा भरविले आहेत. मागाहून वरचेवर पाठवीत जाऊ असें सेनासाहेब बोलले. जासूदजोड्या इकडे येण्यास मना केल्या कीं काये? तैनाती जासूदजोडी येथू(न) च्यार गेले आहेत. आद्याप येत नाहीत म्हणून विनती. सेवेसी श्रुत्य व्हावे हे विज्ञाप्ति. राजश्री दिवाकरपंताचे वर्तमान जे आहे तेंच आहे. चौकी मात्र आहे. आतां त्याजकडे कांही मागावयास पाठवीत नाहींत. ये प्रांती प्रर्ज्येन्याची ओड फार जाली आहे. पेरण्या खरीफाच्याहि नाहींत. रबीच्या आतां होतात. माहगाई फार जाली आहे. गहू हरभरे दर च्यार पायेली, तांदूळ आडीच तीन पायेली, जोधले साडे च्यार पांच पायेली, तूप तीन सेर, तेल साडे तीन सेर, गूळ पाच साहा सेर याप्रमाणें धारण जाली आहे. लाखनवाड्यापासून आलीकडे वराडांत वाट फार नासली आहे. जागा जागा वाटा पडतात. दो चौ जागां माणसें, जासूद मारले पडले आसें यैकिल्यांत आले. सरकारच्या जासूदजोड्या पुण्याहून बिदा जालियावर वाटेन इतके दिवस कां येईनात? कोठे दगा न व्हा किंवा पुण्याहूनच बिदा नाही केले, हे न कल. देखिले यैकिले वर्तमान सेवेसी

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

श्रुत होये. खर्चाची फार आबळ आहे. माहागाई याप्रकारची. स्वाम कृपाळु समर्थ. हे विज्ञाप्ति.

¶*Vithal Shamraj to the Peshwa saying that Janoji Bhonsle has sent urgent despatches to Sabaji and Bhavani Kalo to proceed to Poona at once. He further informs him that arrangements have been made by Janoji for carrying safely to Poona betel leaf creepers of Ramtek. Incidentally he refers to the arrival of Haidar's Vakeel at Nagpur.*

No. 289] [*October 1769*

[पत्र विठ्ठल शामरावाचे. पहिलीं तीन पानें मिळालीं नाहींत. चौथ्या पानापासून]

आम्ही आपल्याकडून होऊं देनार नाही. आतां साबाजीबावास पाठविले आहे. त्यानी साबाजीबावासच बगलेत घेऊन, आम्हावर स्वारी केली तर, आम्ही त्यास नको म्हणार नाहीं. जे त्यांच्या थोरपनास उचित असल ते करोत. आमचा व दादाचा श्रीमंताचे रुबुरू करार आहे जे, नानानी फौज घेऊन स्वारीत जात जावें. आम्ही दोन वर्षें मुलकाचा बंदोबस्त करावा. तदोतर येक स्वारी बंगाल्यात करावी. तिकडील मुलकी बंदोबस्त करून तिकडून पैका आणून कर्जवामापासून आदा व्हावे. पुढे आपन जात जावें. याप्रमाणें श्रीमंताचे रुबरू करार जाले आहेत. इतक्यावर तिकडूनच करार नाहींसा जाला तर आमचा उपाये काये? समर्थ आहेत. याप्रमाणे बोलले. पाहता बारीक शोध फार करता कोठे किलाफ दिसून येत नाही. बाजारी आफवा ज्या येकिल्यांत येतात ह्या लटक्या. परिछिन येथें दुसरा आर्थ दिसून येत नाही. आफवेचे बाजारी वर्तमान येखाद्याने लिहिलें तर धणी दूरआंदेश कृपाळु समर्थ आहेत. दिवाकर-पंताचा मजकूर सेवकास पत्रीं आज्ञापिला होता. तो मनन करून जबानी सांगितले जे याप्रमाणे येथून पत्रें गेलीं म्हणजे त्यांविसी तेथूनहि आक्षेप होनार नाही. उतरेहि येतील आज्ञेप्रमाणें सांगितल्यावरून सेनासाहेबानी सेवेसी पत्रें लिहिलीं आहेत. आथ:पर दिवाकरपंताविसी तेथूनहि आक्षेप कशास होईल? हरयेक दुरोक्ती वर्तमान कोणी भलते लिहितील त्यावरून स्वामींच्या चितांत किलाफ न जावा. सेनासाहेबाविसीं श्रीमंताची खातरजमा पेशजी आपन केली आहे ते खरीच आहे. येथे दुसरा आर्थ किमपि दिसत नाही. साबाजी नानास सेनासाहेबानी फार ताकीद केली आहे जे, जितके लोक येतील तितक्यानसी लवकर जाऊन दादापासीं पोहचां. आधी दादांची भेट तदोतर

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

श्रीमंताची भेट. लवकर जाऊन पोहचां. आम्हांविसीं श्रीमंताचा शब्द रतिमात्र दादांस न लागें यापमाने फार ताकीद केली आहे. तुम्ही तेथे पोंहचल्यावर मागाहून फौजेचा वगैरे सरंजाम दादा जे सांगतील त्याप्रमान लिहून पाठवीत जा. येथून पोंहचेल. याप्रमाणें येथून आज्ञा जाली आहे. सेवकाने नानाबरोबर यावे किंवा कायें ते आज्ञा करनार स्वाम समर्थ. सेनासाहेब बोलले जे, श्रीमंतासी वाईट करून आमचेने दक्षेणेचा बंदोबस्त होईल कीं काये? हे हाक त्याचेच होयेत. मुख्ये गोष्ट श्रीमंताच्या कल्यानांत आमचे कल्यान. त्यानी आम्हांवर लेकराप्रमाने कृपा करावी. आम्ही त्यांजपुढे तरवारा माराव्या. ईश्वर मरण देईल तर, त्याच्या पुढे रणां कतल व्हावे. आनीक आंम्ही कांही अऊतकाठी करणें नाही जे करावी. आम्ही त्याचें असतां त्यानी आवकृपा करावी हे उचित नाही. च्यार वरषे आगर सुईच्या विंधाच्यातून वोढले तर वोढून घेईन यांत कृपा करून माझे ऊर्जीत निष्कपट केले तर मी सेवकच आहे. या चौ वर्षांत फिरून किलाफच राखू लागले तर, माझ्या चितास येईल ते मी करीन. मग मजवर शब्द नाहीं. आतांहि नानास पाठविलें आहे. हा भाऊ तर पुत्र तर ये दौलतीचा आधिकारी होये. श्रीमंताचे सेवेसी पाठविला आहे. आगर यासच बगलेंत घेऊन श्रीमंतानी मजवर स्वारी केली केरोत. हे कबूल आहे. परंतु चाकराची जरब सोसेना. यातील भाव जे, दिवाकरपंताचे कितीक लाहन मोठे बोलणें हे सोसेना. जेनवाक्ये कीं, दिवाकरपंत श्रीमंतास मिळून येखादा भाऊ बगलेत घेऊन यांजवर उपद्राप करील. त्याजकडून येखादी गोष्ट व्हावी ते कशास? भाऊच तेथे पाठवावा. श्रीमंतास उचित ते करतील. मुख्ये गोष्ट दादा मातबर दरम्यान आहेत. हरयेकविसी श्रीमंताचे मर्जीत आतर पडू देनार नाहीत. आपन तों कायावाचामनसेकरून श्रीमंताचे पाये धरले आहेत. येकनिष्ट, दुसरा आर्थ किमपि राहिला नाहीं. यावर कोणाच्या लिहिल्यावरून आगर सांगितल्यावरून श्रीमंत येखादा आघात आपनावर करतील. तोहि च्यार वर्षे सोसावा. तदोतर ईश्वरावर हावाला देऊन मग जे ईश्वर करवील ते सुखी हों. याप्रमाणे बोलणे फार जाले. याची उतरेहि त्यांची खातरजमा होये आसी ये * * * धी करून उतरे केली. बहुत संतोशयुक्त * * त आज भाद्रप (द) शुध ७ सप्तमी गुरुवासर प्राथःकाल दिढा घटका गुरूच्या होन्यावर राजश्री साबाजी भोसले डेरेंदाखल जाले. सेनासाहेबहि समागमे बाहेर पोहचावयास गेले. सेवकहि गेलो होतो. प्राथःकाली स्वारीचे वेळेस आंबारीच्या हातीवर नागा बावा गोसावी आंबारीत बसून पुढे त्यांमागे साबाजी नाना हवद्यात पोशाग मंदील डोईस सुभ्र जामा पैठनी पलेदार, पासोडी कमरेस, किनखापेची विजार,

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

गला मोत्याची कठी, याप्रमाणे पाशाग करून हवद्यांत बसून स्वार जाले. दोन घटका दिवसा डेरे दाखल जाले. सेनासाहेब आर्ध घटका तेथे बसले. त्यावर गोसावीबावा येकीकडे बाहेर बसले होते. त्यांजवळ उभयेता बंधू येऊन बसल. आर्ध घटका बसून गोसावीबावासुधा सेनासाहेब स्वार होऊन शहरांत आले. हवेलीदाखल जाले. लोक नऱ्होजी जाजक व मालजी भोसले समागमे पोहचायास आले होते. त्यास सेनासाहेबानी आज्ञा केली जे, तुम्ही डेऱ्याजवलीच राहा. शहरांत येऊं नका. कोनी कोनी आर्ज केला जे आम्ही आपला सरजाम करायास आपलाल्या गावास जाऊन दुसरे तिसरे दिवसी वरधेच्या आलीकडे नानास येऊन मिळतो. त्यास निक्षून आज्ञा केली जे, आपले कारकून माणसे (पाठऊ) न सरजांम आनवा. येथून आज्ञा देण्यास आनकूल पडत नाहीं. जलद दसऱ्याच्या आलीकडे जाऊन पोहो(च)ले पाहिजे किंवा दसऱ्याचे दिवसीं जाऊन पोहचावे. याप्रमाणे ताकीद येथील आहे. दो हजारा लोकांची नेमनूक आहे. येथून तों पांचसे स्वार देखल्यात येतात. जागा जागा वराडांत आलीकडे पलीकडे मिलतील. आमके लोक आसे * * लिहिता येईना, ही याची ताकीद तर आसी आहे. जे सेवटी पांचाशानसी दसऱ्यास जाऊन पोहचां आसी निक्षून ताकीद जाली आहें. नदीनाले प्रज्येन्यास उपाये नाही याप्रमाणे वर्तमान. साबाजी नानाबरोबर आपले कोनी नाहीं. सेवकाने यावे तर आज्ञा आली नाहीं. यास्तव जासूद मात्र समागमे आपले दिल्हे आहेत. खर्चास दोनसे रुपये पाठविले म्हणून पत्री आज्ञा, कोनाजवळ दिल्हे किंवा परवानगी मात्र आली हे नकले. खर्चावाचून फार हैरान आहे. कर्ज पुष्कळ जाले. कृपा कर * * * समर्थ. येथे जे करणे ते विकताचे. खर्च लागता दिल्ह्यावाचून सेवट नाही. आसा प्रकार येथे आहे. स्वाम तो रागे भरतात. उपाये काये करू? वामोरीच्या वृतीचें स्मरण आसावे. हे विज्ञाप्ति. मागाहून जोडी लवकरीच रवाना करितो * * * *

¶*Vithal Shamraj to the Peshwa informing him how Janoji had some misgivings regarding the Peshwa's attitude towards him. He further writes " Janoji is quite firm in his allegiance to the Peshwa but he suspects that the Peshwa with Diwakerpant and anyone of his brothers might turn against him at any time. He has however given definite orders to Sabaji to proceed to Poona and join the Peshwa without any delay." The first three sheets of the letter are missing.*

2166

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 290] [*11-11-1769?*

पो छ १० साबान

श्रीगजानन.

श्रीमंत राजश्रीं पंत
प्रधान स्वामींचे सेवेसी

विनंती. सेवक गणेश बलाल कृतानेक सां नमस्कार विज्ञापना. ता। छ ११ रजबु पावेतो वर्तमान येथास्थित असे विशेष. सरकारचा यैवज खाली सध्या येणे. त्यासी पुणेयासी द्यावा म्हणोन राजश्री जानोजी भोसले याणी मान्य केला. त्यासी अनकूल पडिले नाही. मग राजश्री लक्ष्मणपंत व राजश्री गणेशपंत यासी करार केला की पैठणास यैवज देतो. त्यासी आम्हास समागमे दिल्हे आणि पैठणी यैवज देतील तो घेऊन येणे. त्यासी पैठणी तो मुकामच केला नाही. पैठणाच्या आलीकडे येऊन तीन कोशावरी मुकाम केला; तेथे विनंती केली. त्यासी उतर दिल्हे येका महिन्याची मुदत केली आहे. लाखणवाडे घाटाखाली वराडात आहे, तेथे गेलियावरी वराडचे कमाविसदार येतील. मुदतहि होईल यैसे बोलोन लाखणवाडियासी आलो. तेथे विनंती केली तेव्हा आठ चहू दिवसी देतो यैसे म्हणोन दररोज कूच करीत नजीक आकोले येथ पावेतो आलो. येथे फारच त्याची आमची जाली. त्यासी राजश्री त्रिंबकजी राजे व राजश्री देवजीपंत याणी राजश्री जानोजी भोसले यासी बहुतां प्रकारे सांगितले कीं श्रीमंतासी सर्व प्रकारे खरें असावे यात श्रेयस्कर आहे. याचे तपसिल फारच बोलिले त्यावरून तूर्त आठा चहू दिवसात निमे यैवज द्यावा यैसे बोलिले आहेत. राजश्री व्यंकटराऊ यांचा व राजश्री जानोजी भोसले याचा यैवजाकरितां येक दिवस तट पडोन त्रितय प्रहरपावेतो दरबारी बसले होते. त्याजपासी बोलिले की या यैवजाची तूर्त रवानगी करीत नाही; तरी आमची गणेशपंत नालिस्तहि लिहितील व श्रीमंत प्रमाणच मानितील. तरी आम्ही याउपरी तुम्हापासी राहिल्याचे सार्थ काये? आम्ही श्रीमंताकडे निघोन जातो. त्यासी अड खाऊन बसले. मग राजश्री जानोजी भोसले याणी राजे व देवाजीपंत यासी पाठऊन बहुता प्रकारे सांगोन दरबारास घेऊन गेले. मग राजश्री जानोजीबावा याणी समाधान केले. यैवजहि सत्वरच देतो परंतु हातास येईल तेव्हा खरे. सर्व करजदार व सिलेदार यासी पैठण वराड म्हणोन घेऊन आले. त्यासी वराडचा यैवज सर्व काही पुण्यास नेला. काही येथील फौजेने खादला. आता वराडचा यैवज च्यार लक्ष पावेतो घासदाणा व बंगाल्याचा थोडासा दोन लाक इतका त्यासी सरकारचा यैवज याजकडे येणे पनांस लक्ष बारदाराचा देणे, यासिवाये सिलेदाराचा देणे; इतके

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

असोन सरकारच्या यैवजाची कलकल. येथे राजश्री त्रिंबकर्जी राजे व राजश्री देवाजीपंत व राजश्री व्यकटरामासी तो यैसे जाले आहे कीं गणेशपंत रिकामा गेला म्हणजे तूर्त आम्हावरी खावंद रागेजतील. यैसी चोप धरितात. सेवेसी श्रृत होये हे विज्ञापना. वरकड सविस्तर दरबारचे वृत राजकी वगैरे लिा आहे, त्यावरून विदित होईल हे विज्ञापना.

¶*Ganesh Ballal reports to the Peshwa his inability to get money out of Janoji Bhonsle who had to meet several demands.*

No. 291] [*December 1769*

श्रीलक्ष्मीकांत

पुरवणी श्रीमंत राजश्री दादा
स्वामीचे शेवेसी

विज्ञति रा साबाजी भोसले याची खर्चाची तंगाचाई जाली. यास कर्जवाम मागावयास लागतील. सावकार कोणी पैसा देणार नाहीत. उपास होत चालिले म्हणजे मागण्याचा उपद्रव करितील. त्यास दाहा वीस हजार द्यावे न द्यावे हे गोष्ट आपण लिहिली यैसी कलू न देतां सूचना करून लिहून पाठवणें म्हणून पत्रीं लिहिलें होतें. त्याप्रमाणेच आपल्याकडील गोष्ट कलूं न देतां पुसिले. त्याणी उतर केले कीं, बेगमी कसीहि केली तरी परदेशामध्यें संकट पडेल. श्रीमंत धणी आहेत. सांभालून नेतील. अथवा उपवास पडो देतील. राजश्री दादाजवल कर्ज येकंदर मागों नये. श्रीमंत तेच दादा कृपा करून चालवितील ते थोडके आहे. संकट पडलें तर तुमच्या चिरंजिवाजवल मागतील. त्याणी आपल्या पतीवर पंचवीस हजारपर्यंत द्यावे आणि देतील. त्याचा जाब रा साबाजी नानांचा पाठऊन द्यावा. त्याप्रा तुमची निशा करून देऊं. तुंम्ही चिरंजिवास लिहून पाठवणे. आंम्ही तों जातेसमई सांगितले आहे व लिहून पाठवितों. याप्रा उतर केले. यैशास चिरंजिवास लस्करात पैका मिलणे व इतकी पत आहे हे आपण जाणतात. मध्यें पडदा मात्र. चिरंजीव त्यांची विनंती करितील. फारच संकट पडेल तेव्हा गरज चालवावी. पंचविसापर्यंत चालविल्यास येथून निर्वाह करून देतील. आपल्याठाई फारच निष्ठा धरितात. मुख्याचे भाषण खरे. आंत बाहेर द्वैत नाही हे पूर्वीहि ठाऊक होतें. परंतु कारभारी यामुलें इतबार नव्हता. आतां खाशासीच गाठ आहे. यामुले खरे भासतें. रा बाबूराव कोनेर सागितले काम करितात. मसलतीमध्यें नाहींत. भवानीपंत मुनसी सर्व कामांत आहेत. परंतु श्रीमंतांच्या लक्षाविरहित चाल

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

नये यैसा निश्चय येजमानाचा पाहून कुटिल मनसबा सांगितल्यानें काढूनच देतील हे भय मानून सरलच चालतात. मागील दिवाकरपंताच्या कारभारांत मामलेदारानी व कारकुनानी सरकारांत येक रुपया व पांच मध्येच भक्षावे याप्रा जाले आहे. चौकसीने बाहीर पडत चालिलें आहे. परंतु ब्राह्मण अफू घेऊन बैसतात. वाजबी पैसा देत नाहीत. हेच खटपट फार करून होत आहे. दिवाकरपंतांस चौकी आहे तैसीच आहे. तो आपल्याजवल काही नाहीं म्हणतो. यांस रुजूमोझे सांपडले आहेत. त्याप्रा जालियावाचून मुक्त करीत नाही म्हणतात. कोणत्या प्रकारास जाईल पाहावें. कृपा करावी हे विनंती.

¶*Monetary difficulties of Sabaji Bhonsle are reported to Moroba Dada to whom, the writer says, he looks up for support. Sabaji has full faith in the Peshwa and his Diwan. Bhavani Munshi cannot but adopt a straight policy. Strict vigilance continues to be kept on Divakerpant.*

No. 292] *[16-12-1769*

श्री

राजश्री मोरोपंत दादा गोसावि यासी

॥ अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्नो जानोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीय कुशल लिहीत आसिले पाहिजे. विशेष :—आपण पत्र पाठविले ते पावोन लिहिला आभिप्राये आवगत जाहाला. हैदरनाईक याजकडील पत्राचे उतर व वकिलाची बिदाई राजश्री रामाजी बलाल याचे पत्री लिहिले आहे त्याप्रो करावी, रुतंबा+ न वाढवावा. म्हणोन विस्तारे लिहिले. ऐशियास राजश्री पंतप्रधान याचा व हैदरनाईक याचा विरोध वाढला असता त्याचे वकिलाचा व उतराचा रुतबा कैसा वाढेल? त्यांचा शत्रू तो आमचा शत्रू. लक्षावधि लाभ व्हावयाचे आसिले तरी त्याची इछा धरीत नाही. येक राजश्री पंतप्रधान याचे स्नेहाची आभिवृधी दिनप्रतिदिनी व्हावी हे चितापासून आवश्य. आन्यथा विचार होणेच नाही. हा आपण निशा आसो घ्यावा. येतद्विशई वारंवार ल्याहावे तरी उपरोध दिसोन येतो. आपले लिहिल्याप्राच हैरदनाइकाचे पत्राचे उतर व वकिलाची रवानगी केली असे. तपसीलवार राजश्री रामाजीपंत लेहून पाठवितील त्याजवरून कळो येईल.

+ Stage, degree.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

राजश्री पंतप्रधान याची व आपली भेटी चिरंजीव राजश्री नाना[1] याची जाली. त्यास सर्व प्रकारे आपणच प्रसंगी आहेत, तेथे वारंवार काये ल्याहावे ! आपणास इकडील आगत्यवाद आहेच. परामृशास व साहित्यास अंतराये होणार नाही, हा भरोसा आहे. सूचनार्थ लिहिले असे. गंगथडीचे घासदाणियाचा मजकूर रा महिपतराव विस्वनाथे[2] याणी लेहून पाठविला की नवाब घासदाणियाची निशा करून देणार आंहत, राजश्री पंतप्रधान यास लेहून पाठविले होते, ऐशियास नबाबानी पैका निशा करून देणे हे गोष्ट दूर आहे. कालहरणावरी घालावे, जंगलचा पसारा गोला जाहाला म्हणजे आणीक गोष्टी सांगावी, हा विचार दिसोन येतो. याउपरी आपण घासदाणियाचा प्रकार नवाबाच्या ध्यानात न आणावा. सरकारचे माहाल आकरा तहनामियात तेथे घासदाणियाचा उपसर्ग लागणार नाही. यासिवाये दोन च्यार आणीक कोणते माहाल सरकारचे आहेत तेहि लेहून पाठवावे. त्यासहि उपद्रव होणार नाही. जे कर्तव्य ते आपले लिहिल्याप्रमाणेच होईल. गंगाथडीस फौज पाठवावयाचे दिवस हेच आहेत याजकरिता राजश्री सिवाजी केशव यासमागमे फौज देऊन रवाना केले आहेत, आपणास कळावे . वरकड कितेक अर्थ राजश्री रामाजीपंत आपणास लेहून पाठवितील त्याजवरून अवगत होईल. यासिवाय हुसेंगाबाद व गढे येथे फौज पाठवावी आपण न जावे, या अर्थी ममतेने लिहिले. त्यास आमचे ठाई माया व जे सला नेक ते लिहिली. फौजच पाठवण्यात येईल. भोपालवाले नवाब व गढ्याचे राजे हे आपणास लिहितील व वकील पाठवितील ते रदबदल मानू नये. निक्षुण्य ताकीद करावी. सिवाजी केशव गंगथडीचे कामाविसी जे लिहितील व महिपतराव विस्वनाथ बोलतील त्याप्रो वरचेवरी साहित्यपत्रे पाठवीत असावी. येथील कोण्ही येक विचार रा रामाजीपंत याजवेगला नाही. याची साक्ष त्याचे त्यास प्रत्यास आली आसे. ते लिहितील त्याजवरून कलो येईल. चिरंजीव याजसमागमे खर्च भारी व तिकडील प्रकार महर्गतेचा याचा सांभाल सर्व आपले स्वाधीन आहे. ल्याहावे हा उपरोध दिसतो. नवाब कासमआलीखा सुभेदार बंगाला हे सुज्यायेतदौला याजवल आले होते. उभयेता येकत्र होऊन फिरंगियासी लडाई केली, सिकस्त जाली. त्याजवरी ते घरी बसले आहेत. येक दोन पत्रे आम्हाकडे पाठविली की तुम्ही मदत कराल व फौज द्याल तरी बंगाला सर करितो व तुमचा यैवज जो

[जानोजीचा शिक्का]

---

१ साबाजी भोसले. २ बिनीवाले.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

बंगालियात आहे तो देतो व खर्चायास फौजेस मदत करितो यैसे लिहिली आली आहेत. त्यास फिरंग्याजवल आम्हाकडील उदेपुरी गोसावी च्यार वर्षे आहे. त्यास ते रुपये देत नाहीं. खाली जाबसांल मात्र लिहितात. जोपर्यंत तिकडील यैवज येत नाही तोपावेतो बोढ वारत नाहीं. याजकरिता कासमआलीखान यासी पत्रे लेहून ग्रहस्त पाठविला आहे की तुम्ही नर्मदेवरी येणे. तुम्ही आलियावरी फौज तुमचे समागमे देऊन कटकास बिदा करून देऊ. तेथील फौज व हे येकत्र होऊन बंगालियात जावे आणि बंगाला सर करावा. म्हणोन पत्रे व ग्रहस्त पाठविला आहे. येतद्विशईचा इतला आपणास आसावा. याजकरिता लिहिले आहे. रा छ १७ माहे शाबान +आपले लिहिल्याप्रा हायदर नाइकाचे उतर लेहून नकल आपनाकडे पाठविले आशे. जेथे दुसरा अर्थ नाही तेथे गुता काय? वरकड घासदान्याचा मजकूर नवाबाचा कालहारनाचा आहे त्यास निक्षुन्य लिहिन्यात यावे. फऊज गेली आहे. हे सालाबादप्रा पइका वेईल. चिरंजीव याची भेट जाली. आपन आलियावर बोलन होईल. येविसी आपनास ल्याहावे तर उपरोध दिसतो. सर्व प्रकारे या दवलतीचा भार आपन घेतला आहे. त्याप्रा निरवाह आपन करतील हा (भर)वसा आहे. बहुत काय लिहिणे? लोभ आसू दिला पाहिजे हे विनती.

मोर्तब
सुद.

¶*This is a letter addressed by Janoji to Moroba Dada Fadnis who was the Secretary of the Peshwa. The letter mentions how completely Janoji was supporting the measures advocated by the Peshwa and how very friendly he was towards him. The letter incidentally mentions that Mirkasim asked Janoji's help to conquer Bengal back from the British, a project which was not accomplished.*

No. 293] *[24-12-1769*

पौ छ ९ सवाल

श्रीगज्यानन

श्रीमंत राजश्री दादासाहेब

स्वामीचे सेवेसी

आज्ञांकित सेवक विठल सामराज चेरनावर मस्तक ठेऊन सां नमस्कार विज्ञापना. ता छ २९ साबान परियेंत मुा नागपूर येथे स्वामीच्या कृपावलोकने-

+From here the writer's own hand.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

करून सेवकांचे वर्तमान येथास्तित आसे. येथील वर्तमान पेशजी विनंतीपत्री सेवेसी लिहिलें आहे. राजश्री साबाजी नानाच्या श्री जेजोरीचे मुकामी श्रीमंताच्या भेटी जाल्या. बहुत सन्मानयुक्त श्रीमंत भेटले. ते वर्तमान राजेश्री सेनासाहेबास राजेश्री साबाजी नानानी राजेश्री भवानी कालो यानी विस्तारयुक्त लिहिले ते पाहून बहुत संतोश सेनासाहेबास जाला. श्रीमंताची व आपली पत्रे राजश्री रामाजीपंत नानाच्या पत्रात येकच लाखोटा होता; ते पत्रे नानानी पाहून सेनासाहेबांस सारी पत्रे वाचून दाखविली. नानाच्या पत्रांत हैदरनाईकास पत्र कसे ल्याहावे व शामराव गोपाल यांची याची रवानगी कसी करावी ते अर्जा सविस्तर आपन लिहिले होते. तेहि सेनासाहेबांस वाचून दाखविले. सेनासाहेबहि बहुत संतोश जाले; बोलले जे, श्रीमंताची व दादांची आज्ञा ज्याप्रमाणे येईल त्याप्रमाणेच वर्तनूक करणे आम्हास युक्त. नानासी बोलले जे, तुम्ही व भवानीपंत मुनसी येकत्र बसून हैदर नाईकास व मुराराव घोरपडे यांस पत्रे लिहिन्याचे मसुदे करून चिटनविसाकडून पत्रे तयार करवा. पत्रे जाली. तयार जालियावर शामराव गोपाळ यांची रवानगी करूं याप्रमाणे नानास सांगितले. त्यावर दरबार बरकास जाला. दुसरे दिवसी भवानीपंत मुनसी व नाना चिटनवीस यैसे उभयतां नानाच्या घरास आले. येकीकडे बसून आपली पत्रे फिरोन आवलोकन करून सर्व अन्वये ध्यानास आनून मसुदा दोही पत्राचा ठराविला. भवानीपंती सेनासाहेबास दाखविला. मसुदा पाहून फार संतोश जाले. त्यावर आज्ञा केली जे चिटनविसाकडून पत्रें तयार करवा. येका दिवसांत पत्रें तयार जालीं. त्यावर छ २० मिनहूस शामराव गोपाळ यास बिदागीस दरबारास बलाविले. नानाहि दरबारांतच होते. वस्त्रे आनऊन पैठनी, तिवट व शालजोडी व जामेवार छीटजोडी व किनखाप या प्रमाणे च्यार वस्त्रें शामराव गोपाळ यांस दिली. पत्रांच्या नकला करून आधींच घेतल्या होत्या. हैदर नाईकाच्या पत्राची थैली व मुरारायांच्या पत्राचा लाखोटा येसे मारनिलेजवळ दिले. विडे देत होते, तो वकील बोलले जे आज वर्जे वार आहे. उदईक विडे घेईन. यानीहि मान्य केले. राजश्री मुधोजी भोसले यांचे पुत्र व कुटुंब येथे आले आहे. तेहि दो चौ रोजानी येणार. त्याच्या पुत्रासह ते समईच शामरायानी तासी पोशाग आनिला होता, तो त्यांस दिल्हा. त्यावर दरबार बरखास जाला. त्यावर वकीलानीं भवानीपंतासी कांही खर्चावेचाचा जाबसाल (अपूर्ण)

¶Sabaji Bhonsle interviews the Peshwa at Jejuri. Senasaheb Subha and his Minister Bhavani Kalo discuss and settle the draft of letters for Haidar and Murarrao Ghorpade.

2172

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 294] [*20-3-1770*

पो छ १८ जिल्हेज सबैन

श्री

सेवेसी विज्ञापना राजश्री सखाराम बापू लस्करात आल्यावरी आपले तीलगुलाची थैली व पत्र होते ते प्रविष्ट करून जाब घेऊन पाठविला आहे. वरकड इकडील वर्तमान अलाहिदा पत्री लिहिले आहे त्याजवरून विदित होईल. नारो शंकर आजच येऊन भेटले. भा(प)कर व कवडे याजबा आले नाहीत. मागाहून येत आहेत. रा छ ३२ जिलकाद सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना.

¶*The arrival of Sakharam Bapu and Naro Shanker in the army is communicated in this chit.*

No. 295] [*6-10-1770*

श्री

सेवेसी बाळाजी बापुजी केळकर साष्टांग नमस्कार विज्ञापना. ता छ १६ जमादिलाखर मुा मौजे पदमावती पो धोवड येथास्थित असे विशेष. को अंबडापूर येथे मुकाम केला ते समई केतजी आटोळे येऊन भेटले. त्याणी आवाई घालून कूच करविलें आणि मौजे आराड (?) येथे पश्चमेकडे मावारे आणिले. ते समई संध्याकाळीं च्यार घटका दिवसास १४ जााखरीं लस्कारांत फौजेचा छापा आला म्हणौन आटोळे याणीं गुल केली ते समई मोठी खैर जाली. लोक जीन ठेऊन कितेक ढालेपुढे गेले. गोटांतील राहुट्या पाडिल्या. जरीपटका पुढे नेला. नोबत केली. तमाम फौज कोसावर गेली. तो फौज छापा कोणाचा नाहींसारिखा जाहला. त्या गडबडीमध्यें आटोळे गोदरीनजीक होते त्याणी लुटावें याप्रमाणें करून गुल केली; परंतु श्रीमंताचे प्रतापेकरून निभावणूक जाहाली. कुल मसलत हरी माहादेव व केतजी आटोळे याणीं करावी. ज्यामार्गे नेतील तसे जावें हलीचा मुकाम रानांत घातला आहे. केतजी आटोळे यांची कर्मे मनास आणितां ब्राह्मणाचे वध अनिवार व लूट मारहाण कितेकप्रकारें या मुलुकांत केली आहे कितेक फिर्यादी येतात ते कर्ण श्रवणी आइकू नये. खंडोजी आटोळे भवानजी आटोळे याचे भाऊ छ १५ जााखरीं भेटले त्याचा बहुमान सरलस्कर यांणी केला. या प्रांतीचे सरकारचे कमादार यांजकडील कारकून वगैरे ममतेने सांगतात की तुम्ही केतजी आटोळे व खंडोजी याचे संगतीने लुटून जाल. पाय-उतारा देशी जावे लागेल या प्रो यांचे इमान आहे. हली लस्करची फौज तजावजा

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

आहे कूच करणे तर केतजी आटोळे जेथे ठेवितील तेथे राहावें. आटोळे यांचे गांवी वैरण लांकडे बिनी भेट देखील घ्यावयाची परवानगी नाहीं. मुकाम करणे तर सरकारचे गाव पाहून करितात. सरलस्करची फौज जाऊन भोसले याचे साहित्य करावे तर भवानजी आटोळे मुधोजीकडे चाकरीस आहेत त्याचेच लगामी सरलस्कर लागले आहे. पुढें साबाजीचे साहित्य होणे तोहि प्रकार समजलाच आहे. येथील लोक कितेक आहेत, तेहि सरलस्कर यांस टाकून यावें इतके मात्र राहिले आहे. यांचे कारण आटोळे यांजकडील कारकून हरबाजी माहादेव व त्या अलीकडे केतजी व खंडोजी आटोळे यांचे मसलतीसिवाय कांही करीत नाहीं. फौजेस आटोळे एकाधे रान पाहून लुटतील याप्रो लोक बोलतात. हली राजश्री विसाजी कृष्ण तपती चांगदेव तापीतीरी आले आहेत त्यांस पत्रे पाठऊन आजणठ्याचे खा(घा?)टी नजीक त्यास मुकाम करावयास सांगून साबाजीस मिळावे असी मसलत लोकांनी योजिली आहे परंतु त्याचे चितास येत नाहीं. आटोळे याणी मसलत केली आहे कीं कोणत्याहि रानांत फौज घालवावी आणि लुटून घ्यावें असी जनवदंता जाली आहे. फौज साबाजीस न मिळतां डोकीचे पागोटे व घोडे माणूस संभाळून देशी आली तर फार आहे, याप्रो येथील वर्तमान आहे. कोणाचे सांगितले सरलस्कर आइकत नाहीं. आटोळे व कारकून आटोळे यांचे सांगतील तेणेप्रो करितात. आजच शनिवार रात्रौ अंबडापुरावर दहा हजार फौजेनसी रघोजी भोसले आले. या मुकामाहून चौदा कोस आहे. विस्तार लिहिता येत नाहीं हे विज्ञापना. सरलस्करचे मर्जीने चालतो हे विज्ञापना.

¶*Balaji Bapuji Kelker describes the disorder caused in the army by a false rumour of an attack, and further says that he had to proceed very cautiously and with great risk accompanied as he was by Kataji Atole against whose faithfulness there were several reports.*

No. 296]

[*22-11-1770*

श्री

श्रीमंत राजश्री दादा स्वामीचे सेवेसी

सेवक भवानी कालोजी कृतानेक सां नमस्कार विनंती. येथील क्षेम ताा छ २३ माहे रजबपावेतो स्वामीचे कृपेंकडून येथास्थित असे विशेष. आपले पत्र येऊन पोहचलें कीं, श्रीमंत राजश्री रावसाहेबानी लिहिलं आहे त्याजप्रमाणें पंढरपूरचे सुमारें जावें. ऐसियासी त्यांचे व आपले पत्रापूर्वींच मौजे गारदौंड येथें येऊन मुकाम जाला आणि आपणाकडे राजश्री नागोराव यांसी पाठविलें कीं, आपण प्रसंगास येऊन भेटीचा योग घडवावा आणि श्रीमंत राजश्री बाबासाहेबांचीहि आज्ञा कीं, राजश्री दादाचे विचारेंच वर्तणूक करावी. त्यासी, श्रीमंत

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

राजश्री पंतप्रधान यांची पत्रें दोन प्रहर रात्रीस येऊन पोहचलीं की, तुम्हांकरितां श्रीजेजुरीस मुकाम आहेत; तरी आति सत्वर यावें. पुढे पांचसात रोज दिवसहि उत्तम नाही म्हणौन सुक्रवारीं प्रहरा दिवसानंतर भेटी व्हाव्या हा निश्चये करून सुप्यांपलीकडील कोसावरचा मुकाम नेमून कूच केलें आहे. आपणास कळावे म्हणौन सूचनार्थ लिहिले. विशेश काये लिहिणे, कृपा लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Bhavani Kalo informs Moroba Dada he is going towards Jejuri where the Peshwa awaits his arrival.*

No. 297] [*24-12-1770*

पौ छ ९ सवाल

श्री

राजश्री मोरोपंत दादा गोसावी यासी

S आखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य स्नो जानोजी भोसले सेनासाहेब सुभा दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लिहित असिले पाहिजे विशेष. आपणाकडून सांप्रत पत्र येऊन कुशल वृत्त कळत नाहीं तरी ऐसे नसावें. निरंतर पत्री संतोशवीत जावे. यानंतर इकडील वर्तमान वरचेवरी आपणांस लेहून पाठविलेच आहे; त्याजवरून ध्यानांत आलेच असेल. चिरंजीव राजश्री नाना[1] यासमागमे फौज आपले कराराप्रमाणे बिदा केली होतीं, त्यापैकी पथके माघारी आली. बाकी चिरंजीवाजवळ फौज आपले सांगितल्याप्रमाणेच राहिली असेल. सर्व प्रकारे निर्वाह करणे आपणासच संकट आहे. एतद्विशई वारंवार ल्याहावे तरी उपरोधीक दिसून येते. इकडील कार्यभागाविशई याददास्त चिरंजिवासमागमे लेहून दिल्ही आहे ते अवलोकन जालीच असेल. त्याप्रमाणे गंगथडी वगैरे ताकीदपत्रे आली पाहिजेत. हैदर नाईक याजकडील वकील आले होते, त्यास आपण लेहून पाठविले त्याप्रमाणेच पत्राचे उतर राजश्री रामाजी बलाल यांचे विद्यमाने लेहून दिल्हे, आणि वकिलाचा काही बहुमान न केला, आणि त्यासहि कांही न देतां बिदा केले. सांप्रत आम्हाकडील वृतांत तरी हा कालपर्यंत आपले लिहिल्याप्रमाणें नागपुरीच आहों. चिरंजीवाकडील फौज माघारी आली ते व जवळ फौज होती त्यापैकीं ऐसी फौज राजश्री शिवाजी केशव यासमागमें देऊन गंगथडीस रवाना केले आहेत. चिरंजीव राजश्री आपा[2] यास गढे मंडळे प्रांते रवाना करावयाची योजना केली आहे. आम्ही महिना दोन महिने आपले मुलकातच चारापाणी पाहोन महिना दोन

---

१ साबाजी भोसले. २ मुधोजी.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

महिना फिरोन माघारे स्वस्थळास जावें ऐसे आहे. नबाब कासमआलीखान पहिले सुभे बंगालियात होते त्याची पत्रे मागेंहि आली व हलीहि आली आहेत कीं बंगालियास जातो. फौज समागमे द्या. ऐशास बंगालियाचे रुपये फिरंगी देत नाहीं व उदेपुरी महंतहि येत नाहीत; याजकरितां त्याजकडे कारकून पत्रे देऊन पाठविला आहे त्याचे आगमन बंगालियात जालेच तरी त्याजकडेहि फौज पाठवणे लागेल. सरदारीचे वोढीचा प्रकार सर्व आपणास अवगत जालाच आहे. बहुतच सरदारी वोढीत जाली आहे. एक तर्कवा[1] आपला धरिला आहे. ज्यामध्ये या सरदारीची उभारणी होऊन राजश्री पंतप्रधान यास समयोचित उपयोगी पडे याचा अभिमान आपणास असावा. इकडील विचार आपले विचारासिवाय तिळतुल्य दुसरा नाहीं ऐशी निशा चितांत असो द्यावी. सर्व भार आपणावरी टाकून आम्ही स्वस्त आहो. आपणास कळावें. चिरंजीव राजश्री नाना याचे परामृषाविसी आपणास वारंवार ल्याहावें ऐसे नाहीं. आपण सांभाळ करितील हा आम्हास पूर्ण भरोसा आहे. वरकड अर्थ राजश्री रामाजी बलाळ लिहितील त्याजवरून कळो येईल. पहिला प्रजन्य बहुत लागला. पाहिजे त्या वेळेस न पडे याजमुळें पिके गेली. महर्गता जाली आहे. लाकूड फाटे वैरण काडी देखील मिळत नाहीं. लोकास तरी वोढीमुळें पुर्ता रोजमरा पावत नाहीं. तेव्हां लोकांची वोढ फार जाली म्हणोन मात्र महिना पंधरा दिवस बाहेर फिरोन उपरांतिक स्वस्थळास येणे होईल. यासिवाय बाहेर फिरण्याचे कारण नाहीं. रा छ ६ माहे रमजान. मागे लिहिले आहे व हलीहि लिहिण्यांत आले आहे याचे मनन करून समर्पक लिहित जावें. तदनुरूप घडत जाईल. बहुत काय लिहिणे? चिरंजीवाविसी वेफिकीर असो. कृपा लोभ असू दिला पाहिजे हे विनंती.

शिक्का
जानोजीचा

मोर्तब
सुद.

¶Janoji Bhonsle to Moroba Fadnis: urges the difficulties of money from which he was suffering and asks for help from the Peshwa particularly for equipping an expedition into Bengal against the English for reinstating Mir Kasim Ali, the deposed Nawab, who had applied for help to the writer.

---

१ आधार.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

No. 298] [13-3-1772 ?

पौ छ १९ जिल्हेज

श्री

श्रीमंत राजश्री नानासाहेब स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक लक्ष्मण बलाल साा नमस्कार विज्ञापना. ताा फाल्गुन शुध ९ मंदवासर मु काा वरवलनजीक स्वामीचे कृपावलोकनेकरून वर्तमान येथास्थित आसे विशेष. नांदेडनजीक गंगातीराहून कूच होऊन सौम्यवासरीं खंदारानजीक मुकाम फौजेचा जाहाला. लांब मजल, तोफखाना आला नाही, याजकरिता गुरुवारीं मुकाम जाहाला. काल भृगुवारीं कूच होऊन येथे आले. हीहि मजल भारींच जाहाली. काल तोफखाना आला नाही, याजकरिता आज मुकाम जाहाला. उदईक कूच होऊन तुळजापूरच्या रोखे मजल दरमजल येत आहेत. राजश्री सेनासाहेबसुभा यांचे लक्ष स्वामीकडे लागले आहे की भेट कधी होईल. आविलंबेच येऊन पोहचतांत. सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Laxman Ballal writes to Nana Fadnis about the movements of Janoji's army on its journey to Poona. Janoji—he says—is most anxious to meet the Peshwa.*

[17-3-1772 ?
[5-3-1773 ?

No. 299]

श्री

श्रीमंत राजश्री नाना स्वामीचे सेवेसी

विनंती. सेवक लक्ष्मण बलाल साा नमस्कार विज्ञापना. ताा फाल्गुन शुध १३ भृगुवासर पावेतो स्वामीचे कृपेकडून सेवकाचे वर्तमान येथास्थित आसे विशेष. पत्र येऊन सनाथ न केले याजकरिता चित सचिंत आहे. इकडील वर्तमान तरी गंगातीराहून कूच होऊन फौजा मुकाम मजकुरास आल्या. पुढेहि आविलंबेच येत आसेत. सारांश राजश्री सेनासाहेबसुभा यांचे लक्ष स्वामीपासीं लागले आहे. भेट होईल. भेटीनंतर परस्परे प्रत्ययास येईल. विस्तारे काये ल्याहावे? सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति.

¶*Laxman Ballal to Nana Fadnis informing him that Janoji is proceeding to Poona to meet the Peshwa.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

No. 300] [*23-5-1772*

श्रीलक्ष्मीकांत.

राजश्रियाविराजित राजमान्य राजश्री
हरिपंत तात्या स्वामीचे सेवेसी.

पोष्य रामाजी बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती. तागायत छ १९ सफर आपल्या कृपेकरून क्षेम असे विशेष. जासुदजोडीसमागमें सरकारचें पत्र पाठविलें तेथें आज्ञा लिहिली जे जानोजी भोसले सेनासाहेबसुभा यांच्या पोटांत तिडकेचा उपद्रव होऊन वैशाख वद्य द्वादसीस देवाज्ञा जाहाली. वाईट गोष्ट जाहाली. यैशास तुमचें प्रयोजन आहे तर जलद निघून येणें म्हणून, त्यास आज्ञेप्रमाणे त्वरेने निघून येतों, विलंब लावित नाहीं. जानोजी भोसले यांचा व कुटुंबाचा वियोग होऊन त्यांस मृत्यु आला. फारच अनुचित जाहालें तें पत्रीं काय लिहावें? भवितव्यानरूप ज्या समई जें होणे तें घडोन येते त्यास इलाज कोणाचा नाहीं. श्रीजेजुरीच्या मुकामीहून त्याचा निरोप घेतला त्या समई वियोगजनित खेद होता, त्यापुढें हे गोष्ट श्रवणांत आली, त्याचा खेद किती असेल तो श्रीहरी जाणे. सर्वाविसी निपुणता श्रीनें जानोजी-बावांसच दिल्ही होती. त्याच्या मागें आहेत त्याचा सांभाल करणार धणी सर्वज्ञ आहेत. विशेष काय लिहावें? कृपा केली पाहिजे हे विनंती.

¶*Ramaji Ballal expresses his deep sorrow for the death of Janoji Bhonsle. He further writes to Haripant that he would soon be coming as instructed by the addressee.*

No. 301] [*1-6-1772*

श्री

राजश्री आनंदरावजी स्वामी गोसावी यासीं.

ॐ अखंडितलक्ष्मुमीआलंकृत राजमान्ये श्रोा जीवनराव व हणमंतराव खुले दंडवत विनंती उपरी. येथील कुशल जाणोन स्वकीये कुशल लेखन करीत असिले पाहिजे विशेष. आपणाकडील बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कलत नवते. हाली पत्र आले ते दर्शनातुल्य जाहाले. याजप्रमाणे निरंतरी पत्री आनदंवीत असिले पाहिजे. इकडील वर्तमान तरी राजश्री जानोजी भोसले सेनासाहेबसुभा यास वैशाख वेाा ९ हे दिवसी देवआज्ञा जाहाली. थोर वाईट भगवंते केले. होणार गोष्टीस उपाई नाही. मृते

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

लोकाची वस्ती यास कोणाचा उपाये? राजश्री मुधोजीबावा मात्र समयास कालाचे वेळेस जवल होते. याजप्रमाणे वर्तमान जाहले. कर्नाटकचे वर्तमान तरी राजश्री त्रिंबकराव मामा याचे मारफातीनी सला जाहलां. तीस, च्यालीस, निदान पनास लक्षपर्येंत खंडणी जाहाली. बहुत काय लिहिणे? कृपा लोभ कीजे. रा। छ २८ माहे सफर सुा। इसने सबैन मया व अलफ.

¶*The death of Janoji Bhonsle is reported to have taken place on 21st May 1772. Trimbakrao Pethe has finished the Carnatic campaign successfully, says the writer.*

No. 302] *[25-8-1773*

श्री

शेवेसी विठल शामराज चरणावरी मस्तक ठेऊन सा। नमस्कार विज्ञापना. ता। छ ६ जमादिलाखर पावेतों मो। धारूर नजीक किले नरनाला वर्तमान येथास्थित असे विशेष. येथील वर्तमान पेसजी विनंती पत्री लिहून छ ४ मिनहूस सुतरस्वारा बा। शेवेसी पाठविली आहेत. सांप्रत राजश्री सेनाधुरंधर तिकडे अल(ज)पुरास गेले आहेत. तेथे इस्माळखानानी साफ उतर केले जे आपण सुभेदारी सोडीत नाहीं व शहरांतून बाहीर निघत नाही. रुकनदौला जे करितील ते कबूल आहे. तेव्हा सेनाधुरंधर त्यास बोलिले जे धनी हायेत त्यासी आग्रह आपण इतका करू नये. ते बोलले जे मदारुलमाहा येथे कशास आले? हैदरबादेहून चिठी हरखासेची पाठवावी असती मी मान्य करितो की नाही पाहावे होते. जाबितजंगाचा आग्रह इतका आहे तर त्यासच पाठवावयाचे होते. उभयेताची लढाई पाहावयाची होती. असो आता त्याणी हैदराबादेस जावें. मीहि मागाहून जातो. असा आग्रह पाहून यानी उतर केले की आम्ही मरतो; आमची दौलत जाती या अर्थी काये सांगतां. तेव्हां कजवब होऊन बोलिला जे मजकरितां तुमची दौलत बुडती तर इतके करा, सुभेदारी मजला नलगे. आणी चाकरीहि त्याची करीत नाहीं. मुलास पांच सात लक्षांची जागीर देतां त्यामध्ये अलजपूर द्यावे. अलजपूरची आमचीं वस्ती शे दीडशे वर्षाची हे सोडिणार नाही. सरकारच सुभा राहणे तरी हमेशा सुभ्याने अकोल्यात राहावे येसा पथच आहे. सुभा कांही अलजपुरांत राहत नाही. अलजपूर आपल्यांकडे असावे हा अग्रह धरला आहे. याजकरितां राजश्री माधवराव आपांस बलाविले आहें की येताना तुम्ही त्या लस्करांतून यावे. ही मसलत मदारुलमाहा यांस अर्ज करून असेच पके होये असे ठराऊन येणे. त्यास माधवराव कालपावेतो रुकनतदौलाच्या लस्करांत होते.

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

आज मसलत काये ते ठराऊन तिकडेस गेले असतील. याप्रो तिकडील वर्तमान. या लस्करचे वर्तमान बाहीर व रघोजीबावा व सरदार मातबर पांच सात हजार येथेच आहेत. आपासाहेबाबरोबर च्यार हजार फौज गेली. त्यास येथील लोकांही पोटाकरिता दंगा केला. लोक आपासाहेबाकडून उठोन जातो म्हणो लागले. त्या अर्थी छ ४ रोजी मिनहूस संध्याकाली मल्हारपंतानी बाईजवल हे वर्तमान लोकाचे सांगितले. त्याजवरून राणोजी नाईक व शंकराजी घोरपडे व हनमंतराव घांटगे व पाटणकर व पोल व मान्ये व सिंदे व होलकर वगैरे सरदारास बाईनी आपल्या डेन्यास बोलाऊन आणिले; आणि त्यांचे समाधान केले जे आठ दिवस सबुरी करावी. आपासाहेबाकडून काये जाबसाल येतो तो पाहू. खर्चाचीहि कोठे विचारणा करु. याप्रो प्रहररात्रपर्यंत लोकाची समजोती करून विडे देऊन वाटेस लाविले. लोकाचे देण्याची निकड फार आहे. बाईचा जामदारखाना व तोशेखाना वगैरे सरजाम होता तो सारा सुतलीचा तोडा उंटावर लादून किले नरनाले याजवर पाठविला. च्यार पोशाक ठेविले आहेत. सडा सरंजाम वोढणा बिछयाना काही भांडी व डेरा राहुटी बाडें इतके मात्र आहे. नवीन वर्तमान छ ७ रोजी प्राथःकाली अलजपुरीहून साडणी आली, ते पत्र येकांती मल्हारपंती व महिपतराव विश्वनाथ यानी बाईस वाचून दाखविलीं. ते क्षणीच कुच्याचा नगारा केला. मातुश्री बाई किल्यावरी चालिली; व रघूजीबावास सरदार कोन्ही फौजेत पाा यास्तव समागमे द्यावे यैसेहि आहे; व बाईबराबर किल्यावर जावें हेहि आहे. वरकड फौज घोरपडे निंबालकर घाडगे पाटणकर यैसे सर्व लाहाण मोठे सरदार घेऊन मल्हारपंत बालापूर आकोल्याकडेस चालिले. मोगलावर दाब पडोन इस्मालखानास सुभा कायेम होईल तरी फौजा बोलाऊन घ्याव्या आणि सला करावा; नाहीतर आग्रहावर गोष्ट पडली तरी सेनाधुरंधर यानी अलजपुरासच आसावें. पटानाचे बरोबर जें होईल तें हो. कबूल आहे. या फौजानी बीड पाथरी वगैरे तह वरजेगांचा मुलुक मारीत जावें. सरकारच्या तालुक्यास उपद्रव न द्यावा असे म्हणतात खरे, परंतु भरवसा दिसत नाही. बंदोबस्ती काये करणे ते करावी. खंडेराव दरेकराजवल फौज मातबर आसावी. सांप्रत्य मसलत बिगडलसी दिसती. देवाजीपंतानी फार आग्रह केला जे श्रीमंताचे व मोगलांचे द्रोही जालांत दौलत बुडती असे करूं नका; परंतु कोन्ही यैकत नाही. छ ७ राखर त्रितीये प्रहरी मातुश्री बाईनी दरबार करून मातबर सरदार बोलाऊन रघोजीबावास त्यांचे हाती दिल्हें जे हे सरदार तुमचे; यांचे संरक्षण करावे. सर्वांस सांगितले. आतां त्रितीये प्रहरानंतरी कूच्य करून बाई किल्यावर जाणार. अंबारी कसावयासी हुकूम केला आहे. मग कूच्य करून जातात किंवा उदईक

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

जातील हे न कले. देवाजीपंत बहुत आपले ठिकाणी श्रमी आहे की बुडविले. अजूनतरी सांभाला; परंतु कोन्ही यैकत नाही. आज त्रितीये प्रहरपर्यंत इतके वर्तमान जाले. सेवेसी श्रुत होय सेवकास काये आज्ञा? येथें राहू किंवा अलजपूरास जाऊ? आज्ञा करणार धणी समर्थ आहांत. हे विज्ञापना. आता फौज सारी च्यार पांच हाजार आहे. सेनाधुरंधर याजसमागमे आलजपुरास च्यार हजार ठेविली आहे. सेवेसी श्रुत्य होये हे विनंती.

¶*Vithal Samraj gives news about Mudhoji, Raghuji Bhonsle and Ismailkhan of Ellichpur.*

No. 303] [*14-1-1774 ?*

पाा छ ६ शैवाल

मोकाम बगरू

श्रीरघुवीर

राजश्री रघुनाथपंत

गोसांवी यासी

॥ सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मीआलंकृत राजमान्य श्री मुधोजी भोंसले सेनाधुरंधर दंडवत विनंती. उपरी: येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लिहित असिले पाहिजे विशेष. गोसांवियाकडून बहुत दिवस पत्र येऊन वर्तमान कळों येत नाहीं; तर सविस्तर वृत लिहून पाठवीत असिले पाहिजे. आमचें वर्तमान तर पुण्याचा गुंता उरकून स्वार जालों ते मजल दरमजल बनस नदीवर येऊन दाखल जालों. येथून लस्करांत सत्वरच येऊन दाखल होतो. तुम्हास कलावें म्हणून लिहिलें असे. कोणते स्थलीं यावें हें लिहून पाठवावें. रवाना छ १ माहे सवाल. विशेष काये लिहिणें? लोभ असों दिल्हा पाहिजे हे विनंती.

¶*Mudhoji Bhonsle informs one Raghunathpant of his having left Poona after despatching his business there.*

No. 304] [*18-8-1774*

श्रीशंकर

सेवेसी विठल सामराज चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार विनंती. ताा छ १० माहे जमादिलाखर मुकाम मौजे खानापूर नजीक आकोट स्वामीच्या

CC-0. Agamnigam Digital Preservation Foundation, Chandigarh

कृपावलोकनेकरून वर्तमान येथास्थित आसे. येथील वर्तमान छ ७ मिनहूस विनंतीपत्र लिहून सुतरस्वाराबरोबर सेवेसी रवाना केली. सांप्रत्य वर्तमान छ ७ रोजी मातुश्री दर्याबाई यानी कूच्य करून नरनालेयावर जांवे या आर्थी तयारी केली. त्यास त्यांचे खास पागेचे बारगीर यानी तलबेसांठी गवगवा केला व राजश्री दिवाकर पुरुषोत्तम याही बाईकडेस जाऊन त्यांस सांगितले जे तुम्ही गडावर जावे, रघोजीबावानी फौजेसुधा प्रांतात जांवे. आपासाहेब तिकडे सल्यास गेले आहेत. हे मसलत उतम दिसत नाही. फौज आपली आनिवार. मोगलाच्या मुलखात आगर श्रीमंताच्या मुलखात धामधूम करतील, खंडण्या घेतील येणेकरून उभयेताकडेस विपर्यास पडेल, मोठ्या कामात नाश होईल याआन्वई येक प्रहर पर्यंत बाईस बोधविले. तेव्हा बाईनी उतरीं दिल्हे जे लोकास खर्चासि काये करावे? दाहावीस हजार रुपये द्यावे तरी आलजपूरचे काम पाहून निष्कर्शी त्यांचा बिगाड जाला तरी हे मसलत योजिली हे बरीच आहे. परंतु तांतड करू नये येसे बहुताप्रकारे सांगोन किल्यावर जाण्याची व मुलुखात फौज पाठवावयाची तजवीज राहिली. वीस हाजार रुपये बाईनी लोकास द्यावे येसे ठरले. दिवाकरपंत आपले रावटीस आले. तो संध्याकाळीं संकराजी घोरपडे बाईकडे आले. मल्हारपंतास बालाविले. त्यानी येकप्रहर रात्रपर्यंत बसून बाईस भार्षाविले जे लोक पोटाविणा हैराण आहेत, तुम्ही वीस हाजार रुपये दिल्हे, याने कायें जाले? पुन्हा: लोक गवगवा करितील, तुम्ही कोठवर द्याल? तिकडेस जावसालास आपासाहेब गेलेच आहेत. तह ठरलाच तरी आम्ही कांहीं लांब जात नाही. आपासाहेबानी बोलाविले म्हणजे लवकरच येऊ येविशेई साहेबांची आज्ञा आहे. जेथे बोलावितील तेंथे येऊ. फौज येके जागा बसल्याने कसी पोसेल? असे प्रहर रात्रपर्यंत बोलून फिरून मसलत केली जे बाईने गडावर जावे व रघोजीबावा फौजसुधा मुलखात जावे. दुसरे छ ८ रोजी किल्यावर जाण्याची बाईनी तयारी केली. स्वार व्हावे तो बारगीर सेदीडसे येऊन आडऊन बसविले. तेसमई लोकानी दंगा केला. मागती येक रावटी उभी करऊन बसली. राडा सांजपर्यंत पडला. वीस हाजार रुपये देणे ठरले. बाईने सांगितले जे किल्यावर जाऊन रुपये पाठवितो. लोक नायेकत. मल्हारपंती हवाला घेतला, तेव्हा संध्याकाली गजराचे वेले पाउसातच निघोन बाई किल्यावर गेली. दोन प्रहर रात्रीस किल्यावर पावली. हाती उटे घोडी सारी खालती साहानुरात (?) ठेविली. आपण पालखीत बसोन सेसवासे पायेदलसुधा किल्यावर दाखल जाली. देवाजीपंत व महिपतराव विश्वनाथ उभयेता समागमे गेले. छ ८ ताा हे वर्तमान. छ ९ रोजी बाईनी काही सोने रुपये वस्त्रे पाा. बार-

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

गिराचा फडच्या करून रघोजीबावानी कूच्य करून मुकाम माारास आले. आज तीन रोज आलजपुराकडोन काही वर्तमान आले नाही. पहिली मसलत ठरली होती जे घोरपडे आदिकरून सरदार व मल्हारपंत समागमे देऊन फौजा पाठवाव्या. तेव्हा निंबालकर घाटगे यानी सांगितले जे आम्ही याजबरोबर जात नाही. रघोजीबावा समागमे द्या येसी पत्रे आपासाहेबास लिहून पाठविली. त्याचेहि उतरी आले. रघोजीबावास समागमे द्यावे. बाईनी जरीपटका निशान व नौबत वस्त्रे देऊन रवाना केले. फौजेची बोलवा घाटपर्यंत येण्याची आहे. आपल्याकडील बंदोबस्ती असावी. सूचनार्थ विनंती लिा आहे. मी अद्यापि या फौजेतच आहे. याजवल आसावे किंवा सेनाधुरंधर याजकडेस जावे? जसी आज्ञा येईल तेथे राहीन. फौज घाटावर येणार हे वर्तमान येकूण याजबरोबर आलो साा की वर्तमान सो पोहोचले पाा. सेवेसी शृत्य होये हे विज्ञापना.

¶*Vithal Samraj reports to Nana the movements of Daryabai and Raghuji, her adopted son.*

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh



Offset, G.P.Z.O. Poona, 1931.

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh

श्रेणी —— क्रम-संख्या ——

श्रेणी —— क्रम-संख्या ——

CC-0. Agamnigam Digital Presevation Foundation, Chandigarh